म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
ग्रं. नं. ८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
(जिल्हा वाचनालय)
REFBK-0001515

निबंधाचे मूलस्थान.

अनु. के. ल. ओगले.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे
No. A. 362
दि. क्र. 9494

सं. नि. ३८२

श्री.

ग्रंथसंपादक व ग्रंथ प्रसारक मंडळीची ग्रंथमाला,

ग्रंथ ४४ वा.

आर्य लोकांचें मूलस्थान

अथवा

उत्तर ध्रुवाजवळील आर्यांच्या वसतीविषयीं वेदांतील पुरावा.

REFBK-0001515

हें पुस्तक

रा. रा. केशव लक्ष्मण ओगले, बी. ए.

यांनीं

लो० बाळ गंगाधर टिळक, यांच्या 'आर्क्टिक होम इन दि वेदाज'

या ग्रंथावरून मराठींत लिहिलें.

प्रकाशक,

दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

प्रिंटर्स, पब्लिशर्स व कमिशन एजंटस्, ठाकुरद्वार—मुंबई.

सन १[redacted] इ.

किंमत रुपये दोन.

हें पुस्तक

मुंबई, 'इंदुप्रकाश' स्टीम प्रेसमध्यें छापिलें.

(या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे ठेविले आहेत.)

प्रस्तावना.

'वेदकालनिर्णय' या पुस्तकाकडे ज्या कारणानें प्रस्तुत लेखकाची दृष्टी वळली, त्याच कारणानें या पुस्तकासंबंधानेंही त्याच्या मनांत प्रथम विचार उत्पन्न झाला. हें पुस्तक लो. **बाळ गंगाधर टिळक** यांच्या 'The Arctic Home in the Vedas' नांवाच्या इंग्रजी पुस्तकाचें सारांशभूत रूपान्तर आहे मूळ पुस्तक प्रसिद्ध झाल्यापासून थोड्याच दिवसांनीं त्याला मराठी रूप देण्याचें या लेखकांच्या मनांत आलें. परंतु त्यावेळीं लो. **टिळकांस** परवानगी विचारिली असतां त्यांनीं सांगितलें कीं, त्या पुस्तकासंबंधानें पाश्चात्य व देशी पंडितांचे अभिप्राय आल्यावर त्याचें मराठींत भाषांतर करविण्याचा विचार आहे. परंतु पुढें थोड्याच दिवसांनीं देशांतील वातावरण बिघडल्यामुळें असल्या वाङ्मयात्मक रूक्ष विषयांकडून सर्वांचें मन राजकीय विषयांकडे वळलें. तेव्हां या पुस्तकासंबंधाचा विचार मागें पडल्यासारखा वाटूं लागला. मूळ पुस्तकाच्या सर्व प्रती खपून तें दुर्मिळही झालें. तेव्हां आतां अधिक वाट पहाण्यांत अर्थ नाहीं, असें मनांत आणून पुस्तकाला मराठी रूप देण्याची परवानगी द्यावी ह्मणून पुनः एकवार **टिळकांना** प्रस्तुत लेखकानें विनंति केली; व त्यांनींही पारिस्थिति लक्षांत घेऊन होय ह्मटलें. परंतु त्याप्रमाणें कामास सुरुवात करण्यापूर्वीच **टिळकांवर** सर्वांना माहीत असलेला अनर्थ गुदरला. त्यामुळें पुनः कांहीं काळ अस्वास्थ्याचा गेला. परंतु एकदां मनांत आणलेलें काम करणें अवश्य समजून सवडीप्रमाणें 'आर्यांच्या उत्तर ध्रुवाजवळील वेदनिर्दिष्ट मूलस्थानाला' मराठी रूप दिलें. मागील पुस्तक स्वतः **टिळकांच्या** नजरेखालून गेलेलें होतें. परंतु प्रस्तुत पुस्तकासंबंधानें तसा प्रसंग सध्यांतरी

लांबणीवर पडलेला दिसत आहे. असें असल्यामुळें त्यांच्यासारख्याच दुसऱ्या कोणा विद्वानास तें प्रथम दाखवावें असें वाटून रा. ब. चिंतामणराव विनायक वैद्य यांस त्याचा हस्तलेख वाचून पहाण्यासाठीं विनंति केली. त्या विनंतीला मान देऊन त्यांनीं आपला अमूल्य वेळ खर्चून हस्तलेख समग्र वाचून पाहिला, आणि बऱ्याच महत्वाच्या सूचना केल्या. याबद्दल प्रस्तुत लेखक त्यांचा फार ऋणी आहे. या पुस्तकाच्या आरंभीं जोडलेला उपोद्घात त्यांच्याच सूचनेवरून जोडला आहे. असो. एवढें झाल्यावर प्रकाशकांच्या सवडीप्रमाणें काम होऊन पुस्तक वाचकांसमोर आलें आहे.

हें पुस्तक 'वेदकालनिर्णयाच्या' पुढची पायरी आहे. संपाताच्या क्रान्तिवृत्तांतील स्थानाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उल्लेख करणारीं जीं वचनें ऋग्वेदांत आढळतात, त्यांवरून वेदकाल ठरविण्याचा प्रयत्न 'वेदकालनिर्णय' या पुस्तकांत केलेला आहे. त्यांतील अतिप्राचीन कालाची मर्यादा शा. शकापूर्वी ६००० वर्षांपलीकडे जात नाहीं. परंतु हा काळ कांहीं वैदिक धर्माचा आरंभकाल असें ह्मणतां येणार नाहीं; कारण तेव्हां यज्ञयागांच्या नियमनासाठीं कोणत्या तरी कालमापनपद्धतीची आवश्यकता वाटूं लागली होती. अर्थात् त्याच्यापूर्वी बराच काळपर्यंत यज्ञयागांची वाढ होत होती असें उघड दिसतें. 'वेदकालनिर्णयांत' स्वीकारलेल्या पद्धतीनें या अति प्राचीन काळाचा मागमूस सांपडत नाहीं. कारण पुनर्वसूंच्या पलीकडील संपाताच्या क्रांतिवृत्तांतील स्थितीचा उल्लेख वेदांत आढळत नाहीं. परंतु नवीन शास्त्रीय शोधांवरून या काळाची थोडी बहुत तरी कल्पना होण्यास मार्ग झाला आहे. भूस्तरशास्त्र आणि पुराणवस्तुशास्त्र यांतील शोधांवरून अलीकडे कित्येक महत्वाच्या गोष्टी कळून आल्या आहेत. त्यांत उत्तरध्रुवप्रदेश पूर्वी एका काळीं वसतियोग्य होते व पुढें हिमकालांत येथील हवा भयंकर थंड झाली असें कळून आलें. यूरोपांतील आर्य लोक मूळचे तेथील नव्हत, व ते उत्तरेकडून खालीं आले असावे असें मत अलीकडे विद्वानांत होऊं लागलें होतें. परंतु उत्तरेकडील प्रदेश मनुष्यांना राहावयास आजच्या सारखेच पूर्वीही सर्वथा अयोग्य होते, अशी जोंपर्यंत समजूत होती, तोंपर्यंत आर्यांच्या मूलस्थानाचा प्रश्न तसाच घुटमळत राहिला होता. त्या बरोबरच आमच्या वैदिक ग्रंथांतील कित्येक वरवर सरळ दिसणाऱ्या वचनांचा अर्थही

कसाबसा ओढून केल्यामुळें तो कित्येक पंडितांना समाधानकारक लागत नव्हता. पारशी लोकांचा धर्मग्रंथ जो 'अवेस्ता' त्यांत त्यांचें प्राचीन स्थान बर्फाच्या पुरामुळें नष्ट झाल्यामुळें तेथील लोकांना अन्यत्र जावें लागल्याचें जें वर्णन आहे, त्याचाही नीट उलगडा आजपर्यंत झाला नव्हता. परंतु उत्तरध्रुवप्रेदशांत पूर्वी एक भूखंड असून त्याचा बर्फाच्या पुरानें नाश केला असें भूस्तरशास्त्रावरून अलीकडे कळून आल्यामुळें आणि या हिम-युगाचा काळ आणि प्राचीन कालगणना यांचा मेळ पडत असल्यामुळें आर्यांचें मूलस्थान आणि त्यांच्या सुधारणेचें प्राचीनत्व यांवर नवीन प्रकाश पडला आहे. या प्रकाराचें वर्णन यथाक्रम या ग्रंथांत केलें आहे.

या प्रकरणीं टिळकांनीं दोन गोष्टींचें प्रतिपादन केलें आहे. पहिली अशी कीं, हिमकालाच्या पूर्वी वैदिक ऋषींचे पूर्वज ध्रुवाजवळच्या प्रदेशांत राहत होते. आणि दुसरी अशी कीं, हिमकालांत त्या स्थानाचा नाश झाल्यामुळें ते नवीन प्रदेश शोधीत दक्षिणेकडे उतरले. यांतील दुसरी गोष्ट म्हणजे पहिल्या गोष्टीवरून साहजिकपणें निघणारें अनुमान होय. पहिली गोष्ट सिद्ध करण्यास वेदांतील वचनांचा आधार आहे, असें या पुस्तकांत दाखविलें आहे. परंतु या वचनांचा अर्थ जसा येथें केला आहे, तसा अर्थ करतां येत नाहीं असें कित्येकांचें मत आहे. वाईचे धर्ममार्तंड वे. शा. सं. काशीनाथ वामन शास्त्री लेले यांनीं आपल्या धर्म नांवाच्या साप्ताहिकांत टिळकांच्या मूळ पुस्तकावर सर्वस्वीं प्रतिकूल टीका केली आहे. त्यांच्या टीकेंत मुख्य दोन मुद्दे आहेत. पहिला मुद्दा असा कीं, आर्यांचें मूलस्थान भरतखंडांत असून तें उत्तरध्रुवाजवळ असणें केव्हांही शक्य नाहीं; कारण ऋग्वेदांत जीं स्थलांचीं नांवें आलेलीं आहेत, तीं भरतखंडांतील स्थलांनाच आज लाविलेलीं असून त्या नांवांचीं स्थलें उत्तरध्रुवा-जवळ मुळींच नाहींत; गंगा, यमुना इत्यादिक अनेक नद्यांचीं नांवें ऋग्वेदांत आलेलीं असल्यामुळें तत्कालीन लोक भरतखंडापेक्षां इतरत्र असणें शक्य नाहीं. पण हा शास्त्रीबोवांचा आक्षेप निरर्थक आहे. प्रश्न आहे तो वेदकालीन आर्यांच्या स्थानाचा नसून वैदिक ऋषींच्या पूर्वजांच्या स्थानाचा आहे. ऋग्वेदांत ३६० दिवसांचें व बारा महिन्यांचें वर्ष स्पष्ट सांगितलें असल्यामुळें, वैदिक ऋषी अशी स्थिति असणाऱ्या या भरतखंडांत रहात होते याविषयीं शंकाच नाहीं; पण त्याच ऋग्वेदांत

केवळ ध्रुवप्रदेशांतच आढळणाऱ्या अशाही गोष्टींचें वर्णन कोठें कोठें असल्यामुळें त्या गोष्टी वैदिक ऋषींना आपल्या पूर्वजांपासून परंपरेनें कळल्या होत्या, व ह्मणून ते पूर्वज पूर्वी ध्रुवाजवळ रहात असले पाहिजेत असें टिळकांचें प्रतिपादन आहे. या प्रतिपादनाला लेले शास्त्रीबुवांच्या पहिल्या मुद्यावरून मुळींच धक्का लागत नाहीं. शास्त्रीबुवांचा दुसरा मुद्दा असा आहे कीं, टिळकांनीं प्रस्तुत ग्रंथांत जीं वैदिक वचनें आधाराला घेतलीं आहेत त्यांचा त्यांनीं सुचविल्याप्रमाणें अर्थ होणें शक्य नाहीं, अतएव त्यांवरून ध्रौविक वसतिस्थान मुळींच सिद्ध होत नाहीं. शास्त्रीबुवांनीं या विषयीं आपल्या 'धर्मांत' जें विवेचन केलें आहे, त्याचा खरेखोटेपणा ठरविण्याची शक्ति प्रस्तुत लेखकाजवळ नाहीं. पण एवढें मात्र सांगतां येईल कीं, त्या वचनांपैकीं कित्येक जरी सोडून द्यावीं लागलीं, तरी दुसरीं मूलसिद्धान्ताची खात्री करून देणारीं अशीं कांहीं वचनें त्यांत आहेत. हीं वचनें अगदीं थोडीं असलीं तरीही त्यांवरून ध्रुववसति-स्थानाची सिद्धता होण्यास अडचण पडणार नाहीं. उषेच्या चक्राकार गतीचें वर्णन, दीर्घ रात्रीच्या अंताला पोहोंचण्याविषयींची आतुरता दर्शविणारीं वचनें, गवामयनाचें वर्णन, इत्यादि गोष्टी अगदीं सरळ असून तेवढ्यावरूनच मूल सिद्धांत स्थापित होण्यासारखा आहे. या दुसऱ्या मुद्याच्या विवरणांत शास्त्रीबोवांचा कोटिक्रम कित्येक ठिकाणीं तर अगदीं बालिश झालेला आहे, इतकेंच नव्हे तर तो वाचला असतां लेखकाला खरोखर मनापासून टीका करावयाची आहे कीं केवळ थट्टा करण्यासाठीं तो लिहीत आहे, असा प्रश्न वाचकाच्या मनांत सहज उत्पन्न होतो.

प्रस्तुत पुस्तकांत ग्रथित केलेल्या सिद्धांतावर 'श्रीसरस्वतीमंदिर' या मासिक पुस्तकांत रा. सा. नारायण भवानराव पावगी यांनीं 'सप्तसिंधूंचा प्रांत अथवा आर्यावर्तांतील आमची जन्मभूमी' या मथळ्याखालीं लिहिलेल्या कित्येक लेखांतही टीका केलेली आहे. ही टीका अंशतः अनुकूल आणि अंशतः प्रतिकूल आहे. रावसाहेब नाना पावगी यांस टिळकांनीं प्रतिपादन केलेला पहिला मुद्दा तत्त्वतः कबूल आहे, परंतु दुसऱ्या मुद्यासंबंधानें त्याचें मत जरा निराळें आहे. त्यांच्या ह्मणण्याचा इत्यर्थ असा आहे कीं, आर्यांचें उत्पत्तिस्थान भरतखंडांतच असून पुढें ते

आपल्या पराक्रमानें दिग्विजय करीत उत्तरध्रुवप्रदेशांत गेले आणि तेथें त्यांनीं विस्तीर्ण वसाहती स्थापन केल्या; परंतु पुढें त्या प्रदेशांत हिमयुग सुरू झालें, तेव्हां त्यांना पुनः आपल्या मूळ ठिकाणीं यावें लागलें. उत्तरध्रुवाजवळील प्रदेशांत आर्यांची वसति पूर्वी होती हें दाखविण्यासाठीं जीं प्रमाणें म्हणजे वैदिक वचनें प्रस्तुत पुस्तकांत दिलीं आहेत त्याच प्रमाणांवरून पावगीनींही तीं गोष्ट सिद्ध होते असें दाखविलें आहे. परंतु पुढें ते असें म्हणतात कीं, आर्यलोक मूळचे उत्तरध्रुवावरील नसून तेथें ते वसाहत करण्यासाठीं मात्र गेले होते; खरोखर आर्यांचें उत्पत्तिस्थान भरतखंड होय. आपल्या सिद्धान्ताच्या पुष्ट्यर्थ पावगींनीं बरेंच विवेचन करून श्रीसरस्वतीमंदिराच्या शेवटच्या अंकांत आठ कारणें संकलित करून दिलीं आहेत. त्यांचा सविस्तर विचार करण्याला येथें जागा नाहीं. येथें एवढें सांगितलें म्हणजे पुरे कीं, त्यांनीं दिलेल्या कारणांवरून भरतखंडांत प्राणी व वनस्पति अगदीं प्राचीन काळीं उत्पन्न झालेल्या होत्या एवढें सिद्ध होईल. पण आर्यांचा उत्पत्ति तेथें झाली कीं काय, या प्रश्नाचा निर्णय त्यांवरून होईल असें खास म्हणतां येत नाहीं. नाना पावगी यांच्या विवेचनांत कल्पनेचेंच साम्राज्य विशेष आहे, असें वाचकांस वाटल्यावांचून रहात नाहीं.

असो. आतां मूळपुस्तकासंबंधानें थोडी* माहिती सांगून ही प्रस्तावना पुरी करूं. 'वेदकालनिर्णयांत' ठरविलेला वेदांचा काळ दुसऱ्या पंडितांनीं स्वतंत्र शोधांनीं ठरविलेल्या काळाशीं मिळता झाला. परंतु पूर्वी सांगितल्याप्रमाणें तो कांहीं आर्यसुधारणेचा आरंभकाल नव्हे; कारण वेदांत आढळून येणारी आर्यसुधारणा बरीच उच्च दर्जाची आहे. या सुधारणेचा आरंभकाल संपाताच्या स्थानावरून दिसून येणाऱ्या कालापूर्वी बराच असला पाहिजे हें अगदीं उघड आहे. 'मृगशीर्ष अथवा वेदांच्या प्राचीनत्वाविषयीं शोध' Researches into the antiquity of the Vedas हें पुस्तक लिहिल्यानंतर टिळकांनीं या काळाचा शोध चालू ठेविला. इतक्यांत १८९७ सालीं महाराष्ट्रांत राजकीय वातावरणांत खळबड उडून सरकारनें कित्येक देशी पत्रांवर खटले केले व त्यांत टिळकांच्या केसरीवर प्रामुख्यानें खटला होऊन त्यांना अठरा महिन्यांची सक्त मजुरीची

---

* हा मजकूर मूळ पुस्तकाच्या प्रस्तावनेवरून घेतला आहे.

शिक्षा झाली, आपल्या इकडे विद्याव्यासंगी लोकांना तुरुंगांत असतांना आपला व्यासंग चालू ठेवणें बहुतेक अशक्यच असतें. परंतु प्रसिद्ध संस्कृत पंडितें परलोकवासी प्रो. मॅक्समुल्लरप्रभृति टिळकांच्या कित्येक स्नेह्यांच्या खटपटीमुळें त्यांना तुरंगावासांतही आपला व्यासंग चालू ठेवितां आला. प्रो. मजकुरांनीं आपण प्रसिद्ध केलेल्या ऋग्वेदाच्या दुसऱ्या आवृत्तीची एक प्रत टिळकांकडे पाठवून दिली आणि सरकारनेंही कृपाळू होऊन हें आणि दुसरीं पुस्तकें वाचण्यास, तसेंच रात्रींही थोडा वेळ दिव्याशीं वाचावयास त्यांना परवानगी दिली. या वाचनाच्या वेळेसच त्यांनीं उत्तर-ध्रुवावरील वसतीचीं दर्शक अशीं ऋग्वेदवचनें गोळा केलीं. एक वर्ष तुरुंगवास भोगल्यावर प्रो. मॅक्स मुल्लर साहेबांच्या विशेष खटपटीमुळें त्यांची सुटका झाली. प्रो. मॅक्स मुल्लर साहेबांस **टिळक** हे '**ओरायन**' पुस्तकाचे कर्ते एवढ्याच नात्यानें माहीत होते. तुरुंगांतून सुटल्यावर टिळकांनीं प्रोफेसर साहेबांस त्यांच्या निरपेक्ष प्रेमाबद्दल मनःपूर्वक आभार मानण्यासाठीं पत्र लिहिलें आणि त्यांतच आपण काढिलेल्या नवीन सिद्धान्ताचीं प्रमाणें सारांशरूपानें लिहिलीं. या पत्राच्या उत्तरांत प्रो. मॅक्समुल्लर यांनीं असें लिहिलें कीं, टिळकांनीं सुचविल्या प्रमाणें कित्येक वैदिक वचनांचा अर्थ होणें शक्य आहे, तरी कदाचित् त्यांवरून निघणारा सिद्धांत भूस्तरशास्त्राच्या सिद्धातांशीं जमणार नाहीं. पण संपूर्णविवेचनात्मक असा हा मूळग्रंथ बाहेर पडण्यापूर्वीच प्रो. मॅक्स मुल्लर परलोकवासी झाल्यामुळें त्यांच्या अधिकारयुक्त अभिप्रायाचा लाभ टिळकांस झाला नाहीं, ही दुःखाची गोष्ट होय. असो.

या ग्रंथाचा मूळ हस्तलेख १८९८ सालीं लिहिला. त्यानंतर टिळकांनीं हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत प्रवास करीत असतां, मद्रास, कलकत्ता, लाहोर, काशी, इत्यादि ठिकाणीं अनेक विद्वानांबरोबर या विषयासंबंधानें चर्चा केली. या ग्रंथांत काढिलेला सिद्धांत भूस्तरशास्त्राच्या सिद्धांताशीं जमणार नाहीं असा जो मॅक्समुल्लर साहेबांनीं आक्षेप काढला होता, त्याचा आमच्या ग्रंथकारांनीं पूर्वीच विचार करून ठेविला होता. तरीही भूस्तरादि अनेक सृष्टिशास्त्रांतील नवीन शोधांचें योग्य आकलन आपल्याला झालें आहे कीं नाहीं, अशा शंकेनें त्यांनीं बरेच दिवस हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें काम लांबणीवर टाकिलें. पाश्चात्य देशांतील सकलशास्त्रकलांचीं क्रीडामंदिरें

झालेल्या विद्यापीठासारखीं विद्यापीठें आपल्या देशांत सांप्रत नसल्यामुळें, एखाद्या विषयासंबंधानें शोध करणाऱ्या विद्वानाला तदानुषंगिक इतर विद्यांच्या ज्ञानाचा वाटेल तेव्हां उपयोग करून घेण्याचें साधन नाहीं. त्यामुळें एखाद्याला एखादी कल्पना सुचली तर ती सांप्रतच्या ज्ञानाच्या स्थितींत शक्य आहे कीं नाहीं, याचा शोध येथें करतां येत नाहीं; आणि म्हणून कोणी काय म्हणतील याचा विशेष विचार न करतां धैर्यानें ती कल्पना लोकांपुढें मांडिल्याशिवाय त्याला गत्यंतर नसतें. अशा स्थितींत शोधाचें काम चाललें असतां प्रसिद्ध आंग्ल विश्वकोशाची दहावी आवृत्ति इकडे प्रसिद्ध होऊन त्यांत दिलेल्या भूस्तरशास्त्रांतील अगदीं नवीन शोधांची संगति आपल्या सिद्धांताशीं लागल्यामुळें टिळकांनीं हें पुस्तक प्रसिद्ध केलें.

या ग्रंथाचा गर्भसंभव जसा संकटावस्थेंत असतांना झाला, तसा त्याचा जन्म त्याहूनही बिकट परिस्थितींत झालेला आहे. १९०२ पासून वर्ष दोन वर्षें महाराष्ट्रांत गाजत असलेल्या प्रसिद्ध ताई महाराजांच्या प्रकरणांतील टिळकांवरील फौजदारी खटला चालू असतांना या पुस्तकाचें प्रकाशन झालें. पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर थोडक्याच दिवसांनीं मुंबईच्या हायकोर्टांत या खटल्याचा शेवटचा निकाल होऊन टिळक पूर्ण निर्दोषी होऊन सुटले.

या ग्रंथाचें प्रकाशन झाल्यावर थोड्याच दिवसांनीं प्रस्तुत लेखकानें व्याख्यानरूपानें त्यांतील सिद्धांतांची मराठी जाणणाऱ्यांसाठीं माहिती करून दिली होती, व तें व्याख्यान अंशतः तत्कालीन इंदुप्रकाशांत प्रसिद्धही झालें होतें. त्यावर त्याचें हें साग्र स्वरूप (थोडें बहुत पाल्हाळिक विवेचन गाळून) मराठी वाचकांस सादर करण्याचा ईश्वरकृपेनें योग आतां आला आहे. वाचकांना तें आवडल्यास आमच्या श्रमाची सार्थकता झाली असें होईल.

के. ल. ओगले.

अनुक्रमणिका.

प्रकरण.	विषयाचें नांव.	पृष्ठें.
उपोद्घात.	... ...	१——६
प्रकरण १ लें.	इतिहासपूर्वकाल.	७—२४
,, २ रें.	हिमकाल अथवा बर्फाचा पूर.	२५—४२
,, ३ रें.	ध्रुवप्रदेश.	४३—६३
,, ४ थें.	देवांची रात्र.....	६४—७६
,, ५ वें.	वैदिक उषा.....	७७—१०६
,, ६ वें.	दीर्घ रात्र आणि दीर्घ दिवस.	१०७—१२४
,, ७ वें.	मास आणि ऋतु.	१२५—१५२
,, ८ वें.	गवां अयनम्.	१५३—१८२
,, ९ वें.	वैदिक कथा—निरुद्धा आपः. ...	१८३—२१६
,, १० वें.	वैदिक कथा—प्रातःकालिक देवता.	२१७—२५३
,, ११ वें.	अवैस्तिक प्रमाणें.	२५४—२७२
,, १२ वें.	तुलनात्मक गाथाशास्त्रांतील प्रमाणें....	२७३—२८१
,, १३ वें.	आर्यांची प्राचीन सुधारणा आणि धर्म.	२८२—३१७
कित्येक शास्त्रीय शब्दांचें स्पष्टीकरण.	....	३१९—३२२
सूचि.....	....	३२२—३३८

शुद्धिपत्रक.

पान.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१	८	आधिमौतिक	आधिभौतिक
२५	२५	उपत्तीवरील	उपपत्तीवरील
३५	टीपेंत	प-म	$\frac{प-म}{म}$
३६	२८	माणार	जाणार
८०	२४	१, ११, ११,	१, ११८, ११
८०	२८	यया	यथा
११५	९	प्रभत्यहः	प्रभृत्यह
१३१	२	सूयही	सूर्यही
१३१	४	श्रतिप्रमाण	श्रुतिप्रमाण
१३४	८	नवम्न	नवग्व
१३९	१५	सभानार्थक	समानार्थक
१४६	७	दोनें	दोन
१५१	२६	आहे	आहेत
१६४	१३	महाव्रात	महाव्रत
१६५	१५	महाव्रात	महाव्रत
१७६	टीपेंत	क्रीणीषुः	क्रीणीयुः
१७८	११	कारक	कारण
१९२	१२	निरक्त	निरुक्त
२२१	४	शय्यूची	शयूची
३०१	१७	क्रि	की
३१०	२०	ध्रुववाशिष्ट	ध्रुवाविशिष्ट
३२०	२२	अंशापर्येयच्या	अंशापर्यंतच्या

आर्य लोकांचें मूलस्थान

अथवा

उत्तर ध्रुवाजवळील आर्यांच्या वसतीविषयीं वेदांतील पुरावा.

उपोद्घात.

प्रस्तुत ग्रंथासारखा ग्रंथ मराठींत प्रथमच होत असल्यामुळें त्यांत आलेल्या शास्त्रीय संज्ञा मराठी वाचकांस बहुतेक नव्याच आहेत. ग्रंथ वाचतांनां या नव्या अपरिचित शब्दांशीं वाचकांना अडखळावें लागूं नये ह्मणून त्यांचा अर्थ आधीं स्पष्ट करून मग प्रकृत विषयास सुरुवात केली असतां ठीक पडेल. त्यांत मुख्यत्वेंकरून जीं शास्त्रें नवींच ह्मणजे बहुधा गेल्या शतकांत उत्पन्न झालीं आहेत, त्यांच्या नांवांचा अर्थ अगोदर सांगणें अगदीं अवश्य आहे. त्यांत मराठींत आधिभौतिक शास्त्रांवर ग्रंथ कमी असल्यामुळें व जे कांहीं आहेत ते बहुधा सार्वत्रिक वाचनांत नसल्यामुळें पारिभाषिक शब्द मराठी वाचकांच्या अंगवळणीं पडलेले नाहींत, इतकेंच नव्हे तर बरेच शास्त्रीय पारिभाषिक शब्द अद्यापि मराठींत आलेलेही नाहींत. अशा स्थितींत शास्त्रीय विषयांसंबंधानें मराठींत कांहीं लिहिणाराला प्रथम शब्दांची अडचण पडते व प्रसंगाविशेषीं नवे शब्द बनवावे लागतात. पण अशा रीतीनें प्रत्येकानें आपआपल्या परीनें शब्द बनाविल्यास एकंदर भाषेंत मोठाच गोंधळ उत्पन्न होतो. यासाठीं सर्वांची परिभाषा एक असणें अवश्य आहे. ह्मणून शास्त्रीय विषयांवर लिहिणारानें आपल्याला लागणारे शब्द पूर्वी कोणीं वापरले आहेत कीं नाहीं हें नीट पाहून, तसे वापरलेले असल्यास तेच कायम ठेवणें जरूर आहे. हा विचार मनांत ठेऊन प्रस्तुत ग्रंथांत

प्रो. रानडे यांचे कोशांतील शब्द कायम करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेंच रा. रा. ना० भ० पावगी यांनीं भूस्तरशास्त्राची परिभाषा सूक्ष्म विचार करून हिंदुस्थानांतील लोकांना सुलभ होईल अशी ग्रंथाधारें बसविली आहे, तिचाच स्वीकार येथें केला आहे. प्रस्तुत ग्रंथाचा विषय फार प्राचीन काळच्या मनुष्यासंबंधाचा आहे. अर्थात् त्यांत प्राचीन मनुष्याविषयीं माहिती गोळा करणाऱ्या शास्त्रांचा ठिकठिकाणीं उपयोग केलेला आहे. तीं शास्त्रें अशीं:—१ गाथाशास्त्र (तुलनात्मक), २ व्युत्पत्तिशास्त्र (तुलनात्मक), ३ पुराणवस्तुशास्त्र, ४ मस्तकविज्ञानशास्त्र, ५ मानुष्यकशास्त्र, ६ भूस्तरशास्त्र, व ७ प्राण्यवशेषशास्त्र. या शास्त्रांचे उद्देश काय व त्यांचा प्रस्तुत ग्रंथांत उपयोग कोणत्या तऱ्हेनें होणार याची थोडीशी कल्पना यावी म्हणून त्यांचें थोडेसें स्वरूप या उपोद्घातांत सांगण्याचें योजिलें आहे.

१. **गाथाशास्त्र**—हा शब्द इंग्रजी मायथॉलॉजी (Mythology) या शब्दाबद्दल योजिलेला आहे. गाथा म्हणजे गोष्ट. प्राचीन काळापासून चालत आलेल्या ज्या देवादिकांच्या गोष्टी त्यांनाच हा शब्द लावावयाचा आहे. अशा गोष्टींना आपण पुराणांतील गोष्टी म्हणतों. या गोष्टींमध्यें पुष्कळ भाग लाक्षणिक असण्याचा संभव असतो. म्हणून या दृष्टीनें व शास्त्रीय पद्धतीनें त्यांचा विचार अलीकडे होऊं लागला आहे. त्यांत निरनिराळ्या देशांतील कथांचा परस्परसंबंध किंवा त्यांमधील साम्य कितपत आहे हें तुलनात्मक दृष्टीनें पहाण्यांत विशेष मौज आहे. कारण, त्यापासून पुष्कळ ऐतिहासिक गोष्टीही कळून येतात. पाश्चात्य पंडितांस संस्कृत भाषेचें ज्ञान झाल्यापासून अशा तुलनात्मक अध्ययनास विशेष जोर आला आहे, व त्यावरून इंग्लिश जर्मन इत्यादि पाश्चात्य जाति व पारशी आणि हिंदु या पौरस्त्य जाति मूळच्या एकच आहेत असें सिद्ध झालें आहे. याप्रमाणें पुराणांतील कथांचा विचार करणाऱ्या शास्त्राला 'गाथाशास्त्र' हें नांव दिलें आहे. त्यांतच निरनिराळ्या राष्ट्रांतील कथांची तुलना करावयाची असतां त्यास 'तुलनात्मक गाथाशास्त्र' म्हणतात.

२. **व्युत्पत्तिशास्त्र**—निरनिराळ्या भाषांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांत शब्दसाम्य, रचनासाम्य, प्रत्ययसाम्य वगैरे किती आहे याचा

विचार करणाऱ्या शास्त्राला ' तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्र ' असें नांव दिलें आहे (इंग्रजी. फाइलॉलॉजि—Philology). एका भाषेंतून दुसऱ्या भाषेंत जातांना शब्दांत कोणते फेरफार होतात याचें सूक्ष्म अवलोकन करून त्यांवरून निरनिराळ्या भाषांसंबंधाचे नियम या शास्त्रांत बसविले आहेत. उदाहरणार्थ, लॅटिन भाषेंतील फ बद्दल इंग्रजींत ब आणि संस्कृतांत भ होतो, असें आढळून आलें आहे. जसें:—लॅ. फ्रेटर, इं. ब्रदर आणि सं. भ्रातृ. हे नियम मूळ **ग्रिम** नांवाच्या विद्वान् जर्मन पंडितानें दाखवून दिले. या नियमांना अपवादादाखल म्हणून दुसरे गौण नियम **व्हर्नर** नांवाच्या पंडितानें ठरविले आहेत. या शास्त्राच्या अध्ययनापासून गाथा-शास्त्राप्रमाणेंच निरनिराळ्या लोकांच्या प्राचीन इतिहासाविषयीं थोडी बहुत माहिती मिळते. या शास्त्रालाही संस्कृत भाषेचें अध्ययन यूरोपांत सुरू झाल्यापासून विशेष महत्व आलें आहे. या दोन्ही शास्त्रांवरून निघणाऱ्या स्थूल अनुमानांचीं उदाहरणें प्रस्तुत ग्रंथांत शेवटच्या दोन प्रकरणांत पहावयास मिळतील.

३. **पुराणवस्तुशास्त्र**—(इ. आर्किऑलॉजि Archæology). कोणत्याही राष्ट्रांचा विश्वसनीय असा इतिहास लेखरूपानें कांहीं नियमित काळापर्यन्तच मिळतो. त्याच्या पलीकडच्या काळाची माहिती मिळण्याचें साधन म्हणजे त्या लोकांच्या राहिलेल्या वस्तु हेंच होय. जुन्या वसतीच्या ठिकाणांतून खणतांना किंवा इतर रीतीनें नाणीं, नानाप्रकारचीं हत्यारें, शिलालेख, ताम्रपट, मोठमोठ्या इमारतींचे अवशेष, इत्यादि अनेक वस्तु आढळतात. त्यांचें वर्गीकरण करून त्यावरून त्या वापरणाऱ्या माणसां-विषयीं अनुमानानें माहिती गोळा करितां येते. अशा प्रकारच्या वस्तूंचा विचार करणारें जें शास्त्र तें ' पुराणवस्तुशास्त्र ' होय. या शास्त्राच्या ठोकळ सिद्धांतांचें विवेचन पुढें प्रथम प्रकरणांत आलें आहे.

४. **मस्तकविज्ञानशास्त्र**—मनुष्यांच्या ज्या निरानिराळ्या जाति पृथ्वीवर अस्तित्वांत आहेत, त्या सर्व मूळ एकाच जातीपासून झाल्या कीं प्रत्येकीचे मूळ पुरुष स्वतंत्र होते असा एक मोठा वाद शास्त्रज्ञ लोकांत चालू आहे. प्रत्येक पक्षाला आपल्या बाजूच्या समर्थनार्थ पुष्कळ गोष्टी सांगतां येण्यासारख्या आहेत. त्यांत प्राचीन माणसांचे जे निरनिराळ्या ठिकाणीं सांगाडे सांपडतात, त्यांच्या मस्तकाच्या आकृतींवरून व लांबी-

रुंदीच्या प्रमाणांवरून त्यांचें वर्गीकरण करण्याचा एक पक्ष प्रयत्न करीत आहे. त्यांच्या उद्योगाला 'मस्तकविज्ञानशास्त्र' (इं. Craniology or phrenology) असें नांव आहे. अशा प्रकारच्या मस्तकपरीक्षणावरून निघणारीं कांहीं अनुमानें या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणांत आलीं आहेत.

५. मानुष्यकशास्त्र—निरनिराळ्या मनुष्यजातीचे स्वभाव, त्यांनीं उत्पन्न केलेल्या निरनिराळ्या कला, त्यांची पूर्वपरंपरा, त्यांची शारीर रचना, मानसिक उन्नति, त्यांनीं उत्पन्न केलेल्या व त्यांच्यांत वाढलेल्या सामाजिक, धार्मिक व राजकीय संस्था इत्यादि गोष्टींचें विवेचन या शास्त्रांत केलेलें असतें. हें शास्त्र फार व्यापक असून त्यांतील कांहीं विशेष गोष्टींचा उहापोह करणारीं कित्येक पोट शास्त्रें आहेत. (इं. Anthropology).

६. भूस्तरशास्त्र—पृथ्वीच्या उत्पत्तीसंबंधीं ज्या कांहीं कल्पना आहेत त्यांतील विशेष सयुक्तिक कल्पना ह्मणजे ती मूळ बाष्पमय अथवा तेजोमेघ स्थितींत असून हळूहळू तिचें घनावस्थेंत संक्रमण झालें, अशी आहे. ही घनावस्था येतांना तिच्या पृष्ठभागावर पातळ कवच बनत गेलें. या कवचांत एकामागून एक पापुद्रे ऊर्फ थर (सं. स्तर) उत्पन्न होऊन कालान्तरानें त्या थरांवर वनस्पतीपासून तों मनुष्यापर्यन्त अनेक जाति निर्माण झाल्या. त्यांत अगदीं प्रथम उत्पन्न झालेला जो थर तो आज जमिनींत फारच खोल असला पाहिजे. परंतु पृथ्वीच्या गर्भांत अद्यापिही अत्यन्त उष्णता असल्यामुळें जीं तिचीं कार्यें भूकंपादिरूपांनीं दृग्गोचर होतात त्यांत वरची जमीन खालीं व खालची वर अशी होत असल्यामुळें आद्य थर कित्येक ठिकाणीं भूपृष्ठाजवळही पहावयास मिळतात. या निरनिराळ्या थरांची पहाणी करून ते प्रथम जेथें सांपडले त्या स्थलांवरून इंग्लिश भूस्तरशास्त्रवेत्यांनीं त्यांस निरनिराळीं नांवें दिलीं आहेत. तसेंच भूपृष्ठाला घनावस्था येऊन त्यावर जीवनाला अनुकूल स्थिति उत्पन्न होण्याला बराच काळ लागला. हा काळ वर्षमासांनीं मोजण्यासारखा नसून हजारों वर्षांचा असल्यामुळें त्याला युग अशी संज्ञा देणेंच योग्य आहे. जीवनानुकूल परिस्थिति उत्पन्न झाल्यावर प्रथम तृणादि वनस्पति, मत्स्यादि साधे प्राणी इत्यादि हळूहळू उदयास आले. तदनंतर कूर्मादि सरपटत चालणारे प्राणी आणि मग वराहादि सस्तन प्राणी निर्माण

झाले. हे निरनिराळ्या प्रकारचे प्राणी उत्पन्न होण्याला जे महान् काळ लागले त्यांनांही तत्तदर्थक नांवें दिलीं आहेत. असे महाकाळ ऊर्फ युगें भूस्तरशास्त्रवेत्यांनीं आजपर्यंत एकंदर पांच मानिलीं आहेत. या प्रत्येक युगामध्यें जे मातीचे किंवा दगडांचे अनेक थर बनत गेले त्यांनां त्यांच्या स्थानांवरून किंवा प्रकृतिद्रव्यांवरून नांवें दिलीं आहेत. आपल्या हिंदुस्थानांतही बहुतेक ठिकाणीं ही भूस्तरपहाणी झालेली असून तिच्यासंबंधीं जीं पुस्तकें प्रसिद्ध झालेलीं आहेत त्यांत या निरनिराळ्या थरांना आपलेकडील स्थानांवरून नांवें दिलेलीं आहेत. हीं पांच युगें व त्यांचे पोटभेद पहिल्या प्रकरणांत कोष्टकरूपानें दिले आहेत. भूस्तरशास्त्रांत पृथ्वीच्या एकंदर सर्व घन कवचाचा विचार करावयाचा असतो. पहिल्या थरापासून अगदीं आतांपर्यंतचे थर कसकसे बनत गेले, वारा, पाऊस, उष्णता इत्यादि सृष्टीच्या शक्तींचे त्यांवर परिणाम होऊन ते कित्येक ठिकाणीं फुटून कसे गेले आहेत, व नवीन थर बनण्याच्या कामीं या सृष्टीच्या शक्तींचा कसा उपयोग होत आहे या सर्व गोष्टींचा भूस्तरशास्त्रांत विचार करावयाचा असतो. एखादा थर बनल्यानंतर कालांतरानें त्यावर वनस्पतींची वाढ होऊन प्राण्यांचीही तेथें वसति होते. पण त्या थरावर कांहीं कारणानें एकाएकीं बर्फाचा मोठा जाडा थर येऊन बसल्यास तेथील वनस्पति, प्राणी वगैरे सर्व त्या बर्फांत गडप होऊन जातात. या बर्फाबरोबर किंवा पाण्याच्या प्रवाहाबरोबर मातीही वहात येऊन तिचे थरही त्या प्राण्यांना व वनस्पतींना आपल्या उदरांत जागा देतात. पुढें युगांतरानें पृथ्वीच्या कवचांत दुसऱ्या कांहीं घडामोडी झाल्यावर किंवा खाणी खणतांना वगैरे या गडदलेल्या प्राण्यांचे व वनस्पतींचे अवशेष आपल्या दृष्टीस पडतात. या प्राण्यवशेषांच्या निरीक्षणानें ते प्राणी कोणत्या जातीचे होते, त्यांचा काल कोणता, इत्यादि गोष्टीविषयी ज्या शास्त्रांत अनुमानें केलेलीं असतात त्या शास्त्राला प्राण्यवशेष–शास्त्र म्हणतात (इं. पॅलिऑन्टॉलॉजि Palæontology). अशा रीतीनें प्राणी व वनस्पति एकदम गडप होऊन जाण्यासारखे बर्फाचे थर उत्पन्न होण्याचीं कारणें काय असावीं याचें सविस्तर विवेचन या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणांत केलें आहे. हीं कारणें सुरू होऊन व बर्फाचा पूर येऊन तीं कारणें नाहींशीं होईपर्यंत जो काळ जातो त्याला हिमकाल किंवा हिमयुग (इ. ग्लेशिअल ईपॉक

किंवा पीरिअड Glacial Epoch or period) असें ह्मणतात. असल्या दोन हिमकालांमध्यें येणारा जो काळ त्याला हिमान्तरकाल (इं. इंटरग्लेशिअल पीरिअड Interglacial period) ह्मणतात; आणि गेला हिमकाल संपल्यापासून आतांपर्यंत जो काळ चालत आला आहे त्याला हिमोत्तरकाल (इं. पोस्टग्लेशिअल पीरिअड Post-glacial Period) ह्मणतात.†

या पुस्तकांत आणखीही कित्येक शब्द आलेले आहेत. त्या सर्वांचे अर्थ शेवटीं जोडलेल्या कोशांत दिले आहेत.

† पृथ्वीवरील पुष्कळ प्रदेशांची भूस्तर पहाणी अद्यापि व्हावयाची आहे. ग्रेट ब्रिटन्, उत्तर अमेरिका, हिंदुस्थान, इत्यादि देशांतील बहुतेक भागांची पहाणी झालेली आहे. हिंदुस्थानांतील भूस्तरांविषयीं सरकारी भूस्तर खात्याकडून पुस्तकही प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून पहातां हिंदुस्थानाची आजची रचना प्राचीन भूस्तर युगांतील रचनेहून बऱ्याच निराळ्या प्रकारची आहे असें दिसतें.

आर्य लोकांचें मूलस्थान.

प्रकरण १ लें.

इतिहासपूर्वकाल.

इतिहासकाल–त्याच्या पूर्वीचा इतिहासपूर्वकाल–इतिहासकाल सर्व देशांत एकदम सुरू झाला नाहीं–त्याच्या ग्रीस व ईजिप्ट देशांतील मर्यादा–इतिहासकालाची पूर्वपीठिका म्हणजे दंतकथा–गाथाशास्त्र-त्याला तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्राचें प्रोत्साहन–या शास्त्रांचीं प्राचीन आर्यांविषयींचीं अनुमानें –मनुष्यप्राणी हिमोत्तरकालीन होय असें मत–वेदांचा अर्थ करण्याची नैरुक्त पद्धत–तिचा पाश्चात्य पंडितांनीं केलेला अवलंब-आर्यांच्या मूलस्थानाचा प्रश्न–मध्यआशियांतील स्थान–पुराणवस्तुशास्त्र व भूस्तरशास्त्र यांतील नवीन शोधांचा या अनुमानांवर झालेला परिणाम-आर्यांचें मूलस्थान उत्तरेकडे असावें असें मत-वेदांचें काठिण्य–भाष्यकारांची कामगिरी–ऋग्वेदाच्या भाषान्तराविषयीं मोक्षमुल्लरचें मत–नवीन शोधांवरून वेदांचा अर्थ करण्याचें नवें साधन कां मिळणार नाहीं?–डॉ. वारनचीं अनुमानें–सर्व मानव जातीचें उत्तरध्रुवाजवळील मूलस्थान-प्रस्तुत ग्रंथाचा संकुचित उद्देश-नवीन शास्त्रीय शोधांची कामगिरी–ध्रुवावरील वसतीविषयीं आक्षेप-शास्त्रीय शोधांचा सारांश–पुराणवस्तुशास्त्रांतील तीन युगें–सुधारणेच्या तीन पायऱ्या–पाषाण-युग, कांस्ययुग, आणि लोहयुग हीं एकमेकांपासून अगदीं अलग नाहींत–लोहयुगाची सुधारणा युरोपांत बाहेरून गेली–या युगांचे आरंभ निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या वेळीं झाले-पाषाणयुगाचे दोन भाग–पूर्व आणि नव–पुराणवस्तुशास्त्राचा भूस्तरशास्त्राशीं संबंध–पांच भूस्तरयुगें आणि त्यांचे पोटभाग–प्रस्तुत त्यांतील चतुर्थ युगाचाच संबंध आहे–तृतीय युगांत मनुष्याचें अस्तित्व होतें–नव पाषाणयुगाचा काल इ. स. पूर्वी ५००० वर्षें–पाषाण युगाचा देवदारुकाल व ओकुकाल यांशीं समकालीनपणा–हिमोत्तरकालाचा आरंभ–प्रो. गीकीचें मत इतर मतें–अमेरिकन शास्त्रज्ञांच्या मताच्या पुष्ट्यर्थ कारणें–मस्तकविज्ञान शास्त्राचे शोध–इतिहास पूर्वकालीन माणसांचें वर्गीकरण–यूरोपांतील सांप्रतच्या लोकांची पूर्वपीठिका–तीसवर्षांनें निरनिराळीं मतें–सांप्रतच्या यूरोपीयांच्या पूर्वजांची सुधारणा–हे लोक मूळचे कोठले या प्रश्नाचा उलगडा अद्यापि झालेला नाहीं–यूरोपांतील मूळचे आर्य पूर्वपाषाण युगांतील माणसांचे वंशज नव्हत–आर्यांच्या आदिस्थानाचा प्रश्न–टेलरचें मत–हें स्थान मध्यआशियांत नाहीं-तें उत्तरध्रुवाजवळ असावें

इतिहासपूर्वकाल.

कोणत्याही राष्ट्राच्या इतिहासाचा विचार केला तर असें आढळून येईल कीं, त्यासंबंधाची विश्वसनीय माहिती कांहीं एका विशिष्ट काळापर्यंतच मिळते. त्याच्या पूर्वीं पाहिलें तर केवळ दंतकथा व काल्पनिक गोष्टी यांचें साम्राज्य असून त्यांच्याही पलीकडे पाहूं गेल्यास सर्वत्र अंधकार दिसून येतो. ज्या काळापासून थोडी बहुत तरी विश्वसनीय अशी माहिती मिळते तो इतिहासकाळ, व त्याच्या पूर्वीचा तो इतिहास-पूर्वकाल होय. हा इतिहासकाल सर्व राष्ट्रांमध्यें एका वेळींच सुरू झाला असें नाहीं. ग्रीस देशाच्या या कालाची मजल इ. स. पूर्वी १००० वर्षांपर्यंत नेतां येते, तर ईजिप्ट देशांतील थडग्यांतून व दुसऱ्या स्मारक चिन्हांतून नुकत्याच उकरून काढिलेल्या लेखांवरून, तेथील इतिहासकाल इ. स. पूर्वी ५००० वर्षांइतका प्राचीन आहे असें दिसतें. इतके जरी हे काळ प्राचीन आहेत, तरी वरील दोन्हीही देशांच्या इतिहासकालाची पूर्वपीठिका म्हणजे दंतकथा व पौराणिक गोष्टीच होत. एकोणिसाव्या शतकाच्या अर्धापर्यंत, इतिहासपूर्वकालीन मनुष्य-जातीच्यासंबंधानें माहिती मिळविण्याचें साधन या दंतकथांशिवाय दुसरें कोणतेंही उपलब्ध नव्हतें आणि म्हणून या कथांचेंच पद्धतशीर व सोपपत्तिक विवेचन करून अति प्राचीन काळच्या मनुष्य जातीच्या इतिहासाची माहिती कांहीं मिळते कीं नाहीं हें पहाण्याचे बरेच जणांनीं प्रयत्न केले. परंतु निःपक्षपातानें विचार करणाऱ्या सर्व पंडितांस त्या कथांची मीमांसा करण्याच्या पद्धतीपैकीं कोणतीही पद्धत समाधानकारक नाहीं असें वाटत असे. परंतु तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्राच्या अध्ययनानें, या पुराण-गोष्टीविषयक प्रश्नाचा नवीन रीतीनें विचार करण्यास प्रथम प्रोत्साहन मिळालें. यूरोपीय लोकांस भरतखंडांतील प्राचीन भाषा व धर्मग्रंथ यांची माहिती झाली, तेव्हां जणूं काय आपणांस एक नवीन जगच सांपडलें असें त्यांस वाटलें. पुढें संस्कृत व झेन्द् या भाषांमध्यें निकट संबंध आहे, व तसाच तो यूरोपांतील मुख्य मुख्य लोकांच्या भाषांमध्येंही आहे असें आढळून आलें आणि त्यामुळें जगाच्या प्राचीन इतिहासासंबंधानें जीं मतें सामान्यतः प्रचलित होतीं त्यांमध्यें पूर्ण क्रांति झाली. यूरोपांतील प्राचीन व अर्वा-

चीन मुख्य मुख्य राष्ट्रांच्या भाषा व भरतखंडांतील ब्राह्मण आणि झोरो-आस्तरचे अनुयायी यांच्या भाषा, यांमध्यें निकट साम्य आहे असें ओढ-ळून आल्यावर सहजच असें अनुमान निघालें कीं, या सर्व भाषा एकाच मूळभाषेच्या शाखा असल्या पाहिजेत; व या अनुमानावरून आणखी असा तर्क झाला कीं, वरील सर्व राष्ट्रांतील लोकांचे मूळपुरुषही कोणी आदि आर्य असावे. अशा रीतीनें वैदिक ग्रंथ व नंतरचें संस्कृत वाङ्मय यांच्या अध्ययनानें, प्राचीन काळच्या मनुष्यांचा इतिहास व त्यांची सुधारणा यासंबंधाच्या पाश्चात्य लोकांच्या कल्पनांमध्यें हळूहळू क्रांति घड-वून आणिली. त्यासंबंधानें सविस्तर विवेचन करणें हें येथें जरा अप्र-स्तुतच होईल. तरी पण एवढें येथें सांगितलें पाहिजे कीं, एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत झालेल्या शास्त्रीय शोधांच्या योगानें, इतिहासपूर्व-कालाहूनही अति प्राचीन अशा काळच्या माणसांसंबंधानें माहिती हो-ण्याचीं नवीन साधनें उपलब्ध होईपर्यंत वरील प्रश्नासंबंधानें विचार व शोध करावयाचा सर्व मक्ता तुलनात्मकगाथाशास्त्रज्ञ व शब्दव्युत्पत्ति-शास्त्रज्ञ लोकांनीं आपलेकडेच ठेवला होता.

हे गाथाशास्त्रज्ञ जेव्हां सदर प्रश्नांचा विचार करीत होते, तेव्हां त्यां-संबंधानें सर्व-संमत मत असें होतें कीं, मनुष्य-प्राणी हा हिमकालानंतर उत्पन्न झाला आहे; व म्हणून प्राचीन माणसांची भौतिक व भौगोलिक परिस्थिति आतांच्याहून फारशी भिन्न नव्हती, असें ते समजत. अर्थात् सर्व प्राचीन दंतकथा व पौराणिक गोष्टी यांची मीमांसा करणें ती, हल्लींच्या प्रमाणेंच जवळ जवळ हवामानादि परिस्थिति असलेल्या देशांत त्या उत्पन्न व वृद्धिंगत झाल्या अशी पूर्वकल्पना करून ते करीत असत. उदाहरण, वेदांतील प्रत्येक गोष्टीचा अर्थ तिचा संबंध पर्जन्याशीं किंवा उषःप्रकाशाशीं लावून ते करीत. पण हा अर्थ बऱ्याच ठिकाणीं मुळींच समाधानकारक नसे. इंद्र म्हणजे केवळ पर्जन्य-देवता व वृत्र म्हणजे अवर्षणाचा अथवा रोज सूर्यास्तानंतर येण्याच्या काळोखाचा दैत्य असें ते मानीत. ही पद्धति प्रथम आपल्या इकडील निरुक्तकारांनीं स्वीकारली होती; व पाश्चात्य पंडितांनीं थोडीशी सुधारणा करून तिचाच हल्लीही अवलंब केला आहे; तरी तिच्या पूर्वस्वरूपांत आजही कांहीं दृश्य फरक झाला आहे असें नाहीं.

गाथाशास्त्रज्ञ लोकांनीं आणखी असेंही एक अनुमान काढलें कीं, आर्य लोकांचें मूलस्थान मध्यआशियांतील कोणतें तरी ठिकाण असावें, व भारतीय आर्य तेथून निघाल्यावर वैदिक सूक्तांची रचना झाली असल्यामुळें त्यांत, समशीतोष्ण कटिबंधांत रहाणाऱ्या लोकांच्या मात्र कल्पना आहेत. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत झालेल्या शास्त्रीय शोधांनीं असल्या अनुमानांस पार हुसकून लाविलें आहे. यूरोपांत ठिकठिकाणीं जमिनींत आढळणाऱ्या शेंकडों दगडी व कांशाच्या हत्यारांच्या साहाय्यानें इतिहासकालाहून फार जुन्या काळीं आढळून येणारीं, जीं लोह, कांस्य व पाषाण युगें तीं एकामागून एक अशीं क्रमानें होऊन गेलीं असें पुराणवस्तुशास्त्रज्ञांनीं ठरविलें आहे. परंतु आपल्या विषयाला प्रस्तुत अशी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत घडलेली सर्वांत महत्त्वाची गोष्ट झटली झणजे * चतुर्थ युगाच्या अन्तीं हिमकाल होऊन गेला हें दाखविणारा पुरावा सांपडला ही होय. त्यावरून मनुष्यप्राणी हा फार प्राचीन झणजे चतुर्थ युगांतच केवळ नव्हे तर तृतीय युगांतही होता, व तेव्हां या पृथ्वीची हवामानासंबंधाची स्थिति आतांच्याहून, तशीच हिमोत्तरकालाहूनही अगदीं भिन्न होती, असें दाखवितां आलें. नवपाषाणयुग व पूर्वपाषाणयुग यांमध्यें बनलेल्या थरांत आढळून आलेल्या मनुष्यांच्या व इतर प्राण्यांच्या शरीरावशेषांवरूनही, जेथें ते सांपडले त्या ठिकाणीं रहाणाऱ्या प्राचीन माणसांविषयीं कांहीं नवीन गोष्टी कळल्या. यावरून लवकरच असें स्पष्ट दिसून आलें कीं, गाथाशास्त्रज्ञांनीं योजिलेल्या प्राचीन कालदर्शक साधनांचा जास्त व्यापक रीतीनें उपयोग करून पुराणकथा व दंतकथा यांच्या विवेचनावरून पूर्वी काढिलेल्या अनुमानांना, नवीन शास्त्रीय शोधांनीं उघडकीस आणिलेल्या गोष्टींच्या सहाय्यानें कांहीं तरी आळा घातला पाहिजे. व्युत्पत्तिशास्त्रज्ञांनां यापुढें आपलीं मतें जरा जपूनच बनवावीं लागूं लागलीं, त्यांपैकीं कित्येकांनीं वर सांगितलेल्या नवीन शास्त्रीय शोधांची वास्तव योग्यता कबूल केली, व त्या शोधांवरून निघणारीं अनुमानेंही त्यांस लवकरच पटलीं. कित्येक जर्मन पंडित आर्य लोकांचें मूलस्थान मध्यआशिया नव्हे असें साफ झणूं

* या व आणखी कांहीं शब्दांचा अर्थ याच प्रकरणांत पुढें आलेला आहे.

लागले; आणि अलीकडे तर त्यांचें मूलस्थान आणखी उत्तरेकडे कोठें तरी असावें असें बहुतेक सर्वसंमत मत झालें आहे.

आतां अशा रीतीनें जरी व्युत्पत्तिशास्त्रज्ञ व गाथाशास्त्रज्ञ यांनीं काढलेल्या अनुमानांमध्यें नवीन शास्त्रीय शोधांच्या अनुरोधानें फेरफार करण्यांत येत आहेत, तरी दुसरें तितक्याच महत्वाचें एक काम अद्यापि व्हावयाचेंच आहे. वर सांगितलेंच आहे कीं, पाश्चात्य पंडितांनां वैदिक ग्रंथांची माहिती झाल्यापासून प्राचीन कथापुराणांच्या अभ्यासाला नवीन प्रोत्साहन मिळालें. पण आर्य लोकांच्या ग्रंथांत अत्यंत प्राचीन ह्मणून सर्वानुमतें ठरलेले जे वेद त्यांचा अद्यापि चांगला अर्थ लागलेला नाहीं. ब्राह्मणकाळीं ह्मणजे इ. स. पूर्वीं कित्येक शतकें इतक्या काळींही ते अंशतः समजत नाहींसे झाले होते; आणि जर आपल्या निरुक्तकारांनीं व वैय्याकरणांनीं श्रम केले नसते, तर आजपर्यन्त ते अगदीं अज्ञातच राहिले असते. व्युत्पत्तिशास्त्र व गाथाशास्त्र यांच्या तुलनात्मक विवेचनानें समजणाऱ्या गोष्टींवरून पाश्चात्य पंडितांनीं आपले इकडील अर्थमीमांसा पद्धतीमध्यें थोडीबहुत सुधारणा केली आहे हें खरें; तरी अगदीं परकी व अपरिचित अशा कल्पना व विचार ज्यांत आहेत अशा वाक्यांचा अर्थ व्युत्पत्तिशास्त्राच्या जोरावर पूर्णपणें लागणें शक्य नाहीं. वेदांचा अर्थ लावण्यांत हीच मोठी अडचण आहे. पर्जन्याच्या अथवा उषेच्या कल्पनेवर कांहीं गोष्टींचा अर्थ लागेल; परंतु वेदांमध्यें कित्येक वाक्यें अशीं आहेत कीं, त्यांतील शब्द तर अगदीं साधे पण कोणत्याही कल्पनेवर त्यांचा अर्थ मात्र बसत नाहीं. अशा प्रकारचीं वाक्यें आलीं ह्मणजे सायणाचार्यांसारखे टीकाकार केवळ शब्दास प्रतिशब्द देतात, नाहीं तर आपल्याला हवा असेल तो अर्थ त्यांतून निघावा ह्मणून त्या शब्दांची वाटेल तशी ओढाताण करतात; आणि कित्येक यूरोपीय पंडित तर हे भाग चुकीचे आहेत, किंवा त्यांत कांहीं शब्द गळलेले आहेत असेंही ह्मणतात. यावरून एक गोष्ट मात्र उघड होते, ती ही कीं, कांहीं वैदिक वाक्यांचा अर्थ प्रस्तुत मुळींच लागण्यासारखा नाहीं व ह्मणून त्यांचें भाषान्तर करणेंही शक्य नाहीं. पंडित मोक्ष मुल्लर यांस ही गोष्ट सर्वस्वी कबूल होती. त्यानें लिहिलें आहे कीं, " ऋग्वेदाचें भाषान्तर करण्याचें काम पुढल्या शत-

कांतील लोकांचें आहे; आजच्या पंडितांचें काम एवढेंच आहे कीं, यास्कप्रभृति भारतीय पंडितांनीं केल्याप्रमाणें कठीण वाक्यें म्हणून जीं आहेत त्यांचा विचार करून त्यांचें काठिण्य होईल तितकें कमी करावयाचें.''

पण जर गेल्या शतकाच्या शेवटीं झालेल्या शास्त्रीय शोधांनीं अति प्राचीन माणसांच्या इतिहासांतील कांहीं गोष्टी समजतात, तर आर्य लोकांच्या प्राचीनतम कल्पनांचा व विचारांचा सांठा जो वेद त्यांतील गोष्टींचा अर्थ करण्याचें एखादें नवें साधन त्यांवरून कां उपलब्ध होणार नाहीं ? हिमकालापूर्वी मनुष्यप्राणी जर अस्तित्वांत असेल, व बर्फामुळें पृथ्वीवर झालेलीं महान् स्थित्यन्तरें जर त्यानें पाहिलीं असतील, तर मनुष्यजातीच्या अति प्राचीन दंतकथा व कल्पना यांमध्यें त्या गोष्टींचा उल्लेख फार गूढ कां असेना, पण कांहीं तरी आढळला पाहिजे. डॉ. **वॉरन** नांवाच्या पंडितानें ''नंदनवनोपलब्धि अथवा मानवजातीचें उत्तर ध्रुवाजवळचें आदिस्थान'' या नांवाच्या आपल्या ग्रंथामध्यें प्राचीन परंपराप्राप्त कथांचा नवीन शास्त्रीय शोधांवरून अर्थ करून असें अनुमान काढलें आहे कीं, सगळ्या मानवजातीचें मूलस्थान उत्तर ध्रुवाजवळच्या प्रदेशांत कोठें तरी असावें. आपल्याला इतक्या विस्तृत दृष्टीनें विचार करावयाचा नाहीं. आपल्याला फक्त वेदांसंबंधानें विचार करून असें दाखवावयाचें आहे कीं, आजपर्यन्त दुर्बोध म्हणून मानिलेल्या कांहीं वैदिक वाक्यांचा नवीन शास्त्रीय शोधान्वयें अर्थ केल्यास वैदिक काळच्या लोकांच्या पूर्वजांचें वसतिस्थान गेल्या हिमकालाच्या पूर्वी उत्तर ध्रुवाजवळ कोठें तरी होतें असें अनुमान अवश्य करावें लागतें. हें दाखविण्यासाठीं ज्या वैदिक वाक्यांचा आधार आतां घ्यावयाचा आहे तीं पौरस्त्य व पाश्चात्य अशा सर्व पंडितांनीं दुर्बोध म्हणून सोडून दिलीं होतीं किंवा प्रत्येकानें आपल्या मर्जीस येईल तसा त्यांचा वेडा वांकडा कसा तरी अर्थ लाविला होता; या गोष्टीचा विचार करतां प्रस्तुत काम बरेंच कठीण आहे हें खरें. त्या वाक्यांचे टीकाकारांनीं केलेले अर्थ आजपर्यंत पंडितांनीं मान्य केले आहेत, तरी ते मुळींच समाधानकारक नाहींत. पण आतां पुराणवस्तुशास्त्र व भूस्तरशास्त्र यांमध्यें झालेल्या नवीन शोधांच्या योगानें त्यांचा अर्थ करण्याचें अधिक चांगलें साधन आपल्याला

मिळालें आहे; आणि ही गोष्ट पुढील विवेचनावरून आपणांस दाखवितां येणार आहे. या शोधांच्या योगानें गाथाशास्त्र व व्युत्पत्तिशास्त्र यांवरून काढिलेलीं अनुमानें रद्द झालीं आहेत; पण याहूनही मोठी कामगिरी त्यांनीं केली आहे; ती ही कीं, आर्य लोकांच्या बहुतेक पौराणिक कथांचा अर्थ करण्याचें एक नवें साधन त्यांच्या योगानें उपलब्ध झालें आहे. या साधनांचा उपयोग करून निघालेल्या अनुमानांच्या योगानेंही पुनः आर्य लोकांच्या प्राचीन इतिहासावर जास्त प्रकाश पडून पुराणवस्तुशास्त्रज्ञ व भूस्तरशास्त्रज्ञ यांनीं सांप्रत काढिलेल्या अनुमानांत भर पडून कदाचित् त्यामध्यें फेरफारही होतील.

आतां वैदिक लोकांचे पूर्वज उत्तर ध्रुवाजवळ रहात होते हें दाखविणाऱ्या वेदांतील वाक्यांचें विवेचन करण्यापूर्वी, पुराणवस्तुशास्त्र, भूस्तरशास्त्र, प्राण्यवशेषशास्त्र वगैरे शास्त्रांत झालेल्या ज्या नवीन शोधांचे उल्लेख वर आले आहेत त्यांचा थोडक्यांत गोषवारा देणें जरूर आहे. कारण, मनुष्यप्राणी हिमकालापूर्वी अस्तित्वांत नव्हता, व ध्रुवप्रदेश वसतियोग्य कधींही नव्हते अशी कल्पना अद्यापिहि बरेच जणांची आहे; अशी कल्पना असणाऱ्या लोकांस, आर्य–लोक ध्रुवाजवळ रहात होते हें म्हणणें दुर्शनींच खोटें वाटेल व ती गोष्ट केवळ अशक्य आहे असेंही ते म्हणतील. या करितां, उत्तरध्रुवप्रदेश एका काळीं वसतियोग्य होते हें दाखविण्यासाठीं, भूस्तरादि शास्त्रांतील हे नवीन शोध काय आहेत हें सांगणें अवश्य आहे.

इतिहासपूर्व–काळच्या माणसांनीं आपल्या अस्तित्वाच्या बऱ्याच खुणा मागें ठेविलेल्या आहेत. पण त्या, इतिहासकालांतील मोठमोठीं स्मारकचिन्हें, थडगीं, मनोरे, शिलालेख, इत्यादिकांसारख्या नसून अगदीं साध्या प्रकारच्या आहेत. यूरोपांत पुष्कळ ठिकाणीं जुन्या छावण्या, प्राचीन किल्ल्यांचे तट, स्मशानें, देवालयें, जलनिवासस्थानें वगैरे प्राचीनकाळच्या वस्तु सांपडतात. त्यांत खणतांना दगडांचीं किंवा धातूचीं हजारों हत्यारें सांपडलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं उत्तम घोंटीव आहेत व कांहीं जरा ओबडधोबड आहेत. पुराणवस्तुशास्त्रज्ञांनीं त्यांचें परीक्षण करून, ईजिप्ट देशांतील चित्रलिपींतील लेखांवरून जीं अनुमानें निघतात तशींच अनु-

मानें काढिलीं आहेत. हीं दगडी व धातूंचीं हत्यारें वगैरे आजपर्यन्त कोणाला माहीत नव्हतीं असें नाहीं, पण शास्त्रप्रवीण लोकांचें लक्ष आजपर्यन्त त्यांकडे गेलें नव्हतें. आशिया व यूरोप या खंडांतील शेतकऱ्यांना शेतें खणतांनां तीं आढळलीं ह्मणजे तीं आकाशांतून पडलेलीं देवतांचीं शस्त्रें वगैरे आहेत असें समजून ते त्यांची पूजा करीत. परंतु या वस्तूंचें सूक्ष्म निरीक्षण करून पुराणवस्तुशास्त्रज्ञ लोकांनीं त्यांचे तीन वर्ग केले आहेत. पहिल्या वर्गांत दगडी हत्यारें (यांत शिंगें, लांकूड व हाडें यांचाही समावेश केला आहे) येतात, दुसऱ्यांत कांशाचीं व तिसऱ्यांत लोखंडाचीं येतात. हे तीन वर्ग इतिहासपूर्वकालीन मनुष्यांच्या सुधारणेच्या तीन पायऱ्या दर्शवितात. धातूंची माहिती होण्यापूर्वी दगड, लांकूड अथवा हाडें यांचीं केलेलीं, विंझणें, कुदळ, बाणांचीं टोकें, टांकी, कऱ्हार वगैरे हत्यारेंच वापरण्यांत होतीं. पण जशी जशी धातूंची माहिती होत गेली तशीं तशीं प्रथमतः कांशाचीं नंतर लोखंडाचीं अशीं हत्यारें उपयोगांत येऊं लागून दगडाचीं हळुहळू कमी होऊं लागलीं. या वर सांगितलेल्या प्राचीन मनुष्याच्या सुधारणेच्या तीन पायऱ्या एकमेकांपासून अगदीं अलग आहेत असें मात्र समजतां कामा नये. त्यासंबंधानें अगदीं कडक निर्बंध करतां यावयाचा नाहीं. पाषाणयुग अमक्या एका वेळीं संपलें व नंतर कांस्ययुग सुरू झालें, असें सांगतां येणार नाहीं. हे तीन विभाग ह्मणजे अगदीं ढोबळ आहेत. एका पायरीवरून दुसऱ्या पायरीपर्यंत झालेलें संक्रमण सावकाश क्रमाक्रमानें झालेलें आहे. म्हणजे कांशाचीं हत्यारें उपयोगांत येऊं लागल्यावर सुद्धां बराच काळपर्यन्त दगडी हत्यारें लोक वापरीत होते; व अशीच गोष्ट पुढच्या ह्मणजे लोहयुगाचीही आहे. तांबें व कथील एका विशिष्ट प्रमाणांत मिळविलीं ह्मणजे कांसें होतें. यावरून कांस्ययुगापूर्वी एक ताम्रयुग मानावें लागतें. परंतु अशीं ताम्र व वंग युगें वेगळीं होतीं अशी कल्पना करण्यास पुरेसा आधार अद्यापि मिळालेला नाहीं. ह्मणून कांसें करण्याची युक्ति मूळ यूरोपांत निघाली नसून तेथील लोक ती इतर देशांतील लोकांपासून शिकले, किंवा हिंदी–यूरोपीय आर्यच ती आपल्या बरोबर घेऊन तेथें गेले असा संभव दिसतो. या युगांसंबंधानें दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ह्मटली ह्मणजे यांपैकीं कोणतेंही एकादें युग निरनिराळ्या देशांत एकांच

वेळीं होतें असें नाहीं. उदाहरणार्थ, यूरोपांतील लोक जेव्हां पाषाणयुगाच्या अगदीं पहिल्या पहिल्या पायरीवरच होते तेव्हां ह्मणजे इ. स. पूर्वी सुमारें ६००० वर्षांच्या सुमारास ईजिप्ट देशांतील लोक सुधारणेच्या बऱ्याच वरच्या पायरीवर चढले होते. त्याचप्रमाणें ग्रीक लोक लोहयुगापर्यंत गेले असतां इतालींतील लोक कांस्ययुगांतच होते व यूरोपच्या अगदीं पश्चिम भागांत तर पाषाणयुगच सुरू होतें. या गोष्टीवरून असें दिसतें कीं, सुधारणेची प्रगति कित्येक ठिकाणीं मंद व कित्येक ठिकाणीं जलद होती, व ती प्रत्येक ठिकाणच्या परिस्थितीवर अवलंबून होती. तरी स्थूलमानानें पहातां हीं तीन युगें ह्मणजे पाषाण, कांस्य व लोह हीं इतिहासकालाच्या पूर्वीच्या सुधारणेच्या तीन निरनिराळ्या पायऱ्या दर्शवितात असें ह्मणावयास हरकत नाहीं.

या युगांमध्यें सर्वांत जुनें जें पाषाणयुग त्याचे आणखी दोन विभाग करतात. ते पूर्वपाषाणयुग व नवपाषाणयुग हे होत. या दोहोंमध्यें फरक एवढाच कीं, पहिल्यांत ह्मणजे पूर्व पाषाणयुगांत केलेलीं हत्यारें फार ओबडधोबड असत ह्मणजे त्यांस फोडून फोडून सरासरी आकार आणलेला असे; परंतु नवपाषाणयुगांतील हत्यारें चांगलीं कांतीव घोंटीव असत. पूर्वपाषाणयुगासंबंधानें आणखीही एक विशेष गोष्ट आहे ती अशी कीं, ज्या ठिकाणीं त्या काळचीं हत्यारें सांपडतात त्या ठिकाणावरूनच नवपाषाणयुगांतील हत्यारांपेक्षां तीं जुनीं आहेत असें स्पष्ट दिसतें; शिवाय ही दोन्ही प्रकारचीं हत्यारें फार करून एके ठिकाणीं सांपडत नाहींत. या दोन पोटविभागांमध्यें तिसरा फरक असा आहे कीं, पूर्वपाषाणयुगांतील माणसांच्या अवशेषांवरोबर पुष्कळ मोठ्या मोठ्या सस्तन प्राण्यांचेही अवशेष आढळतात व हे प्राणी ह्मणजे मोठे अस्वल, हत्ती, व गेंडे, हे नवपाषाणयुगांतील माणसाचा अवतार होण्यापूर्वीच जगांतून निर्वंश झांले. तात्पर्य, हे दोन विभाग निराळे मानणें वरील कारणास्तव भाग आहे. आणखी हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, पूर्वपाषाणयुगांत पृथ्वीवरील पाणी व जमीन यांची वांटणीही नवपाषाणयुगांतील वांटणीहून फार निराळी होती; पण नवपाषाणयुगाच्या आरंभापासून आतांपर्यन्त भूपृष्ठाची स्थिति व त्यावरील हवामान हीं बहुतेक कायमच आहेत.

या तीन युगांचा भूगर्भांतील थरांच्या कालाशीं संबंध काय व कसा

आहे हें समजण्याकरितां भूस्तरशास्त्रांत त्या थरांचें वर्गीकरण कसें केलें आहे हें थोडें पाहिलें पाहिजे. पुराणवस्तुशास्त्र आणि भूस्तरशास्त्र यांचा संबंध असा आहे कीं, पहिल्याची सीमा संपली कीं दुसऱ्याची लगेच सुरू होते. त्यांत भूस्तरशास्त्र पृथ्वीच्या आयुष्यक्रमांतील अति प्राचीन कालाचें विवेचन करतें. पुराणवस्तुशास्त्रज्ञ भूपृष्ठावर किंवा त्याच्या जरा खालीं सांपडलेल्या प्राचीन अवशिष्ट वस्तूंवरून आपलीं अनुमानें बांधतात. पण भूस्तरशास्त्रज्ञ त्याच्या पलीकडचे जे लक्षावधि वर्षांपासून बनलेले दगडाचे व मातीचे थर त्यांचें वर्गीकरण करून आपलीं अनुमानें करतात. या दगडाच्या थरांत आढळणाऱ्या प्राण्यांच्या अस्थिशेषांच्या प्रकारांवरून भूस्तरशास्त्रज्ञांनीं त्या थरांचे पांच वर्ग केले असून ते वर्ग या भूगोलाच्या आयुष्यक्रमांतील निरनिराळ्या युगांचे दर्शक आहेत. वर सांगितलेलीं पाषाण, कांस्य व लोह हीं युगें जशीं एकमेकांपासून अगदीं विलग नाहींत तशीं हीं भूस्तरयुगेंही नाहींत; पण त्यांच्याप्रमाणेंच, हींही एकमेकांपासून भिन्न आहेत असें त्यांतील विशिष्ट प्रकारच्या अस्थिशेषांवरून उघड दिसतें. या भूस्तरयुगांतील प्रत्येकाचे आणखीही पोट-विभाग केले आहेत. हल्लीं चालू असलेल्या युगापासून त्यांचा क्रम येणेंप्रमाणें आहे.

युगनाम.	पोट विभाग.
१ तृतीयोत्तर ऊर्फ चतुर्थयुग...	१ हिमोत्तरकाल (चालू युग). २ हिमकाल.
२ तृतीययुग अथवा वराह-काल...	१ शिवालिकोत्तरकाल, २ शिवालिककाल, ३ प्राक्शिवालिककाल.
३ द्वितीययुग अथवा कूर्म-काल...	१ कोहाट अथवा कठिकाकाल, २ पार किंवा हजाराकाल, ३ तालचीर किंवा कन्हाडवारीकाल.
४ आद्यचैतन्ययुग किंवा ओघाधिमत्स्यकाल ...	१ गोंडवनकाल, २ आंगारिक अथवा कियोल काल, ३ त्रिविष्टप किंवा पुराण-रक्तवालुकोपलकाल, ४ विंध्योत्तर-काल, ५ विंध्यकाल, ६ प्राग्विंध्यकाल.
५ अचैतन्ययुग किंवा जीव-शून्यकाल.	१ आदिस्फटिककाल.

यावरून असें दिसून येईल कीं, सांप्रत माहित असलेल्या दगडांच्या थरांपैकीं सर्वांत जुने ह्मणजे अचैतन्ययुगीन थर होत. त्याच्या मागाहून झालेले आद्यचैतन्ययुगीन, द्वितीययुगीन, तृतीययुगीन व शेवटचे चतुर्थ-युगीन असे क्रमानें आहेत.

यांपैकीं आपल्याला फक्त शेवटच्याचा ह्मणजे चतुर्थ युगाचाच काय तो विचार करावयाचा आहे. त्याचे हिमकाल व हिमोत्तरकाल असे दोन भाग केलेले आहेत. त्यांपैकीं पहिल्याच्या शेवटीं व दुसऱ्याच्या आरंभीं अतिशय बर्फ उत्पन्न होऊन त्यानें यूरोप व अमेरिका या खंडांचा उत्तर भाग बहुतेक व्यापून टाकला होता. त्याच्या थराची जाडी कित्येक हजार फूट होती. वर सांगितलेलीं जीं लोहादि युगें त्यांपैकीं लोह, कांस्य व नव-पाषाण हीं युगें हिमोत्तरकालांतील होत. परंतु पूर्वपाषाणयुग हिमकालांतच होऊन गेलें असावें असा तर्क कित्येक करतात. तरी पण या पूर्व-पाषाण युगांतील कांहीं अवशेष हिमोत्तर कालांतही सांपडत असल्यामुळें पूर्व-पाषाण युगांतील माणसें बर्फाचा पूर येऊन गेल्यावरही कांहीं काळपर्यन्त होतीं असें दिसतें. अगदीं नवीन झालेल्या शोधांवरून मनुष्य प्राण्याचें प्राचीनत्व याहूनही जास्त आहे, ह्मणजे तृतीय युगामध्येंही तो होता असें समजून आलें आहे; निदान चतुर्थ युगामध्यें तरी त्याचें अस्तित्व सदैव होतें असें सिद्ध करण्याला आतां लागेल तितका पुरावा मिळाला आहे.

नव-पाषाणयुग ह्मणून जें वर सांगितलें तें कधीं सुरू झालें असावें याबद्दल निरनिराळ्या शास्त्रज्ञांचीं निरनिराळीं मतें आहेत; परंतु कोणीही तो काळ इ. स. पूर्वी ५००० वर्षांहून प्राचीन आहे असें ह्मणत नाही. पण त्या काळीं झटलें तर ईजिप्ट व खाल्डिया या देशामध्यें सुधारणेच्या शिखरास पोंचलेलीं अशीं साम्राजें नांदत होतीं. पूर्वपाषाण-युगांत स्विट्झरलंड देशांतील लोक लहान लहान तलावांत खांबांवर घरें बांधून रहात होते. त्या तलावांत तेव्हांपासून सांठलेल्या गाळाच्या प्रमाणावरून वर सांगितलेल्या काळाचा अदमास केलेला आहे. डेनमार्क देशांत आढळणाऱ्या एका प्रकारच्या सांठलेल्या शेवाळीवरूनही तेथील पूर्वपाषाणयुगाच्या आरंभकालाची कांहीं अटकळ करतां येते. हिम-कालांतील बर्फाच्या प्रवाहांत सांपडलेलीं झाडें कांहीं कालानें कुजून त्यांचा

कोळशासारखा एक पदार्थ झालेला आहे, त्यांत ही शेवाळ आढळते. या पृथक्कृत वृक्षांच्या थरांमध्यें तीन प्रकारचीं झाडें आढळतात. वर बीच, मध्यें ओक व खालीं देवदार. हवेमध्यें हळू हळू होत जाणाऱ्या फरकामुळेंच हे उद्भिज्जांतील फरकही झाले असें ह्मणतात. या थरांत आढळणाऱ्या हत्यारांवरून व दुसऱ्या अवशेषांवरून शास्त्रज्ञांनीं असें अनुमान काढलें आहे कीं, पाषाणयुग, देवदारुकाल आणि ओककालाचा थोडासा भाग हीं समकालीन असावींत, व कांस्य आणि लोह हीं युगें अनुक्रमें ओक व बीच यांच्या कालाशीं समान असावींत. वर सांगितलेले शेवाळीचे थर बनावयास सुमारें १६००० वर्षें लागलीं असावीं असा अदमास केलेला आहे; आणि या अदमासाप्रमाणें पहातां देनमार्क देशांतील नवपाषाण-युगाचा आरंभ कमींत कमी निदान १०००० वर्षांपूर्वीचा आहे असें ह्मणावें लागतें. परंतु हे केवळ अदमासच असल्यासुळें नवपाषाणयुगाचा आरंभ यूरोपांत इ. स. पूर्वी ५००० वर्षांच्या सुमारास झाला असें सामान्यतः ह्मणावयास हरकत नाहीं.

परंतु नवपाषाणयुग सोडून पूर्वपाषाणयुगाचा विचार करूं लागलें असतां त्याचा आरंभकाल ठरविणें फारच कठीण आहे असें दिसतें. पूर्वपाषाणयुगाचा काल ठरविणें ह्मणजे खरोखर हिमोत्तरकालाचाच आरंभकाल ठरविणें होय. बर्फाचा पूर नाहींसा झाल्यावर थोड्याच काळानें यूरोपाच्या पश्चिम भागांत पूर्वपाषाणयुगांतील माणसांनीं प्रवेश केला असला पाहिजे; आणि या युगांतील माणसें बर्फाचा पूर येण्यापूर्वीही अस्तित्वांत असावीं असें ह्मणण्यास चांगलीं कारणें आहेत; असें प्रसिद्ध इंग्लिश भूस्तरशास्त्रज्ञ प्रोफेसर गीकी याचें मत आहे. हिमकालामध्यें भूपृष्ठ व त्यावरील हवामानाची स्थिति यांमध्यें अतिशय मोठे बदल झालेले आहेत. हे फरक कोणते व त्यांचीं कारणें काय याचें विवेचन पुढें येईल. या ठिकाणीं आपल्याला फक्त हिमोत्तरकालाचा आरंभ केव्हां झाला हें ठरवावयाचें आहे. या विषयासंबंधानें भूस्तरशास्त्रवेत्त्यांमध्यें दोन निराळीं मतें आहेत. यूरोपीय शास्त्रज्ञ ह्मणतात कीं, हिमकाल सुरू झाल्याबरोबर जमीनीची मोठी आलटापालट होऊन ती कोटें उंचाचीं खोल, व कोटें खोलाचीं उंच झालीं; हे एवढाले फरक फार सावकाश होत असतात; ह्मणून हिमोत्तरकालाचा आरंभ ५० किंवा ६० हजार वर्षांपेक्षां अलीं-

कडचा असूं शकणार नाहीं. परंतु बऱ्याच अमेरिकन भूस्तरशास्त्रज्ञांचें असें मत आहे कीं, हा काळ बराच अर्वाचीन आहे. बर्फाचा पूर येऊन गेल्यापासून झालेल्या द-यांच्या झिजण्याला, व नदीकांठीं जमलेल्या गाळाला सांठवावयास लागणारा जो काळ त्याचा निरनिराळ्या प्रकारांनीं हिशोब करून वरील अनुमान त्यांनीं काढलें आहे. उदाहरण, अमेरिकेंतील नायगारा नदीच्या धबधब्याखालचा खळगा प्रस्तुत दिसणाऱ्या प्रमाणावरून पहातां ७००० वर्षांच्या आंतच पडला असला पाहिजे, असें गिलबर्ट नांवाचा एक अमेरिकन शास्त्रज्ञ म्हणतो. दुसऱ्याही अमेरिकेंतील भूस्तरशास्त्रज्ञांनीं इतर पुष्कळ ठिकाणीं घेतलेल्या अनुभवावरून असें अनुमान काढलें आहे कीं, गेला हिमकाल संपल्याला आठ हजार वर्षांहून अधिक काल कांहीं लागला नाहीं. स्विट्झरलंडांतील कांहीं तलावांत सांठलेल्या गाळाच्या प्रमाणावरून नवपाषाणयुगाचा स्थूल रीतीनें काढिलेला काळ व वर सांगितलला अमेरिकन शास्त्रज्ञांचा अंदाज हे बहुतेक बरोबर जमतात. परंतु यूरोपीय शास्त्रज्ञांच्या मतांशीं त्यांचा फारच विरोध येतो. सांप्रतच्या ज्ञानावरून यांतील कोणता अंदाज खरा आहे हें ठरविणें मुष्किलीचें आहे. परंतु असा एक संभव दिसतो कीं, ज्याप्रमाणें पाषाण-कांस्यादि युगें निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या वेळीं होऊन गेलीं, त्याप्रमाणें कांहीं स्थानिक कारणांवरून हिमकालही निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या वेळीं सुरू होऊन संपला असेल. अमेरिकन शास्त्रज्ञांचा अंदाज ईजिप्ट देशांतील प्राचीन सुधारणाकालाशीं मुळींच जमत नाहीं म्हणून तो खरा नव्हे असें प्रोफेसर गीकीचें म्हणणें आहे. परंतु आफ्रिकेमध्यें हिमकालाची अद्यापिहो कांहीं खूण दिसून येत नसल्यामुळें सदर शंकेचें महत्व अगदीं कमी होऊन, अमेरिकन शास्त्रज्ञांचें म्हणणें कशाच्याही विरुद्ध नाहीं असें ठरतें.

अमेरिकन शास्त्रज्ञांचें म्हणणें खरें आहे असें म्हणावयास आणखीही कारणें आहेत. हिमकाल होऊन गेल्याबद्दलच्या ज्या कांहीं खुणा सांपडतात त्या सर्व यूरोप व अमेरिका यांच्या उत्तर भागांतच सांपडतात; एशियाचा उत्तरभाग किंवा उत्तर अलास्का यांत कांहीं त्या अद्यापि आढळल्या नाहींत. यावरून उत्तर आशियामध्यें पूर्वी एका काळीं उत्तम हवा नव्हती असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. या विस्तृत प्रदेशांत पुष्कळ

ठिकाणीं गाळांत गडदलेले प्राचीनकाळचे मोठे मोठे हत्ती, गेंडे, गवे, व घोडे, यांच्या शरीरांचे अवशेष सांपडतात; आणि हे अवशेष इतक्या चांगल्या स्थितींत असतात कीं, एकदां तर एका हत्तीचें वर आलेलें शरीर अगदीं ताजें दिसत असल्यामुळें त्याचें मांस कुत्रे खाऊं लागले. या व दुसऱ्याही अगदीं निर्विवाद गोष्टींवरून असें दिसतें कीं, सैबीरिया-मध्यें एका काळीं चांगली सुखकर हवा होती; व तो काळ तेथें आढळ-णाऱ्या प्राचीन प्राण्यांच्या मृत शरीरांच्या ताजेपणावरून पहातां फार जुनाट असेल असें वाटत नाहीं. उत्तर आफ्रिका व सिरिया यांतील रखरखीत प्रदेशांत नदीप्रवाहामुळें सांठलेला गाळ जिकडे तिकडे आढ-ळतो; व यावरून, यूरोपांत जेव्हां हिमकाल सुरू होता त्या वेळीं आफ्रिकेंत पाऊस पडत असे, असें समजतात. ही गोष्ट जर खरी असेल, ह्मणजे, यूरोपांत जेव्हां हिमकाल चालू होता तेव्हांच उत्तरआफ्रिकेंत जर पावसाळे सुरू असतील, तर यूरोपीय शास्त्रज्ञांचे यूरोपांतील हिमकालाच्या आरंभ-कालाविषयींचे बडे बडे तर्क सोडून द्यावे लागतील, निदान त्यांत बरीच वजावट तरी करावी लागेल.

इतक्या प्राचीनकाळीं यूरोपांत रहात असलेल्या लोकांसंबंधानें विचार करता, तेथें सांपडणाऱ्या प्राचीन माणसाच्या शरीरशेषावरून व कपा-लत्वरून (डोक्याच्या कवच्या) असें दिसतें कीं, ते सांप्रत यूरोपाच्या निरनिराळ्या भागांत रहाणाऱ्या लोकांचे थेट पूर्वज होते. सध्यां मनुष्य जातीचें जें, आर्य, सेमेटिक, मंगोलियन इत्यादि वर्गीकरण केलें आहे, तें भाषेच्या तत्वावर केलें आहे. परंतु प्राचीन लोकांचा विचार करतांना पुराणवस्तुशास्त्रज्ञ व भूस्तरशास्त्रज्ञ हे सदर वर्गीकरण मान्य करणार नाहींत; कारण, ते ज्या चैतन्यावशिष्टादि गोष्टींवरून आपलीं अनुमानें बांध-तात त्यांवरून त्या लोकांच्या भाषादिकांसंबधानें कांहींच तर्क करितां येत नाहीं. ह्मणून त्यांनीं कपालांच्या प्रमाणावरून व आकारावरूनच इतिहास-पूर्वकालीन माणसांचें वर्गीकरण केलें आहे. कपालाची जास्तींतजास्ती रुंदी जर लांबीच्या तीन चतुर्थांश किंवा त्याच्याहून कमी असेल तर त्याला ते दीर्घशीर्ष या वर्गांत टाकतात; व ती रुंदी जर लांबीच्या शेंकडा ८३ हून जास्त असेल तर त्याला ह्रस्वशीर्ष या वर्गांत घालतात. या दोन वर्गाच्या मध्येंही आणखी एक वर्ग ते मानतात, तो ऋजुशीर्ष हा होय.

नव–पाषाणयुगांतील थरांमध्यें सांपडलेल्या निरनिराळ्या कपालांची परीक्षा करून मानववंशशास्त्रवेत्यानीं असें ठरविलें आहे कीं, यूरोपांत त्या युगांत चार प्रकारचे लोक रहात असून थेट त्यांच्यापासूनच सांप्रतचे यूरोपांतील लोक झालेले आहेत. या चार वर्गांपैकीं दोन दीर्घशीर्ष व दोन ह्रस्वशीर्ष असून या दोहोंपैकीं पुनः एक उंच व ठेंगणा असे होते. सध्यां या सर्व वर्गांतील यूरोपीय लोक आर्यभाषाच बोलतात. परंतु यांपैकीं कोणता तरी एकच वर्ग, खरोखर आर्य होता हें उघड आहे. हा खरोखरचा आर्यवर्ग कोणता याविषयीं मात्र निरनिराळ्या पंडितांचीं निरनिराळीं मतें आहेत. कांहीं जर्मन पंडित ह्मणतात कीं, सध्याच्या जर्मन लोकांचे पूर्वज जे दीर्घशीर्ष वर्गांतील उंच लोक तेच खरे मूळचे आर्य; पण फ्रेंच पंडितांच्या मतें मूळचे प्राचीन आर्य ह्रस्वशीर्ष असून गाललोक (फ्रान्स देशांतील मूळचे रहिवाशी) हेच त्यांचे खरे प्रतिपुरुष होत. या वादावर कॅनन टेलर नांवाचा इंग्लिश ग्रंथकार ह्मणतो कीं, जेव्हां दोन प्रकारच्या लोकांचें संघट्टण होतें, तेव्हां त्यांपैकीं जे अधिक सुधारलेले असतात त्यांचीच भाषा बहुधा दुसरे लोक घेतात; ह्मणून बाल्टिक समुद्राच्या किनाऱ्यावरील दीर्घशीर्ष रानटी लोकांचा जेव्हां सुधारलेल्या ह्रस्वशीर्ष आर्यांशीं संबंध आला तेव्हां त्यांनींच आर्य भाषा आर्यांपासून उचलली असें ह्मणणें बरें दिसतें; उलट ह्मणणें, ह्मणजे त्या रानटी लोकांनींच हिंदु, ग्रीक व रोमन यां लोकांना आर्य बनविलें असें मानणें बरोबर नाहीं.

सदरहू चार वर्गांपैकीं यूरोपांतील मूळ आर्य असें कोणत्या वर्गास ह्मणावें, हें ठरविण्याचें दुसरें साधन ह्मटलें ह्मणजे भाषाविषयक अवशेषांवरून सर्व आर्य एके ठिकाणीं असतांनां त्यांची जी सुधारणा झाली असावी असें दिसतें, त्या सुधारणेची व नवपाषाणयुगीन माणसांच्या निवासस्थानांमध्यें सांपडलेल्या वस्तूंवरून दिसून येणाऱ्या त्यांच्या सुधारणेची तुलना करणें हें होय. पूर्वपाषाणयुगांतील माणसांची समाजस्थिति ह्मटली तर अविभक्त आर्यांच्या स्थितीहून फारच कनिष्ट होती. पूर्वपाषाणयुगांतील माणसें दगडी परशु व हाडांच्या सुया वापरीत असून शिल्पकला व चित्रकला याही त्यांस थोड्याबहुत अवगत होत्या; असें त्यांनीं हाडांवर कोरलेल्या निरनिराळ्या प्राण्यांच्या आकृतींवरून दिसतें. परंतु त्यांस मातीचीं भांडीं करण्याची कला व धातूंचा उपयोग हीं मुळींचें माहीत

नव्हतीं. मातीचीं भांडीं प्रथम सांपडतात, तीं नवपाषाणयुगांत स्विट्झरलंडांतील तडागवासी लोकांच्या खांबांच्या घरांत सांपडतात. पण या लोकांपकींही जे जुने लोक, त्यांना तरी धातु व रथ यांची माहिती होतीसें दिसत नाहीं. पण या दोन्ही गोष्टींची माहिती आर्य लोक एकत्र असतांना त्यांस होती. शिवाय, या तडागनिवासी लोकांमध्यें लोंकरीच्या कापडाचा कांहीं मागमूसही मिळत नाहीं; कांस्य युगामध्यें त्यांच्यापाशीं मेंढ्याही पुष्कळ होत्या, नाहीं असें नाहीं. पण इतक्या गोष्टी खेरीज करून स्विटझरलंडांतील तडागवासी लोकांची सुधारणा, युरोपांतील इंडोजर्मन आर्यशाखांतील लोकांच्या सुधारणेच्या सारखीच बहुतेक होती असें डाक्टर श्रेडर नांवाच्या जर्मन पंडिताचें मत आहे; व त्यावरून तो ह्मणतो कीं, स्विटझरलंडातील प्राचीन रहिवासी हे यूरोपीय आर्य शाखांतील एका शाखेचे होते असें मानावयास कांहीं हरकत नाहीं.

याप्रमाणें अर्वाचीन शास्त्रीय शोधांवरून जरी यूरोपामध्यें इतिहासकालापूर्वीं रहात असलेल्या माणसांची इतकी माहिती मिळते, व त्यावरून नवपाषाणयुगांतील मनुष्यांच्या चार वर्गांपैकीं एका वर्गांतील लोक हेच यूरोपांतील आदि आर्य होते असें जरी आपण मानिलें, तरी ते आर्य लोक तेथें मूळचेच रहाणारे होते कीं, त्यांनीं दुसऱ्या कोठून तरी तेथें येऊन आपल्या श्रेष्ठ सुधारणेच्या जोरावर मूळच्या लोकांस आपल्यासारखे आर्य बनविलें, या प्रश्नाचा त्या शोधावरून निकाल होत नाहीं. नवपाषाणयुगांतील स्विटझरलंडांतल्या तडागवासी लोकांचा काल इ. स. पूर्वी ५००० वर्षांहून अलीकडचा नाहीं; त्या वेळीं आर्य लोक मध्य आशियांतील यक्षावर्त (जक्झार्टिस) नदीच्या काठीं वसाहत करून राहिले होते. यूरोपांतील मूळचे आर्य हे पूर्वपाषाणयुगांतील माणसांचे वंशज नव्हत, हें सर्व कबूल करतात. ह्मणजे यावरून सिद्ध झालें कीं, जर नवपाषाणयुगाच्या आरंभीं आर्य लोक यूरोपांत असतील, तर ते तेथें दुसऱ्या कोठून तरी गेले असले पाहिजेत. असें नसेल, तर दुसरा एकच पक्ष उरला; तो ह्मणजे यूरोपांतील नवपाषाणयुगीन माणसांच्या चार वर्गांपैकीं एकानें इतर वर्गांशीं कोणत्याही प्रकारचा संबंध न ठेवतां आर्यांप्रमाणें आपली सुधरणा करून घेतली अशी कल्पना करणें हा होय. पण ही कल्पना दर्शनींच असंभवनीय दिसते. ह्मणजे प्राचीन काळीं मध्य आशियांतील मूलस्थानापासून आर्य

लोकांच्या निरनिराळ्या टोळ्या क्रमाक्रमानें यूरोपांत गेल्या, असें ह्मणणें खोटें आहे हें जरी नवीन शास्त्रीय शोधांवरून आपल्याला समजलें, तरी आपला प्रस्तुत प्रश्न जो आर्य लोकांचें आदिस्थान त्याचा कांहीं उलगडा होत नाहीं. तो तसाच रहातो. मूळ आर्यभाषा ही कधीं व कोठें उत्पन्न झाली, हाही प्रश्न तसाच फार बिकट असून त्याचेंही आज-पर्यंत समाधानकारक उत्तर कोणीं दिलेलें नाहीं. कॅनन टेलरनें आर्य-भाषा व उरल पर्वतापासून आलताई पर्वतापर्यंतच्या लोकांच्या भाषा यांची तुलना करून असें संदिग्ध अनुमान काढलें आहे कीं, पूर्वपाषाणयुगाच्या अन्तीं फिन्लंडांतील एका जातीचे लोक यूरोपांत आले व त्यांची बहुतेक वाढल्याशिवाय राहिलेली भाषा व सध्यांची संश्लिष्ट अशी बास्क भाषा (बिस्केच्या उपसागराच्या किनाऱ्यानजीक व पिरनीज पर्वतांच्या दोन्ही बाजूंकडे बोलण्यांत असलेली भाषा) या एकरूपच आहेत. तो आणखी असें ह्मणतो कीं, त्या काळानंतर पुष्कळ वेळानें, ह्मणजे मेंढ्या गाई वगैरे जनावरांचे कळप पाळून त्यांवर लोक उपजीविका करूं लागल्यावर, फिन्लंडांतील पहिल्या लोकांपेक्षां उंच व शक्तिमान् अशा फिनो-ऊग्रिक नांवाच्या लोकांनीं मध्य यूरोपांत येऊन तेथें विभक्तिविशिष्ट अशी जी आर्यभाषा ती उत्पन्न केली. परंतु हा केवळ तर्क असल्यामुळें, यूरो-पांतील लोक नवपाषाणयुगांत असतांना इंडो-इराणी लोक आशियामध्यें चांगल्या सुधारलेल्या स्थितींत होते हें कसें, या प्रश्नाचें त्याच्यावरून उत्तर मिळत नाहीं. शिवाय, फिन्लंडांतील भाषांमध्यें किती तरी सुधारणा-विषयक शब्द आर्य लोकांपासून घेतलेले दिसतात. आर्य लोकांनीं आपले विभक्तिप्रत्यय वगैरे फिनिश भाषांतून घेतले असावे हें असं-भवनीय आहे. नुसत्या विभक्तिप्रत्ययांमध्यें वगैरे साम्य आहे, एवढ्या गोष्टीवरूनच कोणी कोणाची उसनवारी केली हें मुळींच ठरवितां येणार नाहीं. परंतु, भाषातत्वाच्या जोरावर काढिलेली मध्य आशियांतील आर्यांच्या मूलस्थानाची कल्पना हाणून पाडणाऱ्या पंडितांनींच पुनः भाषेच्या तत्वावरच वरच्या सारखीं विधानें करावीं हें मोठें आश्चर्य आहे. शिवाय, त्या अनुमानांवरून फिनिश लोक आपलें स्थान दोन वेळां सोडून खालीं कां उतरले, ह्याही प्रश्नाचा उलगडा होत नाहीं. या प्रकारच्या कारणांवरून असें विशेष संभवनीय दिसतें कीं, फिनिश लोकांचा जेव्हां

आर्य लोकांशीं संबंध आला, तेव्हां त्यांनीं आपले सुधारणाविषयक शब्द आर्य लोकांपासून घेतले; व आर्य लोक हे मूळचे आशिया किंवा यूरोप यांतील नसून त्यांचें मूलस्थान नवपाषाणयुगांत उत्तरध्रुवाजवळ कोठें तरी होतें व तेथून ते दक्षिणेकडे आशिया व युरोपमध्यें गेले; आणि याचें कारण केवळ अनिवार्य मनःप्रवृत्ति एवढेंच नसून त्यांच्या मूलस्थानांतील हवामानांत होणारे अहितकारक फेरबदल हे होत. या म्हणण्याला पारशी लोकांच्या धर्मग्रंथांमध्यें पुष्कळच पुरावा आहे. आजपर्यंत त्यांतील गोष्टी निरर्थक म्हणून पंडितांनीं सोडून दिल्या आहेत व त्यास वेदांत कांहीं पुरावा नाहीं असेंही ते म्हणतात. मनुष्यप्राणी हा हिमकालान्तरचा आहे अशी त्यांची पूर्वकल्पना होती. परंतु नवीन शास्त्रीय शोधांनीं अतिप्राचीनकाळदर्शक असें साधन आतां आपल्याला उपलब्ध करून दिलें असल्यामुळें, अवेस्त्यांत वर्णिलेल्था गोष्टी इतिहास असून त्यांस वेदांचाही भरपूर पाठिंबा आहे, असें आपल्याला दाखवितां येणार आहे. कांहीं प्रसिद्ध शास्त्रज्ञांनीं सर्व वनस्पति व जीवकोटींचें आदिस्थान उत्तरध्रुव असें मानिलें आहे; व आर्य लोकांचें अगदीं आद्यस्थान उत्तरध्रुवाजवळ कोठें तरी होतें, हें सिद्ध करण्यास वेद व अवेस्ता यांमध्यें भरपूर पुरावा आहे, हेंही आपणांस दाखवितां येईल. हिमकालांत पृथ्वीवर हवामानाची स्थिति कशी होती व उत्तरध्रुवप्रदेशांमध्यें ज्योतिषविषयक विशिष्ट गोष्टी काय दिसतात, याचा विचार पुढील दोन प्रकरणांत करून नंतर आपण त्या पुराव्याकडे वळूं.

प्रकरण २ रें.

हिमकाल अथवा बर्फाचा पूर.

ऋतुपर्याय होण्याचें कारण क्रान्तिवृत्त व विषुववृत्त यांतील कोन–एवढेंच एक कारण नाहीं–अन्य कारणें–जमिनीचें उंचसखल होणें, सामुद्रप्रवाह वगैरे–गल्फ् स्ट्रीम नांवाच्या प्रवाहाचा परिणाम–जमीन आणि पाणी यांच्या वाटणीवर हवामान अवलंबून असतें–प्राचीन भूस्तरयुगांत पृथ्वीवर सर्वत्र समधात हवा होती–पुढील युगांत फरक झाला–द्वितीय व तृतीययुगांत कटिबंधाचा भेद झाला नव्हता–चतुर्थयुगाच्या आरंभीं हवेंत भयंकर फेर-फार झाले–त्याच्यापूर्वी ध्रुवप्रदेशांत ऊष्ण हवा होती–चतुर्थयुगांतील हिम-काल–त्याच्या अद्यापि आढणाऱ्या खुणा–उत्तर यूरोप व अमेरिका येथील हिमावरण–बर्फांबरोबर आलेल्या गदळाचा पूर्वीचा विस्तार–यूरोपांत १० लक्ष चौरसमैल–अमेरिकेंत याहूनही जास्त–गदळाचे दोन थर–त्यांवरून दोन हिमकालाचें अनुमान–प्रो० गीकीच्या मतें चार हिमकाल झाले–हिम-कालांत जमीन उंच होई व बर्फाचे लोट उत्पन्न होत–या बर्फाच्या थरांत माणसांचे अवशेष सांपडतात–हा हवेच्या स्थित्यन्तराचा काल होता–आ-जची हवामानाची स्थिति हिमोत्तरकालीन होय–हिमकालाच्या कारणाचा शोध–त्याला ऊष्ण हवा व विशिष्ट वायुप्रवाहाची आवश्यकता–या कारणांनी दोन हिमकालांचें तरी समर्थन झालें पाहिजे–बऱ्याच लोकांच्या कल्पना या कसाला टिकत नाहींत–लियलचें मत–डॉ० क्रोलचें मत–लियलच्या अनु-यायांचीं मतें–हिमकालाचा अवधि २ लक्ष वर्षे–इतरांचें मत २५ हजार वर्षे–बॉलचें मत–हिमकालाचें कारण ज्योतिःशास्त्रांत शोधिलें पाहिजे–क्रोलच्या उपपत्तीचा सयुक्तिकपणा–तिचा सारांश–संपातचलन आणि बदलणारी पृथ्वीच्या कक्षेची केन्द्रच्युति यांच्यामुळें ठराविक काळानें हिंवाळा व उन्हाळा यांच्या अवधींत फार फरक पडतो–केन्द्रच्युतीची व्याख्या–हर्शलची कल्पना–तीसंबंधानें बालचें मत–पृथ्वीला सूर्यापासून मिळणाऱ्या ऊष्णतेच्या प्रमाणा-संबंधानें बालचें म्हणणें–त्यावरून दिसून येणारें हिमकालाचें कारण–क्रोलच्या उपपत्तीवरील आक्षेप–केन्द्रच्युतीचीं मानें विश्वसनीय नाहींत–न्यूकॉंबचें मत–क्रोलची उपपत्ति पूर्वी एकदां बरी वाटत होती–या उपपत्तीप्रमाणें प्राचीन भूस्तरयुगांत अनेक हिमयुगें झालीं पाहिजे होतीं–परंतु तसें कांहीं दिसत नाहीं–क्रोलची उपपत्ति व भूस्तरशास्त्रज्ञ यांतील आणखी एक विरोध–प्रो. गीकीचें तिला अनुकूल मत–हडल्स्टनचें कडक विरुद्ध मत–एकंदर वादाचें तात्पर्य–पहिल्या व दुसऱ्या प्रकरणांत आलेल्या शास्त्रीय शोधांचा सारांश.

हिमकाल अथवा बर्फाचा पूर.

पृथ्वीची कक्षा ऊर्फ क्रान्तिवृत्त व तिचें विषुववृत्त हीं एकाच पातळींत नाहींत. त्यांच्या पातळ्यांमध्यें थोडासा (२३ अंश, १७ कला) कोन आहे. यामुळें पृथ्वीवरील हवा सर्वदा सारखीच नसून तीमध्यें वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमंत व शिशिर असे ऋतुपर्याय होत असतात.

पृथ्वीचा उत्तरध्रुव जेव्हां सूर्यापासून दूर असतो, तेव्हां उत्तर गोलार्धांत हिंवाळा व दक्षिण गोलार्धांत उन्हाळा होतो; व पुढें जेव्हां पृथ्वी सूर्याभोंवतीं प्रदक्षिणा करितां करितां तिचा दक्षिण ध्रुव सूर्यापासून लांब जातो व उत्तर ध्रुव जवळ येतो, तेव्हां वरच्या उलट स्थिति होते. या दोन गोलार्धांत होणाऱ्या ऋतुपर्यायाचें हें कारण अगदीं साधें आहे; व तें कायमचेंच असल्यामुळें अति प्राचीन काळच्या भूस्तरयुगांमध्येंही असेच ऋतुपर्याय होत असतील, असें कोणास वाटण्याचा संभव आहे. परंतु ही कल्पना भूस्तरशास्त्राच्या शोधांशीं अगदींच विरुद्ध आहे. पृथ्वीच्या विषुववृत्तपातळीचा क्रान्तिवृत्तपातळीशीं असलेला कोन हें एकच ऋतुपर्याय होण्याचें कारण नसून स्थानपरत्वें समुद्राच्या सपाटीपासून असलेली कमीजास्त उंची, विषुववृत्तावरची ऊष्णता इतर ठिकाणीं वाहून नेणारे समुद्रांतील व वायूचे प्रवाह यांच्या योगानेंही एकाच अक्षांशावरील निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे ऋतु होतात असें आढळून आलें आहे. या सामुद्रप्रवाहांपैकीं, मेक्सिकोच्या अखातांतून निघून क्यूबा बेट व अमेरिका यांच्यामधून ईशान्य दिशेनें यूरोपाकडे वाहत जाणारा कढत पाण्याचा प्रवाह विशेष संस्मरणीय* आहे. हा नसता तर यूरोपाच्या वायव्य भागांतील हवा हल्लीं आहे याहून फारच निराळ्या प्रकारची असती. हल्लीं पृथ्वीवर पाणी व जमीन यांची जशी वांटणी आहे, त्याहून ती जर कांहीं निराळ्या प्रकारची झाली, तर त्यामुळेंही हवेची स्थिति निराळ्या प्रकारची होईल; कारण, त्यामुळें विषुववृत्तावरील ऊष्णता इतरत्र वाहून नेणारे

---

* हा प्रवाह इंग्रजींत गल्फ् स्ट्रीम (Gulf Stream) या नांवानें प्रसिद्ध आहे.

समुद्रांतील, तसेच वायूचेही प्रवाह फिरतील. अति प्राचीन काळच्या भूस्तरयुगांमध्यें आल्पस् पर्वत अगदीं सखल असून हिमालय तर वरही येऊं लागला नव्हता, आणि आशिया व आफ्रिका खंडें म्हणजे नुसते लहान बेटांचे थवे होते. त्या वेळचे जमीनीच्या थरांत सांपडणारे जे प्राणी व वनस्पति यांचे अवशेष आहेत, त्यांचा विचार करतां, त्या काळच्या भूपृष्ठाच्या स्थितीमुळें तेव्हां सर्व पृथ्वीवर सारखी समशीतोष्ण हवा होती असें समजतें; व वरील विवेचनावरून यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं हें उघड आहे. प्रथम प्रकरणांत सांगितलेल्या द्वितीय व तृतीय युगांमध्यें या हवामानांत थोडासा फरक झाला होता असें दिसतें. पण या युगांमध्यें प्रथम युगाइतकी जरी सारखी हवा नसली, तरी तृतीय युगाच्या शेवटापर्यन्त पृथ्वीवर हवेसंबंधीं कटिबंधाचा भेद झाला नसून थंडी व ऊष्णता यांच्यामध्यें आतांच्या इतकें अंतर पडत नव्हतें; हें मात्र भूस्तरशास्त्रांतील पुराव्यावरून स्पष्ट दिसतें. परंतु तृतीय युगाचा अंतिम काल व चतुर्थ युगाचें प्रथमार्ध यांमध्यें हवेंत भयंकर फेरबदल होऊन त्या योगानें हिमकाल व हिमान्तरकाल उत्पन्न झाले. पण आतां असें निःसंशय सिद्ध झालें आहे कीं, हल्लीं ज्या वनस्पति फक्त ऊष्ण व समशीतोष्ण कटिबंधांतच वाढूं व जगूं शकतात, त्या वनस्पति तृतीय युगांत स्पिट्झबर्जनसारख्या ठिकाणीं म्हणजे जेथें सूर्य वर्षांतून सुमारें पांच महिने क्षितिजाखालीं असतो अशा अति उन्नत अक्षांशावर मोठ्या जोमानें वाढत असत. यावरून त्या वेळीं ध्रुवप्रदेशांत चांगली ऊष्ण हवा होती हें उघड होतें.

या प्रदेशांतील समधात हवेंत एकाएकीं जे फेरफार होऊन त्यायोगें हिमकाल उत्पन्न झाला, ते चतुर्थ युगाच्या प्रथमार्धांत झाले. चतुर्थयुगाचें प्रथमार्ध व हिमकाल यांच्या मर्यादा जरी अगदीं एकच नसल्या, तरी हे दोन्ही काल स्थूलमानानें एकच म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. या कालामध्यें हिमकाल एकच झाला कीं अधिक झाले याचें विवेचन करणें येथें शक्य नाहीं. त्याचें सामान्यतः स्वरूप काय आहे व अशाप्रकारचे भयंकर फेरबदल होण्याचीं कारणें भूस्तरशास्त्रवेत्ते व सृष्टिशास्त्रवेत्ते यांच्या मतें काय आहेत एवढें मात्र आपल्यास थोडक्यांत सांगतां येईल. याच्या कारणांसंबंधानें जरी शास्त्रज्ञ लोकांमध्यें अद्यापि मतभेद आहे, तरी हिमकाल

ह्या होऊन गेल्याबद्दल कांहीं कोणाला संशय नाहीं. अजूनही बर्फाचे थर पृथ्वीवरून साफ नाहींसे झाले नाहींत, व आल्पस् पर्वताच्या दऱ्यांत व ध्रुवाजवळच्या प्रदेशांमध्यें आपल्याला अजूनही हिमनद्यांच्या रूपानें बर्फाचे खेळ पहातां येतील. ग्रीनलंडसारखे प्रदेश अजूनही इतक्या जाडीच्या हिमावरणानें आच्छादिलेले आहेत कीं, तेथें वनस्पतींचा लागवड होणें व माणसें रहाणें शक्य नाहीं. या प्रदेशांतील हिमनद्यांच्या कार्याचें निरीक्षण केल्यावरून भूस्तरशास्त्रवेत्यांना, प्राचीन काळीं उत्तर यूरोप व उत्तर अमेरिका येथें सर्वत्र ठिकाणीं अशाच प्रकारचे बर्फाचे परिणाम झाल्याचें दिसून आलें आहे. या ठिकाणीं गरगरित व खरवडलेल्या मोठमोठ्या शिला, अद्यापि जिचे थर बनले नाहींत अशी एकाप्रकारची चिकण माती, वाटोळे झालेले खडक व टेंकड्या वगैरे ज्या गोष्टी आढळतात त्यांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, उत्तर यूरोप व उत्तर अमेरिका यांतील प्रदेशांत एके काळीं कित्येक हजार हात जाडीचा बर्फाचा थर पसरलेला होता. या प्रदेशांनां व्यापून टाकणारें सर्वच बर्फ उत्तरध्रुवाकडून आलें होतें असें नाहीं. बर्फाच्या योगानें खडकांवर निघालेल्या रेषा किंवा पट्टे यांच्या दिशांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, तें बर्फ सर्व ठिकाणावरून व पर्वतांवरून निरनिराळ्या दिशांनीं खालीं उतरलें होतें. या बर्फाच्या थरांनीं स्कँडिनेव्हियाचा (स्वीडन नार्वे) सर्व भाग आच्छादून, उत्तर समुद्र भरून टाकून, ब्रिटनमध्यें (इंग्लड) प्रवेश करून, टेम्सनदीची दरी, उत्तर जर्मनी, मास्कोपर्यंन्त रशियाचा सर्व उत्तर भाग व पूर्वेस उरल पर्वतापर्यंन्त बहुतेक प्रदेश व्यापून टाकिले होते. या हिमनद्यांनीं व हिमपाताच्या योगानें तुटलेल्या फुटलेल्या खडकांचा गदळ यूरोपांत निदान १० लक्ष चौरस मैलांवर व उत्तरअमेरिकेंत तर याहूनही जास्त प्रदेशावर पसरला होता असा अंदाज केलेला आहे; व या गोष्टीवरूनच हिमकाल होऊन गेल्याविषयीं भूस्तरशास्त्रज्ञ अनुमान करतात. या गदळामध्यें दोन प्रकारची चिकण माती आहे व त्यावरून दोन वेळां बर्फाचा पूर आला होता असें दिसतें. दुसऱ्या वेळच्या गदळानें पहिल्या गदळाचे थर पुष्कळ ठिकाणीं मोडले आहेत; तरी पण दोन निरनिराळ्या वेळीं चिकण माती व वाहून आलेला गदळ यांचे दोन निराळे थर झाले होते एवढें दाखविण्यापुरते त्यांचे भाग शिल्लक राहिलेले आहेत. प्रो. गीक्कीच्या मतें असे

एकामागून एक चार हिमकाल चतुर्थ युगाच्या पूर्वार्धांत यूरोपांत होऊन गेले; पण इतर भूस्तरशास्त्रज्ञ हें कबूल करीत नाहींत. तरी दोन हिमकाल व त्यांच्या मधील हिमान्तरकाल एवढीं तरी होऊन गेलीं याबद्दल सर्वांची खात्री आहे.

हे हिमकाल व त्यांमधील हिमान्तरकाल यांमध्यें हवा क्रमानें अतिथंड व अतिऊष्ण होत गेली असली पाहिजे; व त्याबरोबरच जमीनही ठिकठिकाणीं कोठें अति उंच तर कोठें अति सखल अशी झाली असली पाहिजे. जमीन सखल होणें ती एकाद्या ठिकाणीं बर्फाचें फार ओझें पडल्यामुळें होत असे. हिमकाल सुरु झाला झणजे जमीन उंच होऊं लागे, हवा भयंकर थंड होई आणि हल्लीं आपण ज्याला समशीतोष्ण कटिबंध झणतों, त्या प्रदेशांत बर्फाचे मोठमोठे लोटच्यालोट येऊं लागत. ते बंद झाले झणजे पुनः जमीन सखल होऊं लागे व हवा नेमस्त होऊन ध्रुवप्रदेशहि वसतियोग्य होत. वर सांगितलेल्या दोन हिमकालांतील चिकण मातीच्या थरांच्यामध्यें पुरून गेलेले पूर्वपाषाणयुगीन माणसांचे अवशेष सांपडतात; व त्यांवरून चतुर्थ युगांत हिमान्तरकालामध्यें मनुष्यप्राणी होता असें निःसंशय ठरतें. हिमकाल व हिमान्तरकाल यांतील हवेसंबंधानें प्रो. गीकी झणतो, 'हिमान्तरकालांत हिंवाळे समधात असत व उन्हाळेही तसेच असत, त्यामुळें ऊष्ण कटिबंधांत आढळणाऱ्या वनस्पति व हत्ती, गेंडे आणि सरिदश्व यांसारखे मोठेमोठे प्राणी ध्रुवप्रदेशांत सर्वत्र संचार करीत व पूर्वपाषाणयुगीत माणसानांही तेथें सुखाचें स्थान नव्हतें असें नाहीं.' यावरून हवेसंबंधानें पहातां चतुर्थ युगाच्या प्रथमार्धांतील स्थितीही त्या पूर्वीच्या युगांतील म्हणजे सर्वत्र सारखी हवा असण्याची स्थिति व सांप्रतची म्हणजे एके ठिकाणी अति थंड, दुसरे ठिकाणीं समशीतोष्ण तर तिसरे ठिकाणीं अति ऊष्ण अशी स्थिति, यांच्या मधली होती. सारांश, हवेच्या स्थित्यन्तराचाच हा काल होय. हवामानाची आजची स्थिति हिमोत्तरकालाच्या आरंभी स्थापित झाली. तरी यावर प्रो० गीकीचें असें म्हणणें आहे कीं, प्रस्तुतचें हवामान स्थापित होण्यापूर्वी हिमोत्तरकालांत सुद्धां यूरोपाच्या वायव्य भागांत एकदां समधात व पुन्हा फार थंड अशी हवा कांही कालपर्यंत होती.

हिमकाल व हिमान्तरकालांतील ध्रुवप्रदेशावरील सौम्य हवेचें अस्तित्व वा गोष्टी जरी निःशंक ठरल्या, तरी या भयंकर उत्पाताच्या कारणांचा

कांहीं अजून शास्त्रज्ञांना चांगला तलास लागला नाहीं. सर्व उत्तर यूरोप व उत्तर अमेरिका यांनां व्यापून टाकणारे बर्फाचेलोट कांही आपोआप निर्माण झाले नाहींत; 'असत्' म्हणजे शून्यापासून कांहीं होणार नाहीं हें उघड आहे. अशा प्रकारचे बर्फाचे लोट तयार व्हावयास म्हणजे पृथ्वीवर दुसऱ्या कोठें तरी अतिशय ऊष्णता असून तिच्या योगानें जमीनीवरील पाण्याची पुरेशी वाफ झाली पाहिजे व ही वाफ थंड प्रदेशांत नेऊन तेथें तिचें बर्फ बनविण्यासाठीं तशा प्रकारचे वायुप्रवाह पाहिजेत. ज्या उपपत्तीवरून हिमकालाचें कारण टरवावयाचें तीमध्यें जर सदर गोष्टींचा विचार केलेला नसेल तर ती अगदीं अपुरी इतकेंच नव्हे, तर केवळ कुचकामाची होय. त्या उपपत्तीवरून एकामागून एक असे निदान दोन तरी हिमकाल झाले असें दाखवितां आलें पाहिजे. या कसाला प्रस्तुत पुढें आलेल्या उपपत्त्या लावल्या, म्हणजे त्यांपैकीं बहुतेकींचा निकाल लागतो. यूरोपच्या वायव्य भागास ऊष्णता पुरविणारा अटलांटिक महासागरांतील जो कढत पाण्याचा प्रवाह वर सांगितला, त्याचा मार्ग पनामाची संयोगीभूमी समुद्रांत बुडाल्यामुळें बदलून त्या योगानें चतुर्थ-युगाच्या पूर्वार्धांत यूरोपाचा वायव्य भाग हिमाच्छादित झाला, असें एक कारण एकदां कोणी पुढें आणलें होतें. परंतु चतुर्थयुगाच्या पूर्वार्धांत पनामाची संयोगभूमि जलावृत होती या गोष्टीला भूस्तरशास्त्रांत कांहीं प्रमाण नाहीं. हिमकालोत्पत्तीसंबंधानें दुसरी एक उपपत्ति अशी काढिलेली होती कीं, पृथ्वी थंड व ऊष्ण अशा आकाशप्रदेशांतून अनुक्रमें गेली असेल व त्यामुळें हिमकाल व हिमान्तरकाल अनुक्रमें झाले असतील. पण या कल्पनेलाही कांहीं प्रमाण नाहीं. तिसरी एक कल्पना सुचविली गेली होती कीं, पृथ्वीला सूर्यापासून मिळणाऱ्या ऊष्णतेच्या प्रमाणांत कांहीं कमजास्त फरक होऊन त्यामुळें तीवरील हवा थंड किंवा ऊष्ण झाली असेल. पण हा केवळ तर्क होय असें लवकरच समजलें. पृथ्वीचा आंस जर बदलला, तर मात्र अशा तऱ्हेचे आकस्मिक फेरबदल हवेंत होतील हें खरें आहे. परंतु ही गोष्ट संभवनीय नाहीं. कारण आंस बदलला म्हणजे महत्तम मध्यवृत्त ऊर्फ विषुववृत्तही बदललें पाहिजे. पृथ्वीच्या चक्राकार भ्रमणाच्या योगानें ध्रुवापेक्षां विषुववृत्तावर जास्त फुगीरपणा आलेला आहे. ही चक्राकार गति अव्याहत चालू आहे. म्हणजे आंस बदलून


त्यामुळें विषुववृत्तही बदललें असलें, तर या नवीन विषुववृत्तावरही फुगीरपणा आला असला पाहिजे. पण अशी गोष्ट झाली असल्यालाही कांहीं प्रमाण नाहीं. तेव्हां ही उपपत्तीसुद्धां निरुपयोगीच. पृथ्वी ऊष्ण वायूचा गोळा होती ती हळू हळू निवत येत असल्यामुळें ध्रुवप्रदेश इतर ठिकाणापेक्षां लवकर वसतियोग्य झाले असतील; पण यावरून हिमकाल एका मागून एक असे ठराविक कालानें कां व्हावे हें समजत नाहीं.

याप्रमाणें हिमकालोत्पत्तीच्या कारणाच्या उपपत्तींपैकीं बहुतेकांची वाट लागून दोनच काय त्या शिल्लक रहातात. पहिली लियलची.. तो ह्मणतो कीं जमीन व पाणी यांच्या वांटणीची भिन्नता व मोठे मोठे भूप्रदेश उंच होणें व जलावृत होणें यामुळें हवेंत फार फेरफार होऊन हिमकाल उत्पन्न होईल. दुसरी उपपत्ति डॉ. क्रोल याची आहे. त्याच्या मतें **संपातां**चें चलन होत असल्यामुळें व पृथ्वीची कक्षा दीर्घवर्तुलाकृति असल्यामुळें कांहीं ठराविक कालानें हिमकाल उत्पन्न होतील. वालेस नांवाच्या विद्वानानें लियलच्या उपपत्तीचा विशेष विचार करून असें दाखविलें आहे कीं, वर सांगितलेल्या प्रकारचे फरक जर भूपृष्ठावर झाले तर तेवढ्यावरूनच हिमकाल व हिमान्तरकाल उत्पन्न होण्यासारखी थंडी किंवा ऊष्णता उत्पन्न होईल. भूस्तरयुगांपैकीं पहिल्या पहिल्या युगांत सर्व पृथ्वीवर सारखी समधात हवा होती व याचें कारण पृथ्वीवरील पाणी व जमीन यांची वांटणी आतांच्याहून निराळी होती असें प्रथम प्रकरणांत सांगितलेंच आहे. लियलची हिमकालोत्पत्तीच्या कारणांची उपपत्ति कांहीं याहून निराळी नाहीं. हजारों वर्षें जातील तेव्हांच जमीन अतिशय उंच किंवा नीच होणार; ह्मणून लियलचे अनुयायी ह्मणतात कीं, हिमकालाचें मुख्य कारण ज्या भूपृष्ठ व भूगर्भ यांतील आलटापालटी त्या सर्व जमेस धरल्या तर हिमकालाचा अवधि सुमारें दोन लक्ष वर्षांचा असला पाहिजे. परंतु याच मताच्या दुसऱ्या भूस्तरशास्त्रवेत्त्यांचें असें मत आहे कीं, हिमकालावधि फार तर २० किंवा २५ हजार वर्षांचा असेल. या दोन मानांमधला फरक कांहीं लहान सहान नाहीं. यासाठीं कोणतें मत खरें याचा निर्णय करणें आजच्या ज्ञानाच्या स्थितींत कठीणच आहे. आपल्याला आज एवढेंच ह्मणतां येईल कीं, चतुर्थ युगाच्या पूर्वार्धांत निदान दोन हिमकाल व एक हिमान्तरकाल होऊन गेले असल्यामुळें त्याचा अवधि,

हिमोत्तरकालारंभापासून आतांपर्यंत लोटलेल्या काळापेक्षां बराच मोठा असला पाहिजे.

सर रॉबर्ट बॉल याच्या मताप्रमाणें हिमकालाचें कारण भूस्तरशास्त्रांत न शोधितां जर ज्योतिःशास्त्राच्या आधारानें शोधण्याचा प्रयत्न केला तर सर्व अडचण नाहींशी होते. आपल्या या पृथ्वीवर जे उत्पात अति भयंकर असे वाटतात तसे किती तरी उत्पात नित्यशः विश्रांत होत असतात. ज्योतिःशास्त्रांत ते प्रसिद्धच आहेत. असो. डॉ. क्रोल याच्या उपपत्तीमध्यें हा एक विशेष आहे कीं तीवरून चतुर्थ युगाच्या पूर्वार्धांत झालेले दोन हिमकाल व एक हिमान्तर काल यांचें चांगलें कारण सांगतां येतें. त्यानें आपल्या ग्रंथामध्यें मोठें गणित करून आपली उपपत्ति स्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे; आणि त्यांत असें दाखविलें आहे कीं, सूर्याभोंवतालच्या पृथ्वीच्या प्रदक्षिणेंत जीं अस्थिरमानें आहेत त्यांत होणाऱ्या फेरफारांवरून, चतुर्थ युगाच्या पूर्वार्धांत झालेल्या हवेंतील फेरफारांची सकारण व्यवस्था लावतां येते. तरी आतां प्रथम डॉ. क्रोलची उपपत्ति काय आहे हें थोडक्यांत सांगून, नंतर तिच्या संभवनीयतेसंबंधानें तज्ज्ञ लोकांचीं मतें काय आहेत तीं पाहूं.

बाजूच्या आकृतींत न व उ श ही पृथ्वीची सूर्याभोंवतीं फिरण्याची कक्षा आहे. ही दीर्घवर्तुळाकार असून सूर्य तिच्या मध्यावर म्हणजे म जवळ नसतो, तर के, क या केंद्रांपैकीं कोणत्या तरी केंद्रांत असतो. तो के जवळ आहे असें समजूं. आतां पृथ्वी जर न जवळ असल तर तिजपासून सूर्याचें अंतर फारच कमी



असेल, आणि उ जवळ असेल तर तें अतिशय असेल. या न आणि उ बिंदूंना नीच व उच्च अशीं अनुक्रमें नांवें आहेत. वर सांगितलेंच आहे कीं, ऋतु होतात ते पृथ्वीचो कक्षापातळी व विषुववृत्तपातळी यांच्यामध्यें

कांहीं तिर्कसपणा असल्यामुळें होतात; ह्मणजे, पृथ्वी **न** जवळ असून तिचा उत्तरध्रुव जर सूर्यापासून दूर असेल, तर उत्तर गोलार्धांत हिंवाळा उत्पन्न होईल; पण पृथ्वी उ जवळ आली ह्मणजे तो ध्रुव सूर्याकडेसच्च वळेल, व ह्मणून त्या उत्तर गोलार्धामध्यें उन्हाळा होऊं लागेल. येथें एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत असतांना तिच्या आसांची दिशा बदलत नाहीं. आतां या आंसाला जर कोण-त्याही प्रकारची गति नसेल तर हें ऋतुचक्र सारखें तसेंच फिरत राहील, ह्मणजे पृथ्वी **न** जवळ आली कीं उत्तर गोलार्धांत हिंवाळा व उ जवळ आली कीं, उन्हाळा असे सारखे ऋतु होत जातील. परंतु त्या आंसाला गति आहे. तो क्रान्तिवृत्ताच्या ध्रुवाभोंवतीं ह्मणजे कदंबाभोंवतीं २५८६८ वर्षांत एक फेरा करितो; आणि त्यामुळें अयनचलन ऊर्फ संपातचलन होतें. ह्मणून पृथ्वीचा आंस व तिची कक्षापातळी यांच्या मधला कोन कक्षेंतील कोणत्याही एका बिंदूशीं इतक्या वर्षांच्या अवधींत सारखा नसतो. त्यामुळें या मोठ्या कालचक्रामध्यें वसंतादि ऋतु पृथ्वी आपल्या कक्षेंत निरनि-राळ्या बिंदूंशीं आली असतां होतात. उदाहरणार्थः—पृथ्वी **न** जवळ असतांना जर उत्तर गोलार्धांत एकदां हिंवाळा झाला, तर कांहीं काळानें तो पृथ्वी **ना** जवळ आली असतांनां होईल; व अशा रीतीनें हा हिंवा-ळ्याचा बिंदु मागें मागें येऊन वरील चक्र संपण्याच्या वेळेला पुनः **न** जवळ येईल. अशीच गोष्ट **उ** जवळ होणाऱ्या उन्हाळ्याची होणार. तसेंच **व** आणि **श** या संपातांचें होणार. आकृतींतील **शा वा** आणि **ना ऊ** या रेघा **श व** आणि **न उ** यांची पालटलेली स्थिति दाख-वितात. पण येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, जरी उन्हाळा, हिंवाळा वगैरे कोणत्याही बिंदूंशीं झाले तरी पृथ्वीची कक्षा व तिचीं उच्चनीचें हीं कांहीं परस्परसंबंधानें पहातां बदलत नाहींत. ह्मणून, उत्तर गोलार्धांत हिंवाळा जर पृथ्वी **ना** जवळ असतांना झाला तर त्यावेळीं पृथ्वीचें सूर्या-पासूनचें अंतर **न** येथील अंतरापेक्षां जास्त असणार. असें होतां होतां वर सांगितलेल्या कालचक्रांत हिंवाळा एकदां पृथ्वी उ जवळ आली असतां होईल व तेव्हां ती आपल्या उच्चीं असल्यामुळें तिचें सूर्यापासूनचें अंतर-ही परम असेल. आतां **न** जवळ होणारा हिंवाळा व उ जवळचा हिंवाळा यांमध्यें महदंतर आहे हें उघड आहे. **न** जवळ असतांनां सूर्यापासूनचें

तिचें अंतर फार थोडें असल्यामुळें तेथला हिंवाळा सूर्यसान्निध्यामुळें जरा सौम्य होईल. पण ती उ जवळ येऊन तें अंतर परम झालें ह्मणजे तेथला हिंवाळा फारच कडक होईल. वर सांगितलेल्या चक्रामध्यें हिंवाळा एकदां उ पाशीं होईल. हें चक्र २५८६८ वर्षांचें असल्यामुळें न पाशीं हिंवाळा झाल्यापासून उ पाशीं तो व्हावयास साधारण पणें त्याच्या निम्मे ह्मणजे १२९३४ वर्षें लागतील. परंतु न आणि उ या बिंदूंनां थोडीशी उलट दिशेनें गति आहे असें आढळून आलें आहे; त्यामुळें २५८६८ वर्षांचें चक्र कमी होऊन तें २०९८४ इतक्या किंवा स्थूल मानानें २१००० वर्षांचें होतें. ह्मणजे पृथ्वी न पाशीं असतां एका गोलार्धांत हिंवाळा झाल्यापासून पृथ्वी आपल्या उर्चीं ह्मणजे उ शीं आली असतां तेथें हिंवाळा व्हावयास १०५०० वर्षें लागतील. आतां इ. स. १२५० या वर्षीं पृथ्वी आपल्या कक्षेंत नीचीं म्हणजे न पाशीं असतांना उत्तर गोलार्धांत हिंवाळा झाला होता; आणि पुढें इ. स. ११७५० वर्षांच्या सुमारास पृथ्वी आपल्या कक्षेंत उर्चीं म्हणजे उ पाशीं असतांना हिंवाळा होईल; व तेव्हां ती सूर्यापासून परमान्तरावर असल्यामुळें तो फार कडक होईल. याप्रमाणें मागें हिशोब करीत गेल्यास इ. स. पूर्वी ९२५० वर्षांच्या सुमारास असा फार कडक हिंवाळा झाला होता असें आढळून येतें. एका गोलार्धांत हिंवाळा असतांनां दुसऱ्यांत उन्हाळा असतो हें सांगावयास नकोच. उत्तर गोलार्धांतील हिंवाळ्याची जी गोष्ट वर सांगितली तीच थोड्या बहुत फरकानें दक्षिण गोलार्धांतील उन्हाळ्यालाही लागू आहे.

कोणत्याही गोलार्धांत होणाऱ्या हिंवाळ्याचा कडकपणा किंवा उन्हाळ्याचा सौम्यपणा यांचा विचार करतांना आणखी एक गोष्ट लक्षांत घ्यावी लागते. एका संपातबिंदूपासून (व) दुसऱ्या संपातबिंदूपर्यंत (श : जावयास पृथ्वीला लागणारा जो काळ तो उन्हाळा असें जर समजलें, तर हा कालावधि सदा स्थिर नाहीं. पूर्वी सांगितलेंच आहे कीं न आणि उ हे उन्हाळ्या हिंवाळ्याचे बिंदु तसेच श आणि व हे संपातबिंदु हे अचल नाहींत; तर ते २१००० वर्षांच्या अवधींत क्रान्तिवृत्तांत एक फेरा करतात. हें क्रान्तिवृत्त जर वर्तुळाकार असतें तर श व आणि न उ या रेघांनीं त्याचें नेहमीं बरोबर दोन भाग झाले असते. परंतु तें

दीर्घवर्तुळाकार असल्यामुळें ते विभाग समान होत नाहींत. उदाहरणार्थ; कल्पना करूं कीं, पृथ्वी **न** जवळ आली असतां हिंवाळा झाला, तर तेव्हां उन्हाळ्याचा अवधि **व उ श** एवढा होईल; पण जेव्हां तो हिंवाळा पृथ्वी **उ** जवळ असतांना होईल तेव्हां उन्हाळ्याचा अवधि फक्त **श न व** एवढाच होईल. हा अवधि **व उ श** यापेक्षां फार लहान आहे हें त्या त्या वर्तुळ खंडावरून दिसतेंच आहे. हें अंतर भूकक्षा दीर्घवर्तुलाकार असल्यामुळेंच पडतें; आणि दीर्घवर्तुळाच्या दोन ह्मणजे लहान व मोठ्या व्यासांपैकीं मोठा व्यास लहानापेक्षां ज्याप्रमाणें मोठा असेल त्याप्रमाणें हें अंतरही मोठें होईल; ह्मणजे उन्हाळ्याच्या काळापेक्षां हिंवाळ्याचा काळ बराच मोठा होईल. भूकक्षेच्या दीर्घवर्तुळाचीं मानें तिचें सूर्यापासून जें मध्यम व परम अंतर त्यांवरून काढतात, व त्या दीर्घत्वाला ज्योतिःशास्त्रांत केंद्रच्युति* ह्मणतात. ही केन्द्रच्युति कायम नाहीं. ती हळूहळू वाढत जाऊन महत्तम मानाला पोंचल्यावर पुनः कमी व्हावयास लागते, व पूर्वीसारखी पुनः होते. ह्मणून प्रत्येक गोलार्धांत हिंवाळ्याच्या व उन्हाळ्याच्या अवधींमधला फरकही त्याप्रमाणें मोठा किंवा लहान होत असतो. वर सांगितलेंच आहे कीं, हिंवाळा व उन्हाळा यांचे अवधि संपातरेषेच्या स्थितीवर ह्मणजे, क्रान्तिवृत्तांतील ज्या बिंदूशीं पृथ्वी आली असतां हे ऋतु होतात, त्या बिंदूंच्या स्थानावरही अवलंबून असतात. या दोन बदलणाऱ्या मानांचा संयुक्त परिणाम असा होतो कीं, पृथ्वीची केंद्रच्युति महत्तम असून पृथ्वी आपल्या उच्चीं असतांना हिंवाळा व नीचीं असतांना उन्हाळा असें जर झालें, तर त्यांच्या अवधीमध्यें फार मोठा फरक पडतो. हा फरक महत्तम झाला ह्मणजे २३ दिवस असतो असें आढळून आलें आहे. हल्लीं तो सुमारें ७½ दिवस आहे. ह्मणजे पृथ्वी **न** जवळ आली असतांना तिची केंद्रच्युति महत्तम असून उत्तर गोलार्धांत जर हिंवाळा झाला तर तेव्हांच्या उन्हाळ्यापेक्षां तो २३ दिवसांनीं लहान होईल. पण १०५०० वर्षांनीं ही स्थिति पालटून पृथ्वी **उ** जवळ आली असतां होणारा हिंवाळा उन्हाळ्यापेक्षां तितकाच ह्मणजे २३ दिवसांनीं मोठा होईल.

---

* केन्द्रच्युति = $\frac{\text{प–म}}{\text{मध्यम अंतर}} = \frac{\text{मध्यबिंदूपासून केन्द्रापर्यंतचें अंतर}}{\text{मध्यम अंतर}}$

पृथ्वी आपल्या कक्षेंत फिरत असतांनां तिचा मंदकर्ण समान कालांत समान क्षेत्रें आक्रमितो. यावरून हर्शल यानें अशी कल्पना केली कीं, वर सांगितल्याप्रमाणें जरी उन्हाळा व हिंवाळा यांच्या अवधींत फरक असला तरी पृथ्वीला एका संपातापासून दुसऱ्या संपातापर्यंत जातांनां प्रत्येक वेळीं सारखीच उष्णता सूर्यापासून मिळते; कारण प्रत्येक अवधींतील सूर्याच्या उष्णतेच्या अरीभवनाचें प्रमाण जरी कमजास्त असलें तरी तो कमजास्तपणा त्या अवधींच्या स्वतःच्या कमजास्तपणामुळें बरोबर भरून निघतो. हें ह्मणणें खरें मानलें तर डॉ. क्रोलच्या ह्मणण्याला थोडासा कमीपणा येतो. पण सर राबर्ट बॉल या प्रसिद्ध ज्योतिर्विदानें गणितानें असें सिद्ध केलें आहे कीं, हर्शलची वरील कल्पना अगदीं चुकीची आहे; व उन्हाळा किंवा हिंवाळा यांमध्यें एखाद्या गोलार्धाला सूर्यापासून मिळणाऱ्या उष्णतेचें प्रमाण हें पृथ्वीच्या तिर्यक्त्वावर अवलंबून असून तिच्या कक्षेच्या केंद्रच्युतीशीं त्याचा फारसा संबंध नाहीं. प्रत्येक गोलार्धाला सबंध वर्षामध्यें सूर्यापासून मिळणारी उष्णता ३६५ ह्मणजे दररोजची सरासरीनें एक धरून, व पृथ्वीचें तिर्यक्त्व २३° २७′ मानून बॉलनें असें दाखविलें आहे कीं, पृथ्वीची कक्षाकेन्द्रच्युति कितीही असली तरी प्रत्येक गोलार्धाला उन्हाळ्यामध्यें २२९ उष्णता मिळेल व हिंवाळ्यामध्यें फक्त १३६ मिळेल. आतां कक्षाकेंद्रच्युतीमुळें या आंकड्यांवर जरी कांहीं परिणाम झाला नाहीं, तरी तीमुळें उन्हाळा व हिंवाळा यांच्या अवधिमध्यें फरक पडतो हें आपण वर पाहिलेंच आहे. यावरून उत्तर गोलार्धांत महत्तम अवधीचा हिंवाळा जेव्हां होईल, तेव्हां तेथें २२९° उष्णता १६६ दिवसांवर (उन्हाळ्याच्या) वांटली जाऊन, १३६ उष्णता हिंवाळ्याच्या १९९ दिवसांवर वांटली जाईल. ह्मणजे उन्हाळ्यांतील रोजच्या उष्णतेचें सरासरी मान ($\frac{२२९}{१६६}$) व हिंवाळ्यांतील रोजच्या उष्णतेचें सरासरी मान ($\frac{१३६}{१९९}$) यां मधील अंतर फार होउन, उन्हाळे अल्पावधि पण अधिक ऊष्ण, आणि हिंवाळे दीर्घावधि पण फार थंड असे होतील; त्यामुळें त्या दीर्घ हिंवाळ्यांत सांठलेलें बर्फ वगैरे लहानशा उन्हाळ्यांत सर्व वितळून जाणार नाहीं, व ह्मणून तेथें हिमकाल उत्पन्न होईल. वरील विवेचनावरून हेंही लक्षांत येईल कीं त्यावेळीं दक्षिण गोलार्धांत सौम्य व अल्पावधि हिंवाळे होऊन उन्हाळे दीर्घावधि

पण थंड असे होतील, म्हणजे तेथें उत्तर गोलार्धाच्या अगदीं उलट स्थिति होईल. सारांश या दोन्ही गोलार्धांत हिमकाल व हिमान्तरकाल असे एकामागून एक १०५०० वर्षांनीं येत जातील; मात्र भूकक्षेची केन्द्रच्युति हिंवाळा व उन्हाळा यांच्या अवधींत एवढा फरक करण्याइतकी असली पाहिजे.

आतां डॉ. क्रोलचें एवढेंच म्हणणें जर असतें तर तें खोडून काढणें दुरापास्तच झालें असतें; कारण वर सांगितलेलें कारण हिमकालाला योग्य असे फेर हवामानांत करण्याला पुरेसें आहे. निदान हिमकालोत्पत्तीचें एवढेंच एक कारण जरी नसेल, तरी त्याचा बराच मोठा परिणाम झाला असला पाहिजे यांत कांहीं शंका नाहीं. परंतु लव्हरियर याच्या कोष्टकांतील भूकक्षेच्या केन्द्रच्युतीचें मान घेऊन त्यावरून डॉ. क्रोलनें असें गणित केलें आहे कीं, गेल्या तीस लक्ष वर्षांत पृथ्वीची केन्द्रच्युति तीन वेळां महत्तम झाली असून पहिल्या वेळीं ती १७०००० वर्षें, दुसऱ्या वेळीं २६०००० वर्षें व तिसऱ्या वेळीं १६०००० वर्षें होती; हा शेवटला काळ येऊन गेल्यापासून ८०००० वर्षें झालीं आहेत. या डॉ. क्रोलच्या म्हणण्याप्रमाणें पहातां चतुर्थ युगाच्या पूर्वार्धांतील शेवटचा हिमकाल २४०००० वर्षांपूर्वीं सुरू झाला असून ८०००० वर्षांपूर्वीं तो संपून हिमोत्तरकाल सुरू झाला असला पाहिजे. या १६०००० वर्षांच्या दीर्घ अवधींत हिंवाळा जसा पृथ्वी आपल्या कक्षेंत नीचीं अथवा उच्चीं असतांना झाला असेल त्याप्रमाणें हवा सौम्य किंवा कडक अशी कित्येक वेळां झाली असेल. परंतु महत्तमकेंद्रच्युतिकालाच्या पहिल्या पहिल्या भागामध्येंच हवेचा कडकपणा महत्तम असल्यामुळें डॉ. क्रोलच्या मताप्रमाणें गेला मोठा हिमकाल २००००० वर्षांपूर्वीं म्हणजे गेल्या महत्तम केंद्रच्युतीच्या कालाच्या आरंभापासून सुमारें ४०००० वर्षांनंतर झाला असें म्हटलें पाहिजे.

परंतु या गणिताच्या विश्वसनीयतेबद्दल ज्योतिर्विद व भूस्तरशास्त्रज्ञ यानां सारखीच शंका आहे. डॉ. क्रोलच्या बहुतेक म्हणण्याला वॉलनें पाठबळ दिलें आहे. परंतु त्याला भूकक्षेच्या केन्द्रच्युतीचें महत्तम मान, गेल्या हिमकालाचा आरंभ केव्हां झाला असावा याचा अदमास, तसाच पुढचा हिमकाल केव्हां होईल याचा अंदाज वगैरे गोष्टींचें गणित ज्योतिः-

शास्त्रावरून करण्याचें धाडस करूं नयेसें वाटलें. तो ह्मणतो 'मला या संबंधानें कांहीं सांगतां येत नाहीं व कोणताही सूज्ञगणितशास्त्रज्ञ सध्याच्या ज्ञानाच्या स्थितींत असल्या गोष्टींसंबंधानें भविष्यें करण्याला धजणार नाहीं.' लाखों वर्षांपूर्वीच्या कालांतील केंद्रच्युतीच्या मानावर भरंवसा ठेवणें अगदीं वेडेपणाचें आहे, कारण ज्या मानांवरून केंद्रुच्युति काढावयाची तींच मुळीं सध्या संशयित आहेत; व विशेषतः प्राचीन भूस्तर युगांतील कालासंबंधानें तर तसें करतांच येत नाहीं असें मत प्रसिद्ध अमेरिकन ज्योतिर्विद न्यूकोंब यानेंही दिलें आहे. डॉ. क्रोलनें यावर एवढेंच ह्मटलें कीं 'माझें गणित अगदीं नवीन काढलेल्या केन्द्रच्युतीच्या मानावरून बिनचुक केलेलें आहे.' पण हें उत्तर बरोबर नाहीं. कारण आक्षेप आहे तो गणिताच्या बिनचुकपणाबद्दल नसून जीं मानें गणित करावयास घेतलीं त्यांच्याच खात्रीलायकपणाबद्दल आहे.

एका वेळीं पंडितांची अशी समजूत झाली होती कीं डॉ. क्रोलनें ठरविलेल्या निरनिराळ्या कालांचा भूस्तर शास्त्रांतील गोष्टींशीं चांगला मेळ पडतो; व ह्मणून हिमकाल व हिमान्तरकाल यामध्यें झालेल्या भूपृष्ठावरील आलटापालटी केव्हां झाल्या असाव्या या संबंधाच्या अंदाजांनां त्यावरून चांगली वळकटी येते. पण भूस्तरशास्त्रज्ञ आतां त्या अगडबंब आंकडयांचा व कालांचा जरा अधिक सूक्ष्म विचार करावयास लागले आहेत. वर सांगितलेंच आहे कीं, गेल्या तीस लक्ष वर्षांत भूकक्षेच्या केंद्रच्युतीचें महत्तम मान तीन वेळां झालें होतें, असें डॉ. क्रोलचें मत आहे. त्यावरून तीन हिमयुगेंही त्या त्या वेळीं झालीं असून प्रत्येक युगामध्यें कित्येक हिमकाल व हिमान्तर काल झाले असले पाहिजेत. परंतु पहिल्या पहिल्या भूस्तर युगांत असलीं हिमयुगें झालीं असल्याचें कांहीं प्रमाण नाहीं; कदाचित् झालीं असतील तर प्रथम युगांतील गोंडवन व आंगारिक कालामध्यें झालीं असतील. या आक्षेपावर असें उत्तर आलें कीं जरी त्यावेळीं भूकेंद्रच्युति महत्तम होती तरी भूपृष्ठावरील पाणी व जमीन यांची वाटणी चतुर्थ युगाहून तेव्हां फारच निराळी असल्यामुळें, केंद्रच्युति फार असूनही चतुर्थ युगाच्या पूर्वार्धांत झालेले हवेचे फेरबदल तेव्हां झाले नाहींत. ह्मणजे केन्द्रच्युति फार असूनही पृथ्वी आपल्या कक्षेंत उर्ध्वीं असतांनां जरी हिंवाळे होत असले तरी एवढ्यावरून कांहीं हिमकाल

उत्पन्न होईल असें नाहीं असें कबूल केल्याप्रमाणें झालें. यावरून भूकेंद्रच्युति महत्तम नसतांनांही हिमकाल होईल असें म्हणावयासही हरकत नाहीं. दुसऱ्याही एका बाबतींत डॉ. क्रोलची उपपत्ति व भूस्तरशास्त्र यांमध्यें विरोध आहे. अमेरिकन शास्त्रज्ञांनीं गेला हिमकाल संपल्यापासून झालेल्या दऱ्यांच्या क्षयावरून काढिलेल्या त्याच्या कालाशीं डॉ. क्रोलचें मत जमत नाहीं. हिमोत्तरकालाचा आरंभ १०००० वर्षांहून पलीकडचा नाहीं असें अमेरिकन शास्त्रज्ञांचें मत प्रथम प्रकरणांत दिलें आहे. पण डॉ. क्रोलच्या मताप्रमाणें पहातां तो काल सुमारें ८० किंवा १०० हजार वर्षांपूर्वीचा आहे. हें अंतर कांहीं लहान सहान नव्हे. प्रो. गीकी याला अमेरिकन शास्त्रज्ञांचें मत जरी सर्वस्वीं कबूल नाही तरीही त्यानें हें कबूल केलें आहे कीं, हिमकालाचें एकामागून एक येण्याचें सबळ कारण दाखवीत असल्यामुळें डॉ. क्रोलची उपपत्तीच कायती खरी आहे, तरी कदाचित् त्यानें भूकक्षेच्या केन्द्रच्युतीचीं मानें जीं घेतलीं त्यांत कांहीं चूक असल्यामुळें एवढा मोठा फरक त्याच्या हिशोबांत पडत असेल; भूस्तरशास्त्रांतील प्रत्यक्ष पुराव्यावरून निघालेलीं अनुमानें कांहीं खोटीं म्हणतां येणार नाहींत, अर्थात् तीं अशींच म्हणून सोडून देतां येणार नाहींत. या डॉ. क्रोलच्या उपपत्तीसंबंधानें दुसऱ्या एका हडल्स्टन नांवाच्या विद्वानानें दिलेलें प्रतिकूल मत तर फारच कडक आहे. त्याचें म्हणणें असें आहे कीं " डॉ. क्रोलच्या गोड गोड उपपत्तीवरून पूर्वीचे भूस्तशास्त्रज्ञ कसे फसले हें मोठें आश्चर्य आहे. हिमकाल कदाचित् कधीं झालेलाही नसेल, आणि आम्हीं आज त्याच्या कालाच्या संबंधाचीं अनुमानें खरीं कीं खोटीं याचा वाद चालविला आहे. एका अतिक्रमापासून दुसरा अतिक्रम उत्पन्न होतो आणि क्रोलसारख्याच्या अनियंत्रित तर्कांनीं नवशिके शास्त्रज्ञ फसूनही जातात. " पण या टीकेमध्येंही सौम्यपणाचा अतिक्रम झाला आहे. डॉ. क्रोलचे अंदाज अनियंत्रित असतील; तरी पृथ्वीवर एखाद्या गोलार्धांत बर्फाचा पूर येईल असे फेरफार ठराविक काळानें हवेंत होण्याचें एक सयुक्तिक कारण सुचविल्याचा तरी मान त्यास दिलाच पाहिजे.

यासंबंधानें कांहींही मतें असलीं, तरी ज्यांत निदान दोन हिमकाल व एक हिमान्तरकाल होऊन गेले त्या हिमयुगाचा अवधि हिमोत्तरकाला-

रंभापासून आतांपर्यन्त लोटलेल्या कालापेक्षां बराच मोठा असला पाहिजे यांत कांही शंका नाहीं. एकंदर स्थिति अनुकूल असल्यास, कक्षाकेन्द्र-च्युति फार नसूनही जर पृथ्वी आपल्या कक्षेंत उच्चीं असतांनां हिंवाळा झाला, तर तेवढ्यानेंही हिमकाल उत्पन्न होऊं शकेल. उच्चाजवळ लागो-पाठ होणाऱ्या दोन हिवाळ्यांच्या दरम्यान २१००० वर्षें जातील हें पूर्वी सांगितलेंच आहे. ह्मणून भूकक्षेच्या केन्द्रच्युतीचा प्रश्न सोडून दिला तरी दोन हिमकाल व त्यांच्यामधला एक हिमान्तरकाल एवढ्याला २१००० वर्षांहून थोडा तरी अधिक काळ दिला पाहिजे; व प्रो. गीकीच्या ह्मणण्याप्रमाणें जर पांच हिमकाल व चार हिमान्तरकाल मानिले तर त्या हिमयुगाचा अवधि ८४००० वर्षांचा तरी होईल. असो.

या शास्त्रीय गोष्टींच्या वादांत याहून खोल जाण्याचें कांहीं कारण नाहीं. मागें सांगितलेंच आहे कीं आपला मुख्य उद्देश ह्मणजे वेदांतील वाक्यांच्या आधारावरून वेदकालीन लोक व त्यांबरोबर इतरही आर्य लोक यूरोपांत, किंवा उक्षस् (ऑक्सस्), यक्षावर्त (जक्सार्टिस) किंवा सिंधु या नद्यांच्या तीरावर येऊन रहाण्यापूर्वी, त्यांचें वसतिस्थान कोठें होतें तें शोधून काढणें हा होय. त्याला साहाय्यभूत अशा शास्त्रीय शोधांचा विचार आतांपर्यन्त केला, त्याचा सारांश असा:—

१ नवपाषाणयुगाच्या आरंभीं यूरोपांत जे लोक रहात होते, त्यांच्या-पासूनच हल्लींचे आर्यभाषा बोलणारे यूरोपीय लोक झाले आहेत, असें दिसतें.

२ परंतु नवपाषाणयुगाच्या आरंभीं आर्य लोकांच्या एका शाखेचे लोक यूरोपांत रहात होते असें जरी सिद्ध झालें व ह्मणून आर्य लोक हिमोत्तरकालामध्यें आशियांतून यूरोपांत गेले हें म्हणणें जरी खोटें ठरलें, तरी त्यावरून ते आर्य लोक यूरोपांतले मूळचेच रहिवाशी होते असें सिद्ध होत नाहीं; म्हणजे आर्यांच्या मूलस्थानाच्या प्रश्नाचा त्यावरून शेवटचा निकाल होत नाहीं.

३. पुष्कळ कारणांवरून अशी अटकळ करावी लागते कीं यूरोपा-मध्यें धातुयुगाची सुधारणा परकीय लोकांनीं नेली.

४ पाषाण, कांस्य व लोह ही युगें सर्व देशांत एकाच काळीं झालीं असें नाहीं; ह्मणून एकाच काळी ईजिप्टची मोठी सुधारणा व यूरोपांत पाषाणयुगाचें अस्तित्व या गोष्टी परस्परविरुद्ध नाहींत.

५. भूस्तरशास्त्रांतील अगदीं नवीन शोधांच्या खात्रीलायक पुराव्यावरून हिमकाल संपल्याला व हिमोत्तरकाल सुरू झाल्याला सुमारें १०००० वर्षें झालीं असावीं असें दिसतें; व सैबीरियांत सांपडलेल्या जनावरांच्या मृत शरीरांच्या ताजेपणावरून या मतास पुष्टि येते.

६ मनुष्यप्राणी हा कांहीं वर्षांपूर्वी मानीत होते त्याप्रमाणें, केवळ हिमोत्तरकालीन नसून, तृतीय युगांत नाहीं तरी निदान चतुर्थ युगांत तरी त्याचें जिकडे तिकडे अस्तित्व होतें असें दाखविण्यास भूस्तर शास्त्राजवळ भक्कम पुरावा आहे.

७ आजपर्यन्त निदान दोन हिमकाल व मध्यें एक हिमान्तरकाल असे होऊन गेले; या हिमान्तरकालामध्यें पृथ्वीवर जमीन व पाणी यांची वांटणी आतांच्याहून फार भिन्न होती.

८ चतुर्थ युगाच्या प्रथमार्धांत हवेचीं मोठमोठीं स्थित्यन्तरें झालीं. हिमकालांत ती फार थंड होती; आणि हिमान्तरकालामध्यें ध्रुवप्रदेशांत देखील ती सौम्य व समशीतोष्ण होती.

९आशिया व युरोप या दोन्ही खंडांतील ध्रुवाजवळच्या प्रदेशांत हिमान्तरकालामध्यें थंड उन्हाळे व गरम हिंवाळे असल्यामुळें तेव्हां तेथें अक्षय वसंत नांदत होता; आणि हल्लीं फक्त समशीतोष्ण व उष्ण कटिबंधांत आढळून येणाऱ्या वनस्पतीही पूर्वी स्फिट्सबर्जन सारख्या, ह्मणजे जेथें कार्तिकापासून चैत्रापर्यंत सूर्य क्षितिजाखालीं असतो अशा ठिकाणींही मौठ्या जोमानें वाढत असत असें दाखविण्यास पुष्कळ आधार आहे.

१० या सौम्य हवेचा हिमकालावतारानें बिघाड केला व ते प्रदेश त्यामुळें उष्ण कटिबंधांतील प्राणी व वनस्पती यानां रहावयास अयोग्य झाले.

११ या हिमकालाच्या अवधीविषयीं अनेक भिन्न भिन्न अंदाज केलेले आहेत. आपल्या सद्यःकालीन ज्ञानाच्या मानानें पहातां या बाबींत आपल्याला ज्योतिःशास्त्रापेक्षां भूस्तरशास्त्रावरच अधिक भिस्त ठेविली पाहिजे; तरी हिमकालोत्पत्तीच्या कारणासंबंधानें पहातां ज्योतिशास्त्राचेंच मत अधिक संभवनीय दिसतें.

१२ प्रो. गीकीच्या मताप्रमाणें तर एकंदर पांच हिमकाल व चार हिमान्तरकाल होऊन गेले, व हिमोत्तरकालाच्या आरंभीं सुद्धां कडक व सौम्य अशी हवा, निदान यूरोपच्या वायव्य भागांत तरी, दोनदां होऊन गेली, असें मानण्यासही पुरावा आहे.

१३ कित्येक प्रसिद्ध शास्त्रज्ञ लोकांनीं या पूर्वीच असें मत दिलें आहे कीं मनुष्याचें आदिस्थान ध्रुवप्रदेशांत कोठें तरी असावें, आणि वनस्पति व प्राणि कोटी यांचा उद्गमही तेथेंच कोठें तरी झाला असावा.

यावरून असें दिसेल कीं, जर वेदवाक्यांचा कल वैदिक वसतिस्थान ह्मणजे पूर्वकाळीं वैदिक ऋषी जेथें रहात असत तें स्थान ध्रुवाजवळ होतें असें दाखविण्याचा असेल, तर त्याला दर्शनींच अपवाद आणील अशी नवीन शास्त्रीय शोधांत कोणतीही गोष्ट नाहीं. उलट ध्रुवप्रदेशोपपत्तीच सुचविणाऱ्या वेदांत कित्येक गोष्टी आहेत; इतकेंच नव्हे तर अलीकडे कित्येक शास्त्रज्ञांचें असें मत होत चाललें आहे कीं मानवजातीचें आदिस्थान शोधणें तें ध्रुवप्रदेशांतच कोठें तरी शोधिलें पाहिजे.

प्रकरण ३ रें.

ध्रुवप्रदेश.

चतुर्थ युगाच्या आरंभीं हवेंत विलक्षण फेरफार झाले–ध्रुवप्रदेशांत विशेष झाले–ध्रुवप्रदेशासंबंधीं डॉ. वारनचें मत–हिमकालापूर्वी ध्रुवाजवळील भूखंडाच्या अस्तित्वाबद्दल प्रमाणें–तेथें हिमान्तरकालांत थंड उन्हाळे व गरम हिंवाळे, ह्मणजे जवळ जवळ अक्षय्य वसंतच होता–पण एवढ्यावरून आर्यांचें मूलस्थान तेथें होतें असें सिद्ध होत नाहीं–त्याची शक्यता मात्र दिसते–तें सिद्ध व्हावयास पुराणवस्तुशास्त्राची मदत पाहिजे–किंवा वेदादि प्राचीन ग्रंथांचा आधार पाहिजे–वैदिक कथांचा आजपर्यंत केलेला अर्थ समाधानकारक नाहीं–नवीन शोधांवरून त्यांत दुरुस्ती केली पाहिजे–वैदिक कथा आतांपर्यंत अबाधित आल्या आहेत–डॉ. वारनचे शोध–ध्रुवावरील मानव जातीचें आदिस्थान–ध्रुवावर दिसणारे ज्योतिःशास्त्र विषयक चमत्कार–ध्रुवबिन्दु व ध्रुवप्रदेश यांतील भेद–ध्रुवविशिष्ट गोष्टी–आकाशस्थ ज्योतींचें चक्राकार भ्रमण–तेथें तारा उगवत किंवा मावळत नाहींत–सूर्य दक्षिणेकडून उगवतो–सहा महिन्यांचीं दिवसरात्रें–उत्तरारुण–पंधरा दिवसांचा अखंड चंद्रप्रकाश–दीर्घावधि संध्याप्रकाश–दीड महिन्यापासून दोन महिन्यांपर्यंत अवधीची उषा–ध्रुवावरचें वर्ष–दीर्घरात्रींतील अस्सल काळोखाचा भाग दोन किंवा अडीच महिन्यांचा असतो–डॉ. वारननें केलेलें ध्रुवावरील चक्राकार फिरणाऱ्या उषेचें वर्णन–ध्रुवाच्या दक्षिणेकडील प्रदेशांत दिसणारे विशिष्ट चमत्कार–तारा तिरकस फिरतात–सूर्य नेहमीं दक्षिणेकडे असतो–सहा महिन्यांतून कमी अवधीचीं दीर्घ दिवसरात्रें–वर्षांतील उरलेल्या भागांतील साधीं अहोरात्रें–दीर्घावधि उषा–या चमत्कारांची उष्णकटिबंध प्रदेशांतील चमत्कारांशीं तुलना–ध्रुवाबिंदुविशिष्ट आणि ध्रुवप्रदेशविशिष्ट चमत्कारांचा सारांश.

पूर्व प्रकरणांत सांगितलेंच आहे कीं चतुर्थ युगाच्या पूर्वार्धांत पृथ्वीवर जिकडे तिकडे जमीन फार उंच किंवा खोल होऊन त्यामुळें हवेमध्येंही विलक्षण आलटापालटी झाल्या. हिमकालाचा कडकपणा ध्रुवप्रदेशांत अर्थातच जास्त असणार, ह्मणून त्यावेळीं भूपृष्ठावर झालेल्या मोठमोठ्या आलटापालटी इतर ठिकाणांपेक्षां ध्रुवप्रदेशावर फार मोठ्या प्रमाणावर झाल्या असल्या पाहिजेत, अशी कल्पना करण्यास कोणताही प्रत्यवाय नाहीं. यावरून आणखीही एक अनुमान करावें लागतें, तें हें कीं, हिमान्तरकालांत ध्रुवाजवळ जमीन व पाणी यांची वांटणी आतांच्याहून फार निराळी असली पाहिजे. 'नंदनवनोपलब्धि' नांवाच्या पुस्तकामध्यें डॉ. वारन यानें पुष्कळ प्रमाणें देऊन असें दाखविलें आहे कीं अगदीं अलिकडच्या भूस्तरयुगामध्यें नोव्हा झेम्ला व स्पिट्सबर्जन या बेटांजवळचा उत्तरध्रुवप्रदेशांतील बराच मोठा पट्टा समुद्रांत बुडाला आहे; व त्यावरून त्यानें असें अनुमान केलें आहे कीं, उत्तर महासागरांतील सध्यांचीं बेटें (नोव्हाझेन्ला, स्पिट्सबर्जन वगैरे) ह्मणजे पूर्वी समुद्रांत बुडालेल्या पर्वतांचीं शिखरें असावीं. तृतीय युगाच्या शेवटच्या कालांत उत्तर ध्रुवाच्या आसमंतात् बरेंच विस्तृत असें एक भूखण्ड होतें ही गोष्ट सर्व भूस्तरशास्त्रज्ञांनीं कबूल केली आहे, व तें सर्व तसेंच चतुर्थ युगाच्या पूर्वार्धांतही होतें असें जरी ह्मणतां आलें नाहीं तरी, हिमान्तरकालामध्यें जमीन व पृथ्वी यांची विभागणी आतांच्याहून कांहीं तरी निराळी होती, असें मानण्यास पुष्कळ सबळ कारणें आहेत; आणि प्रो. गीकी तर असें ह्मणतो कीं 'पूर्वपाषाणयुगीन मनुष्य, व चतुर्थ युगांत आढळणारे इतर प्राणी हे त्यावेळीं उत्तर ध्रुवप्रदेशांत जिकडे तिकडे रहात असत.' हल्लींही ध्रुवाजवळ अशिया खंडाच्या उत्तरेस सैबीरियासारखा बराच मोठा जमीनीचा भाग आहे; आणि त्या ठिकाणीं पूर्वी वसतियोग्य सौम्य हवा होती असें दाखविण्यास आधार आहे. सैबीरियाच्या उत्तरेस महासागराची खोली अद्यापिही १०० वांवांहून कमीच आहे; आणि चतुर्थ युगाच्या पूर्वार्धांत भूपृष्ठावर झालेल्या मोठमोठ्या आलटा पालटी मनांत आणिल्यास हल्लीं पाण्यांत डालेला जमिनीचा भाग पूर्वी एकदां पाण्यावर होता ही

गोष्ट असंभवनीय दिसत नाहीं. एकंदरींत गेल्या हिमकालापूर्वी उत्तर-ध्रुवाभोंवतीं असलेल्या एका भूखंडाच्या वऱ्याच खुणा अजून शिलक आहेत.

हवेसंबंधानें विचार करतां आपण पूर्वी पाहिलेंच आहे कीं, हिमान्तर-कालांत उत्तरवृत्ताच्या आंतल्याही प्रदेशांत थंड उन्हाळे व गरम हिंवाळे होते. सर रॉबर्ट बॉल यानें तर त्यावेळीं हिंवाळे व उन्हाळे यामध्यें पृथ्वीला मिळणारी उष्णता आंकड्यांनीं दाखवून त्या वेळच्या हवेच्या सौम्यपणाची चांगली कल्पना आणून दिली आहे. दीर्घावधि उन्हाळ्या-मध्यें एकंदर २२९ भाग उष्णता व अल्पावधि हिंवाळ्यामध्यें एकंदर १३६ भाग उष्णता, म्हणजे जवळ जवळ सारखा वसंतऋतूचं झाला. म्हणून पूर्वपाषाणयुगीन माणसें हिमान्तरकालांत जर त्या प्रदेशांत रहात असलीं तर सूर्य सारखा कित्येक दिवस (निरनिराळ्या अक्षांशांच्या मा-नानें) क्षितिजाखालीं असूनही त्यांना तेथें मजा वाटली असेल. ध्रुवा-जवळची सध्यांची कडक हवा हिमोत्तरकालानंतर झाली असल्यामुळें त्यापूर्वीच्या काळाविषयीं बोलतांना तिचा विचार करणें नलगे.

परंतु अशा प्रकारच्या सौम्य व सुखकर हवेनें युक्त असें एक उत्तरखंड हिमान्तरकालांत अस्तित्वांत होतें, व पूर्वपाषाणयुगीन माणसेंही तेथें रहात होतीं असें जरी मानलें, तरी त्यावरून आर्य लोकांचे पूर्वज त्या ठिकाणीं तेव्हां रहात होते असें कांहीं निष्पन्न होत नाहीं; मात्र तसें असणें बरेंच संभवनीय आहे एवढें त्यावरून दिसतें. तसें कायम करण्यास एक तर पुराणवस्तुशास्त्राच्या नवीन कांहीं शोधांनीं हिमान्तरकालांत आर्य लोक ध्रुवाजवळ रहात होते असें सिद्ध होईपर्यंत थांबलें पाहिजे; नाहीं तर वेद आणि अवेस्ता यांच्यासारख्या सर्वांनीं पुराणतम म्हणून कबूल केलेल्या आर्य-ग्रंथांमध्यें आढळणाऱ्या प्राचीन कथांचें व विचारांचें परीक्षण करून त्यांवरून तरी आर्य लोक हिमान्तरकालांत ध्रुवप्रदेशांत रहात होते असें मानावयास कांहीं आधार मिळतो कीं काय हें पाहिलें पाहिजे. या कथां-पैकीं पुष्कळांचा सध्यां लाविलेला अर्थ मुळींच समाधानकारक नाहीं हें सर्व कबूल करतात. म्हणून जसें जसें पुराण-वस्तुशास्त्र, भूस्तरशास्त्र, मानुष्य-कशास्त्र, यांतील नवीन शोधांनीं प्राचीन मनुष्यांसंबंधाचें आपलें ज्ञान वाढत जाईल अथवा निश्चित तरी होत जाईल, त्याप्रमाणें त्या कथेचे अर्थ वेळोवेळीं तपासून गैरसमजामुळें, मनोविकार प्रावल्यामुळें, किंवा तत्कालीन

मनुष्यांच्या आचारविचारादिकांसंबंधीं आपल्या अपुऱ्या ज्ञानामुळें झालेल्या चुका दुरुस्त केल्या पाहिजेत. सर्व लोकांमध्यें प्राचीन दंतकथा वगैरे अजून राहिलेल्या आहेत यांत कांहीं शंका नाहीं; कदाचित् कालान्तरानें त्यांमध्यें कांहीं ओढाताणही झाली असेल, नाहीं असें नाहीं. ह्मणून आधुनिक शास्त्रीय शोधांवरून आपल्याला प्राचीन माणसांविषयीं जी माहिती मिळते ती प्राचीन कथांशीं जमते कीं नाहीं हें पहाणें आपलें काम आहे. वैदिक कथा व तत्कालीन लोकांचे समज यांसंबंधानें आणखी लक्षांत घेण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, त्या कथा व ते समज हजारों वर्षांपूर्वीं गोळा केलेले असून आज आपल्याला जसेच्या तसेच मिळत आहेत. ह्मणून प्राचीन आर्य लोक एका काळीं जर खरोखर उत्तरध्रुवाजवळ रहात असतील तर त्यांच्या आदिग्रंथांमध्यें त्या मूलस्थानासंबंधानें कांहीं उल्लेख सांपडणें अशक्य नाहीं. कारण त्यांमध्यें अद्यापि असे कांहीं भाग आहेत कीं, त्यांतील शब्द साधे व सरळ असूनही त्यांचा कोणत्याही आधुनिक मीमांसापद्धतीनें योग्य अर्थ लागत नाहीं. ध्रुवप्रदेशांत मानवजातीचें आदिस्थान आहे असें आपलें मत सिद्ध करण्यासाठीं डॉ. वॉरन यानें इतर राष्ट्रांच्याबरोबर वैदिक लोकांच्याही कथांचा आधार दिला आहे. परंतु वैदिक कथांसंबंधानें पहातां हा प्रयत्न वरवरचा झाला आहे; आणि असें होणें साहजिकच आहे. कारण वैदिक कथांचा नवीन शास्त्रीय शोधांच्या मदतीनें आजपर्यंन्त कोणीही ऊहापोह केलेला नाहीं; शिवाय डॉ. वारनला केवळ वेदांच्या जुन्या भाषान्तरावरच भिस्त ठेवावी लागली होती. ह्मणून या दृष्टीनें आतां वैदिक कथांचें व वचनांचें परीक्षण करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. परंतु तसें करण्यापूर्वी आपल्याला ध्रुवावर व त्याच्याजवळ आसपासच्या ठिकाणींच आढळणाऱ्या अशा विशेष गोष्टी, ज्यांना न्यायशास्त्रांत 'विशेष' ह्मणतात, त्या काय आहेत हें पाहिलें पाहिजे; व जर त्या गोष्टींचें वर्णन वेदांमध्यें आपल्याला आढळलें तर तत्कालीन लोकांचें आदिस्थान ध्रुवाजवळ होतें ही गोष्ट निःसंशय सिद्ध होईल. प्रस्तुत ध्रुवाजवळची हवा फार थंड आहे; परंतु पूर्वी ती तशी नव्हती. ह्मणजे थंड हवा हीं कांहीं ध्रुवासंबंधीं विशेष गोष्ट नव्हे हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. ह्मणून प्रस्तुत आपल्या उपयोगी अशा ध्रुवविशिष्ट गोष्टी काय आहेत हें ज्योतिःशास्त्राच्या मदतीनें आतां पाहूं.

ध्रुवावर सूर्य सारखा सहा महिने क्षितिजावर व पुढें एकसारखा सहा महिने क्षितिजाखाली असल्यामुळें तेथें सहा महिने सारखा दिवस व सूर्यप्रकाश आणि सहा महिने सारखी काळोखी रात्र असें असतें अशी सर्वत्र समजूत आढळून येते. परंतु त्यासंबंधानें थोडा अधिक विचार केल्यास ही समजूत केवळ स्थूलमानानें खरी आहे व शास्त्रीयदृष्ट्या तिचें ग्रहण करण्यापूर्वी तींत थोडाबहुत फरक केला पाहिजे असें दिसून येईल. प्रथमतः खुद्द ध्रुव व ध्रुवप्रदेश यांतील भेद समजून घेतला पाहिजे. ध्रुव म्हणजे केवळ एक बिन्दु असल्यामुळें त्याजवळ पूर्वी एकदां कोणा लोकांचें मूलस्थान खरोखर असलें तरी ते सर्व लोक कांहीं त्या एका बिंदूवरच रहात असणें शक्य नाहीं. ध्रुवप्रदेश म्हणजे उत्तर-ध्रुवबिंदु व उत्तरवृत्त (म्हणजे ध्रुवबिंदूपासून सुमारें २३॥ अंशावर विषुव-वृत्ताला समान्तर असलेलें वर्तुळ) यांमधला प्रदेश होय. रात्र, दिवस व ऋतु यांचें मान ध्रुवबिंदूवर व ध्रुवप्रदेशांतील निरनिराळ्या ठिकाणीं एकच असणें कांहीं शक्य नाहीं व तें तसें नसतेंही. ध्रुवबिंदुविशिष्ट गोष्टींवरून ध्रुवमंडळविशिष्ट गोष्टीचें अनुमान करतां येईल. तरी पण प्राचीन आर्यांच्या तेथील मूलस्थानासंबंधीं पुरावा गोळा करतांनां त्यांतील भेद लक्षांत ठेवणें अवश्य आहे. ध्रुवप्रदेशांत रहाणाऱ्या लोकांनां सहा सहा महिन्यांचीं दिवसरात्रें माहीत असलीं पाहिजेतच; परतु ध्रुव-बिंदुच्या कांहींसे दक्षिणेस ते रहात असल्यामुळें त्यांचा कालादर्श (पंचांग) खुद्द ध्रुवावर रहाणाऱ्या लोकांच्याहून कांहींसा निराळा असला पाहिजे. म्हणून ध्रुवबिंदुविशिष्ट गोष्टी व ध्रुवप्रदेशविशिष्ट गोष्टी यांतील भेद स्पष्ट समजावा म्हणून त्यांचें पृथक विवेचन करणें जरूर आहे.

पृथ्वीचे ध्रुव म्हणजे पृथ्वी ज्या आंसावर फिरते त्या आंसाचीं अग्रें होत. आंसाची स्थिति पृथ्वीच्या मानानें, अगदीं प्राचीन भूस्तरयुगांतही बदलली असल्याचें कांहीं द्योतक नाहीं. म्हणजे ध्रुवबिंदु व ध्रुवप्रदेश हे पूर्वी जे होते तेच आजही आहेत. त्यांवरील पूर्वीची हवा व आतांची हवा यांमध्यें मात्र जमीन अस्मानांचें अंतर आहे. परंतु पृथ्वीच्या अक्षाला थोडीशी गति असल्यामुळें म्हणजे क्रांतिवृत्ताच्या कदंबाभोंवतीं तो फिरत असल्यामुळें संपातांचें चलन होऊन खगोलाचे ध्रुव नित्य पालटत असतात; तसे पृथ्वीचे कांहीं पालटत नाहींत. यामुळें सुमारें ७००

वर्षांपूर्वी जी तारा ध्रुवस्थानीं होती तीच कांहीं आज नाहीं; तरी पण पृथ्वीचे ध्रुव कायमच आहेत. संपातचलन उत्पन्न करणाऱ्या या पृथ्वीच्या अक्षाच्या गतीचें प्राचीनविद्यापंडितांस फार महत्व आहे, कारण त्यामुळें वेळोवेळीं ऋतूंचे आरंभकाल बदलत जातात. याच कालज्ञापकाच्या आधारानें " वेदकालनिर्णय " या ग्रंथामध्यें, वैदिक गोष्टींपैकीं कांहीं गोष्टी वसंतसंपात मृगशीर्षांत असतांनां रचण्यांत आल्या, व ही संपाताची स्थिति आतांपर्यन्त सारखी बदलत आल्याचे दाखले वैदिक ग्रंथांत व त्यानंतरच्या वाङ्मयांतही पुष्कळ आहेत, असें दाखविलें आहे. त्यावरून असें दिसेल कीं, तैत्तिरीयसंहिता व ब्राह्मण यांच्याकाळीं वसंतसंपात कृत्तिकांत होता. हें सिद्ध करण्यासाठीं आधारास घेतलेल्या वाक्यांसंबंधानें असलेल्या सर्व शंका, कै० शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं दाखविलेल्या शतपथ ब्राह्मणांतील " एता (कृत्तिकाः) ह वै प्राच्यै दिशो न च्यवन्ते सर्वाणि ह वा अन्यानि नक्षत्राणि प्राच्यै दिशश्च्यवन्ते " म्हणजे कृत्तिका मात्र पूर्वदिशेहून चळत नाहींत इतर सर्व नक्षत्रें चळतात, या वचनावरून आतां साफ नाहींशा झाल्या आहेत.* ईजिप्ट देशांतील मनोरे व जुनीं देवळें यांचें पूर्वाभिमुखत्व ऐतिहासिकदृष्ट्या जितकें महत्वाचें आहे तितकीच ही कृत्तिकांची प्राचीनकाळची स्थिति वेदकालानुक्रम ठरविण्यांत महत्वाची आहे. परंतु प्रस्तुतचा कालज्ञापक याहून निराळा आहे. उत्तरध्रुव व उत्तरवृत्तांतर्गत प्रदेश यामध्येंच आढळणाऱ्या अशा ज्या कांहीं ज्योतिःशास्त्रविषयक विशिष्ट गोष्टी आहेत, त्यांच्याविषयीं कांहीं उल्लेख जर वेदांत सांपडले, तर आधुनिक शास्त्रीय शोधांवरून असें उघडच दिसेल कीं वैदिक ऋषींचे पूर्वज जेव्हां त्या ठिकाणीं रहात होते तेव्हां त्यांनां त्या विशिष्ट गोष्टींची माहिती झाली असलीच पाहिजे, आणि ही गोष्ट तर हिमान्तरकालांतच केवळ शक्य होती. म्हणून आतां या वर सांगितलेल्या दोन्ही प्रकारच्या विशिष्ट गोष्टींचें पृथक् विवेचन करूं.

उत्तरध्रुवावरून पहाणाराला प्रथम दर्शनींच दिसणारा चमत्कार म्हणजे खगोलाचें डोक्यावर होणारें छत्राकार भ्रमण हा होय. आपण उष्ण व समशीतोष्ण कटिबंधांत रहात असल्यामुळें आपल्याला सर्व आकाशस्थ ज्योति पूर्वेस उगवतात व पश्चिमेस मावळतात असें दिसतें.

* भारतीय ज्योतिःशास्त्र पानें १२७—१२९.

त्यांपैकीं कांहीं आपल्या डोक्यावरून जातात व कांहीं तिरक्या जातात. परंतु ध्रुवावरच्या प्रेक्षकाला आपल्या डोक्यावरील सर्व खगोलार्ध डावीकडून उजवीकडे डोक्यावर उंच धरलेल्या छत्रीप्रमाणें वाटोळें फिरतें आहे असें दिसेल. तेथें तारा उगवणार नाहींत व मावळणारही नाहींत, तर कुंभाराच्या चाकाप्रमाणें क्षितिजसमान्तर पातळ्यांमध्यें वाटोळ्या फिरतील; आणि एक प्रदक्षिणा झाली कीं दुसरी सुरू या प्रमाणें सहा महिन्यांच्या दीर्घरात्रभर चालू राहील. तेथें सूर्य सहा महिने क्षितिजावर असतो तेव्हां तोही अशाच फिरत राहील. तेथून पहाणाराचें खस्वस्तिक म्हणजे खगोलाचा उत्तरध्रुव, व त्याची उत्तर दिशा म्हणजे ऊर्ध्व दिशा होय; अर्थात् क्षितिजाखालीं असलेले अदृश्य प्रदेश हे त्याच्या दक्षिणेस असणार. पृथ्वीच्या दैनिक अक्षभ्रमणामुळें पूर्व व पश्चिम बिंदू पहाणाराच्या डावीकडून उजवीकडे फिरत रहातील व त्यामुळें पूर्वेकडील खस्थ ज्योतीही दररोज क्षितिजावरोवर डावीकडून उजवीकडे फिरत रहातील. त्या आपल्या इकडील उष्ण किंवा समशीतोष्ण प्रदेशांतल्या प्रमाणें रोज पूर्वेस उगवून, डोक्यावरून जाऊन पश्चिमेस मावळतात असें दिसणार नाहीं. सूर्याभोंवतीं फिरतांनां पृथ्वीच्या आंसाची दिशा फारशी बदलत नसल्यामुळें ध्रुवावरून पहाणाराला नेहमीं एकच खगोलार्ध दिसत राहून तें डोक्यावर छत्रीसारखें वाटोळें फिरत राहील, आणि दुसरें अर्ध व त्यांतील सर्व तारा त्यास नेहमींच अदृश्य असतील; व आकाशाचें विषुववृत्त हेंच त्याचें क्षितिज होईल. अशा प्रेक्षकाला उत्तरगोलार्धांत सूर्य प्रवेश करूं लागला म्हणजे तो दक्षिणेकडून उगवतोसा वाटेल, व म्हणून तो बेलाशक सूर्य दक्षिणेस उगवतो असें म्हणेल; आणि हें आपल्याला कितीही चमत्कारिक वाटलें, तरी तें त्यास अगदीं खरेंच आहे. ध्रुवावर सूर्योदय वर्षांतून फक्त एकदांच होईल, आणि तो एकदां दक्षिणेस उगवल्यावर सहा महिने सारखा दिसत राहील. इतक्या अवधींत तो क्षितिजावर सुमारें $२३\frac{१}{२}$ अंश येईल, व नंतर पुन्हा खालीं खालीं जात क्षितिजाखालीं दक्षिणेस मावळेल. हे सहा महिने सारखा दिवसच असेल आणि खगोल २४ तासांत डोक्यावर एक प्रदक्षिणा करीत असल्यामुळें सूर्यही आपली क्षितिजप्रदक्षिणा २४ तासांत पुरी करील. ध्रुवावरून पहाणाराला सहा महिन्याच्या दीर्घ रात्रींत किंवा

दिवसा तारांची किंवा सूर्याची दर चोवीस तासांनीं होणारी एक प्रदक्षिणा ह्मणजे आपल्या दिवसाप्रमाणें काल मोजण्याचें एक साधन होईल. एखाद्या झाडाची किंवा दुसऱ्या कोणत्यातरी वस्तूची खूण धरून ध्रुवावर सूर्य, चंद्र ह्मरा, व उष्ण यांच्या दर चोवीस तासांनीं होणाऱ्या प्रदक्षिणा मोजतां येतील. अशा प्रकारें सूर्याच्या सुमारें १८० प्रदक्षिणा (ही नक्की संख्या पूर्व प्रकरणांत सांगितलेल्या उन्हाळा व हिंवाळा यांच्या अवधींवर अवलंबून राहील.) झाल्या ह्मणजे तो पुन्हा क्षितिजाखालीं उतरेल व ज्या तारा आजपर्यंत सूर्यप्रकाशांत लोपून गेल्या होत्या त्या सर्व आतां एकदम दिसूं लागतील; आपल्या इकडीलप्रमाणें एका मागून एक अशा उगवणार नाहींत. ज्या सूर्यप्रकाशानें त्यांस लोपून टाकिलें होतें तो नाहींसा झाल्याबरोबर ताराखचित असें सर्व उत्तर गोलार्ध एकदम दृश्यमान होऊन पहाणाराच्या डोक्यावर सारखें सहा महिने छत्राकार फिरत राहील. याप्रमाणें खगोलाचें क्षितिजसमान्तर असें सतत भ्रमण, वर्षांतून एकच सकाळ व एकच संध्याकाळ, तसेंच एकच सहा महिन्याचा दिवस व सहा महिन्यांची रात्र, या उत्तरध्रुवावरील कालादर्शीतील मुख्य मुख्य विशिष्ट गोष्टी आहेत.

ध्रुवावर रहाणाराला एक रात्र सहा महिन्यांची असेल असें वर सांगितलें, यावरून तेथें अर्धें वर्षभर सारखा काळोख असेल, असें वाटणें सहाजिक आहे. सहा महिन्यांएवढ्या मोठ्या रात्रींत येणाऱ्या संकटांची व अडचणींची कल्पना मनांत आल्याबरोबर काय हा भयंकर प्रसंग असें एखाद्यास सहज वाटेल. एवढ्या मोठ्या रात्रींत उजेड नाहीं तर नाहींच पण सूर्यापासून मिळणारी उष्णताही त्यावेळीं नसल्यामुळें या दोन्ही गोष्टी कृत्रिम साधनांनीं उत्पन्न करावयाच्या ह्मणजे केवढा खटाटोप केला पाहिजे ! पण खरोखर पाहिलें असतां ही कल्पना चुकीची आहे. या दीर्घ रात्रीं अंधकाराचा बराच परिहार करणारी पहिली गोष्ट ह्मणजे "उत्तरारुण" नांवाचा एक प्रकारचा रम्य विद्युत्प्रकाश हा आहे. चंद्रही तेथें महिन्यांतून पंधरा दिवस क्षितिजावर असून तेथून पहाणारास आपल्या बदलणाऱ्या निरनिराळ्या कला सारख्या दाखवीत राहील. परंतु ध्रुवावरील दीर्घ रात्रीच्या काळोखाचें भय नाहींसें करणारी याहूनही मोठी गोष्ट ह्मटली ह्मणजे सूर्य मावळल्यावर व उगवण्यापूर्वी पडणारा दोन वेळचा संधिप्रकाश होय.

आपल्या इकडे म्हणजे उष्ण व समशीतोष्ण कटिबंधांत, हा संधिप्रकाश मग तो सकाळचा असो वा संध्याकाळचा असो, फार तर तास दोन तास असतो. परंतु ध्रुवाजवळची स्थिति याहून फार निराळी आहे. तेथें वर्षांतून एकदांच येणारा दिवस व तशीच रात्र यांच्या मधला प्रत्येक वेळचा संधि प्रकाश पुष्कळ दिवस दिसत असतो. मात्र तो नक्की किती दिवस असतो हें अद्यापि निश्चितपणें माहीत झालें नाहीं. कांहींच्या मतें तो ४५ दिवस दिसत असतो, पण दुसरे म्हणतात तो पुरे दोन महिने रहातो. उष्ण कटिबंधामध्यें सूर्य सुमारें १६ अंश क्षितिजाच्या खालीं असतांनांच त्याचे किरण प्रथम दिसूं लागतात. परंतु उन्नत अक्षांशांच्या ठिकाणीं सूर्य १८ किंवा २० अंशही क्षितिजाखालीं असतांनां ते दिसूं लागतात असें म्हणतात. ही दुसरी मर्यादा बहुधा ध्रुवाजवळील प्रदेशाला लागू असावी; आणि तशी असेल तर तेथें संधिप्रकाशही दोन महिने सारखा राहील. डॉ. वॉरननें आपल्या ग्रंथामध्यें कॅप्टन पिमनें केलेलें ध्रुवावरील वर्षाचें वर्णन दिलें आहे तें असें:—

"मार्चाच्या सोळाव्या तारखेला तेथें सूर्य उगवतो. त्याच्या पूर्वी ४७ दिवस म्हणजे जानेवारीच्या २९ तारखेपासून अरुणप्रकाश दिसत असतो. पुढें सप्टंबरच्या २५ तारखेला सूर्य मावळतो व त्यानंतर ४८ दिवस म्हणजे नवंबरच्या १३ तारखेपर्यंत संधिप्रकाश असतो. यापुढें मात्र सूर्य व अरुणप्रकाश हे दोन्ही नाहींसे झाल्यामुळें होणारा काळोख ७६ दिवस असतो; आणि मग पुनः अरुणप्रकाश होऊन सूर्य उगवतो तो १९४ दिवस क्षितिजावर असतो. म्हणजे ध्रुवावरचें वर्ष म्हणजे १९४ दिवस सूर्यप्रकाश, ४८ दिवस संध्याप्रकाश, पुढें ७६ दिवस काळोख आणि नंतर ४७ दिवस अरुणप्रकाश, असें असतें."

परंतु इतर कांहीं विद्वान या संध्याप्रकाशाचा किंवा अरुणप्रकाशाचा अवधि वाढवून पूर्ण काळोखाचा अवधि कमी करतात म्हणजे ७६ दिवसांवरून ६० दिवसांवर म्हणजे फक्त दोन महिन्यांवर तो आणतात. आतां यांपैकीं कोणती गोष्ट खरी हें ठरवावयाचें तर प्रत्यक्ष ध्रुवावर जाऊन अनुभव घेतला पाहिजे. संधिप्रकाशाचे अवधीचें मान किरणांचें वक्रीभवन व परावर्तन करण्याच्या वातावरणाच्या शक्तीवर अवलंबून आहे; व ही शक्ती हवामान इत्यादि कारणांमुळें निरनिराळी असते. ध्रुवावरची सध्याची

हवा फार थंड आहे. पण हिमान्तरकालामध्यें ती सौम्य होती; व या एकाही कारणामुळें हिमान्तरकालांतील तेथच्या संधिप्रकाशाच्या अवधीचें मान बदलेल. पण याचें कारण कांहीं असलें तरी एवढें खरें कीं, ध्रुवावर वर्षांतून दोनच वेळां दिसणारा हा संधिप्रकाश बरेच दिवस रहातो. कारण सूर्य क्षितिजाखालीं असतांनां दिसूं लागण्याची त्याची कमींत कमी मर्यादा जी १६ अंश ती धरिली तरीही एवढें अंतर तोडून क्षितिजावर यावयास त्यास एका महिन्याहून कांहीं तरी जास्त वेळ लागेल; आणि एवढा वेळ तेथें सारखा अरुणप्रकाश पडेल. म्हणजे हे मोठमोठे अरुणप्रकाश व संध्याप्रकाश ध्रुवावरील रात्रीच्या काळोखाचा बराच भाग कमी करून तिला जवळ जवळ दोन किंवा फार तर अडीच महिन्यांची करून टाकतील. म्हणून ध्रुवावरील अर्धवार्षिक रात्र म्हणजे त्या प्रदेशाला रहावयास अयोग्य करून टाकणारा असा सारख्या अंधकाराचा काळ असें मानणें केवळ चुकीचें होईल. इतकेंच नव्हे तर उलट तेथील ताऱ्यांप्रमाणेंच दिसत असे तोंपर्यंत क्षितिजासभोंवार सारख्या प्रदक्षिणा करीत रहाणाऱ्या एवढ्या दीर्घ उषेचा अद्भुत मौजेचा देखावा पहाण्याचा अधिकार एकट्या ध्रुवस्थ लोकांनाच मिळालेला आहे; इतरांना तो मिळणें नाहीं.

उष्ण किंवा समशीतोष्ण कटिबंधांतील उषाप्रकाश थोडका वेळ टिकणारा असून तो दर चोवीस तासांनीं पुनः पुनः येत असतो. तरी देखील कवींनां कविता करावयास तो एक विषय होऊन राहिला आहे. मग ज्या ठिकाणीं तो दोन महिन्यांच्या काळोखानंतर येऊन, आला म्हणजे वर सांगितलेले मजेचे प्रकार करीत दीड महिना तरी रहातो, त्या ध्रुवनिवासी जनांनां त्याच्या आगमनापासून किती आनंद व मजा वाटत असेल व त्याची ते किती उत्सुकतेनें मार्गप्रतीक्षा करीत असतील याचें वर्णन करण्यापेक्षां कल्पनाच करणें बरें. हा दीर्घ उषःप्रकाश म्हणजे ध्रुवविशिष्ट गोष्टींपैकीं एक मुख्य गोष्ट आहे. त्याचें फार मजेचें वर्णन डॉ. वॉरन यानें आपल्या "नंदनवनोपलब्धि" नांवाच्या पुस्तकांत केलें आहे. या अवर्णनीय शोभेच्या उषेसंबंधानें तो लिहितो:—


"प्रथमारंभीं ईषद्दृश्यमान असा एक तेजाचा पुंज रात्रौ खगोलाच्या अधोभागीं क्षितिजाजवळ दिसूं लागतो. आरंभीं अन्य तारकांच्या तेजास

अमळसें लोपवून व नंतर क्रमाक्रमानें वाढत जाऊन तो अद्यापि कांळ्या रुंद असलेल्या क्षितिजाला जरा तिरकस अशा वर्तुळांमध्यें प्रदक्षिणा करूं लागतो. साठ घटिकांनीं एक प्रदक्षिणा पुरी करून पुनरपि तो पूर्वस्थानीं येतो आणि आणखीही कित्येक तारांनां अगदी निस्तेज करून सोडतो. थोडयाच वेळांत हा विस्तीर्यमाण तेजोगोल 'प्राच्य मौक्तिका'च्या प्रभेनें देदीप्यमान हौत्साता आपल्या थाटाच्या प्रदक्षिणा करीत असतांनां त्याचा मौक्तिकश्वेतिमा अधिकाधिक उज्वलं होत होत नील आणि पीत वर्णांनीं खचित होऊन शेवटीं आरक्त होतो. दिवसें दिवस हा उज्वल तेजाचा पुंज प्रदक्षिणा करीत राहून वातावरण व अभ्रें यांची प्रकाश-परावर्तनास अनुकूलता किंवा प्रतिकूलता असेल त्याप्रमाणें प्रज्ज्वलित किंवा निस्तेज होतो; आणि निस्तेज झाला तरी पुनरपि अधिकच प्रज्वलित होतो. हा त्याचा क्रम अद्यापि लुप्तप्राय असलेला सविता आपल्या उदयागिरीच्या शिखरावर येईपर्यंत चालतो. सरतेशेवटीं जेव्हां दोन महिनेपर्यंत असल्या अद्भुत देखाव्यांनीं अंतरिक्ष भरून गेलें असतें तेव्हां तेजोनिधि सविता दीर्घकालानें आपल्या विश्रामस्थानांतून वर येऊं लागून पुनरपि मनुष्यदृष्टीस गोचर होतो. आरंभीं अर्धवर्तुलांकित असलेलें त्याचें मंडळ एक दोन प्रदक्षिणांनन्तर पूर्ण होत्सातें अति दूरच्या गिरि-शिखरांस देखील प्रसन्न करितें आणि मग सहा महिनेपर्यंन्त आपल्या प्रिय अशा ध्रुवभूला रात्रीचें वारेंही न लागूं देतां तो विश्वाच्या अक्षाभोंवती पूर्णबिंब होत्साता चक्राकार भ्रमण करीत रहातो. सरतेशेवटीं दृष्टीआड झाल्यावर सुद्धां तो आपल्यामागें क्रमानें प्रज्वलित व निस्तेज होणारा संधिप्रकाश ठेऊन जातो, आणि अशा रीतीनें वियोगदुःखित होणाऱ्या पृथ्वीला आपल्या शीघ्र पुनरागमनाविषयीं अभिवचन देतांना जणूं काय खुणाच करीत आहे असें दर्शवितो."


असो. तर अशा प्रकारच्या अद्भुत देखाव्याचा परिणाम ध्रुवस्थ प्रेक्षकाच्या स्मृतीवर कायमचा झाल्याशिवाय रहाणारच नाहीं; आणि पुढें आपणांस असें दिसून येईल कीं, आर्यलोकांच्या अति प्राचीन कथांमध्यें, त्यांच्या पूर्वजांनीं आपल्या मूलस्थानांमध्यें पाहिलेल्या या अद्भुत चमत्काराची म्हणजे क्षितिजावर कित्येक दिवसपर्यन्त सारख्या तिरकस प्रदक्षिणा करणाऱ्या दीर्घ उषेची स्मृति राहिलेली आहे.

उत्तरध्रुवावरील म्हणजे भूगोलाच्या अक्षाच्या उत्तर टोंकावरील विशिष्ट गोष्टी या अशा आहेत. परंतु उत्तरध्रुव हा केवळ एक बिंदु असल्यामुळें भौविक वसतिस्थान म्हणजे एक बिंदु न मानितां ध्रुवाभोंवतालचाही बराच प्रदेश समजला पाहिजे; म्हणून या बिंदूच्या कमीजास्त दक्षिणेस ज्याप्रमाणें प्रेक्षक असेल त्याप्रमाणें वर सांगितलेल्या विशिष्ट गोष्टींमध्यें काय काय फेरफार होतील हें आतां आपल्याला पाहिलें पाहिजे.

पूर्वी सांगितलेंच आहे कीं ध्रुवावर रहाणाराच्या डोक्यावर फक्त एकच खगोलार्ध छत्रीसारखें फिरतें असें दिसतें, आणि त्यांतील सर्व ताराही कधीं उगवत किंवा मावळत नसून, त्या सर्व बरोबरच क्षितिजसमान्तर पातळ्यांतून फिरत असतात. परंतु जसें जसें ध्रुवबिंदूच्या खालीं खालीं यावें, तसें तसें पहाणाराचें खस्वस्तिक ध्रुवतारेशीं न रहातां तिच्या दक्षिणेस येऊं लागेल; व मग त्याचें क्षितिजही खगोलविषुवापाशीं न रहातां त्याच्या दक्षिणेस जाऊं लागेल. उदाहरणार्थ, बाजूस दिलेल्या आकृतींत ख हें पहाणाराचें खस्वस्तिक आणि ध हा खगोलाचा उत्तरध्रुव आहे. पहाणारा, जेव्हां पृथ्वीच्या ध्रुवावर होता तेव्हां त्याचें खस्वस्तिक ध हें आणि क्षितिज म्हणजे खगोलांचें विषुव असें होतें, व त्यामुळें व ध वा या खगोलार्धांतील सर्व तारा त्याच्या डोक्याभोंवतीं क्षितिजसमान्तर वर्तुळांत फिरत होत्या. परंतु आतां तें खस्वस्तिक ख जवळ आल्यामुळें ती स्थिति बदलली. कारण, आतांही खगोल पूर्वीप्रमाणेंच ध म धा या आंसाभोंवतीं फिरणार, ख म खा याभोंवतीं नाहीं. पहाणारा उत्तरध्रुवावर असतांना या दोन्ही रेषा एकच होत्या म्हणून तारांनीं भूगोलाच्या ध्रुवाभोंवतीं प्रदक्षिणा केल्या कीं, त्या खस्वस्तिकरेषेभोंवतीही साहाजिक होत. परंतु खस्वस्तिक आकृतींत



दाखविल्याप्रमाणें **ध** पासून **ख** जवळ आलें म्हणजे पहाणाराचें क्षितिजही **क्ष क्षा** हें होईल; आणि म्हणून तारा आतां क्षितिजाला तिरकस फिरूं लागतील. बाजूस दिलेल्या आकृतींत **अ आ, क का, च चा,** या जाड रेघांनीं दर्शविल्याप्रमाणें त्या फिरतात असें दिसेल. **क ध क्षा** एवढ्या भागांतील तारा सर्व रात्रभर दिसतील; कारण त्यांचे प्रदक्षिणामार्ग **क्ष चा का क्षा** या क्षितिजावर असणार. परंतु ज्या तारांची उत्तरक्रान्ति **क व** पेक्षां कमी आहे, त्या सर्व रोज कांहीं वेळ क्षितिजावर असून कांहीं वेळ खालीं असतील. उदाहरणार्थ, **च** जवळच्या तारांच्या प्रदक्षिणेचा थोडासा भागच **क्ष क्षा** या क्षितिजावर असेल. तात्पर्य, ध्रुवावरून पहाणाऱ्याला दिसणाऱ्या आकाशाहून **ख** हें खस्वस्तिक असलेल्या मनुष्याला दिसणारें आकाश निराळ्या प्रकारचें असेल. तारा क्षितिजाला समान्तर अशा न फिरतां तिरक्या फिरतील. त्यांपैकीं ध्रुवापासून कांहीं एक अंतरावरील तारा नेहमीं क्षितिजावर ध्रुवाभोंवतीं फिरतांनां दिसतील; परंतु इतर आपल्या इकडीलप्रमाणेंच उगवून मावळून तिरक्या फिरतांनां दिसतील. खस्वस्तिक अगदीं बहुतेक **ध** जवळ असल्यास अशा उगवून मावळणाऱ्या तारा फार थोड्या असतील व त्यांमधला फरकही चटकन लक्षांत येण्यासारखा नसेल. परंतु जसा जसा **ख** बिंदु दक्षिणेस येईल तसा तसा हा फरक विशेष दिसूं लागेल.



ध्रुवबिंदूच्या खालीं दक्षिणेस रहाणाऱ्या माणसांच्या दिनमानांत व रात्रिमानांतसुद्धां अशा प्रकारचे फेरबदल होतील. बाजूच्या आकृतीवरून ही गोष्ट स्पष्ट रीतीनें कळेल. **ध** हा खगोलाचा उत्तरध्रुव आणि **व वा** हें हें त्याचें विषुववृत्त आहे. सूर्य **क का** या क्रान्तिवृत्तांतून फिरत असल्यामुळें व या वृत्ताचा विषुव-

वृत्ताशीं सुमारें २३½° [बरोबर २३° २८′] कोन असल्यामुळें आ क आणि का अ हीं वृत्तें पृथ्वीवरील अयनवृत्तांशीं समान होतील; आणि उ म हें वृत्त पृथ्वीच्या उत्तरवृत्ताशीं सदृश होईल. सूर्य क का या क्रान्तिवृत्तांतून फिरत असल्यामुळें तो दर वर्षीं, अयनवृत्तांच्या आंत रहाणाऱ्या माणसांच्या डोक्यावर दोन वेळां येईल; एकदां का पासून क पर्यन्त येतांनां व पुनः क पासून का पर्यन्त येतांनां. तेथें कांहीं वेळ सूर्य पहाणाऱ्याच्या खस्वस्तिकाच्या उत्तरेसही असेल, व वर्षाच्या बाकीच्या वेळांत दक्षिणेस असेल. सूर्य विषुववृत्ताच्या उत्तरेस २३½° पेक्षां जास्त कधींही येत नसल्यामुळें आ क या वृत्ताच्या उत्तरेस खस्वस्तिक असलेल्या मनुष्याला तो नेहमीं खस्वस्तिकाच्या दक्षिणेस दिसेल; आणि जसें जसें ध्रुवाकडे जावें, तसें तसें हें सूर्याचें खस्वस्तिकापासून दक्षिण अंतर वाढत जाईल. तरीपण आ क आणि उ म या वृत्तांमध्यें खस्वस्तिक असलेल्या माणसांनां वर्षांतील प्रत्येक दिवशीं निदान कांहीं तास तरी सूर्य क्षितिजाखालीं गेलेला दिसेल. उदाहरणार्थ म हें एकाचें खस्वस्तिक आहे असें समजूं. आकृतींत दाखविल्याप्रमाणें म हा समशीतोष्ण कटिबंधांतील उत्तरेकडचा शेवटचा अक्षांश आहे. आतां येथील क्षितिज म च्या दोन्ही बाजूंनां ९०° वर म्हणजे आ म अ हें होईल; आणि सूर्य का क या क्रान्तिवृत्तांतून फिरतांनां रोज कांहीं वेळ तरी क्षितिजावर दिसेल. परंतु याहून उत्तरेकडे शीतकटिबंधांत गेलें असतां तेथें सूर्य वर्षांतून कित्येक दिवस सारखा क्षितिजाखालीं राहिलेला दिसेल, आणि हा काल जसें जसें उत्तरेकडे जावें तसा तसा वाढत जाऊन शेवटीं ध्रुवाजवळ सहा महिन्यांचा होईल. तात्पर्य रात्रिमान ध्रुवावर सहा महिन्यांचें असून जसें जसें दक्षिणेकडे जावें तसें तसें तें कमी होऊन, समशीतोष्ण कटिबंधांत आल्यावर सूर्य रोज कांहीं वेळ तरी क्षितिजावर असल्यामुळें तें चोवीस तासांहून कांहींतरी कमी होईल. आतां पहाणाराचें खस्वस्तिक ख हें शीतकटिबंधांत आहे असें समजूं; म्हणजे त्याचें क्षितिज क्षा क्ष हें होईल; आणि सूर्य वर्षांतून कित्येक दिवस सारखा या क्षितिजाखालीं असेल. उदाहरणार्थ, सूर्य ग पाशीं आहे अशी जर कल्पना केली, तर त्याच्या रोजच्या प्रदक्षिणेचा मार्ग ग क्ष हा होईल; हें सर्व वर्तुळ ख हें खस्वस्तिक असलेल्या ठिकाणाच्या क्षितिजाखालीं आहे. अर्थांतच ख हें खस्वस्तिक

असलेल्या प्रेक्षकाला सूर्य ग पासून का पर्यंत आणि पुनः का पासून ग पर्यंत येतांनां मुळींच दिसणार नाहीं. सूर्य सारखा क्षितिजाखालीं असणाऱ्या या दिवसांच्या जोडीला तो उत्तरेस आला असतां सारखा क्षितिजावर दिसण्याचे तितकेच दिवस असतात. उदाहरणार्थ सूर्य द जवळ आहे असें समजल्यास त्याचा दैनिक प्रदक्षिणेचा मार्ग द क्षा हा सर्व क्ष क्षा या क्षितिजाच्या वर असेल; आणि सूर्य द पासून क पर्यन्त आणि पुनः क पासून द पर्यन्त जातांना तो तसाच नेहमीं वर असेल. या वेळामध्यें सूर्य उगवणार नाहीं आणि मावळणारही नाहीं, तर पहाणाराच्या डोक्यावर ध्रुवाभोंवतालच्या तारांप्रमाणें चक्राकार पण तिरक्या फेऱ्या करीत राहील. परंतु ग पासून द पर्यन्त आणि कांहीं दिवसांनीं पुनरपि द पासून ग पर्यन्त सूर्य असतांनां तो रोज कांहीं वेळ तरी क्षितिजावर दिसेल व बाकी वेळ क्षितिजाखालीं जाईल; ह्मणजे तेव्हां आपल्या इकडीलप्रमाणें चोवीस तासांचा अहोरात्रें होतील. मात्र उत्तर गोलार्धांत सूर्य असतांनां रात्रीपेक्षां दिवस मोठा असेल व सूर्य दक्षिण गोलार्धांत असतांनां दिवसापेक्षां रात्र मोठी असेल. ह्मणजे उत्तरध्रुवापासून थोड्याशा अंतरावर शीतकटिबंधांत रहाणाऱ्या लोकांचें वर्ष, खुद्द ध्रुवस्थ लोकांप्रमाणें सहासहा महिन्यांच्या रात्रिदिवसांचें न होतां थोडया निराळ्या प्रकारचें होऊन त्यांत, एक कांहीं महिन्यांचा मोठा दिवस, पुढें आपल्या इकडीलप्रमाणें कांहीं अहोरात्रें, नंतर मोठ्या दिवसाएवढीच एक मोठी रात्र आणि पुनः मागच्या इतकींच कांहीं अहोरात्रें अशीं होतील. यांपैकीं मोठा दिवस व मोठी रात्र हीं सहा महिन्यांपेक्षां नेहमीं कांहीं तरी कमी असतील. मोठा दिवस व मोठी रात्र हीं वर्षांचीं दोन विरुद्ध दिशांचीं अग्रें असून, मोठ्या दिवसाचा मध्य सूर्य उदगयनाच्या शेवटच्या बिंदूशीं असतांनां होईल व रात्रीचा मध्य तो दक्षिणायनाच्या शेवटच्या बिंदूशीं असतांनां होईल. हा त्रिप्रकार संवत्सरविभाग आपल्याला विशेष महत्वाचा आहे. करितां एक उदाहरण घेऊन तो विशेष स्पष्ट करूं. कल्पना करा कीं, एक मनुष्य ध्रुवबिंदूच्या इतका दक्षिणेस आहे कीं त्याची दीर्घ रात्र फक्त दोन महिन्यांची आहे; ह्मणजे त्या ठिकाणीं सूर्य वर्षांतून सहा महिने क्षितिजाखालीं नसून फक्त दोनच महिने असतो. या रात्रीचा मध्यकाल ह्मणजे दक्षिणायनदिवस (ह्मणजे सायन मकरसंक्रमणदिवस) असल्यामुळें ही रात्र दिसेंबरच्या

२१ तारखेच्या ह्मणजे दक्षिणायनदिनाच्या पुढें व मागें एक एक महिना असते, असें ह्मणावयास हरकत नाहीं. या दीर्घरात्रीप्रमाणेंच दोन महिन्यांचा एक दीर्घ दिवस, जून महिन्याच्या एकविसाव्या तारखेच्या ह्मणजे उत्तरायणदिनाच्या पुढें व मागें एक एक महिना असा असेल. आतां वर्षांतून हे चार महिने कमी केले ह्मणजे उरलेल्या आठ महिन्यांत समशीतोष्ण कटिबंधांतल्याप्रमाणें, चोवीस तासांनीं दिवस रात्र एकामागून एक येत जातील. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यांत दीर्घ रात्र संपली ह्मणजे हीं अशीं चोवीस तासांचीं अहोरात्रें सुरू होतील; आणि आरंभीं दिवसापेक्षां रात्र बरीच मोठी असेल. परंतु सूर्य दक्षिणेकडून हळू हळू उत्तर गोलार्धांत गेला ह्मणजे रात्रीपेक्षां दिवस थोडा थोडा मोठा होऊं लागून शेवटीं मे महिन्याच्या सुमारास तो सारखा दोन महिन्यांचा होईल. पुढें जुलै मध्यें हा दीर्घ दिवस संपून पुनः पूर्वींप्रमाणें चोवीस तासांचीं अहोरात्रें सुरू होतील, व आरंभीं आरंभीं दिवस रात्रीपेक्षां मोठा असून सूर्य पुनः दक्षिण गोलार्धांत आल्यावर रात्र दिवसापेक्षां मोठी व्हावयास लागून नोव्हेंबरच्या सुमारास पूर्वीं सांगितल्याप्रमाणें ती दोन महिन्यांचीं होईल. हीच गोष्ट थोड्या बहुत फरकानें ज्या ठिकाणीं दीर्घ रात्र व दीर्घ दिवस हीं तीन चार किंवा पांच महिन्यांचीं असतात, तेथेंही लागू पडेल; आणि अगदीं ध्रुवावर गेलें असतां तीं दोन्ही सहा सहा महिन्यांचीं होऊन मधलीं चोवीस तासांचीं अहोरात्रें अजिबात नाहींशीं होतील.*

---

* या विषयीं भास्कराचार्यकृत सिद्धांतशिरोमणि, गोलाध्याय, अध्याय ७ श्लोक ६—७ पहा. ते असे:—

सदा समत्वं द्युनिशोर्निरक्षे नोन्मंडलं तत्र कुजाद्यतोऽन्यत् ।
षट्षष्टिभागाभ्यधिकाः पलांशा यत्राथ तत्रास्त्यपरो विशेषः ॥ ६ ॥
लंबाधिका क्रान्ति रुदक्च यावत् तावद्दिनं संततमेव तत्र ।
यावच्च याम्या सततं तमिस्रा ततश्च मेरौ सततं समार्धम् ॥ ७ ॥

" विषुववृत्तस्थ प्रदेशांत क्षितिज व उन्मंडल हीं एकच असल्यामुळें तेथें रात्रि व दिवस हीं समान असतात. परंतु ज्या ठिकाणीं उत्तर अक्षांश ६६° हून जास्त असतात तेथें एक विशेष गोष्ट घडते; ती ही कीं, त्या स्थळाचे लंबांशाहून सूर्याची उत्तर क्रान्ति जोंपर्यंत अधिक असते तों

दोन महिन्यांची दीर्घ उषा ही ध्रुवावर दिसणारी विशेष महत्वाची गोष्ट आहे हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. ध्रुवापासून जसजसें खालीं दक्षिणेस यावें तशी तशी त्या उषेची शोभा व अवधि हीं कमी कमी होऊं लागतात. तरी पण तेथेंही दोन, तीन, किंवा त्याहूनही अधिक महिन्यांच्या दीर्घ रात्रीच्या अन्तीं येणारी उषा नेहमींच्या रात्रीच्या शेवटीं येणाऱ्या उषेहून किती तरी मोठी असते, ह्मणजे ती कित्येक दिवसांचीही असते. ही दीर्घ रात्र संपण्याच्या सुमारास पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्रथमतः एक जरासें अस्पष्ट तेज दिसूं लागेल, आणि पहाणारा जर ध्रुवाच्या बराच जवळ असेल तर त्याला ती उषा क्षितिजावर कित्येक दिवस सारखी फिरतांनां दिसून, शेवटीं सूर्यबिंब वर येईल आणि मग रात्रिदिवसाचे (चोवीस तासांच्या अहोरात्रांचे) पर्याय सुरू होऊन पुन्हा कांहीं दिवसांनीं दीर्घ दिवस येईल. उदीचीन अरुणाचेंही तेज खुद्द ध्रुवापेक्षां त्याच्या खालच्या दक्षिणेकडील प्रदेशांत कमी कमीच दिसेल.

आतांपर्यंत सांगितलेल्या उत्तर प्रदेशांतील विशिष्ट गोष्टी ध्रुवबिंदूवरील विशिष्ट गोष्टींहून जरी भिन्न आहेत, तरी आपल्याला प्रस्तुत उष्ण किंवा समशीतोष्ण कटिबंधांत दिसणाऱ्या गोष्टींहूनही त्या तितक्याच भिन्न आहेत. आपल्याला वर्षांतल्या प्रत्येक दिवशीं सूर्य कांहीं वेळ तरी क्षितिजावर दिसतोच. परंतु उत्तरवृत्तान्तर्गत माणसांनां तो कित्येक दिवस तरी

पर्यंत तेथें सतत दिवसच असतो, आणि लंबांशाहून दक्षिण क्रान्ति अधिक असते तोंपर्यंत तेथें सतत रात्र असते, व ह्मणूनच ध्रुवावर सारखी सहा महिने रात्र व सहा महिने दिवस अशीं असतात." आतां एखाद्या ठिकाणचे अक्षांश ७०° असतील, तर तेथचे लंबांश ९०°—७०° = २०° झाले. सूर्य विषुववृत्ताच्या उत्तरेस कधीहीं २३½° हून जास्त येत नसल्यामुळें त्याची उत्तरक्रान्ति २३½° हून कमी व २०° हून जास्त आहे तो पर्यंत तेथें सारखा दिवसच असेल, आणि सूर्य दक्षिण गोलार्धांत गेल्यावर त्या दिवसा एवढीच एक रात्र होईल. यूरोपाचें अगदीं उत्तर टोंक जें नार्डकिन किंवा उत्तर भूशिर त्या ठिकाणीं (उत्तर अक्षांश ७१° ६′ ५०″) दीर्घ रात्र १८ नोव्हेंबरला सुरू होऊन २४ जानेवारीला संपते, ह्मणजे तेथें एकंदर ६७ दिवस सारखी रात्र असते असें ह्मणतात.

सारखा क्षितिजाखालीं असल्यामुळें तितके दिवस मुळींच दिसत नाहीं. हा अखंड दीर्घ रात्रीचा वेळ जर आपण हिशेबांत घेतला नाहीं, तर ध्रुवप्रदेशांतील वर्ष ह्मणजे सूर्यप्रकाशयुक्त काल, सहापासून अकरा महिनेपर्यंत असतो असें ह्मणावयास हरकत नाहीं. शिवाय उष्ण व समशीतोष्ण कटिबंधांत उषा फार थोडा वेळ असते; कारण रात्र व दिवस मिळून चोवीस तासांहून कधींही अधिक होत नसल्यामुळें अर्थातच त्यांमध्यें येणारी उषा फार तर दोन तीन तासांची असते; याहून कधीं जास्त असत नाहीं. परंतु ध्रुवावरची वर्षांतून एकदांच येणारी उषा व ध्रुवाजवळच्या प्रदेशांतील दीर्घ रात्रीच्या शेवटीं येणारी उषा या दोन्ही कित्येक दिवसपर्यन्त अखंड रहातात. आपल्या इकडे हिंवाळा उन्हाळा वगैरे ऋतु होतात; परंतु ध्रुवप्रदेशांत हिंवाळ्यांत अखंड दीर्घ रात्र असते, आणि उन्हाळ्यामध्यें प्रथम दिवसांपेक्षां रात्र मोठी असून चोवीस तासांपेक्षां कमी असते, आणि पुढें दिवस हळू हळू मोठा होत जाऊन शेवटीं त्याचा अखंड दीर्घ दिवस होतो. प्रस्तुत ध्रुवावरील हवा अतिशय थंड व कडक आहे. पण प्राचीन काळीं ती प्रस्तुतहून फार भिन्न होती याविषयीं मागील भागांत विवेचन झालेंच आहे. ह्मणून या भेदाभेदविवेचनांत हवेचा विचार करण्याचें कारण नाहीं.

येथपर्यन्त केलेल्या विवेचनावरून आपल्याला असें आढळून येईल कीं, या विशिष्ट गोष्टींचे दोन पृथक् जोड आहेत. एक खुद्द ध्रुवस्थ लोकांस दिसणारा व दुसरा ध्रुव व उत्तरवृत्त यांच्यामध्यें ह्राणाऱ्या लोकांस दिसणारा. सोयीसाठीं या दोन जोडांस ध्रुवविशिष्ट गोष्टी व ध्रुवमंडळाविशिष्ट गोष्टी अशीं अनुक्रमें नावें देऊन त्यांचा थोडक्यांत सारांश देऊं.

१ ध्रुवविशिष्ट गोष्टी.

(१). सूर्य दक्षिणेस उगवतो.

(२). तारा उगवत किंवा मावळत नाहींत; तर क्षितिजसमान्तर पातळ्यांत त्या वाटोळ्या फिरून चोवीस तासांत एक प्रदक्षिणा पुरी करतात. या ठिकाणीं उत्तर खगोलार्ध मात्र नेहमीं क्षितिजावर असून सबंद वर्षभर दिसत असतें, परंतु खालचें ह्मणजे दक्षिण खगोलार्ध कधींही दिसत नाहीं.

(३) सहा महिन्यांचा एक अखंड दिवस व तितकीच एक अखंड रात्र मिळून तेथलें एक वर्ष होतें.

(४). तेथें वर्षांतून एकच सकाळ व एकच संध्याकाळ असते, ह्मणजे सूर्य तेथें वर्षांतून एकदांच उगवतो व एकदांच मावळतो. परंतु तेथला संधिप्रकाश—मग तो सकाळचा असो कीं संध्याकाळचा असो—सारखा दोन महिने, ह्मणजे चोवीस तासांचा एक अवधि अशा ६० अवधींइतका असतो. हा रक्त संध्याप्रकाश आपल्या इकडीलप्रमाणें फक्त पूर्वेस (सकाळीं) किंवा पश्चिमेस (संध्याकाळीं) असा एका ठिकाणींच न दिसतां, क्षितिजावर सारख्या वाटोळ्या प्रदक्षिणा करीत असतो. हा त्याच्या प्रदक्षिणेचा क्रम सूर्यबिंब क्षितिजावर येई तोंपर्यंत चालू असतो; आणि नन्तर सूर्यही हा क्रम पुढें सहा महिने चालू ठेवतो; ह्मणजे तोही दर चोवीस तासांत एक याप्रमाणें पहाणाऱ्याच्या मोंवतीं प्रदक्षिणा करीत रहातो; आपल्या इकडीलप्रमाणें चोवीस तासांनीं उगवत किंवा मावळत नाहीं.

२ ध्रुवमंडळविशिष्ट गोष्टी.

(१). सूर्य नेहमीं पहाणाऱ्याच्या खस्वस्तिकाच्या दक्षिणेस असेल, परंतु समशीतोष्ण कटिबंधांतही ही गोष्ट प्रत्ययास येत असल्यामुळें तिला विशेष असें मानतां येत नाहीं.

(२). या ठिकाणीं बऱ्याच तारा नेहमीं क्षितिजावर राहून ध्रुवतारेभोंवतीं प्रदक्षिणा करतात, ह्मणून त्या सतत दिसत असतात. बाकीच्या तारा समशीतोष्ण कटिबंधांतल्याप्रमाणें उगवतात व मावळतात; पण त्यांचे फिरण्याचे मार्ग जास्त तिरके असतात.

(३). येथें वर्षाचे तीन भाग असतातः—(१) एक अखंड दीर्घ रात्र; ही मकर संक्रमणाचे वेळीं होऊन विवक्षित ठिकाणच्या अक्षांशाच्या मानानें ती चोवीस तासांहून मोठी व सहा महिन्यांहून लहान अशी असते; (२) या दीर्घ रात्रीचे जोडीला एक अखंड दीर्घ दिवस; हा कर्क संक्रमणाचे वेळीं होतो; (३) आणि बाकीच्या वर्षाच्या भागांत साध्या रात्रिदिवसांचें एक चक्र; यांपैकीं रात्रदिवस मिळून होणारा काल चोवीस तासांहून जास्त नसतो. दीर्घ रात्रीच्या मागाहून येणारा दिवस, तेव्हांपासून

होणाऱ्या अहोरात्रांतील रात्रीपेक्षां लहान असंतो व पुढें तो मोठा होत होत त्याचा वर सांगितलेला दीर्घ दिवस होतो. या दीर्घ दिवसामागून येणारी रात्र, तेव्हांपासून पुनः सुरू होणाऱ्या अहोरात्रांतील दिवसापेक्षां लहान असते, व पुढें मोठी होत होत ती वर सांगितलेल्या दीर्घ रात्रीला मिळण्याच्या वेळीं वर्ष संपतें.

(४). या दीर्घ रात्रीच्या शेवटीं येणारी उषा कित्येक दिवसपर्यंत सारखी रहाते. परंतु हा तिचा अवधि तसेंच तिचा तेजस्वीपणा हे ठिकठिकाणच्या अक्षांशाच्या मानानें ध्रुवावरील उषेच्यापेक्षां कमी असतात. ध्रुवापासून थोड्याशा अंशापर्यंतच्या प्रदेशांत चक्राकार फिरणाऱ्या उषःकाळच्या तेजाचा देखावा त्याच्या एकंदर अवधीपैकीं बराच वेळ दिसत रहातो. पण साध्या अहोरात्रांच्या दरम्यान येणाऱ्या उषा इतर ठिकाणांसारख्याच एक दोन तास मात्र रहातात. अखंड दीर्घ दिवसामध्यें सूर्य क्षितिजावर असतांनां ध्रुवावर फिरतो त्या प्रमाणेंच पहाणाराच्या भोंवतीं फिरत असतो; परंतु तेथच्या प्रमाणें त्याच्या प्रदक्षिणा येथें क्षितिजसमान्तर न होतां बऱ्याच तिरक्या होतात. अखंड दीर्घ रात्रीं तो सारखा क्षितिजाखालीं असल्यामुळें मुळींच दिसत नाहीं; आणि राहिलेल्या संवत्सरभागांत उगवून मावळून चोवीस तासांपैकीं कांहीं वेळ तरी तो क्षितिजावर येतो; हा वेळ अर्थात् अक्षांशाच्या मानानें कमजास्त असतो.

येणेंप्रमाणें आपलेजवळ विशिष्ट गोष्टींचे दोन जोड झाले. एक ध्रुवसंबंधी व दुसरा ध्रुवप्रदेशसंबंधी. या गोष्टी पृथ्वीच्या दुसऱ्या कोणत्याही भागीं दिसावयाच्या नाहींत; शिवाय पृथ्वीचे ध्रुव खरोखरच ध्रुव (अचल) असल्यामुळें लाखों वर्षांपूर्वी ते जे होते तेच आजही आहेत,आणि ह्मणून या विशिष्ट गोष्टी सर्व काळांनां लागू पडणाऱ्या आहेत. चतुर्थ युगाच्या पूर्वार्धांत ध्रुवावरील हवेंत केवढाले मोठे जरी फरक झाले असले तरी या गोष्टी आज आहेत तशाच तेव्हांही होत्या. थोडक्यांत सांगावयाचें ह्मटलें तर या गोष्टी प्रस्तुत विषयाला लागणाऱ्या वैदिक कथांच्या परीक्षणामध्यें इष्ट स्थानाची बिनचुक वाट दाखविण्याच्या कामीं आपल्या उपयोगी पडतील. या गोष्टींपैकीं एखादी गोष्ट आपल्याला वेदांतील वर्णनांत किंवा कथेंत आढळली तर तें वर्णन अथवा

ती कथा मूळची ध्रुवसंबंधी आहे व वैदिक ऋषींनीं जरी ती प्रत्यक्ष पाहिलेली. नसली तरी वंशपरंपरागत जशाच्या तशाच आलेल्या दंतकथांवरून तरी ती त्यांनां माहीत होती असें आपण बेलाशक समजावें. सुदैवानें असल्या प्रकारचे उल्लेख व वाक्यें वैदिक वाङ्मयामध्यें भरपूर आहेत. सोयीसाठीं आपण त्यांचे दोन भाग करूं. पहिल्या भागांत दीर्घ रात्र व दीर्घ उषा यांचें प्रत्यक्ष वर्णन देणारीं अथवा त्यांचा स्पष्ट उल्लेख करणारीं वाक्यें येतील, आणि दुसऱ्यामध्यें पहिल्यांतील गोष्टींचा अप्रत्यक्ष उल्लेख करून त्यांना बळकटी आणणाऱ्या कथा वगैरे येतील. पहिल्या भागांतील पुरावा प्रत्यक्ष असल्यामुळें अधिक खात्रीलायक आहे, ह्मणून त्याचें प्रथम विवेचन करूं व मग वैदिक कथांच्या विचाराकडे वळूं.

प्रकरण ९ वें.

देवांची रात्र.

वैदिक याग--चांद्रसौर कालमानानें त्यांचें नियमन केलें होतें-तैत्तिरीय संहितेंतील सहा ऋतूंचें आणि बारा महिन्यांचें वर्ष-अधिकमास-ऋग्वेदांतही हेंच कालमान आढळतें-वैदिक कथांच्या परीक्षणावरून काढिलेलीं सध्यांचीं अनुमानें-त्या सर्वांत आर्यांचें मूलवसतिस्थान शीतोष्ण किंवा उष्ण कटिबंधांत होतें अशी पूर्वकल्पना आहे-आणखी शोधांची आवश्यकता-ऋग्वेदाच्या विशिष्ट स्वरूपाचें स्पष्टीकरण-ध्रुवविशिष्ट गोष्टी ऋग्वेदांत सांपडतात-इंद्रे आकाशाला अक्षावर तोलून चक्राकार फिरवतो अशी कल्पना-सहा महिन्यांचा दिवस आणि सहा महिन्यांची रात्र-देवांची रात्र व देवांचा दिवस यांचा अवधि प्रत्येकीं अर्धवर्ष आहे-तत्संबंधीं सूर्यसिद्धान्त व इतर प्राचीन सिद्धांतग्रंथ यांत उल्लेख आढळतो-भास्कराचार्यांची चूक व तिचा उलगडा-देवांच्या दिवसारात्रीविषयीं मनूचें वाक्य-त्यांचा यास्कानें केलेला उल्लेख-मेरू ऊर्फ उत्तरध्रुवाचें महाभारतांतील वर्णन-मेरूचें तैत्तिरीय आरण्यकांतील वर्णन-तैत्तिरीय ब्राह्मणांतील देवांच्या दिवसासंबंधाचें वाक्य-तें प्रत्यक्षानुभवावरून लिहिलें असें मानिल्याशिवाय त्याचा उलगडा होत नाहीं-या वाक्याला समनार्थक असें पारशी वेंदिदादांतील वाक्य-संदर्भावरून या वाक्यांचा संबंध ध्रुवाशींच असला पाहिजे असें स्पष्ट दिसतें-ऐर्यन वइजो मधील यिमाचा वर-तेथें सूर्य वर्षांतून फक्त एकदांच उगवतो व मावळतो-ऋग्वेदांतील देवयान आणि पितृयाण-त्यांचा संबंधही देवाच्या दिवसरात्रीप्रमाणें संवत्सराच्या प्राचीन विभागाशींच असावा-पारशी धर्मग्रंथांतील मरदाचा मार्ग (यान)--पितृयाणांत आलेल्या मरणाचा अशुभपणा-त्यासंबंधानें बादरायण व्यासांचें मत-त्याचा एक शक्य दिसणारा खुलासा-पारशी धर्मग्रंथांतील हिंवाळ्यांत ऊर्फ पितृयाणांत आलेल्या मरणासंबंधानें विचारणा-तीवरून अस्सल काळेखाच्या दीर्घावधि रात्रीचा बोध होतो-ग्रीक कथांतील साम्य-नॉर्स पुराणांतील देवांची उषा-त्यांवरून अर्धवर्षावधि अशा देवांच्या रात्रीदिवसाची कल्पना केवळ हिंदीपारसीक नसून हिंदीजर्मनीय आहे असें अनुमान होतें-ही गोष्ट ध्रुवावरील वसतीची स्पष्ट द्योतक आहे.

देवांची रात्र.

वैदिक वाङ्मयमंदिराच्या द्वारांत पाऊल ठेवतांच तेथें फार व्यवस्थित रीतीनें वसविलेली यज्ञपद्धति आपल्या दृष्टीस पडते. हे यज्ञ चांद्रसौर कालमानांनीं उत्तम रीतीनें नियमित केलेले होते, आणि त्यांवरून वैदिक ऋषींची ज्योतिश्शास्त्रामध्यें बरीच प्रगति झाली होती असें दिसतें. त्या वेळीं दैनिक, पाक्षिक, मासिक, त्रैमासिक, षाण्मासिक व वार्षिक यज्ञ होते व त्यांचा कालमान दाखविण्याकडेही तेव्हां उपयोग होत असे. तौत्तिरीय संहिता व ब्राह्मणें यांमध्यें तीस दिवसांचा चांद्रमास व अशा बारा महिन्यांचें वर्ष यांचा स्पष्ट उल्लेख आहे. चांद्रसौर मानांचा मेळ बसविण्यासाठीं एक अधिक महिनाही तेव्हां धरीत असत. क्रान्तिवृत्ताचे (राशिचक्राचे) २७ किंवा २८ भाग करून त्यांना नक्षत्रें म्हणत व सूर्याच्या वार्षिक प्रदक्षिणेच्या मार्गाची तसेंच चंद्राच्या दर महिन्याला पृथ्वीभोंवतीं होणाऱ्या प्रदक्षिणेच्या मार्गाची खूण धरण्यासाठीं या नक्षत्रांचा उपयोग करीत असत. वेदकालीन आर्यांस अयनबिन्दु, संपातबिन्दु, तसेंच उत्तरायण व दक्षिणायन यांची चांगली माहिती होती. वर्षाचे सहा ऋतु करून प्रत्येकांतील सणवारांचे दिवसही त्यांनीं पक्के निश्चित केलेले होते. सूर्याबरोबर उगवणाऱ्या व मावळणाऱ्या तारांचें ते नीट निरीक्षण करीत. त्या काळाच्या मानानें शक्य तितक्या रीतीनें पूर्वपश्चिम बिन्दूही त्यांनीं नक्की केले होते. त्या लोकांना संपताच्या चलनाचीही माहिती होती. संपातचलनाच्या त्यांच्या उल्लेखांवरून वेदांच्या निरनिराळ्या भागांचें वर्गीकरण करणें कसें शक्य आहे यांचें विवेचन "वेदकालनिर्णयांत" आलेंच आहे. या वर्गीकरणाप्रमाणें पहातां तैत्तिरीय संहिता कृत्तिकाकालांत (शकापूर्वी २५०० वर्षें) घालावी लागते. यावरून कोणाला असें वाटेल कीं वर दिलेल्या गोष्टींचें ज्ञान वेदकालाच्या उत्तर भागांतील ग्रंथांतच कायतें दिसून येतें. परंतु ऋग्वेदाचें थोडें बहुत निरीक्षण करणारासही त्यामध्यें ३६० दिवसांचें वर्ष, त्यांत कधीं कधीं

मिळविण्यांत येणारा अधिमास* किंवा बारा चांद्रमासांचें वर्ष व प्रतिवर्षाच्या शेवटीं धरावयाचे बारा अधिक दिवस§ यांचे उल्लेख आढळून येतील. वसंतसंपातापासून शरत्संपातापर्यन्तचा सूर्याचा उत्तरेकडील मार्ग व शरत्संपातापासून वसंतसंपातापर्यन्तचा त्याचा दक्षिणेकडचा मार्ग यांचाही ऋग्वेदांत कित्येक ठिकाणीं **देवयान** व **पितृयाण** या नांवांनीं उल्लेख केलेला आहे.[1] यावरून ऋग्वेदकालीन कालमापनपद्धति (पंचांग) तैत्तिरीय संहिताकालांतील पद्धतीहून तर फारच थोडी भिन्न होती असें दिसून येतें. आतां बारा महिन्यांचें वर्ष अथवा वर्षाचे सहा ऋतु अशी पद्धति समशीतोष्ण कटिबंधांत व उष्ण कटिबंधांतच कायती शक्य आहे. म्हणून वर सांगितलेल्या गोष्टींवरूनच जर पहावयाचें असेल, तर ही पद्धति ज्या लोकांत चालू होती ते लोक समशीतोष्ण किंवा ऊष्ण कटिबंधांत म्हणजे ज्या ठिकाणीं सूर्य वर्षाच्या ३६० दिवसांपैकीं प्रत्येक दिवशीं थोडा वेळ तरी क्षितिजावर दिसतो अशा ठिकाणीं रहात होते असें म्हटलें पाहिजे. वैदिक कथांचा प्रस्तुत शास्त्रीयपद्धतीनें जो विचार आजपर्यन्त झाला आहे त्यावरूनही याच मताला आधार मिळतो. वृत्र म्हणजे अवर्षणाची किंवा काळोखाची देवता असें हे गाथाशास्त्री मानितात, आणि कित्येक कथा, प्रकाश आणि काळोख, उन्हाळा व हिंवाळा, दिवस व रात्र यांच्या देवता अथवा इन्द्र व मेघ यामध्यें होणाऱ्या झटापटीच्या बोधक आहेत अशा कल्पनेवर त्यांचा अर्थ लावितात. बंगलूरचे नारायण अय्यंगार यांनीं असल्या कित्येक कथांचा नाक्षत्रोपपत्तिपर अर्थ लावून, त्या कथांचा कल वैदिक सुधारणेच्या अत्यन्त प्राचीनकाळीं वसंतसंपात मृगशीर्ष पुंजांत होता

---

* वेद मासो धृतव्रतो द्वादश प्रजावतः । वेदा य उपजायते । ऋ० १,२५,८.

अर्थः—व्रत धारण करणारा वरुण प्रजायुक्त बारा महिने जाणतो, आणि (संवत्सरासमीप) उत्पन्न होणारा मासही जाणतो.

§ द्वादश द्यून्नगोह्यस्यातिथ्ये रणन्नृभवः ससंतः । ऋ, ४,३३,७,

१ वैदिक कालांतील लोकांचें ज्योतिःशास्त्रविषयक ज्ञान किती होतें हें सविस्तर पहावयाचें असेल तर कै. दीक्षितकृत ' भारतीय ज्योतिःशास्त्र ' या पुस्तकाचें ' वैदिक काल ' हें प्रकरण पहावें.

असें दाखविण्याकडे आहे असें सिद्ध केलें आहे. परंतु या सर्व कल्पनांत व अर्थ करण्याच्या पद्धतींत प्राचीन वैदिक आर्य लोक समशीतोष्ण किंवा उष्ण कटिबंधांतच कोठें तरी रहात होते आणि वेदांतील सर्व गोष्टींचा व दंतकथांचा जन्म व त्यांची वाढ अशाच ठिकाणीं झाली, असें गृहीत धरलेलें आहे.

वैदिक लोकांचें मूलस्थान व त्यांच्या पुराणकथांचें प्राचीनत्व यासंबंधानें, व्युत्पत्तिशास्त्र, गाथाशास्त्र, कालमापनपद्धति इत्यादिकांच्या साह्यानें केलेल्या वेदग्रंथांच्या परीक्षणावरून वरीलप्रमाणें माहिती मिळते. परंतु या दिशेनें विचार करणारापुढें साहजिकच असा प्रश्न उभा रहातो कीं वरील प्रकारच्या शोधांची मजल येथेंच थांबते कीं काय? ऋग्वेदांतील सगळ्या देवता, गोष्टी, दंतकथा वगैरे एकाच काळीं उत्पन्न झाल्या असें मानणें चुकीचें आहे हें संपातचलनाच्या उल्लेखांवरून स्पष्ट दिसून येत आहे. ऋग्वेदाची रचना कालक्रमवार केलेली नसल्यामुळें त्यांतील एकामागची एक गोष्ट घेऊन तिचा स्वतंत्र विचार करतां येणें शक्य नाहीं. प्राचीनकाळाच्या निरनिराळ्या भागांतील गोष्टी त्यांत इतक्या विलक्षण रीतीनें एकत्र मिसळून गेलेल्या आहेत कीं त्यांचा कालानुक्रम लावण्यास किती तरी काळ दीर्घ प्रयास केला पाहिजे. हें काम फार कठीण आहे इतकेंच नव्हे तर कित्येक बाबतींत अशक्यही आहे. तथापि प्रत्येक पिढीनें शक्य तितकी मेहनत करून पुढील पिढीचें ह्या संबंधाचें काम होईल तितकें कमी करून ठेविलें पाहिजे; व तसें केल्यास कालान्तरानें तरी शास्त्रीय ज्ञानाच्या वाढीबरोबर उत्तरोत्तरच्या पिढयांना हें काम अधिकाधिक सुलभ होत जाईल. असो. तर वैदिक कालमापनपद्धतीमध्यें आजपर्यंत जरी ध्रुवाजवळील वसतिस्थानाचा मागमूस आढळला नाहीं, तरी त्यांतल्याच आजपर्यंत क्षुल्लक म्हणून टाकून दिलेल्या गोष्टींचें आधुनिक शास्त्रीय शोधांच्या अनुरोधानें परीक्षण केल्यास बऱ्याच महत्वाच्या गोष्टी कळून येण्यासारख्या आहेत. म्हणून ऋग्वेदांतील चांद्रसौरमानाचें वर्ष पाहूनच केवळ आपण आपल्या शोधांपासून निवृत्त होतां कामा नये. ध्रुवप्रदेशाला विशिष्ट असलेल्या गोष्टी मागें सांगितल्याच आहेत. त्या आपल्यापुढें असलेल्या वेदवाक्यांनां व कथांनां कितपत लागू पडतात हेंच फक्त आतां पहावयाचें आहे.

खगोलाचें छत्रीसारखें फिरणें ही गोष्ट ध्रुवबिन्दुविशिष्ट आहे; व जर वैदिक लोक किंवा त्यांचे पूर्वज कधींकाळीं तेथें राहिलेले असतील, तर त्यांच्या दंतकथांत ती आढळली पाहिजे. त्याप्रमाणें पहातां अशा अर्थाचीं वाक्यें ऋग्वेदांत आढळतात. **यो अक्षेणेव चक्रिया शचीभिर्विष्वक्तस्तंभ पृथिवीमुतद्याम्** । (ऋ. १०,८९,४.) 'ज्याप्रमाणें आस चक्रांना धरितो, त्या प्रमाणें जो आपल्या शक्तीनें पृथ्वीला आणि आकाशाला पृथक् धरून ठेवितो; **अवंशे द्यामस्तभायत्** (ऋ. २,१५,२.) 'काठीशिवाय आकाशाला धरून ठेविलें;' **य इमे द्यावापृथिवी जजान उर्वी गभीरे रजसी सुमेके अवंशे धीरःशच्या समैरत्** । (४,५६,३.) 'जो या विस्तीर्ण द्यावापृथ्वीला उत्पन्न करून त्या सुंदर व विस्तीर्ण लोकांस स्तंभाशिवाय आपल्या शक्तीनेंच प्रेरिता झाला;' **स सूर्यः पर्युरू वरांस्येंद्रोववृत्याद्रध्येव चक्रा** । (१०,८९,२.)'तो सूर्यरूपी इन्द्र विशाल विस्ताराला (तारागण युक्त आकाशाला) रथाच्या चाकांप्रमाणें वाटोळें फिरविता झाला.' यांतील शेवटच्या वाक्यातील तारगणयुक्त आकाशाची चक्राकार गति, व इतरांतील त्याचें स्तंभाशिवाय धरून ठेवणें, या गोष्टींचा एकत्र विचार केल्यास ही स्थिति ध्रुवावर रहाणाऱ्याच्याच कायती दृष्टीस पडणारी आहे असें स्पष्ट दिसून येईल; कारण शीतोष्ण व उष्ण कटिबंधांतही जरी नक्षत्रांची चक्राकार गति दिसून येत आहे तरी स्तंभाशिवाय आकाशाला या चक्राकारगत्यनुसार सांवरून धरण्याची कल्पना तेथें शक्य नव्हे; ती फक्त ध्रुवावरच उत्पन्न होणारी आहे. **अमी य ऋक्षा निहितास उच्चा नक्तं ददृश्रे कुहचिद्दिवेयुः** । (ऋ. १, २४, १०.) यांत [आकाशाच्या] 'उच्च प्रदेशीं ठेविलेले हे जे ऋक्ष (सप्तर्षि) ते रात्रीं दिसतात आणि दिवसास कोठें तरी जात असतात' असें म्हटलें आहे. ह्यांत सप्तर्षींच्या उंचीचाच संबंध असल्यामुळें 'उच्च प्रदेशीं ठेविलेले' या शब्दावरून ते त्यावेळीं पहाणाराच्या डोक्यावर असले पाहिजेत हें उघड दिसतें. ही सप्तर्षींची स्थितीही उष्ण व समशीतोष्ण कटिबंधांतील नसून ध्रुवमंडलांतीलच आहे. ऋग्वेदामध्यें नक्षत्रें किंवा आकाश यांच्या गतीचें वर्णन करणारीं इतर वाक्यें फारशीं नसल्यामुळें ध्रुवविशिष्ट दुसरी गोष्ट जी सहा महिन्यांचा दिवस व सहा महिन्यांची रात्र तिजकडे आतां वळूं.

देवांचा दिवस व रात्र हीं सहा सहा महिन्यांचीं असतात ही कल्पना आपल्या वाङ्मयामध्यें इतकी प्रसिद्ध आहे कीं तिचा उल्लेख पूर्वापर सर्व ग्रंथांत आलेला आहे. पुराणग्रंथ तसेच ज्योतिषग्रंथ यांत त्यांचें वर्णन आहे. ज्योतिष्यांचा उत्तरध्रुव ह्मणजेच पुराणांचा मेरु पर्वत. सूर्यसिद्धांतामध्यें मेरूवर देव सूर्याला मेषराशीपासूनच्या अर्ध्या प्रदक्षिणेंत एकदांच उगवलेला पहातात असें ह्मटलें आहे. पुराणांतील वर्णनाप्रमाणें देवांचें घर मेरूवर आहे; याकरितां त्यांच्या सहा महिन्यांच्या रात्रिदिवसांसंबंधाच्या वाक्यांचा उलगडा सहज होतो; व तो सर्वप्रकारच्या पंडितांनां मान्यही आहे. देवांचा दिवस (देवयान) ह्मणजे वसंतसंपातापासून शरत्संपातापर्यंतचा सूर्याचा मार्ग. याच काळांत सूर्य उत्तरध्रुवप्रदेशावर दिसत असतो. तसेंच शरत्संपातापासून पुनः वसंतसंपातापर्यंतचा सूर्याचा मार्ग ह्मणजे देवांची रात्र. कारण त्यावेळीं सूर्य उत्तरध्रुवावर दिसत नाहीं. परंतु हा अर्थ लक्षांत न आल्यामुळें सिद्धान्तशिरोमणिकार भास्कराचार्य यांनीं उत्तरायण ह्मणजे देवांचा दिवस कसा? असा प्रश्न* विचारिला आहे. कारण त्यांच्या वेळीं उत्तरायणाचा अर्थ मकर संक्रमणापासून कर्कसंक्रमणाचा काळ असा होता; व या सर्व काळांत कांहीं मेरूवर ह्मणजे उत्तरध्रुवावर सूर्य दिसत नसतो. परंतु उत्तरायणाचा पूर्वीचा खरा अर्थ न समजल्यामुळेंच भास्करचार्यांची ही चूक झालेली आहे. कारण उत्तरायणाचा खरा अर्थ पाहिल्यास उत्तरायण ह्मणजे देवांचा दिवस कसा हें सहज समजतें. देव ह्मणजे देवासारखे मानलेले मनुष्यांचे मृतपूर्वज असा कित्येक जण अर्थ समजतात. परंतु तसें करण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण आपले पूर्वज जर कधींकाळीं उत्तरध्रुवावर राहिलेले असतील, तर त्यांचे देवही अर्थात् तेथलेच असले पाहिजेत. पुढील एका भागामध्यें वैदिक देवतांच्या ध्रुवविशिष्ट लक्षणांविषयीं विशेष विवेचन यावयाचें आहे. सध्या प्रस्तुत प्रश्नांत देव ह्मणजे कांहींही समजलें तरी अडचण नाहीं. मुख्य मुद्दा त्यांत ध्रुवविशिष्टपणा आहे कीं नाहीं हें पहाण्याचा आहे. तेवढा साधला ह्मणजे आपलें काम झालें.

---

* या प्रश्नाचें सविस्तर विवेचन **वेदकालनिर्णय** पान ११–१५ यांत केलें आहे.

यासंबंधाचा दुसरा आधार मनुस्मृतीमध्यें अ० १ श्लो. ६७ यांत आहे. त्यांत **दैवे रात्र्यहनी वर्ष प्रविभागस्तयो पुनः । अहस्तत्रोदगयनं रात्रिःस्याद्दक्षिणायनम् ।** ' वर्ष ह्मणजे देवांचें एक अहोरात्र, त्यांत दिवस म्हणजे उत्तरायण व रात्र म्हणजे दक्षिणायन ' असें म्हटलें आहे. कालविभागप्रकरणांत हा मजकूर आला आहे. या देवांच्या अहोरात्राच्या मानावरच त्यांत पुढें कल्पादि कालगणना केलेली आहे. पुराणांतही या कल्पनेची चांगली वाढ झालेली दृष्टीस पडते. म्हणजे अगदीं वैदिककालापासून तों तहत पुराणांपर्यंत या गोष्टींचे उल्लेख आढळून येत आहेत, आणि म्हणून ती मूळ प्रत्यक्ष पाहिल्यावरूनच रूढ झाली असली पाहिजे असें म्हणणें भाग पडतें. असो; महाभारतामध्येंही वनपर्वांत मेरुपर्वताचें वर्णन इतकें उत्तम दिलें आहे कीं त्यावरून मेरु व ध्रुव यांच्या एकत्वाविषयीं अगदीं शंका रहात नाहीं. अर्जुन मेरुपर्वतावर गेला होता त्या वेळच्या सफरीचें तें वर्णन आहे. त्यांत म्हटलें आहे कीं, ' मेरूवर सूर्य, चंद्र व सर्व तारा प्रतिदिवशीं त्याच्या भोंवतीं प्रदक्षिणा करीत फिरतात. ' *तसेंच पुढें आणखी वर्णन आहे, तें असें—' हा पर्वतराज आपल्या स्वतःच्या तेजानें व त्यावरील वनस्पतींच्या प्रभावानें काळोखाचा नाश करीत असल्यामुळें तेथें रात्र व दिवस यांमध्यें भेदच दिसत नाहीं. ' तसेंच आणखी पुढें ' तेथील लोकांचें अहोरात्र वर्षांशीं समान झालें ' असें म्हटलें आहे. या वर्णनावरून एवढें दिसून येईल कीं, महाभारताची रचना झाली त्या वेळीं ग्रंथलेखकांनां उत्तरध्रुवविशिष्टगोष्टींचें सूक्ष्मज्ञान होतें. इतकें ज्ञान त्यांस गणित व ज्योतिष यांच्याच केवळ साहाय्यानें झालेलें होतें असें संभवत नाहीं.

---

* एनं त्वहरहर्मेरुं सूर्याचंद्रमसौ ध्रुवम् । प्रदक्षिणमुपावृत्य कुरुतः कुरुनन्दन ॥
ज्योतींषि चाप्यशेषेण सर्वाण्यनघ सर्वतः । परियान्ति महाराज गिरिराजं प्रदक्षिणम् ॥ व० अ. १६३.

स्वतेजसा तस्य नगोत्तमस्य महौषधीनां च तथा प्रभावात् ।
विभक्तभावो न बभूव कश्चिदहोनिशानां पुरुषप्रवीर ॥
बभूव रात्रिर्दिवसश्चतेषां संवत्सरेणैव समानरूपः ॥

व० अ० १६४.

एकदां केव्हांतरी प्रत्यक्ष पाहिलेल्याच गोष्टी परंपरागत त्या काळीं ज्ञात होत्या. या वर्णनांत त्या पर्वताच्या तेजाचा जो उल्लेख आला आहे तो विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे. कारण तें तेज म्हणजे ध्रुवप्रदेशावर दिसणारा " अरोरा बोरियालिस " ऊर्फ उदीच्चीन [उत्तरे कडील] उषाप्रकाशच होय. तर याप्रमाणें वेदकालानन्तरच्या ग्रंथांत सहा महिन्यांच्या रात्रीदिवसांचा उल्लेख आणि तसेंच मेरुपर्वताचें सविस्तर वर्णन हीं इतकीं स्पष्ट आहेत कीं, ही गोष्ट फार प्राचीन काळापासून परंपरागत आलेली असून ती केव्हां तरी एकदां प्रत्यक्ष पाहिलेली असली पाहिजे असें मानणें भाग येतें, व वैदिकग्रंथांतही तिचा उल्लेख असल्यामुळें असें मानण्याला चांगलाच आधार मिळतो.

तैत्तिरीय आरण्यकामध्यें " मेरुपर्वत हा सप्त आदित्यांचें स्थान असून, आठवा आदित्य जो कश्यप तो महामेरूला सोडून कधींही जात नाहीं, व त्या सप्त आदित्यांना प्रकाश देऊन पर्वतालाही प्रकाशमान करितो " असें वर्णन आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत तर **एकं वा एतद्देवानामहः यत्संवत्सरः** । म्हणजे " ज्याला संवत्सर म्हणतात तो देवांचा एक दिवस " असें स्पष्टच म्हटलेलें* आहे. [टिळक म्हणतात] अशा अगदीं स्पष्ट वाक्यावरही एका काळीं कांहीं विशेष प्रकारचें अनुमान करण्याचें धाडस आमच्यानें झालें नाहीं. ब्राह्मणांतील या वचनाच्या जोडीला संहिताग्रंथांत कांहीं आधार न मिळाल्यासुळें उत्तरायण व दक्षिणायन यांना अनुक्रमें देवांचा दिवस व देवांची रात्र असें बहुधा लक्षणेनें म्हटलें असावें असें वाटत होतें. परंतु त्यानंतर केलेल्या शोधांवरून या वचनांचा ध्रुवाशीं संबंध आहे असें अनुमान करणें अगदीं भाग पडलें. या अनुमानांविषयीं पुरावा पुढील विवेचनांत येणार आहे. या वर दिलेल्या तैत्तिरीय ब्राह्मणांतील वचनावर कित्येक शंका येण्यासारख्या आहेत. तें केवळ कल्पनेनेंच लिहिलें असेल, किंवा अलंकारिक असेल अथवा ज्योतिष्यांनीं मागाहून आपल्या ज्योतिषशास्त्राच्या ज्ञानानें अंदाजानें त्याविषयीं अनुमान करून पुढें त्याला प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टीसारखें स्वरूप दिलें असेल; पण या सर्व शंका व्यर्थ आहेत. ही गोष्ट जर केवळ ज्योतिष ग्रंथांतच आढळली असती, तर कदाचित् वरील कल्पनांपैकीं शेवटची कल्पना सयुक्तिक

* तै. ब्रा. ३, ९, २१.

ह्मणतां आली असती. सकृद्दर्शनीं असंभाव्य वाटणाऱ्या गोष्टींचा केवळ ज्योतिषज्ञानावरून सामान्य लोकांस विश्वास पटणें शक्य नाहीं. शिवाय ही गोष्ट वैदिकग्रंथांत आढळून येत असल्यामुळें, वरील कल्पना खरी मानावयास तत्कालीन लोकांस ज्योतिषगणिताचें बरेंच सूक्ष्मज्ञान होतें असें मानावें लागतें. परंतु तें शक्य दिसत नाहीं. हेरोडोटस या ग्रीक इतिहासकाराच्या काळींही (इ. पू. ४५०) 'सहा महिने निजून रहाणारे लोक पृथ्वीवर आहेत ' हें ह्मणणें लोकांना खोटें वाटत असे. अर्थात् हेरोडोटसपूर्वी कित्येक शतकें ही गोष्ट वैदिक ऋषींनीं गणिताच्या आधारावर रचिलेली असणें शक्य नाहीं. ती त्यांनीं किंवा त्यांच्या पूर्वजांनीं प्रत्यक्ष पाहिलेली अशीच असली पाहिजे. पण या सर्व शंका पारशी लोकांच्या धर्मग्रंथांतील याच अर्थाच्या एका वाक्यावरून नाहींशा होण्यासारख्या आहेत. त्यांत **तएच अयर मइन्यएन्ते यत् यरे** म्हणजे ' जें वर्ष त्याला ते दिवस मानतात ' असें म्हटलें आहे. हें वाक्य म्हणजे तै० ब्राह्मणांतील वाक्याचें केवळ रूपान्तर आहे.[1] हें वाक्य ज्या प्रकरणांत आलें आहे त्यांत **अहुरमझ्द** व **यिम** यांच्यामधील संवाद वर्णिला आहे. त्यांत **अहुरमझ्द** हा मनुष्यांचा आदिराजा जो **यिम** त्यास सूचना करितो कीं " भयंकर थंडीचा काल लवकरच येणार आहे; तो बर्फाच्या दाट आवरणाच्या योगानें संपूर्ण जीवसृष्टीचा नाश करणार आहे, तर हे **यिम** ! तूं वनस्पति व प्राणी यांची बीजें जतन करून ठेविण्याकरितां एक वर [घर] बांध. " हा संवाद **अइर्यन वइजो** [इराणी लोकांचें नंदनवन] मध्यें झाला असें म्हटलें आहे. या सूचनेप्रमाणें वर बांधल्यावर **यिमानें अहुरमझ्दास** विचारिलें " हे जगत्प्रभवा ! हे पवित्र पुरुषा ! त्या वरामध्यें प्रकाश पाडावयास दिवे कोठचे ? " त्यावर **अहुरमझ्द** उत्तर करितो " त्या ठिकाणीं सृष्ट आणि असृष्ट असे दीप आहेत. तेथें चंद्र, सूर्य आणि तारका वर्षांतून एकदांच उगवतात व एकदांच मावळतात, आणि सर्व वर्ष एकाच दिवसासारखें दिसतें. " या वाक्यांतील सर्वच गोष्टी मह-

---

१ हें वाक्य अगदीं संस्कृतासारखेंच आहे. **तेच अहर्मन्यन्ते यद्वर्ष** । असें त्याचें संस्कृत रूपान्तर होईल. वर्ष वाचक **यर** शब्दाचें स्वरूप संस्कृतांत दिसत नाहीं. इंग्रजींतील इयर (year) शब्द त्याशीं सरूप दिसतो.

त्वाच्या आहेत. पहिली **अइर्यन वइजो** ऊर्फ इराणी लोकांचें मूल-स्थान, हें हिमावतरणामुळें वसतीला अयोग्य झालें; दुसरी, त्या स्थानीं चंद्र सूर्य वर्षांतून एकदां उगवत व एकदांच मावळत आणि तेथील वर्ष दिवसासारखें होतें. आतां हा मजकूर व तै० ब्राह्मणांतील वर दिलेलें वाक्य यांत किती निकटपणा आहे हे सांगावयास नको च. वरील वर्णना-वरून **अइर्यन वइजो** व **यिमानें** बांधिलेला वर हीं दोन्हीं ध्रुवाजवळच होतीं हें अगदीं उघड दिसून येईल. अवेस्तिक व वैदिक अशा आर्य लोकांच्या दोन्हीं वाङ्मयांमध्यें आढळून येणारी ही गोष्ट केवळ कविकल्पना किंवा ज्योतिष्यांनीं अंदाजानें काढिलेली कल्पना असेल असें संभवत नाहीं तर ती गोष्ट केव्हांतरी प्रत्यक्ष पाहिलेलीच असली पाहिजे.

हा किंवा अशा प्रकारचा दुसरा कांहीं उल्लेख ऋग्वेदामध्यें नाहीं हें खरें; परंतु याला पुष्टी देणारीं दुसरीं पुष्कळ वचनें त्यांत आहेत. प्राचीन वैदिक वर्षाचे **देवयान** व **पितृयाण** असे जे दोन भाग केलेले आढळतात, ते व **उत्तरायण** आणि **दक्षिणायन** हीं पूर्वी एकच होतीं. **देवयान** हा शब्द 'देवांचा मार्ग' या अर्थी ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं आढळतो. ऋ० १,७२, ७ यांत अग्नीला 'देवयान जाणणारा' असें म्हटलें आहे. तसेंच, १,१८३,६ व १,१८४,६, यांत 'हे अश्विन हो, आम्हीं तमाच्या पाराला येऊन पोहोंचलों, आतां देवयान मार्गानें तुम्हीं आम्हांकडे या,' असा मजकूर आला आहे. पुनः ७,७६,२ मध्यें 'देवयान मार्ग मला दिसूं लागला,—उषेचा केतु (निशाण) पूर्व दिशेकडे फडकूं लागलेला दिसत आहे' असें म्हटलें आहे. या वाक्यांवरून देवयानाचा आरंभ उषेच्या उदयापासून म्हणजे काळोख संपल्यावर होत होता, व

---

१. अंतर्विद्वाँ अध्वनो देवयानान् । ऋ. १,७२,७.
अतरिष्म तमसस्पारमस्य प्रति वां स्तोमो अश्विनावधायि ।
एह यातं पथिभि र्देवयानैः । ऋ. १, १८३,६.
प्रमे पंथा देवयाना अदृश्रन्.....अभूदु केतुरुषसः पुरस्तात् ।
ऋ. ७, ७६,२.
परं मृत्यो अनु परेहि पंथां यस्ते स्व इतरो देवयानात् ।
ऋ. १०,१८.१.

याच मार्गानें अग्नि, अश्विनौ, उषा, सूर्य वगैरे प्रातःकालिक देवता आपल्या दिव्य भ्रमणामध्यें फिरत असत हें उघड दिसतें. दुसऱ्या पक्षीं पितृयाणाला देवयानाचा विरोधी किंवा मृत्यूचा मार्ग असें ऋग्वेदांत म्हटलें आहे. यावरून पितृयाणाचा आरंभ काळोख पडल्यावर होत असे असें दिसतें. १०,८८,१५ मध्यें त्या सूक्ताचा ऋषि म्हणतो[1] कीं "मीं फक्त दोनच मार्गांविषयीं ऐकिलें आहे; एक देवांचा व दुसरा पितरांचा." आतां ज्या अर्थीं या प्रत्येक * यानाचे तीन तीन ऋतु असतात असें श० ब्राह्मणांत वर्णन आहे, त्या अर्थीं ते नेहमीचे दिवसरात्र नसून वर्षाचे दोन भाग जे ध्रुवावरील सहा महिन्यांचा दिवस व सहा महिन्यांची रात्र तेच होत. ही भाषा पुढें बदललेल्या स्थानाला जरी अनुरूप नव्हती, तरी ती एकदां रूढ झालेली असल्यामुळें तशीच राहिली. तात्पर्य देवयान-पितृयाणरूपी वर्षविभागाचा वरीलप्रमाणें अर्थ लाविल्यास, तै० ब्राह्मणांतील 'संवत्सर म्हणजे देवांचा एक दिवस होय' या वचनाला त्यावरून चांगला पाठिंबा मिळतो. या देवयानाचा ऊर्फ देवांच्या मार्गाचा पारशी धर्मग्रंथांतही उल्लेख आहे ही गोष्ट येथें सांगितली पाहिजे. त्यामध्यें एके ठिकाणीं "फ्रवशीं (पितृ)नीं चंद्रसूर्यांनीं **मझ्दानें केलेला मार्ग, देवांनीं केलेला मार्ग** दाखविला" असें, व दुसऱ्या एका ठिकाणीं "दएवांच्या (असुरांच्या) त्रासामुळें पुढें न चालतां चंद्रसूर्य हे, फ्रवशी त्यांस मझ्दाचा (देवाचा) मार्ग दाखवीपर्यन्त बराच वेळ थांबून राहिले" असें वर्णन आहे. यावरून मझ्दाचा मार्गही देवयानाप्रमाणें असुरांच्या त्रासांतून सूर्य मोकळा झाल्यावर सुरू होतो असें झालें. म्हणजे हा काळ सूर्य क्षितिजावर असे तोपर्यन्तचा होता हें उघड आहे. याप्रमाणें वैदिक व पारसीक वाङ्मयांची या गोष्टीसंबंधानें एकवाक्यता आहे.

भारतीय व पारसाक धर्मग्रंथांतील सादृश्य येथेंच संपलें असें नाहीं. आपल्याप्रमाणेंच पारशी लोकांमध्येंही पितृयाणासंबंधानें मोठा कटाक्ष

---

१. द्वे स्रुती अशृणवं पितृणामहं देवानामुत मर्त्यानाम् ॥

ऋ. १०, ८८,१५.

* याविषयीं सविस्तर विवेचन वेदकालनिर्णय पान ११–१५ यांत आलें आहे.

आहे. पितृयाणामध्यें ऊर्फ दक्षिणायनामध्यें मरण येणें अशुभ आहे असें आपण समजतों, आणि याच कारणास्तव भारतप्रसिद्ध भीष्माचार्य उदगयन येईपर्यन्त मरावयाचे थांबले [इच्छामरणी असल्यामुळें थांबतां आलें] असें महाभारतांत वर्णन आहे. उपनिषद्ग्रंथांमध्येंही उत्तरायणांत व दक्षिणायनांत मरण पावणाऱ्यांच्या आत्म्यांच्या गतीचें वर्णन करून उत्तरायण ऊर्फ देवयान मार्गाचें श्रेयस्करत्व सांगितलें आहे. हीं सर्व वाक्यें शंकराचार्यांनीं ब्रह्मसूत्र अध्याय ४ पाद २ यांतील ' **रश्म्यनुसारी । १८ । निशि नेति चेन्न, संबंधस्य यावद्देहभावित्वाद्दर्शयतिच । १९ । अतश्चायनेऽपि दक्षिणे । २० । योगिनः प्रति च स्मर्यते स्मार्ते चैते । २१ ।** या सूत्रांवरील आपल्या भाष्यांत दिलीं आहेत. त्यांत जरी सूत्रकारांनीं ' दक्षिणायनांत मरणारास असुखदायक लोक प्राप्त होतो ' असाच या वाक्यांचा अर्थ करण्याचें कारण नाहीं, कारण त्याचा उद्देश केवळ **योग्यांना** विशिष्ट कालीं मेल्यास कोणती गती प्राप्त होते हें सांगण्याचा* आहे, इतरांविषयीं नव्हे, असें आपलें मत दिलें आहे तरी त्यावरून लोकांमध्यें प्रचलित असलेला पितृयाणाविषयीं वरील प्रकारचा विश्वास दिसून येतोच. ह्मणून पितृयाणाचा मूळचा अर्थ जर दीर्घ काळोखाचा काळ असा असेल, तर या कल्पनेचा उलगडा समाधानकारक रीतीनें करतां येईल. पितृयाण ह्मणजे काळोखी दीर्घ रात्र असल्यामुळें मृतमनुष्यांचे अंत्य विधि दिवस ह्मणजे देवयान येईपर्यन्त लांबणीवर पडत. अद्यापसुद्धां रात्रीं मरण येणें जास्त अशुभ समजतात व अशा प्रसंगीं दहनविधीही बहुधा दिवस येईपर्यन्त करीत नाहींत.

पारसी ग्रंथांतील यासंबंधाचें वर्णन अधिक स्पष्ट आहे. त्यांत एके ठिकाणीं ' उन्हाळा जाऊन हिंवाळा आल्यावर जर कोणीं मृत्यु पावला तर **मझ्दाच्या** भक्तानें काय करावें ? ' असा प्रश्न विचारतां **मझ्द** त्यास उत्तर करितो " अशा प्रसंगीं घरांत **कट** (खांच) खणून त्यांत तें

---

* **भ. गी. अ० ८ श्लो. २४–२६ पहा.**

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।
तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥ २४ ॥

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ।
तत्र चांद्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥ २५ ॥

मृतशरीर दोन रात्री, तीन रात्री, किंवा महिनाभरही, ह्मणजे, पक्षी उडूं लागव, वनस्पति वाढूं लागत, प्रवाह सुरु होत, आणि वायू पृथ्वीवरील पाणी शोषूं लागत पर्यन्त, ठेवावें. " सूर्यदर्शन झाल्याखेरीज मृतशरीर गृध्रादि पक्ष्यांच्या हवालीं करण्याची पारशी लोकांत वहिवाट नाहीं या गोष्टीचा विचार करतां वरील वर्णनांतील महिना सवंद काळोखाचा असला पाहिजे असें दिसून येईल. या वर्णनांतील पक्षी उडूं लागण्याचें वगैरे वर्णन ऋग्वेदांतील उषेच्या वर्णनासारखेंच आहे. यावरून भारतीय व पारसीक या दोन्ही धर्मग्रंथांमध्यें या दीर्घ रात्रिदिवसांविषयीं असलेलें ऐकमत्य स्पष्ट होतें.

या गोष्टी इतर आर्य राष्ट्रांच्याही पुराणवाङ्मयामध्यें दिसून येतात. **अनाग्झिमिनिस** नांवाच्या ग्रीक ग्रंथकारानें आकाशाच्या भ्रमणाला 'मनुष्याच्या डोकीवरील टोपीच्या फिरण्याची' उपमा दिली आहे. तसेंच दुसऱ्या एका ग्रीक ग्रंथकारानें 'प्रथम ध्रुवतारा डोक्यावर दिसत असे' असें लिहिलें आहे. **इलियड** आणि **ऑडिसी** या ग्रीक काव्यांतही वर्षांच्या अवधीचा व चोविस तासांच्या अवधीचा अशा दोन प्रकारच्या दिवसांचे उल्लेख आढळतात. नार्वे देशांतील पुराणकथांमध्येंही 'देवांच्या उषेचा' उल्लेख आहे. या पुराणकथा जर खऱ्या असतील तर सहा सहा महिन्यांच्या रात्रिदिवसाची कल्पना फार प्राचीन ह्मणजे भारतीय व यूरोपीय आर्य वेगळे होण्याच्या पूर्वीची असली पाहिजे, व तिचा उगमही आर्यांच्या आदिस्थानांतच झाला असला पाहिजे. तुलनात्मकगाथाशास्त्रावरून आर्यांचें आदिस्थान ध्रुवावर होतें ही गोष्ट चांगली दिसून येते; ह्मणूनच षण्मासावधि रात्रिदिवसांचे उल्लेख वेद आणि अवेस्ता यांतच नव्हे, तर ग्रीक आणि नॉर्स वाङ्मयांतही आढळल्यास आश्चर्य नाहीं. आर्यांच्या सर्व शाखांना ही गोष्ट परंपरागत प्राप्त झालेली आहे, आणि ती स्पष्टपणें ध्रुवविशिष्ट असल्यामुळें केवळ तिच्याच जोरावर आपली उपपत्ति सिद्ध होईल. परंतु सुदैवानें मागें सांगितलेल्या सर्व ध्रुवविशिष्ट गोष्टींचे उल्लेख वेदांत सांपडत असल्यामुळें आपल्या उपपत्तीची इमारत एकाच आधारावर उभारण्याची गरज नाहीं. ध्रुवविशिष्ट दुसरी गोष्ट वर्तुलाकार भ्रमण करणारी उषा ही होय. पुढल्या भागांत ऋग्वेदांतील उषेचें वर्णन ध्रुवावरील उषेला लावल्यानेंच कसें सुगम होतें तें पाहूं.

प्रकरण ५ वें.

वैदिक उषा.

ऋग्वेदांतील मनोहर उषःसूक्तें–उषेचें साम्र व रूपकविरहित स्पष्ट वर्णन–उषेच्या दीर्घावधीच्या सूचक गोष्टी–उषा संपेपर्यंत हजार सूक्तांचा किंवा लागल्यास सर्व ऋग्वेदाचा पाठ करण्याची चाल–उषेचा त्रिप्रकार किंवा पंच-प्रकार भेद– दोहोंवरून दीर्घावधि उषेचें अनुमान होतें–उषस् व व्युष्टि या दोन निराळ्या शब्दांवरूनही तेंच अनुमान होतें–आजपर्यंत नीटपणें न समजलेल्या अशा दीर्घावधि उषेसंबंधाच्या ऋग्वेदांतील वाक्यांचें विवेचन–अरुणोदय आणि प्रत्यक्ष सूर्योदय यांच्या मध्यें जाणारा कित्येक दिवसांचा अवधि–त्याचा ऋग्वेदांतील (७,७६,३) स्पष्ट उल्लेख–यावरील सायणभाष्य ओढाताणीचें असून समाधानकारक नाहीं–सूर्योदयापूर्वी येणाऱ्या अनेक उषा–ऋग्वेदांत कित्येक ठिकाणीं उषेचा अनेकवचनीं प्रयोग केला असल्याचें कारण–अनेकवचनीं प्रयोग केवळ बहुमानार्थी नव्हे–तसाच तो अनेक दिवसांच्या अनेक उषांसंबंधानेंही नव्हे–त्यावरून एकामागून एक येणाऱ्या अनेक उषांच्या कलापाचाच बोध होतो–हें अनुमान तैत्तिरीय संहितेवरून दृढ होतें– तीस वहिणी असा उषांचा उल्लेख–या तीस उषा अखंड एकसारख्या होत्या असें दाखवावयास तैत्तिरीय ब्राह्मणांतील प्रत्यक्ष आधार– तीस उषासंबंधाच्या सायणाचार्यांच्या मतांचें परीक्षण–तीस उषा ह्मणजे एकाच उषेनें टाकलेलीं तीस पावलें असें वर्णन–उषेच्या चक्राकार भ्रमणाचा ऋग्वेदांतील स्पष्ट उल्लेख–प्रतिदिनीं त्या एकाच ठरींव ठिकाणीं येतात असें वर्णन–या सर्वांवरून तीस उषांच्या अखंड कलापाचाच बोध होतो–एकंदर विवेचनाचें तात्पर्य–त्यावरून या उषा ध्रुवस्थानीय होत असें सिद्ध होतें–उषेच्या दीर्घावधींत होणारे फेरबदल–उषेच्या रथाचा इन्द्रानें चुराडा केला या कथेचा अर्थ–उषेसंबंधाच्या या गोष्टी पूर्वयुगांतील होत असें सांगणारीं स्पष्ट वचनें–वैदिक उषांचें वर्णन ध्रुवालाच लागू पडणारें आहे.

वैदिक उषा.

ऋग्वेदामध्यें षण्मासावधीच्या रात्रिदिवसांविषयीं स्पष्ट उल्लेख नाहींत; तरी हा उणेपणा पारसीक अवेस्त्यानें पूर्णपणें भरून काढला आहे. परंतु ध्रुवावरील चक्राकार फिरणाऱ्या तेजोयुक्त उषेसंबंधानें अशी अडचण सुदैवानें मुळींच नाहीं. उषा ही वेदांतील अति महत्वाची व सर्वांस अतिप्रिय अशी देवता असून तिचें ऋग्वेदांत सुमारें वीस सूक्तांत वर्णन केलें आहे; आणि एकवचनीं व अनेकवचनीं मिळून एकंदर तीनशेंपेक्षां अधिक वेळ तिचा नामनिर्देश झालेला आहे. तिचीं सूक्तें फारच मनोहर आणि काव्यगुणप्रचुर आहेत असें विद्वानांचें मत आहे. तिचें वर्णन फारच सविस्तर केलें असून त्यांत तिच्या वास्तव स्वरूपाचा अलंकारिक वर्णनानें मुळींच विघाड केलेला नाहीं ही गोष्ट आपणांस विशेष महत्वाची आहे. ह्मणून आपल्या उपपत्तींची सत्यता पटविण्यास तिची फार चांगली मदत होईल. वरवरही विचार केला असतां वैदिक ऋषींनीं उष्ण किंवा समशीतोष्ण कटिबंधांत दिसणाऱ्या तास दीड तासाच्या उषेच्या वर्णनांत आपली एवढी करामत खर्च केली असावी अथवा या वर्णनांत दिसून येणाऱ्या औत्सुक्याइतकें तिच्या आगमनावद्दलं औत्सुक्य व्यक्त करावें; व याचें कारण, फक्त त्यांच्याजवळ चोवीस तासापेक्षां कमी अवधीचा अंधकार नाहींसा करणारीं विद्युद्दीपादि साधनें नव्हतीं, एवढेंच असावें, हें संभवनीय दिसत नाहीं. आजपर्यन्त उषेच्या सूक्तांचा या दृष्टीनें विचार कोणीही केलेला नाहीं. वैदिक उषा ह्मणजे आपली तास दोन तासांच्या अवधीची उष्ण व समशीतोष्ण कटिबंधांतील उषा असें आजपर्यन्त सर्व विद्वान समजत आले आहेत; कारण त्यांच्या मतें आर्य लोकांचें आदिस्थान मध्य आशियांतील डोंगर सपाटीचा प्रदेश हेंच होतें. परंतु या समजुतीवर सर्वस्वीं अवलंबून राहिल्यामुळें उषेच्या वर्णनांतील कित्येक वाक्यें बरोबर समजत नाहींत व ह्मणून आजपर्यन्त त्यांचा कांहींतरी अर्थ करून त्यांजकडे दुर्लक्षच केलेलें आहे. अशा वाक्यांचा अर्थ स्वाभाविक जसा होईल तसा केला असतां आपली उपपत्ति कशी उत्तम रीतीनें सिद्ध होते तें आतां पाहूं.

वैदिक उषेच्या दीर्घावधीविषयीं प्रथम उल्लेख ऐतरेय ब्राह्मणामध्यें आला आहे. **गवाम् अयनम्** नांवाच्या सत्रास आरंभ करण्यापूर्वी होत्यानें सुमारें एक हजार मंत्रांचें पठण करावयाचें असतें. त्या मंत्रांनां आश्विनशस्त्र ह्मणतात. तें **अग्नि, उषा व अश्विनौ** या प्रातःकालिक देवतांना अनुलक्षून केलेलें आहे. तें पठन करावयाचा काल मध्यरात्रीनंतर ह्मणजे "रात्रीचा अंधकार उषःकालाच्या प्रकाशानें नाहींसा होऊं लागण्याच्या वेळीं" आहे असें **तयोःकाल ऊर्ध्वमर्धरात्रात्प्रकाशीभावस्यानुविष्टंभम्**। या निरुक्तावरून दिसतें. ऋग्वेदांतही (७,६७,२.३) हाच काल सांगितला आहे. 'हें शस्त्र पठण करण्यापूर्वी होत्यानें घृत भक्षण करावें, कारण ज्याप्रमाणें चाकांना तेल लाविलें ह्मणजे गाडी नीट चालते, तद्वत् होत्यालाही घृतभक्षणापासून पठण करणें सोईचें होईल,' असें सांगून ऐतरेय ब्राह्मणांत या शस्त्राचा लांबलचकपणा व्यक्त केला आहे. "सूर्योदयापूर्वी हें शस्त्र पुरें झाल्यास सूर्योदय होईपर्यन्त दुसरे मंत्र ह्मणून पठण चालू ठेवावें," असें आश्वलायन श्रौतसूत्रांत (६,५,८) सांगितलें आहे. आपस्तंबानें तर "हें शस्त्र आटपल्यावर गरज पडल्यास ऋग्वेदाचीं दहाही मंडळें ह्मणावीं" असें ह्मटलें आहे. ज्या अर्थी या पठाणास उषेचा उदय झाल्याबरोबरच आरंभ करावयाचा असतो त्या अर्थी उषेचा उदय झाल्यापासून सूर्य उगवेपर्यन्त फारच वेळ वाट पहात बसावें लागत असे हें उघड दिसतें; आणि तैत्तिरीय संहितेंत तर कित्येक ठिकाणीं "अपेक्षित कालीं सूर्योदय न झाल्यास देवांना प्रायश्चित करावें लागत असे" असें ह्मटलेलें आढळतें.

उषेच्या दीर्घकालावधीची दुसरी सूचक गोष्ट तैत्तिरीयसंहितेंत आहे.

---

१. नाश्विनं हैव तद्यदर्वाक्सहस्रंतस्मात्तत्सहस्रं वैव शंसेद्वयोवा, प्राश्य घृतं शंसेद्यथा ह वा इदं मनो वा रथो वाक्तो वर्तत एवं हैवाक्तो वर्तते। ऐ. ब्रा. ४,७.

२. यस्याश्विने शस्यमाने सूर्यो नाविर्भवति सौर्यं बहुरूपमालभेत ॥ १ ॥ सर्वा अपि दाक्षतयीरनुब्रूयात्। आपस्तंब १४, १-२.

३ असावादित्यो न व्यरोचत तस्मै देवाः प्रायाश्चित्तिमैच्छन्. । तै. सं. २, १, २, ४.

४ उषसे स्वाहा व्युष्टयै स्वाहोदिष्यते स्वाहोद्यते स्वाहोदिताय स्वाहा सुवर्गाय स्वाहा लोकाय स्वाहा। तै० सं० ७, २, २०.

त्यांत **उषस्, व्युष्टि, उदेष्यत्, उद्यत्, उदित, सुवर्ग** आणि **लोक** अशा सात देवतांना द्यावयाचे हविर्भाग सांगितले आहेत. त्यांतील पहिले पांच तर उघडच उषोदेवतेच्या पांच स्वरूपांना आहेत. तैत्तिरीय ब्राह्मणामध्यें यांपैकीं पहिल्या दोघांचें स्पष्टीकरण, **उषस्** म्हणजे **रात्र** व **व्युष्टि** म्हणजे **दिवस** असें दिलें आहे; व तें जरी खरें मानिलें तरी बाकीच्या तीन भागांची व्यवस्था लावावयाची रहातेच. ध्रुवकटिबंधाखेरीज इतर ठिकाणची उषा इतकी लहान असते कीं, तिचा **उगवूं लागणारी** [उदेष्यत्], **उगवत असलेली** [उद्यत्], आणि **उगवलेली** [उदित] असा भेद म्हणजे भिन्नतारहित भेद होय. अर्थात्, असला भेद जिचा केलेला आहे अशी उषा म्हणजे ध्रुवावरची दीर्घ उषाच समजली पाहिजे असें मानणें भाग येतें.

ऋग्वेदांतही उषेचा हा त्रिप्रकार भेद माहीत नव्हता असें नाहीं. "त्याच्या [अरुणाच्या] आवडत्यांनीं त्याच्यासाठीं तीन उषा वर्धमान केल्या" असें ऋ. ८,४१,३ यांत म्हटलें आहे. तसेंच १,१७४,७ यांतील **तिस्रः दानुचित्राः** म्हणजे "दानूनें [दवानें] चित्रविचित्र झालेल्या तीन" या शब्दांनीं तीन उषाच विवक्षित असाव्या असें दिसतें. ऋ. [3]५,७९,९ यांत "हे उषोदेवते लवकर उदयास ये, थांबूं नको, नाही तर सूर्य तुला आपल्या तेजानें भाजून टाकील;" आणि २,१५,६ यांत उषेच्या घोड्यांना हळू चालणारे (अजवसः) असें म्हटलें आहे. त्यावरून क्षितिजावर फार वेळ रेंगाळत असल्यामुळें लोकांना तिचा कधीं कधीं कंटाळाही येत असे असें दिसतें. परंतु यापेक्षांही 'पूर्वी उषा देवी एकसारखी फार वेळ उदित असे'[4] [ऋ. १,११३,१३] हें वाक्य व **शश्वत्तमा** म्हणजे 'अतिशय वेळ रहाणारी' हा उषोदेवतावाचक शब्द [१,११४,११] हीं विशेष महत्वाचीं आहेत. **उषस्** आणि **व्युष्टि**

---

१ रात्रिर्वा उषाः । अहर्व्युष्टिः । तै० ब्रा० ३,८,१६,४.

२ स क्षपः परि षस्वजे...तस्य वेनीरनु व्रतमुषस्तिस्रो अवर्धयन् ।

ऋ. ८,४१,३.

३ व्युच्छा दुहितर्दिवो मा चिरं तनुथा अपः । नेत्त्वा स्तेनं यया रिपुं तपाति सूरो अर्चिषा । ऋ. ५,७९,९.

४ शश्वत्पुरोषा व्युवास देवी । ऋ. १, ११३, १३.

हे दोन एकाच धातूपासून निघालेले शब्द उषेच्या दीर्घत्वाबद्दल साक्ष देतात. कारण, ती जर अगदीं लहान असती तर तिच्याविषयीं 'पूर्ण उदित', 'उगवणारी' वगैरे म्हणण्याची मुळींच अवश्यकता नव्हती. पण या सर्व गोष्टी कितीही सूचक असल्या, तरी पूर्ण साधक नसल्यामुळें कांहीं दुसऱ्या पूर्ण साधक गोष्टींचा आतां विचार करूं. त्यांपैकीं पहिली ऋचा अशी:—

क्रियात्या यत्समया भवाति
या व्यूषुर्याश्च नूनं व्युच्छान्
अनु पूर्वाः कृपते वावशाना
प्रदीध्याना जोषमन्याभिरेति ॥ ऋ. १, ११३,१०.

या ऋचेंत अडचण काय ती पहिल्या चरणांत आहे. त्यांत **समया** याचा अर्थ सायणाचार्यांनीं 'समीप' [जवळ] असा दिला आहे. मॅक्समुल्लरनें [ग्रीक ऑमॉस व लॅटिन सायमल यांच्या साम्यावरून] त्याचा अर्थ 'सहवर्तमान' 'एकासमयीं' असा केला आहे; तसेंच दुसरे कित्येक यूरोपीय पंडित **समयाभवाति** हे शब्द एकत्र घेऊन त्यांचा अर्थ 'दोहोंच्या मध्यें येणारी' असा करितात. परंतु यांपैकीं कोणता जरी अर्थ घेतला तरी त्यावरून एकंदर ऋचेचा रोंख कांहीं पालटत नाहीं. या ऋचेचा भावार्थ असा:—"उषा उदय पावून किती तरी काळ झाला बरें? आणखी किती वेळ तरी त्या उगवणार? (अथवा, पूर्वीच ज्या उगवल्या आहेत आणि ज्या आतां उगवणार त्या उषा एकत्र किती वेळ राहिल्या?) आमच्यासाठीं प्रकाश करणारी [ही वर्तमान] उषा पूर्वीच्या उषांप्रमाणेंच देदीप्यमान होत्साती इतरां [पुढें येणाऱ्या] बरोबर चालत आहे." यांत एवढी गोष्ट स्पष्ट आहे कीं, **या व्यूषुः** म्हणजे ज्यांचा उदय झाला आहे आणि **या व्युच्छान्** म्हणजे ज्याचा उदय व्हावयाचा आहे, अशा दोन प्रकारच्या उषांचे दोन कलाप या ऋचेंत वर्णिले आहेत. सायणाचार्यांच्या अर्थाप्रमाणें पहातां या दोन्ही उषःकलापांमिळून एक मोठी थोरली उषा मानावी लागते. कारण, हे दोन्ही कलाप फारच मोठ्या अवधीपर्यन्त 'समीप' रहातात असें या ऋचेंत म्हटलें आहे. या ऋचेचा अर्थ इतर यूरोपीय पंडितांच्या मताप्रमाणें जरी घेतला तरीहीं हें वर्णन ध्रुवाला लावल्याशिवाय गत्यंतर रहात नाहीं. कारण, त्यांच्या मतें

'या दोन उषःकलापांच्यामध्यें फारच दीर्घ काळ जातो' असा या ऋचेतील पहिल्या चरणाचा भावार्थ आहे. तो घेतल्यास हा मधला दीर्घ काळ म्हणजे ध्रुवावरील अखंड अशा दीर्घ रात्रीचाच काळ होय असें मानणें भाग येतें. एवंच कोणताही अर्थ घेतला तरी या ऋचेंत ध्रुवावरील उषेचेंच वर्णन आहे हें खास. तरी पण पुढें विवेचन केलेल्या कांहीं वेदवाक्यांवरून पहातां वर दिलेला सायणाचार्यांचाच अर्थ बरोबर दिसतो. शिवाय, याच सूक्ताच्या पुढच्या एका ऋचेंत (१३ व्या) 'उषा पूर्वी एकसारखी (शश्वत्) प्रकाशमान होत असे' असें म्हटलें आहे. त्यावरूनही हा उषेचा अवधि फार मोठा असला पाहिजे हें उघड होतें.

ऋग्वेदाच्या सातव्या मंडळांत उषेचीं सूक्तें बरींच आहेत. त्यांत एकेठिकाणीं 'मला देवयानमार्ग दिसूं लागला; कारण, उषेचा केतु (ध्वज) पूर्वेकडे फडकूं लागला' असें म्हणून पुढच्या ऋचेंत 'उषा प्रथम दिसूं लागल्यापासून सूर्योदय होईपर्यन्त किती तरी दिवस होऊन गेले' असें स्पष्ट म्हटलें आहे. तीं ऋचा अशीः—

तानीदहानि बहुलान्यासन्
या प्राचीनमुदिता सूर्यस्य ।
यतःपरि जार इवाचरन्ती
उषो ददक्षे न पुनर्यतीव ॥ ऋ. ७,७६,३.

या ऋचेचा अर्थ करतांना भाष्यकारांची फारच त्रेधा झालेली आहे. कारण, 'उषेचा उदय झाल्यापासून सूर्य उगवेपर्यंत किती तरी दिवस झाले' या वाक्याचा त्यांना उलगडा करितां येईना. उषेचा उदय झाल्यापासून सूर्योदयापर्यंत बरेच दिवस लोटणें अशक्य आहे असें त्यांस वाटत होतें. म्हणून या अडचणींतून पार पडण्यासाठीं सायणाचार्यांनीं 'अहन्' (दिवस) याचा 'उषः—प्रकाशयुक्तकाल'[1] असा अर्थ केला आहे. परंतु आपल्याला तसें करण्याचें कारण नाहीं. दिवस म्हणजे जितका वेळ सूर्य क्षितिजावर असतो तितका वेळ असाच केवळ अर्थ नसून त्याचा अहोरात्र म्हणजे चोवीस तासांचा एक अवधि असाही सामान्य अर्थ आहे. म्हणून सूर्योदयापूर्वी बरेच दिवस कसे गेले हें जर आप-

---

१ उषःप्रकाशयुक्तस्यैव कालस्य अहःशब्दव्यवहारात् ।

ल्याला ज्योतिषाच्या साहाय्यानें समजतें आहे, तर द्राविडी प्राणायाम करून अहन् याचा 'उषःप्रकाशयुक्तकाल' असा अर्थ न घेतां नेहमींचा व स्वाभाविक अर्थ जो 'दिवस' तोच घेणें योग्य आहे. तसा अर्थ घेतला असतां वरील ऋचेचीं एकंदर तीन वाक्यें होतात. एक मुख्य आणि दोन गौण. मुख्य वाक्य **तानि इत् अहानि बहुलानि आसन्**—'खरोखर ते पुष्कळ दिवस झाले' हें. उरलेलीं गौण वाक्यें मुख्य वाक्यांतील अहानि शब्दाचीं विशेषणें आहेत. पहिलें, **या प्राचीनम् उदिता सूर्यस्य**–'जे सूर्याच्या उदयापूर्वी होऊन गेले,' आणि दुसरें, **यतः परि जार इवाचरन्ती दद्दक्षे**–'ज्या (दिवसां) भोंवतीं उषा आपल्या प्रियकराभोंवतीं जशी फिरावी तशी फिरतांनां दिसली. या ऋचेचा याहून दुसरा अर्थ होणें शक्य नाहीं. वैदिक ऋषींचे पूर्वज ध्रुवाजवळ रहात होते अशी कल्पनाच नसल्यामुळें सायणाचार्यांप्रमाणें पाश्चात्य पंडितांचीही या ऋचेंत गडबड उडाली आहे; आणि त्यानींही **अहन्** शब्दाचा 'तेज' असा अर्थ घेतला आहे. पण वर सांगितल्याप्रमाणें **अहन्** ह्मणजे 'सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यन्तचा वेळ' असेंच समजण्याचें कारण नाहीं. ऋ. ६,९,१ यांत **अहश्च कृष्णम् अहः अर्जुनंच**–'काळोखाचा दिवस व प्रकाशयुक्त दिवस' असे शब्द आहेत; तसेंच तै. सं. ३,३,४,१ यांत **एतद्वा अह्नो रूपं यद् रात्रिः**—'रात्र ही दिवसाचेंच रूप होय' असें ह्मटलें आहे. **शम् अहोभ्याम्** या तै. संहितेंतील (१,३,९,१) **अहन्** शब्दाचा 'अहोरात्र' असाच अर्थ दिलेला आहे (शमहोभ्यामिति निनयत्यहोरात्राभ्यामेव). तात्पर्य, या ऋचेंत उषा दिसूं लागल्यापासून सूर्योदय होईपर्यन्त पुष्कळ दिवस होऊन गेले, आणि त्या दिवसांना उषा अगदीं धरून होती, [पतीला] सोडून जाणाऱ्या स्त्रीसारखी नव्हती (न पुनः यती इव), ह्मणजे इतक्या दिवसांच्या काळांत उषःप्रकाश सारखा होता असें स्पष्ट ह्मटलेलें आहे. हें वर्णन ध्रुवेतर स्थानाला लागू पडणारें नव्हे. आर्यांचें मूलस्थान ध्रुवावर होतें, या कल्पनेवर आजपर्यन्त बिकट ह्मणून वाटलेल्या किती तरी वाक्यांचा सरळ व स्वाभाविकपणें होणारा अर्थच समाधानकारक कसा असतो याचीं अनेक उदाहरणें पुढील विवेचनांत यावयाचीं आहेत; त्यांपैकीं हें एक चांगलें उदाहरण आहे. या कल्पनेच्या अभावीं टीकाकारांना वाक्यांतून कांहीं

तरी अर्थ निघावा ह्मणून वाटेल तशी शब्दांची ओढाताण करावी लागते; व ती करूनही पुनः त्यांतून समाधानकारक अर्थ निघत नाहीं तो नाहींच, हें दाखविण्याकरितां या ऋचेवर एवढें विवेचन करावें लागलें. असो.

या विवेचनावरून, ध्रुवावरील उषा क्षितिजावर वाटोळी फिरत असल्यामुळें तिच्या प्रत्येक प्रदक्षिणेचा ह्मणजे चोवीस तासांचा एक एक निराळा भाग मानावयाला कांहीं हरकत नाहीं असें दिसून येईल; व त्या अन्वयें प्रत्येक भागाला 'एक उषा' असें नांव देऊन अशा कांहीं उषा येऊन गेल्या व कांहीं यावयाच्या आहेत असेंही ह्मणतां येईल. **हें कियात्या यत्समया भवाति** या ऋचेवरून स्पष्ट होतेंच आहे. तसेंच आणखी "इतक्या दिनावधि उषा येऊन गेल्या तरी अजून सूर्योदय होत नाहीं" असेंही ह्मणतां येईल. ऋ. २,२८,९ यांत वरुणाची प्रार्थना केलेली आहे, ती अशी:—

पर ऋणा सावीरध मत्कृतानि
माहं राजन्नन्यकृतेन भोजम् ।
अव्युष्टा इन्नु भूयसीरुषास
आ नो जीवान्वरुण तासु शाधि ॥

या ऋचेचा सरळ पदशः अर्थ असा–'मी केलेलीं ऋणें दूर नाहींशीं कर. हे राजन् इतरांच्या कृत्याचें फळ मला भोगावें न लागो. खरोखर बहुत उषा पूर्ण उदित झालेल्या नाहींत; हे वरुण त्यामध्यें आह्मीं जिवंत रहावें असें कर.' या ऋचेच्या पहिल्या दोन व चवथ्या चरणांत नित्याप्रमाणें वरुणाची प्रार्थना केलेली आहे. विशेष भानगडीचा भाग. ह्मणजे तिसऱ्या चरणांतील **भूयसी उषासः अव्युष्टाः** हीं पदें. त्यांतही पहिलीं दोन सरळच आहेत; त्यांचा अर्थ 'बहुत उषा'. आतां उरलें **अव्युष्टा** हें पद. हें **व्युष्टा** या शब्दाला नकारार्थी **अ** मागें लागून झालें आहे. **व्युष्ट** शब्द **उष्ट** शब्दाला **वि** उपसर्ग लागून बनला आहे. वर एके ठिकाणीं उषस् आणि व्युष्टि या शब्दांवरून दिसून येणाऱ्या उषेच्या त्रिप्रकार भेदाविषयीं सांगितलें आहेच. तै० ब्राह्मणांत **अहः व्युष्टिः** या पदांनीं व्युष्टि ह्मणजे **वि**–पूर्णपणें-**उष्टि**-उदित झालेली उषा ह्मणजे **उगवलेला** दिवस असा अर्थ दिला आहे. ध्रुवावरील दीर्घ उषेविषयीं

माहिती नसल्यामुळें सायणादि टीकाकारांनीं हा उषस् आणि व्युष्टि यांतील भेद मानिला नाहीं. त्यामुळें 'पुष्कळ उषा पूर्ण उदित झालेल्या नाहात.– त्यांचें पर्यवसान सूर्योदयांत झालें नाहीं' या वाक्याचें त्यांना मोठें कोडें पडलें. सूर्योदयांत पर्यवसान होणारी उषाच कायती त्यांना माहीत होती. म्हणून त्यांनीं त्या शब्दांतून कांहीं तरी अर्थ निघावा म्हणून **अव्युष्टाः** याचा अर्थ 'अद्यापि ज्या उगवलेल्या नाहींत त्या उषा, म्हणजे पुढें येणारे दिवस' असा भविष्यकालवाचक अर्थ केला. परंतु हा अर्थ क्लिष्ट आहे. **अव्युष्टाः उषासः** म्हणजे सूर्यबिंब क्षितिजाखालीं असल्यामुळें पूर्णपणें उदित न झालेल्या दिनावधि उषा असा सरळ व स्वाभाविक अर्थ घेतल्यास सूर्य उगवण्यापूर्वी अशा बऱ्याच उषा कशा होऊन गेल्या याचा नीट उलगडा होतो.

या मताला पुष्टी देणारीं दुसरींही वचनें ऋग्वेदांत आहेत. वरील ऋचेंतील **भूयसीः** शब्दाप्रमाणें **पूर्वीः** असें अनेकवचनार्थी विशेषण उषांना ऋ. ४,१९,८ आणि ६,२८,१ यांत लाविलेलें आहे. उषा शब्दाचा अनेकवचनी प्रयोग ऋग्वेदांत किती तरी वेळां आलेला आहे. ऋ. १,९२ या सूक्ताला "ह्या (एताः) त्या (त्याः) उषा (उषसः)" असा आरंभ केलेला आहे. ऋ. ७,७८,३ मध्यें असेच शब्द आहेत. निरुक्तांत (१२,७) यास्कानें हें बहुवचन बहुमानार्थी आहे असें म्हटलें आहे. सायणाचार्यांनीं प्रातःकालाला अधिष्ठित करणाऱ्या देवतांना अनुलक्षून हा अनेकवचनीं प्रयोग आहे असें म्हटलें आहे. पाश्चात्य पंडितांनीं बहुतेक त्यांचाच अनुवाद केला आहे. परंतु हें म्हणणें बरोबर दिसत नाहीं. बहुमानार्थी अनेकवचन असल्यास तें एकाच सूक्तांत तरी सर्वत्र पाहिजे. पण तसा प्रकार नाहीं. अनेकवचनी प्रयोगानंतर लगेच पुढें उषेला एकवचनांतही संबोधिलें आहे. यास्काच्या अर्थावर दुसरेही आक्षेप आहेत. उषेला ज्या नानाप्रकारच्या उपमा दिल्या आहेत त्यांवरून त्या अनेक आहेत असें म्हणण्याचा वैदिक ऋषींचा आशय स्पष्ट दिसतो. ऋ. १,९२,१ मध्यें त्यांना 'वीरांची' (धृषणवः) व १,९२,३ मध्यें 'उद्योगव्यापृत नारींची' उपमा दिली आहे. ६,६४,१ मध्यें 'पाण्याच्या लाटांप्रमाणें (अपां न ऊर्मयः) क्षितिजावर दिसतात असें, आणि ४,५१,२ मध्यें 'यज्ञस्तंभांप्रमाणें (अध्वरेषु स्वरवः) असें त्यांच्या

संबंधानें झटलें आहे. त्या 'सज्ज झालेल्या पुरुषांप्रमाणें' (विशो न युक्ताः) काम करतात असें ७,७९,२ मध्यें आणि 'गाईंच्या कळपाप्रमाणें चालतात' (गवां न सर्गाः) असें ४,५१,८ यांत सांगितलें आहे. त्या सर्व 'सारख्या' (सदृशीः) आहेत व 'एक मताच्या आहेत' (संजानते) असें त्याचें अनुक्रमें ४,५१,६ आणि ७,७६,५ यांत वर्णन आहे. या शेवटल्या ऋचेंत तर 'त्या एकाच ठिकाणीं रहात असूनही (समाने उर्वे) एकमेकींशीं भांडत नाहींत (मिथः न यतन्ते) असें सांगितलें आहे. तसेंच १०,८८,१८ मध्यें 'अग्नि एकंदर किती आहेत, सूर्य किती आहेत, तशाच उषा (उषासः) किती आहेत असा स्पष्ट प्रश्न विचारिलेला[1] आहे. उषेला केवळ बहुमानार्थीं अनेक वचन लाविलें असल्यास या प्रकारांचा उलगडा कसा करावयाचा ? ही अडचण लक्षांत आणूनच बहुतकरून सायणाचार्यांनीं त्या अनेक वचनांचा संबंध प्रातःकालिक अनेक देवतांशीं लाविला आहे. पण ही तोड समाधानकारक नाही. यावर आतां या पक्षाचें एवढेंच म्हणणें उरलें आहे कीं, या अनेकवचनांचा संबंध निरनिराळ्या दिवसांच्या निरनिराळ्या उषांशीं असेल. हें म्हणणें सकृद्दर्शनीं खरेंही वाटेल. पण विचार केल्यास त्याचा फोलपणा लक्षांत येईल. ३६० दिवसांच्या ३६० उषांनां अनुलक्षून जर अनेकवचनीं प्रयोग केला असेल, तर 'ह्या त्या उषा ज्या क्षितिजावर फिरकूं लागल्या' असें जें प्रत्यक्ष पुढें घडत असलेल्या गोष्टीचें वर्णन ऋ. १,९२,१ यांत केलें आहे त्याचा अर्थ काय ? शिवाय वर्षाच्या ३६० उषांनां 'युद्धास सज्ज झालेल्या वीरांची' उपमा कशी जुळेल ? तसेंच 'एका ठिकाणीं रहात असूनही त्या एकमेकींशीं भांडत नाहींत.' असें चोवीस तासांच्या अवधीनें विभक्त असलेल्या वर्षाच्या ३६० उषांना कसें म्हणतां येईल ? म्हणजे एकंदरींत वरील सर्व वर्णनें सूर्योदयानें अखंडित अशा उषःकलापाला म्हणजे ध्रुवावरील दीर्घ उषेला लाविल्याशिवाय उपाय नाहीं. चोवीस तासांच्या एका उषःप्रदक्षिणेला एक उषा म्हटल्यानें व अशा पुष्कळ उषा मिळून एकच मोठी थोरली उषा होत असल्यामुळेंच तिच्यासंबंधीं एकवचनीं किंवा अनेकवचनीं असे प्रयोग आलेले आहेत.

---

१. कत्यग्नयः कतिसूर्यासः कत्युषासः कत्युस्विदापः ॥ ऋ. १०,८८,११.

असें मानिल्याशिवाय उषेच्या निरनिराळ्या वर्णनांचा योग्य उलगडा करतां येणें शक्य नाहीं.

परंतु या मतासंबंधानें सर्व शंका दूर करणारीं अशीं अगदीं स्पष्ट वचनें तै० संहितेंत आहेते. चौथ्या कांडाच्या तिसऱ्या प्रपाठकाच्या अकराव्या अनुवाकांत उषा 'तीस बहिणी' (त्रिंशत् स्वसारः) असून त्या 'पांच कलापांनीं' (पंचाभिः) वाटोळ्या फिरत (परियन्ति) एकाच ठिकाणीं पोंचतात (समानं निष्कृतं उपयन्ति) आणि त्या सर्वांचा एकच ध्वज आहे (समानं केतुं प्रतिमुञ्चमानाः) असें वर्णनं आहे. या अनुवाकांत १५ मंत्र असून ते व्युष्टी नांवाच्या विटा वेदीवर ठेवण्याच्या वेळीं म्हणावयाचे असतात. हा सर्व अनुवाक व त्यावरील ब्राह्मण हीं याविषयीं फार महत्वाचीं आहेत. यांपैकीं कांहीं मंत्र अथर्ववेदांतही आले आहेत. पहिल्या मंत्रानें पहिली व्युष्टी ठेवावयाची असून त्यांत फक्त एकाच उषेविषयीं सांगितलें आहे. दुसऱ्यांत एकाच ठिकाणीं संचार करणाऱ्या दोन उषा आल्या आहेत. तिसऱ्यांत तिसरी आणि पुढें चवथी व पांचवी अशा आल्या आहेत. नंतर लगेच या प्रत्येक उषेला आणखी पांच पांच बहिणी आहेत असें सांगून एकंदर उषःसंख्या तीस केली आहे. पुढें या तीस बहिणी एकाच स्थानाला धरून सहा सहा जणींचा एक अशा पांच कलापांनीं वाटोळ्या फिरतात, असें सांगितलें आहे. पुढें या पांच मुख्य उषांपैकीं पहिली ऋतापासून उत्पन्न झालेली असून (ऋतस्य गर्भः) दुसरी "जलांचा महिमा वाढविणारी (अपां महिमानं बिभर्ति) तिसरी सूर्याच्या प्रदेशांत फिरणारी (सूर्यस्य निष्कृतेषु चरति), व चवथी घर्माच्या प्रदेशांत फिरणारी असून पांचवीचें नियमन सविता करतो (सविता एकां नियच्छति) असें म्हटलें आहे; यावरून या उषा उष्ण व समशीतोष्ण कटिबंधांत प्रतिसूर्योदयापूर्वी दिसणाऱ्या नव्हत हें उघड आहे. शेवटच्या मंत्रांत सर्वांचें तात्पर्य म्हणूव 'ही उषा निरनिराळ्या रूपांनीं प्रकाशित होत असली तरी खरोखर एकच आहे' असें सांगितलें आहे. या सर्व अनुवाकांत सूर्योदयाचा संबंध कोठेंच आलेला नसून त्यावरील ब्राह्मणांत तर सांगितलें आहे कीं "हा काळ दिवसाचा किंवा रात्रीचा नसून अव्यावृत्त (ओळखतां न येण्यासारखा) होता. तेव्हां देवांनीं या व्युष्टी पाहिल्या, आणि त्यांचें उपाधान (योग्य जागीं

योजना) केलें. तेव्हां प्रकाश झाला. ह्मणून ज्याच्यासाठीं त्यांचें उपाधान होतें त्यांना प्रकाश होतो आणि त्यांचा तम नष्ट होतो.' वरील मंत्रानींच या व्युष्टी कां ठेवावयाच्या याचें कारण या ब्राह्मणांत सांगून दिवसही नाहीं आणिं रात्रही नाहीं अशा संधीच्या वेळीं [एका मागून येणाऱ्या दिवशीं नव्हे] तीस उषा देवांना दिसल्यावद्दलची पुराणकथा त्यांत दिली आहे. हें ब्राह्मण व या अनुवाकांतील 'खरोखर उषा एकच आहे' असें सांगणारा शेवटचा मंत्र यांवरून या तीस उषा अखंड असून आपल्या इकडीलप्रमाणें सूर्योदयानें खंडित नव्हत्या हें सिद्ध होतें. पण याहूनही स्पष्ट पुरावा पाहिजे असल्यास तो तै. ब्रा. २,५,६,५ यांत आहे[1]. त्यांत 'ज्या प्रथम प्रकाशल्या त्याच ह्या उषा होत; या देवी पांच रूपें करितात. त्या कायम असून खंडित नसतात व त्यांचा अंतही होत नाहीं' असें वर्णन आहे. हीं पांच रूपें ह्मणजे वरील अनुवाकांतील पांच उषःकलाप असून ते अखंड आहेत असें स्पष्ट ह्मटलें आहे. ऋग्वेदांतील [१,१५२,४.] 'उषांच्या प्रियकराचें वस्त्र अखंडित [अनवकृण] आणि विस्तृत [वितत] आहे' या वाक्याचा अर्थ वरील ब्राह्मणाच्या अनुरोधानें पहातां 'हो उषा अखंड व दीर्घ आहे' असाच केला पाहिजे. अथर्ववेदांत [७,२२,२.] उषांना 'सचेतसः आणि समीचीः' ह्मणजे 'एकमताच्या' आणि 'एकत्र चालणाऱ्या' ह्मटलें आहे. यांतील पहिलें पद ऋग्वेदांत आलें आहे; व दुसऱ्याच्या समानार्थक वर्णन आहे. समीचीः (एकत्र चालणाऱ्या) या शब्दावरूनही ध्रुवावरील अखंड उषेचाच बोध होतो.

सायणाचार्यांनीं तैत्तिरीय संहितेंत सांगितलेल्या तीस उषांची व्यवस्था काय केली आहे हें पहाणें जरा मजेचें आहे. वर सांगितलेल्या तैत्तिरीय संहितेंतील अनुवाकावरील भाष्यांत त्यांनीं ह्मटलें आहे कीं, या अनुवा-

---

१ तै. ब्रा. २,५,६,५.–इमा एव ता उषसो या प्रथमा व्यौच्छन् । ता देव्यः कुर्वते पंचरूपा । शश्वतीर्नावपृज्यन्ति न गमंत्यन्तम् ॥

२ अ. वे.–ब्रध्नः समीचीरुषसः समैरयन् । अरेपसः सचेतसः स्वसरे मन्युमत्तमाश्विते गोः ॥ भावार्थ–निकट संलग्न, एकमताच्या आणि तेजस्वी अशा उषा सूर्यानें पुढें पाठवून दिल्या आहेत.

काच्यां पहिल्या मंत्रांत सांगितलेली पहिली उषा सृष्टीच्या आरंभींची आहे; व दुसरी नित्याची आहे. पण एवढ्यानेंच कांहीं उषा संपल्या नाहींत. तेव्हां त्या सर्वांची नीट व्यवस्था न लावतां आल्यामुळें उषा आपल्या यौगिक शक्तीनें अनेक रूपें धारण करते अशी त्यांनीं वर मखलाशी केली. पण पुढें लगेच पांच उषांच्या तीस उषा झाल्या. त्याबरोबर पुनः त्या महिन्याच्या तीस दिवसांच्या तीस उषा असें त्यांनीं ठरविलें. पण त्यावर असा प्रश्न आहे कीं, या मंत्रांत वर्षाच्या ३६० उषांपैकीं एकाच महिन्याच्या तीस उषा कां घेतल्या ? हे सर्व अर्थ परस्परविरुद्ध असून शेवटच्या मंत्रांत ' उषा अनेक नसून एकच आहे ' असें जें म्हटलें आहे त्याच्या तर ते साफ उलट आहेत. परंतु सायणाचार्यांना इतर वेदवेत्या पंडितांप्रमाणेंच ध्रुवावरील उषा माहीत नसून फक्त इकडील मात्र उषा माहीत होती; यामुळें खरा अर्थ त्यांना समजला नाहीं तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. उलट त्यांनीं वर वर तरी सयुक्तिक दिसणारे अनेक अर्थ सुचवून निरनिराळ्या मंत्रांचे अर्थ करण्यांत येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला हें त्यांच्या अगाध विद्वत्तेचें द्योतक आहे. आजच्या ज्ञानाच्या स्थितींत ते असते तर त्यांनीं ही आपल्यासारखाच अर्थ केला असता. ज्योतिष हा वेदाचा डोळा आहे असें वेदांगशिक्षेंत[1] सांगितलें आहे. तर या डोळ्याची शक्ति व क्षेत्र जसजशीं वाढत जातील तसतसा वेदांतील अद्यापि दुर्ज्ञेय असलेल्या वाक्यांचा अर्थ लावण्याच्या कामीं, या डोळ्यांच्या सहाय्यानें मिळालेल्या ज्ञानाचा आपण उपयोग करून न घेणें हें मोठें दोषास्पद होईल.

" उषा तीस आहेत असें फक्त तैत्तिरीय संहितेंतच सांगितलें आहे. म्हणून त्याचा ऋक्सूक्तांतील वर्णनाशीं जोड करून त्या दोहोंवरून कांहीं अनुमानें काढणें रास्त होणार नाहीं; कारण वरील अनुवाकांतील मंत्र मूळचे परस्परसंबद्ध नसून निरनिराळ्या ठिकाणांतून विशिष्ट यज्ञकर्मासाठीं घेतलेले असतील " असें कित्येकांचें म्हणणें पडेल; व या मंत्रांपैकीं थोडेसे मात्र अथर्ववेदांत आले आहेत या गोष्टीवरून तें खरेंही

---

१ शिक्षा–छंदः पादौ तु वेदस्य हस्तौ कल्पोऽथ पठ्यते । ' ज्योतिषामयनं ' चक्षुर्निरुक्तं श्रोत्रमुच्यते ॥ ४१ ॥ शिक्षा घ्राणं तु वेदस्य मुखं व्याकरणं स्मृतम् । तस्मात्सांगमधीत्यैव ब्रह्मलोके महीयते ॥ ४२ ॥

भासेल. पण थोडें विचारपूर्वक पाहिल्यास ही शंका दूर होईल. कारण ६ व्या मंत्रांत ' त्या तीस वाहिणी आहेत ' असें स्पष्टच म्हटलेलें आहे. शिवाय यास ऋग्वेदांतील पुरावा पाहिजे असल्यास तोही आहे. ऋ. ६,५९,६,[1] यांत ' उषा तीस पावलें चालली ' असें वर्णन आहे. या वाक्याचा खुलासा आजपर्यंत झालेला नाहीं. ' एकाच ठिकाणाला धरून तीस उषा वाटोळ्या फिरतात ' ही तैत्तिरीय संहितेंतील वर सांगितलेल्या अनुवाकांतील गोष्टच ' उषा तीस पावलें चालली ' अशा अन्य शब्दांनीं ऋग्वेदांत सांगितली आहे. ऋ. १,१२३,४[2] ही ऋचाही अशीच दुर्ज्ञेय राहिली आहे. तींत ' आजही समान आणि उद्यांही समान अशा उषा वरुणाच्या घरांत दीर्घ काळ रहातात. निरवद्य निर्दोष अशा त्या उषा आपापल्या मार्गानें तीस योजनें वाटोळ्या फिरतात ' असें म्हटलें आहे. यांत तीस योजनें याचा अर्थ काय ? क्षितिजाखालीं सूर्य तीस योजनें असतांना त्याचे किरण दिसूं लागतात म्हणजे त्यावेळीं उषेचा उदय होतो; म्हणून उषा तीस योजनें चालते म्हणजे उषेचे किरण तीस योजनांइतका प्रदेश प्रकाशित करतात, अशा धर्तीचें सायणाचार्यांनीं या तीस योजनांचें स्पष्टीकरण केलें आहे. यांत त्यांची मोठी कल्पकता दिसून येते खरी, पण शास्त्रीयदृष्ट्या विचार केल्यास हें स्पष्टीकरण अगदीं फुकट ठरतें. सूर्य मेरूभोंवतीं म्हणजे अर्थात् पृथ्वीभोंवतीं २४ तासांत ५०५९ योजनें फिरतो, असें सायणाचार्य म्हणतात. म्हणजे त्यांच्या मतें पृथ्वीचा परीघ ५०५९ योजनें झाला. पृथ्वीचा परीघ २४८७७ मैल आहे हें आतां सर्व प्रसिद्ध आहे. त्यावरून एक योजन म्हणजे सुमारें ५ मैल झाले, व तीस योजनें म्हणजे १५० मैल अंतर झालें. पण सूर्याचे किरण वस्तुतः तो क्षितिजाखालीं १६ अंश असल्यापासूनच खास दिसूं लागतात. एक अंश म्हणजे ६० मैल धरिले तरी १६ अंशाचे ९६० मैल झाले.

---

१ इंद्राग्नी अपादियं पूर्वागात्पद्वतीभ्यः । हित्वी शिरो जिह्वया वावदच्चरत् **त्रिंशत्पदान्यक्रमीत्** ॥ ऋ. ६,५९,६.

२. सदृशीरद्य सदृशीरिदु श्वो दीर्घं सचन्ते वरुणस्य धाम । अनवद्यास्त्रिंशतं योजनान्येकैका क्रतुं परि यन्ति सद्यः ॥ ऋ. १,१२३,४.

हें अंतर सायणाचार्यांच्या अंतराहून सहापटीपेक्षांही अधिक आहे. तसेंच आणखी ऋ० ६,५९,६ मधील तीस पावलांचाही या खुलाशानें उलगडा होत नाहीं. म्हणजे शेवटीं 'तीस योजनें,' ' तीस वहिणी,' आणि " तीस पावलें ' हे सर्व शब्द एकाच गोष्टीचे ह्मणजे ध्रुवावरील दिनावधि तीस उषःप्रदक्षिणांचे वाचक आहेत, असें म्हणावें लागतें. या वर्णनांतील **परियन्ति** ' वाटोळ्या फिरतात ' हे शब्दही ध्रुवावरील उषेच्या प्रदक्षिणेलाच बरोबर लागू पडतात. **योजन** शब्दाचा मूळचा अर्थ ' रथ ' असा असून पुढें तो ' एका दमानें घोड़े जितकें अंतर जातात तितकें अंतर ' ऊर्फ ' टप्पा ' असा झाला. हा टप्पा ह्मणजे एका दिवसाचा प्रवास ह्मणावयास हरकत नाहीं. मॅक्स मुल्लरनें ऋ. ५,५४,९. यांतील ' योजन ' शब्दाचा असाच अर्थ केला आहे. हा अर्थ घेतला असतां **त्रिंशतं योजनानि परियन्ति** (तीस योजनें वाटोळ्या फिरतात) याचा अर्थ उषा दिनावधि तीस प्रदक्षिणा करितात (उत्तर ध्रुवावर करतात त्याप्रमाणें) असा होईल. या वाक्यांत चक्राकार गतीच उद्दिष्ट आहे, यांत संशय नाहीं. कारण, ऋग्वेदांत दुसरे एके ठिकाणीं [३,६१,३.] ' एकाच अर्थाकडे जाणारी तूं चक्राकार फीर ' असें उषेला संबोधून स्पष्ट म्हटलें[1] आहे. आतां, चक्राकारगति क्षितिजसमान्तर किंवा उभी ' गाडीच्या चाकांप्रमाणें ' वाटेल तशी कल्पितां येईल; पण उषेची उभी चक्राकार गति कोठेंही असणें शक्य नाहीं. अर्थात् उरलेली कुंभाराच्या चाकासारखी आडवीच गति घेतली पाहिजे, आणि तीतर ध्रुवेतर ठिकाणीं संभवनीय नाहीं. म्हणजे वरील ऋचेंतील वर्णन ध्रुवावरील उषेलाच केवळ लागू पडणारें आहे असें झालें. ' एकाच ठिकाणीं पोंचणाऱ्या ' हें वर्णनही एका ठिकाणाहून निघून चोवीस तासांच्या अवधीनें त्याच ठिकाणीं पुनः पुनः येणाऱ्या उषेलाच केवळ लागणारें आहे. तात्पर्य, ऋग्वेद आणि तैत्तिरीयसंहिता या दोहोंतही तीस दिनावधि उषा मिळूनं झालेल्या अखंड व दीर्घ अशा उषेचें ह्मणजे ध्रुवविशिष्ट उषेचें वर्णन आहे असें सदरील सर्व विवेचनावरून एकच अनुमान निघतें.

---

१ उषः प्रतीची भुवनानि विश्वोर्ध्वा तिष्ठस्यमृतस्य केतुः ।
समानमर्थं चरणीयमाना चक्रमिव नव्यस्या ववृत्स्व ॥ ऋ. ३,६१,३.

ऋग्वेदांत उषेविषयीं अनेकवचनीं प्रयोग दुसऱ्याही पुष्कळ ठिकाणीं आलेले आहेत; व त्यांत बऱ्याच ठिकाणीं उषांच्या मागून प्रातःकालिक देवता येतात असें वर्णन* आहे. या अनेक उषा ह्मणजे ३६० दिवसांच्या ३६० उषा नसून ध्रुवावरील दीर्घ उषेचे दिनावधि भाग होत हें ऋग्वेद, तै. संहिता आणि अथर्ववेद यांतील वचनांविषयीं वर केलेल्या विवेचनावरून दिसून येणार आहे. तथापि यावरून ऋग्वेदांत आपल्या-इकडील सारख्या अल्पकालावधि उषेचें मुळींच वर्णन नाहीं असें मात्र समजतां कामा नये. इतकेंच नव्हे तर त्यांतील एकंदर उषेच्या वर्णनापैकीं बराच भाग चोवीस तासांच्या दिवसांत दिसणाऱ्या लहानशा उषेला तसाच ध्रुवावरच्या दीर्घ उषेलाही लागू पडणारा आहे. उदाहरणार्थ, 'प्रत्येक प्राण्याला जागेंकरणारी' किंवा 'तमानें झाकलेले निधि प्रकाशांत आणणारी' अशाप्रकारचीं वर्णनें दोन्ही प्रकारच्या उषांनां लावतां येतील. तेव्हां ऋक्सूक्तांत आढळणाऱ्या विशेष गोष्टींवरून काढलेल्या अनुमानांना कांहीं अशा वाक्यांनीं बाध येत नाहीं. ज्या उषेच्या आगमनाची वैदिक ऋषी इतक्या आतुरतेनें वाट पहात असत व जिचें त्यांनीं आपल्या सूक्तांत फार सुंदर असें याथातथ्यानें वर्णन केलें आहे ती उषा इकडील सारखी अल्पावधि नसून ध्रुवावरील दीर्घ उषाच होय असें दाखविण्याचा या विवेचनाचा हेतु आहे. तो सिद्धीस गेला असल्यास मग ऋग्वेदांत अन्य कांहीं ठिकाणीं साध्या अल्पकालिक उषेचें वर्णन असल्यास त्याची नड नाहीं. चांद्रसौर मानांचा मेळ घालण्यासाठीं कधीं कधीं तेरावा महिना धरणाऱ्या ऋषीनां अल्पावधि उषा माहीत होती हें उघडच आहे. उषा ही वैदिक देवता ऋषींनाही प्राचीन असून तिचें वर्णन त्यांना परंपरागत माहीत होतें, व तें त्यानीं जशाचें तसें आजही आपल्यासाठीं राखून ठेविलें आहे. हें ज्ञान त्यांना हजारो वर्षें कसें ठेवितां आलें ह्याचा विचार पुढें करूं; सध्या इतकेंच सांगणें पुरे आहे कीं आज ब्राह्मण मंडळींनीं चार पांच हजार वर्षें जसे वेद शब्दशः राखून ठेविले आहेत तसेच पूर्वीही ते राहिले होते.

---

* १ ६,३;१,१८०,१;५,७६,१;७,९,१;७,६३,३ इ०.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं वैदिक वाङ्मयांतील उषेच्या वर्णनाचें आधुनिक शास्त्रीय शोधांच्या साहाय्यानें सूक्ष्म निरीक्षण केल्यास त्यावरून खालील अनुमानें स्पष्ट निघतात.

(१) ऋग्वेदांत वर्णिलेली उषा इतकी दीर्घ होती कीं तिच्या प्रथम-दर्शनापासून सूर्योदयापर्यन्त कित्येक दिवस (चोवीस तासांचे अवधि) जात असत; अथवा पुष्कळ उषा एकामागून एक येऊन त्यांचें सूर्योदयांत पर्यवसान होई. (ऋ. ७,७६,३;२,२८,९.).

(२) ऋग्वेदांत उषेविषयीं जे अनेकवचनी प्रयोग आहेत, ते केवळ बहुमानार्थक किंवा वर्षाच्या ३६० उषांचे दर्शक नसून ध्रुवावरील दीर्घ उषेच्या दिवसावधि **तीस भागांचे** द्योतक आहेत. (१,२३,८;६,५९,६; तै. सं. ४,३,११,६.).

(३) पुष्कळ उषा **एकाच ठिकाणीं** राहून **एकसतानें** वागत आणि कधींही एकमेकींशी **भांडत नसत** (४,५१,७–९; ७,७६,५; अ. वे. ७,२२,२).

(४) उषेचे **तीस भाग** पृथक् पृथक् नसून **एकाला एक लागून** असे **अखंडित** होते. (१.१५२,४; तै. ब्रा. २,५,६,५; अ. वे. ७,२२,२)

(५) या तीस उषा किंवा एकाच उषेचे तीस भाग **चक्राप्रमाणें वाटोळे फिरत** व पुनः त्याच ठिकाणीं येत.

या सर्व गोष्टी ध्रुवावर किंवा त्याच्या जवळच्या प्रदेशांत दिसणाऱ्याच आहेत हें सांगावयास नकोच. त्यांत शेवटची तर खुद्द ध्रुवावरच शक्य आहे. तर आतां उषा ही वैदिक देवता मूळ ध्रुवोत्पन्न आहे असें अनुमान करावयास कोणतीही हरकत नाहीं. यावर एक शंका येण्यासारखी आहे; ती अशी कीं ध्रुवावरची उषा ४५ पासून ६० दिवसांची असतां ती फक्त तीसच दिवसांची वरील वर्णनांत सांगितली आहे हें कसें ? पण ही अडचण फारशी महत्वाची नाहीं. तेजाचें वक्रीभवन किंवा परावर्तन करण्याच्या वातावरणाच्या शक्तीवर उषेचा अवधि अवलंबून असतो; व ही शक्ति कमीजास्त उष्णतामानावर अथवा दुसऱ्या कांहीं परिस्थितीवर अवलंबून असते. शिवाय खुद्द ध्रुवबिन्दूच्या थोडेसें खालीं आल्यासही उषेचा अवधि कमी होईल. म्हणजे उषेच्या

वर दिलेल्या वर्णनांत ज्योतिःशास्त्राच्या विरुद्ध असें कांहीं नाहीं. आणखी हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं ही उषा कधीं कधीं ठराविक वेळापेक्षां अधिक वेळ क्षितिजावर राहिल्यामुळें कंटाळून लवकर जाण्याविषयींही तिची ऋग्वेदांत प्रार्थना केली आहे* [५,७९,९]. अशा वेळीं म्हणजे उषा वाजवीपेक्षां जास्त काळ क्षितिजावर राहिल्यास कधीं कधीं इंद्राला तिचा रथ मोडून टाकून सूर्याला वर आणावा लागे (ऋ.[1] २,१५,६). हीच गोष्ट इतर ठिकाणींही अन्यरूपानें आली आहे. (ऋ. ४,३०,) यासूक्ता मध्यें इंद्राच्या पराक्रमाचें वर्णन करतांना त्यानें उषेच्या रथाचा चकाचूर करून तिचें हनन केलें असें म्हटलें[2] आहे. या गोष्टींचा संबंध मेघडंबरा-मुळें लुप्त झालेल्या उषेकडे आजपर्यंत लावीत आले आहेत. पण हें करणें तितकें सयुक्तिक दिसत नाहीं. एकदांच घडलेली गोष्ट कांहीं अशा कथेचा मूलाधार असेल असें संभवत नाहीं; तसेंच प्रतिदिनीं नेमक्या उषेच्या वेळेला मेघ येऊन ती लुप्त होत असे असेंही संभवत नाहीं. शिवाय ' ती फार वेळ थांबल्यामुळें तिचा रथ मोडून टाकला ' या शब्दांची फोड वरील खुलाशानें होत नाहीं. आपल्या उपपत्तीनेंच म्हणजे साधारण मानानें तीस दिवस दिसणारी उषा स्थानपरत्वें व हवामानपरत्वें अधिक दिवस दिसण्याच्या वेळचें हें वर्णन आहे असें मानिल्यानेंच त्यांचा नीट उलगडा होतो. उषा आणि इतर प्रातःकालिक देवता याविषयींच्या दुस-ऱ्याही अनेक कथा ध्रुवोपपत्तीवरून नीट समजण्यासारख्या आहेत; परंतु या उपपत्तीच्या सिध्यर्थ प्रत्यक्ष प्रमाणें सर्व देऊन झाल्यावर त्यांचा स्वतंत्रपणें विचार करूं.

आतां उषा ही वैदिक देवता मूळची ध्रुवोत्पन्न आहे असें मानिल्यास असा प्रश्न उत्पन्न होतो कीं ' वैदिक ऋषींच्या पूर्वजांनीं तिला हिमोत्तर-कालांत न पहातां हिमपूर्वकालांतच पाहिली असली पाहिजे; मग या

---

* व्युच्छा दुहितर्दिवो माचिरंतनुथा अपः । नेत्वास्तेनं यथा रिपुं तपाति सूरो अर्चिषा ॥ ऋ. ५,७९,९.

१ वज्रेणान उषसः सं पिपेष । ऋ. २,१५,६.

२ एतद् घेदुत वीर्यमिंद्र चकर्थ पौंस्यम् । स्त्रियं यद्दुर्हणायुवं वधीर्दुहितरं दिवः ॥ ऋ. ४, ३०, ८.

प्राचीन काळाचे उल्लेख ऋक्सूक्तांत कां आढळूं नयेत ? ' असे उल्लेख सुदैवानें ऋग्वेदांत कित्येक ठिकाणीं आहेत. ' शश्वत्पुरोषा व्युवास देवी ' म्हणजे ' पूर्वी उषा देवी एकसारखी प्रकाशत असे ' (ऋ० १, ११३, १३) असें जें म्हटलें आहे त्यांत **पुरा** याचा अर्थ याच कल्पांतील प्राचीनकाळीं असा नसून मागच्या कल्पांतील (पुरा कल्प) असा आहे. इंद्राचे **पहिले पराक्रम** (इंद्रस्य नु वीर्याणि प्रवोचं यानि चकार प्रथमानि वज्री ऋ० १,३२,१.) किंवा ' हे पहिले धर्म होते ' (तानि धर्माणि प्रथमान्यासन् १०,९०,१६) अशा वाक्यांतील **पहिला** याचा अर्थ अतिप्राचीन असाच केला पाहिजे. याच कारणास्तव बहुधा सायणाचार्यांनीं ' प्रथमा उषा ' म्हणजे सृष्टीच्या आरंभींची उषा असा अर्थ केला असावा. तै० संहितेंत तर देवांनीं तीस उषा पाहिल्याची गोष्ट प्राचीन ह्मणून ह्मटलेंच आहे. असें असतांनां उषेच्या प्राचीनत्वाविषयीं ऋग्वेदांत कांहीं सांगितलेलें नाहीं असें कसें ह्मणतां येईल ! या विषयाचें विशेष विवेचन आपल्या उपपत्तीला आधारभूत असलेला इतर सर्व प्रत्यक्ष पुरावा देऊन झाल्यावर करूं. ऋग्वेदांतील कित्येक मनोरम सूक्तांचा विषय होऊन बसलेली जी उषा तिच्या अवधीचा विचार करून, ती देवता ध्रुवविशिष्ट आहे असें दाखविण्यासाठीं येथवर पुरावा देऊन त्याचें विवरण केलें. आतां त्याच्या पुढच्या ध्रुवविशिष्ट गोष्टी घेऊन त्यांच्यावरून आपल्या उपपत्तीला वळकटी आणणारा आणखी कांहीं पुरावा ऋग्वेदांत मिळतो कीं नाहीं तें पाहूं.

पांचव्या प्रकरणाची पुरवणी.

तिसि उषा.

८७ आणि ८८ या पानांवर सांगितलेला तैत्तिरीय संहितेंतील वचनें.

तै. सं. कांड ४ थें, प्रपाठक ३, अनुवाक ११.

इयमेव सा या प्रथमा व्यौच्छदन्तरस्यां चरति प्रविष्टा ।
बधूर्जजान नवगज्जनित्री अर्य एनां महिमानः सचन्ते ॥ १ ।
छन्दस्वती उषसा पेपिशाने समानं योनिमनु सञ्चरन्ती ।
सूर्यपत्नी वि चरतः प्रजानती केतुं कृण्वाने अजरे भूरि रेतसा॥ २॥
ऋतस्य पंथामनु तिस्र आगुस्त्रयो घर्मासो अनु ज्योतिषाऽऽगुः ।
प्रजामेकारक्षत्यूर्जमेका व्रतमेका रक्षति देवयूनाम् ॥ ३ ॥
चतुष्टोमो अभवद्या तुरीया यज्ञस्य पक्षावृषयो भवन्ती ।
गायत्रीं त्रिष्टुभं जगतीमनुष्टुभं बृहदर्कं युञ्जानाः सुवराभरन्निदम् ॥४॥

टीप.—या अनुवाकांतील १, २, ३, ४ हे मंत्र अथर्ववेदांतही थोडयाबहुत फरकानें आले आहेत. ते असे.

इयमेव सा या प्रथमा व्यौच्छदास्वितरासु चरति प्रविष्टा ।
महान्तो अस्यां महिमानो अन्तर्वधूर्जिगाय नवगज्जनित्री ॥
(अ. वे. ३, १०,४ व ८, ९, ११).
छन्दःपक्षे उपसा पेपिशाने समानं योनिमनु सं चरेते ।
सूर्यपत्नी सं चरतः प्रजानती केतुमती अजरे भूरि-रेतसा ॥
ऋतस्य पन्थामनु तिस्र आगुस्त्रयो घर्मा अनु रेत आगुः ।
प्रजामेका जिन्वत्यूर्जमेका राष्ट्रमेका रक्षति देवयूनाम् ॥ अ. वे. ८, ९, १२ : ४.

पंचभिर्धाता विदधाविदं यत्तासा ꣳ स्वस्रूरजनयत् पंचपंच ।
तासामु यन्ति प्रयवेण पंच नाना रूपाणि ऋतवो वसानाः ॥ ५ ॥
त्रिꣳशत्स्वसार उप यन्ति निष्कृत ꣳसमानं केतुं प्रतिमुञ्चमानाः ।
ऋतूꣳस्तन्वते कवयः प्रजानतीर्मध्ये छन्दसः परि यन्ति भास्वतीः ६
ज्योतिष्मती प्रति मुञ्चते नभो रात्री देवी सूर्यस्य व्रतानि ।
वि पश्यन्ति पशवो जायमाना नानारूपा मातुरस्या उपस्थे ॥ ७ ॥
एकाष्टका तपसा तप्यमाना जजान गर्भं महिमानमिन्द्रम् ।
तेन दस्यून् व्यसहन्त देवा हन्ताऽसुराणामभवच्छचीभिः ॥ ८ ॥
अनानुजामनुजां मामकर्त सत्यं वदन्त्यन्विच्छ एतत् ।
भूयासमस्य सुमतौ यथा यूयमन्या वो अन्यामति मा प्र युक्त ॥ ९ ॥
अभून्मम सुमतौ विश्ववेदा आष्टे प्रतिष्ठामविदद्धि गाधम् ।
भूयासमस्य सुमतौ यथा यूयमन्या वो अन्यामति मा प्र युक्त ॥ १० ॥

अग्नीषोमावदधुर्या तुरीयासीद्यज्ञस्य पक्षावृषयः कल्पयन्तः ।
गायत्रीं त्रिष्टुभं जगतीमनुष्टुभं बृहदर्कीं यजमानाय स्वराभरन्तीम् ॥
(अ. वे. ८, ९, १४).

८.—हा मंत्र अथर्ववेदांतही आला आहे (३, १०, १२). त्यांत दुसऱ्या चरणांत थोडा फरक आहे. तो असा.

तेन देवा व्यषहन्त शत्रून् हन्ता दस्यूनामभवच्छचीपतिः ।

११. अ. वे. ८, ९, १५, " समानमूर्धीः "च्या ऐवजीं त्यांत ' ता एक-मूर्धीः ' असें आहे.

पंच व्युष्टीरनु पंच दोहा गां पञ्चनाम्नीमृतवोऽनु पंच ।
पञ्च दिशः पञ्चदशेन क्लृप्ताः समानमूर्ध्नीरभि लोकमेकम् ॥११॥

ऋतस्य गर्भः प्रथमा व्यूषुष्यपामेकां महिमानं बिभर्ति ।
सूर्यस्यैका चरति निष्कृतेषु घर्मस्यैकां सवितैकां नि यच्छति॥१२॥

या प्रथमा व्यौच्छत् सा धेनुरभवद्यमे ।
सा नः पयस्वती दुह्वोत्तरामुत्तरा ँ समाम् ॥ १३ ॥

शुक्रर्षभा नभसा ज्योतिषाऽऽगाद् विश्वरूपा शबलीरग्निकेतुः ।
समानमर्थ ँ स्वपस्यमाना बिभ्रती जरामजर उष आगाः ॥१४॥

ऋतूनां पत्नी प्रथमेयमागादन्हां नेत्री जनित्री प्रजानाम् ।
एका सती बहुधोषा व्युच्छस्यजीर्णा त्वं जरयति सर्वमन्यत् ॥१५॥

तै. सं. का. ५, प्र. ३, अनु. ४, वर्ग ७.

न वा इदं दिवा न नक्तमासीदव्यावृत्तं ते देवा एता व्युष्टीरपश्यन् ता उपादधत ततो वा इदं व्यौच्छद्यस्यैता उपधीयन्ते व्येवास्मा उच्छत्यथो तम एवापहते ।

---

१३. अ. वे. ३, १०, १. 'या प्रथमा व्यौच्छत्' बद्दल त्यांत 'प्रथमा ह व्युवास ।' आणि 'धुक्ष्व' बद्दल 'दुहाम्' असें आहे. ऋ. ४, ५७,४ यांतही दुसरें अर्ध अथर्ववेदाप्रमाणेंच आहे.

भावार्थ.

तै. सं ४,३,११.

१ जी प्रथम प्रकाशमान झाली तीच ही (उषा). हिच्यांत (पृथ्वींत) प्रविष्ट होत्साती ती भ्रमण करिते. नूतन विवाहवती प्रजोत्पादिका वधू उत्पन्न झाली. महिमायुक्त असे तिघे तिच्या मागोमाग येतात.

२ छंदांनीं युक्त प्रकाशमान होणाऱ्या व एकाच स्थानांत संचार करणाऱ्या अशा दोन उषा सूर्याच्या पत्न्या जराविरहित व प्रचुर रेतानें युक्त होत्साऱ्या (आपला मार्ग) बरोबर जाणत व पताका प्रकट करीत भ्रमण करितात.

टीपः—**१ या प्रथमा व्यौच्छद्**—जी प्रथम प्रकाशमान झाली:—अर्थात् पुढें सांगितलेल्या तीस उषांपैकीं पहिली. उषेपासून नूतन वर्षाचा आरंभ होतो असें पुढें तेराव्या मंत्रांत सांगितलें आहे. अर्थात् या तीस उषा वर्षारंभींच्या असून त्यांतील पहिली पहिल्या मंत्रांत सांगितली आहे. ही उषा सृष्ट्यारंभ-कालीन होय असें सायणाचार्यांचें मत आहे (आदिसृष्टिकाले प्रथमो यः प्रभात-कालस्तद्रूपेयमिष्टकेत्यर्थः). परंतु संदर्भावरून तसें दिसत नाहीं.

हिच्यांत प्रविष्ट होत्साती:—हिच्यांत ह्मणजे पृथ्वींत (**पृथिव्यां**—सायण) अथर्ववेदांतील पाठाप्रमाणें 'इतरां (उषांत) मध्यें प्रविष्ट होत्साती' असा अर्थ होईल. या अर्थाप्रमाणें पहातां अनेक उषांच्या कलापापैकीं ही एक होय असें स्पष्ट होतें.

महिमायुक्त असे तिघे—अग्निसूर्यचंद्ररूपाः देवताः (सायण). यास्कानें अग्नि, वायु किंवा इंद्र आणि सूर्य अशा तीन मुख्य देवता सांगितल्या आहेत (नि. ७, ५,). 'तीन अग्नी (घर्म) उषेबरोबर येतात' (त्रयो घर्मासा उषसं सचन्ते) असें ऋग्वेदांत सांगितलें आहे (३, ३३, ७). तसेंच ७, ७८, ३ यांत उषांनीं सूर्य, यज्ञ आणि अग्नि यांना उत्पन्न केलें असे ह्मटलें आहे. या तीन देवता निरनिराळ्या प्रकारांनीं सांगितल्या असल्या तरी प्रस्तुत मंत्रां-तील उल्लेखाचा संबंध प्रथम उषेच्या उदयानंतर होणाऱ्या सूर्योदयाशीं व यज्ञाग्निप्रज्वलनाशीं आहे हें उघड आहे.

२ छंदानीं युक्त—छंदोयुक्त मंत्रांनीं स्तुति केलेल्या (सायण). सूक्तपठणानें

३ तिवी (उषा) ऋतांच्या मार्गानें येत्या झाल्या. प्रकाशासह तीन अग्नी (घर्म, तिच्या मागून येते झाले. त्या उषां पैकीं एक (यजमानाच्या) प्रजेचें रक्षण करिते, दुसरी बलाचें रक्षण करिते आणि तिसरी ईश्वर-प्राप्तीची इच्छा करणाऱ्यांच्या कर्मांचें रक्षण करिते.

४ जी चवथी उषा ती यज्ञाचे पक्ष जे ऋषी त्यांप्रमाणें आचरण करणारी होत्साती चतुष्टोम झाली. गायत्री, त्रिष्टुभ्, जगती आणि अनुष्टुभ् व मोठें स्तोत्र यांच्या योजनेनें त्यांनीं हा प्रकाश आणिला.

प्रभात काल दुमदुमून गेल्याचें ऋ, ३, ६१, १ आणि ६ यावरून दिसून येईल. पुढें ६ व्या मंत्रांतील 'मध्ये छंदसः' यां शब्दांतही हींच कल्पना आहे.

या मंत्रांतील उषेला दिलेलीं विशेषणें ऋग्वेदांतही तिला अनेक ठिकाणीं दिलेलीं आहेत. (पहा, ऋ. १,९२,४;७,७६,५;४,५,१३;१,११३,१३)

दोन उषा—सायणाचार्यांच्या मतें पहिली उषा सृष्ट्यारंभकालीन व दुसरी दररोजची होय (द्वे ह्युषसौ, एका सृष्टिकालीना 'प्रथमा' इति पूर्वमंत्रोक्ता अपरा प्रतिदिनसंचारिणी). पण यापुढें आचार्यांनीं हा अर्थ सोडून दिलेला दिसतो. पहिल्या उषेनंतर आणखी एक आल्यानें आतां त्या दोन झाल्या हें उघड आहे. दोन, तीन, पांच किंवा तीस उषांचे कलाप एकत्र संचार करतात असें सांगितलें असल्यामुळें त्या उषा प्रतिदिनीं येणाऱ्यांपैकीं नव्हत यांत शंका नाहीं. या उषा सूर्य प्रकाशान्तरित नसून अखंड एकी मागून एक येणाऱ्या होत.

३ **तिघी उषा**—मागच्या दोन व ही एक मिळून आतां तीन झाल्या. या संख्यावृद्धीचें कारण आचार्यांनी सांगितलेलें नाहीं.

४ **चवथी उषा**--आतां आणखी एक मिळून चार उषा झाल्या. उषा वास्तविक एकच असून योग सामर्थ्यानें अनेक रूपें धारण करिते असें सायणाचार्य ह्मणतात! (यद्यपि एकैव उषा तथापि जगद्रक्षणाय योगैश्वर्यादनेक शरीरस्वीकारे सति बहव उषसो भवन्ति).

ऋषींप्रमाणें आचरण करणारी इ.—चार ऊषांना चतुष्टोमाची उपमा दिली आहे. ऐ. ब्रा. ३,४२ यांत चतुष्टोमाचें वर्णन दिलें आहे. गायत्री इ. त्यांतील छंद होत. या स्तोमाचें फल प्रकाश. **स्वः** याचा स्वर्गलोक असा अर्थ सायणाचार्यांनी केला आहे.

५ विधात्यानें या पांचांसह प्रत्येकीला पांच पांच याप्रमाणें स्वसा (बहिणी) निर्माण केल्या. त्यांचे पांच मार्ग (ऋतु) नाना रूपें धारण करीत समूहानें गमन करतात.॥ ६ ॥

६ समान पताका धारण करणाऱ्या तीस स्वसा नियमित स्थानाकडे गमन करतात. ज्ञानयुक्त होत्साऱ्या त्या ऋतु उत्पन्न करतात. तेजस्वी अशा त्या (आपला मार्ग) जाणत, छंदांच्या गजरांस चक्राकार भ्रमण करतात (परियन्ति).

---

५ **पांचासह**—उषांची संख्या पांच झाल्यावर पांचा पांचानीं पुढील सृष्टि झाली.

पांच मार्ग—'तासां पंच क्रतवः प्रवयेन यन्ति' असा अन्वय. क्रतवः म्हणजे यज्ञ असा अर्थ सायणाचार्यांनीं केला आहे. पण 'अनवद्या त्रिंशतं योजनान्येकैका क्रतुं परियन्ति सद्यः" यांत क्रतु याचा अर्थ 'नियत स्थान' असा उघड आहे (१,१२३,८. पान ९० पहा) तोच अर्थ येथेंही घेतला पाहिजे.

समूहानें—सहा उषांचा एक कलाप असे तीस उषांचे पांच कलाप झाले. "ता देव्यः कुर्वते पंच रूपा" हें तै. ब्राह्मणांतील (२,५,६,५) मागें सांगितलेलें वाक्य पहा (पान ८८). आपापल्या नियत स्थानांत व्यक्तिशः फिरणाऱ्या अशा तीस उषांचे पांच कलाप यांत वर्णिले आहेत. प्रत्येक कलापांत सहा सहा उषा असून त्यांचे प्रत्येकीं नियत मार्ग असल्यामुळें हे पांच ऋतु विविध रूपें धारण करतात असें म्हटलें आहे.

६. **तीस स्वसा**—महिन्याच्या तीस दिवसांच्या मिळून तीस उषा होत असें आचार्यांनीं ५ व्या मंत्राच्या भाष्यांत सांगितलें आहे. परंतु ३६० दिवसांपैकीं फक्त एकाच महिन्याच्या तीस उषा कां सांगितल्या याचा खुलासा त्यांनीं केलेला नाहीं. शिवाय हा त्यांचा अर्थ संदर्भाविरुद्ध आहे (पान ८९ पहा). उषांना स्वसा असें ऋग्वेदांतही म्हटलें आहे. (१, १२४,८-९)

नियतस्थान—**निष्कृतम्**-हा शब्द उषांच्या मार्गाचा वाचक असा ऋग्वेदांतही आला आहे (१,१२३, ९ अहरहर्निष्कृतमाचरन्ती). दैनंदिन परिभ्रमणामध्यें उषा एकाच स्थानीं येत असतील तरच हा शब्द यथार्थ होईल.

७ नभामध्यें प्रकाशमान होणारी रात्री देवी सूर्याच्या व्रतांचा स्वीकार करते. या मातेच्या (पृथ्वीच्या) उत्संगावर (मांडीवर) उत्पन्न होणारे नानाविध पशू विविध व्यवहार पाहूं लागतात.

८ तपाच्या योगानें तेजस्वी होणारीं एकाष्टका महिमायुक्त अशा इन्द्र-रूप गर्भाला जन्म देती झाली. त्याच्या साहाय्यानें देवांनीं शत्रूंना हत-वीर्य केलें. आपल्या सामर्थ्यानें तो असुरांचा वधकर्ता झाला.

मध्येच्छंदसः परियन्ति—मध्येछंदाः हें विशेषण सूर्याचें समजून उषा सूर्याभोंवतीं फिरतात असें सायणाचार्यांनीं म्हटलें आहे. परंतु इतका दूरचा अर्थ घेण्याचें कारण नाहीं. उषःकालींही छंदोगायन चाललेलें असतेंच.

७ नभामध्ये—नभः म्हणजे 'नभस्थस्य' असें समजून आचार्यांनीं त्याचा संबंध सूर्याकडे लाविला आहे. कसेंही केलें तरी मुख्यार्थ बदलत नाहीं.

पशवः—प्रातःकालिक तेजाचाच वाचक हा शब्द आहे. त्याला बहुधा गाई (गावः) या पदानें उल्लेखिलें असतें. ऋ. १,९२,१२ यांत उषेला ' पशून् प्रथाना '–' पशूंना पसरणारी ' असें म्हटलें आहे.

८. एकाष्टका—इन्द्राचा जन्म म्हणजे अर्थात् या तीस अखंड उषानंतर होणारा सूर्योदय होय. एकाष्टका म्हणजे माघ वद्य अष्टमी असा अर्थ आप-स्तंब सूत्राला (८,२१,१०) अनुसरून सायणाचार्यांनीं केला आहे. वेद-कालनिर्णयांतील कृत्तिकाप्रकरणांत सांगितलेल्या संवत्सरसत्राचे अनुवाकांत (तै. सं. ७,४,८) एकाष्टकेचा हाच अर्थ असावा; याविषयीं विवेचन तेथें आलेंच आहे. एकाष्टका हा संवत्सराचा प्रथम दिवस ऊर्फ त्याची पत्नी असें म्हटलें आहे- म्हणजे त्या सुमारास सूर्य दक्षिणायन संपवून उत्तरेकडे वळे, आणि म्हणून संवत्सराचा आरंभ एकाष्टकेला करावा असें सांगितलें. पण ही स्थिति वसंत-संपात कृत्तिकांत असतांच्या वेळची आहे. या काळाच्या पूर्वी एकाष्टका म्हणजे सूर्योदयापूर्वी येणाऱ्या अनेक उषांपैकीं शेवटची उषा असा अर्थ असावासा वाटतो. एकाष्टका शब्दांतील **एक** शब्दाचा अर्थ कदाचित् वर्षाचा पहिला महिना असा असून शेवटची उषा पहिल्या चांद्र महिन्याच्या अष्टमीला पडत असावी.

९ अनुज (मागाहून जन्मलेला सोबती) विरहित असलेल्या मला तुम्ही सानुज केलेंत. सत्य भाषण करणारी तूं आहेस, तर मीं मागतों कीं ज्या प्रमाणें तुमच्यांपैकीं कोणीही दुसरीचें अतिक्रमण करीत नाहीं त्याप्रमाणें मीं त्या (अनुजा) च्या कृपेंत असावें.

१० सर्व जाणणाऱ्या (इंद्रा) विषयीं माझी बुद्धि चांगली आहे. त्यानें तिला स्थिर केली आहे, आणि त्याला तींत स्थानही मिळालें आहे. (तर) ज्याप्रमाणें तुह्मीं एकमेकींचें अतिक्रमण करीत नाहीं याप्रमाणें मीही त्याच्या कृपेंत असावें.

११ पांच उषांना अनुसरून पांच दोह आहेत; पांच नांवाच्या गाईला अनुसरून पांच ऋतु आहेत. पंधरा जणांनीं संपादन केलेल्या पांच दिशांमिळून एका लोकाला अभिमुख असें एकच शीर्ष आहे.

---

९. **मला सानुज केलेंत**—हा अनुज ह्मणजे मागील मंत्रांत सांगितलेला इंद्र किंवा सूर्य होय. याची आपल्यावर कृपा असावी अशी ऋषीची प्रार्थना आहे. हा इंद्राचा ह्मणजे सूर्याचा जन्म तीस उषा होऊन गेल्यावर झालेला आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सत्य भाषण करणारी—सत्यं वदन्ती हें पद संबोधनाचें अनेकवचन ह्मणून आचार्यांनीं मानिलें आहे–पण तसें मानणें व्याकरणाच्याविरुद्ध आहे. पदपाठांत 'वदंती' असेंच प्रथमेचें एकवचनाचें रूप स्पष्ट दिलें आहे. पण त्यांत भाषांतरास अडचण पडते. 'सत्यं वदंती' याच अर्थाचें 'सूनृता ईरयन्ती' असें विशेषण ऋग्वेदांत (३,६१,२) उषेला लाविलेलें आहे.

तुह्मीं एकमेकींचे इ०–ऋ. ७, ७६, ५ पहा. अनेक उषा एकत्र असूनही एकमेकींचे विरुद्ध खटपट करीत नाहींत (न यतन्ते मिथस्ते) असें ह्मटलें आहे.

१० सर्व जाणणारा–विश्ववेदाः ह्मणजे उषा असें सायणाचार्यांनीं घेतलें आहे. पण या पदाचा संबंध उघड उघड 'अनुजाशीं' आहे. ऋषीला परस्परांची बुद्धि परस्परांविषयीं चांगली असावी असें वाटत आहे. आपली बुद्धि इंद्राविषयीं चांगली आहे असें सांगून त्याचीही आपल्या विषयीं तशीच असावी असें तो ह्मणतो. विश्ववेदाः हें विशेषण इंद्राला व अग्नीला ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं लाविलेलें आहे, (६,४७,१२;१,१४७,३ इ०).

११ पांच दोह—पांच दोह म्हणजे तामिस्रा (काळोख), ज्योत्स्ना (चंद्र-

१२ पहिली उषा ऋताचें अपत्य होय. एक जलांचा महिमा वृद्धिंगत करते. एक सूर्याच्या प्रदेशांत संचार करते. एक घर्माच्या प्रदेशात संचार करते; आणि एकीचें सविता नियमन करतो.

१३ जी प्रथम उदयास आली ती यमलोकांत धेनु झाली; पयानें युक्त अशी ती आह्मांला प्रतिवर्षी दुग्ध देवो.

१४ प्रकाशयुक्त नक्षत्रांत (शुक्र) श्रेष्ठ, अनंत रूपें धारण करणारी, शबल वर्णाची, अग्निरूप ध्वज असलेली ही उषा प्रकाशासह आकाशांत आली. समान अर्थाचें संपादन करण्यासाठीं नीट झटणारी, जरा (वृद्धपण) धारण करणारी पण जरायुक्त न होणारी अशी जी तूं ती, हे उषे, तूं आलीस.

प्रकाश) दोन संध्या आणि दिवस असे होत असें आचार्यांनीं तै. ब्राह्मणाला (२,२,९,६,९) अनुसरून म्हटलें आहे. हे प्रजापतीचे दोह होत. (एते वै प्रजापतेर्दोहाः). यांत पांच उषःकलापांपासून पुढील सर्व पंचविध सृष्टि उत्पन्न झाली, असें म्हणण्याचा आशय दिसतो.

पांच नांवांची गाय—म्हणजे पृथ्वी (सायणाचार्य) पांच ऋतूंत पृथ्वीला पांच निराळीं नांवें आहेत; वसंतांत **पुष्पवती**, ग्रीष्मांत **तापवती**, वर्षाऋतूंत **वृष्टिवती**, शरदांत **जलप्रसादवती**, आणि हेमंतशिशिरांत **शैल्यवती**. हेमंतशिशिरांना एक समजून एकंदर ऋतु पांच म्हटले आहेत.


पंधरा—ऐतरेय ब्राम्हणांत (३,४२) सांगितलेला हा पंचदश स्तोम होय.

१३ **प्रतिवर्षी**—या शब्दावरून ही पहिली उषा संवत्सरारंभींची होय असें स्पष्ट दिसतें. ऋ. १,२३,१० यांत तमापासून गाईचें (प्रकाशाचें) दोहन केल्याचें सांगितलें आहे (तमसो गा अधुक्षत्).

१४ **समान अर्थ**—ऋ. ३,६१,३ पहा. यांत समान अर्थाकडे गमन करणाऱ्या उषेला चक्राकार फिरावयास सांगितलें आहे.

जरा धारण करणारी—' समानमर्थं स्वपस्यमाना जरां बिभ्रती ' असा अन्वय येथें घेतला आहे. सायणाचार्यांनीं ' स्वपस्यमाना समानमर्थं बिभ्रती जरामागाः' असा घेतला आहे. कसाही अन्वय घेतला तरी एकंदर मंत्राच्या तात्पर्यांत विशेषसा फरक होत नाहीं.

वैदिक उषा.



सूर्य क्षितिजाखालीं १६ अंशांवर आहे; तेव्हां त्याचे किरण उषेच्या रूपानें क्षिति-जावर दिसूं लागून दर चोवीस तासांत एक एक प्रदक्षिणा करीत, सूर्यबिंब क्षितिज-पातळीच्या वर येईपर्यंत शरांच्या दिशेनें वाटोळे चक्राकार फिरत रहातील.

चित्रशाळा प्रेस, पुणें.

१५ ऋतूंची पत्नी, दिवसांची नेत्री, प्रजांनां उत्पन्न करणारी अशी ही पहिली उषा आली. हे उषे, स्वतः जरारहित असून इतर सर्वांला तूं जीर्ण करतेस. तूं एक असून अनेक प्रकारांनीं प्रकाशित होतेस.

तैत्तिरीय संहिता ५, ३, ४, ७.

तें (कालस्वरूप) दिवसही नव्हे आणि रात्रही नव्हे, असें अनिश्चित होतें. (तेव्हां) देवांनां (त्याचा निश्चय करणाऱ्या) व्युष्टी दिसल्या (त्यांचें आधान करतांनां म्हणावयाचे हे वर दिलेले पंधरा.मंत्र होत). त्यांनीं त्यांचें (व्युष्टि–इष्टकांचें) आधान केलें. तेव्हां तें (कालस्वरूप) स्पष्ट झालें. तस्मात् ज्याच्यासाठीं त्यांचें आधान होतें त्याला प्रकाश मिळतो, त्याचा तम (भ्रांतिरूप) नाहींसा होतो.

या वर दिलेल्या पंधरा मंत्रांनीं व्युष्टि नामक इष्टकांचें आधान करावयाचें असतें. यज्ञकर्मासाठीं लागणारे मंत्र पुष्कळ वेळां निरनिराळ्या सूक्तांतून किंवा अनुवाकांतून घेत असतात. त्यामुळें या पंधरा मंत्रांचा परस्पर संबंध कांहीं नाहीं असें कदाचित् कोणास वाटेल. पण त्यांत दिलेल्या तीस उषांच्या वर्णनावरून हे सर्व मंत्र मूळचे सुसंबद्ध आहेत हें उघड होतें. शिवाय जर हे मंत्र निरनिराळ्या सूक्तांतून घेतलेले असते तर ते सोळा पाहिजे होते; कारण सोळा व्युष्टि–इष्टकांचें आधान करावयाचें असतें. म्हणून या अनुवाकांत पंधराच मंत्र आहेत ही एकच गोष्ट त्यांचा परस्पर

---

१५ **एक असून अनेक इ.**—या वर्णनावरून अनेक भागांमिळून झालेली एक अखंड उषाच या अनुवाकांत विवक्षित आहे असें दिसतें.

दिवसांची नेत्री इ.—हीं विशेषणें ऋग्वेदांतही (७,७७,२) उषेला लाविलेलीं आहेत.

१ हा वर्ग वरील अनुवाकानंतर पंचम कांडांत आला आहे. यांत व्युष्टिनामक इष्टकांचें आधान सदरील पंधरा मंत्रांनीं कां करावयाचें तें सांगितलें आहे. तैत्तिरीय संहितेंत असें स्पष्टीकरण ज्यांत दिलेलें असतें त्या भागाला ब्राह्मण अशी संज्ञा आहे.

२ **तेव्हां इ०–तेव्हां** शब्दावरून सूर्योदयापूर्वी तीसही उषा येऊन गेल्या होत्या असें ह्मणण्याचा आशय दिसतो. पूर्वी पान ८८ येथें उषा अखंड एकसारखा होत्या असें सांगणारें तै. संहितावचन दिलेलें आहेच (शश्वतीर्नावपृज्यंति).

संबंध सिद्ध करण्यास पुरेशी आहे. आतां यांतील कांहीं मंत्र अथर्ववेदांत तुटक तुटक किंवा अन्य संदर्भांत आले आहेत हें खरें. पण तेवढ्यावरून तैतिरीय संहितेंतील हा अनुवाक तीस उषांचें सुसंबद्ध वर्णन करणारा नसून फुटकळ मंत्रांनीं झालेला आहे असें म्हणतां येत नाहीं. खरें पाहिलें असतां हा प्रश्नच मुळीं फारसा महत्वाचा नाहीं; कारण त्यांपैकीं पांचवा व सहावा हे दोनच मंत्र प्रस्तुत मुद्दा म्हणजे वैदिक उषा ह्या तीस उषांचा कलाप होत्या ही गोष्ट शाबीत करवयास पुरेसे आहेत. उषा तीस पावलें चालली (ऋ.६,५९,६) किंवा त्या तीस योजनें वाटोळ्या फिरतात (१,१२३,८) असें जें ऋग्वेदांत झटलें आहे त्याचें आजपर्यंत पौरस्त्य पाश्चात्य अशा दोन्ही विद्वानांनां गूढ पडलें होतें. पण उषांची संख्या तीस होती असें समजल्यावर या वाक्यांचा उलगडा सहज होतो. प्रस्तुत विषयासंबंधानें आतां एकच महत्वाचा प्रश्न उरला. तो असा कीं या उषा तीस दिवसांच्या तीस उषा कीं सर्वीं मिळून झालेली तीस दिवसांच्या अवधीची एकच उषा ? पांचव्या प्रकरणांत दिलेल्या पुराव्यावरून यांपैकीं दुसरीच कल्पना खरी होय असें दिसून येईल. वैदिक ऋषींना साध्या उषा माहीत होत्या. पण जिला त्यांनीं प्रातर्देवता झणून मानिली ती दीर्घरात्रीनंतर येणारी दीर्घ उषाच होय; ही चक्राकार भ्रमण करणारी तीस दिवसांच्या अवधीची उषा ध्रुवापासून थोडयाशा अंशांबाहेर दिसावयाची नाहीं.

प्रकरण ६ वें.

दीर्घ रात्र आणि दीर्घ दिवस.

दीर्घावधि उषेवरून दीर्घ दिवसरात्रींचें अनुमान होतेंच–तरी त्यांसंबंधीं स्वतंत्र प्रमाणेंही मिळतात–वृत्राचें दीर्घ तमांत शयन–तमाच्या पाराला पोंच-ण्याविषयींची उत्कंठा–दीर्घाः तमिस्राः–रात्रीच्या दुसऱ्या पाराला सुखरूप पोंचविण्याकरितां केलेल्या प्रार्थना–जिचें पर तीर माहीत नाहीं अशी अथर्व-वेदांतील रात्र–रात्र संपून जाणार नाहीं अशा भीतीनें प्राचीन ऋषींनीं या प्रार्थना केल्या असा खुलासा तैत्तिरीय संहितेंत केला आहे–सायणाचार्यांचा अर्थ–त्याचें खंडन–पुराकल्पाचें उदाहरण म्हणून हें वचन सायणाचार्यांनीं दिलें आहे–तें ध्रुवालाच लागू पडणारें आहे–ऋग्वेदांतील रात्रिदिवसांचें वर्णन–दिवसरात्रींच्या दोन निराळ्या प्रकारच्या जोड्या–पहिली तेजस्वी, कृष्ण आणि 'विरूपे' अशी आहे–'विरूपे' शब्दाचा अर्थ विविध अवधीची असा आहे, विविध वर्णाची असा नव्हे–दुसरी 'अहनी' नांवाची जोडी पहिलीहून भिन्न आहे–पृथ्वीवरील निरनिराळ्या ठिकाणच्या दिवसरात्रींच्या मानांचें परीक्षण–'अहनी' म्हणजे ध्रुवप्रदेशांतील दीर्घ दिवसरात्रीची जोडी असाच अर्थ केला पाहिजे–तैत्तिरीय संहितेंतील संवत्सराचें वर्णन–दीर्घ दिवस व दीर्घ रात्र हीं त्याच्या डाव्या उजव्या बाजूंना आहेत–ऋग्वेदांतील दीर्घ दिवसाचे स्पष्ट उल्लेख–सूर्यानें आपला रथ आकाशाच्या मध्येंच थांबवून दासांचा प्रतिकार केल्याचें वर्णन–या वर्णनावरून दीर्घ दिवसाचा बोध होतो–दीर्घ दिवस व दीर्घ रात्र यांच्या सिद्ध्यर्थ दिलेल्या प्रमाणांचा सारांश–उषा आणि सूर्य यांना अनुक्रमें दक्षिणा व दक्षिणेचा पुत्र असें म्हटलें आहे, त्याचा संबंध सूर्य ध्रुवावर दक्षिणेस उगवतो या गोष्टीशीं असावा–फिनिशन नाविकांची गोष्ट.

दीर्घ रात्र आणि दीर्घ दिवस.

तीस दिवसांच्या अवधीची अखंड उषा ऊर्फ निकटसंबद्ध अशा दिनावधि तीस उषा यांचा उल्लेख ऋग्वेदांत दाखवून दिल्यावर, असल्या दीर्घ उषेच्या पूर्वी येणारी दीर्घ रात्र आणि त्या दीर्घ रात्रीच्या जोडीला तेवढाच दीर्घ दिवस हीं तिच्या मागोमाग आलींच. या दीर्घ रात्रिदिवसांखेरीज उरलेल्या वर्षाच्या भागांत चोवीस तासांच्या अवधीचीं कांहीं अहोरात्रें असून त्यांत कित्येकवेळां रात्रीपेक्षां दिवस मोठा व केव्हां दिवसापेक्षां रात्र मोठी असा प्रकार असणार. या गोष्टी एकमेकींशीं इतक्या संबद्ध आहेत कीं त्यांतल्या एखादीचा कोठें उल्लेख आढळल्यास बाकीच्यांचा निराळा उल्लेख केलेला पहाण्याचें कारण नाहीं. परंतु हजारों वर्षांपूर्वी अस्तित्वांत असलेल्या गोष्टींचा आपल्याला विचार करावयाचा असल्यामुळें व तो ज्या प्रमाणांवरून करावयाचा तीं प्रमाणें परंपरागत आलेलीं असूनही त्यांचा अर्थ आह्मीं करतों तसा आजपर्यंत कोणी केलेला नसल्यामुळें सदर ज्योतिःशास्त्रविषयक गोष्टी जणूं काय परस्पर संबद्ध नाहींतच असें समजून त्यांतील प्रत्येकीविषयीं स्वतंत्र प्रमाणें मिळविण्याचा प्रयत्न करणें इष्ट आहे. असा प्रयत्न केला ह्मणून या गोष्टींच्या अन्योन्यसापेक्षत्वासंबंधानें ह्मणजे कांहीं संशय दाखविला असें मात्र नाहीं. या गोष्टींहून अधिक अन्योन्यसंबद्ध अशा गोष्टीच नाहींत. तथापि कोणतीही गोष्ट सिद्ध करण्यासाठीं जीं प्रमाणें दाखवावयाचीं, तीं जितकीं निरनिराळ्या बाजूंनीं दाखवितां येतील तितकीं दाखविणें बरें. ह्मणून आतां दीर्घ दिवस दीर्घ रात्र, सूर्यप्रकाशाच्या किंवा काळोखाच्या महिन्यांची संख्या आणि संवत्सराचें स्वरूप यांविषयीं वैदिक वाङ्मयांत आढळणाऱ्या प्रमाणांचा या व पुढच्या प्रकरणांत स्वतंत्रपणें विचार करूं.

प्रथम दीर्घ रात्र घेऊं. ही रात्र कित्येक दिवसांच्या अवधीची असल्यामुळें आजमितीस उत्तरध्रुवप्रदेश फार थंड व गैरसोयीचे होऊन मनुष्यांना वसती करावयास सर्वथा अयोग्य झाले आहेत. परंतु हिमान्तरकालांत ह्या दीर्घ रात्रीमुळें कित्येक दिवसपर्यंत टिकणाऱ्या अखंड काळोखा-

शिवाय ध्रुवप्रदेशांत दुसरी कांहीं गैरसोय होण्यासारखी होतीसें दिसत नाहीं. हा काळोख ह्मणजे मोठा सुखकर होता असें नाहीं. अर्थात् त्याचा अनुभव घेणारीं मनुष्यें तो केव्हां एकदां संपतो असें मोठ्या उत्कंठेनें ह्मणत असलीं पाहिजेत. या दीर्घावधि भयंकर काळोखाचें वर्णन ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं आलें आहे. इंद्राच्या शत्रूंचीं आश्रयस्थानें या काळोखांत असत आणि तो नष्ट करण्यासाठीं इन्द्राला दासांशीं युद्ध करावें लागत असे उदाहरणार्थ १,३२,१०,यांत **दीर्घं तम आंशयदिंद्रशत्रुः** 'इन्द्राचा शत्रु वृत्र हा दीर्घ अंधारामध्यें पडला' असें म्हटलें आहे; तसेंच ५,३२,५ यांत **युयुत्सन्तं तमसि हर्म्ये धाः** 'युद्धासाठीं उत्सुक झालेल्याला (शुष्णाला) इन्द्रानें अंधारमय खाचेंत लोटिलें' असें सांगून, पुढच्या ऋचेंत **असूर्यं तमाचा** (भयंकर काळोख) उल्लेख केला आहे. या सर्व ठिकाणीं इन्द्र व त्याचा शत्रु (वृत्र व शुष्ण वगैरे) यांच्यांतील युद्धाचें वर्णन केलें आहे. हें युद्ध प्रतिदिनीं होणारें काळोख व प्रकाश यांचें युद्ध असें आजपर्यंत समजत आले आहेत; परंतु तसें मानिल्यास वर उल्लेख केलेल्या शब्दांची सार्थकता मुळींच होत नाहीं. ज्या दीर्घ व भयंकर काळोखाशीं झगडण्याला इन्द्राला आपल्या सर्व साहाय्यकाऱ्यांसह इतकी मेहनत पडत असे व ज्याचा शेवट कधीं होतो ह्मणून वैदिक ऋषी मोठ्या उत्कंठेनें वाट पहात असत तो काळोख कांहीं २४ तासांच्या अहोरात्रांतील खास नसून ध्रुवप्रदेशाजवळील दीर्घ रात्रीचाच असला पाहिजे.

परंतु ही इन्द्रवृत्रांच्या युद्धाची कथा सोडून दिली तरी देखील आपल्या इकडील रात्रीपेक्षां किती तरी पट मोठ्या अशा रात्रीचा स्पष्ट उल्लेख करणारीं वाक्यें ऋग्वेदांत आहेत. काळोखांतून सोडविण्यासाठीं वैदिक ऋषींनीं आपल्या देवतांची किती तरी वेळां प्रार्थना केली आहे. २, २७, १४ यांत "आह्मीं तुमचा कांहीं अपराध केला असेल तर त्याची क्षमा करा, निर्भय असा प्रकाश आह्मांला मिळो आणि दीर्घ काळोख आमच्यावर न येवो" अशी गृत्समदानें अदिति, मित्र आणि वरुण या देवतांची प्रार्थना केली आहे. यांत **दीर्घाः तमिस्राः** या पदांचा अर्थ अखंड काळोखाची दीर्घ रात्र असा करणें बरें. पण कसाही अर्थ धरिला

---

१ अदिते मित्र वरुणोत मृळ यद्वो वयं चकृमा कच्चिदागः । उर्वश्यामभयं ज्योतिरिंद्र मा नो **दीर्घा** अभि नशन्**तामिस्राः** ॥ ऋ. २, २७, १४.

तरी या ऋचेंत दाखविलेली एवढी चिंता जर चोवीस तासांपेक्षां कमी अवधीच्या काळोखाबद्दलच केवळ असेल, तर ती योग्य दिसत नाहीं. १, ४६, ६ यांतं " जी आह्माला काळोखांतून तारील अशी शक्ति आह्माला दे " अशी अश्विनांची प्रार्थना कण्व ऋषीनें केली आहे. ७, ६७, २ यामध्यें वसिष्ठ ऋषि ह्मणतो, " अग्नि प्रदीप्त होऊं लागला, आह्मांला तमाचा अन्त दिसला आणि उषेचा केतु पूर्वेकडे फडकूं लागला. " या सर्व वाक्यांतील काळोख शब्दाचा अर्थ हिंवाळ्यांतील (दिवसापेक्षां) मोठ्या असलेल्या रात्रीचा काळोख एवढाच घेणें सयुक्तिक नाहीं. असल्या यःकश्चित् गोष्टीविषयीं वैदिक ऋषींनीं इतक्या आतुरतेनें देवांनां विनवावें हें शक्य दिसत नाहीं. विसाव्या शतकांतील सुधारलेल्या माणसांसारखीं विद्युद्दीपादि तमोनाशक साधनें वैदिक ऋषींजवळ नव्हतीं, ह्मणून त्यांना रात्र ही मृत्यूप्रमाणें अगदीं भयप्रद वाटत असे असें मानून वरील वाक्यांचा अर्थ कोणी लावतील. पण आजच्या काळांतील पूर्णपणें रानटी स्थितींत असलेलीं माणसेंही वैदिक ऋषींप्रमाणें प्रकाशाविषयीं आतुरता दाखवीत असल्याचें ऐकण्यांत येत नाहीं; शिवाय माणसेंच नव्हेत तर देवही दीर्घ तमांत असल्याचें वर्णन ऋग्वेदांत आहे. १०,१२४,१ यांत अग्नीसंबंधानें **'ज्योगेव दीर्घं तम आशयिष्ठाः'** ह्मणजे 'दीर्घ तमामध्यें अति दीर्घ काळ रहाता झाला' असें ह्मटलें आहे. यांत **ज्योग्** आणि **दीर्घं** ही दीर्घत्ववाचक शब्दांची जोडी हिंवाळ्यांतिल साधी रात्र कितीही मोठी असली तरी तीस लावणें योग्य होणार नाहीं. ऋ. २,२,२ यांत **क्षपः** हा रात्रिवाचक शब्द अनेकवचनीं आलेला असून मॅक्समुल्लरनें त्याचें भाषान्तर 'निरंतरच्या रात्री' असें केलेलें आहे. परंतु 'निरंतरच्या रात्रीं' ह्मणजे काय याचा खुलासा त्यानें केलेला नाहीं. सूर्यप्रकाशाच्या योगानें ज्यांत खंड पडत नाहीं अशा रात्री असा 'निरंतर' शब्दावरून अर्थ समजावयाचा कीं नेहमींच्या रात्री

---

१ या नः पीपरदश्विना ज्योतिष्मती तमस्तिरः । तामस्मे रासाथामिषम् ॥ ऋ. १, ४६, ६.

२ अंशोच्यग्निः समिधानो अस्मे उपो अदृश्रन्तमसश्चिदन्ताः । अचेति केतुरुषसः पुरस्ताच्छ्रिये दिवो दुहितुर्जायमानः ॥ ऋ. ७, ६७, २.

एवढाच समजावयाचा ? मॅक्समुल्लरनें भाषान्तरांत शब्द बरोबर घातला असूनही त्याच्या खऱ्या अर्थाकडे त्याचें लक्ष गेलें नाहीं असें दिसतें.

ध्रुवाजवळील दीर्घ रात्र प्राचीनकाळीं वैदिक लोकांस माहीत होती हें सिद्ध करावयास वर दिलेल्या वचनांसारख्या तुरळक वचनांवरच कांहीं सर्वस्वीं अवलंबून रहावयास नको आहे. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळांतील १२७ वें सूक्त रात्रिदेवतेचें असून त्याच्या ६ व्या ऋचेंत **अथा नः सुतरा भव** ह्मणजे 'आह्मांला तरून जावयाला सुलभ हो' अशी तिची प्रार्थना केली आहे; व त्याच्या परिशिष्टाच्या रात्रिसूक्तांतही 'आह्मांला परतीराला सुखरूप पोंहोंचूं दे' असें तिला विनविलें आहे. अथर्ववेदांतही या परिशिष्टाचा अनुवाद करून 'जिचें परतीर दिसत नाहीं अशा रात्रीच्या ठिकाणीं प्रत्येक गतिमान् वस्तु विश्राम पावते. हे प्रशस्त तमोमय रात्रि, आह्मांला निर्विघ्नपणें तुझ्या तीराला पोंहोंचूं दे' असें ह्मटलें[1] आहे. त्यांतच दुसरे एके ठिकाणीं 'प्रत्येक रात्र (रात्रिं रात्रिं) आमच्या शरीराला इजा झाल्याशिवाय आमची जावो' असें ह्मटलें आहे. आतां येथें असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, या वाक्यांत दिसून येणाऱ्या रात्रीच्या पर तीराला पोंचण्याबद्दलच्या एवढ्या आतुरतेचें कारण काय ? तसेंच तिचें पर तीर दिसत नाहीं असें कां ह्मटलें ? ही रात्र ह्मणजे आपल्या इकडील हिंवाळ्यांतील मोठी रात्र होती कीं ध्रुवाजवळची कित्येक महिन्यांच्या अवधीची दीर्घ रात्र होती. ? या सर्व प्रश्नांचीं उत्तरें तैत्तिरीय संहितेंत सुदैवानें देऊन ठेविलेलीं असल्यामुळें त्यांविषयीं अर्वाचीन टीकाकारांच्या तर्कावरच कांहीं भिस्त टाकायाला नको आहे. त्या संहितेच्या*

---

१ अपन्नोऽहं शिवां रात्रीं भद्रे पारमशीमहि भद्रे पारमशीमहि ॥
२ न यस्याः पारं दद्दशे न योयुवद्विश्वमस्यां नि विशते यदेजति ।
अरिष्टासस्त उर्वि तमस्वति रात्रि पारमशीमहि भद्रे पारमशीमहि ॥
अ. वे. १९,४७,२.

रात्रिं रात्रिमरिष्यन्तस्तरेम तन्वा वयम् ।
अ. वे. १९,५०,३.

* चित्रावसो स्वस्ति ते पारमशीय ॥ तै. सं. १,५,५,४. चित्रावसो स्वति ते पारमशीयेत्याह । रात्रिर्वैचित्रावसुरव्युष्टयै वा एतस्यै पुरा ब्राह्मणा अमैषुः ।

पहिल्याच कांडाच्या पांचव्या प्रपाठकाच्या पांचव्या अनुवाकांत 'हे चित्रावसो, आह्मांला सुखानें तुझ्या तीराला जाऊं दे' असें ह्मणून पुढें सातव्या अनुवाकांत 'चित्रावसु ह्मणजे रात्र, पूर्वकाळीं ही संपून उषा येणार नाहीं ह्मणून ब्राह्मण भीत असत' असें त्याचें स्पष्टीकरण केलें आहे. ह्मणजे यांत रात्र संपणार नाहीं अशी भीति पूर्वकाळीं लोकांना वाटत होती असें स्पष्टपणें सांगणारें वचन आपल्याला मिळालें. आतां याचा अर्थ काय ? रात्र साधी असल्यावर, ती संपणार नाहीं अशी शंका येण्याचें कारण काय ? ही रात्र म्हणजे हिंवाळ्यांतीलच थोडीशी मोठी असलेली रात्र असा अर्थ नित्याप्रमाणें सायणाचार्यांनीं केला आहे. पण असें करण्यांत आचार्यांनीं खोलपणा दाखविलेला मुळींच दिसत नाहीं. कारण हा अर्थ त्यांनींच दुसऱ्या एका प्रकरणांत दिलेल्या एका गोष्टीवरून खोडून काढतां येण्यासारखा आहे. तैत्तिरीय संहितेच्या ज्या भागांत मंत्राचें स्पष्टीकरण असतें त्यांना ब्राम्हण म्हणतात. 'रात्र संपून उषःकाल येईल कीं नाहीं अशा शंकेने पूर्वी ब्राह्मण भीत असत' हें संहितावचन अर्थातच ब्राह्मण या सदराखालीं येईल. ब्राह्मणांतील मजकुराचे आपल्या ब्रह्मवाद्यांनी दहा वर्ग केले आहेत; ते असेः—हेतु, निर्वचन (व्युत्पत्ति), निन्दा, प्रशंसा, संशय, विधि (नियम), परक्रिया, पुराकल्प (जुनी चाल किंवा गोष्ट), व्यवधारणकल्पना (व्याप्ति निश्चित करणें), आणि उपमान. आतां सायणाचार्यांनीं ऋग्वेदावरील आपल्या भाष्याच्या प्रस्तावनेंत यांपैकीं पहिल्या नवांचा उल्लेख केला आहे. व त्यांत आठव्याचें (पुराकल्पाचें) उदाहरण म्हणून हें वर सांगितलेलें तैत्तिरीय

तै. सं. १,५,७,५. यावरील सायणाचार्यांची टीकाः—हेमंततौ रात्रेर्दीर्घत्वेन प्रभातं न भविष्यति एव इति कदाचिद् ब्राह्मणाः भीता अत पारमशीयेति प्रार्थनया प्रभातं लभते । भावार्थ—हेमंत ऋतूंत रात्र दीर्घ असल्यामुळें पहाट होणार नाहीं असें वाटून पूर्वी ब्राह्मण भीत असत. ह्मणून 'पाराला पोहोंचूं दे' अशी प्रार्थना केल्यावर पहाट होई.

१ हेतुर्निवचनं निन्दा प्रशंसा संशयो विधिः । परक्रिया पुराकल्पो व्यवधारणकल्पना ॥ उपमानं दशैवेते विधयो ब्राह्मणस्य तु । एतद्वै सर्ववेदेषु नियतं विधिलक्षणम् ॥

संहितेंतील वाक्य दिलें आहे. म्हणजे आचार्यांच्या मतानेंच ' पूर्वकालीं रात्र संपणार नाहीं अशी ब्राह्मणांना भीति वाटत असे' हें तै. संहितावाक्य पुराकल्प म्हणजे प्राचीन दंतकथा या सदरांत येतें. तें केवळ अर्थवादात्मक नव्हे, हें त्यांतल्या **पुरा** या शब्दावरून उघड दिसून येत आहे. आतां पुढें असा प्रश्न आहे कीं ही रात्र जर आपल्या इकडच्यासारखी साधी असती तर ती सदा सर्वकाळ तशीच असल्यामुळें तिच्या संबंधानें पूर्वी मात्र ब्राह्मण भीत असत असें म्हणून, हल्लीं भीत नाहींत असें कां दर्शविलें ? वैदिक ऋषींना सूर्यास्तानंतर कांहीं तासांनीं उषेचा उदय होतो हें माहीत नव्हतें असें यावर कोणी म्हणतील; परंतु चांद्रसौर मानांचा मिलाफ करण्यापर्यन्त ज्यांची मजल गेली होती त्या वैदिक ऋषींना एवढी साधी गोष्ट समजलेली नसावी हें म्हणणें अगदीं वेडगळपणाचें होईल. यास्तव सायणाचार्यांचें या रात्रीसंबंधाचें मत त्याज्य होय. वैदिक ऋषी भीत असत तें कांहीं हिंवाळ्यांतील साध्या मोठ्या रात्रीला नव्हे. ती रात्र ध्रुवावरचीच असून, **पुरा** या शब्दावरून ती प्राचीन काळापासून वैदिक ऋषींना परंपरागत माहीत होती असें उघड होतें. 'वेदकालनिर्णयांत' सांगितल्याप्रमाणें तैत्तिरीयसंहिता श. पूर्वी २५०० वर्षांच्या सुमारास झाली. तर त्या काळाच्या सुमारास 'जिचें पर तीर दिसत नाहीं अशी रात्र केव्हां एकदां संपते अशी मोठ्या उत्सुकतेनें वाट पहात प्राचीन वैदिक ऋषी आपण तिच्या तीराला सुखरूप जावें म्हणून देवांची प्रार्थना करीत असत ' अशी गोष्ट परंपरागत तत्कालीन लोकांस माहीत होती असें म्हणावयास कांहीं एक हरकत नाहीं. हें रात्रीचें वर्णन ध्रुवावरील दीर्घरात्रीसंबंधाचें आहे असें न मानिल्यास अगदींच अयुक्त दिसतें.

आतां दीर्घ तमाच्या उल्लेखाशिवाय दीर्घ दिवस व दीर्घ रात्र यांच्याविषयीं ऋग्वेदांत कांहीं प्रत्यक्ष वचनें आहेत कीं नाहीं हें पाहूं. ऋग्वेदकालीन पंचागांतील वर्ष ३६० दिवसांचें होतें हें मागें सांगितलेंच आहे. अर्थात् तें ध्रुवमंडलस्थ नव्हे हें उघड आहे. पण या ३६० साध्या दिवसांच्या वर्णनाबरोबरच ध्रुवमंडलाच्या अलिकडच्या प्रदेशांतील रात्रिदिवसांना लागू न पडणारें असें रात्रिदिवसांचें वर्णन ऋग्वेदांत आहे. वैदिक वाङ्मयांत दिवसरात्रीची जोडी कल्पून तिचा द्विवचनी नांवानें उल्लेख केलेला आहे. **उषासानक्ता** (१,१२२,२), **नक्तोषासा** (१,१४२,

७) किंवा **उषसौ** (१,१९८,६) असे शब्दप्रयोग ऋग्वेदांत असून त्या सर्वांचा अर्थ दिवस व रात्र यांची जोडी असा आहे. या जोडीला **अहोरात्रे** असेंही नांव ऐतरेय ब्राह्मणांत आहे. कधीं या जोडीला जुळीं भावंडें तर कधीं बहिणी असेंही झटलें आहे. ऋग्वेद ३, ५५, ११ यांत **अहोरात्रे** या देवतेचें वर्णन आहे. ती ऋचा अशी:—

नाना चक्राते यम्या वपूंषि
तयोरन्यद्रोचते कृष्णमन्यत् ।
श्यावी च यदरुषी च स्वसारौ
महद्देवानामसुरत्वमेकम् ॥

यांपैकीं पहिल्या तीन चरणांत मुख्य गोष्ट सांगितली असून चवथा चरण सर्व सूक्तामध्यें ध्रुवपदासारखा आहे. तिचा सरळ अर्थ असा:-"या जुळ्या अनेक रूपें (शरीरें) करितात; त्यांतील एक तेजस्वी आहे व दुसरी कृष्ण (काळी) आहे. त्या दोन बहिणी असून एक श्यावी (काळी) व दुसरी प्रकाशमान (अरुषी) आहे. देवांचें मोठें देवत्व अद्वितीय आहे." या ऋचेंतील शब्द साधे असूनही तिचा दोन महत्वाच्या गोष्टीसंबंधानें आजपर्यन्त अर्थविपर्यास केलेला आहे. पहिल्या अर्धांत ' या जुळ्या विविध रूपें करतात, व त्यांतील एक प्रकाशते व दुसरी काळी आहे' असें म्हटलें आहे. हें सर्व वर्णन वाटेल त्या दिवस रात्रीच्या जोडीला कांहीं साजेसें नाहीं. त्यांतील दुसरा भाग मात्र सर्वांना लागू पडेल. पहिल्या भागांतील मूळांतील शब्द **नाना चक्राते वपूंषि** असे असून त्यांचा शब्दशः अर्थ 'अनेक रूपें किंवा शरीरें करितात,' असा आहे. या ऋचेंत दिवस रात्रीच्या जोडीचें दोन प्रकारचें वर्णन आहे; तिला तेजस्वी व कृष्ण असें झणून नानारूपें करणारी असेंहा झटलें आहे. ऋ. १, १२३, ७ यांत अहोरात्राला **विपुरूपे अहनी** झटलें असून इतर ठिकाणीं **विरूपे** हें विशेषण दिलें आहे. असें असल्यामुळें **नाना वपूंषि, विपुरूपे** अथवा, **विरूपे** या शब्दांचा संबंध प्रकाश व काळोख यांशीं नसून दुसऱ्या कशाशीं तरी असला पाहिजे. नाहीं तर या दुहेरी वर्णनाला केवळ द्विरुक्ति म्हणावें लागेल. **रूप** व **वपु** यांचा अर्थ वर्ण, रंग असा सायणाचार्यांनीं या प्रकरणांत केला आहे; आणि पाश्चात्य पंडितांनीं त्याचाच अनुवाद केला

१ अहोरात्रे वा उषासानक्ता । ऐ. ब्रा. २, ४.

आहे. पण दिवस रात्रीचे रंग म्हणजे काय ? शिवाय **रूप** याचा 'रंग' असा अर्थ होऊं शकेल, पण **वपूंषि** शब्दाची वाट काय ? या प्रश्नाकडे आजपर्यन्त कोणीच खोल लक्ष पुरविलेलें दिसत नाहीं. तथापि ऋ. १, ११३, ३ या ऋचेसंबंधानें सायणाहून प्राचीन अशा एका टीकाकाराचें मत समजल्यामुळें या प्रश्नाचा थोडासा उलगडा होणार आहे. हीच ऋचा सामवेदाच्या उत्तरार्चिकेंत आली असून **माधव** नांवाच्या भाष्यकारानें विवरण नामक सामवेदावरील आपल्या भाष्यांत **विरूपे** याची व्याख्या केली आहे ती अशी:—सुमेके–संवत्सरे, दक्षिणायने रात्रेर्वै वृद्धिः, उत्तरायणे त्वह्नः, नक्तं रात्रिः, उषाकालप्रभव्यहः।"—संवत्सरांत दक्षिणायनामध्यें रात्र मोठी होते, व उत्तरायणामध्यें दिवस मोठा होतो. म्हणजे त्याच्या मतें **रूप** शब्दावरून दिवसरात्रीच्या अवधीचा बोध होतो असें झालें. अर्थात् **विरूपे** याचा अर्थ 'कमीजास्त अवधीचे' असा केला पाहिजे. अशा रीतीनें माधवाच्या विवरणावरून **नाना चक्राते** या ऋचेच्या पहिल्या अर्धाचा—"त्या जुळ्या कमीजास्त दीर्घ असे अवधि घेतात; त्यां पैकीं एक प्रकाशते व दुसरी काळी आहे," असा अर्थ करावयाला हरकत नाहीं.

पण एवढ्यानेंच कांहीं भागत नाहीं. तिसऱ्या चरणांत आणखी अडचण आहेच. 'त्या दोन बहिणी असून एक काळी व दुसरी प्रकाशित आहे' असें त्यांत म्हटलें आहे. आतां प्रश्न असा आहे कीं या तिसऱ्या चरणांतील बहिणी पहिल्या चरणांत सांगितलेल्या जुळ्यांहून भिन्न आहेत कीं एकच आहेत ? त्या एकच आहेत असें मानिल्यास तिसरा चरण निरुपयोगी ठरतो; भिन्न मानिल्यास कशा तें सांगितलें पाहिजे. टीकाकारांनां याचा उलगडा करतां न आल्यामुळें द्विरुक्तीचा दोष पत्करून त्यांनीं त्यांनां एकच म्हणून ठरविलें आहे. पण हा मार्ग प्रशस्त नसून शक्य असेल तर याहून अधिक समाधानकारक असें या प्रश्नाचें उत्तर मिळविलें पाहिजे. रात्रिदिवसांच्या अगदीं पृथक् अशा जोड्यांचें वर्णन हें एवढेंच आहे,[1] असें नाहीं. ऋग्वेदांत अहोरात्राचा

---

१ समानो अध्वा स्वस्रोरनन्तस्तमन्यान्या चरतो देवशिष्टे । न मेथेते न तस्थतुः सुमेके नक्तोषासा समनसा विरूपे ॥ ऋ. १, ११३, ३.

वाचक असा **अहनी** हा शब्द आला आहे. **अहनी** याचा अर्थ दोन दिवस असा नसून अहोरात्र असा आहे. हें ऋ. ६, ९, १ यांत **अह्श्च कृष्णमहरर्जुनंच** (काळोखाचा दिवस आणि प्रकाशाचा दिवस) असें जें ह्मटलें आहे त्यावरून उघड होतें. आतां ही **अहनी** व **अहोरात्रे** अथवा **उषासानक्ता** एकच आहेत कीं भिन्न आहेत ? ऋं. ४, ५५, ३ यावरून या प्रश्नाचा उलगडा करतां येतो; कारण यांत **अहनी** आणि **उषासानक्ता** यांची संरक्षण करण्याविषयीं पृथक प्रार्थना केली आहे यावरून त्या दोन निराळ्या प्रकारच्या जोडया आहेत हें स्पष्ट होतें. आतां वर्षाचे सर्व ३६० दिवस व ३६० रात्री जर आपल्या इकडच्या सारख्याच असत्या तर त्यांचे **उषासानक्ता** आणि **अहनी** असे वर्ग करण्याचें प्रयोजनच नव्हतें; 'काळोखाच्या, प्रकाशाच्या आणि कमीजास्त अवधीच्या' एवढ्या साध्या वर्णनानें काम भागलें असतें. पण **उभे यथा नो**[1] या ऋचेंत दिसून येणारा **अहनी** आणि **उषासानक्ता** यांतील भेद जर खोटा मानावयाचा नसेल तर त्या भेदाचें कारण शोधून काढिलें पाहिजे. आतां पृथ्वीच्या पाठीवरील निरनिराळ्या ठिकाणीं आढळून येणाऱ्या रात्रिदिवसांचा विचार केल्यास, वरील वाक्यांत आलेलें वर्ष ध्रुवप्रदेशांतील असून तें एक दीर्घ दिवस व त्याच्या एवढीच एक दीर्घ रात्र यांची एक जोडी आणि बाकी निरानिराळ्या अवधींच्या साध्या रात्रिदिवसांच्या कित्येक जोडया मिळून झालेलें होतें असें मानणें हाच काय तो वरील प्रश्न सोडविण्याचा मार्ग दिसतो. हें वर्णन पृथ्वीच्या दुसऱ्या कोणत्याही भागाला लावतां येणें शक्य नाहीं. कारण विषुववृत्तावर नेहमीं दिवसरात्र सारखींच असतात, व त्यांना 'काळोखाचीं, प्रकाशाचीं आणि सारख्या अवधीचीं (सरूपे)' असें ह्मणतां येईल; विषुववृत्तापासून ध्रुववृत्तापर्यंतच्या प्रदेशांत दिवस आणि रात्र मिळून कधींही २४ तासांपेक्षां जास्त अवधी नसतो; मात्र त्यांत दिवसरात्रींच्या अवधीमध्यें स्थानपरत्वें पुष्कळच फरक पडण्यासारखा असतो. उदाहरण, ध्रुवमंडळाच्या अगदीं जवळच्या प्रदेशांत कधीं २३ तासांची रात्र व एकतासाचा दिवस व कधीं याच्या उलट ह्मणजे २३ तासांचा दिवस आणि एक तासाची रात्र असा प्रकार असतो. अशा रात्रिदिवसांनां 'काळोखाचे, प्रकाशाचे,

---

१ उभे यथा नो अहनी निपात उषासानक्ता करतामदव्धे । ऋ. ४,५५,३.

आणि निरनिराळ्या अवधींचे (विरूपे) असें ह्मणतां येईल. पण ध्रुव-मंडल उलटून दीर्घ रात्रीच्या प्रदेशांत गेल्यावरोबर वरील वर्णनांत बदल करून त्यांत साध्या दिवसरात्रींच्या जोडीला निरनिराळ्या अक्षांशाप्रमाणें बदलणाऱ्या अशा दीर्घ रात्रिदिवसांची एक जोडी घालावी लागेल. हीं दीर्घ दिवस आणि दीर्घ रात्र कोणत्याही एका ठिकाणीं पाहिल्यास सार-ख्याच अवधींचीं असून अक्षांशापरत्वें मात्र भिन्न असल्यामुळें त्यांनाही **विरूपे** असें विशेषण लावतां येईल. अशा रीतीनें, वर्षाचे दिवस व रात्रि दर्शाविण्यासाठीं दिवसरात्रीच्या जोडीचें प्रमाण धरल्यास पृथ्वीवर निरनि-राळ्या ठिकाणीं दिसणाऱ्या दिवसासंबंधी भेदांचे तीन वर्ग होतातः—

१ **ला.**—विषुववृत्तावरील—एकच जोडी—कृष्ण व प्रकाशणारी असून नेहमीं एकाच स्वरूपाची (**सरूपे**).

२ **रा.**—विषुववृत्तापासून ध्रुववृत्तापर्यंतच्या प्रदेशांतील—एकच जोडी-कृष्ण व प्रकाशणारी—पण कमीजास्त अवधीची (**विरूपे**).

३ **रा.**—ध्रुववृत्ताच्या आंतील—दोन जोड्या—प्रत्येक कृष्ण व प्रकाश-णारी—पण कमीजास्त अवधीची (**विरूपे**).

ध्रुवावर सहा सहा महिन्याचा एकच दिवस व एकच रात्र असते. आतां **उभे यथा नो** या ऋचेंत **उषासानक्ता** आणि **अहनी** अशा दोन निराळ्या दिवसरात्रींच्या जोड्या जर स्पष्ट दिसत आहेत, तर त्या उघडच ध्रुवप्रदेशांतल्या असल्या पाहिजेत; ह्मणून या ऋचेच्या आधारानें **नाना चक्राते** या ऋचेचा अर्थ लावून एक जुळी जोडी आणि दुसरी बहिणींची जोडी अशा दोन निराळ्या जोड्यांचें वर्णनच त्यांत आहे असें मानिलें पाहिजे. अशा रीतीनें या ऋचेचा अर्थ होईल तो असाः—" त्या जुळ्या (पहिली जोडी) नाना रूपें (अवधि) करितात; त्यांतली एक प्रकाशते आणि दुसरी काळी आहे. त्या दोन बहिणी (दुसरी जोडी) एक **श्यावी** (काळी) आणि दुसरी **अरुपा** (प्रकाशमान) अशा आहेत." असा अर्थ केल्यास द्विरुक्तीचा दोष टळून सर्व गोष्टींचा समा-धानकारक उलगडा करितां येतो.

अहनी हा रात्रिदिवसवाचक शब्द जेथें जेथें आला आहे तेथें प्रत्येक ठिकाणीं त्याचा अर्थ **उषासानक्ताहून** भिन्न आहेच असें

खास ह्मणतां येणार नाहीं; पण कित्येक ठिकाणीं तरी त्यांत भेद आहे हें **उभे यथा नो** या ऋचेवरून उघड होत आहे. आतां हा भेद जर खरा असेल तर साध्या रात्रिदिवसांची जोडी आणि **अहनी** या शब्दानें दर्शविलेली जोडी यांत आणखीही एक फरक दिसून येईल. साध्या दिवसरात्री एकामागून एक सारख्या येत असतात, म्हणजे दिवस व रात्र किंवा रात्र व दिवस यांत कधीं खंड पडत नाहीं. पण ध्रुवप्रदेशांतील दीर्घ रात्र व दीर्घ दिवस जरी सारख्याच अवधीचीं असलीं तरी तीं एक संपल्याबरोबर लगेच दुसरें अशीं येत नाहींत. सूर्य मकरांत जातो त्यावेळीं दीर्घ रात्र असते व कर्कांत येतो त्यावेळीं दीर्घ दिवस होतो, व या दोन बिन्दूंत १८० अंशांचें अंतर आहे. **अहनी**संबंधाची ही गोष्ट आरण्यककालीं माहीत होती असें दिसतें. तैत्तिरीय आरण्यकांत संवत्सररूपी पुरुषाचें वर्णन करितांनां त्याला एकच डोकें, पण दोन निराळीं मुखें असून हें सर्व ऋतुलक्षण आहे असें ह्मटलें आहे. हीं दोन मुखें ह्मणजे संवत्सराचीं दोन अयनें असा टीकाकारानीं अर्थ केला आहे. पण याच्या पुढें आलेलें वर्णन आपल्याला अधिक महत्वाचें आहे. "संवत्सराच्या उजव्या व डाव्या बाजूला प्रकाशयुक्त व कृष्ण असे (दिवस) आहेत; त्याला अनुलक्षून हा पुढचा मंत्र (**शुक्रं ते** इत्यादि) आहे—'तुझें एक (रूप) प्रकाशमान असून दुसरें यजत (कृष्ण) आहे; हे दोन निरनिराळ्या रूपांचे अहन् (दिवस) होत, तूं द्यौप्रमाणें आहेस. हे स्वतंत्र पूषन् तूं सर्व मायांचें रक्षण करितोस; तुझी देणगी शुभकारक होवो.' यांत काळोखाचा व प्रकाशाचा दिवस ह्मणजे दीर्घ रात्र आणि दीर्घ दिवस हे संवत्सर देवतेचे डावे उजवे हात ह्मणजे दोन टोंकाकडचे दोन भाग आहेत असें ह्मटलें आहे. ह्मणजे अन्य शब्दांनां सांगावयाचें तर **अहनी**चे शुक्ल व कृष्ण असे भाग एकामागून एक येणारे नसून संवत्सराच्या दूरच्या दोन टोंकाशीं असतात असा याचा स्पष्ट अर्थ

---

१ एक हि शिरो । नाना मुखे । कृत्स्नं तदृतुलक्षणम् ॥ ३ ॥ शुक्लकृष्णे संवत्सरस्य दक्षिण वामयोः पार्श्वयोः । तस्यैषा भवति । शुक्रं ते अन्यद्यजतं ते अन्यद्विषुरूपे अहनी द्यौरिवासि । विश्वाहि माया अवसि स्वधावो भद्रा ते पूषन्निहरातिरस्तु । नात्र भुवनं । न पूषा न पशवः । नादित्यः । संवत्सर एव प्रत्यक्षेण प्रियतमं विद्यात् ॥ ४ ॥ तै. आ. १. २.

होतो. ही गोष्ट **अहनी** शब्दानें दर्शाविलेले दिवसरात्र म्हणजे ध्रुवप्रदेशांतील दीर्घ दिवसरात्र असें मानिल्याखेरीज संभवत नाहीं. ध्रुवाजवळ ही दीर्घ रात्र व दीर्घ दिवस बरोबरीचे असून एक मकरसंक्रमणाच्या सुमारास व दुसरा कर्कसंक्रमणाच्या सुमारास अशीं होत असल्यामुळें **अहनीचे** हे दोन भाग संवत्सरदेवतेचे डावे उजवे हात असें आरण्यकांत अगदीं यथार्थ म्हटलें असून त्यावरून **अहनी**संबंधाच्या वरील विवेचनाला चांगला जोर मिळतो.

दीर्घ दिवसाचें स्पष्ट वर्णन करणारीं वाक्यें ही ऋग्वेदांत आहेत. ५, ५४, ५. यांत सूर्याच्या वाढलेल्या गतीचें (**दीर्घं योजनम्**) वर्णन आहे. पण याच्याहून स्पष्ट वर्णन १०, १३८, ३ यांत आहे. या सूक्तांत इंद्राच्या अंतरिक्षांतील पराक्रमाचें वर्णन असून पहिल्या ऋचेंत इन्द्रानें वृत्राला मारून उषा आणि पाणी यांनां मोकळें केल्याचें सांगितलें आहे. दुसरींत सूर्याला याच रीतीनें प्रकाश पाडण्यासाठीं मोकळा केल्याबद्दल सांगितलें आहे. तिसरी ऋचा अशी:—

वि सूर्यो मध्ये अमुचद्रथं दिवो
विदद्दासाय प्रतिमानमार्यः ।
दृळ्हानि पिप्रोरसुरस्य मायिन
इंद्रो व्यास्यच्चक्रुवाँ ऋजिश्वना ॥

ही ऋचा प्रस्तुत विषयासंबंधानें बरीच महत्वाची आहे. तिचा सरळ भावार्थ असा:— ' सूर्यानें आकाशाच्या मध्येंच रथ सोडला. आर्याला दासाचें प्रतिमान (तोडीस तोड) मिळालें. ऋजिश्वाबरोबर पराक्रम करून इंद्रानें मायावी असुर जो पिप्रु त्याचे दृढ दुर्ग फोडून टाकिले. " यांत पहिल्या चरणांत सूर्यानें आकाशाच्या मध्यभागीं (क्षितिजाजवळ नव्हे) आपला रथ तेथें थांबविण्यासाठीं सोडला असें स्पष्ट शब्दांनीं सांगितलें आहे; व या सूर्याच्या विलक्षण वर्तनाचा खुलासा टीकाकारांनां करितां आलेला नाहीं. या गोष्टीचा संबंध ग्रहणाशीं असेल असें कित्येकांचें मत आहे, पण त्यांत अर्थ नाहीं; कारण ग्रहणाच्या वेळीं सूर्य कांहीं थांबत नाहीं.

---

१ तद्वीर्यं वो मरुतो महित्वनं दीर्घं ततान सूर्यो न योजनम् ।

सायणाचार्यांनीं **रथं व्यमुचद्** याचा अर्थ 'रथ चालावयाला मोकळा केला' असा करून **मध्ये दिवः** याचा 'आकाशाच्या मध्यभागाकडे' असा केला आहे. पण या अर्थांत शब्दांची फार ओढाताण केलेली आहे. **विमुच्** हा शब्द ऋग्वेदांत दुसऱ्या दहाबारा ठिकाणीं आला असून त्या प्रत्येक ठिकाणीं त्याचा अर्थ, रथाचे घोडे सोडणें असाच आहे; व सायणाचार्यांनींही तो तसाच घेतला आहे. ह्मणून वरील ऋचेंत 'सूर्यानें आपल्या रथाचे घोडे सोडिले' असा स्वाभाविक होणारा अर्थच घेतला पाहिजे. शिवाय **दिवो मध्ये** याचा अर्थ आकाशाच्या मध्याकडे असा होणें शक्य नाहीं. पुनः सायणाचार्यांचा अर्थ मान्य केल्यास **प्रतिमान** शब्दाचें महत्व दिसत नाहीं. कारण या शब्दावरून दासाच्या दुष्ट कृत्याला उलट तोड इन्द्रानें केली असा अर्थ निघत आहे. हें दासाचें दुष्ट कृत्य आणि त्याला इंद्रानें केलेली उलट तोड ह्मणजे काय? **दास** आणि **आर्य** या शब्दांमुळें यूरोपीयन पंडितांत गोंधळ उडून गेलेला आहे. या शब्दांचा **अनार्य** आणि **आर्य** असा अर्थ घेऊन आर्यांनीं अनार्यांवर मिळविलेल्या विजयाचें यांत वर्णन आहे असें ते मानतात. परंतु अनार्यांनीं केलेल्या आर्यांच्या पराभवाचें आधीं वर्णन आल्याखेरीज, त्यांचा सूड आर्यांनां घेतला असें ह्मणतां येणार नाहीं. शिवाय दास याचा अर्थ अनार्य असा जरी होतो, तरी प्रत्येक ठिकाणीं तसाच तो घेतला पाहिजे असें नाहीं; कारण इंद्राच्या शंबर, पिप्रु नमुचि वगैरे शत्रूंना दास शब्द पुष्कळ वेळां लाविलेला आहे. **वि सूर्यो मध्ये** यावरील ऋचेंतही इन्द्रानें केलेल्या पिप्रूच्या पराभवाचेंच वर्णन आहे; आणि अन्य ठिकाणीं पिप्रूला दास ह्मटलेलें आहे. ह्मणून

---

१ उत **दासं** कौलितरं बृहतः पर्वतादधि । अवाहन्निंद्र **शंबरं** । ऋ.४,३०, १४। यः सृविंदमनर्शानिं **पिप्रुं दास**महीशुवं । वधीदुग्रो रिणन्नपः ! ८,३२,२। अत्रा **दासस्य नमुचेः** शिरो यदवर्तयः । ५,३०,७.। **दासाय** भियसं दधाति । १०,१२०,२ (इन्द्रानें दासाच्या मनांत भीति उत्पन्न केली)। अमर्त्यं चिद्दासं मन्यमानमवाभिनद् । २,११,२. (आपल्याला अमर मानणाऱ्या दासाला इंद्रानें छिन्नभिन्न केलें). याप्रमाणें कित्येक ठिकाणीं इन्द्राच्या शत्रूंना मोघमपणेंहीं दास ह्मटलें आहे.

या ठिकाणीं **आर्य** व **दास** हे शब्द इंद्र व पिप्रु यांचेच वाचक घेतले पाहिजेत. शिवाय या सूक्तांत वर्णिलेले इंद्राचे सर्व पराक्रम आकाशांतील असल्यामुळें एवढा मधलाच एक आर्य व अनार्य यांच्या मधील युद्धाला लावणें बरोबर नाहीं. सूर्यानें भर आकाशांत मध्येंच मुक्काम केल्याचें वर्णन ऋग्वेदांत इतर ठिकाणींही आहे. ७,८७,५ यांत[1] ' वरुण आकाशांत या सुवर्णमयाला (सूर्याला) हिंदोळ्याप्रमाणें करिता झाला ' असें म्हटलें आहे; त्यावरूनही सूर्य आकाशांत पुढें मागें झुलत असून क्षितिजावर दिसत असल्याचेंच स्पष्ट दिसत आहे. या सर्व विवेचनावरून प्रस्तुत ऋचेचा अर्थ ' सूर्यानें आकाशांत मध्येंच मुक्काम केला, (म्हणजे दिवस पुष्कळ लांबला) व अशा रीतीनें इन्द्राला दासाच्या कृत्याला उलट तोड मिळाली ' असाच उघड दिसतो. दासाचें कृत्य म्हणजे काळोख उत्पन्न करून रात्री दीर्घ करणें हें होय. अर्थातच त्याच्या उलट करून त्याचा सूड उगविणें म्हणजे त्या रात्री एवढाच एक दीर्घ दिवस करणें होय. हाच मतलब **प्रतिमान** शब्दांत आहे. यूरोपीय पंडितांची इतिहासाची कल्पना सायणाचार्यांजवळ नसल्यामुळें त्यानीं त्या पंडितांप्रमाणें न फसतां, **आर्य** आणि **दास** या शब्दांचा इन्द्र व त्याचा शत्रु असाच योग्य अर्थ केला आहे; पण त्यांनाही सूर्य भर आकाशांत मध्येंच थांबला कसा हें समजलें नाहीं. शब्द सरळ आणि साधे असूनही अर्थ लावण्याची खरी गुरुकिल्ली माहित नसल्यामुळें प्रचलित कल्पनांतच लोक कसे वाहत जातात हें या विवेचनावरून दिसून येईल.

येणेंप्रमाणें रात्रिदिवसांच्या दोन निराळ्या जोड्यांचे उल्लेख ऋग्वेदांत आहेत असें आपल्याला आढळून आलें. पहिली जोडी साध्या रात्रिदिवसांची व दुसरी ध्रुवमंडलांतील **अहनी** नांवाची दीर्घ रात्रिदिवसांची. हिलाच तैतिरीय आरण्यकांत संवत्सरदेवतेच्या डाव्याउजव्या बाजू म्हटलें आहे. रात्र फार मोठी असल्यामुळें ती कदाचित् संपणार नाहीं अशी भीति पूर्वी ब्राह्मणांना वाटत असे, असें तै. संहितेंत स्पष्ट म्हटलें आहे. ऋग्वेदामध्येंही ' दीर्घं तमः ' ' दीर्घास्तामिस्राः ' ' असूर्यं तमः ' ' सूर्याचें दीर्घ योजन ' असे शब्द अनेक ठिकाणीं आलेले आहेत. जिचें परतीर दिसत नाहीं, अशा रात्रींतून पार पडावें म्हणून

---

१ गृत्सो राजा वरुणश्चक्र एतं दिवि प्रेंखं हिरण्मयं शुभे कं ॥ ऋ.७,८७,५.

वेदांत देवांची प्राथना केलेली आहे; आणि अखेर तर सूर्य आकाशांत मध्येंच थांबला व अशा रीतीनें दासानें केलेल्या दीर्घ रात्रीबद्दल त्याचा सूड उगविण्यांत आला असें स्पष्टच वचन ऋग्वेदांत आहे. याप्रमाणें ऋग्वेदांत दीर्घ दिवस व दीर्घ रात्र यांबद्दलच केवळ उल्लेख नसून त्यांच्या जोडगोळीची कल्पनाही त्यांत स्पष्ट आहे; व म्हणूनच त्यांना संवत्सराच्या डाव्या उजव्या बाजू असें तै. आरण्यकांत म्हटलें आहे. अशा रीतीनें दीर्घ उषेचें अस्तित्व सिद्ध करणाऱ्या वचनांखेरीजही ध्रुवप्रदेशांतील दीर्घ दिवस व दीर्घ रात्र यांची माहिती वैदिक ऋषींना होती असें दाखविण्याला पुरेसा स्वतंत्र पुरावा आपल्याला मिळाला आहे; व तैत्तिरीय संहितेंत या गोष्टी पूर्वीच्या कल्पांतील (पुरा) आहेत असें स्पष्ट सांगितलें आहे.

आतां दुसऱ्या एका ध्रुवप्रदेशांतील विशेष गोष्टीचें थोडें विवेचन करून हें प्रकरण पुरें करूं. ही गोष्ट म्हणजे सूर्याचा दक्षिणेकडून येण्याचा मार्ग होय. मागील एका प्रकरणांत सांगितलेंच आहे कीं, समशीतोष्ण किंवा शीत कटिबंधांत रहाणाऱ्या मनुष्याला सूर्य अगदीं डोक्यावर आलेला कधींही दिसणार नाहीं आणि उत्तर गोलार्धांतील या कटिबंधांत रहाणाऱ्यांना तो दक्षिणेस दिसून उत्तर ध्रुवावर तर तो दक्षिणेस उगवतांना दिसेल. **दक्षिणा** याचा अर्थ वैदिक संस्कृतांत तसाच इतरही आर्यभाषांत 'उजवी बाजू' किंवा 'दक्षिण दिशा' असा दोन्ही प्रकारचा होतो. 'दान' किंवा 'देणगी' असा तिसराही या शब्दाचा अर्थ आहे; व त्यावर फारच भर देण्यांत येत असतो. सूर्याला "दक्षिणेचा पुत्र" असें ऋ. ३,५८,१यांत म्हटलें आहे. यांत **दक्षिणा** म्हणजे उषा असें जरी म्हटलें, तरी पुनः उषेला **दक्षिणा** कां म्हटलें हा प्रश्न येतोच. **दक्षिणा** म्हणजे कुशल असा अर्थ घेऊन तिचा उषेशीं संबंध जोडण्याचा प्रयत्न करण्यांत येतो, पण त्यापेक्षां तिचा दक्षिण दिशेशीं संबंध लावणें अधिक बरें असें वरील विवेचनावरून म्हणावयास हरकत नाहीं. वैदिक ऋचांचें विवेचन करतांनां बारीक सारिक गोष्टींचाही सूक्ष्म विचार करणें अवश्य आहे हें खरें; पण **दक्षिण** किंवा त्यावरून निघणारे इतर शब्द यांचा ऋग्वेदांत कोठेंही दक्षिण दिशेशीं संबंध नाहीं असें म्हणणें धाडसाचेंच होईल. हेरोडोटस नांवाच्या ग्रीक इतिहासकारानें लिहिलें आहे कीं,

'ईजिप्त देशाच्या राजानें कांहीं फिनीशियन दर्यावर्दी लोकांना गलबतांतून आफ्रिकेला (लिबिया) प्रदक्षिणा करून जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीच्या बाजूनें परत यावयास सांगितलें. त्याप्रमाणें आपली सफर पुरी करून ते नावाडी तिसऱ्या वर्षी परत आले, व त्यांनी राजाला सांगितलें कीं लिबियाला प्रदक्षिणा करतांना सूर्य आपल्या उजवीकडे दिसत असे.' परंतु ह्या नांवाड्यांनीं लिबियाला प्रदक्षिणा केलीच नाहीं, कारण खरोखर त्यांनीं तशी प्रदक्षिणा केली असती तर, सूर्य आपल्याला उजवीकडे दिसला अशा खोट्या खोट्या गोष्टी त्यांनीं सांगितल्या नसत्या अशी टीका करून हेरोडोटसनें त्या नावाड्यांना खोटें ठरविलें आहे. हेरोडोटस हा उत्तर समशीतोष्ण कटिबंधातच काय तो (विषुववृत्तापासून २३½ अंशांच्या वर उत्तरेस) फिरलेला असल्यामुळें सूर्य उत्तरेस दिसणें शक्यच नाहीं असें त्याला वाटत होतें. परंतु जी गोष्ट त्यानें अगदीं अविश्वसनीय म्हणून मानिली तीच गोष्ट आम्हाला त्या नांवाड्यांच्या खरेपणाबद्दल प्रत्यक्ष प्रमाण म्हणून वाटते.* पण हेरोडोटसला हें पुढचें भविष्य काय माहीत ? असो. तर हेरोडोटसच्या या गोष्टीवरून धडा घेऊन, ऋग्वेदांत जेथें जेथें ह्मणून **दक्षिणा** शब्द आढळेल तेथें तेथें त्याचा 'उजवी बाजू' किंवा 'देणगी' असाच केवळ अर्थ करण्याचा हट्ट सोडून दिला पाहिजे. दक्षिण अथवा त्या स्वरूपाचे इतर शब्द यांचा ऋग्वेदांत कोठेंही दक्षिण दिशेशीं संबंध नाहीं असें म्हणणें धाडसाचेंच होईल. सूर्य दक्षिणेकडून येतो असें स्पष्ट सांगणारीं वचनें वेदांत नसतील, पण उषेला **दक्षिणा** ह्मणणें (ऋ. १, १२३, १—१०, १०७, १) किंवा सूर्याला 'दक्षिणेचा पुत्र' म्हणणें या गोष्टी बऱ्याच सूचक असून वैदिक काळीं हे शब्द रूढ असल्यामुळेंच ऋषींनीं त्यांचा प्रयोग केला असावा. भूगर्भशास्त्रांत ज्या प्रमाणें अस्थिशेष, त्याप्रमाणें भाषाशास्त्रांत जुने शब्द इतिहासपूर्ण असतात. या शब्दांचा मूळ इतिहास ऋषींच्या स्मरणांतून कदाचित् गेला असेल; पण त्यापासून स्वाभाविकपणें निघणारीं अनुमानें काढावयाला आपल्याला

---

* आफ्रिकेचें दक्षिण टोंक दक्षिण गोलार्धांतील समशीतोष्ण कटिबंधांत असल्यामुळें उत्तर गोलार्धांतील समशीतोष्ण कटिबंधांत जसा सूर्य दक्षिणेस दिसतो, तसा तेथें तो उत्तरेस दिसेल हें उघड आहे.

काय हरकत आहे? उत्तर दिशावाचक **उत्तर** हा शब्द 'वरची' अशा अर्थाचा, व दक्षिण दिशा वाचक **अधर** शब्द 'खालची' या अर्थाचा आहे, या गोष्टीवरूनही वरील अनुमानालाच बळकटी येते. ध्रुवाखेरीज इतर ठिकाणीं उत्तर दिशेला 'वरची' असें म्हणतां येणार नाहीं. मध्यकालीन संस्कृत वाङ्मयांत सूर्य सप्तर्षिपुंजाच्या **खालीं** असतो अशी कल्पना आढळते. सूर्याचा मार्ग उर्फ क्रान्तिवृत्त सप्तर्षींच्या दक्षिणेस आहे; पण त्यांच्या **खालीं** सूर्य असावयाला म्हटलें तर पहाणारा ध्रुवमंडलस्थच असला पाहिजे. सप्तर्षि उंचावर बसविलेले आहेत अशा अर्थाचें एक वाक्य मागें दिलेंच आहे. समशीतोष्ण कटिबंधांतही सूर्य नेहमीं दक्षिणेसच असल्यामुळें त्याचा दक्षिण मार्ग स्थापित झाला, तरी तो आपल्या उपपत्तीला कांहीं विशेष साधक होत नाहीं. म्हणून त्यावर फार जोर देण्याची गरज नाहीं. असो. दीर्घ रात्र व दीर्घ दिवस यांच्यासंबंधानें पुष्कळ पुरावा या प्रकरणांत दिला. आतां पुढच्या प्रकरणांत मास व ऋतु यांविषयीं विवेचन करून तत्संबंधीं वेदग्रंथांतील वर्णन येथपर्यन्त दिलेल्या पुराव्यावरून स्थापित होणाऱ्या उपपत्तीशीं अगदीं बरोबर कसें जुळतें तें पाहूं.

---

१ अधःप्रस्थापिताश्चेन समावर्जितकेतुना । सहस्ररश्मिना साक्षात् सप्रणाममुदीक्षिताः । कालिदास. कु. सं. ६, ७.

सप्तर्षिहस्तावचितावशेषानधो विवस्वान् परिवर्तमानः ॥

कु. सं. १, १६.

प्रकरण ७ वें.

मास आणि ऋतु.

सोडून दिलेल्या कालमापनपद्धतीविषयीं प्रमाणें–पुराणमताभिमानी धर्माचार्य जुनी पद्धति बहुधा यज्ञकर्मांत राखून ठेवितात–ध्रुवप्रदेशांतील सूर्यप्रकाशयुक्त महिन्यांची कमीजास्त संख्या–यज्ञसत्रांवर त्यामुळें होणाऱ्या परिणामाचें विवेचन–सूर्याच्या सप्तविध स्वरूपाचें वेदांतील वर्णन–अदितीची कथा–अदितीनें आपले सात पुत्र देवांनां दिले आणि आठव्याला टाकून दिलें–या कथेचे ब्राह्मणांत व तैत्तिरीय आरण्यकांत आढळणारे निरनिराळे अर्थ–द्वादश आदित्य म्हणजे वारा महिन्यांचे बारा सूर्य असा वेदोत्तरकालीन वाङ्मयांत समज आहे–त्यावरून सात आदित्य म्हणजेही सूर्यप्रकाश युक्त अशा सात महिन्यांच्या सात देवता होत असें अनुमान होतें–निरनिराळे ऋतु होण्यास निरनिराळे सूर्य पाहिजेत असा समज–अदितीची कथा चालू युगांतील नसून पूर्वीच्या युगांतील (पूर्व्ये युगम्) आहे–याज्ञिक ग्रंथांतील या गोष्टीविषयीं प्रमाणें–आदिकालांतील यजमानांना ऋग्वेदांत 'आमचे प्राचीन पितर' असें म्हटलें आहे–त्यांपैकीं अथर्वण आणि अंगिरस हे हिंदीयूरोपीयकालीन होत असें दाखवितां येतें–अंगिरसांतील मुख्य कुलें, नवग्व आणि दशग्व–वलाशीं होणाऱ्या युद्धांत हे अंगिरस इंद्राला साहाय्य करीत–ते आपलें सत्र दहा महिन्यांत आटोपीत–सूर्य तमांत रहातो असें वर्णन–दहा महिन्यांच्या सत्रावरून सूर्यप्रकाशयुक्त दहा महिन्यांच्या वर्षाचा बोध होतो–नवग्व आणि दशग्व शब्दांची व्युत्पत्ति–या शब्दांवरून नऊ किंवा दहा महिन्यांत सत्र संपविणाऱ्या ऋत्विजांचा बोध होतो असें सायणाचार्यांचें मत आहे–अंगिरसांना **विरूपे** हें विशेषण लाविलेलें आहे–त्यावरून अंगिरसांच्या दुसऱ्या जातींचा बोध होतो–सप्तगु ऊर्फ सात होते (होतृचें–अनेकवचन) किंवा विप्र–दीर्घतम्याची कथा–तिचें महाभारतांतील स्वरूप–ऋग्वेदांत दीर्घतमा हा अश्विनांचा आश्रित आहे–तो दहाव्या **युगांत** जरायुक्त होतो–**युग** शब्दाच्या अर्थाबद्दल विवेचन–**मानुषा युगा** म्हणजे मनुष्यांचीं **युगें** (कालपर्याय) असा अर्थ ऋग्वेदांत आहे; मनुष्यांच्या **पिढ्या** किंवा **जाति** असाच नेहमीं नाहीं–या मताच्या सिध्यर्थ

दोन वैदिक वाक्यांचें विवेचन–पाश्चात्य विद्वानांनीं केलेल्या या वाक्यांच्या अर्थांचें परीक्षण–त्यांचा अर्थ त्याज्य होय–**मानुषा युगा** म्हणजे दीर्घ उषा व दीर्घ रात्र यांच्यामध्यें येणारे महिने असा अर्थ दिसतो–दीर्घतमा म्हणजे दहाव्या महिन्यांत क्षितिजाखालीं जाणारा सूर्य–**मानुषा युगा** आणि **क्षपः**— प्राचीन काळचे पांच ऋतु–पांच ऋतुदर्शक अशा एका ऋचेचें विवरण–पंचऋ- [illegible] रहातो अशें वर्णन–त्यावरून दीर्घ रात्रीच्या काळो- खाचा बोध होतो–हे पांच ऋतु म्हणजे सहांपैकीं कोणते तरी दोन एकत्र करून झालेले नव्हत–त्यासंबंधानें ब्राम्हणांत केलेला खुलासा समाधानकारक नाहीं– एकंदर विवेचनाचा गोषवारा.

मास आणि ऋतु.



वांच्या षाण्मासिक रात्रिसंबंधी संस्कृत व अवेस्तिक वाङ्मयामध्यें आढळणाऱ्या उल्लेखांच्या अनुरोधानें पहातां तीस दिवसांच्या अखंड उषेचें तसेंच सहा महिन्याहून कमी परंतु २४ तासांहून अधिक अशा अक्षांशपरत्वें कमी-जास्त असणाऱ्या अखंड अशा दीर्घ रात्रिदिवसांचें वर्णन करणारीं वाक्यें ऋग्वेदांत आढळतात व या गोष्टी त्यांत प्राचीन काळच्या (पुरा) म्हणून वर्णिल्या आहेत, हें पूर्व प्रकरणांत दाख- विलें. आतां पुढें प्रश्न असा आहे कीं, वेदांत मास, ऋतु किंवा वर्ष यांच्या- विषयींही अशाच प्रकारचे उल्लेख आहेत कीं नाहीं? ध्रुवप्रदेशांतील कालमापनपद्धति (पंचांग) संहिताकालांतील पद्धतीपेक्षां निराळी आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. पण ऋषिवर्गाचे पूर्वज जर पूर्वी कधीं ध्रुवाजवळ रहात असतील तर त्यांच्या वेळीं चालत असलेल्या कालमानाची पद्धति त्यांच्या पुराणमताभिमानी वंशजानीं कशीतरी जपून ठेविली असलीच पाहिजे. बदललेल्या पारिस्थितीमुळें नवीन पद्धत व्यवहारासाठीं स्वीकारून व जुनी धार्मिक विधींसाठीं राखून ठेवून जुन्या गोष्टींविषयीं आदर दाख- विलेला ईजिप्ट देशांतही दृष्टीस पडतो. मग वैदिक आर्यांनीं तसा आदर दाखविला नसेल असें कसें होईल? ध्रुवप्रदेशांतील कालमान व त्याच्या अलीकडील प्रदेशांतील कालमान यांच्यांत इतका मोठा भेद आहे कीं,

ध्रुवप्रदेशांतून बाहेर पडल्याबरोबर नवीन मान स्वीकारणें अगदीं अवश्य आहे. वैदिक आर्यांनीं असा प्रकार केला असला तरी त्यांनीं पुराणमताभिमानित्वामुळें ही परंपरागत गोष्ट कोणत्याना कोणत्या तरी रूपानें आपल्या याज्ञिक विधींत ग्रथित करून ठेविली असली पाहिजे. निरनिराळ्या आर्य भाषांतील शब्दांच्या परस्परसाम्यावरून यज्ञ करण्याची चाल अगदीं आदिकालपासून चालू आहे ही गोष्ट सिद्ध झाली आहे. तसें असल्यास आर्य लोक ध्रुवाकडून खालीं खालीं येत असतां त्यांच्या यज्ञपद्धतींत बरेच मोठे फेरफार झाले असले पाहिजेत. कालमापनपद्धति आणि यज्ञपद्धति व विशेषतः संवत्सरसत्रें यांच्यांत निकट संबंध असून, तीं सूर्याच्या वार्षिक गतीवर बसविलेलीं होतीं हें वेदकालनिर्णयांत दाखविलेंच आहे. अग्नि जागृत ठेवून वार्षिक यागपर्याय योग्य ऋतूंवरच होत आहेत कीं नाहीं हें पहाणें ऋत्विजांचें कर्तव्य होतें. ध्रुवाजवळ रहात असतांची पद्धति व मागाहून स्वीकारलेली पद्धति ह्या जरी निराळ्या होत्या तरी, या नवीन पद्धतींत जुन्या पद्धतीच्या पुष्कळ खुणा सांपडत असल्यामुळें आपल्या वैदिक ऋषींचे पूर्वज ध्रुवप्रदेशांत रहात होते हें सिद्ध होतें. परंतु हीं प्रमाणें दाखविण्यापूर्वी अगदीं आद्य यज्ञपद्धति व ऋषिकालीन पद्धति यांच्यांत फरक असण्याचा संभव कोठें कोठें आहे तें पाहूं.

संहिता व ब्राह्मणें यांत वार्षिक सत्रें बारा महिनेपर्यंत चालावयाचीं असें ह्मटलें असतें. पण ही गोष्ट ध्रुवप्रदेशाच्या आंत शक्य नव्हती; कारण तेथें सूर्य कित्येक दिवस अथवा महिनेही सारखा क्षितिजाखालीं असून त्यामुळें तेथें दीर्घ रात्र होत असते. ह्मणून अगदीं प्राचीन वार्षिक सत्रांचा काल बारा महिन्यांहून कांहीं तरी कमी असलाच पाहिजे. ह्मणजे बारांपेक्षां कमी महिन्यांचें वार्षिक सत्र हें एक जुन्या पद्धतीचें विशिष्ट लक्षण झालें. आतां ध्रुवप्रदेशांत सर्व ठिकाणीं दीर्घ रात्रिदिवसांचा काल कांहीं सारखाच नसतो. खुद्द ध्रुवावर रात्र व दिवस सहा सहा महिन्यांचीं असतात. पण सगळे लोक ध्रुवावर रहात असणें संभवनीय नाहीं. ह्मणून ध्रुवप्रदेशांत सूर्य जाऊन येऊन क्षितिजावर दिसण्याचा काळ स्थानपरत्वें सातपासून अकरा महिनेपर्यंत असावयाचा. हा सूर्य प्रकाशाचा काल एक दीर्घ दिवस व त्यांच्या मागून एकामागोमाग एक येणारीं कांहीं साधीं २४ तासांचीं अहोरात्रें मिळून झालेला असावयाचा. यज्ञयाग, व्या-

पारधंदे, धार्मिक व इतर महत्वाचे विधि हे सर्व याच काळांत व्हावयाचे. हा काळ संपला ह्मणजे दीर्घ रात्र होऊन ती संपण्याच्या सुमारास उषः-प्रकाश पडला कीं पुनः कर्मकालाचा प्रारंभ झाला. असें असल्यामुळें ध्रुवाजवळच्या वार्षिक सत्राचा काल ह्मणजे वस्तुतः सूर्य प्रकाशाचा कालच असावयाचा. ह्मणून प्रकाशयुक्त महिन्यांची कमीजास्त संख्या हें एक ध्रुवाजवळील याज्ञिक कालमानाचें विशिष्ट लक्षण असणार. ऋग्वेद आणि इतर संहिता यांतील अति प्राचीन काळच्या कालमानाचा विचार करितांना ही गोष्ट आपल्याला नीट लक्षांत ठेविली पाहिजे.

आपण पहातों असल्या तीस दिवसांची उषा जेथें आहे तो प्रदेश इतका ध्रुवाजवळ पाहिजे कीं तेथें सूर्य प्रकाशाचा काळ, चार पांच महिन्यांचा दीर्घ दिवस व नंतर साध्या रात्रिदिवसांच्या कांहीं जोड्या मिळून सात महिन्यांहून जास्त असतां कामा नये. ऋग्वेदांत असल्या कालमानाच्या खुणा राहिलेल्या दिसून येतात. अदिति व तिचे सात पुत्र यांच्या कथेंत या काळाचा संबंध असून ती कथा कोणत्या तरी सृष्ट चमत्कारावर रचिलेली आहे. या गोष्टींत आदित्यांची संख्या अगदीं प्राचीनकाळीं सात होती असें सांगितलें असून ऋग्वेदांत इतर पुष्कळ ठिकाणींही ही कल्पना स्वतंत्र रूपानें आढळते. ऋ. ९, ११४, ३ यांत सात आदित्य व सात ऋत्विज् एकाच ठिकाणीं सांगितले आहेत. २, २७, १ यांत मित्र, अर्यमा, भग, वरुण, दक्ष आणि अंश अशी सहा आदित्यांची नांवें दिलीं आहेत, पण सातव्याचें दिलें नाहीं. तरी सूर्याचें सप्तविशिष्टत्व अनेक गोष्टींवरून उघड सिद्ध होत आहे. ऋ.५,४५,९ यांत त्याला **सप्ताश्व** (सात घोडे असलेला) म्हटलें आहे; १, ५०, ८ यांत त्याचा रथ सात हरित् अश्व ओढतात असें सांगितलें आहे; तसेच, १, १६४, २ यांत एकचाकी रथ सात नांवांचा अश्व ओढतो असें वर्णन केलें आहे. अथर्ववेदांतही (७, १०७, १) सूर्याचे सात तेजस्वी रश्मी सांगून ऋग्वेदांत आलेला आदित्य शब्द **अदितेः पुत्राः** असे शब्द घालून अधिक स्पष्ट केला आहे (अ. वे. १३, २, ९.). आतां सूर्याचे सातच रश्मि कां हें कांहीं टीकाकारांनीं कोठें सांगितलेलें नाहीं. लोलकांतून दिसणारे सात प्रकारचे किरण वैदिक ऋषींना माहीत होते असें मानिल्यास गोष्ट निराळी. पण यास्क किंवा सायणाचार्य यांना कांहीं

---

१ सप्त युंजन्ति रथमेकचक्रमेको अश्वो वहति सप्तनामा ।

त्यांची माहिती होती असें दिसत नाहीं. पण हे सात रश्मि गृहित धरून त्यावरून सात आदित्यांचा जरी उलगडा केला तरी आठव्या मृत आदित्याची व्यवस्था त्यावरून लावतां येत नाहीं ती नाहींच. अदितीच्या गोष्टींत सांगितलें आहे कीं " अदितीला आपल्या शरीरापासून जे आठ पुत्र झाले त्यांपैकीं सातांसह ती देवांकडे गेली; आणि (आठव्या) मार्तांडाला टाकून देती झाली. पूर्व युगामध्यें अदिति सात पुत्रांसह (देवांकडे) गेली. तेथें तिनें मार्तांडाला जन्मण्यासाठीं व मरण्यासाठीं पुनः आणिलें." ही गोष्ट वैदिक ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं आली असून तिचा अर्थ लावण्याचा प्रयत्नही पुष्कळ ठिकाणीं केलेला आहे. तै. * संहितेंत साध्यांसाठीं (देवांसाठीं) ब्रह्मौदन शिजविणाऱ्या अदितीची कथा दिली आहे. " या ब्रह्मौदनाचा भाग देवांनीं तिला दिला व त्यापासून तिला चार आदित्य झाले. पुनः तिनें दुसऱ्यानें ब्रह्मौदन शिजवून तो आपणच खाल्ला, तेव्हां तिला त्यापासून कच्चें अंडें झालें. तिसऱ्यानें तिनें तो शिजविला, तेव्हां मनुष्यजातीचा आदिजनक विवस्वत् आदित्य उत्पन्न झाला. " या कथेंत आदित्यांची एकंदर संख्या व नांवें दिलेलीं नाहींत. तरी ही उणीव तै.‡ ब्राह्मणानें भरून काढिली आहे. त्यांत सांगितले आहे कीं ' अदितीनें चार वेळां ओदन शिजविला व प्रत्येक वेळीं देवांनीं तिला त्याचा शेषभाग दिला. अशा रीतीनें तिला पुत्रांच्या चार जोड्या झाल्या. पहिली जोडी **धातृ** व **अर्यमा** यांची, दुसरी **मित्र** व **वरुण** यांची, तिसरी **अंश** व **भग** यांची, आणि चवथी **इन्द्र** व **विवस्वन्** यांची. पण या ब्राह्मणांतही आठव्या आदित्याला **मार्तांड** का म्हटलें व त्याला टाकून कां दिलें याचा उलगडा केलेला नाहीं. तैत्तिरीय आरण्यकांत ही गोष्ट देऊन आठ आदित्यांचीं नांवेंही दिलीं आहेत. पण त्यांत सुद्धां त्या आदित्यांपैकी मार्तांड कोणता हें सांगितलेलें नाहीं. तरी या आरण्यकांत दुसऱ्या एका

---

१ अष्टौ पुत्रासो अदितेर्ये जातास्तन्वस्परि । देवाँ उप प्रैत्सप्तभिः परा मार्ताण्डमास्यत् ॥ सप्तभिः पुत्रैरदितिरुप प्रैत्पूर्व्यं युगं । प्रजायै मृत्यवे त्वत्पुनर्मार्ताण्डमाभरत् ॥ ऋ. १०, ७२, ८-९.

* तै. सं. ६, ५, ६, १.

तै. ब्रा. १, १, ९, १.

ठिकाणीं दिलेल्या वर्णनावरून या प्रश्नाचा थोडासा उलगडा करतां येतो. या वर्णनांतील आदित्यांचीं नांवें निराळीं आहेत; व त्यांपैकीं आठवा कश्यप हा महामेरूला सोडून कधीं जात नाहीं असें म्हटलें आहे. हे सप्त आदित्य म्हणजे सप्त प्राण असें कित्येक आचार्यांचें मत देऊन दुसरे आचार्य ते सप्त ऋत्विज होत असें म्हणतात असें या आरण्यकांत सांगितलें आहे. पुढें तिसरा अर्थ दिला आहे तो असा :—निरनिराळ्या ऋतूंत सूर्य किरणांचा निरनिराळा परिणाम होत असल्यामुळें सूर्य निराळे सात आहेत असें म्हटलें असावें. या अर्थाच्या पुष्ट्यर्थ त्या आरण्यकांत ' दिग्भ्राज ऋतून्करोति ' (अनेक दिशांत प्रकाशून ते ऋतु उत्पन्न करतात) हा वैदिक मंत्र दिला आहे. हा मंत्र प्रस्तुत उपलब्ध असलेल्या वेदसंहितांत कोठें आढळलेला नाहीं. सायणाचार्यांनींही या आरण्यकावरील भाष्यांत ' निरनिराळे सूर्य ऋतु करितात असें मानिल्याशिवाय निरनिराळे ऋतुधर्म संभवत नाहींत. म्हणून निरनिराळ्या दिशांत निरनिराळे सूर्य असलेच

---

१ तै. आ. १, ७. आरोजो भ्राजः पटरः पतंगः । स्वर्णरो ज्योतिषीमान् विभासः ।.....। कश्यपोष्टमः । स महामेरुं न जहाति ।..... ते अस्मै सर्वं कश्यपाज्ज्योतिर्लभन्ते ।.....। सप्त शीर्षण्याः प्राणाः सूर्या इत्याचार्याः । तेषामेषा भवति । "सप्त दिशो नाना सूर्याः सप्त होतार ऋत्विजः । देवा आदित्या ये सप्त तेभिः सोमाभि रक्ष न" इति (ऋ. ९, ११४, ३) । सप्तर्त्विजः सूर्या इत्याचार्याः ।.....। तदप्याम्नायः । दिग्भ्राज ऋतून् करोति । एतयैवावृता सहस्रसूर्यताया इति वैशंपायनः ।.....। नानालिंगत्वादृतूनां नानासूर्यत्वं । अष्टौ तु व्यवासिता इति ।

यावर सायणाचार्य ह्मणतात :—' दिग्भ्राजः ' तां तां दिशं प्राप्यावस्थिताः सूर्याः ' ऋतून् ' वसंतादिसूचितानृतुधर्मान् ' करोति ' तस्यां तस्यां दिशि कुर्वन्ति । नहि ऋतुनिष्पादकसूर्यव्यतिरेकेण तत्तदृतुधर्माः संभवन्ति । तस्मात्संत्येव दिक्षु विभिन्नाः सूर्याः ।.....।नानालिंगत्वादिति । यदि एक एव सूर्यः स्यात् तदानीं वसंताद्यृतूनां नानालिंगत्वं न स्यात् । न हि कारणभेदमन्तरेण कार्यभेदः संभवति । तस्मादृतुधर्मवैलक्षण्यसिद्धये बहूसूर्यत्वमभ्युपेयम् ।.....। ' अष्टौ तु व्यवासिता ' इति । बाढम् । संत्येव तत्तल्लिंगकल्पा अनन्ताः सूर्याः । किन्तु तत्रास्ति कश्चिद् विशेषः । ' व्यवासिताः ' निश्चिताः ।

पाहिजत ' एवढेंच म्हटलें आहे. पण हा अर्थ मान्य केल्यास ऋतु लक्षणें हजारों असल्यामुळें सूयही हजारों मानावे लागतील. ही शंका त्या आरण्यकांतच वैशंपायनानें काढिलेली म्हणून दिली आहे. पण शेवटीं अनेक सूर्य असले तरी आठच श्रुतिप्रमाण असल्यामुळें तेवढेच मानावे असा त्यांत शेरा मारिला आहे. शतपथ ब्राह्मणांत (३,१,३,३) या अदितीच्या गोष्टीसंबंधानें सांगतांना असें म्हटलें आहे कीं, तिच्या फक्त सातच पुत्रांना **देवाः आदित्याः** असें म्हणतात, आणि आठवा मार्तंड हा पुरा वाढलेला नसल्यामुळें देव आदित्यांनीं त्याच्यापासून मनुष्यें व इतर प्राणी निर्माण केले.' या ब्राह्मणांत दुसऱ्या एक दोन ठिकाणीं (६,१,२,८ व ९,६,३,८) आदित्य बारा म्हणून सांगितले आहेत. प्रजापतीच्या बारा बिन्दूंपासून बारा आदित्य उत्पन्न झाले व त्यांनां निरनिराळ्या दिशांत प्रजापतीनें ठेविलें, असें एके ठिकाणीं सांगून, दुसरे ठिकाणीं, आदित्य किती असा प्रश्न करून 'संवत्सराचे बारा मास हेच आदित्य' असें त्याचें उत्तर दिलें आहे. उपनिषदांमध्येंही बाराच आदित्य सांगितले आहेत. अदितीच्या स्वरूपाविषयीं अनेकांचे अनेक तर्क आहेत, पण त्यांपैकीं कोणीही आदित्यांच्या संख्येसंबंधानें योग्य खुलासा केलेला नाहीं. उलट आदित्यांच्या सात किंवा आठ या संख्येचा सूर्याच्या गतीशीं कांहीं संबंधच नाहीं असें मानण्याकडे बऱ्याच जणांचा कल आहे. आठ आदित्य आठ मुख्य दिशांचे दर्शक होत असें कोणाचें मत आहे; पण टाकून दिलेल्या आठव्या आदित्याची त्यांत व्यवस्था लागत नसल्यामुळें त्या मार्तंडाप्रमाणें हें मतही टाकून देण्यासारखेंच आहे.

अर्थ लावण्याच्या खऱ्या गुरुकिल्लीच्या अभावीं एखाद्या साध्या गोष्टीविषयींही कसे तर्क वितर्क सुरू होतात तें दाखविण्यासाठीं अदितीच्या कथेविषयीं एवढा ऊहापोह करावा लागला. असो. बारा आदित्य म्हणजे वर्षाच्या बारा महिन्यांच्या बारा देवता होत असें शतपथ ब्राम्हणांतील वर दिलेल्या वाक्यावरून उघड होत आहे. आदित्यांच्या संख्येचा हा स्पष्ट खुलासा, आणि ऋतूंचीं नानाविध लक्षणें अनेक सूर्य असल्यामुळेंच

---

२ स मनसैव वाचं मिथुनं समभवत् । स द्वादश द्रप्सान् गर्भ्यमवत् । ते द्वादशादित्या असृज्यन्त तान् दिक्षूपादधात् (श. ब्रा. ६, १, २, ८) । कतम आदित्या इति । द्वादश मासाः संवत्सरस्यैत आदित्याः (श. ब्रा. ९,६,३,८) ।

उत्पन्न होतात अशी श्रद्धा, या दोन गोष्टी पुढें असल्यावर, आज बारा आदित्य म्हणजे जसे वर्षाच्या बारा महिन्यांचे दर्शक आहेत, तसे पूर्वी (पूर्व्ये युगे) सात आदित्य हे वर्षाच्या सात महिन्यांचे दर्शक होते, असें मानावयाला कल्पनेची फार ओढाताण करावयाला नको आहे. परंतु आर्य लोकांचें मूलस्थान मध्यआशियांत कोठें तरी होतें अशा पूर्व कल्पनेनें बद्ध झालेल्या पंडितांनां हें मत रुचलें नाहीं किंवा कदाचित् सुचलेंही नसेल. म्हणून, तैत्तिरीय आरण्यकांत निरनिराळे महिने निरनिराळ्या सूर्यांमुळें होतात असें सांगून त्याला आधार म्हणून सध्या अनुपलब्ध असा एक वेदमंत्रही दिला आहे, व शेवटीं सात आदित्य सात प्रदेशांत राहून ऋतू उत्पन्न करीत असतात या मतालाच पुष्टि दिली आहे, ही गोष्ट फार समाधान मानण्यासारखी आहे. सात सूर्य व सात दिक्प्रांत यांचा परस्परसंबंध ऋग्वेदांतही सांगितला आहे *(९, ११४,३). असो. तर आतां अदितीच्या गोष्टीचें सरळ तात्पर्य असें कीं, तिनें आपले सात पुत्र जे सात आदित्य ते प्रकाशयुक्त सात मास करण्याकरितां देवांना दिले; तिला आठवाही पुत्र झाला पण तो अपूर्ण वाढीचा होता; म्हणजे हा आठवा महिना प्रकाशाचा नसून तेथपासून काळोख सुरू झाला. ही गोष्ट पूर्वयुगांत घडली म्हणून जें सांगितलें आहे तें फार महत्वाचें आहे. या सूक्तांत पहिल्या दोन ऋचांत युग शब्द कालविभागवाचक म्हणून घातलेला आहे हें **देवानां पूर्व्ये युगे** व **उत्तरे युगे** या प्रयोगांवरून उघड दिसत आहे. यूरोपीय पंडित युग याचा अर्थ प्रत्येक ठिकाणीं 'पिढी' असा करतात. परंतु प्रस्तुत ऋचेंत तो तसा घेतां येत नाहीं. सूर्याचे सात रश्मी, किंवा सात घोडे, किंवा सात नांवाचा एकच घोडा या सर्वांतील सात संख्येचा संबंध सूर्यप्रकाशयुक्त अशा वर्षाच्या सात महिन्यांशींच आहे. तीस दिवसांची दीर्घ उषा जेथें आहे तेथें सूर्य प्रकाशाचे सात महिने असले पाहिजेत. सात आदित्य म्हणजे प्रकाशयुक्त सात महिने आणि आठवा मार्तांड म्हणजे काळोखाचा काळ असें मानिल्यास

---

* ही ऋचा वर १३० पानांत टीपेंतील तै. आरण्यकांतील उतार्‍यांत आली आहे. तिचा भावार्थ:–सात दिक्प्रांत असून त्यांचे सात सूर्य आहेत; सात ऋत्विज होते आहेत; हे सोम, जे सात आदित्य देव आहेत त्यांसह तूं आमचें रक्षण कर.

अदितीच्या गोष्टीचा चांगला उलगडा होतो.[1] मार्तंड शब्द **मार्त** म्हणजे मृत (मृ—मरणें या पासून) आणि **अंड** म्हणजे अंडें किंवा पक्षी यांपासून झाला आहे; व त्याचा अर्थ मृत सूर्य म्हणजे क्षितिजाखालीं असलेला सूर्य असा होतो; कारण ऋ. १०,५५,५ यांत **ममार** (मृत झाला) हा शब्द सूर्याच्या प्रात्याहिक अस्ताला लाविलेला आहे. सूर्याला पक्षी असेंही ऋग्वेदांत कित्येक ठिकाणीं म्हटलें आहे. (५,४७,३ सुपर्ण—१०,५५,६ सुपर्ण—१०,११९,३ कुवित्—१०,१७७,१८ पतंग). तर मग टाकून दिलेला मार्तंड म्हणजे क्षितिजाखालीं बुडालेला सूर्य असून ही गोष्ट ज्या ठिकाणी सूर्य सात महिने क्षितिजावर असून आठव्या महिन्यांत तो खालीं जातो त्या ठिकाणची होय. हें सूर्याचें विशिष्ट स्वरूप स्मृतिपटलावर एकदां बिंबल्यावर नुसत्या स्थानांतरानें त्याची आठवण कोणाच्याही मनांतून जाणें शक्य नाहीं. वैदिक ऋषी द्वादशादित्यांच्या प्रदेशांत रहात होते तरी त्यांना हें सूर्याचें स्वरूप परंपरागत जुन्या कथेच्या रूपानें माहीत होतें.

अक्षांशपरत्वें कमी जास्त होणारी महिन्यांची संख्या हें ध्रुवप्रदेशाचें विशिष्ट लक्षण असल्यामुळें केवळ सात महिन्यांच्या सूर्यप्रकाशयुक्त कालाचाच उल्लेख काय तो ऋग्वेदांत सांपडतो असें म्हणून भागणार नाहीं. कारण प्रस्तुत उपपत्ति खरी असल्यास सात महिन्यांबरोबर आठ, नऊ किंवा दहा महिन्यांचाही संबंध कोणत्याना कोणत्या तरी रूपानें सांपडला पाहिजे. असा संबंधही वेदांत आढळतो; पण तो कोठें व कसा पहावयाचा हें मात्र समजलें पाहिजे. सूर्याचे सात घोडे किंवा दुसऱ्याही सप्तांकविशिष्ट गोष्टी यांचा संबंध सात महिन्यांशीं आहे. पण सूर्याचे घोडे दहा आहेत असेंही ऋ. १,६३,९ यांत म्हटलें आहे. अर्थात् त्यांचाही अर्थ दहा महिने असाच घेतला पाहिजे. पण या संबंधानें अदितीच्या कथेवरच्च सर्व भिस्त टाकावयास नको आहे. याज्ञिक प्रक्रियेंत या विषयीं स्वतंत्र पुरावा मिळत आहे. ऋग्वेदांत 'आमचे पूर्व पितर' या नांवानें कांहीं प्राचीन ऋत्विजाविषयीं सांगितलें आहे. या ऋत्विजांनीं प्राचीन काळीं यज्ञांचा स्थापना करून पुढच्या लोकांना मार्ग करून ठेविला (ऋ. २, ३३, १३—६, २२, २). ऋ. १, ७६, ५ यांत मनूनें दिलेल्या हवींबरोबर इतरांची तुलना केली आहे. पण प्राचीन काळीं एकट्या मनूनेंच देवांनां हविर्भाग दिला

---

१ उत ला **हरितो दश** सूरो अयुक्त यातवे। इंदुरिंद्र इति ब्रुवन्॥ ऋ. ९,६३,९

असें नाहीं. त्यानें सात होतृंसहवर्तमान आदित्यांना पहिली होत्रा दिली असें १०, ६३, ७ यांत सांगितलें आहे; १, ३१, १७ यांत **अंगिरस्** आणि **ययाति** असे मनूबरोबरीचे ऋत्विज् सांगितले आहेत. दुसऱ्या ठिकाणीं (८, ४३, १३) **भृगु** व **अंगिरस**, (१, ८०, १६) **अथर्वण** आणि **दध्यंच्**, (१, १३९, ९) **दध्यंच्, अंगिरस्**, **कण्व**, आणि **अत्रि** अशींही नांवें पूर्व ऋत्विजांचीं म्हणून मनूबरोबरच दिलीं आहेत. अथर्व्यानें यज्ञ करून प्रथम पथ करून दिला, तेव्हां सूर्य जन्मास आला (१, ८३, ५). या अथर्वणांना बहुवचनांत **अंगिरस, नवग्न** आणि **भृगु** यांच्या सह ' आमचे पूर्वज ' (नः पितरः) असें म्हटलें आहे. (१०, १४, ६). २, ३४, १२ यांत **दशग्वांनीं** प्रथम यज्ञ केला असें सांगून (ते दशग्वाः प्रथमा यज्ञमूहिरे) १०, ९२, १० यांत जेव्हां भृगूंनीं आपल्या दक्षपणानें आपल्याला देवपण आणलें तेव्हां प्रथमच अथर्व्यानें यज्ञांच्या योगानें धारणा (सुव्यवस्था) केली. (यज्ञैरथर्वा प्रथमो विधारयद्देवा दक्षैर्भृगवः सं चिकित्रिरे) असें सांगितलें आहे. व्युत्पत्तिशास्त्राप्रमाणें वैदिक **अथर्वन्** शब्द **अथ्रवन्** (अग्नीचा उपासक) रूपानें अवेस्ता ग्रंथांत आढळतो; व **अंगिरस** शब्दाचा, व्युत्पत्तिनियमांवरून ग्रीक **आग्गिलॉस** (Aggilos)–दूत–आणि पर्शियन **अंगार**–घोडेस्वार या शब्दांशीं संबंध दिसतो. ऐतरेय ब्राह्मणांत (३, ३४) **अंगिरस** हे अंगारच (जळते कोळसे) होत असें म्हटलें आहे (ये अंगारा आसन् ते अंगिरसोऽभवन्). ऋ. १०, ६२, ५ यांतही 'अंगिरस अग्नीपासून उत्पन्न झाले ' (ते अंगिरसः सूनवस्ते अग्नेः पारे जज्ञिरे) असें सांगितलें आहे. आतां या सर्व व्युत्पत्या जरी खऱ्या मानिल्या नाहींत, तरी त्या शब्दांतील साहश्यावरून **अथर्वन्** आणि **अंगिरस** हे केवळ वैदिक ऋषींचेच पूर्व ऋत्विज् नसून सर्व आर्य शाखांचे होते असें म्हणावयास हरकत नाहीं. हीं नांवें विशेष व्यक्तींचीं नसून पूर्वकालीं यज्ञ चालविणाऱ्या ऋत्विजांच्या कुलांचीं जरी असलीं तरी त्यावरून आर्य लोकांची फाटाफूट होण्यापूर्वी त्यांना देवांची योग्यता आलेली होती हें उघड दिसत आहे. त्यां सर्वांचा ऋ. १०,१४,३–६ यांत यमाशीं संबंध जोडला आहे. पण एवढ्यावरून त्यांचें मनुष्यत्व कांहीं नाहींसें होत नाहीं. कारण त्यांना 'पूर्व यज्ञिय' असें अनेक ठिकाणी म्हटलें

आहे. तेव्हां हे आमचे पूर्व पितर आर्य लोकांची फाटाफूट होण्यापूर्वी जे यज्ञ करीत त्यांचे अवधि कसे होते हें दाखविण्यासारख्या कांहीं गोष्टी यज्ञिय वाङ्मयांत आहेत कीं नाहींत तें पहाणें फार महत्वाचें आहे; कारण त्यावरून आपल्या ध्रुवोपपत्तीला विशेष आधार मिळण्याचा संभव आहे.

अंगिरसांखेरीज इतरांच्या यज्ञांचे काल निश्चित करणारीं वचनें वैदिक ग्रंथांत आढळलेलीं नाहींत. श्रौतसूत्रांत '**अंगिरसां अयनम्**' नांवाच्या वार्षिक सत्रांचें वर्णन देऊन तें सर्व वार्षिक सत्रांचें आदर्शरूप जें '**गवां अयनम्**' त्याचेंच एक रूप आहे असें सांगितलें आहे. पण त्यांत 'गवाम् अयनाच्या' अवधि कांहीं दिलेला नाहीं. तै. संहितेंत **गवां अयनाचा** अवधि दिला आहे, त्याचें वर्णन पुढच्या स्वतंत्र प्रकरणांत करूं. प्रस्तुत अंगिरसांच्या अयनाचा कालावधि ठरवितां येतो कीं नाहीं तें पाहूं. तो ठरविण्याचें साधन सुदैवानें ऋग्वेदांतच आहे. ऋ. १०, ६२, ५–६ यांत **नवग्व** आणि **दशग्व** अशा अंगिरसांच्या जाति दिल्या आहेत; आणि बहुतेक ठिकाणीं त्यांचा एकत्र उल्लेख करून अंगिरसांनां लाविलेल्या गोष्टी व विशेषणें त्यांनांहीं लाविलेलीं आहेत. त्यांना अंगिरस् व भृगूंप्रमाणेंच 'आमचे पूर्व पितर' असें म्हटलें आहे (६,२२,२; व १०, १४,६). **वल सरमा** आणि **पणी** यांचा इन्द्रानें पाडाव केल्याच्या कथेंतही अंगिरसांप्रमाणेंच नवग्वांचाही संबंध आलेला आहे (१, ६२, ३ व ४; ५, २९, १२; ५, ४५, ७; १०, १०८, ८). त्यांत एका ठिकाणीं (१, ६२, ४) इन्द्रानें बल व त्याचा अद्रि हे फोडतांना त्यांची मदत घेतल्याचें सांगितलें[1] आहे. ५, २९, १२ यांत[2] नवग्वांनीं इन्द्राची स्तुति करून घट्ट झांकलेला गाईंचा गोठा फोडला असें म्हटलें आहे. पण यांपैकीं दोन ठिकाणींच त्यांच्या सत्राच्या अवधीचा संबंध आला आहे. ५, ४५, ७ यांत "ज्या अद्रीनें (दगडानें) **नवग्वांनीं दहा महिने अर्चन केलें** तो हातांनीं ताडण केल्यामुळें वाजत होता" असें सांगून पुढें ११ व्या ऋचेंत "जिनें **नवग्व दहा मास तरले** ती प्रकाशाचा वर्षाव करणारी तुमची स्तुति मीं अपांनां (जलांना) अर्पण करितों"

---

१ शक्र वलं रवेण दरयो दशग्वैः । १,६२,४.

२ नवग्वासः सुतसोमास इंद्रं दशग्वासो अभ्यर्चंत्यर्कैः ।
गव्यं चिदूर्वमपिधानवंतं तं चिन्नरः शशमाना अप व्रन् ॥ ऋ. ५,२९,१२

असें म्हटलें[1] आहे. पुनः २, ३४, १२ यांत "ज्या दशग्वांनीं पहिला यज्ञ केला, ते उषेच्या उदयीं आह्मांवर कृपा करोत," असें म्हणून, ४,५१,४ यांत "उषा नवग्व अंगिरसांवर आणि सप्तास्य दशग्वांवर पुष्कळ प्रकाशली" असें सांगितलें[2] आहे. याचा अर्थ उघडच असा होतो कीं त्यांचें सत्र फक्त दहा महिन्यांचें असून त्याचा उषेच्या उदयाशीं संबंध आहे. या नवग्व व दशग्वांनीं यज्ञांच्या साहाय्यानें काय काय केलें त्याचें आणखी, ५,२९,१२ यांत वर्णन केलें आहे, तें असें:—'सोमाचा हवि देऊन नवग्व व दशग्व यांनीं इन्द्राची स्तुति केली. नरांनीं मेहनत करून गाईंचा गोठा बळकट आच्छादिलेला होता तरी फोडला. ३, ३९, ५ यांत "आपले मित्र जे शक्तिमान् नवग्व त्यांच्यावरोबर इन्द्र जेथें गेला तेथें त्या दहा दशग्वांसह इन्द्राला सूर्य तमांत रहात असलेला असा आढळला" असें वर्णन केलें आहे.* १०,६२,२—३ यांत दशग्व व नवग्व अंगिरसांनीं स्वतःच वलाला मारण्याचें व सूर्याला आणि गाईंना सोडविण्याचें काम वर्षाच्या शेवटीं केल्याचें सांगितलें आहे;† पण त्याचा अर्थ त्यांनीं तसें करावयास इन्द्राला मदत केली असाच घेतला पाहिजे. असो. या सर्व वचनांचा एकत्र विचार करतां त्यावरून अनुमानें निघतात तीं अशीं:—

१. नवग्व आणि दशग्व यांचें सत्र दहा महिन्यांनीं संपत असे.

२. या सत्रांचा संबंध उषेच्या प्रथम प्रकाशाशीं होता.

३. हे याज्ञिक वलापासून गाईंची मुक्तता करण्याकरितां इन्द्राला वर्षाच्या शेवटीं (परिवत्सरे) मदत करीत; व

---

१ अनूनोदत्र हस्तयतो अद्रिरार्चन् येन दशमासो नवग्वाः । ५,४५,७
धियं वो अप्सु दधिषे स्वर्षां यया तरन् दश मासो नवग्वाः । ५,४५,११.

२ ते दशग्वाः प्रथमा यज्ञमूहिरे ते नो हिन्वं तूषसो व्युष्टिषु । २,३४,१२
येना नवग्वे अंगिरे दशग्वे सप्तास्ये रेवती रेवदूष ।४,५१,४.

* सखा ह यत्र सखिभि र्नवग्वैरभिज्ञ्वा सत्वभि गा अनुग्मन् । सत्यं तदिंद्रो दशभिर्दशग्वैः सूर्यं विवेद तमसि क्षियन्तम् ॥ ऋ. ३,३९,५.

† य उदाजन्पितरो गोमयं वस्त्रतेनाभिंदन्परिवत्सरे वलं । १०,६२,२.
य ऋतेन सूर्यमारोहयन् दिव्यप्रथयन्पृथिवीं मातरं वि । १०,६२,३.

४. ज्या ठिकाणीं इन्द्र गाईंना शोधावयास गेला तेथें सूर्य काळोखांत असलेला (तमसि क्षियन्तम्) त्याला आढळला.

आतां नवग्व व दशग्व यांच्याविषयींच्या या चार विधानांचा जरा बारीक विचार करूं. यासंबंधानें पहिला प्रश्न असा येतो कीं, त्यांचीं सत्रें दहाच महिन्यांत कां आटपत, व वर्षाचे बाराही महिने तीं कां चालत नसत ? वलाचा वध करून इन्द्रानें नवग्वांच्या साहाय्यानें गाईंना व सूर्याला **वर्षाच्या शेवटीं** सोडविलें असें जें त्यांच्या पराक्रमाचें वर्णन करणाऱ्या वर दिलेल्या वाक्यांत म्हटलें आहे, त्याचा संबंध सूर्याच्या व प्रकाशकिरणरूपी गाईंच्या वार्षिक मुक्ततेशीं आहे हें उघड आहे; व 'इंद्राला सूर्य काळोखांत असलेला आढळला'' या शब्दांनीं तर असें म्हणावयास विशेष आधार मिळतो. "अश्विनांनीं निर्ऋतीच्या उपस्थावर (मृत्यूच्या मांडीवर) निजलेल्याप्रमाणें किंवा अंधकारांत पडून राहिलेल्या सूर्याप्रमाणें किंवा पुरलेल्या तेजस्वी सुवर्णाप्रमाणें असलेल्या वंदनाला मुक्त केलें'' असें ऋ. १,११७,२* यांत म्हटलें आहे. यावरून **तमसि क्षियन्तम्** या शब्दांनीं क्षितिजाखालीं जाऊन दृष्टीआड झालेल्या सूर्याचाच बोध होतो असें दिसून येईल. म्हणून इन्द्रानें वलाला संवत्सराच्या शेवटीं ज्या ठिकाणीं मारिलें तें ठिकाण काळोखाचें असून नवग्व त्या वेळीं त्याला आपल्या सूक्तांनीं मदत करीत असत असें मानिलें पाहिजे. यावरून नवग्वाचे व दशग्वांचे सोमाचे हविर्भाग वलार्शी युद्ध चाललें असतां दिले जात असत असें सकृद्दर्शनीं वाटेल. पण वैदिक कल्पना अगदीं निराळी आहे. उदाहरणार्थ, सकाळची सूर्योपासना (संध्या) सूर्य उगवण्यापूर्वी करावयाची असते; तसेंच इंद्राला मदत करण्यासाठीं केलेले यज्ञही युद्धाच्या पूर्वीच करावे लागत. शिवाय दहा महिन्यांचा काळोखाचा काल पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही शक्य नाहीं. ह्मणजे अर्थातच नवग्वांचीं व दशग्वांचीं सत्रें प्रकाशयुक्त दहा महिन्यांत होत असत असें मानावें लागतें. हा प्रकाशाचा काळ जर बारा महिन्यांचा असता तर त्या दशग्वांना आपलें सत्र दहाच महिन्यांत पुरें करण्याचें कारण नव्हतें. म्हणून नवग्वांचें सत्र दहा महिने चालल्यावर सूर्य क्षितिजाखालीं गेल्या-

---

* सुषुप्वांसं न निर्ऋतेरुपस्थें सूर्यं न दस्रा तमसि क्षियन्तम् । शुभे रुक्मं न दर्शतं निखातमुदूपथुराश्वना वंदनाय ॥ १,११७,२.

मुळें काळोख पडून तें बंद होत असे असें मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं. या काळोखाच्या दीर्घ रात्रींत सोम पिऊन पुष्ट झालेला इन्द्र वलाचे किल्ले फोडून प्रकाशरूपी गाई व सूर्य यांना जुन्या वर्षाच्या अखेरीस व नव्याच्या आरंभीं मुक्त करीत असे; व मग पुनः हे अंगिरस उषःकालीं नवीन सत्राला आरंभ करीत. तात्पर्य, नवग्व दशग्वादि सर्व आद्य यज्ञिय दहा महिन्यांचें वर्ष असलेल्या ठिकाणीं रहात असत. या दशग्वांच्या कथेशिवाय इतर यज्ञिय वाङ्मयांतील स्पष्ट उल्लेखांवरूनही दशमासिक वर्षांची सिद्धता होत आहे; त्याचा विचार पुढील प्रकरणांत करूं.

नवग्व आणि दशग्व या शब्दांची व्युत्पत्ति पाहिली तरी तेंच अनुमान निघतें. **नव** आणि **दश** यांनां **ग्व** जोडून हे शब्द झाले आहेत. पण **नव** याचा अर्थ 'नऊ' असा न घेतां 'नवीन' असा निरुक्तकारांनीं घेतला आहे (११,१९). परंतु **नवग्व** आणि दशग्व हे ऋग्वेदांत बहुधा एकत्र आलेले असल्यामुळें दशग्वांचा **दश** शब्दांशीं जो संबंध आहे तोच नवग्वांचा **नव** शब्दाशीं असला पाहिजे. म्हणून **दश** याचा **दहा** खेरीज दुसरा कोणताही अर्थ नसल्यामुळें **नव** याचाही **नऊ** असाच अर्थ घेणें भाग आहे. आतां ग्वचा अर्थ ठरवावयाचा. कित्येक हा शब्द **गो** (गाय) पासून साधतात, तर दुसरे गम् (जाणें) पासून तो झाला आहे असें म्हणतात. पण ऋ. ३,३९,५ यांत दशग्व **दहा** आहेत असें म्हटलें आहे, त्यावरून **नऊ गाईंचे** अथवा **दहा गाईंचे** असा अर्थ न घेतां **दहांनीं** किंवा **नवांनीं गमन करणारे** असाच घेणें रास्त दिसतें. पण दशग्व व नवग्व या शब्दांचा एक वचनीं प्रयोगही आलेला असल्यामुळें (ऋ. ६,६,३,; ८, १२, २; ९, १०८, ४) नवांचा किंवा दहांचा गण असा त्याचा नेहमींच अर्थ असेलसें दिसत नाहीं. अर्थात् नऊ व दहा या संख्यांचा अर्थ दुसरा कांहीं तरी असला पाहिजे. सायणाचार्य ऋ. १,६२,४ या वरील आपल्या भाष्यांत * म्हणतात

---

* अंगिरसो द्विविधाः । सत्रयागमनुतिष्ठन्तो ये नवभिर्मासैः समाप्य गतास्ते नवग्वाः ।...' नवग्वा नवनीतगतय ' इति यास्को व्याचख्यौ । ये तु दशभिर्मासैः समाप्य जग्मुस्ते दशग्वाः ॥ ऋ. १०,६२,४ वरील भाष्य.

सत्रमासीनानामंगिरसां मध्ये केचन नवसु मास्सु कर्म कृत्वोदतिष्ठन् केचन

"अंगिरसांच्या दोन जाति आहेत, नऊ महिन्यांनीं सत्र संपवून उठले ते नवग्व, आणि दहा महिन्यांनीं सत्र संपवून उठले ते दशग्व." नवग्व व दशग्व यांचीं सत्रें दहा महिन्यांत संपत हें ऋ. ५,४५,७–११ यांत सांगितलेंच आहे. अर्थात् सायणाचार्यांचा अर्थ अगदीं सयुक्तिक असून कांहीं परंपरेनेंच तो आलेला असला पाहिजे. आतां एवढें आहे कीं, ऋग्वेदांत नवग्वांसंबंधानेंही दहा महिन्यांचेंच सत्र सांगितलें असून नऊ महिन्यांचें मुळींच सांगितलेलें नाहीं. परंतु दशग्वांना दशमासिक सत्रावरून नांव मिळालें असल्यास नवग्वांना नवमासिक सत्रावरून मिळालें असलें पाहिजे. हें व्युत्पत्तिसादृश्यावरून अगदीं उघड आहे; कारण त्या दोन शब्दांत फक्त संख्येचाच कायतो फरक आहे. म्हणून दशग्वांनीं जें दहांनीं केलें तेंच नवग्वांनीं नवांनीं केलें असें उघड होतें.

या अनुमानाला बळकटी आणण्यासारखी **अंगिरसांची** आणखीही एक गोष्ट आहे. ऋ ३,५३,७ यांत त्यांना '**विरूपा** दिवस्पुत्रासः' (विविध रूपांचे द्यौचे पुत्र) म्हणून, ८,६४,६. यांत 'विरूप' हा एकवचनी शब्द **अंगिरस्** शब्दार्थी समानार्थक म्हणून योजलेला आहे. पण या गोष्टीचा अगदीं स्पष्ट उल्लेख १०,६२,६ यांत आढळतो. पांचव्या ऋचेंत 'अंगिरस **विरूप** असून ते अग्नीपासून उत्पन्न झाले असें सांगून पुढें-त्यांत म्हटलें आहे[1] कीं, 'जे विरूप अग्नीपासून व द्यौपासून उत्पन्न झाले, (त्यांत) नवग्व व दशग्व हे श्रेष्ठ अंगिरस देवांच्यामध्यें उत्कर्ष पावते झाले.' **विरूप** याचा सरळ अर्थ विविध रूपांचे असा आहे; व वरील वाक्यांत अंगिरसांच्या नाना जाति दाखविण्यासाठीं त्याचा उपयोग केलेला आहे असें वाटतें. दिवस व रात्र यांच्या संबंधांत आलेल्या **विरूप** शब्दाचें मागें विवेचन केलें आहे, व त्यांत **रूप** याचा अर्थ अवधि असा होतो असें माधव नामक टीकाकाराच्या आधारावरून दाखविलें आहे (पान ११५). प्रस्तुत प्रकरणांतही विरूप शब्दाचा तोच अर्थ आहेसें दिसतें. नवग्व व दशग्व हे अंगिरसांत मुख्य होते खरे, पण त्यांच्या या दोनच

दशमु मास्स्विति । एवमंगिरसामयनमुक्तं । तेषामग्निर्नवग्वश्च दशग्वश्चोक्तः ॥ ऋ. १०,६२,६ वरील भाष्य.

1 ये अग्नेः परि जज्ञिरे विरूपासो दिवस्परि । नवग्वो नु दशग्वो अंगिरस्तमः सचा देवेषु मंहते ॥ ऋ. १०,६२,६.

जाति होत्या असें नाहीं; हेंच दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें तर ते केवळ **नवां** नन्तर कीं **दहां** नन्तर उठणारे नसून **विविध अवधीं** नंतर उठणारे (विरूप) होते, म्हणजे त्यांच्या सत्राचा अवधि कधीं नऊ महिन्यांहून कमी तर कधीं दहांहून अधिक असे. ऋ. १०, ४७, ६ यांत अंगिरसाचा पुत्र बृहस्पति याला **सप्तगु** असें विशेषण लाविलें आहे. बृहस्पतीला ४,५०,४ यांत **सप्तास्य** म्हटलें असून अथर्व वेदांत (४, ५, १) प्रथम ब्राम्हण जो बृहस्पति त्याला दशास्य म्हटलें आहे. दशग्वालाही ऋ. ४, ५१, ४ यांत सप्तास्य म्हटलेलें पूर्वी सांगितलेंच आहे. या सर्वांचा अर्थ नीट लावावयाचा तर अंगिरस हे केवळ नऊ किंवा दहा महिन्यांनींच केवळ सत्रयाग संपवून उठणारे नसून दुसऱ्या अवधीनंतरही उठणारे होते आणि त्यांचीं सत्रें सूर्य क्षितिजावर जितके महिने स्थानपरत्वें असे, तितक्या महिन्यांत आटपत असें मानिलें पाहिजे. म्हणजे यावरून असें झालें कीं, अगदीं प्राचीन सत्रें सात पासून दहा महिने पर्यंत चालत असून त्यांतील होतृ-संख्याही महिन्यांच्या प्रमाणेंच सात पासून दहा पर्यंत असे. दीर्घ रात्र सुरू झाली म्हणजे हीं सत्रें बंद होऊन वर्ष संपण्याच्या सुमारास इन्द्र वलाशीं युद्ध करून त्याला चीत करीत असे. यांत **परिवत्सरे** (वर्षाच्या शेवटीं) हे शब्द फार सूचक असून वर्षाचा शेवट दीर्घरात्रीबरोबरच होत असे असें त्यावरून दिसत आहे.

दहा महिन्यांच्या सूर्यप्रकाशयुक्त कालाचा संबंध **दीर्घतमस्** याच्याही कथेंत आला आहे. वैदिक कथांचें परीक्षण पुढील एका स्वतंत्र प्रकरणांतच करावयाचें आहे. पण **दीर्घतमस्च्या** गोष्टींत त्याच्या आयुष्याविषयीं केलेल्या स्पष्ट उल्लेखावरून दशग्वासंबंधानें वर केलेल्या अनुमानाला चांगली बळकटी येत असल्यामुळें, त्याच्या कथेचा येथेंच विचार करूं. महाभारत आदिपर्व अध्याय १०४ यांत दीर्घतम्याची गोष्ट दिली आहे. तो **उतथ्य** व **ममता** यांचा पुत्र असून बृहस्पतीच्या शापामुळें जन्मान्ध झालेला होता. पुढें **प्रद्वेषीशीं** त्याचें लग्न होऊन त्यांना कांहीं मुलेंही झालीं. कालान्तरानें त्या मुलांना आपल्या अंध बापाला पोसण्याचा कंटाळा आल्यामुळें त्यांनीं त्याला एका तराफ्यावर बसवून गंगेंत सोडून दिलें. बराच काल तो तसाच वहात होता. शेवटीं पुष्कळ अंतर गेल्यावर बलि राजानें

त्याला बाहेर काढिल. ऋग्वेदामधील कथेंत त्याची मुक्तता **अश्विनांनीं** केली आहे. तो **ममता** आणि **उचथ्य** यांचा पुत्र असून (१, १५२, ६; १, १५८, ४) त्यानें **त्रैतना**पासून सोडविण्यासाठीं **अश्विनां**ची प्रार्थना केली आहे. पण ऋ. १, १४७, ३ आणि ४, ४, १३ यांत त्याला अग्नीनें दृष्टि दिली असें [1]सांगितलें आहे. ऋग्वेदांत एका देवतेचीं कृत्यें दुसरीला पुष्कळदां लाविलेलीं लाविलेलीं असल्यामुळें अग्नीचें हें कृत्य अश्विनांकडे लावण्यास हरकत नाहीं. दोन्ही देवता प्रातःकालिक असल्यामुळें त्यांच्या पराक्रमाची भेसळ होणें सहाजिक आहे. असो. अश्विनांनीं एकट्या दीर्घतम्याचीच मुक्तता केली आहे असें नाहीं. त्यानीं **च्यवनाला** वृद्धाचा तरुण केलें (ऋ. १,११६, १०). **भुज्यूला** समुद्रांतून बाहेर काढिलें (ऋ. १,११६,४) इत्यादि अनेक प्रकारचीं त्यांचीं परोपकाराचीं कृत्यें १, ११६ यांत वर्णन केलीं आहेत. या सर्व पराक्रमांचा संबंध हिंवाळ्यांत कमजोर झालेल्या सूर्याला पुनः शक्तिमान् करण्याशीं आहे असें पुष्कळांचें मत आहे. पण ' तमसि क्षियन्तं सूर्य न ' (काळोखांत पडलेल्या सूर्याप्रमाणें) हे वंदनाच्या कथेंतील शब्द स्पष्ट पुढें असतांना केवळ हिंवाळ्यांतील कमजोर सूर्याशींच या पराक्रमांचा संबंध जोडून भागणार नाहीं; क्षितिजाखालीं बुडालेल्या सूर्यालाच ते लावले पाहिजेत. ही गोष्ट लक्षांत ठेऊन दीर्घतम्याच्या कथेवरून प्रस्तुत विषयाला अनुकूल असें कांहीं अनुमान काढतां येईल कीं नाहीं तें पाहूं.

या कथेंतील विशेष महत्वाचें वाक्य ऋ. १,१५८,६ यांत आलें आहे. त्याचा भावार्थ असा:—"ममतेचा पुत्र दीर्घतमा **दहाव्या युगांत** जराजीर्ण झाल्यामुळे तो आपल्या अर्थाकडे (उद्दिष्ट स्थानाकडे) जाणाऱ्या अपांचा ब्राम्हण सारथी झाला." यांत **दहाव्या युगांत** आणि आपल्या **अर्थाकडे जाणाऱ्या आपः** या पदांचाच अर्थ जरा गूढ आहे. बाकीचा भाग अगदीं सरळ आहे. दीर्घतमा दहाव्या युगांत म्हातारा होऊन व महाभारतांत सांगितल्याप्रमाणें

---

१ ये पायवो मामतेयं ते अग्ने पश्यन्तो अंधं दुरितादरक्षन्। ऋ. १,१४७,३ व ४,४,१३.

२ दीर्घतमा मामतेयो जुजुर्वान् दशमे युगे। अपामर्थं यतीनां ब्रह्मा भवति सारथिः। ऋ. १, १५८, ६.

पाण्यावर स्वार होऊन (सारथी होऊन) पाण्याच्या अर्थाकडे (उद्दिष्ट स्थानाकडे) चालू होतो. पण यांतील **युग** शब्दाच्या अर्थाविषयीं पंडितांमध्यें मतैक्य नाहीं. कित्येक त्याचा अर्थ वेदांगज्योतिषांतल्यासारखें पंचसंवत्सरमय कालचक्र असा घेतात, व दीर्घतमा पन्नासाव्या वर्षीं म्हातारा झाला असें म्हणतात. कित्येक यूरोपियन पंडितांचा तर ऋग्वेदांत युग शब्दाचा प्रत्येक ठिकाणीं 'पिढी' असा अर्थ घेण्याचा आग्रहच आहे. तेव्हां त्याचा जरा विशेष विचार केला पाहिजे. **युग** शब्दाचा 'कालभाग' असा अर्थ होतो, निदान त्याच्या अनेक अर्थांपैकीं हा एक आहे याबद्दल शंकाच नाहीं. पण युग शब्द व विशेषेंकरून **मानुषा युगा** असा प्रयोग जेथें जेथें ऋग्वेदांत येतो, तेथें तेथें त्याचा अर्थ 'पिढी' असा पाश्चात्य पंडित करतात, व सायणादि आपलेकडील वैदिक टीकाकार बहुतेक ठिकाणीं 'मर्त्यांचीं युगें' असा त्याचा अर्थ घेतात. पण कित्येक ठिकाणीं विकल्पानें 'जोडी' 'युग्म' असाही त्याचा अर्थ त्यांनीं केला आहे. व्युत्पत्तिदृष्ट्या पहातां युग शब्द युज् (जोडणें) धातूपासून झाला असल्यामुळें त्याचा 'रात्रि-दिवसाची जोडी,' 'महिन्यांची जोडी' (ऋतु) 'पक्षांची जोडी' ऊर्फ 'सूर्यचंद्रांचा संयोगकाल म्हणजे महिना' असा कोणताही अर्थ होऊं शकेल. कलियुगाच्या आरंभीं सर्व ग्रह एकत्र झाले होते अशी कल्पना आहे, व म्हणूनच त्याला युग नांव दिल्याचें सांगतात. मनुष्यांकडे लाविल्यास, 'जोडी' किंवा 'पिढी' असाही **युग** शब्दाचा अर्थ होईल. म्हणजे **मानुषा युगा** या ऋग्वेदांतील प्रयोगांतील **युगा** शब्दाचा अर्थ निश्चित करण्यांत व्युत्पत्तीचा फारसा उपयोग होणार नाहीं. पुराणांतील युगपद्धति वेदांना लावतां येणार नाहीं अशा मतामुळेंच पाश्चात्य पंडित युग शब्दाचा अर्थ 'पिढी' शिवाय दुसरा कांहीं करीत नाहींत. पण हा त्यांचा केवळ आग्रह आहे.

युगे युगे हा प्रयोग ऋग्वेदांत निदान पांच सहा ठिकाणीं तरी आलेला आहे (३, २६, ३—६, १५, ८—१०, ९४, १२ इ०). त्या सर्वांचा 'कालभाग' असाच अर्थ सायणाचार्यांनीं केला आहे. ३, ३३, ८ व १०, १०, १० यांत **उत्तरा युगा** असे शब्द आहेत, व १०, ७२, १ यांत **उत्तरे युगे** असा प्रयोग आहे. याच्या पुढच्या ऋचेंत 'देवानां पूर्व्ये युगे' आणि 'देवानां उत्तरे युगे' असे प्रयोग आहेत. या सर्व ठिकाणीं 'युग' शब्दाचा अर्थ 'कालभाग' याशिवाय दुसरा होणें शक्य

नाहीं, हें संदर्भावरून उघड दिसत आहे; कारण युगशब्दाचा त्या ठिकाणीं कालाशीं संबंध आहे. आतां 'देवानां युगं' याचा जर 'देवांचें युग' (काल) असा अर्थ करावयाचा तर 'मानुषा युगा' याचा ही 'मनुष्यांचे काल' असा करावयास काय हरकत आहे? पण ऋग्वेदांत कित्येक स्थळें तर अशीं आहेत कीं, त्यांत 'युग' याचा अर्थ 'पिढी' असा घेतांच येत नाहीं. उदाहरणार्थ, ५, ५२, ४ यांत मरुतां-संबंधानें **विश्वे ये मानुषा युगा पान्ति मर्त्यं रिषः** असें म्हटलें आहे. यांत **पान्ति** हें क्रियापद असून त्याचा **ये विश्वे** (जे सर्व) हा कर्ता व **मर्त्यं** हें कर्म आहे; व **रिपः** (त्रासापासून) हा पंचम्यन्त शब्द ज्यापासून रक्षण करावयाचें (पान्ति—रक्षण करतात) त्याचा वाचक आहे. आतां एवढ्या शब्दांचा 'जे सर्व त्रासापासून मनुष्यांचें रक्षण करतात' असा अर्थ झाला. उरतां उरलें **मानुषा युगा** हें पद; त्याचा अर्थ काय? हें पद द्वितीयान्त समजून त्याचा अर्थ 'मनुष्यांच्या पिढ्यांना' असा केल्यास **मर्त्यं** हें द्वितीयान्त पद निरथक होतें. अर्थात् युग शब्दाचा दुसरा प्रसिद्ध अर्थ जो 'काल' तोच घेणें अवश्य आहे. असा अर्थ घेतल्यास एकंदर वाक्याचा 'जे सर्व मनुष्यांच्या कालांत त्यांचें त्रासापासून रक्षण करतात' असा सरळ स्वाभाविकपणें अर्थ होतो. पण द्विरुक्तीचा दोष घेऊनही मॅक्स मुल्लरनें 'जे सव मनुष्यांच्या पिढ्यांचें, माणसांचें त्रासापासून रक्षण करतात' असा अर्थ केला आहे. **युग** शब्दाचा अर्थ निश्चित करणारें आणखी वचन ऋ. १०, १४०, ६ हें आहे. ही ऋचा अग्नीची असून तींत 'अग्नीपासून आशीर्वाद घेण्यासाठीं जनांनीं त्याला पुढेंच ठेविलें' असें सांगितलें आहे. ती ऋचा अशी.

ऋतावानं महिषं विश्वदर्शतम्
अग्निं सुम्नाय दधिरे पुरो जनाः ।
श्रुत्कर्णं सप्रथस्तमं
त्वा गिरा दैव्यं मानुषा युगा ॥

या ऋचेंत ऋतावानं, महिषं, विश्वदर्शतं, श्रुत्कर्णं, सप्रथस्तमं, त्वा, दैव्यं हे सर्व शब्द द्वितीयान्त असून अग्नीचीं विशेषणें आहेत. 'अग्निं' हें द्वितीयान्त पद 'दधिरे' क्रियापदाचें कर्म आहे. 'जनाः' हा कर्ता

असून ' दधिरे ' (ठेविते झाले) हें सर्व ऋचेंत एकच क्रियापद आहे. 'सुम्नाय' हा चतुर्थ्यन्त शब्द 'दधिरे' या क्रियेचा उद्देश व 'पुरः' हा शब्द स्थान दाखवीत आहे. आतां यांतील विशेषणात्मक शब्द काढून टाकिल्यास एकंदर ऋचेचा अर्थ 'जनांनीं आपलें कल्याण व्हावें म्हणून अग्नीला पुरोभागीं ठेविलें' असा होतो. आतां राहिलें ' मानुषा युगा ' हें पद. त्याचा स्वाभाविकपणें इतर शब्दांशीं दिसणारा संबंध म्हणजे कालवाचक द्वितीया हाच होय. असा संबंध घेऊन या ऋचेचा अर्थ 'जन आपले कल्याणास्तव (यथावर्णित) अग्नीला मनुष्यांच्या कालांत स्तुतिपूर्वक पुरोभागीं ठेविते झाले ' असा होतो. पण ग्रिफिथ या पाश्चात्य पंडितानें युग याचा आपला ठराविक ' पिढी ' असा अर्थ घेऊन व पदरचें एक क्रियापद भरीला घालून ' मनुष्यांच्या पिढ्या सूक्तांनीं अग्नीस [मोठेपणा देते झाले]' असा या ऋचेच्या शेवटच्या चरणाचा अर्थ केला आहे. एकदां युग शब्दाचा अर्थ कांहीं झालें तरी ' पिढ्या ' असाच करावयाचा दुसरा करावयाचाच नाहीं, असें कायमचें ठरवून टाकिल्यामुळें शब्दांची कोण ओढाताण करावी लागते हें ग्रिफिथच्या या अर्थावरून दिसून येईल. वाजसनेयी संहितेंत हा मंत्र आला असून त्यांत महीधरानें ' मानुषा युगा ' याचा मनुष्यांचीं युगें ' काल ' असाच अर्थ केला आहे. अशा रीतीनें सर्वमान्य अर्थपद्धतीचा अवलंब करावयाचा असल्यास " मानुषा युगा " याचा 'मनुष्यांचे काल' याशिवाय दुसरा कोणताही अर्थ होणें ज्यांत शक्यच नाहीं अशीं दोन स्थळें आपल्याला आढळलीं. 'मानुषा युगा' हे शब्द 'मर्त्याः, जनाः' अशा मनुष्यवाचक शब्दांबरोबर ऋग्वेदांत अन्य ठिकाणीं आलेले आढळत नाहींत. पण एकदां एखाद्या शब्दाचा अर्थ फक्त एकाच ठिकाणावरून कां होईना, पण पूर्णपणें निश्चित करतां आला, तर तोच इतर ठिकाणींही संदर्भाला विरुद्ध नसल्यास घेतला पाहिजे. यास्कानें मुष्कळ वैदिक शब्दांचा अर्थ याच पद्धतीनें निश्चित केला आहे, व म्हणून प्रस्तुत प्रसंगीं त्या पद्धतीचा अवलंब करण्यांत वहिवाटीविरुद्ध वर्तन मुळींच होत नाहीं.

मानुषा युगा याचा ' मनुष्यांचे काल ' असा अर्थ ठरला. पण या कालाचा अवधि किती तें पाहिलें पाहिजे. अथर्ववेदांत (८, २, २१) युग याचा अर्थ दहा हजार वर्षांहून कमी नाहीं इतका

मराठी ग्रंथ संग्रहालय
पुणे

काळ असा घ्यावा लागतो. पण ऋग्वेदांत युग शब्दानें याहून फारच कमी अशा काळाचा बोध होतो असें मानावयास सबळ आधार आहे. ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं **प्रथमा उषा, आयतीनां प्रथमा** (येणाऱ्या उषांत पहिली) असें पुष्कळ वेळां आलें आहे, (१, ११३, ८; २३, २; ७, ७६, ६ इं.) व ७, ७१, ३ यांत 'अवमा' (शेवटची) उषा सांगितली आहे. १, १२३, ९ यांत 'उषा पहिल्या दिवसाला जाणते' असें म्हटलें आहे, (जानत्यह: प्रथमस्य). पूर्वी एका प्रकरणांत केलेलें वैदिक उषेचें विवेचन बाजूला ठेविलें, तरी 'पहिली' या क्रमवाचक विशेषणावरून ही उषा वर्षाची पहिली उषा म्हणजे वर्षाच्या पहिल्या दिवसाची उषा होय हें दिसून येईल. ही **प्रथमा** आणि **अवमा** उषा म्हणजे वर्षाच्या पहिल्या व शेवटच्या दिवसाची उषा होय. तसेंच वैदिक उषांसंबंधानें मागील विवेचन विचारांत घेतल्यास ही पहिली उषा म्हणजे दीर्घ रात्रीच्या अखेरीस येणाऱ्या व वर्षारंभ करणाऱ्या उष:कलापैकीं पहिली उषा असेंही अनुमान करावयास हरकत नाहीं. ही पहिली उषा "मनुष्यांच्या युगांना हळुहळु कमी करते" (प्रमिनती मनुष्यां युगानि) असें १, १२४, २ व १, ९२, ११ यांत म्हटलें असून उषेचा उदय झाल्यावर "देवभक्त लोक युगें पसरतात" (नरो देवयंतो युगानि वितन्वते) असें १, ११५, २ यांत सांगितलें आहे. यूरोपीय पंडित येथें युगाचा अर्थ 'पिढी' असाच करतात. पण संदर्भावरून वर ठरविलेला 'कालविभाग' असाच त्याचा अर्थ घेतला पाहिजे. ही पहिली उषा दैवी यज्ञ सुरु *करते व मानुष युगें पसरते असें जें म्हटलें आहे त्यावरून पहिली उषा आली कीं यज्ञ व मानुष युगें सुरु होत; म्हणजे 'मानुषा युगा' या पदानें बोधित होणारा काळ पहिल्या उषेपासून मोजित असत असें दिसतें. 'मानुषा युगा' व 'प्रथमा उषा' यांच्या या साहचर्यावरून मानुष युगांचा अवधि ठरविण्याचें एक साधन मिळालें आहे. कारण हीं मानुष युगें जर पहिल्या उषेबरोबर सुरू होत तर तीं शेवटच्या उषेबरोबर संपत असत हें उघड झालें. म्हणजे मानुष युगांचा हा समुच्चय पहिल्या व शेवटच्या उषांमधील प्रकाशयुक्त कालाचा द्योतक असून असें एक युग म्हणजे या कालाच्या कोणत्या तरी भागाचें दर्शक होतें. येणें

---

* अमिनती दैव्यानि व्रतानि । ऋ.

प्रमाणें युग शब्दाचा अर्थ ऋग्वेदांत 'वर्षांहून कांहीं तरी कमी काल' असा होतो हें दाखविण्याला दीर्घतम्याच्या गोष्टीखेरीज इतरही स्वतंत्र पुरावा आहे. असें असल्यामुळें 'दीर्घतमा दहाव्या युगांत जराजीर्ण झाला' या वाक्याचा उलगडा करणें आतां सोपें झालें आहे इतकेंच नव्हे तर त्यावरून युग शब्दाचा नक्की अर्थ काय आहें हेंही समजण्याला मार्ग झाला आहे. 'मानुषा युगांचा' काल वर्षांहून कमी म्हणजे पहिली व शेवटली उषा ऊर्फ संवत्सरांचीं दोनें अग्रें यांच्या मधला असून दीर्घतम्याची गोष्ट म्हणजे जर सूर्यावरील रूपक असेल तर 'तो दहाव्या युगांत म्हातारा झाला' याचा अर्थ 'तो दहाव्या महिन्यांत क्षितिजाखालीं गेला' असाच केला पाहिजे. वर्षांची पहिली उषा व शेवटची उषा यांच्या मधला काळ, दहा दिवस किंवा दहा पक्ष हा फारच थोडा—नव्हे अशक्य—असल्यामुळें तो दहा महिन्यांचाच मानिला पाहिजे. म्हणजे युग शब्दाचा अर्थ **महिना** असा केला पाहिजे. तात्पर्य दीर्घतमा म्हणजे दहाव्या महिन्यांत म्हातारा होणारा सूर्य होय; आणि तो पाण्यावर स्वार होऊन त्यांच्याबरोबर त्याच्या इष्टस्थानाकडे गेला म्हणजे क्षितिजाखालील समुद्राकडे गेला. यांत आलेलें पाणी म्हणजे ज्यांचा वरुण राजा, (७, ४९,२) ज्यांना त्यानें ऋत नांवाचा मार्ग खणून देऊन (२,२८,४) सूर्याला वाट पाडून दिली (७,८७,१) व ज्या इन्द्रानें त्यांना वलाच्या तडाख्यांतून सोडविल्यावर सूर्याला वर आणतात (१,५१,४) त्याच प्रसिद्ध **आपः** होत. दीर्घतम्याची कथा, ध्रुवाजवळील प्रदेशांतल्या 'शुक्र अर्णावर (७,६०,४) म्हणजे तेजोमय समुद्रावर (क्षितिजावर) आल्यावर तेथें मानुषा युगा म्हणजे दहा महिने राहून पुनः समुद्रांत जाणाऱ्या' सूर्यावरील रूपक आहे. **आपां**संबंधानें सविस्तर विवेचन पुढील एका प्रकरणांत यावयाचें आहे. येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं, दीर्घतम्याच्या कथेचा वर सांगितल्याप्रमाणें अर्थ केल्यास त्याचा दहा महिन्यांनीं सत्र संपविणाऱ्या दशग्वांच्या कथेशीं मुळींच विरोध येत नाहीं.

युग आणि **मानुषा युगा** यांवर एवढें व्याख्यान करावयाचें कारण एवढेंच कीं 'कालभाग' असा त्यांचा स्पष्ट अर्थ दाखवणारीं वचनें ऋग्वेदांत असतांही आग्रहानें त्यांचा चुकीचा अर्थ पाश्चात्य पंडित करीत असतात. **विश्वे ये मानुषा युगा** इ० (५,५२,४) आणि **ऋतावानं विश्वदर्शतं**—

दैव्यं मानुषा युगा । (१०,१४०,६) या दोन वचनांवरून मानुषा युगा म्हणजे मनुष्यांचीं युगें (काल) असा अर्थ दिसून आला. पहिल्या उषेशीं असलेल्या त्यांच्या संबंधावरून (प्रमिनती मनुष्या युगानि...आयतीनां प्रथमोषा व्यद्यौत् १,१२४,२) मानुषा युगा म्हणजे वर्षाहून कांहीं कमी असलेला काळ असा अर्थ ठरला; व दीर्घतमा दहाव्या युगांत जरा जीर्ण होतो यावरून युग शब्दाचा महिना असा अर्थ निश्चित करतां आला. मद्रासचे प्रोफेसर रंगाचार्य यांनीं आपल्या 'युगा'वरील निबंधांत स्वतंत्र आधारावरून हींच अनुमानें काढिलीं आहेत. युग शब्दाच्या व्युत्पत्तीवरून त्याचा **युति** असा अर्थ घेऊन विशिष्ट आकाशस्थ ज्योतींच्या युतीवरून युगांचा कालावधि ठरविण्याची कल्पना प्रथम चंद्राच्या कलांवरून निघाली असावी असें त्यांनीं अनुमान केलें आहे. षड्विंश ब्राम्हणांत (४,६) चार युगांचीं अगदीं प्राचीन नांवें दिलीं असून तेथें त्यांचा चंद्राच्या कलांशीं संबंध आहे. प्रो. रंगाचार्यांनीं अमावास्येचें प्राचीन नांव जें दर्श त्याचा विचार करून युगाची प्राथमिक कल्पना म्हणजे दर्शापासून दर्शापर्यंतचा काळ ऊर्फ महिना अशी असावी असा तर्क केला आहे. मानुषा युगांचा आरंभ पहिल्या उषेपासून होतो असें जें ऋग्वेदांत म्हटलें आहे, त्याशीं 'इन्द्रानें वृत्राला मारून आणि उषा व सूर्य यांना उत्पन्न करून **आकाशांत मासांचें विधान केलें** (मासां विधानमदधा अधि द्यवि १०, १३८, ६) हें वाक्य जोडल्यास, प्रथम उषेपासून सुरू होणारें कालचक्र म्हणजे मासचक्रच होय हें आणखी स्पष्ट होईल. तर आतां मानुषा युगा याचा अर्थ प्राचीन काळीं मासचक्र असा असून, ज्या काळांत सूर्य क्षितिजावर असून आर्य लोकांचे आदिपूर्वज यज्ञयागादि धार्मिक व सामाजिक विधि करीत असत त्या काळाचा दर्शक असा हा शब्द होता असें अनुमान करावयास कांहींच हरकत नाहीं.

या म्हणण्याला जोर आणणारीं आणखीहीं वचनें ऋग्वेदांत आहेत. **मानुषा युगा** हा प्रयोग वर दिलेल्या शिवाय इतर ठिकाणींही आलेला आहे. पण तेथेंही पाश्चात्य पंडितांचा 'मनुष्यांच्या पिढ्या किंवा जाति'

---

१ पुष्ये (कलौ) चानुमतिर्ज्ञेया सिनीवाल्लीति द्वापरे । खार्वायां (त्रेतायां) तु भवेद्राका कृतपर्वे कुहुर्भवेत् ॥

अस्मा अर्थ जरी कसाबसा जुळतो, तरी तो समाधानकारक लागत नाहीं. याचें उत्तम उदाहरण ऋ. २, २, २ हें आहे. या ऋचेंत 'अग्नि **मानुषा युगा** आणि **क्षपः** इतका काळ पर्यन्त प्रकाशतो' असें म्हटलें आहे. **क्षपः** म्हणजे 'रात्री' असा अर्थ असल्यामुळें मानुषा युगा आणि क्षपः हे शब्द जोडीचे असून त्या दोहोंचाही अर्थ कालवाचकच समजणें युक्त आहे. मानुषा युगा या शब्दांनीं दीर्घ दिवस व त्याच्या मागाहून येणारीं साधारण अहोरात्रें मिळून झालेल्या प्रकाशयुक्त कालाचा जरी बोध होत असला, तरी त्यांत त्या कालानन्तर येणाऱ्या दीर्घ रात्रीचा कांहीं समावेश होत नाहीं. तेव्हां सर्व वर्षाविषयीं बोलावयाचें असल्यास मानुषा युगा आणि क्षपः असा जोड शब्द घालणें अवश्यच होतें व हाच अर्थ २,२,२ या ऋचेंत **मानुषा युगा** आणि **क्षपः** या शब्दांनीं व्यक्त केला आहे. ऋ. ४,१६,१२ या ऋचेसंबंधानेंही अशीच चूक झालेली आहे. त्यांत **क्षपो मदेम शरदश्च पूर्वीः** असे शब्द आले आहेत. 'बहुत शरद् (ऋतु) आणि रात्रीपर्यन्त आम्हांला आनंदित असूं दे' अशा तऱ्हेचें सायणाचार्यांनीं त्यांचें भाषान्तर केलें आहे व तें बरोबरही आहे. पण 'शरद् आणि रात्री' या शब्दांचा मतलब काय? च हें समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय असल्यामुळें हे दोन शब्द फोडून त्यांचा निरनिराळ्या क्रियापदांशीं संबंध जोडणें योग्य होणार नाहीं. ध्रुवाजवळील वसतिगृहाची कल्पना माहीत नव्हती तेव्हां या शब्दांचा अर्थ न लागणें शक्य होतें. पण ती माहीत झाल्यावर 'शरद् व रात्रि' हे शब्द एकत्र घेऊन त्याचा अर्थ 'दीर्घ दिवस' थोडींशीं साधीं अहोरात्रें (ऋतु) आणि दीर्घ रात्र (क्षपः) मिळून होणारा वर्षाचा अवधि असा करणेंच सयुक्तिक आहे.

दृह्यव आणि **दीर्घतमा** यांच्या कथांवरून निघणाऱ्या अनुमानांना बळकटी आणणारा स्वतंत्र पुरावाही वेदांत आलेल्या ऋतुसंख्येच्या उल्लेखांवरून मिळतो. ऋ. १,१६४,१२ या ऋचेंत, पांच पादांचा, बारा आकृतींचा पिता सांगितला आहे. ही ऋचा थोड्याबहुत फरकानें अथर्ववेद आणि प्रश्नोपनिषद् यांतही आली आहे. तिचा भावार्थ असा— ' असें म्हणतात कीं पांच पादांचा व बारा आकृतींचा पिता आकाशाच्या

---

१ दिव द्वेदरतिर्**मानुषा युगा क्षपो भासि** पुरुवार संयतः । ऋ. २,२,२

२ पुढील पानावरील टीप पहा.

दुसऱ्या अर्धांत धूमानें व्याप्त असा आहे. दुसरे हे म्हणतात कीं सर्वत्र पहाणारा असा तो सात चाकांच्या व सहा आरांच्या रथांत बसलेला आकाशाच्या वरच्या भागांत आहे.' यांत संवत्सराचें वर्णन असल्यामुळें पांच पाद म्हणजे पांच ऋतु समजलें पाहिजे. दहा महिन्यांच्या वर्षांत ऋतु पांचच असणार हें उघड आहे. या पूर्वीच्या ऋचेंत 'बारा आरांचें चक्र आकाशांत असून त्यांत अग्नीचीं ७२० मुलें रहातात असें'[1] म्हटलें आहे.' बारा महिन्यांचें वर्ष व त्यांतील ७२० दिवसरात्री यांच्या विषयीं हा अगदीं स्पष्ट उल्लेख आहे. अर्थात् त्यापुढच्या ऋचेंतील वर्णनही संवत्सराचेंच आहे यांत शंका नाहीं. या ऋचेच्या दोन भागांत बारा आकृतींच्या पित्याविषयीं दोन मतें सांगितलीं आहेत. पहिल्यांत त्याला पांच पाद ऊर्फ ऋतु आहेत असें कांहींचें मत देऊन पुढें त्याचा रथ सहा आरांचा आहे म्हणजे तो सहा ऋतूंचा आहे असें कित्येक म्हणतात असें सांगितलें आहे. असा फरक कां व्हावा? ऐतरेय ब्राह्मणांत (१,१) 'पंचर्तवो हेमंतशिशिरयोः समासेन' म्हणजे हेमंत व शिशिर हे एकत्र घेऊन पांचच ऋतु होतात असें सांगितलें आहे. शतपथ ब्राह्मणांत (१३,९,१,१०) वर्षा आणि शरद् हे एकत्र घेतले आहेत. यावरून सहांचे पांच ऋतु करण्यासाठीं कोणते दोन निश्चित घ्यावयाचे या संबंधानें मतैक्य नाहीं. अर्थात् दोन ऋतु एकत्र घेऊन ऋतुसंख्या कमी करण्याची कल्पना मागाहून आलेली दिसते. ऋग्वेदांत पांच ऋतु सांगितले आहेत त्यांचा कसा तरी उलगडा केला पाहिजे एवढ्याचसाठीं दुसऱ्या संयुक्तिक कारणांच्या अभावीं दोन ऋतु एकत्र करण्याची कल्पना निघाली असावी. परंतु तींत कांहीं अर्थ नसल्यामुळें

---

[1] **द्वादशारं** नहि तज्जराय वर्वर्ति **चक्रं** परि द्यामृतस्य । आ पुत्रा अग्ने मिथुनासो अत्र **सप्तशतानि विंशतिश्च** तस्थुः ॥ ११ ॥ **पंचपादं** पितरं **द्वादशाकृतिं** दिव आहुः परे अर्धे पुरीषिणम् । अथेमे अन्य उपरे विचक्षणं **सप्तचक्रे** षळर आहुरर्पितम् ॥ १२ ॥ प्रश्नोपनिषदावरील भाष्यांत शंकराचार्यांनीं 'परे अर्धे' याचा अर्थ 'तृतीयस्यां दिवि' म्हणजे तिसऱ्या लोकांत असा केला आहे. हा तिसरा लोक विष्णूच्या तिसऱ्या अदृश्य पावलाचें स्थान असल्यामुळें संवत्सरदेवता त्या वेळीं अति दूरच्या ठिकाणीं अदृश्य असते असा अर्थ होतो.

'पंचपादं पितरं' या ऋचेवरून ऋतुसंख्येचा उलगडा होतो कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. तिच्या पहिल्या अर्धांत 'पांच पादांचा पिता आकाशाच्या दूरच्या भागांत धूमानें व्याप्त असतो' असें सांगून दुसऱ्यांत 'सहा आरांच्या रथांत बसलेला संवत्सर सर्वत्र पहाणारा (विचक्षण) आहे' असें सांगितलें आहे. पुढच्या म्हणजे १३ व्या ऋचेंत 'पांच आरांचें चक्र प्राचीन असूनही शीर्ण होत नाहीं' असें सांगून, १४ वींत 'जराविरहित चक्र आपल्या नेमीसह (धांव) फिरतें, त्याला जोडलेले दहा ओढतात, सूर्याचें चक्षु रजानें आच्छादिलेलें असें चालतें, त्यावर सर्व विश्वें अवलंबून आहेत.' असें म्हटलें[1] आहे. वर अकराव्या ऋचेंतील **पुरीषिणम्** (पाण्याच्या धूमानें व्याप्त) शब्द आणि १४ वींतील **रजानें अवृत** हे शब्द समानार्थक आहेत हें दोनी ऋचांची तुलना केल्यास दिसून येईल. यावरून एवढेंच अनुमान निघतें कीं 'हा पंचपाद संवत्सर वर्षाच्या कांहीं भागांत धूमानें किंवा काळोखानें व्याप्त होऊन जात असे.' 'त्याला दहा घोडे ओढतात' यावरूनही असें दिसून येईल कीं सहा ऋतूंचे पांच केले ते कांहीं दोन कोणते तरी एकत्र केलेले नसून खरोखर पांच ऋतूंचें किंवा दहा महिन्यांचेंच वर्ष सांगण्याचा वरील वर्णनाचा उद्देश आहे. पांच ऋतूंचे सहा झाले तेव्हां 'धूमानें व्याप्त असलेला' (पुरीषिणम्) संवत्सर, 'सर्वत्र पहाणारा' (विचक्षण) झाला. अशा रीतीनें पांच ऋतूंच्या व सहा ऋतूंच्या वर्षांचें वर्णन यांत जोडीनें केलें आहे. **परे अर्धे, पंचपाद** (किंवा **पंचारे**) आणि **पुरीषिणम्** या शब्दांच्या जोडीला अनुक्रमें **उपरे** (अर्धे) **पळ(ड)रे** आणि **विचक्षणं** हे शब्द घातलेले आहेत. हीं दोन विरुद्ध वर्णनें एकाच काळीं एकाच ठिकाणाला लागू पडणें शक्य नाहीं. १२ व्या ऋचेंत पांच ऋतूंच्या व दहा महिन्यांच्या वर्षांचें वर्णन स्पष्ट असून त्यांत पुढें सूर्याच्या तमोमय आवरणाचा म्हणजे अखंड दीर्घ रात्रीचाही संबंध आहे. हें वर्णन केवळ ध्रुवप्रदेशांतील वर्षालाच लागू पडणारें आहे, हें मागील सर्व विवेचनावरून दिसून येईल. आतां

---

१ पंचारे चक्रे परिवर्तमाने तस्मिन्ना तस्थुर्भुवनानि विश्वा । तस्य नाक्षस्तप्यते भूरिभारः सनादेव न शीर्यते सनाभिः ॥ सनेमि चक्रमजरं वि वावृत उत्तानायां दश युक्ता वहंति । सूर्यस्य चक्षू रजसैत्यावृतं तस्मिन्नर्पिता भुवनानि विश्वा ॥ १३–१४ ॥

यांत सहा ऋतंच्या वर्षाचें वर्णन करतांना 'सप्तचक्र' ह्मणजे सात चक्रांचा ऊर्फ सात महिन्यांचा असा शब्द घातला आहे, व पंचपाद पित्याला ह्मणजे पांच ऋतूंच्या वर्षाला द्वादशाकृति उर्फ बारा महिन्यांचा असें म्हटलें आहे. सकृद्दर्शनीं हा विरोध दिसतो. पण भाषेंतील शब्दांच्या इतिहासाचा थोडासा विचार केल्यास हा विरोध महत्वाचा वाटणार नाहीं. कारण प्रथम एखादी विशिष्ट कल्पना दर्शविणारा शब्द ती कल्पना नष्ट झाल्यावरही भाषेंत तसाच राहून जातो. सायंकाळीं सूर्य समुद्रांत बुडून सकाळीं पुनः वर येतो अशी जेव्हां कल्पना होती तेव्हां 'उदय' शब्द प्रचारांत आला; पण आतां ती कल्पना जरी नाहींशी झालेली आहे तरी अजूनही आपण सूर्य दिसूं लागला असें न ह्मणतां उगवला किंवा वर आला असेंच ह्मणतों. त्याचप्रमाणें **सप्ताश्व** किंवा **सप्तचक्र** हे शब्द भाषेंत एकदां रूढ झाल्यावर पुष्कळ काळानें त्यांतील मूळ कल्पना नाहींशी झाली, तरी केवळ गतानुगतिकत्वामुळें परिस्थिति बदलल्यावरही वैदिक ऋषींनीं त्यांचा उपयोग केलेला आहे. ब्राह्मणग्रंथांत जुन्या वैदिक कल्पनांचीं वर्तमान स्थितीशीं संगति लावण्याचा नाना तऱ्हेनें व युक्तिप्रयुक्तींनें प्रयत्न केलेला आहे, व असें करणें धर्मदृष्ट्या अवश्यही होतें. पण त्या गोष्टींचें ऐतिहासिकदृष्ट्या परीक्षण करतांना जुन्या नव्या गोष्टी पृथक् पृथक् केल्या पाहिजेत. पांच ऋतूंचें व दहा महिन्याचें जुनें वर्ष सांगतांना वर्तमान वर्षाचेंही थोडें वर्णन त्यांत येऊन गेलें आहे. परंपरागत वेदांचें प्रस्तुत स्वरूपांत रूपान्तर करणाऱ्या ऋषींनीं चालू गोष्टीही त्यांत सांगितल्या असल्याच पाहिजेत. वास्तविक पहातां एवढ्या जुन्या गोष्टी त्यांनीं राखून ठेविल्या हेंच आश्चर्य होय. वैदिक ग्रंथाचें धर्मदृष्ट्या आणि ऐतिहासिकदृष्ट्या जें महत्व आहे तें यामुळेंच होय.

असो. तर येणें प्रमाणें पूर्वी एकदां वर्षाचे सात किंवा दहा महिने होते असें दाखविण्याला अदितीच्या किंवा दध्यङ्ग व दीर्घतमा यांच्या कथेसारख्या गोष्टी ऋग्वेदांत स्पष्टपणें आढळत आहे. त्यांचा ध्रुवोपपत्तीशिवाय नीट उलगडा होत नाहीं. प्राचीन आर्य यज्ञियांचें सत्र या दहा महिन्यांतच होत असे. या काळाला **मानुषा युगा** अशी संज्ञा होती. त्यांत दहाव्या युगांत सूर्य क्षितिजाखालीं बुडत असे. तेथें काळोखांत रहाणाऱ्या त्या सूर्याला इन्द्र वर्षाच्या अखेरीस **वलाला** मारून, वर काढीत असे. एक-

दर वर्षं **मानुषा युगा** व अखंड काळोखाची दीर्घ रात्र मिळून होत असे. या सर्व गोष्टी दंतकथात्मक असल्या तरी त्यामुळें त्यांचें प्रामाण्य कमी होत नाहीं. कारण यांपैकीं कांहीं गोष्टी आर्यांचीं फाटाफूट होण्यापूर्वीच्या आहेत हें निरनिराळ्या आर्य शाखांतील पुराणकथांवरून दिसून येंत. याविषयीं विशेष विवेचन पुढें एका प्रकरणांत यावयाचेंच आहे. यांच ऋतूंचें वर्ष होतें, व सूर्याच्या रथाला दहा घोडे जोडलेले असत या कल्पनाही वरील कथांशीं सुसंगत आहेत. आतां पुढच्या प्रकरणांत असें दाखवावयाचें आहे कीं वैदिक वाङ्मयांत दहा महिन्यांच्या सत्राचे स्पष्ट उल्लेख असून त्यांचा वर सांगितलेल्या कथांशीं कांहीं संबंध नसल्यामुळें प्रस्तुत प्रकरणांत सांगितलेल्या कथांवरून जीं अनुमानें निघतात त्यांचीं त्यांवरून स्वतंत्र रीतीनेंही सिद्धि होते.

प्रकरण ८ वें.

गवां अयनम्.

प्रवर्ग्य विधि—त्याचा सोमयागाशीं संबंध—वार्षिक सत्राचें प्रजनन (पुनरुज्जीवन) त्यांत लाक्षणिक रूपानें सांगितलें आहे–घर्म किंवा महावीर नांवाच्या पात्रांत कढविलेलें दूध हें रेतस् (बीज) होय–हें दूध घर्मपात्रांत ओततांना ह्मणावयाचे मंत्र–पांचांना निर्माण करणारे दोन–विवस्वताचे दहा–यावरून पांच ऋतूंनंतर ह्मणजे दहा महिन्यानंतर संवत्सर संपतो असा अर्थ दिसतो–सूर्य आकाशाच्या पलीकडे पडतो अशी दंतकथा–संवत्सर सत्रें–**गवां अयनम्** हें त्या सर्वांची प्रतिमा होय–हें सत्र दहा किंवा बारा महिन्यांनीं संपतें असें ऐतरेय ब्राह्मणांत ह्मटलें आहे.–' गवां अयना ' विषयीं तैत्तिरीय संहितेंतील दोन उतारे–त्यांत या सत्राचा अवधि दहा महिन्यांचा सांगितला आहे, पण असें असण्याला पुरातन वहिवाटीशिवाय दुसरें कांहीं कारण त्यांत दिलेलें नाहीं–यावरून प्राचीन काळचे यज्ञ दहा महिन्यांच्या वर्षांत होत असत असें उघड होतें–प्राचीन रोमन लोकांचेही वर्ष दहा महिन्यांचें ह्मणजे ३०४ दिवसांचे होतें–वर्षाच्या ३६० दिवसांपैकीं बाकीच्या दिवसांची काय वाट हें अद्यापिही कोणास माहीत नाहीं–दशग्वांच्या कथेवरून पहातां हे बाकीचे दिवस ह्मणजे अखंड काळोखाचा अवधि होय–ह्मणजे त्यावरून ध्रुवोपपत्ति सिद्ध होते–वेदांतील गाईंच्या त्रिप्रकार स्वरूपांविषयीं मॅक्स मुल्लरचें मत–ऋग्वेदांत ' गाई ' शब्द या नांवाचे पशु, जलें, उषःप्रकाश किंवा दिवस यांनां लाविलेला आहे–दहा महिन्यांत संपणारें ' गवा अयनम् ' ह्मणजे साध्या दिवस रात्रींचा दहा महिन्यांचा अवधि–हेलिऑसचे ३५० बैल–त्यांवरून दहा दिवसांच्या अखंड रात्रीचा बोध होतो–हर्मिस यानें अपालानच्या गाई चोरणें ह्मणजे काय ?—वृत्रानें चोरलेल्या गाईंचें ऋग्वेदांतील वर्णन–यावरून दिवसरूपी गाई चोरल्यामुळें दीर्घ रात्र उत्पन्न होते असा भावार्थ निघतो–याविषयीं वेदांतील याज्ञिक गोष्टींवरून आणखी प्रमाणें-सोमयागांचें वर्गीकरण–एकाह

आणि अहीन यांतील भेद–शंभर रात्रिसत्रें–गवां अयनांसारखीं दुसरीं वार्षिक सत्रें–त्यांतील विधींचा साधारण आदर्श–त्यांचीं रूपान्तरें–त्या सर्वांची रचना प्रस्तुत व्यावहारिक वर्षमानावर केलेली आहे–परंतु पुरातनकाळीं हीं सत्रें दहाच महिन्यांत संपत असत–रात्रिक्रतूंचा समावेश सध्या दिवससत्रांतच होतो–रात्रिसत्रें शंभर रात्रींहून अधिक काळ कां लांवत नाहींत याचा उलगडा आजपर्यंत झालेला नाहीं–ध्रुवोपपत्तीवर त्यांचा योग्य उलगडा होतो–अतिरात्र–यागांत आजही सोमरस रात्रीसच काढतात–दुसऱ्याही रात्रिसत्रांना हीच गोष्ट लागू केली पाहिजे–रात्रिसत्रें हीं पुरातन काळीं दीर्घ रात्रींत करावयाचीं सत्रें होतीं–त्यांचा उद्देश–सोमाच्या आहुति वलार्शी होणाऱ्या युद्धांत मदत म्हणून एकट्या इंद्रालाच देत असत–शतरात्रावरून दीर्घ रात्रीचा महत्तम अवधि दिसून येतो–या अनुमानाला अदितीच्या कथानकावरून वळकटी येते–इंद्राला शतक्रतु असें पुराणांत कां म्हटलें याचा उलगडा–पाश्चात्य पंडितांना ह्या विशेषणाचा खरा अर्थ समजला नाहीं–सोमयाग आणि अश्वमेध यांतील साम्य–इतर विशेषणांप्रमाणें शतक्रतु या विशेषणाचें रूपान्तर ऋग्वेदांत कोठेंही केलेलें नाहीं–यावरून तें केवळ इन्द्रालाच लावीत असत असें दिसतें—'क्रतु' शब्दाचा अर्थ वेदांत यज्ञ असा आहे याविषयीं डा० हौचें मत–वृत्राची शंभर पुरें ऊर्फ किल्ले-म्हणजे शंभर तमोयुक्त स्थानें ऊर्फ रात्री–अवेस्त्यांतील तिष्ट्रय आणि **अपौशा** यांच्यामधील युद्धाची कथा–इंद्रवृत्र युद्धाचें हें केवळ रूपान्तर होय–शंभर रात्रिक्रतू हे रात्रींसच करावयाचे असत याला त्यावरून स्वतंत्र प्रमाण मिळतें–**सतोकरहे** हें विशेषण अवेस्त्यांत आढळतें–अतिरात्र यागाच्या अर्थाविषयीं व स्वरूपाविषयीं विवेचन-दीर्घ रात्रीच्या आद्यन्तीं करावयाचा याग–संवत्सरसत्राच्या आरंभीं तो योग्यच आहे–तो दीर्घ रात्रीचा अंत व सूर्यप्रकाशाच्या कालाचा आरंभ दाखवितो–सत्र, अतिरात्र, रात्रिक्रतु आणि पुनः अतिरात्र मिळून पुरातन काळचा संवत्सर सत्राचा पर्याय होत असे–त्यावरून तत्कालीन वर्षांतील शतदिनावधि दीर्घ रात्रीचा स्पष्ट बोध होतो–प्राचीन यज्ञपद्धति तत्कालीन वर्षमानावर वसविली होती–नवीन परिस्थितीला अनुरूप असें वर्ष ब्राह्मणांनीं सुरु केलें–यज्ञग्रंथांतील प्रमाणावरून निघणाऱ्या अनुमानांचें महत्व.



हा महिन्यांत सत्र संपविणाऱ्या दशग्वांची गोष्ट एवढाच कांहीं यज्ञिक वाङ्मयांत उरलेला प्राचीन वर्षाचा अवशेष नाहीं. ऐतरेय ब्राह्मणांत वर्णिलेल्या **प्रवर्ग्य** नांवाच्या विधींतही या प्राचीन वर्षाची खूण दिसून येते. हा विधि केल्याशिवाय पशुयज्ञ किंवा सोमयाग करितां येत नाहीं. या सर्व विधींत बीजरूपानें ठेविलेल्या सूर्याचें किंवा यज्ञाचें प्रजनन (पुनरुज्जीवन) लाक्षणिक रूपानें सांगितलें आहे.* **घर्म** किंवा **महावीर** नांवाचें एक मृत्तिकापात्र, वेदीवर **खर** नांवाचें मातीचें एक वर्तुळ करून त्यावर अध्वर्यु ठेवितो व तें चांगलें कढत होईपर्यन्त तापवितो. मग तें वर उचलून त्यांत गाईचें दूध घालून त्याशीं मृतवत्स अशा बकरीचें दूध मिसळतात. पुढें तें मिश्रण आहवनीय अग्नींत ओततात, व उरलेला त्यांतला भाग **होता** (होतृ) पितो. "या पात्रांतील दूध म्हणजे रेतस् (बीज) अग्निरूपी देवयोनींत पुनर्जननासाठीं सिंचन करतात, कारण अग्नि हा देवांची योनि आहे," असें ऐतरेय† ब्राम्हणांत वरील विधीचें कारण दिलें आहे. त्यावरून या अग्नींत यज्ञाचें बीज, त्याचें कांहीं दिवसांनीं पुनर्जनन व्हावें म्हणून, ओतितात असें झालें. हें दूध महावीर पात्रांत ओततेवेळीं म्हणावयाचा मंत्र 'दुहन्ति सप्तैकामुप' (ऋ. ८, ६१, ८) हा आहे.‡ हा मंत्र केवळ शब्दसाम्यावरून घेतला असेल असें दिसत नाहीं. ज्या सूक्तांत हा मंत्र आलेला आहे तें सूक्तच जरा गूढ आहे. पण हा व याच्या मागचे दोन मंत्र सरळ आहेत. त्यांचा भावार्थ असा:—

"आतां त्याचा मोठा व भक्कम रथ, घोडे, व रथाची ओळ दिसूं लागलीं ॥ ६ ॥

"सात एकाचें दोहन करतात; गर्जणाऱ्या समुद्राच्या तीरावर दोन पांचांना निर्माण करतात" ॥ ७ ॥

---

* ऐ. ब्रा. १, १८.

† यत्पयस्तद्रेतस्तदिमग्नौ देवयोन्यां प्रजनने रेतः सिच्यतेऽग्निर्वै देवयोनिः । ऐ. ब्रा. १, २२.

‡ वालखिल्य सूक्तें धरिल्यास हें सूक्त ७२ वें होतें.

" विवस्वताच्या दहानंतर इन्द्र आपल्या तिहेरी खेदीनें (हातोड्यानें) आकाशाचा कोश खालीं पाडता झाला." ॥ ८ ॥

आतां यांत सूर्याचा रथ दिसूं लागला ह्मणजे उषा क्षितिजावर दिसूं लागली हें उघडच आहे. सात ह्मणजे सात होते उषेचें दोहन करून दोन ह्मणजे दिवस रात्र हीं उत्पन्न करतात. हा दोह विधि ऋग्वेदांत पुष्कळ वेळां आलेला आहे. १,३३,१० यांत इन्द्रानें तमाचें दोहन करून गाई (उषा) निर्मिल्या (तमसो गा अधुक्षत्) असें सांगितलें आहे. पुढें या दोहोंच्या दोहनानें पांच ह्मणजे पांच ऋतु उत्पन्न होतात. दिवस रात्रीला सूर्याच्या माता असें ३,५५,६ यांत ह्मटलें, तसें येथें त्यांना ऋतूंच्या माता ह्मटलेलें आहे. पुढें हे ऋतु संपल्यावर काय होतें हें सांगतांना इन्द्रानें विवस्वताच्या दहानंतर म्हणजे दहा महिन्यानंतर आपल्या तिहेरी हातोडयानें आकाशकटाह फोडून कोश खालीं पाडला असें ह्मटलें आहे. याचा अर्थ असा कीं दिव्य जलांचे तीन कोश (७,१०१,४) फोडून समुद्रांत सोडून दिले व त्यांबरोबर सूर्यही खालीं गेला. ७,१०१,२ यांत सूर्याचा प्रकाश (ज्योति) तीनप्रकारचा सांगितला आहे व तै. संहितें-तही* (२,१,२,५) सूर्याच्या वसंत, ग्रीष्म, शरद् रूपी तीन ज्योति आहेत असें ह्मटलें आहे; अर्थात् प्रस्तुत ऋचेंतही हा त्रिप्रकार मार्ग सूर्याच्या त्रिप्रकार प्रकाशाचा द्योतक असून, हा सर्व प्रकार विवस्वताच्या दहानंतर संपतो असें ह्मटलें आहे. हा गुप्त झालेला सूर्य किंवा यज्ञ पुनः त्याचें जनन व्हावें ह्मणून बीजरूपानें ठेविलेला असतो. ,ही स्थिति प्रवर्ग्यांत लाक्षणिक रूपानें सांगितली आहे. यज्ञिय वाङ्मयांत सूर्याच्या आकाशांतून खालीं गळण्याचा उल्लेख पुष्कळ वेळां येतो. ऐ. ब्राह्मणांत (४,१८) 'सूर्य पलीकडे पडेल या भीतीनें देवांनीं त्याला उच्च लोकांच्या सहाय्यानें आधार दिला' असें वर्णन आहे. यांत पलीकडे (पराचः अतिपातात्) हे शब्द महत्वाचे आहेत; कारण त्यांवरून सूर्य पलिकडच्या प्रदेशांत जातो असें दिसून येतें. अश्विनांनीं च्यवन नांवाच्या

---

* त्रीणि वा आदित्यस्य तेजांसि वसंता प्रातर्ग्रीष्मे मध्यंदिने शरद्यपराह्णे । तै. सं. २, १, २, ५.

१ तस्य पराचोऽतिपातादबिभयुस्तं परमैः स्वर्गैर्लोकैः परस्तात्प्रत्यस्तम्नुवन् । ऐ. ब्रा. ४, १८.

एका भक्ताला तरुण केलें अशी ऋग्वेदांत कथा आहे. तिचा स्पष्टार्थही च्युत झालेल्या सूर्याला त्यांनीं पुनः पूर्वस्थानीं आणिलें असा आहे. तात्पर्य यज्ञाचें बीज राखून ठेवण्याचा प्रवर्ग्यांतील विधि हा सूर्याच्या पलिकडच्या प्रदेशांत पडण्याचें लाक्षणिक स्वरूप आहे. कारण त्यांत योजिलेला मंत्र कांहीं निरर्थक नव्हे; त्याचा नीट अर्थ केल्यास त्यावरून पांच ऋतूंच्या व दहा महिन्यांच्या प्राचीन वर्षाची खूण त्यांत दिसून येणार आहे.

या सत्रांच्या अवधीविषयीं याहून स्पष्ट पुरावा पाहिजे असेल तरी तोही सर्वमान्य वैदिक ग्रंथांत आढळून येत आहे. यज्ञ ही संस्था अगदीं प्रथमपासून चालू असल्यामुळें त्यांतील परंपरागत आलेल्या बारीक सारीक गोष्टीही ऋत्विजांना निश्चित कराव्या लागत. त्यांत कांहींचीं कारणें देतांना त्यांची कल्पनाशक्ति वाटेल तशा भराऱ्या मारी. परंतु अशाही कित्येक गोष्टी त्यांत होत्या कीं, त्यांचीं कारणें त्यांना मुळींच न समजल्यामुळें ' अशी पूर्वापर वहिवाट आहे ' असें म्हणून त्यांना काम भागवावें लागलें आहे. संवत्सर सत्राचा अवधि ठरविण्यासाठीं आतां अशा कांहीं प्रमाणांचा विचार करावयाचा आहे.

ब्राह्मणें व श्रौतसूत्रें यांत, अंगिरसांचें अयन (अंगिरसां अयनम्) गाईंचें अयन (गवां अयनम्) आदित्यांचें अयन (आदित्यांनां अयनम्) अशीं अनेक संवत्सरसत्रें सांगितलेलीं आहेत. त्या सर्वांची रचना सूर्याच्या वार्षिक क्रमावर केलेली आहे. वैदिक यज्ञांत हीं सत्रें अति-पुरातन असून त्यांचें विवेचन फार बारकाईनें व काळजीपूर्वक असें याज्ञिक ग्रंथांत केलेलें आहे. तीं एकमेकांपासून तत्वतः भिन्न नसून एकाच सत्राचीं परिस्थित्यनुसार अनेक स्वरूपें झालेलीं आहेत. **गवां अयनम्** हें त्या सर्वांचा आदर्श होय. ऐ० ब्राह्मणांत (४, १७) ' गवामयन सत्र करितात; आदित्य याच गाई होत, म्हणजे ते आदित्यांचेंच अयन करितात ' असें म्हटलें आहे. या ' गवां अयना ' चा अवधि ठरविल्यास तोच सर्वांनां लागू होणारा असल्यामुळें इतर सत्रांच्या अवधीचा निरनिराळा विचार करावयास नको. या ' गवां अयनाचें ' ऐतरेय ब्राह्मणांत एकदां व तै० संहितेंत दोनदां असें एकंदर तीन ठिकाणीं सविस्तर

---

१ गवामयनेन यंति । गावो वा आदित्या आदित्यानामेव तदयनेन यंति ऐ. ब्रा. ४, १७.

वर्णन आलें आहे. ऐ० ब्राह्मणांत या सत्राचें मूळ व अवधि दिलीं आहेत त्यांत ' शफ आणि शिंगें ' मिळविण्यासाठीं गाईंनीं सत्र आरंभिलें, व दहाव्या महिन्यांत त्यांना तीं मिळाल्यावर त्या उठल्या, पण ज्या आणखी बसल्या त्यांच्या अश्रद्धेमुळें त्यांचीं शृंगें व शफ नाहींसे झाले. ' असें सांगितलें आहे, त्यावरून ब्राह्मण ग्रंथांत बारा महिन्यांचें ह्मणून वर्णिलेलें हें सत्र पूर्वी दहाच महिन्यांत संपत असे हें उघड दिसतें. पण असें कां व्हावें ? यज्ञ करणाऱ्यांना बारा महिन्यांत मिळणारें फळ दहाच महिन्यांत कसें मिळालें ? या महत्वाच्या प्रश्नांचा ऐतरेय ब्राह्मणांत मुळींच विचार केलेला नाहीं. पण तैत्तिरीय संहितेंत हे प्रश्न करून व हें सत्र यजमानाच्या इच्छेनुरूप बारा किंवा दहा महिन्यांनीं संपतें असें सांगून, या विकल्पाचें कारण काय हें सांगतां न आल्यामुळें ' पूर्वापर वहिवाटीप्रमाणें ते करितात' (पदेन खलु वा एते यन्ति) असा शेरा त्यांत मारिला आहे. या तीन वर्णनांत बारीक सारीक भेद असले तरी हें सत्र दहा किंवा बारा महिन्यांत संपत असे या गोष्टीविषयीं सर्वांचें एकमत आहे. तांड्य ब्राह्मणांतही ' गवां अयना ' च्या वर्णनांत हा द्विप्रकार अवधि सांगितला आहे. आतां या सत्राच्या अवधींसंबंधाचे स्पष्ट उल्लेख व मागील प्रकरणांतील दहा महिने सत्र चालविणाऱ्या दशग्वांची कथा यांचा एकत्र विचार केल्यास प्राचीनकाळीं वैदिक आर्यांचें संवत्सरसत्र दहाच महिन्यांत आटपत असे, असें अप्रतिकार्य अनुमान निघतें. वैदिक लोक जेव्हां ध्रुवप्रदेशांतून खालीं आले तेव्हां हा अवधि पालटून सर्व सत्रें बारा महिन्यांचीं झालीं. तरी धार्मिक गोष्टीसंबंधाचो पुराणप्रियता फार जबर असल्यामुळें सत्रांचा जुना अवधि विकल्पानें ठेऊन देण्यांत आला. म्हणून पूर्वपरंपरेच्या सबबीवर तै० संहितेंत बारा महिन्यांबरोबरच दहा महिन्यांचा काळही मान्य केलेला आहे. आणि त्यावरून आमच्या मतें पुरातनकालीन सत्रांच्या अवधीच्या प्रश्नाचा निर्णय होतो. त्यांचीं कारणें कांहींही असोत, एवढें खरें कीं, अगदीं प्राचीन संवत्सरसत्र फक्त दहाच महिने चालत असे.

प्राचीन कालमापनपद्धतीचा अवशेष जो हा वार्षिक सत्राचा दहा महिन्यांचा अवधि त्याचें कारण काय असावें हें न समजण्यांत एकटी तैत्तिरीयसंहिताच वांटेकरी आहे असें नाहीं. यूरोपीय सौर वर्षाच्या बाराव्या महिन्याला **दिसेंबर** असें नांव आहे. व्युत्पत्तिदृष्ट्या या शब्दाचा अर्थ

दहावा महिना असा आहे [दिसेम्—(सं०) दशन्—दहा, आणि बेर—(सं०) वार–कालावधि]. यापूर्वीच्या महिन्यांच्या नांवाचेही सातवा, आठवा, नववा असेच अर्थ आहेत (सेप्टेम्—सप्तन् इ०). आरंभीं रोमन लोकांचें वर्ष दहा महिन्यांचें होतें व पुढें कांहीं काळानें **न्यूमा** राजानें त्यांत पहिले दोन महिने मिळविले असें, प्लूटार्क यानें आपल्या ' रोमन लोकांच्या चरित्रांत ' सांगितलें आहे. पण याचें कारण काय असावें याचा आजपर्यंत कोणीही विचार केलेला नाहीं. शास्त्रीयज्ञानाची एवढी वाढ झालेली असतांही आज मितीस जर रोमन लोकांचें वर्ष प्रथम दहा महिन्यांचेंच कां होतें हें सांगतां येत नाहीं, तर तैत्तिरीयसंहितेंत गवामयनाचा अवधि दहा महिन्यांचा कां होता याचें ' पूर्वापर वहिवाटी ' शिवाय (पद) दुसरें कांहीं कारण सांगितलेलें नाहीं, याचें आश्चर्य मानावयास नको. पण आतां ध्रुवोपपत्तीमुळें बऱ्याच अज्ञात गोष्टींवर प्रकाश पडणार आहे. ' गवां अयना ' चा दहा महिन्यांचा अवधि व रोमन लोकांचें दहा महिन्यांचें वर्ष या गोष्टी जर या दोन्ही आर्यशाखा एकत्र असतांच्या काळच्या खुणा असतील तर सबंद वर्षांपैकीं उरलेल्या दोन महिन्यांच्या काळाचा हिशोब आपल्याला सहज देतां येण्यासारखा आहे. हा काळ म्हणजे ज्या दीर्घ रात्रींत इंद्र वलाला मारून त्यानें कोंडिलेल्या गाई सोडवीत असे, अथवा आपल्या गाई चोरणाऱ्या **काकस** नांवाच्या राक्षसाला **हर्क्युलीस** ठार करीत असे, त्या दीर्घ रात्रीचा काळ होय. ध्रुवावरून खालीं आल्यावर आर्यांना आपल्या पंचांगांत अवश्य ते फेरफार करावे लागले. त्याप्रमाणें त्यांनीं जुन्या वर्षांत दोन महिने मिळविले. पण या पूर्वीच्या वहिवाटी साफ नाहींशा होण्यासारख्या नसल्यामुळें त्या पुराणकथा आणि यज्ञपद्धति यांत दिसून येत आहेत. त्यांवरून पहातां आर्य लोक एकत्र असतांना त्यांचें वर्ष दहा महिन्यांचें असून या दहा महिन्यानंतर काळोखाची दीर्घ रात्र येत असे, असें मानावयास कोणतीच हरकत दिसत नाहीं. तुलनात्मक गाथाशास्त्रावरूनही ही गोष्ट सिद्ध होत असून तद्विषयक विवेचन पुढच्या एका प्रकरणांत स्वतंत्रपणें यावयाचें आहे.

हें ' गवां अयनम् ' सत्र गाईंनींच केलें असें ऐतरेय ब्राह्मण व तैत्तिरीय संहिता यांत सांगितलें आहे. पण या गाई म्हणजे कोण ? खरोखरीच्या

गाई होत्या अथवा दुसरें कोणी होतें ? ऐतरेय ब्राह्मणांत, ' आदित्य याच गाई होत ' असें सुचविलें* आहे; व या ऐतरेय ब्राह्मणांतील वचनाला तुलनात्मक गाथाशास्त्रावरून चांगला आधार मिळतो. पुराण-कथांत येणाऱ्या गाई म्हणजे संवत्सरांतील दिवस व रात्री असें केवळ वेदांसंबंधानेंच नव्हे तर ग्रीक पुराणांसंबंधानेंही दिसून येतें. असें असल्या-मुळें शिंगें मिळविण्याच्या इच्छेनें गाईंनीं आरंभिलेल्या सत्राचा अर्थ अधिक चांगल्या रीतीनें आपणांस समजणार आहे. मॅक्स मुल्लरनें आपल्या गाथाशास्त्रावरील ग्रंथांत आर्यपुराणांतील गाईसंबंधानें विवेचन केलें आहे. त्यांत तो ह्मणतो, 'वेदांमध्यें तीन प्रकारच्या गाई आढळ-तात; खऱ्या गाई, जलरूपी गाई आणि प्रातःकालिक प्रकाशरूपी गाई. या एकमेकांपासून ओळखणें कठीण पडतें, इतकें त्याचें वर्णन मिश्र असतें. **निरुद्धा आपः पणिनेव गावः** यांत पाण्याला गाईंची उपमा दिली; पण या उपमेचें रूपक होऊन कित्येक ठिकाणीं तर मूळ पाणी जाऊन गाई या शब्दानेंच त्याचें वर्णन प्रामुख्यानें होऊं लागलें. उषे-लाही पुष्कळ ठिकाणीं गाई ह्मटलें आहे. १,९२,१ "या उषांनीं पूर्वेकडे आपला केतु फडकावला...त्या तेजस्वी, गाई, माता येत आहेत" व १,९३,४, 'हे अग्निषोमहो, पर्णांच्या गाई हिरावून तुम्हीं पुष्कळांना प्रकाश दिला' या वर्णनांतील गाई ह्मणजे उषा किंवा त्यांचा प्रकाश होत हें सहज समजण्यासारखें आहे. १,६२;३ यांत 'बृहस्पतीनें अद्रि फोडून गाई शोधून काढिल्या' असें म्हटलें आहे. २,१९,३ 'इन्द्रानें सूर्य उत्पन्न करून गाई शोधून काढिल्या' २,२४,३ 'बृहस्पतीनें गाईंना हांकून लाविलें, ब्रह्मानें (हत्यारानें) अद्रि फोडिला, तमाला नाहींसें केलें आणि स्वर्लोकावर प्रकाश केला', इत्यादि वर्णनांतील गाईंचें स्वरूप स्पष्ट दिसण्यासारखें आहे. पण याहूनही महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे उषेच्या गाईंचें इतर राष्ट्रांच्या पुराणांत आलेलें वर्णन ही होय. त्या ठिकाणीं गाई म्हणजे दिवस होत हें अगदीं स्पष्ट आहे. **हेलिऑस** (ग्रीक देवता-संस्कृत सूर्य) याच्या ३५० गाई व ३५० मेंढ्या ग्रीक पुराणांत आल्या आहेत;त्या ह्मणजे वर्षाचे ३५० दिवस व ३५० रात्रीच होत. व त्यांवरून आर्य लोक विभक्त होण्यापूर्वी त्यांचें वर्ष ३५० दिवसांचें होतें असें सिद्ध होतें.

---

*' गावो वा आदित्या आदित्यानामेव तदयनेन यंति । ऐ० ब्रा० ४,१७.

असो, तर पणीनें निरुद्ध (अडकविलेल्या) केलेल्या गाई म्हणजे शिंगें असलेल्या खऱ्याखुऱ्या गाई नसून दिवसरात्री होत. **गवामयनम्** हें सत्र करणाऱ्या गाई म्हणजे दिवस असा अर्थ घेतल्यास या चमत्कारिक गोष्टींचें मूळ उत्तर ध्रुवाजवळील दहा महिन्यांचें वर्ष असलेल्या प्रदेशांत आहे, असें दिसून येईल. पणीच्या कचाट्यांतून निसटलेल्या गाई म्हणजे दीर्घ रात्री-नंतर येणारा प्रकाश होय. हा दहा महिने चालल्यावर पुनः दीर्घ रात्र येई, म्हणजे पणी पुनः गाईंना पळवून नेई. रोमन लोकांचें वर्ष प्रथम दहा महिन्यांचें होतें हें मागें सांगितलेंच आहे. अवेस्त्यांतही **ऐर्यन वइजो** मध्यें दहा महिने उन्हाळा असल्याचें वर्णन आहे. म्हणजे दहा महिन्यांचें वर्ष व त्याच्या मागाहून येणारी दोन महिन्यांची दीर्घ रात्र हीं आर्य लोक विभक्त होण्यापूर्वी त्यांस माहीत होतीं असें मान्दावयास आतां कांहीं अडचण नाहीं. त्यांच्यासंबंधाचे उल्लेख वेदांत एक दोनच व तेही काल्पनिक असे नसून विपुल व प्रत्यक्ष आहेत. आजपर्यंत ते गूढ राहिले यांचें कारण त्यांचा अर्थ लावण्याची खरी गुरुकिल्ली समजली नव्हती हें होय.

मागें सांगितलेंच आहे कीं, ध्रुवाजवळील प्रदेशांत वर्षाचे महिने अक्षांश मानानें सातपासून अकरापर्यन्त असतात. म्हणून, जरी दहा महिन्यांच्या वर्षाचेच उल्लेख वेदांत स्पष्टपणें आहेत, तरी तेवढ्यावरून इतर प्रकार त्यांत नाहींतच असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. कारण, अदितीच्या गोष्टींत सात महिन्यांचा उल्लेख आलाच आहे. एवढेंच कीं, दहा महिन्यांचें वर्ष विशेष महत्वाचें होतें. अंगिरसांचे अनेक प्रकार असून त्यांतील दशग्व हे श्रेष्ठ होते असें जें ऋग्वेदांत म्हटलें आहे त्यावरून हीच गोष्ट दिसून येते. पण कसेंही असलें तरी हें वर्णन ध्रुववृत्ताच्या आंतील प्रदेशाचें आहे यांत कांहीं शंका नाहीं. **हेलिऑस**चें वर्ष ३५० दिवसांचें होतें. हें वर्ष साध्या व्यावहारिक वर्षाहून १० दिवसांनीं कमी आहे. हे दहा दिवस म्हणजे काळोखाचेच असावे. जेथें दहा महिन्यांचें वर्ष असेल तेथें ६० दिवसांचो दीर्घरात्र असेल; अशा-प्रकारच्या दीर्घरात्रीचा अवधि जास्तींत जास्ती किती होता हें समजण्या-सारख्या कांहीं गोष्टी सांपडतात कीं नाहीं तें आतां पाहूं.

होमर कवीनें **हेलिऑस**च्या गाईंसंबंधानें जें कांहीं वर्णन केलें आहे त्याचा उलगडा करतां येत नाहीं असें मॅक्स मुल्लरनें म्हटलें आहे. पण

ध्रुवोपपत्तीची मदत घेतल्यास त्याचा उलगडा चांगला होण्यासारखा आहे. **ऑडिसीस**च्या सोबत्यांनीं **हेलिऑस**च्या (सूर्याच्या) गाई खाऊन टाकून त्यांना परत येऊं दिलें नाहीं, किंवा **हर्मिसनें अपॉलन**च्या गाई चोरून त्यांपैकीं दोन ठार केल्या असें जें होमरनें लिहिलें आहे त्यांत अमुक गाई ऊर्फ दिवस खाल्ले ह्मणजे वर्षांतील तितके दिवस दीर्घ काळोखाच्या रात्रींत गडप झाले असें समजलें पाहिजे. यांत दिवसांची संख्या जी कमीजास्त आहे ती अर्थात्च अक्षांशपरत्वें होय. आजपर्यंत प्रकाश व काळोख यांतील रोजच्या झगड्यावर सर्व गोष्टींचा अर्थ लावण्याचा प्रयत्न झाल्यामुळें वरील गोष्टींसारख्या कित्येक गोष्टी अगदीं गूढ राहिल्या. परंतु ध्रुवोपपत्तीचें ग्रहण केल्यास त्या सर्व सुगम व स्पष्ट होत आहेत. वेदांतही वलानें किंवा वृत्रानें इन्द्राच्या गाई पळवून नेल्याचें सांगितलें आहे, पण त्यांची संख्या स्पष्टपणें कोठें आलेली नाहीं. **ऋज्राश्वानें** १०० (१,११६,१६) किंवा १०१ (१,११७,१८) मेषांनां मारून वृकापुढें टाकिलें असें वर्णन ऋग्वेदांत आलें आहे, त्याचा मात्र शंभर दिवसांच्या अवधीच्या रात्रींशीं संबंध असावा. यज्ञिय वाङ्मयांत या दीर्घ रात्रीसंबंधानें एक महत्वाची गोष्ट आली आहे. पण त्या गोष्टीवर पुढील टीका, भाष्यें इत्यादिकांचें एवढें दडपण पडलें आहे कीं, सोमयागांच्या इतिहासाचा सविस्तर विचार केल्याशिवाय ती स्पष्टपणें पुढें मांडतां येणार नाहीं. सोमयाग हे अगदीं पुरातन असून सर्व यागांचे आदर्श होत. ऋग्वेदांतील कर्मकांडांत यांचेंच प्राधान्य असून ११४ सूक्तांचें सबंद ९ वें मंडल सोमसूक्तांनींच झालेलें आहे. या सोमयागांचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास त्यावरून आर्यांच्या अति पुरातन काळच्या यज्ञपद्धतीचें स्वरूप थोडेंबहुत तरी स्पष्ट होण्यासारखें आहे. ह्मणून त्यांचा आतां थोडासा बारकाईनें विचार करूं.

सोमयाग या नांवावरून त्यांत सोमरस काढून त्याचा हवि देणें ही गोष्ट विशेष आहे हें उघड आहे. हे सोमरसांचे हवि रोज सकाळीं, मध्यान्हीं व सायंकाळीं असे तीन वेळां द्यावयाचे असतात. सोमयागांच्या अवधीवरून त्यांचे तीन वर्ग होतात; १ एकाह ह्मणजे एकाच दिवसांत संपणारे, २ अहीन ह्मणजे दोन पासून तेरा दिवसांच्या आंत संपणारे, आणि, ३ सत्रें ह्मणजे तेरा दिवसांपासून तों एक हजार वर्षेंपर्यंतही रहाणारे.

अग्निष्टोम हा पहिल्या वर्गांत* येतो, पण त्याशीं आपल्याला प्रस्तुत कांहीं कर्तव्य नाहीं. **द्वादशाह** हा दुसऱ्या वर्गांतील असून तो **अहीन** किंवा **सत्र** यांपैकीं कोणत्याही रूपानें करतां येतो. याचें विशेष महत्व आहे. **तीन** व्यह दहावा दिवस आणि दोन **अतिरात्र** मिळून हा झालेला‡ असतो. तीन व्यहांमिळून झालेल्या नऊ दिवसांना **नवरात्र** म्हणतात. त्याबरोबर द्विरात्र, त्रिरात्र वगैरे सोमयागही सांगितले आहेत. संवत्सरसत्रें तिसऱ्या वर्गांत येत असून **गवां अयनम्** हें त्यांचें आदर्श रूप आहे. यांपैकीं विशेष महत्वाचीं सत्रें म्हटलीं म्हणजे संवत्सरसत्रें होत. त्यांचें स्वरूप योग्य रीतीनें कळण्यासाठीं **षळह** म्हणजे काय तें पाहिलें पाहिजे. सहा दिवसांचा यज्ञ असा त्याचा अर्थ असून असे पांच षळह म्हणजे एक महिना होतो. **ज्योतिः, गो, आयुस्,** आणि पुनः **आयुस्, गो, ज्योतिस्,** असे सहा एकाह मिळून **षळह** होतो. म्हणजे प्रत्येक षळहाच्या आद्यन्तीं **ज्योतिष्टोम** असतो. **अभिप्लव** आणि **पृष्ठ्य** असे आणखी षळहाचे भेद आहेत. कित्येक षळह आणि दुसरे कांहीं आदिमध्यान्तीं येणारे विशेष विधि मिळून संवत्सरसत्र होतें. या सत्राच्या मध्य दिवसाला विषुवान् म्हणतात; व या विषुवानाच्या योगानें सत्राचे बरोबर दोन सारखे भाग होत असून पहिल्यांत होणारे विधि दुसऱ्यांत उलट क्रमानें होतात. या ' गवां अयना ' ची अनुक्रमणिका अशी.

भाग.	दिवस.
१ आरंभींचा अतिरात्र.	१
२ चतुर्विंश दिन (त्यालाच आरंभणीय किंवा प्रायणीय ह्मणतात).	१

* ऐतरेय ब्राह्मणांत (३, ३९–४४) अग्निष्टोमाचें साम्र वर्णन दिलें असून तो या पहिल्या वर्गांतील सर्व यागांची प्रकृति आहे. अत्यग्निष्टोम, उक्थ्य, षोडशी, वाजपेय, अतिरात्र आणि अप्तोर्याम अशा त्याच्या सहा विकृती असून हे सहा व अग्निष्टोम, असे सात मिळून जोतिष्टोमाचे सात भाग होतात (आश्व. श्रौ. सू. ६, ११, १.)

‡ त्रयश्च वा एते व्यहा आदश्चममहराद्वावतिरात्रौ यद् द्वादशाहः । ऐ. ब्रा. ४, २४.

३	चार अभिप्लव षळह व एक पृष्ठ्य षळह मिळून एक महिना असे पांच महिने.... ... ...१५०	
४	तीन अभिप्लव षळह व एक पृष्ठ्य षळह.	२४
५	अभिजित् दिन.	१
६	तीन स्वरसाम दिन	३
७	विषुवान् (याची एकंदर सत्रंदिनांत गणती करीत नाहींत).	
८	तीन स्वरसाम दिन	३
९	विश्वजित् दिन.	१
१०	एक पृष्ठ्य आणि तीन अभिप्लव षळह.	२४
११	एक पृष्ठ्य आणि चार अभिप्लव असे चार महिनेपर्यंत...१२०	
१२	तीन अभिप्लव षळह, एक गोष्टोम, एक आयुःष्टोम आणि एक दशरात्र मिळून एक महिना.	३०
१३	महाव्रात.	१
१४	शेवटचा अतिरात्र.	१
	एकूण दिवस	३६०

संवत्सरसत्रांतील या भागांपैकीं ज्यांत अगदीं कांहीं फेर करतां यावयाचा नाहीं असे थोडेच आहेत. पहिला व शेवटचा असे दोन अतिरात्र, चतुर्विंश, महाव्रात, अभिजित्, विश्वजित्, विषुवान् आणि त्याच्या अलीकडे व मागाहून येणारे तीन स्वरसाम, आणि द्वादशाहांपैकीं दशरात्र एवढेच काय ते त्यांतील विशिष्ट भाग होत. बाकीचे दिवस अभिप्लव आणि पृष्ठ्य षळहानीं भरून काढलेले असतात. असें असल्यामुळें 'गवां अयनम्' हें सत्र दहा महिन्यांचें करावयाचें असल्यास वर दिलेल्या ३ व ११ या कलमांतील पांच पांच षळह कमी केले म्हणजे झालें. वर दिलेल्या रचनेंत थोडासा फेरफार केला कीं, 'आदित्यानां अयनम्' नांवाचें सत्र * होतें. त्यांत मुख्य विशेष एवढाच कीं, त्यांतील सगळे षळह अभिप्लवच असतात, कांहीं पृष्ठ्य आणि कांहीं अभिप्लव असे नसतात. तसेंच सर्व षळह अभिप्लव करून दुसरे बारीक सारीक फेरफार

* यथा वा प्रायणीयोऽतिरात्रश्चतुर्विंश उक्थ्यः सर्वेऽभिप्लवाः षळहा आक्ष्यंस्यन्यान्यहानि तदादित्यानामयनम् । ऐ. ब्रा. ४,१७.

केले असतां त्याचें 'अंगिरसां अयनम्' हें सत्र होतें. हे फेरफार झाले तरी त्यांवरून ३६० दिवसांच्या संख्येला कांहीं बाध येत नाहीं. परंतु कांहीं याज्ञिक चांद्र वर्षाचा अवलंब करून ३५४ दिवसच घेत व त्यामुळें ते वरच्या कोष्टकापैकीं सहा दिवस गाळीत असत. या त्यांच्या सत्राला 'उत्सर्गिनां अयनम्' ह्मणतात. या सर्व सत्रांत तात्पर्य एवढेंच कीं, चांद्र किंवा सौर पैकीं ज्या प्रकारचें वर्ष घेतलें असेल त्या वर्षाला अनुरूप असा त्या सत्राचा कार्यक्रम करावयाचा. परंतु या गोष्टींशीं प्रस्तुत आपल्याला विशेष कर्तव्य नसल्यामुळें त्यांत याहून खोल जाण्याचें कारण नाहीं. ब्राह्मणांत आणि श्रौत्रसूत्रांत विषुवान्, अभिजित् अथवा स्वरसाम या दिवशीं करावयाचे विधि सविस्तर सांगितले आहेत. ऐतरेय आरण्यकांत महाव्रताचें वर्णन दिलें असून ऐतरेय ब्राह्मणाच्या चवथ्या पंचिकेंत अतिरात्र आणि चतुर्विंश यांचें वर्णन केलें आहे. सत्राचा खरा आरंभ चतुर्विंशापासून असून त्याची अखेर महाव्रतानें होते. ऐतरेय ब्राह्मणाच्या चवथ्या पंचिकेंत असें सांगितलें आहे[२] कीं, 'बृहद्दिव सूक्तानें होता रेताचें सिंचन करतो; अशा रीतीनें तो त्या रेताकडून महाव्रात दिनानें प्रजनन करवितो. कारण, प्रतिसंवत्सरीं सिंचन केलेलें रेत प्रजनन करणारें होतें.' या खुलाशावरून असें दिसतें कीं, प्रवर्ग्य विधीप्रमाणेंच महाव्रताचा उद्देशही यज्ञाचें बीज यथाकालीं प्रजनन होण्यासाठीं राखून ठेवण्याचा आहे. महाव्रत ह्मणजे जुन्या व नव्या वर्षांना एकत्र जोडणारा दुवा असून सत्राची परिसमाप्ति त्यानें होई हें योग्यच आहे. प्रत्येक संवत्सर सत्राच्या आद्यंतीं एक एक अतिरात्र याग असे आणि सत्राच्या शेवटच्या भागांत द्वादशाहाचें विशेष महत्व असे.

याप्रमाणें यज्ञग्रंथांत सांगितलेल्या संवत्सरसत्रांच्या रचनेचें अगदीं स्थूल मानानें स्वरूप आहे. हीं सत्रें साधारणतः ३६० दिवसांच्या वर्षावर बसविलेलीं असून त्यांत विषुवान् दिन महत्त्वाचा असे. कारण, त्याच्या नंतर करावयाचे विधि पूर्वीच्या विधींच्या उलट क्रमानें करावयाचे

---

१ प्रायणीयोऽतिरात्रश्चतुर्विंश उक्थ्यः सर्वे पृष्ट्याः षळहा आक्ष्यंत्यन्यान्यहानि तदंगिरसामयनम्। ऐ. ब्रा. ४,१७.

२ बृहद्दिवेनात्र होता रेतः सिंचति। तददो महाव्रतीयेनान्हा प्रजनयति॥ संवत्सरे संवत्सरे वै रेतः सिक्तं जायते। ऐ. ब्रा. ४,१४.

असत. विषुवानाच्या स्थितीवरून ही यज्ञपद्धति स्थापन झाली त्या काळासंबंधानें कोणतीं महत्वाचीं अनुमानें काढतां येतात हें *'वेदकाल-निर्णयांत' सांगितलें आहे. पण आतां आपल्याला त्याहूनही प्राचीन अशा काळाचा विचार करावयाचा असल्यामुळें सत्र या सामान्य वर्गांत मोडणाऱ्या दुसऱ्या प्रकारच्या सोमयागांचें थोडेंसें वर्णन केलें पाहिजे. द्वादशाहाबरोबरच असणाऱ्या दोन रात्रींपासून बारा रात्रींपर्यन्तच्या अहीन यागांविषयीं मागें सांगितलेंच आहे. पण हीं रात्रिसत्रें बारा रात्रींपर्यन्तच थांबत नाहींत. त्यांची मजल त्रयोदशरात्रापासून शतरात्रापर्यन्त गेलेली आहे. परंतु अहीन याची व्याख्या 'बारा किंवा कमी दिवसांचा याग' अशी असल्यामुळें त्रयोदशरात्रादि यज्ञ सत्र या वर्गांत घालतात. पण हा कृत्रिम भेद टाकून दिल्यास असें दिसून येईल कीं, एकाह, द्वादशाह व सत्रें यांच्या बरोबरच 'रात्रिसत्रें' नांवाची दोनपासून शंभर रात्रींपर्यन्त (पण त्याहूत जास्त नाहीं) होणाऱ्या सत्रांचीही मालिका आहे. तैत्तिरीय संहिता, ब्राह्मणें आणि श्रौतसूत्रें यांत हीं सत्रें स्पष्टपणें सांगितलीं असल्यामुळें त्यांचें स्वरूप, संख्या किंवा अवधि यांविषयीं कोणतीच शंका रहात नाहीं.

आतां यासंबंधानें महत्वाचा प्रश्न असा आहे कीं रात्रिक्रतु, किंवा रात्रिसत्रें हें नांव या सत्रांनांच कां लावलेलें आहे व त्यांचा अवधि शंभर रात्रींहून अधिक कां नसावा? रात्रि ह्मणजे वस्तुतः दिवस असें या सत्रांच्या नांवासंबंधानें मानिलें पाहिजे असें यांतील पहिल्या प्रश्नाचें उत्तर मीमांसकानीं दिलेलें आहे; त्या अर्थाप्रमाणें पहातां द्विरात्र ह्मणजे दोन दिवसांचा याग, व शतरात्र ह्मणजे शंभर दिवसांचा याग, असें होतें. हा अर्थ सर्व यज्ञग्रंथांत मान्य केलेला आहे; इतकेंच नव्हे तर चंद्र हा प्राचीन काळीं कालमापक असल्यामुळें त्या काळीं दिवसापेक्षां रात्रीकडे विशेष लक्ष वेधणें साहाजिक होतें व ह्मणून रात्रि हाच शब्द दिवस या अर्थी व्यवहारांत वापरीत असतील, हें खरें. पण पुढें पुनः असा प्रश्न येतो कीं या रात्रिसत्रांची मुदत शंभर रात्रींहून (ह्मणजे दिवसांहून) अधिक कां नसावी? शंभर दिवसांवरून एकदम ३६० दिवसांच्या संव-

---

* पान ११, १२.

त्सरसत्रावर उडी कशी मारली? एकशें एक पासून ३५९ पर्यंत दिवसांचे यज्ञ कां सांगितलेले नाहींत? या प्रश्नांचें समाधानकारक उत्तर कोणी दिलेलें नाहीं. मात्र ब्राह्मण ग्रंथांतील तर्काचें अवलंबन केल्यास असें ह्मणतां येईल कीं मनुष्याचें आयुष्य शंभर वर्षांहून अधिक नसल्यामुळें शंभर रात्रींहून अधिक अवधीचे सोमयागही नाहींत (तै. ब्रा. ३, ८,१६,). पण हा तर्क कितपत मान्य करतां येईल हें सांगावयास नकोच. तात्पर्य मीमांसकांना सदर प्रश्न सुटला नाहीं एवढें खरें. असो. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, यज्ञिय ग्रंथांत सांगितलेलीं जीं दोनपासून शंभर रात्रीपर्यन्तचीं रात्रिसत्रें तीं 'गवां अयना' सारख्या कोणत्याही संवत्सरसत्राचा भाग नसून त्यांचें स्वतंत्र अस्तित्व कां व त्यांची मुदत शंभर रात्रींहून अधिक कां नाहीं? याचें कारण कोणी दिलेलें नाहीं. रात्रि शब्दाचा अथ दिवस असा घेऊनही त्यांचा संवत्सरसत्रांत अन्तर्भाव करतां येत नाहीं. पण ध्रुवोपपत्तीच्या साहाय्यानें या प्रश्नांचा बराच समाधानकारक उलगडा करतां येतो. तो कसा हें आतां पाहूं.

पहिला विचार करण्यासारखा प्रश्न असा आहे कीं अतिरात्र या शब्दांत रात्रि याचा जर सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा काळ असा अर्थ आहे व अतिरात्र यज्ञही जर अद्यापिही रात्रीसच करावयाचा असतो, तर द्विरात्र त्रिरात्रपासून शतरात्रपर्यंतच्या यज्ञांतही रात्र ह्मणजे काळोखाचा काळ असें समजून ते यज्ञ खरोखरीच्या रात्रीस करावयाचे असत असें मानावयास काय हरकत आहे? सोमरस रात्री काढीत नाहींत; तेव्हां ही रात्रिसत्रें खरोखर रात्रींचीं नसून दिवसांचींच होतीं, असा एक आक्षेप आमच्या ह्मणण्यावर येईल; पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. ऐतरेय ब्राह्मणांत (४, ५) अतिरात्राचें मूळ देतांना असें सांगितलें आहे कीं "देवांनीं दिवसाचा आश्रय केला, व असुरांनीं रात्रींचा केला. तेव्हां असुरांना तेथून काढून लावण्याच्या कामीं इंद्राला दुसरा कोणी सहाय मिळना. छंद मात्र त्याच्या मागोमाग गेले. तेव्हां त्यानीं असुरांनां, रात्रीच्या पूर्व भागांतून पहिल्या पर्यायानें, मधल्या भागांतून मधल्या पर्यायानें व शेवटच्या भागांतून शेवटच्या पर्यायानें असें हाकून लाविलें." हे तिन्ही सोमाचे पर्याय रात्रीचे आहेत. शिवाय हे इंद्र व छंद यांशिवाय इतर कोणालाही ते द्यावयाचेच नाहींत असें त्या ब्राह्मणांत स्पष्ट

दर्शविलें आहे. पुढें पुढच्या प्रकरणांत* ' पवमान स्तोत्रांचा संबंध दिवसाशीं असल्यामुळें तीं रात्रीस कशीं सांगितली ? " असा प्रश्न विचारून तीं रात्र व दिवस या दोहोंचींही आहेत असें त्याचें उत्तर दिलें आहे. यावरून हा सोमरस अतिरात्रामध्यें रात्रीसच्च काढीत असत व तो फक्त इन्द्रालाच देत असें दिसतें. अतिरात्र प्रयोग अगदीं प्राचीन आहे. पारशी ग्रंथांतही याच्यासारखा एक प्रयोग सांगितला आहे. त्यांत रात्रीचे तीन भाग सांगून पहिल्या भागांत अहुरमझ्दाचा पुत्र अग्नि हा यजमानाला उठून कस्ति घालून चांगलें इन्धन आणावयास सांगतो व ह्मणतो " दइवांनीं (वैदिक असुर) केलेला अही आतां येऊन माझ्याशीं लढून मला मारणार आहे; तर मला चांगला पेटूं दे. " दुसऱ्या व तिसऱ्या भागाविषयींही असेंच सांगितलें आहे. अतिरात्रांतील तीन पर्याय आणि हे रात्रीचे तीन भाग यांतील साम्याचा विचार केल्यास असें दिसून येईल कीं, अतिरात्र याग फार प्राचीन असून तो वृत्राशीं लढणाऱ्या इन्द्राला मदत करण्यासाठीं ह्मणून रात्रीसच्च करीत असत.

आतां जी गोष्ट एक रात्रीच्या यागाला लागू आहे ती उघडच अनेक रात्रींच्या यागालाही लागू असली पाहिजे. प्राचीन यज्ञिय आपलीं संवत्सरसत्रें दहा महिन्यांत संपवीत असत, हें पूर्वी सांगितलेंच आहे. या दहा महिन्यांनंतर काळोखाची दीर्घ रात्र येत असे. या एवढ्या मोठ्या रात्रींत यज्ञियांनीं करावयाचें तरी काय ? एकसारखें निजून रहाणें शक्य नाहीं. यूरोपच्या उत्तर भागांत ज्या ठिकाणीं दीर्घ रात्र असते त्या ठिकाणीं अद्यापिही सर्व काळपर्यंत लोक निजून रहात नाहींत. तारांच्या स्थितीवरून कालज्ञानही त्यांना होतें. हीच गोष्ट प्राचीन ऋत्विजांनांही लागू आहे. पण जर ते निजत नव्हते तर काय करीत होते असा प्रश्न सहाजिकच येतो ? हात जोडून रिकामे बसत असत असेंही ह्मणतां येत नाहीं. कारण त्यावेळीं इन्द्रवृत्राचें युद्ध चालल्यामुळें इन्द्राला साहाय्य करणें अवश्य होतें. असें असल्यामुळें जर ध्रुवोपपत्ती खरी असेल ह्मणजे वैदिक ऋषींचे पूर्वज जर कधीं खरोखरच ध्रुवाजवळ रहात होते असें असेल, तर तेथें असणाऱ्या दीर्घ काळोखाच्या रात्रीं इंद्र वृत्राशीं झगडत

---

*पवमानवदहरित्याहुर्न रात्रिः पवमानवती कथमुभे पवमानवती भवतः... तेन रात्रिः पवमानवती तेनोभे पवमानवती भवतः । ऐ. ब्रा. ४,६.

असतां त्याला साहाय्य करण्यासाठीं ते रात्रीस कांहीं तरी करीत असलेच पाहिजेत. ह्मणजे रात्रीं करण्याचे सोमयाग वैदिक यज्ञग्रंथांत आढळलेच पाहिजेत. तेच हे रात्रिक्रतु होत. अतिरात्र त्यांत धरल्यास एका रात्रीपासून तों शंभर रात्रींपर्यन्त त्यांची मुदत होते. ध्रुवाजवळील वसतिस्थानासंबंधानें ब्राह्मणकारांनां किंवा मीमांसकांना कांहीं माहिती नसल्यामुळें या रात्रिसत्रांना दिवससत्रांचें स्वरूप त्यांनीं दिलें. परंतु हा अर्थविपर्यास रात्रिसत्रांचें खरें स्वरूप स्मरणांतून गेल्यावर झाला असला पाहिजे. मीमांसकांचा अर्थ मान्य केल्यास या रात्रिसत्रांची मर्यादा शंभर रात्रींपर्यंतच जाऊन कां थांबावी हें सांगतां येत नाहीं, हें वर सांगितलेंच आहे; पण ध्रुवोपपत्तीवरून या गोष्टीचें कारण सांगतां येईल. ध्रुववृत्तस्थ प्रदेशांत रात्रीची मुदत अक्षांशमानानें एक पासून शंभर दिवसपर्यंत असते; व त्या मानानें रात्रिसत्रांचीही मुदत एकपासून शंभर रात्रीपर्यंतच असे. ज्या ठिकाणीं दहा दिवसांची रात्र असे त्या ठिकाणीं दशरात्र करीत व ज्या ठिकाणीं शंभर दिवसांची रात्र असे त्या ठिकाणीं शतरात्र करीत. शंभर दिवसांपेक्षां रात्रीची मुदत अधिक नसल्यामुळें रात्रिसत्रांचीही मुदत शंभरांच्या पलीकडे गेलेली नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें ज्या ठिकाणीं सात महिन्यांचा प्रकाशाचा काळ असतो त्या ठिकाणीं पांच महिन्यांची दीर्घ रात्र असते. या मुदतींतून दोन्ही काळच्या संध्याप्रकाशाचा एक एक महिना काढून टाकिला ह्मणजे जवळ जवळ शंभर रात्रींचीच मुदत येते. उषःकाळांत स्वतंत्र यज्ञ सांगितलेले असल्यामुळें त्या काळाचा रात्रींत अंतर्भाव करतां येत नाहीं. असो. तर येणेंप्रमाणें शतरात्र हा याग दीर्घ रात्रीच्या महत्तम मानाचा दर्शक आहे. या रात्रिक्रतूंचा उलगडा दुसऱ्या कोणत्याही उपपत्तीवरून होत नसल्यामुळें व विशेषतः त्यांच्या शंभर रात्रींच्या मुदतीचा खुलासा करतां येत नसल्यामुळें, ते, सात महिन्यांचा प्रकाशाचा काळ, एक एक महिन्याचा संधिप्रकाशकाल व तीन महिन्यांचा दीर्घरात्रिकाल असे स्थूल मानानें भाग असलेल्या प्राचीन संवत्सराचे द्योतक आहेत असें मानावयास कांहीं हरकत नाहीं.

दुसऱ्याही कित्येक गोष्टींवरून हेंच अनुमान निघत आहे. एकट्या इंद्रालाच शतक्रतु हें नांव असल्यामुळें दुसऱ्या कोणी तें बळकावण्याचा प्रयत्न केल्यास त्याची व इन्द्राची चकमक होत असे,

अशा अनेक कथा वेदोत्तरकालीन ग्रंथांत दिल्या आहेत. सायणाचार्यांनीं कित्येक ठिकाणीं वैदिक **शतक्रतु** शब्दाचा अर्थ शंभर **यज्ञांचा** स्वामी असा न घेतां शंभर **शक्तींचा** स्वामी असा केला आहे, व त्याला अनुसरून युरोपीयन पंडितांनीं पौराणिक कथांना पार धुडकावून देऊन वेदांत " क्रतु " याचा ' शक्ति ' किंवा ' युक्ति ' याशिवाय कोणताही अर्थ करावयाचाच नाहीं असा निश्चय केलेला दिसतो. रात्रिक्रतूंसंबंधानें वर केलेलें विवेचन जर बरोबर असेल, तर पौराणिक कथा व्यर्थ आहेत असें न समजतां शतक्रतु हा शब्द वेदांत इन्द्राला ज्या अर्थानें लाविलेला आहे, त्याच अर्थावर पौराणिक कथाही रचलेली आहे असें मानावें लागतें. पुष्कळ पुराणांतील कथांना वैदिक कथांचा फारसा आधार नसतो हें जरी कबूल केलें तरी प्रस्तुत गोष्टींत तसें न मानण्याला खात्रीलायक पुरावा आपल्याजवळ आहे. शंभर रात्रिक्रतूंची ही संस्था इतर सत्रांपासून अलग असून ती तशी कां हें जोंपर्यंत सांगतां येत नाहीं तोंपर्यंत वैदिक शतक्रतु शब्दाचा पौराणिक कथेशीं संबंध जोडलाच पाहिजे. पुराणांत शंभर यज्ञ हें इंद्रत्वाचें लक्षण असून हे यज्ञ अश्वमेध आहेत, पण शतरात्र कांहीं अश्वमेध नव्हे अशी यावर शंका येईल. परंतु वैदिक कथांपासून पौराणिक कथांपर्यंत होणाऱ्या स्थित्यंतरांत हा भेद महत्वाचा नाहीं. शिवाय अश्वमेध हाही सोमयागच असून शतरात्राबरोबर त्याचेंही वर्णन केलें आहे. अश्वमेध यज्ञांत द्यावयाचे शंभर हविर्भाग तैत्तिरीय संहितेंत सांगितले असून (७,२,११) ते प्रजापतीला **रात्रीं** प्राप्त झाले म्हणून त्यांना **रात्रिहोम** म्हणतात असें तैत्तिरीय ब्राह्मणांत म्हटलें आहे (३,८,१५,१). ऋग्वेदांत (१,१६३,१) यज्ञिय अश्व म्हणजे समुद्रांतून जाणारा सूर्य असें म्हटलें आहे. म्हणून अश्वमेधांतील अश्वाचें परत येणें म्हणजे दीर्घरात्रींच्या काळोखांतून सूर्याचें पुनः परत येणें असें समजावयास हरकत नाहीं. तात्पर्य एवढेंच कीं, शतरात्र हा सोमयाग पुराणांत शंभर अश्वमेधांच्या रूपानें दिसल्यास यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं. ध्रुवोपपत्तीनें या दोन्ही गोष्टींचा चांगला उलगडा होत असल्यामुळें त्या खोट्या ठरवून पुराणांतील इन्द्राची गोष्ट वेदांतील ' शतक्रतु ' याच्या चुकीच्या अर्थावरच रचिली आहे असें मानण्याचें कारण नाहीं.

पाश्चात्य पंडित शतक्रतूचा 'शंभर शक्तींचा स्वामी' या शिवाय दुसरा कोणताही अर्थ करावयास तयार नाहींत हें वर सांगितलेंच आहे. परंतु इंद्राच्या शंभर शक्ति कोणत्या हें सांगतां येणें कठीण असल्यामुळें 'शत' याचा अर्थ **शंभर** असा नक्की न घेतां **पुष्कळ** असा मोघम घेतला पाहिजे. असा अर्थ घेतां येतो. ऋग्वेदांत **शतनीथ** किंवा **शतमूति** प्रमाणेंच **सहस्रनीथ** किंवा **सहस्रमूति** अशींही विशेषणें इंद्राला लाविलेलीं आहेत. अर्थात् **शत** याचा **शंभर** असाच निश्चित अर्थ तेथें नाहीं हें उघड आहे. **शतयामन्, सहस्रयामन्** इत्यादि शब्दांवरून **शत** किंवा **सहस्र** हे शब्द वेदांत अनेकत्वार्थी योजिलेले असतात असें दिसून येतें. पण **शतक्रतूंत** 'शत' शब्दाची अशी गोष्ट दिसत नाहीं. वरील प्रत्येक शब्दांत 'शत' शब्दाच्या जोडीस 'सहस्र' कोठेंना कोठें तरी आलेला आहे. पण 'शतक्रतु' ऋग्वेदांत सुमारें साठ वेळां आला असूनही 'सहस्रक्रतु' असा शब्द एकदांही आलेला नाहीं. यावरून 'शतक्रतु' शब्दांत 'शत' चा अर्थ **शंभर** असाच घेण्याचा वैदिक ऋषींचा आशय स्पष्ट दिसतो. शिवाय 'क्रतु' शब्दाचा 'यज्ञ' असा अर्थच जर ऋग्वेदांत नसता तर पाश्चात्य पंडितांप्रमाणें शतक्रतूंचा अर्थ समजणें भाग होतें. पण क्रतु शब्दाचा अर्थ यज्ञ असा ऋग्वेदांत आहे हें ७,३२,२६ या *ऋचेवरून उघड दिसतें. ही ऋचा अतिरात्र यागासंबंधानें आहे असें ऐतरेय ब्राह्मणांत (४,१०) सांगितलें आहे. असें असल्यामुळें पुराणांना अनुसरून शतक्रतूचा अर्थ शंभर यज्ञांचा स्वामी असा घ्यावयास कांहीं हरकत नाहीं. दुसरीही एक गोष्ट या अर्थाला अनुकूल आहे. इन्द्रानें शत्रूंची ९०, ९९ किंवा १०० पुरें भग्न केलीं असें ऋग्वेदांत सांगितलें आहे. **देवपुराः** ह्मणजे देवांची पुरें

---

* इंद्र क्रतुं न आ भर पिता पुत्रेभ्यो यथा । शिक्षा णो अस्मिन् पुरुहूत यामनि जीवा ज्योतिरशीमहि ॥ ऋ. ७,३२,२६. भावार्थ—हे इन्द्र, ज्याप्रमाणें पिता पुत्राला, त्याप्रमाणें तूं आह्मांला यज्ञाच्या तडीस ने. हे पुरुहूत (अनेकांनीं आवाहन केलेला) आह्मीं या रात्रीच्या प्रहरांतून जगून प्रकाशाला पोहोंचूं असें कर. ही ऋचा अतिरात्रासंबंधीं असावी असें डॉ. हौ यांचें मत आहे.

याचा अर्थ **दिवस** असा तैत्तिरीय संहितेंतं (७,२, १३,४) दशरात्राच्या वर्णनांत दिला आहे. आतां देवांचीं पुरें म्हणजे जर **दिवस** तर शंबरांचीं म्हणजे इन्द्राच्या शत्रूंचीं पुरें म्हणजे **रात्री** हें उघड आहे. 'असुरांनीं रात्रीचा आश्रय केला' या ऐतरेय ब्राह्मणांतील मागें सांगितलेल्या वाक्यावरूनही हा अर्थ उघड दिसतो. शंबराचीं १०० पुरें भग्न करणें, शंभर रात्रिक्रतूंचा स्वामी असणें, १,३२,१४ यांत म्हटल्याप्रमाणें अहीशीं युद्ध करीत असतां ९९ नद्या (स्रवन्ती) उलटून जाणें या सर्व गोष्टी एकाच गोष्टीचीं रूपान्तरें होत. या सर्वांवरून आर्यांच्या आद्यस्थानांतील १०० दिवसांच्या मुदतीची अखंड रात्र सिद्ध होत आहे. "जेव्हां इन्द्र आपल्या वज्रानें वृत्रावर प्रहार करितो, तेव्हां त्याच्या गृहांत फिरणारे, **शंभर** दिवसांचें संवर्तन व विवर्तन करतात' असें ऋ. ५,४८,३ यांत† सांगितलें आहे. दीर्घ रात्रीच्या मागें व पुढें साधे दिवस असल्यामुळें हे शंभर म्हणजे शंभर दिवसांच्या मुदतीच्या दीर्घ रात्रींत इन्द्रासाठीं केलेले शंभर यज्ञच होत. सूर्यप्रकाशाच्या काळाच्या मागें व पुढें ही दीर्घरात्र असल्यामुळें हे शंभर यज्ञ दिवसांचा क्रम मोडून पुनः तो चालू करतात असें म्हणणें सहाजिक आहे. अर्थात् या ऋचेंत ध्रुवावरील शतदिनावधि दीर्घ रात्रीचाच संबंध दिसून येतो.

या मताचें दृढीकरण पारशी लोकांच्या अवेस्त्यांतील कांहीं स्थलांवरून चांगलें होतें. त्या स्थलांत **अपओशा** नामक दैत्य आणि **तिष्ट्र्य** यांच्या मधील युद्धाचें वर्णन आहे. ऋग्वेदांतील इंद्रवृत्रांचें युद्ध (वृत्रतूर्य), अप्तूर्य (जलासाठीं युद्ध), गविष्टि (गाईंसाठीं युद्ध) आणि दिविष्टि (दिवसासाठीं युद्ध) या तीन रूपानीं झालेलें आहे. या युद्धांत इंद्र वृत्राला मारून, पाणी, गाई व सूर्य यांना वाट करून देतो.* वेदांतील

---

१ भट्ट भास्कर नांवाचा टीकाकार आपल्या टीकेंत या संबंधानें म्हणतो, 'देवपुराः' देवानां पुरस्थानीयानि पुरविवक्षया इतराण्यहानि 'पर्यूहन्ते' सर्वतो नयंति आत्मनो रक्षार्थम् ।...। 'ते देवाः' देवपुराख्यानि दशरात्रसंबंधीन्यहानि ।

† आ ग्रावभिरहन्येभिरक्तुभिर्वरिष्ठं वज्रमा जिघर्ति मायिनि । शतं वा यस्य प्रचरन्त्स्वे दमे संवर्तयन्तो वि च वर्तयन्नहा ॥ ऋ. ५, ४८, ३.

* ऋ. १, ५१, ४; २, १९, ३.

वृत्रहन् इन्द्र हा अवेस्त्यांत **वेरेथ्रघ्न** या रूपानें आलेला आहे. पण जलासाठीं झालेलें युद्ध अवेस्त्यांत **वेरेथ्रघ्नानें** केलेलें नसून पर्जन्यदेवता जो तिष्ट्रय त्यानें केलेलें आहे. या दोन्ही प्रकारच्या गोष्टींतील जलार्थ झालेल्या युद्धाचा अर्थ पर्जन्यदेवता ढग फोडून पाऊस पाडते इतकाच आजपर्यन्त करीत आलेले आहेत. परंतु या अर्थानें सूर्याला वाट कशी मिळते हें सांगतां येत नाहीं. खरोखर या युद्धाचा खऱ्या पावसाशीं कांहीं संबंध नाहीं हें पुढील स्वतंत्र प्रकरणांत दाखवावयाचें आहे. जलार्थ युद्ध व प्रकाशार्थ युद्ध हीं वस्तुतः एकाच गोष्टीचीं रूपान्तरें आहेत. प्रकाश व तम यांच्या देवतांमधील युद्ध हें या कथांचें मूळ आहे. ऋग्वेदांत इंद्राच्या शत्रूला **शुष्ण**‡ (शोषणारा, पोळणारा) असें एक नांव दिलेलें आहे. अवेस्तिक **अपओश** व वैदिक शुष्ण हे एकच आहेत. अहुर-मझ्दानें दिलेल्या **हओमाच्या** आहुतीच्या साहाय्यानें तिष्ट्र्यानें **अप-ओशाचा** पाडाव केला असें सांगितलें आहे. हें युद्ध **वौरुकश** समुद्रांत होऊन अपौशाला मारल्यावर तिष्ट्रय त्यांतूनच विजयी होत्साता बाहेर येतो. या सर्व वर्णनांत विशेष महत्वाचा भाग म्हटला म्हणजे या युद्धांत तिष्ट्र्याला जय मिळून त्यानें नियमित वेळीं भक्तापुढें हजर व्हावें म्हणून काय केलें पाहिजे हें सांगतांना अहुरमझ्द आणि तिष्ट्रय यांमध्यें झालेला संवाद हा होय. अहुरमझ्दाला तिष्ट्रय म्हणतो "माझ्या नांवानें माझें आवाहन करून जर माणसें आहुति देऊन माझी पूजा करितील, तर मीं नेमलेल्या वेळीं भक्ताला भेटेन. तो नेमलेला वेळ एक रात्र असो, दोन असोत, पन्नास असोत वा शंभर असोत." आतां यांत नेमलेला वेळ म्हणजे कोणता ? अपौशाला मारल्यानंतर तिष्ट्रय भक्ताकडे यावयाचा आहे. म्हणजे नेमलेला वेळ हा युद्धाचा काळ असला पाहिजे. हा काळ एक पासून शंभर रात्रींचा होता व त्यांत तिष्ट्र्याला हओमाच्या आहुति देऊन व त्याच्या नांवानें त्याचें आवाहन करून पुष्ट करावें लागत असे. शंभर रात्रींचे सोमयाग हें इंद्रवृत्रांच्या युद्धांत इंद्राला मदत म्हणून करावयाचे असत व ते इंद्राशिवाय दुसऱ्या कोणासाठींही नसत हें वर सांगितलेंच आहे. यावरून पारशी धर्मग्रंथांतील तिष्ट्रय व अपौश यांतील युद्ध म्हणजे

---

‡ ऋ. १, ५१, ११.

ऋग्वेदांतील इंद्रवृत्रांच्या युद्धाची प्रतिकृतिच आहे असें दिसून येईल. या दोहोंमधील साम्य इतकें स्पष्ट असल्यावर शतरात्रयागाच्या उत्पत्तीविषयीं वर केलेलें अनुमान खरें आहे असें मानावयास कांहीं हरकत नाहीं. हें साम्य काकतालीय आहे असें ह्मणतां येत नाहीं. या युद्धांतील नायकाला मग तो इन्द्र असो कीं तिष्ट्रय असो–यज्ञाच्या योगानें मिळणाऱ्या मदतीची अपेक्षा असे हें या गोष्टीवरून उघड दिसत आहे, आणि खरोखर अशा प्रकारचे यज्ञ त्यांच्यासाठीं करीतही असत. शतक्रतु हा शब्द अवेस्ता ग्रंथांत नाहीं. तरी पण एकेठिकाणीं **मैशहे सतोकरहे** (शंभर शक्तींचा मेष) त्यांत आलेला आहे. अशा प्रकारचा मेष वेरेथ्रघ्नाचा (वैदिक वृत्रहन्) अवतार आहे असेंही एके ठिकाणीं सांगितलें आहे. *ऋग्वेदांतही (८,२,४०) मेषाचें रूप घेतलेल्या इन्द्राचें वर्णन आहे. या सर्व गोष्टींचा विचार केल्यास सतोकरहे मैशहे ह्मणजे वेरेथ्रघ्नच असून **शतक्रतू** प्रमाणें **सतोकरहे** याचा अर्थही ' शंभर शक्तियुक्त ' असा नसून 'शंभर यज्ञांचा स्वामी' असाच असला पाहिजे असें दिसून येईल. या विषयासंबंधानें वैदिक व अवेस्तिक ग्रंथांत इतकें निकट साम्य असल्यामुळें वैदिक ग्रंथांत आलेलीं रात्रिसत्रें आर्यांच्या मूलस्थानांतील कमी जास्त प्रमाणाच्या दीर्घरात्रीमुळेंच उत्पन्न झालीं असें अनुमान करावयास बळकट कारण मिळतें. अपौशाला मारल्यावर तिष्ट्रय मनुष्याच्या वर्षाचे पर्याय सुरू करतो असें जें ह्मटलें आहे त्याचा आतां उलगडा करतां येणार आहे. वैदिक उषा मानुषा युगांनां सुरू करतात असें जें ह्मटलें आहे त्याचें वरील गोष्ट अवेस्तिक रूपान्तर आहे. दोघांचें तात्पर्य एवढेंच कीं, इंद्रवृत्रांचें किंवा तिष्ट्रयअपौशांचें युद्ध संपल्यावर दीर्घ उषा सुरू होऊन नवीन वर्षाला आरंभ होत असे.

या सर्व विवेचनावरून अतिरात्र यज्ञाचें मूलस्वरूप आतां चांगलें ध्यानांत येईल. तो रात्रियाग असून, अद्यापिही तो रात्रीसच करतात. मीमांसकांना त्याला दिनसत्र बनवितां आलें नाहीं. पण आतां असा प्रश्न आहे

---

* इत्था धीवन्तमद्दिवः काण्वं मेध्यातिथिम् । **मेषोभूतो** भियंनयः ॥ ऋ. ८,२,४०.

१ पुष्कळ गोष्टींवरून तिष्ट्रय ही तारा वर्षाचा आरंभ करणारी आहे हें उघड होतें.

कीं याला अतिरात्र हें नांव कां मिळालें? अति यां उपसर्गाचा अर्थ 'पलीकडचा, दुसऱ्या टोंकाचा' असा असून 'व्यापकत्वा' चा त्यांत संबंध नाहीं. 'रात्रिं अतीत्य वर्तते इति अतिरात्रः' असें त्याचें व्याख्यान सायणाचार्यांनाहि केलें आहे (सा. भा. ऋ. ७,१०३,७). यावरून अतिरात्र याग रात्रीच्या शेवटीं करावयाचा असून रात्रभर करावयाचा नव्हे असें स्पष्ट झालें. असुरांनां रात्रींतून घालवून देण्यासाठीं हा याग करावयाचा असें ऐतरेय ब्राह्मणांत (४–५) अतिरात्राचें मूळ सांगतांना म्हटलें आहे. तांड्य ब्राह्मणांत (४,१,४–५) 'अतिरात्रापासून प्रजापतीनें अहोरात्रें निर्माण केलीं' असें म्हटलें आहे. यावरूनही अतिरात्र याग रात्रीच्या शेवटीं करावयाचा असून तो झाल्यावर अहोरात्रांची परंपरा सुरू होत असे असें दिसून येतें. परंतु असें होण्यास ही रात्र फार मोठी असली पाहिजे. आपल्या इकडे अहोरात्रांचे पर्याय वर्षभर सारखे सुरू असतात. त्यामुळें अमुक एका रात्रीनंतर अरोरात्रें सुरू होतात असें आपल्या प्रदेशासंबंधानें मानणें निरर्थक आहे शिवाय साध्या रात्रींतूनच जर असुरांना घालवून द्यावयाचें असेल तर हे अतिरात्र दररोज पहाट होण्यापूर्वीं केले पाहिजेत. पण ते सत्राच्या आरंभीं व शेवटीं असे फक्त दोनदांच करावयाचे असतात. असें असूनही खऱ्या सत्राला चतुर्विंशापासून आरंभ होऊन तें महाव्रत दिनीं संपतें; अतिरात्र झाल्यावर नाहीं. यावरून अतिरात्राचा उद्देश केवळ वर्षाच्या ३६० रात्रींपैकीं पहिल्या रात्रींतून असुरांनां हांकून देण्याचा नव्हता असें दिसतें. कारण तसें असतें तर इतर रात्रींही हा याग करावा लागला असता. पण तसें नसल्यामुळें अतिरात्राचा संबंध खुद्द सत्रांत न येणाऱ्या अशा एखाद्या विशेष रात्रीशीं असला पाहिजे असें मानणें भाग येतें. सत्राच्या आरंभीं व शेवटीं करावयाचे असल्यामुळें त्यांना **अतिसत्र** असें एका अर्थानें म्हणतां येईल. पण त्यावरून 'अतिरात्र' या नांवाचा उलगडा होत नाहीं; कारण सत्र कांहीं रात्रीं व्हावयाचें नसतें. म्हणून हे दोन अतिरात्र मूळ सत्राच्या आदि अन्तींच केवळ करावयाचे नसून दीर्घ रात्रीच्या आद्यंतीं करावयाचे होते असें मानलें पाहिजे. पहिल्या अतिरात्राबरोबर दीर्घ रात्र संपून सत्राला आरंभ होई, व प्रकाशाचा काल संपून दीर्घरात्र पुनः आली कीं, सत्र संपून पुनः असुरांनां घालवून

देण्यासाठीं अतिरात्र करावा लागे; मध्यंतरीं तो करण्याची गरजच नव्हती. तैत्तिरीय संहितेवरून संवत्सरसत्र पूर्वी एकदां दहा महिन्यांत संपत असे हें निश्चित दिसतें, व त्यासंबंधानें मागें विवेचन आलेंच आहे. असलें सत्र अतिरात्र करून सुरू करीत व तें संपल्यावर पुनः अतिरात्र करीत असें मानिल्यास सर्व गोष्टींचा यथास्थित उलगडा होतो. पूर्वी सांगितलेलीं रात्रिसत्रें या दोन अतिरात्रांमधील दीर्घरात्रींत करून त्यांत फक्त इन्द्रालाच हविर्भाग देत असत. तर येणेंप्रमाणें, दहा महिन्यांचें किंवा कांहीं कमी कालाचें 'गवां अयनम्,' तें संपल्यावर अतिरात्र, त्याच्यानंतर दोनपासून शंभर रात्रीपर्यंत रहाणारे रात्रिक्रतु व रात्रिसत्रें आणि पुनः अतिरात्र इतकीं मिळून वैदिक ऋषींच्या आदि पूर्वजांचे संवत्सरावधि यज्ञपर्याय होत असत. यांतील प्रत्येक निरानिराळ्या यज्ञांचा उद्देश व त्यांचें स्थान हीं त्यांच्या नांवावरून जशीं दिसतात तशींच मूळ होतीं. पण जेव्हां दहा महिन्यांचें वर्ष पालटून बारा महिन्यांचें झालें, तेव्हां गवामयनही ३६० दिवसांचें झालें. या बदललेल्या परिस्थितींत पूर्वीच्या दीर्घरात्रींतील रात्रिक्रतूंचें प्रयोजन नाहींसें झालें, तरी रात्रिसत्राला केवळ प्रास्ताविक याग करून त्याचा खुद्द सत्रांतच समावेश करण्यांत आला. याप्रमाणें मूळ दीर्घरात्रीच्या आद्यंतीं करीत असलेले अतिरात्र याग हे खुद्द सत्राचेच आरंभींचे व शेवटचे भाग बनले. अतिरात्र हा शब्द जर आज राहिलेला नसता तर हा प्रकार समजणें शक्य नव्हतें. रात्रिसत्रांचा उपयोग नाहींसा झाल्यामुळें, त्यांचें खरें स्वरूप हळुहळू स्मरणांतून गेलें व शेवटीं तर ' रात्रि ' याचा व्यापकपणें ' दिवस ' असा अर्थ समजून या सत्रांना मीमांसकांनीं रोजच्या सोमयागांत ढकलून दिलें. हा फरक कसा झाला तें पहाणें आपल्या विषयाबाहेरचें आहे. तरीपण एवढें खरें कीं यज्ञपद्धति नवीन परिस्थितीला अनुरूप करून घेण्याचें विकट काम ब्रह्मवादी व ब्राह्मणकार यांनीं केलें. वैदिक धर्माचें मुख्य अंग म्हणजे यज्ञ हें

---

१ या विवेचनांत ठरविलेला अतिरात्रांचा काल श्रौतसूत्रकारांस माहीत होतासें दिसतें. लाट्यायनश्रौतसूत्रांत (८,२,६) ' **समाप्ते संवत्सरे रात्रिसत्रेषु राजानं क्रीणीषुः** ' ' संवत्सरसत्र संपल्यावर रात्रिसत्रांत सोम (राजा) विकत घ्यावा ' असें म्हटलें आहे. त्यावरून संवत्सरसत्र संपल्यावर रात्रिसत्रें होत असत हें उघड होतें.

असल्यामुळें नवीन परिस्थितीप्रमाणें त्यांत फरक करतांनाही होईल तितकें करून जुनें कायम ठेवण्याचा प्रयत्न वैदिक ऋषींनी केला असणें स्वाभाविक आहे. असा फरक करणें कांहीं सोपें काम नव्हतें. खऱ्या स्थितीचा विसर पडल्यावर, यज्ञपद्धतींत दिसून येणाऱ्या गोष्टींचें समर्थन करून ब्राह्मणकारांनां जुन्यानव्याचा मिलाफ करावयाचा होता. ब्राह्मण ग्रंथांत लागतील तसे मनमुराद तर्क आढळून येतात, असा त्यांच्यावर दोषारोप करणारांनीं ही तत्कालीन परिस्थिति लक्षांत ठेविली पाहिजे. यज्ञपद्धति त्यांच्याच काळांत प्रथम बसविली असती तर वाटतील तसे तर्क त्यांच्यानें करवले नसते. या गोष्टींचें मूळ माहीत होतें तोंपर्यंत खुलाशाची गरज नव्हती. पण त्याची विस्मृति पडल्यावर त्या गोष्टींचें तत्कालीन स्थितीला अनुसरून कांहीं सयुक्तिक कारक सांगणें भाग होतें. या दृष्टीनें विचार केल्यास ब्राह्मण ग्रंथांचें स्वरूप व त्यांची रचना या विषयीं विचार करण्यास एक नवीन साधन होणार आहे. पण तो विषय प्रकृत नसल्यामुळें त्याचें येथें जास्त विवेचन करतां येत नाहीं.

येणेंप्रमाणें वैदिक ग्रंथांत आढळून येणाऱ्या सोमयागांतील मुख्य मुख्य गोष्टींचें जरूर तेवढें अवलोकन केलें; त्यांत आजपर्यन्त अगदीं अगम्य ह्मणून समजलेल्या कित्येक गोष्टींचा ध्रुवोपपत्तीच्या साहाय्यानें सहज व सरळ उलगडा करतां येतो असें आढळून आलें. सर्व वैदिक यज्ञपद्धतीचें या दृष्टीनें विवेचन करण्याचें हें स्थल नव्हे. पण वर केलेल्या विवेचनावरून व विशेषतः रात्रिसत्रांच्या विवेचनावरून हे सोमयाग मूळ वृत्राशीं लढतांनां इन्द्राला साहाय्य व्हावें ह्मणून करीत असत असें धरावयास हरकत नाहीं. प्राचीन रोमन वर्षाप्रमाणें ' गवां अयनम् ' हें सत्रही मूळ दहा महिन्यांचें होतें, हें या प्रकरणाच्या पूर्व भागांत सांगितलेंच आहे. रात्रिसत्रें हीं अशा सत्राची स्वाभाविक पुरवणी होत. तीस दिवसांची उषा व दीर्घ दिवस आणि दीर्घ रात्र हीं त्यांच्या जोडीला घेतल्यास त्यांवरून वैदिक ऋषींच्या पूर्वजांचें आदिस्थान कोठें तरी उत्तरध्रुवप्रदेशांत होतें हें निःसंशय सिद्ध होतें. नवग्व व दशग्वांचीं सत्रें, दहाव्या महिन्यांत ह्मातारा होणाऱ्या दीर्घतम्याची गोष्ट, वर्षाचे पांच ऋतु किंवा सूर्याचे सात किंवा दहा घोडे, इत्यादि सर्वांवरून हेंच सिद्ध होतें. अवेस्त्यांतील तिष्ट्रय व अपौश यांच्या युद्धाच्या कालाचें

वर्णन, इंद्र शंभर यज्ञांचा स्वामी असल्याची पौराणिक कथा या व दुसऱ्या बारीक सारीक पुष्कळ गोष्टी यांवरून आर्यांच्या ध्रुवाजवळिल मूलस्थानाच्या उपपत्तीला बळकटी येते. मागाहून झालेल्या वैदिक ग्रंथांत आढळून येणाऱ्या यज्ञसंबंधीं सूक्ष्म गोष्टीही आदिकालीं प्रचलित होत्या असें आमचें ह्मणणें नाहीं. उलट आदिकालचे यज्ञ अगदीं साधे होते हेंच विशेष संभवनीय दिसतें. यज्ञ हेंच तत्कालीन धर्माचें प्रधान अंग असल्यामुळें प्राचीन वैदिक ऋषी प्रतिदिवशीं व प्रतिरात्रीं यज्ञ करीत. आपल्या यज्ञपद्धतीचें पर्यवसान सूक्ष्म नियमांनीं बद्ध झालेल्या अशा संवत्सरसत्रांत होईल अशी कदाचित् त्यांना कल्पनाही आली नसेल. 'वेदकालनिर्णयांत' सांगितल्याप्रमाणें वार्षिक यज्ञपर्याय सूर्याच्या वार्षिक गतीच्या अनुरोधानें बसविलेले असल्यामुळें हे यज्ञ कालमापनाचें साधन झालेले होते. प्राचीन यज्ञपद्धतीचें इतिहासांत जें मत्व आहे तें याच दृष्टीनें आहे, व त्याच दृष्टीनें तिचें येथें परीक्षण केलें आहे. या परीक्षणांत, ध्रुवोपपत्तीचें ज्यांवरून अनुमान करतां येईल व त्या उपपत्तीवर ज्यांचा नीट उलगडा करितां येईल, अशा बऱ्याच गोष्टी आपल्याला आढळून आलेल्या आहेत. याप्रमाणें ऋग्वेद आणि प्राचीन यज्ञपद्धति या दोहोंचाही आपल्या अनुमानांना भक्कम आधार असल्यामुळें त्यांच्या खरेपणाबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं.



आठव्या प्रकरणाची पुरवणी.

'गवां अयना'चे कालाविषयीं ऐतरेय ब्राह्मण आणि तैत्तिरीय संहिता यांतील वचनें.

गावो वै सत्रमासत । शफाँ छृंगाणि सिषासत्यस्तासां दशमे मासि शफाः शृंगाण्यजायन्त । ता अब्रुवन् यस्मै कामायादीक्षाम-ह्यापाम तमुत्तिष्ठामेति । ता या उदतिष्ठंस्ता एताः शृंगिण्योऽथ याःसमापयिष्यामः संवत्सरमित्यासत तासामश्रद्धया शृंगाणि प्राव-र्तत । ता एतास्तूपरा ऊर्जं त्वसुन्वंस्तस्मादु ताः सर्वान्नृतून्प्राप्त्वोत्तर-मुत्तिष्ठंत्यूर्जं ह्यसुन्वन् सर्वस्य वै गावः प्रेमाणं सर्वस्य चारुतां गताः । सर्वस्य प्रेमाणं सर्वस्य चारुतां गच्छति य एवं वेद । ऐतरेय ब्राह्मण ४–१७.

भावार्थ.

"खूर आणि शिंगें प्राप्त करून घेण्याची इच्छा करणाऱ्या गाई सत्रानु-ष्ठानास बसल्या. त्यांना दहाव्या महिन्यांत खूर आणि शिंगें उत्पन्न झालीं. त्या म्हणाल्या, 'ज्या इच्छेनें आम्ही सत्रासाठीं दीक्षा घेतली ती पूर्ण झाली. (आतां) आपण उठावें.' ज्या उठल्या त्या ह्या शिंगें-वाल्या (गाई). पण संवत्सरसत्र पुरें करूं असें म्हणून ज्या बसल्या त्यांचीं शिंगें अश्रद्धेमुळें निघून गेलीं. त्या ह्या बिनशिंगाच्या (गाई). (सत्र चालू ठेविल्यावर) त्यांनीं ऊर्ज (बल) उत्पन्न केलें. त्यानंतर (बारा महिने सत्र चालविल्यावर) त्या सर्व ऋतू प्राप्त करून शेवटीं उठल्या; कारण त्यानीं (खूर शिंगें उत्पन्न करणारें) बल उत्पन्न करून घेतलें. याप्रमाणें गाई सर्वांचें प्रेम आणि सर्वांचें चारुत्व संपादन करत्या झाल्या. जो हें जाणतो तो सर्वांचें प्रेम आणि सर्वांचें चारुत्व संपादन करतो."

यांत प्रथम गाईंचा हेतु **दहाच महिन्यांत** सिद्धीस गेला, आणि म्हणून त्यांपैकीं कांहीं सत्र संपवून उठल्या असें स्पष्ट सांगितलें आहे. ज्यांनीं पुढें दोन महिने सत्र चालविलें त्यांना 'अश्रद्धालू' म्हटलें असून

या त्यांच्या अश्रद्धेबद्दल त्यांनां मिळालेलीं शिंगें नाहींशीं झाल्याचें सांगितलें आहे. यावरून एवढें स्पष्ट होतें कीं संहिता आणि ब्राह्मणें यांत सांगितलेलें सूर्याच्या वार्षिक गतीवर बसविलेलें जें हें संवत्सरसत्र तें एकदां दहा महिन्यांत संपत असे. असें कां असावें ? जें सत्र स्वाभाविक-पणें बारा महिन्यांचें दिसतें तें पूर्वी दहा महिन्यांत कसें संपत असे ? बारा महिन्यांनंतर मिळणारें सर्व फळ या सत्र करणाऱ्या गाईंना दहाच महिन्यांत कसें मिळालें ? हे प्रश्न फार महत्वाचे असूनही ऐतरेय ब्राह्मणांत त्यांचा उल्लेख केलेला नाहीं. पण सर्व यज्ञग्रथांत अत्यंत प्राचीन व प्रमाणभूत अशी जी तैत्तिरीय संहिता तींत हे प्रश्न स्पष्ट विचारिले आहेत. ' गवां अयनम् ' हें सत्र यजमानाच्या मर्जीनुरूप दहा किंवा बारा महिन्यांत संपवितां येतें असें त्या संहितेंत स्पष्ट सांगितलें असून हें वास्तविक बारा महिन्यांचें सत्र दहा महिन्यांत कसें संपे याचे कारण ' पूर्वापर वहिवाटी ' शिवाय दुसरें कांहींही या संहितेंत सांगितलेलें नाहीं. तैत्तिरीय संहितेंत ' गवां अयनां ' विषयीं दोनदां उल्लेख आलेला आहे, त्यांतील पहिला असाः—

गावो वा एतत्सत्रमासताशृंगाः सतीः शृंगाणि नो जायन्ता-मिति कामेन । तासां दश मासा निषण्णा आसन्नथ शृंगाण्यजायन्त ता उदतिष्ठन्नरात्स्मेत्यथ यासां नाजायन्त ताः संवत्सरमाप्त्वोदतिष्ठन्न रात्स्मेति । यासां चाजायंत यासां च न ता उभयीरुदतिष्ठन्नरात्स्मे ति । गोसत्रं वै संवत्सरो य एवं विद्वाँसः संवत्सरमुपयंत्यृध्नुवं-त्येव तस्माच्चपरा वार्षिकौ मासौ पर्त्वा चरति सत्राभिजित्यै ह्यस्यै तस्मात्संवत्सरसदो यत्किंच गृहे क्रियते तदात्तमविरुद्धमभिजित्यै क्रियते । तैत्तिरीय संहिता. ७,५,१,१–२.

भावार्थ.

"शिंगें नसल्यामुळें आपल्याला शिंगें उत्पन्न व्हावीं या इच्छेनें गाई ह्या सत्रानुष्ठानास बसल्या. त्यांना दहा महिने बसून झाले तेव्हां शिंगें उत्पन्न झालीं. ' आह्मी मिळवित्या झालों ' असें म्हणून त्या उठल्या. पण ज्यांना (शिंगें) उत्पन्न झालीं नाहींत त्या संवत्सर संपवून ' आह्मी

मिळवित्या झालों ' असें म्हणून उठल्या. ज्यांना (शिंगें) उत्पन्न झालीं आणि ज्यांना झालीं नाहींत त्या दोन्ही (प्रकारच्या गाई) ' आह्मी मिळवित्या झालों ' असें ह्मणून उठल्या. गोसत्र ह्मणजे संवत्सर (संवत्सरसत्र). जे असें जाणतात ते संवत्सराप्रत प्राप्त होऊन खचित उत्कर्ष पावतात. म्हणून बिनशिंगांची (गाय) वर्षाकालाचे दोन महिने संतुष्ट होऊन संचार करते (चरते). हें तिला (या) सत्रानें प्राप्त करून दिलें. ह्मणून संवत्सरसत्र करणाऱ्याच्या घरीं जें कांहीं होतें तें यशस्वी, यथाकाल आणि विरोधरहित होतें."

हें वर्णन ऐतरेय ब्राह्मणांतील वर्णनाहून जरा निराळें आहे. तैत्तिरीय संहितेंत बारा महिते सत्र चालविणाऱ्या गाई बिनशिंगांच्याच राहिल्या, पण ऊर्ज मिळण्याऐवजीं त्यांना वर्षाकाळांत सुखानें चरण्याचा वर मिळाला असें सांगितलें आहे. तरी, सत्राच्या अवधीसंबंधानें सांगतांना ऐतरेय ब्राह्मणाप्रमाणेंच या संहितेंतही तें **दहा** अथवा **बारा** महिन्यांनीं संपतें असें म्हटलें आहे. या अनुवाकाच्या पुढच्या अनुवाकांत पुनः 'गवां अयना'चें वर्णन केलें आहे; तें असें:—

गावो वा एतत् सत्रमासताशृंगाः सतीः शृंगाणि खिषासंतीस्तासां दश मासा निषण्णा आसन्नथशृंगाण्यजायन्त ता अब्रुवन्नरात्स्मोत्तिष्ठामाव तं काममरुत्स्महि येन कामेन न्यषदामेति तासामु त्वा अब्रुवन्नर्धा वा यावतीर्वाऽऽसामहा एवेमौ द्वादशौ मासौ संवत्सरं संपाद्योत्तिष्ठामेति तासांद्वादशे मासि शृंगाणि प्रावर्तंत श्रद्धया वाऽ श्रद्धया वा ता इमा यास्तूपरा उभय्यो वाव ता आर्ध्नुवन् याश्च शृंगाण्यसुन्वन् याश्चोर्जमवारुंधतध्नोति दशसु मास्सूत्तिष्ठन्नृध्नोति द्वादशसु य एवं वेद पदेन खलु वा एते यंति विन्दति खलु वै पदेन यन्तद्वा एतद्ब्रह्मयनं तस्मादेतद्वोसानि । तैत्तिरीय संहिता ७, ५, २, १,—२.

भावार्थ.

"शिंगें नसल्यामुळें शिंगें मिळविण्याच्या इच्छेनें गाई ह्या सत्रानुष्ठानास बसल्या. त्यांना दहा महिने बसून झाले तेव्हां त्यांना शिंगें उत्पन्न झालीं. त्या ह्मणाल्या, ' आह्मी मिळवित्या झालों, उठूं या, ज्या इच्छेनें (सत्रा-

नुष्ठानास) बसलों ती इच्छा पूर्ण झालीं. ' त्यांपैकीं निम्या (गाई)— किंवा किती असतील त्या—बोलल्या, ' हे बारा महिने बसूं याच, संवत्सर संपवून उठूं.' त्यांची शिंगें बाराव्या महिन्यांत परत गेलीं. अश्रद्धेमुळें ज्या बिनशिंगाच्या राहिल्या त्या ह्या. ज्यांना शिंगें उत्पन्न झालीं आणि ज्यांना ऊर्ज (बल) उत्पन्न झालें त्या दोहोंचाही याप्रमाणें उत्कर्ष झाला. जो हें जाणतो तो दहा महिन्यांनीं उठो वा बारा महिन्यांनी उठो त्याचा उत्कर्ष होतो. ते मार्गानेंच (पूर्वापर वहीवाटीप्रमाणेंच) जातात. मार्गानें जाणारा सिद्धि पावतो. हें तें यशस्वी अयन (सत्र). तस्मात् तें गोसनि (गाईंना हितावह) होय."

या अनुवाकाच्या पहिल्या भागांत पूर्वीच्या अनुवाकांतील गोष्टच थोड्याशा फरकानें सांगितली आहे. पण पुढें मात्र यांत दोन महत्वाच्या गोष्टी आल्या आहेत. पहिली गोष्ट अशी कीं हें सत्र दहा किंवा बारा महिन्यांनीं असें केव्हांही संपविलें तरी फल सारखेंच मिळतें; कारण दोन्हीं प्रकारच्या सत्र करणारांचा उत्कर्ष होतो असें त्यांत झटलें आहे. दुसरी गोष्ट ही कीं या वैकल्पिक सत्रावधीचें कारण **पद** (पूर्वापर वहिवाट— सायणाचार्य) होय. झणजे याचें तात्पर्य असें कीं वस्तुतः या वैकल्पिक भेदाविषयीं या संहितेंत मुग्धताच स्वीकारिली आहे. या संहितेंत याज्ञिक विधींचें मूळ सांगतांना कित्येक वेळां जे मनमुराद तर्क केलेले असतात त्यांचा विचार करतां ही मुग्धता लक्षांत ठेवण्यासारखी आहे. एकंदरींत सगळ्या संवत्सरसत्रांची प्रतिमा जें ' गवां अयनम् ' तें पूर्वी एकाकाळीं दहाच महिन्यांत संपत असे आणि असें वास्तविक बारा महिन्यांचें सत्र दहा महिन्यांत कसें संपे याचें कारण तैतिरीय संहिताकाळीं माहीत नव्हतें, ह्या दोन गोष्टी वरील संहितावचनांवरून पूर्णपणें सिद्ध होत आहेत.

प्रकरण ९ वें.

वैदिक कथा—निरुद्धा आपः.

ध्रुवोपपत्तीच्या सिद्धयर्थ दिलेल्या प्रत्यक्ष पुराव्याचा गोषवारा-गाथाशास्त्र-विषयक प्रमाणांचें स्वरूप त्याहून निराळें आहे-वैदिक वाक्यार्थमीमांसा-निरनिराळ्या पद्धति-नैरुक्त मत त्यांतील कल्पनांचें स्यरूप-उषेची कल्पना आणि तीवरून समजणाऱ्या वैदिक कथा पर्जन्योपपत्ति, इंद्रवृत्राचें युद्ध-वसंतोपपत्ति, अश्विनांचे पराक्रम-वृत्रकथेचा अर्थ बहुधा पर्जन्यपर लावितात-वृत्रवधाबरोबर घडून येणाऱ्या दुसऱ्या गोष्टी-जलांचें मोचन, गाईंचें मोचन, उषेचें व सूर्याचें आगमन-त्यांच्या एकसमयावच्छेदकत्वाविषयीं वेदांतील प्रमाणें-युद्धाचा काल आणि स्थल दर्शविणारीं वचनें-या गोष्टींच्या एकसमयावच्छेदकत्वाचा उषेच्या किंवा पर्जन्याच्या कल्पनेवर उलगडा होत नाहीं-पर्जन्योपपत्तींत सुचविल्याप्रमाणें इंद्रवृत्रांचें युद्ध अंतरिक्षांत झालेलें नव्हे-वर्षाकालांतही नव्हे-पर्वत, गिरि, अद्रि, इत्यादि शब्दांचा अर्थविपर्यास-पर्जन्योपपत्तीचा कोतेपणा-दुसरी कांहीं तरी कल्पना अवश्य आहे-जलांच्या खऱ्या स्वरूपाविषयीं विवेचन-तीं दिव्य असून, पावसांत पडलेलीं नव्हत-'तीन पृथिवींच्या खालच्या' प्रदेशाची वैदिक ऋषींना माहिती होती-उलट मतांचें खंडन-**रजस्, निर्ऋति, अधौ,** आणि **समुद्रौ** या शब्दांच्या अर्थाविषयीं विवेचन-दिव्य जलांचें दैनंदिन परिभ्रमण-दिव्य जलांचें स्थान पाताळांत होतें-दिव्य जलांच्या परिभ्रमणाविषयीं अवेस्त्यांतील वचनें-**सरस्वति** आणि **अर्द्वि सूर अनाहित** या नद्या दिव्य (आकाशांतील) होत-सर्व उद्भिज्ज सृष्टीचें आणि जलांचें उगमस्थान-वृत्रयुद्धाचें खरें स्वरूप-जलें (आपः) आणि प्रकाश यांची एकाच काळीं मुक्तता होण्यास त्याचें स्थान एकच पाहिजे-पाताळांत जलांना वृत्रानें निरुद्ध केल्यामुळें दोहोंची गति बंद होते-क्षितिजावरील पर्वतांच्या द्वारांचें पिधान-जलां (आपः) चें परिभ्रमण आणि सूर्याची गति यांचा निकट संबंध-त्याच्या सिद्धयर्थ अवेस्त्यांतील स्पष्ट वचनें-सूर्याचें बराच काल जलांत रहाणें-अवेस्त्यांतील प्रमाणें-मृत शरीराची व्यवस्था-काळोखाची सुरुवात आणि हिंवाळ्यांतील जलप्रवाह बंद होणें हीं एकाच वेळीं

घडतात–काळोखाचा दीर्घ अवधि–दिव्य जलांच्या दैनंदिन परिभ्रमणाविषयीं इतर राष्ट्रांच्या पुराणांतील उल्लेख–वृत्रयुद्ध वार्षिक असून हिंवाळ्यांत घडतें याविषयीं प्रत्यक्ष आधार–या वचनांचा ध्रुवोपपत्तीखेरीज अर्थ लागत नाहीं–इंद्रवृत्रांच्या युद्धाचा नक्की दिवस ऋग्वेदांत सांगितला आहे **चत्वारिंश्यां शरदि** या शब्दांचा खरा अर्थ–शरद्ऋतूच्या चाळिसाव्या दिवशीं इंद्राला शंवर आढळला–हा दिवस दीर्घ काळोखाचा आरंभ होय–शरद्ऋतु सूर्यप्रकाशाचा शेवटचा ऋतु असें दाखविणारीं वेदांतील वचनें–ऋतूंनीं काल मोजण्याच्या पद्धतीविषयीं प्राचीन लेखांवरून मिळणारीं प्रमाणें–अवेस्त्यांतील अशाच प्रकारची पद्धति–वृत्रार्चा शंभर पुरें म्हणजे काय?—वृत्राला हिमानें मारणें याचा अर्थ–इन्द्रानें मुक्त केलेल्या सात नद्या–त्या पृथ्वीवरील नव्हत–पंजाबांतीलही नव्हत–पाश्चात्य विद्वानांच्या मताचें परीक्षण–सप्तसिंधु आणि सप्त आदित्य यांचा निकट संबंध–अवेस्त्यांतील **हप्तहिंदु** शब्दाचें मूळ–तें मूळ वसतिस्थानांतील पुराणांतील नांव असून पुढें नवीन स्थानांत गेल्यावर तेथील एखाद्या ठिकाणाला दिलें असावें–वृत्राची कथा मूळ ध्रुवसंबंधीं होय 'निरुद्धा आपः' या ध्रुवाजवळील प्राचीन वसतिस्थानांतील प्रकाश व काळोख यांच्या वार्षिक झगड्याच्या दर्शक आहेत.

वैदिक कथा—निरुद्धा आपः.

तिसऱ्या प्रकरणांत सांगितलेल्या ध्रुवावरील आणि ध्रुवप्रदेशांतील विशिष्ट गोष्टी वैदिक ऋषींना परंपरागत माहीत होत्या असें प्रत्यक्ष दाखविणाऱ्या वेदवाक्यांचें आतांपर्यंत परीक्षण झालें. देवांची रात्र, सहा महिन्यांचा दिवस व सहा महिन्यांची रात्र, या गोष्टींचें मूळ पारशी व भारतीय आर्य एकत्र होते त्या काळापर्यंत तरी नेतां येतें, असें प्रथम दाखविलें. नंतर ऋग्वेदांतील उषेच्या सूक्तांचें सूक्ष्म निरीक्षण केल्यावरून त्यांतील उषा अनेक आहेत अशा अर्थाच्या विधानाचा खुलासा त्या उषा एकामागून एक सारख्या येणाऱ्या होत्या याच कल्पनेवर होतो असें दाखविलें. उषा तीस आहेत, उषा दिसूं लागल्यापासून सूर्योदय होई-

पर्यंत कित्येक दिवस जात असत, तीं चक्राकार भ्रमण करते, इत्यादि गोष्टी सांगणाऱ्या स्पष्ट वचनांवरून वैदिक ऋषींना केवळ उत्तर ध्रुवावरच दिसून येणारे असे हे सृष्ट चमत्कार माहीत होते, हें स्पष्ट दिसून येतें. याहूनही खात्रीलायक पुरावा ह्मणून गेल्या तीन प्रकरणांत, उत्तर ध्रुव-प्रदेशांत दिसणाऱ्या दीर्घ रात्री व तसेच दीर्घ दिवस, दहा महिन्याचें वर्ष, इत्यादि गोष्टीही वैदिक ऋषींस माहीत होत्या असें सिद्ध करणारीं वचनें देऊन त्यांचें विवरण केलें. प्राचीन यज्ञपद्धति व विशेषेंकरून त्यांतील वार्षिक सत्रें व रात्रिसत्रें यांचें परीक्षण केल्यावरून प्राचीन वार्षिक सत्रें नऊ किंवा दहा महिन्यांनीं संपत असत व रात्रिसत्रें ही खरोखरच आपल्या नांवाप्रमाणें शतदिनावधि दीर्घ रात्रींतच इंद्रासाठीं केलीं जात असत, असें दिसून आलें. दीर्घतम्याची गोष्ट, अदितीच्या सात पुत्रांची कथा, नवग्व आणि दशग्व यांची सत्रें यांवरूनही तेंच अनुमान दृढ होतें. तिसऱ्या प्रकरणांत सांगितलेल्या ध्रुवप्रदेशाच्या विशिष्ट लक्षणांपैकीं प्रत्येक लक्षणाची माहिती वैदिक ऋषींस होती व हे ऋषी तर ३६० दिवसांचें वर्ष असलेल्या प्रदेशांत रहात असत, हें समजल्यावर वैदिक ऋषींस ह्या गोष्टी परंपरागत ज्ञानावरूनच माहीत होत्या असें मानणें अपरिहार्य होतें. यांपैकीं एखाद्या गोष्टीविषयींचा पुरावा कदाचित् निर्णायक नसेल. परंतु त्या सर्व गोष्टी ज्योतिषदृष्ट्या एकमेकांशीं कार्यकारणांसारख्या संबद्ध असल्यामुळें त्या सर्वांवरून निघणारीं अनुमानें खात्रीलायक वाटल्यावांचून रहाणार नाहींत. येथपर्यन्त दिलेल्या पुराव्यांत कित्येक वचनांचा जो अर्थ केला आहे तो अगदीं नवीन आहे, हें खरें. पण पूर्वीचे चुकीचे अर्थ होण्याचें कारण ३०–४० वर्षांपूर्वी उत्तर-ध्रुवप्रदेश पूर्वी एकदां वसतियोग्य होते ही गोष्टच माहीत नव्हती हें होय. यास्क व सायणाचार्य यांनाही ही गोष्ट माहीत नव्हती; ह्मणून त्यांनीं कित्येक ठिकाणीं केवळ शब्दास शब्द देण्यापलीकडे कांहीं केलेलें नाहीं. पाश्चात्य पंडितांना ४० वर्षांपूर्वी ध्रौविक वसतिस्थानाची शक्यताच कबूल नसल्यामुळें त्यांनींही त्या वचनांकडे दुर्लक्ष करून कशी तरी वेळ मारून नेलेली आहे. आतांपर्यंत दिलेल्या वचनांपैकीं बरींच अशाच प्रकारचीं आहेत. त्यांचा पूर्व विवेचनांत केलेला अर्थ सरळ व स्वाभाविक आहे असें निःपक्षपातबुद्धीनें विचार करणारास खास दिसेल.

असा अर्थ करण्याचीं कारणें कित्येक ठिकाणीं सविस्तर दिलेलीं असल्यामुळें त्या ठिकाणीं थोडें बहुत विपर्यान्तर झाल्यासारखें वाटेल; पण एकंदरींत सर्व विवेचन शास्त्रीय पद्धतीनेंच केलेलें आहे. त्यांत ध्रुवावरील वसतिस्थानाची कल्पना गृहीत धरलेली नाहीं, किंबहुना ती असंभवनीय आहे असेंच आरंभीं वाटत होतें. पण त्यासंबंधाचा पुरावा इतका जबर दिसला कीं त्यामुळें ध्रौविक वसतीची उपपत्ति कबूल करणें भाग पडलें; व येथपर्यंतच्या प्रकरणांत दिलेला पुरावा वाचकांसही तितकाच निर्णायक वाटेल असें मानावयास हरकत नाहीं.

ध्रुवावरील वसतिस्थानाविषयींचा जो पुरावा यापुढें द्यावयाचा आहे, तो आतांपर्यंत दिलेल्या पुराव्याहून जरा निराळ्या स्वरूपाचा आहे. वैदिक ऋषींचे पूर्वज जर कधीं उत्तर-ध्रुवाजवळ राहिलेले असतील तर त्यांच्या पुराणकथांत तेथील सृष्ट चमत्कारांचें कांहीं तरी वर्णन असलें पाहिजे. म्हणजे जर आपली कल्पना खरी असेल तर वैदिक-ग्रंथांतील पुराणकथांचें निरीक्षण केल्यास त्यांवरून आपल्या कल्पनेला पोषक पण दुसऱ्या कोणत्याही कल्पनेशीं योग्य तऱ्हेनें न जुळणाऱ्या अशा कित्येक गोष्टी त्यांत आढळून आल्या पाहिजेत. या गोष्टींचा निरनिराळ्या प्रकारचे पंडित निरनिराळ्या तऱ्हेनें अर्थ लावीत असल्यामुळें अशा प्रकारचा पुरावा कमी दर्जाचा असणार हें उघड आहे. यास्काचार्यांनीं निरुक्तांत तीन चार प्रकारच्या अर्थ करण्याच्या पद्धति सांगितल्या आहेत. त्यांत **ऐतिहासिक** अर्थ करणारे असें मानितात कीं, वैदिक देवता म्हणजे मूळ ऐतिहासिक पुरुष असून पुढें त्यांच्या अंगच्या दिव्य गुणांमुळें त्यांना देवपदवी मिळाली. दुसरे **ब्रह्मवादि** हे कर्मदेवता[1] आणि आजानदेवता[2] असे देवतांचे दोन भेद करितात. तिसरे **नैरुक्त** हे असें मानितात कीं, वदिक देवता ह्या कोणत्या तरी सृष्ट चमत्कारांच्या दर्शक आहेत. चवथे **अध्यात्मिक** हे वैदिक कथांचा अर्थ ब्रह्मज्ञानपर लावितात. दुसरेही आणखी अर्थ करणारे असे पंडितांचे कित्येक वर्ग आहेत. त्यांत नैरुक्तांखेरीज बाकीचे कोणीही वैदिक देवताविषयक गोष्टींचा सृष्टचमत्कारपर केलेला अर्थ बहुधा मान्य करणार नाहींत. म्हणून असल्या प्रकारचा पुरावा गौण

---

१ ज्यांनीं आपल्या स्वतःच्या कर्मामुळें देवपदवी प्राप्त करून घेतली त्या.

२ जन्मतःच देवपदवीला पोहोंचलेल्या.

अगर अप्रत्यक्ष होय. सहा महिन्यांची रात्र इत्यादि गोष्टींमध्यें या अर्थ लावण्याच्या निरनिराळ्या पद्धतींत मुळींच बदल होणारा नसल्यामुळें त्यांच्या संबंधाचा पुरावा प्रत्यक्ष होय, पण पुराणकथाविषयक प्रमाणें नैरुक्त मत मान्य करणारे मात्र कबूल करितील. नैरुक्त पद्धति म्हणजे कांहीं आजकालची आहे असें गाहीं. तीहि अगदीं प्राचीन असून बहुतेक बाबतींत ती आधुनिक पंडितांनीं मान्य केलेली आहे. तरी आपली कल्पना अगदीं नवीन असल्यामुळें दोन्ही प्रकारचा पुरावा निरनिराळा देणेंच इष्ट आहे.

निरुक्तकार हे बहुतेक वैदिक कथांचा अर्थ अंधकार व प्रकाश यांच्या युद्धाच्या कल्पनेवर किंवा पाणी व सूर्य यांना अडवून ठेवणारे कृष्णमेघ आणि वातदेवता यांच्या युद्धाच्या कल्पनेवर लाविताते. अश्विनांनीं वृकाच्या जबड्यांतून वर्तिकेची मुक्तता करणें म्हणजे त्यांच्या मतें रात्रीच्या काळोखांतून प्रकाश आणणें होय. वृत्रासंबंधानें निरनिराळीं मतें देतांना निरुक्तांत म्हटलें* आहे, " तर वृत्र हा कोण ? नैरुक्त म्हणतात ' वृत्र म्हणजे मेघ ' ' असुर, त्वष्ट्याचा पुत्र ' असें ऐतिहासिक म्हणतात. पाणी आणि प्रकाश यांच्या मिश्रीभावानें वर्षाव होतो; त्यालाच अलंकारिक भाषेंत युद्ध म्हणतात. मंत्र व ब्राह्मण यांत वृत्र म्हणजे सर्प असें म्हटलें आहे. त्यानें आपल्या शरीराचा विस्तार करून नद्या अडवून टाकिल्या. त्याला मारल्यावर पाणी पुनः वाहूं लागतें." नैरुक्तमतांत पर्जन्य व उषा यांच्या कल्पना ह्या अर्थपद्धतीचे आधारस्तंभ होत. पाश्चात्य विद्वानांनी जरी या पद्धतींत सुधारणा केली आहे, तरी वैदिक देवतांच्या खऱ्या खऱ्या स्वरूपाचा सूक्ष्म विचार करून वैदिक सूक्तांचा अर्थ करण्याची ही पद्धत सुचविल्याचा मान आमच्या प्राचीन नैरुक्तांसच आहे. आपल्या कन्येचा अभिलाष करणाऱ्या प्रजापतीची गोष्ट ऐतरेय ब्राह्मणांत उषेमागून येणाऱ्या सूर्याच्या कल्पनेवर बसवून दाखविली आहे. अहल्या व इंद्र यांच्या कथेचाही असाच अर्थ केलेला आहे. पण निरुक्त-

---

* निरुक्त २,१६. तत्को वृत्रः। मेघ इति नैरुक्ताः। त्वाष्ट्रोऽसुर इत्यैतिहासिकाः। अपांच ज्योतिषश्च मिश्रीभावकर्मणा वर्षकर्म जायते। तत्रोपमार्थेन युद्धवर्णा भवन्ति। अहिवत्तु खलु मंत्रवर्णाः ब्राह्मणवादाश्च। विवृद्धया शरीरस्य स्रोतांसि निवारयांचकार। तस्मिन्हते प्रस्यंदिरे आपः।

काळांतील सृष्टिज्ञान बेताचें असल्यामुळें त्यांना सर्व गोष्टींचा अर्थ सृष्ट चमत्कारांच्या कल्पनेवर बसवितां येईना. उदाहरणार्थ अश्विनांच्या अनेक गोष्टींपैकीं वृकमुखांतून सुटलेल्या वर्तिकेची गोष्टच कायती यास्काचार्यांनीं उषेच्या कल्पनेवर बसविली आहे. या नैरुक्त पद्धतींत पाश्चात्य पंडितांनीं थोडीशी सुधारणा केली आहे; कारण ते बऱ्याच उन्नत अशा उत्तर अक्षांशांत रहात असल्यामुळें हिंवाळ्यांतील सूर्याचा कमजोरपणा, त्यानंतर येणाऱ्या वसंताचें महत्व, व तेव्हां पुनः सूर्याचें तेजस्वी होणें इत्यादि गोष्टी विशेष ठळक रीतीनें त्यांच्या नजरेस येतात. त्यांच्या आधारावर त्यानीं बऱ्याच वैदिक कथांचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. याप्रमाणें आतांपर्यंत पर्जन्य, उषा व वसंतारंभ या तीन कल्पना नैरुक्त मतांत प्रसिद्ध आहेत. त्यांचें थोडेसें वर्णन करणें येथें जरूर आहे.

उषेच्या कल्पनेच्या पुरस्कर्त्यांनी तिला सर्व कथांचें मूळ मानिलें आहे. देव, सूर्य, प्रातःकाल, दिवस, वसंत या सर्वांची जननी व स्वतः अमरत्वाची मूर्तिच अशी ती तेजस्वी उषा प्राचीन लोकांपुढें एकापेक्षां एक गहन प्रश्न उभे करीत असे. आपले सोनेरी दरवाजे उघडून विजयी सूर्याला मार्ग करून देणारी उषा उदयाला आली असतां त्या लोकांनां सान्ताकडून अनन्ताकडे भराऱ्या मारावयाला चांगला अवसर मिळत असे. अनन्त, अमर्त्य, दिव्य, इत्यादि कल्पना मनांत जागृत करणाऱ्या उषेचीं विविध नांवें हींच ईशशक्तींचीं दर्शक झालीं. सरण्यूनें अश्वीचें रूप घेतल्यावर विवस्वतापासून तिला दोन जुळीं मुलें होणें म्हणजे सूर्योदय झाल्यावर उषा नाहींशी होणें व दिवसरात्रीचो जोडी उत्पन्न होणें होय. सूर्येचें सोमाशीं लग्न होणें, वृषाकपायीचे बैल इंद्रानें खाऊन टाकणें किंवा अदितीला आदित्यरूपी पुत्र होणें इत्यादि सर्व उषेच्याच गोष्टी होत. पणींनीं चोरलेल्या गाई शोधून काढण्यासाठीं गेलेली सरमा, पुरूरव्यापासून दूर जाणारी उर्वशी हींही उषेचींच स्वरूपें होत. सारांश, एवढाच कीं, या उषेच्या कल्पनेवर शक्य तितक्या गोष्टी जुळविण्याचा हे लोक प्रयत्न करतात. त्यांच्यामतें ही उषा म्हणजे उष्ण किंवा समशीतोष्ण कटिबंधांतील रोजची उषा होय. पण ती तशी नसून ध्रुवप्रदेशांतील दीर्घ उषाच आहे असें समजल्यावर या सर्व गोष्टींचें स्पष्टीकरण निराळ्याच रीतीनें करावें लागेल. पण तें करण्याचें हें स्थळ नव्हे.

आतां दुसरी कल्पना म्हणजे पर्जन्याची. ही कल्पना उषेच्या कल्पनेची पुरवणी म्हणून आपल्या निरुक्तकारांनीं दिलेली आहे. या कल्पनेवर बसविलेली मुख्य कथा म्हणजे इंद्रवृत्रांच्या युद्धाची होय. इंद्र शब्दाचा धात्वर्थ 'पर्जन्यबिंदु' असा असून तो व इंदु हे दोन्ही शब्द एकाच धातूपासून निघाले आहेत. वृत्र याचा धात्वर्थ (वृ—आच्छादणें) 'आच्छादणारा' असा आहे. या दोन शब्दांचा अशा रीतीनें अर्थ ठरविल्यावर इतर बाबी थोडी बहुत ओढाताण करून मूळ कल्पनेशीं जुळत्या करीत. या कल्पनेप्रमाणें इन्द्रानें पर्वत फोडून पाण्याला वाट करून देणें म्हणजे ढग फोडून पाऊस पाडणें होय. इन्द्र पर्जन्याची देवता असल्यामुळें त्याचें वज्र म्हणजे विद्युत् होय. पण या कथांत विशेष बिकट भाग म्हटला म्हणजे वृत्रानें ऊर्फ अहीनें जलांना निरुद्ध करून ठेवणें हा होय. ढगांतील पाणी वृत्र कसें अडकवून ठेवितो हें समजणें फार कठीण नाहीं. पण ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं वृत्राचा वध झाल्यावर 'सिन्धवः' म्हणजे नद्या मोकळ्या झाल्या असें वर्णन आहे. या पर्जन्याच्या कल्पनेच्या पुरस्कर्त्यांच्या मताप्रमाणें या नद्या म्हणजे जर पंजाबांतील नद्या असतील, तर त्यांना वृत्रानें अडवून ठेविलें म्हणजे काय हें समजणें कठीण आहे. उन्हाळ्यांत नद्या आटतात त्याला अनुलक्षून हें आहे असें या शंकेचें उत्तर नैरुक्तांनीं दिलें आहे. या पलीकडे आपले निरुक्तकार गेलेले नाहींत. पण जर्मन पंडितांनीं आणखीही कित्येक गोष्टी पर्जन्याच्या कल्पनेवर बसविण्याचा प्रयत्न केला आहे; व त्यांच्या मतें हिंदी—यूरोपीय लोकांच्या सर्व कथांनां मूळ आधार वातावरणांतील चमत्कारांचाच आहे.

तिसरी जी वसंताची कल्पना तीही पहिल्या म्हणजे उषेच्या कल्पनेप्रमाणेंच सूर्यमूलक आहे. तिच्यावरून पहातां कित्येक वैदिक कथांत हिंवाळा नाहींसा झाल्यावर आनंददायक अशा वसंताच्या आगमनाचें वर्णन आहे. आपले यास्काचार्यादि निरुक्तकार ज्या प्रदेशांत रहात होते, तेथें हिवाळ्यांतील व वसंतांतील सूर्यामध्यें सांगण्यासारखें अंतर नसल्यामुळेंच बहुधा त्यांनीं वैदिक कथांच्या स्पष्टीकरणार्थ ह्या वसंताच्या कल्पनेचा उपयोग केलेला नसावा. परंतु इंग्लंडसारख्या वरच्या अक्षांशांत हा फरक अगदीं ढोबळ दिसत असल्यामुळें प्राश्चात्य पंडितांनीं या वसं-

ताच्या कल्पनेवर बऱ्याच वैदिक कथांचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. अश्विनांनीं च्यवनाला पुनः तरुण केलें, अत्रीचें तमापासून रक्षण केलें, विहिरींत बुडालेल्या वंदनाला वर काढिलें, ऋज्राश्वाला दृष्टि दिली इत्यादि अश्विनांच्या पराक्रमांचा अर्थ पाश्चात्य पंडितांनीं वसंताच्या आगमनपर लाविला आहे. हे सर्व पराक्रम अर्थातच वार्षिक होत.

या तीन कल्पनांशिवाय नाक्षत्र कल्पनेवरही कित्येकांनीं वैदिक कथांचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. बंगळूरचे नारायण ऐयंगार यांनीं कांहीं गोष्टींचा अर्थ मृगशीर्ष व रोहिणी या नक्षत्रांच्या स्थितीवर लाविला आहे. या सर्व कल्पनांचें ऊर्फ उपपत्त्यांचें सविस्तर वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे. त्यांचा येथें उल्लेख करण्याचें कारण एवढेंच कीं, इतक्या जरी निरनिराळ्या उपपत्त्या कांढिलेल्या आहेत तरी अद्यापिही बऱ्याच महत्वाच्या अशा वैदिक कथांचा समाधानकारक उलगडा झालेला नाहीं. अशा गोष्टी ध्रुवोपपत्तीवर चांगल्या बसत असल्यामुळें ह्या उपपत्तीच्या दृढीकरणार्थ त्या येथें सांगणें गैर होणार नाहीं. चालू व पुढच्या अशा दोन प्रकरणांत याच हेतूनें कित्येक महत्वाच्या वैदिक कथांचा ऊहापोह केला आहे.

इन्द्रवृत्रांच्या युद्धाची गोष्ट ही पर्जन्याच्या कल्पनेवर चांगली बसते असा साधारण समज आहे; म्हणून तीच आतां प्रथम घेऊं. इंद्रवृत्रांचें युद्ध हें वेदांत चार प्रकारें वर्णिलेलें आहे. १ ला प्रकार, **वृत्रतूर्य**, म्हणजे नमुचि, शुष्ण, शंबर, वल, पिप्रु, कुवय इत्यादि निरनिराळीं नांवें असलेल्या वृत्रांशीं झालेलें इन्द्राचें युद्ध. २ रा प्रकार, **अपतूर्य** किंवा पाण्यासाठीं केलेलें युद्ध; यांत वृत्राला मारल्यावर 'सिन्धवः' किंवा 'आपः' मोकळ्या होतात; ऋग्वेदांत इंद्राला **अप्सुजित्** (पाण्यांत जिंकणारा) असें म्हटलें असून, वृत्र त्या पाण्याला गराडा घालून बसल्याचें (अपः परिशयानम्) वर्णन केलें आहे. ३ रा प्रकार, **गविष्टि** म्हणजे गाईंच्या शोधासाठीं झालेलें युद्ध. आणि ४ था प्रकार, **दिविष्टि**, ऊर्फ प्रकाशासाठीं झालेलें युद्ध; वृत्राला मारिल्यावर सूर्य आणि उषा यांना इंद्र वर आणितो असें ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं सांगितलें आहे. इन्द्रवृत्रांच्या युद्धांतील या चारी बाबींचें स्वरूप नीट लक्षांत यावें म्हणून त्यांचें वर्णन करणाऱ्या ऋचांचा सारांश येथें देतों.

इन्द्र आपल्या वज्रानें जेव्हां वृत्रावर प्रहार करतो तेव्हां द्यावापृथिवी भयानें कांपतात. पाण्याला आच्छादून टाकणाऱ्या (अपो वन्रिवासं) किंवा पाण्याभोंवतीं पसरलेल्या (परिशयानमर्णः) वृत्राला इन्द्रानें ठार मारिलें. इन्द्रानें पाण्याला मोकळें केल्यावर तें वृत्राच्या गुप्त ठाण्यांतून बाहेर पडून त्याला गुरफटून टाकितें. वृत्राचे ९९ किल्ले (पुरः) फोडून इन्द्रानें त्याला ठार केलें. तमामध्यें युद्धाची इच्छा करणाऱ्या शुष्णाला त्यानें असूर्य अशा तमांत ठार केलें. इंद्राच्या मदतीनें बृहस्पतीनें समुद्राला झोंकून देऊन गाईंचा गोठा (गवां गोत्रं) मोकळा केला. वृत्राला मारल्यावर त्याचें शरीर दीर्घ तमामध्यें पडून राहिलें (दीर्घं तम आशयदिंद्रशत्रुः). वृत्रानें वेढून टाकिलेला समुद्र (अर्णः) तमानें वेष्टिलेला असून (तमसा परिवृतम्) सूर्य ज्याचें अधिरोहण करितो तो समुद्र तेजस्वी आहे (शुक्रमर्णः). मायावी नमुचीला इन्द्रानें दूरच्या प्रदेशांत (परावति) मारिलें. इन्द्रानें अर्बुदाला हिमानें मारिलें. गाई परत मिळविण्यासाठीं इन्द्राला मदत करतांना अंगिरसांनीं वलाला वर्षाच्या शेवटीं (परिवत्सरे) ठार केलें. वृत्राचीं पुरें पाषाणाचीं किंवा लोखंडाचीं (अश्मन्मयीः आयसीः पुरः) असून तीं शारदीय (पुरो यदिंद्र शारदीरवातिरः) आहेत.

वृत्राला मारल्यावर गाई, सूर्य, आणि उषा यांना वाट होते, अशा प्रकारचें वर्णनही ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं आलें आहे. २,१९,३ यांत 'इंद्रानें समुद्राच्या पाण्याला मोकळें करून सूर्याला उत्पन्न केलें, आणि गाई मिळविल्या' असें म्हटलें आहे. दुसऱ्याही कित्येक ठिकाणीं असेंच वर्णन आहे. इंद्रानें अहीला मारल्यावर सुरू केलेल्या नद्या वर वाहूं लागल्या (सोदंचं सिंधुमरिणात्) असें २,१५,६ यांत म्हटलें आहे.

आतां, या सर्व वर्णनांत पर्वत, गिरि, अद्रि, ऊधस् (ओंटी, कांस) उत्स (झरा), कबंध, कोश वगैरे जे शब्द आलेले आहेत त्या सर्वांचा अर्थ निरुक्तकारांनीं मेघ असा केला आहे; व तो पाश्चात्य पंडितांनींही मान्य केला आहे. तसेंच गो हा शब्द साधारणपणें गाईचा वाचक असूनही त्याचा अर्थ पाणी असा त्यांनीं केला आहे. वृत्राशीं होणाऱ्या युद्धांत बहुधा मरुत् हे इंद्राचे सहाय असतात; तरी कित्येक प्रसंगीं विष्णु, अग्नि, आणि बृहस्पति यांनींही वलाच्या लडाक्यांतून गाई सोड-

विण्यांत इन्द्राला मदत केली आहे. या गोष्टींचीं दुसरींही कित्येक स्वरूपें ऋग्वेदांत आढळून येतात; पण प्रस्तुत विषयाला आतांपर्यन्त झालेलें विवेचन पुरें आहे.

हें इंद्रवृत्रांच्या युद्धाचें वर्णन वाचणारास असें सहज दिसून येईल कीं, वृत्राला मारल्याबरोबर एकदम चार गोष्टी घडून येतात. त्या अशाः—१ ली गाई मोकळ्या होणें, २ री पाणी वाहूं लागणें, ३ री उषा उत्पन्न होणें आणि ४ थी सूर्य वर येणें. एकसमयावच्छेदेंकरून घडून येणाऱ्या या चार गोष्टींचा पर्जन्याच्या कल्पनेवर उलगडा होतो कीं काय हें आतां पहाणें आहे. वृत्र म्हणजे मेघ असें समजल्यावर त्याला वज्रानें फोडून त्यांत असलेलें पाणी इंद्र बाहेर काढतो हें म्हणणें ठीक आहे. पण या पाण्याबरोबरच मोकळ्या होणाऱ्या गाई कोठल्या? गाई म्हणजे पाणी असें निरुक्तकारांप्रमाणें समजल्यास त्या दोन वस्तु भिन्न नव्हत असें होतें. पण पाण्याबरोबर उषा व सूर्य हीं कशीं वर येतात हें समजणें फार कठीण आहे. ढग कित्येक वेळां क्षितिजाजवळ दिसत असतात; पण एवढ्यावरून त्यांना फोडून इन्द्रानें सूर्याला वर काढिलें असें म्हणणें वेडेपणाचें आहे. या चार गोष्टींपैकीं पाणी मोकळें होणें ही गोष्ट प्रधान समजून निरुक्तकारांनीं कदाचित् दुसऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष केलें असेल. कित्येक पाश्चात्य पंडितांनां तर या चार एकदम घडून येणाऱ्या गोष्टींचा नीट उलगडा करतां न आल्यामुळें आपलें अज्ञान झांकण्यासाठीं त्यांनीं "वैदिक ऋषींनीं कल्पनांचा घोटाळा केला आहे" असें म्हणून सर्व दोष वैदिक ऋषींच्या डोक्यावर टाकला आहे.

इन्द्रवृत्रांच्या युद्धांतील एवढ्याच बाबी पर्जन्याच्या कल्पनेवर जुळत नाहींत असें नाहीं. मागें एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें वृत्रवधाचें स्थान दूरच्या प्रदेशांत (परावति) असून तेथें भयंकर तम (असूर्यं तमसि) आहे. तसेंच इन्द्रानें नमुचीला मारून देवयान मार्ग मोकळे केले असें ऋ. १०,७३,७ यांत म्हटलें आहे. अवेस्ता या पारशी ग्रंथांतही अपौशाला मारिल्यावर तिश्ट्रय मश्दाच्या मार्गांत संचार करतो असें वर्णन आलें आहे. वृत्राचें आश्रयस्थान गुत (निण्य) आणि जलावृत असें रजस्च्या तळाशीं आहे, असें ऋ. १, ५२, ६ यांत सांगितलें आहे. वृत्र म्हणजे मेघ असेंच केवळ समजल्यास यांपैकीं कोणत्याच गोष्टीचा चांगला उलगडा

होत नाहीं. ऋग्वेदांत परावत् व अरावत् (जवळचा) आणि देवयान व पितृयाण अशा विरोधी शब्दांच्या जोड्या आलेल्या आहेत. देवयान म्हणजे उत्तर खगोलार्ध. आतां वृत्रवधाचें स्थान ढगांत होतें असें धरल्यास तें परावति किंवा देवयानाच्या द्वाराशीं होतें असें कसें म्हणतां येईल ? वर दिलेल्या वचनांत वर्णन केल्याप्रमाणें पाहिल्यास तमानें परिवृत झालेल्या पलीकडच्या समुद्रांत म्हणजे ज्यांतून सूर्य सकाळीं वर येतो, त्यांत वृत्राला मारिलेलें आहे. हें वर्णन दक्षिणगोलार्धरूपी खालच्या लोकालाच लागू पडणारें असून ढगांना लागू पडणारें नव्हे. इन्द्राचा पर्जन्याशीं कांहीं संबंध नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं; पण वृत्रहन् असा जो इन्द्र तो वर दिलेलीं वैदिक वचनें लक्षांत घेतां केवळ पर्जन्यदेवता असणें संभवनीय दिसत नाहीं.

वृत्राच्या कथेच्या प्रचलित अर्थावर तिसरा आक्षेप असा आहे कीं, त्याचा काल सांगणाऱ्या वचनांचा अर्थ त्यावरून समाधानकारक असा लागत नाहीं. पर्जन्याच्या कल्पनेप्रमाणें पाहिल्यास हें युद्ध वर्षाकालांत झालेलें पाहिजे. पण जे वृत्राचे किल्ले (पुरः) इन्द्रानें फोडले ते शारदीय होते. यावर असें म्हणणें येईल कीं, पूर्वी वर्षा व शरद् हे दोन ऋतु-मिळून एक ऋतु समजून त्या सगळ्याला शरद् असें नांव दिलेलें असेल. पण असें मानिलें तरी त्यावर दुसरी अडचण येतेच; कारण, हें युद्ध संवत्सराच्या शेवटीं झालेलें आहे (ऋ. १०,६२,२). इन्द्राचें अर्बुदाला मारण्याचें शस्त्रहीं हिम (बर्फ) होतें. शिवाय या युद्धानंतर उषेची प्राप्ति कशी होते व हें युद्ध काळोखांत कां झालें हें त्याचा काळ वर्षाऋतूंत होता असें मानिल्यास गूढच रहातें. तात्पर्य, यांपैकीं कोणत्याच गोष्टीचा पर्जन्याच्या कल्पनेनें उलगडा होत नाहीं.

पर्जन्याच्या कल्पनेवर चवथा आक्षेप आणखी असा आहे कीं, पर्वत, गिरि, अद्रि या शब्दांचा मेघ असा मुख्य किंवा गौण असा कोणताच अर्थ नसतांना केवळ रूपकानें तो तसा घ्यावा लागतो. पण हा अर्थ कित्येक ठिकाणीं फार अप्रयोजक दिसतो. तरी आजपर्यंत दुसऱ्या कांहीं चांगल्या कल्पनेच्या अभावीं तो तसाच घेत आले आहेत.

येणेंप्रमाणें पर्जन्याच्या कल्पनेवरील आक्षेप आहेत. त्यांचा नीट विचार केल्यास पर्जन्याच्या कल्पनेचा कमकुवतपणा स्पष्ट दिसून येईल.

तिच्यावरून इंद्रवृत्रांच्या युद्धानंतर एकसमयावच्छेदेंकरून घडून येणाऱ्या चार गोष्टींचा, तसाच त्या युद्धाच्या कालाचा व स्थानाचा मुळींच उलगडा होत नाहीं. तरीपण आमच्या प्राचीन निरुक्तकारांपासून अद्यापपावेतों या कथेचें मूळ पर्जन्यच होय असें मानीत आले आहेत. इन्द्रवृत्रांच्या युद्धांत दिसून येणाऱ्या चार गोष्टींपैकीं पाण्याची सुटका होणें या गोष्टीचा उलगडा पर्जन्याच्या कल्पनेवर होतो; व गाई म्हणजे पाणी असें निरुक्तकारांप्रमाणें समजल्यास दोन गोष्टींचा होतो; उरलेल्या दोन गोष्टी उषेच्या कल्पनेवर जुळण्यासारख्या आहेत. पण कोणत्याही एकाच कल्पनेवर चारी गोष्टींचा कांहीं उलगडा होत नाहीं. म्हणून त्यांपैकीं पहिल्या गोष्टीला प्राधान्य देऊन आपल्या निरुक्तकारांनीं 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः' या न्यायानें, इंद्र हा पर्जन्यदेवता आहे या कल्पनेशीं जुळतील तेवढ्या गोष्टी जुळवून बाकीच्यांकडे दुर्लक्ष केलें. इंद्रवृत्रांच्या युद्धाचा उलगडा करणारी याशिवाय दुसरी कल्पना आजमितीस प्रचलित नाहीं. ही कल्पना अगदीं अपुरी असल्यामुळें, दुसऱ्या एखाद्या कल्पनेनें जर या सर्व गोष्टींचा उलगडा होत असेल, तर ही पर्जन्याची कल्पना सोडून द्यावयास कोणालाही हरकत वाटणार नाहीं.

इंद्रवृत्रांचें युद्ध म्हणजे मूळ पर्जन्यदेवता व मेघ यांमधील झगड्यावरील रूपक आहे असें मानणेंच मुळीं आमच्यामतें चुकीचें आहे. हें युद्ध मूळ प्रकाश व काळोख यांमधील लढाई होय हें ऐतरेय ब्राह्मणावरून (४–५, पान १६७ पहा) उघड होत आहे. इंद्र हा प्रकाशाची देवता आहे, ही गोष्ट ऋग्वेदांतील अनेक वचनांवरून सिद्ध करतां येईल. 'इन्द्र ज्योति (प्रकाश) मिळविता झाला'* (३, ३४, ४), 'अंधतमांत प्रकाश मिळविता झाला' (१,१००,८), 'ज्यानें सूर्याला व उषेला उत्पन्न केलें तो† इंद्र' (२,१२,७;), 'सूर्याला मार्ग करून देणारा' पथिकृत्सूर्याय १०,१११,३), इत्यादि इंद्राचें वर्णन ऋग्वेदांत आलें आहे. या वचनांत वृत्रयुद्धाचा संबंधही आलेला नाहीं. असें

---

* अविंदज्ज्योतिः (३,३४,४); ज्योतींषि विवेदिथ (८,१५,५); विदज्ज्योतिः (१०,४३,४).

† यःसूर्यं य उषसं जजान यो अपां नेता स जनास इंद्रः । ऋ. २,१२,७.

असतां त्याच इन्द्राचें वृत्राशीं युद्ध होऊन पाणी मोकळें होतें व उषेलाही वाट मिळते ती कशी, हें सांगणें हीच काय ती मुख्य अडचण आहे. ही अडचण आजपर्यन्त प्रचलित असलेल्या कोणत्याही कल्पनेनें नाहींशी होत नाहीं. यासाठीं त्या कल्पना खोट्या म्हणून म्हणण्यापूर्वी वेदांत वर्णन केलेल्या पाण्यांचें स्वरूप तरी काय आहे याचा थोडा विचार करूं.

वृत्रवधानंतर पाणी वाहूं लागलें असें सांगणाऱ्या वचनांत मेघांचा स्पष्ट उल्लेख कधींही केलेला नाहीं. पाण्याला अडवून धरलेलें ठिकाण दर्शविण्यासाठीं 'पर्वत, गिरी' इत्यादि शब्दांचा व पाणी दर्शविण्यासाठीं 'आपः' किंवा 'सिंधवः' या शब्दांचा त्यांत उपयोग केलेला आहे. 'आपः' शब्द ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं आला असून त्यांत बऱ्याच ठिकाणीं दिव्य ऊर्फ आकाशांतील जलें असा त्याचा अर्थ आहे. "ज्या सूर्याजवळ आहेत, व सूर्य ज्यांच्याजवळ आहे" असें त्यांच्यासंबंधानें ऋ० १,२३,१७ यांत म्हटलें आहे. ७,४९,२ यांत 'दिव्याः आपः' व 'खनित्रिमाः आपः' म्हणजे आकाशांतील जलें व नद्यांतून वहाणारीं जलें असा स्पष्ट भेद केलेला असून त्यांचें उद्दिष्टस्थान (अर्थ) समुद्र आहे (समुद्रार्था) असें सांगितलें आहे. ऋ. ८,६९,१३ यांत 'सप्तसिंधु वरुणाच्या मुखांत पडतात' असें म्हटलें आहे. इंद्राप्रमाणें वरुणही नद्यांस वहावयास लावितो (२,२८,४) असें वर्णन आहे. आपल्या अर्थाकडे जाणाऱ्या 'आपः'चा दीर्घतमा सारथि झाल्याचें मागें सांगितलेंच आहे. पण या 'दिव्याः आपः'चें खरें स्वरूप काय आहे हें आजपर्यंत नीट न समजल्यामुळें उषेच्या उदयाशीं हीं जलें मोकळीं होण्याचा संबंध कसा पोहोंचतो हें पंडितांस समजलें नाहीं. 'दिव्या आपः' म्हणजे केवळ पावसाचें पाणी इतकाच अर्थ ते बहुधा समजतात. पण ही चूक आहे. कारण, ऋ. १०,८२,६; १२९,३ यांत जगाच्या उत्पत्तीसंबंधानें सांगतांना 'पूर्वी सर्वत्र तम व तमानें झांकलेलें अज्ञात (अप्रकेत) जल होतें,' असें सांगितलें * आहे. शतपथ ब्राह्मण, ऐतरेय उपनिषद्, मनुस्मृति इत्यादि ग्रंथांत हें जग पाण्याच्या वाफांपासून उत्पन्न झालें असें म्हटलें आहे. अर्थात् दिव्य जलांचें स्वरूप वैदिक ऋषींच्या पूर्वजांस

---

* तम आसीत्तमसा गूळ्हमग्रेऽप्रकेतं सलिलं सर्वमा इदम्। ऋ.१०,१२९,३.

चांगलें माहीत होतें, हें उघड होतें. या दिव्य जलांपासून सर्व सृष्टि झाली असा त्यांचा समज असल्यामुळें अर्वाचीन शास्त्रज्ञांच्या विश्वांतील सर्व जागा व्यापून टाकणाऱ्या ' ईथर ' नांवाच्या अति विरल पदार्थाप्रमाणेंच वैदिक ऋषींच्या या ' दिव्याः आपः ' होत असेंही म्हणतां येईल. पण इतकें खोल जाण्याचें आपल्याला कारण नाहीं. दिव्य जलें अथवा पुरीष (पाण्याची वाफ) यांचें वर्णन ऋग्वेदांत आहे; व अंतरिक्ष, खालचा लोक, आणि सभोंवतालच्या सर्व दिशा त्या ' आपांनीं ' भरलेल्या होत्या असें वैदिक ऋषींचें मत होतें; इतकें समजलें म्हणजे आपलें काम झालें.

पण वैदिक ऋषींना ' खालच्या लोकाची' मुळींच कल्पना नव्हती असें कित्येक पाश्चात्य पंडितांचें मत आहे. ते असें म्हणतात कीं, रात्री दिवसा सूर्याचें फिरणें वगैरे सर्व गोष्टी डोक्यावरील आकाशांतीलच होत. परंतु हें म्हणणें साधार दिसत नाहीं. ऋ ६,९,१ यांत ' कृष्ण आणि तेजस्वी दिवस दोन्ही रजांचें (लोकांचें) प्रसिद्ध मार्गांनीं विवर्तन करितात. ' असें सांगितलें आहे. यांत दोन रजें म्हणजे उघडच वरचा व खालचा असे लोक होत. ५,८१,४ यांत 'हे सवित्या, तूं दोन्ही बाजूनीं रजनीच्या भोंवतीं फिरतोस (रजनीमुभयतः परीयसे) ' असें म्हटलें आहे. याहूनही स्पष्ट वचनें ऋग्वेदांत आहेत. ७,१७४,११ यांत " रिपु तीन पृथ्वींच्या खालीं जावो " अशी प्रार्थना केली आहे. त्यांत 'तिस्रः पृथिवीरधः' असे शब्द घातलेले आहेत. शत्रु तेथें जाऊन पडो यांचा भावार्थ तो प्रदेश दुःखमय असला पाहिजे असा उघड दिसतो. पुनः १०,१५२,४ यांत ' जो आम्हांला त्रास देईल तो खालच्या तमोमय प्रदेशांत जावो ' (अधरं गमया तमः) अशी इन्द्राची प्रार्थना केलेली आहे. ' आमचा जो द्वेष करतो तो खालीं जाऊन पडो ' (यो नो द्वेष्ट्यधरः सस्पदीष्ट, २,२३,२१); ' जो दासाच्या वर्णाला खालच्या गूढ प्रदेशांत टाकता झाला ' (यो दासं वर्णमधरं गुहाकः २,१२,४) इत्यादि वचनांवरूनही अंधारमय अशा पृथ्वीच्या खालच्या प्रदेशाची वैदिक ऋषींची कल्पना स्पष्ट दिसून येते. पृथ्वीच्या खालीं म्हणजे केवळ पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या आंत असा अर्थ घेतां येत नाहीं. कारण तसें असतें तर तीन्ही पृथ्वींच्या खालीं असें म्हणण्याचें कारण नव्हतें. ही गोष्ट दुसऱ्याही एका प्रमाणावरून दिसून येईल. **तिस्रः पृथिवीरधः** याच्या उलट ' तिस्रःपृथिवी

रुपरि ' (तीन पृथ्वींच्या वर) हीं पदें येतील. आणि खरोखरच अशीं पदें ऋग्वेदांत आलेलीं आहेत. १,३४,८ यांत * ' हे अश्विनहो तुम्ही तिन्ही पृथ्वींच्या वरच्या प्रदेशांतून रात्रंदिवस स्वर्गलोकाचें रक्षण करतां. ' असें म्हटलें आहे. पृथ्वीचा त्रिप्रकार भेद ऋग्वेदांत दुसऱ्या अनेक ठिकाणीं आला असून (१,१०२,८;४,५३,५;७,८७,५), अवेस्त्यांतही तो सांगितला आहे. ऋ. ४,५३,५ यांत तर हा त्रिप्रकार भेद अंतरिक्ष, रजस, रोचन, आणि द्यौ यांनाही लाविलेला आहे, व यावरून तीन पृथिवी म्हणजे काय हें समजून येईल. एकच पृथ्वी तीन प्रकारची मानिली आहे. तिन्ही पृथ्वींच्या वर राहून अश्विन स्वर्गाच्या द्वाराचें रक्षण करतात, यावरून त्या प्रदेशाच्या उलट असलेला खालचा प्रदेश म्हणजे काय याची चांगली कल्पना होईल. हा खालचा प्रदेश म्हणजे पृथ्वीच्या पोटांतील नसून सर्व पृथ्वीच्या खालचा होय. 'तीन पृथ्वीच्या खालीं' आणि ' तीन पृथ्वींच्या वर ' असे स्पष्ट शब्द ऋग्वेदांत असतांना पृथ्वींच्या खालच्या प्रदेशाची वैदिक ऋषींना माहिती नव्हती हें म्हणणें टिकणार नाहीं.

रजस्चे ' पार्थिवं रजः, ' ' दिवो रजः ' आणि ' परमं रजः ' असे तीन भेद असून त्यांत पहिलें पृथ्वीचें व दुसरें आकाशाचें असून, तिसऱ्या सर्वांत उंच अशा रजामध्यें पाण्याचें स्थान आहे असें सांगितलें असल्यामुळें पृथ्वीच्या खालच्या प्रदेशाला या त्रिप्रकार रजोविभागांत जागाच नाहीं असा कित्येकांचा आक्षेप आहे. पण या आक्षेपांत कांहीं अर्थ नाहीं. कारण तीन रजांप्रमाणेंच सहा रजेंही १,६४,६ यांत सांगितलीं आहेत (षळिमा रजांसि). ' सविता कृष्ण रजांतून (कृष्णेन रजसा) वर येतो ' (१,३५,२), ' सविता परावताहून (दूर ठिकाणाहून) वर येतो ' (आ देवो याति सविता परावतः १,३५,३), या वाक्यांवरून कृष्ण रजस् व परावत् हे शब्द समानार्थक असावेत असें दिसतें. सूर्य समुद्रांतून वर येतो (७, ५५, ७) व मावळतांना समुद्रांत जातो (१०,११४,४) असें जें वर्णन आहे त्यावरून हा समुद्र म्हणजे पृथ्वीच्या खालचाच असला पाहिजे असें स्पष्ट दिसतें. निर्ऋतीच्या मांडीवर निजलेला (सुषुप्वांसं निर्ऋतेरुपस्थे, १,११७,४) आणि तमांत असलेला (तमसि क्षियन्तम्)

---

* तिस्रःपृथिवीरुपरि प्रवा दिवो नाकं रक्षेथे द्युभिरक्तुभिर्हितम् ॥ ऋ.१,३४,८.

असें सूर्याचें वर्णन ऋग्वेदांत आलें आहे. ' द्यौ व पृथ्वी यांच्या आंत फिरल्यावर सूर्य निर्ऋतींत प्रवेश करिता झाला ' असें ऋ. १,१६४,३२ यांत सांगून, १०,११४,२ यांत तीन निर्ऋती (तिस्रो निर्ऋतीः) सांगितल्या आहेत. या तीन निर्ऋती म्हणजे वरच्या तीन लोकांप्रमाणें पृथ्वीच्या खालचे तीन लोक होत. १०,१६१,२ यांत ' निर्ऋतीचें उपस्थ ' याचा मृत्युप्रदेश असा अर्थ आहे. " पुरूरवा दूरच्या प्रदेशांत जाऊन तेथें निर्ऋतीच्या उपस्थावर शयन करता झाला " असें, १०,९५,१४ यांत सांगितलें आहे. मरुत् हे अवंश अशा निर्ऋतीमधून आकाशांत चढतात असें ७,५८,१ यांत म्हटलें आहे. या सर्व वचनांवरून निर्ऋति ऊर्फ मृत्युप्रदेश याला पश्चिमेस सुरवात होते व तिच्या मांडीवर निजणारा सूर्य पुनः पूर्वेस उगवतो हें उघड सिद्ध होतें. म्हणजे ही निर्ऋति पृथ्वीच्या वरचा भाग नसून पश्चिमेपासून पूर्वेपर्यंत पसरलेला जो पृथ्वीच्या खालचा प्रदेश तोच होय. ऋग्वेदांत याविषयीं वर सांगितलेलीं स्पष्ट वचनें असल्यामुळें वैदिक ऋषींना खालच्या लोकाची कल्पना नव्हती असें म्हणतां यावयाचें नाहीं.

दुसऱ्याही कित्येक ऋग्वेदवचनांवरून ही गोष्ट सिद्ध होते. **रजसी** या द्विवचनी शब्दाप्रमाणें **उभौ अर्धौ** असा आणखी एक द्विवचनी शब्द ऋग्वेदांत आला आहे. २,२७,१५ यांत या दोन अर्धांची कल्याणप्रद (साधू) होण्याविषयीं प्रार्थना केली आहे. हीं दोन अर्धें म्हणजे पृथ्वी व आकाश असें कांहीं जण समजतात. पण ही चूक आहे. कारण आकाशाचाच **पर** व **उपर** असा भेद १,१६४,१२ यांत केला आहे. यापुढें १७ व्या ऋचेंत ' वत्साला घेऊन गाय **पराच्या** खालीं व **अवराच्या** वर दिसूं लागली ' असें सांगून पुढें ' ती कोणत्या अर्धांत (कस्विदर्धे) निघून गेली ' ? असा प्रश्न विचारला आहे; त्यावरून हें अर्ध म्हणजे पृथ्वी किंवा आकाश नव्हे हें उघड आहे. अथर्ववेदांत (१०,८,७) या दोन अर्धांचा उल्लेख करून म्हटलें आहे कीं, 'प्रजापतीनें एका अर्धानें जग निर्माण केलें; पण दुसऱ्या अर्धाचा मागमूस लागावयाला कांहीं खूण आहे काय ' ? यांत दुसरें अर्ध म्हणजे पृथ्वी नव्हे हें सहज दिसून येईल. खालचा व वरचा लोक दर्शविणारा आणखी एक ' समुद्रौ ' असा शब्द ऋग्वेदांत (१०,१३६,५) आहे. यांतील एक समुद्र अलीकडच्या

बाजूला असून दुसरा पलीकडच्या बाजूला आहे (७,६,७). शुक्ल व कृष्ण अर्णांविषयीं मागें उल्लेख केलाच आहे. या दोन समुद्रांसंबंधानें **अवस्तात्** आणि **परस्तात्** असेही शब्द आलेले आहेत. ८,८,१४ यांत 'परावत्' प्रदेशाचा 'अंबराशीं' (आकाश) विरोध दाखवून, ३,५५,६ यांत सूर्य 'परस्तात्' प्रदेशांत शयन करतो असें सांगितलें आहे. तर येणेंप्रमाणें **परावत्** व **अर्वावत्** ही जोडी, 'रजसी,' 'अर्धौ' 'समुद्रौ' या शब्दांनी दर्शविलेली असून जेव्हां दोन्ही खगोलार्धें उद्दिष्ट असतील तेव्हां उभयतः शब्द घातला आहे. ३,५३,५ यांत "हे मघवन्, हे बंधो इन्द्र ! पलीकडे (परा) जा आणि पुनः इकडे ये, (कारण) तुझें दोहोंकडे काम (उभयत्र ते अर्थं) आहे" असें म्हटलें आहे.

अशा प्रकारचीं इतकीं हीं वचनें आपल्यापुढें असतां वैदिक ऋषींना खालच्या खगोलार्धाची माहिती नव्हती हें म्हणणें जुळणार नाहीं. शिवाय हें म्हणणें प्रथमदर्शनींच संभवनीय दिसत नाहीं. वैदिक ऋषींना व्यवहाराला पुरेसें चंद्रसूर्यांच्या गतीचें गणित करितां येत होतें ही गोष्ट आतां सुप्रसिद्ध आहे. इतकें ज्ञान ज्यांना होतें त्यांना 'आकाश हें क्षितिजाजवळ पृथ्वीला चिकटविलें आहे व सूर्य सायंकाळीं खालून न जातां वरच्च कोठें तरी गडप होतो' असें वाटणें शक्य नाहीं. ऐतरेय ब्राह्मणांतील एका वाक्यावरून (३,४४) कांहीं जणांनीं तसें अनुमान काढलें आहे. पण तें वाक्य अस्पष्ट असून त्यावरून तसें स्पष्ट अनुमान निघत नाहीं. पाश्चात्य पंडितांनीं आपल्या स्वतःकडील कल्पना वैदिक ऋषींवर लादण्याचा प्रयत्न केल्यामुळें हा घोटाळा झालेला आहे. आतांच्या इतकें सूक्ष्म ज्योतिषज्ञान वैदिक ऋषींना नसेल, आणि म्हणून त्यांनीं "सूर्य आतां (मावळल्यावर) कोठें आहे आणि त्याचे किरण कोणत्या द्यौला प्रकाशित करतात ?" असा प्रश्न विचारला आहे (१,३५,७). पण त्यावरून आतांपर्यंत केलेल्या विवेचनाला मुळींच बाध येण्यासारखा नाहीं.

वैदिक ऋषींना खालचा लोक ऊर्फ अधःखगोलार्ध माहीत होतें ही गोष्ट जर लक्षांत आणिली तर **दिव्य आपांचें** स्वरूप व गति यांचा चटकन् उलगडा होईल. सर्व विश्व भरून टाकणारें सूक्ष्म तत्व म्हणजे पाण्याची वाफ, व ही वाफ सारखी पृथ्वीभोंवतीं भ्रमण करीत असल्यामुळेंच सूर्य चंद्र व तारका या पृथ्वीभोंवतीं फिरतात अशी प्राचीन

आर्यांची कल्पना होती. या कल्पनेवर बऱ्याच वैदिक कथांचा उलगडा होणार आहे. या पाण्याच्या ओघांस "आकाशांत वाहत असून शेवटीं वरुणाच्या मुखांत पडणाऱ्या नद्या" असें ह्मटलें आहे (८,६९,१२). अधः खगोलार्ध हें पाण्याचें वास्तव्यस्थान असून वरुणाचें राज्य, यमाचें राज्य व वृत्राचें गुप्त (निण्यं) घर हीं सर्व त्यांतच आहेत. या पाण्याच्या गतीचें वर्णन पारशी धर्मग्रंथांत फार स्पष्ट रीतीनें केलेलें आहे. त्यांत ह्मटलें आहे "**वौरुकश** समुद्र पाण्याचें निधान आहे, तर उठा वायुमार्गानें वर जाऊन खालीं पृथ्वीवर या; आणि पुनः वायुमार्गानें वर जा. उठा व वाहूं लागा. ज्याच्या उगवण्यानें अहुरमज्दानें वायुमार्ग सुरू केला, अशा (सूर्या) ऊठ आणि फिरूं लाग. हे जवाश्व सूर्या तुला 'गरोन्मानेम' मध्यें रहावयाचें आहे व मज्दाच्या आणि देवांनीं सुरू केलेल्या जलमार्गानें जावयाचें आहे, तर पृथ्वीवर उगवून तीवर प्रकाश कर." या वर्णनांत 'वौरुकश' समुद्रांतून निघून हीं दिव्य जलें आकाशांत जातात व पुनः खालीं जाऊन दुसरी प्रदक्षिणा सुरू करितात असें ह्मटलें आहे. हीं जलें व प्रकाश एकाच ठिकाणापासून निघतात. ऋग्वेदांतही हीं जलें देवांनीं केलेल्या मार्गानें जातात (७,४७,३ देवानामपि यन्ति पाथः) असें ह्मटलें आहे. अवेस्त्यांतील जलांप्रमाणें ऋग्वेदांतील आपः सुद्धां समुद्राकडे गमन करणाऱ्या असून वायुमार्गानें जाऊन शेवटीं वरुणाच्या मुखांत जातात. पण अवेस्त्यांत एक विशेष सांगितला आहे. तो हा कीं, त्यांत जवाश्व सूर्याला या आकाशांतील जलांच्या मार्गानें जावयास सांगितलें आहे. अवेस्त्यांत एके ठिकाणीं **आर्द्वि सूर अनाहित** नांवाची नदी **हुकैर्य** पर्वताच्या शिखरावरून **वौरुकश** समुद्रांत जोरानें वहात जाते असें वर्णन आहे. ऋग्वेदांतील **सरस्वती** नदीसंबंधानेंही असेंच वर्णन आहे (५,४३,११). या दोन्ही नद्या आकाशांतील असून खालीं आल्यावर पृथ्वीवरील नद्यांना त्या भरून टाकितात असें ह्मटलें आहे. पृथ्वीवरील सर्व पदार्थांना रसाचा पुरवठा पर्जन्याच्या द्वारें या दिव्य जलांकडूनच होतो. पारशी ग्रंथांत आणखी असें ह्मटलें आहे कीं, "पृथ्वी आणि प्रकाशमय आकाश यांच्यामध्यें तारकालोक (यांत जल व वनस्पतींचीं बीजें असतात), चंद्रलोक व सर्वांत उंच असा सूर्यलोक असे तीन लोक आहेत." जलाचें निवासस्थान असें जें उच्चतम रजस्

ऋग्वेदांत सांगितलें आहे त्यावरून पृथ्वीच्या खालचें असें त्याचें निवास स्थान नाहींच असें जें कित्येकांना वाटतें, तसें वाटण्याचें कारण नाहीं. कारण या उच्च प्रदेशांतील जलें तरी खालच्या स्थानांतूनच येतात. **अर्द्वि सूर अनाहित** ही अवेस्त्यांतील नदी तारकालोकांतून वहाते, आणि तिचीं सर्व जलें सूर्यलोकांत जाऊन पृथ्वीवर अवर्षण होऊं नये म्हणून तिची यज्ञ करून पूजा करावी लागते. ऋग्वेदांतील सरस्वतीही पार्थिव प्रदेश व विस्तृत असें रजस् भरून टाकणारी आहे (आपप्रुषी पार्थिवान्युरू रजो अंतरिक्षं । सरस्वती निदस्पातु ६,६१,११). पण या दोन नद्यांतील विशेष साम्य झटलें म्हणजे सरस्वतीला ऋग्वेदांत (६,६१,७) 'वृत्रघ्नी' म्हटलें असून **अर्द्वि सूर अनाहित** नदीनें **थाएतौनाला** (ऋ. त्रित आप्त्य) **अझी दहाक** नामक त्रिशीर्ष राक्षस तुझ्या हातून मरेल असा आशीर्वाद दिलेला आहे. ही गोष्ट म्हणजे ऋग्वेदांतील 'त्रित आप्त्या' च्या गोष्टीचेंच बहुतेक रूपांतर आहे. त्रित आप्त्याला आपल्या पित्याचीं आयुधें मिळाल्यावर व इंद्राकडून प्रेरणा झाल्यावर त्यानें त्वष्ट्याचा मुलगा जो त्रिशीर्ष त्यावर हल्ला करून त्याला ठार केलें, आणि गाई मोकळ्या केल्या. या गोष्टीवरून सरस्वतीरूप दिव्यजलें आणि वृत्रवध यांच्यामधील संबंध स्पष्ट दिसून येतो. सरस्वती ही आकाशांतील नदी नसून पंजाबांतील हल्लींची सरस्वतीच होय असें कित्येक मानतात. पण वर सांगितल्याप्रमाणें अवेस्तिक **अर्द्वि सूर अनाहित** आणि ऋग्वेदांतील सरस्वती यांच्या साम्यावरून ती दिव्य नदीच आहे हें उघड होतें. यज्ञाच्या योगानें तिच्यापैकीं कांहीं जल पृथ्वीवर येऊन त्याबरोबर वनस्पतीचीं बीजेंहीं येतात. या बीजांचा वृक्ष वौरुकश समुद्राच्या मध्यभागीं असून तीं बीजें या दिव्यजलांच्या बरोबर आकाशांत जाऊन पर्जन्याबरोबर पृथ्वीवर येतात असें अवेस्त्यांत सांगितलें आहे. ऋग्वेदांतही (१,२३,२०) अशा प्रकारची कल्पना आहे. दिव्य जलांचें परिभ्रमण हें अशा प्रकारचें आहे. खालचा लोक त्यांचें निवासस्थान असून तो सर्व बाजूंनीं पर्वताच्या योगानें मर्यादित झालेला आहे असें स्पष्ट झटलें आहे. या पर्वतांमधून हीं दिव्यजलें बाहेर आलीं झणजे तीं वरच्या खगोलार्धांत भ्रमण करून व जातां जातां पृथ्वीवर प्रकाश पाडून पुनः वौरुकश समुद्रांत जातात. पण एखादे वेळेस हीं जलें पर्जन्यरूपानें

खालीं न येतां वरच्यावर सूर्यलोकांत जाऊन अवर्षण होण्याची भीति असे. ह्मणून यज्ञादिकांनीं त्याची पूजा करून त्यांचा आशीर्वाद घ्यावा लागे.

वृत्राच्या कथेचा खरा अर्थ लक्षांत यावयाला या दिव्य जलांचें स्वरूप व त्यांची गति यांसंबंधानें प्राचीन आर्यांची कल्पना काय होती हें नीट समजलें पाहिजे. हीं दिव्य जलें व प्रकाश एकाच ठिकाणापासून निघून समान्तर मार्गांचें आक्रमण करितात अशी त्यांची कल्पना होती. नदींतून ज्याप्रमाणें होडी वगैरे वहाते त्याप्रमाणें सूर्यादि खस्थ गोल या दिव्यजलांच्या प्रवाहाबरोबर आकाशांतून वहातात. अर्थात् या जलांना जर कोणी अडवून धरिलें तर भयंकर परिणाम होणें साहाजिक आहे. कारण त्यांचा प्रवाह बंद झाल्यास सूर्य, चंद्र, तारा हीं फिरावयाचीं बंद होऊन सर्व जगत् तमोमय होऊन जाईल, व सर्व व्यवहार बंद पडतील. वृत्राच्या दुष्टपणाचा एवढा मोठा घातक परिणाम होत असे. रजसाच्या तळाशीं (पृथ्वीच्या खालच्या लोकांत) आपल्या गुप्त वाडयांत राहून वृत्र या पाण्यांना अडवून वर येऊं देईना. तेव्हां इंद्राला त्याचा वध करून त्यांनां मोकळें करून द्यावें लागे. पाण्यांची मुक्तता झाल्यावर अर्थातच सूर्यचंद्रादि पुनः उगवूं लागत; म्हणजे याजलांबरोबर उषा, सूर्य व गाई (प्रातःकाल) हींही येत. म्हणून हें युद्ध चार प्रकारचें असणें साहाजिकच आहे. या लढाईंत पर्वतांचें अंग कोणतें व कसें असे हेहीं आतां समजण्यासारखें आहे. खालच्या समुद्राच्या सीमेवर **अल्बुर्झ** उर्फ **हर बेरोझैति** नांवाचा जो पर्वत अवेस्ता ग्रंथांत सांगितला आहे त्यांचीं द्वारें वृत्र आपलें शरीर फुगवून बंद करीत असे, म्हणून वृत्राला मारल्यावर हीं द्वारेंही इंद्राला मोकळीं करावीं लागत. अल्बुर्झ पर्वताला पूर्वेस १८० व पश्चिमेस १८० अशीं द्वारें असल्याचें अवेस्त्यांत सांगितलें आहे. सूर्य चंद्र तारा हीं नित्यशः यांतूनच वर येतात. अर्वाचीन संस्कृत वाङ्मयांत प्रसिद्ध असलेले उदयगिरि व अस्तगिरि याच पर्वताचे अवतार होत. इंद्राला शंबर ज्या पर्वतावर आढळला (२,१२,११), जो पर्वत अंगिरसांनीं फोडला (१,७१,२) व ज्यांत वलानें गाई लपवून ठेविल्या होत्या, तोही पर्वत हाच होय. वृत्रकथेचा हा अर्थ कित्येक पंडितांनां कदाचित् चमत्कारिक

वाटेल. पण या अर्थांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं. जल-प्रवाह व सूर्यादिकांचा उदय यांमधील वर दाखविलेला संबंध कांहीं काल्पनिक नाहीं. वेदांत जरी तो अगदीं स्पष्ट शब्दांनीं सांगितलेला नाहीं तरी ही उणीव पारशी धर्मग्रंथांनीं भरून काढिली आहे. वेदांतील पित्रंचे अवेस्त्यांतील जोडिदार जे 'फ्रवशी' त्यांचे पराक्रम वर्णन करतांनां "त्यांनीं जलांना सुंदर मार्ग दाखवून दिले; कारण तीं बराच वेळपर्यंत न वाहतां एकाच ठिकाणीं थांबून राहिलीं होतीं; तीं जलें मझ्दानें त्यांच्यासाठीं तयार करून नेमून दिलेल्या मार्गांनं वाहूं लागलीं" असें सांगून, पुढें लगेच "त्यांनीं तारका, सूर्य, चंद्र आणि अनंत प्रकाश यांना मार्ग दाखविले, कारण ते दएवांच्या (वैदिक राक्षस) त्रासामुळें न हालतां एकाच ठिकाणीं बराच वेळ थांबून राहिले होते" असें झटलें आहे. या ठिकाणीं प्रकाश व पाणी यांतील संबंध अगदीं स्पष्ट सांगितला आहे. वृत्रकथेचा नीट अर्थ करण्यांत मुख्य अडचण होती ती हा संबंध स्पष्ट दाखवून देण्याचीच होती. पण अवेस्त्यांतील या वर दिलेल्या वाक्यांवरून ती दूर झाली आहे.

अवेस्त्यांत दोन ठिकाणीं हीं जलें वहावयाचीं केव्हां थांबतात तें सांगितलें आहे. हीं दोन्हीं स्थलें महत्वाचीं असल्यामुळें त्यांचें सविस्तर वर्णन केलें पाहिजे. हिंवाळ्यांत मृत झालेल्या मनुष्याची व्यवस्था कशी लावावी असा प्रश्न मझ्दाला केला असतां तो उत्तर देतो "प्रत्येक घरांत मृतासाठीं तीन कट उभारून त्यांत तें प्रेत, दोन रात्री, तीन रात्री, किंवा महिनाभर झणजे पक्षी उडूं लागत, वनस्पती वाढूं लागत, प्रवाह वाहूं लागत आणि वायू पृथ्वीवरील पाणी शुष्क करूं लागेपर्यंत ठेवावें. आणि मग पक्षी उडूं लागले, प्रवाह वाहूं लागले झणजे मझ्दाच्या भक्तानें तें प्रेत सूर्याकडे डोळे होतील असें दक्मावर ठेवावें". या वर्णनांतील प्रवाह वाहणें झणजे काय हें नीट समजून घेतलें पाहिजे. या प्रवाहाचा संबंध सूर्याच्या उदयाशीं आहे. हे प्रवाह व सूर्यचंद्रादि गोल हिंवाळ्यांत चालावयाचे थांबत; झणून मझ्दाच्या भक्तानें मृत शरीराची व्यवस्था लावणें ती हे प्रवाह सुरू होऊन सूर्य उगवेपर्यंत—मग तो काळ दोन रात्रींचा असो तिहींचा असो अथवा महिन्याचा असो—लावूं नये असें सांगितलें आहे. हा काळ हिंवाळ्याचा असून तो दोन रात्रीं-

पासून महिन्यापर्यंतच्या अखंड काळोखाचा असला पाहिजे. कारण सूर्य-किरण प्रेतावर पडल्याशिवाय तें शुद्ध होत नाहीं असें मझ्दाच्या पूजकांचें मत होतें. हा काळ अखंड काळोखाचा असल्या शिवाय प्रेतांचें काय करावें असा प्रश्न उपस्थित होणेंच संभवनीय नाहीं. समशीतोष्ण किंवा उष्ण कटिबंधांत रहाणाऱ्या मझ्दभक्ताला ही अडचण उत्पन्न होणार नाहीं. कारण तेथें रात्रीचें महत्तम मान २४ तासांपेक्षां कमी असतें. काळोखांत प्रेताची व्यवस्था लावावयाची नाहीं असा पक्का निर्बंध असल्याशिवाय महिनाभर प्रेतासारखी घाणेरडी वस्तु कोणी घरांत ठेवावयास सांगणार नाहीं. ह्मणून जरी वरच्या वर्णनांत काळोखाचा स्पष्ट उल्लेख आलेला नाहीं तरी तो उद्दिष्ट आहे हें उघड आहे. पण दुसऱ्या ठिकाणीं हा काळोखाचा उल्लेख स्पष्ट आहे. या ठिकाणीं मझ्दाला असा प्रश्न विचारला आहे कीं, "जर भक्ताच्या घरांत एकादा कुत्रा किंवा मनुष्य मेला व जर तेव्हां पाऊस किंवा बर्फ पडत असेल, किंवा माणसें व जनावरें वाट चुकतील असा **काळोख** येत असेल तर भक्तानें काय करावें" ? त्यावर मझ्दाचें उत्तर पुनः पूर्वी प्रमाणेंच आहे. या वर्णनांत पाऊस किंवा बर्फ यांच्या बरोबरच्च काळोखही सांगितला आहे. त्यावरून हिंवाळा हा प्रवाह बंद होण्याचा किंवा सूर्य चालावयाचा थांबण्याचा काल होता हें उघड होतें. या काळांत सूर्य एक सारखा क्षितिजाखालीं असल्यामुळें अखंड काळोख असे. ह्मणून तेव्हां एकादा मनुष्य मेल्यास त्यांचें प्रेत जलप्रवाह सुरू होऊन सूर्य उगवेपर्यंत तसेंच घरांत ठेवावें लागे. दक्षिणायनांत मरण येणें हें वाइट आहे अशी जी आपल्याकडे कल्पना आहे तिचें मूळही या उत्तर ध्रुवावरच्या दीर्घ रात्रींतच आहे हें मागें दर्शविलें आहेच. ऋग्वेदांत (१, १०६, ६) 'काटांत पडलेला कुत्स वृत्रहन् अशा इन्द्राला रक्षण करण्याकरितां बोलाविता झाला' असें म्हटलें आहे, त्यांत आलेला **काट** शब्द अवेस्तिक 'कट'च्च होय. या वचनावरून ऋग्वेदांतही वृत्रवध होऊन जलप्रवाह वाहूं लागत व सूर्य उगवूं लागेपर्यंत मृत शरीर घरांतच खांचेंत (कट) ठेवण्याच्या चालीचा उल्लेख असावा असें वाटतें. पण तो प्रश्न गौण असून दिव्य जलांच्या परिभ्रमणाचा विचार प्रस्तुत आपल्याला कर्तव्य आहे. वर दिलेल्या अवेस्त्यांतील

वचनांवरून हिंवाळ्यांत हीं दिव्य जलें वहावयाचीं बंद होऊन सूर्यही त्यांबरोबर चालेनासा होई; व हिंवाळा संपतांना फवशींच्या ऊर्फ पितृंच्या मदतीनें देव त्या जलांना मुक्त करून मूर्याला वर यावयाला वाट करून देत, ही गोष्ट स्पष्ट होते. हें समजल्यावर आतां इन्द्रानें नदीला **वर** वहावयास कसें लाविलें (२,१५,६), वृत्राला मारून त्यानें सप्त-सिंधूंना मुक्त कसें केलें (१,३२,१२), किंवा प्रकाशाला अव्याहत प्रकाशण्यास कसें लाविलें हें कळून येईल. ध्रुवोपपत्तीच्या साहाय्यानें या दिव्य जलांच्या भ्रमणाचा आजपर्यंत कोणी विचार न केल्यामुळें इंद्र-वृत्रांच्या युद्धांतील एकसमयावच्छेदेंकरून घडून येणाऱ्या चार गोष्टींचा उलगडा व्हावयाचा राहिला.

दिव्य जलांचें आकाशांतील भ्रमण भारतीय व इराणी आर्यांच्या पुराणकथांतच काय तें आहे असें नाहीं. होमर या ग्रीक कवीच्या ग्रंथांतही तें आलें आहे. हेलिऑस ह्मणजे सूर्य हा सुवर्णाच्या नावेंतून पश्चिमेकडून पूर्वेकडे येतो असें होमरनें वर्णिलें आहे. होमरच्या मतें पृथ्वी ह्मणजे एकसारखें सपाट मैदान आहे असें त्याच्या टीकाकारांनी गृहीत धरल्या-मुळें त्यांना या वर्णनाचा उलगडा झालेला नाहीं. पण खरोखर पृथ्वी गोल आहे व तिच्या खालचा लो.क वायुरूप जलानें पूरित आहे, असेंच मत होमरच्या काव्यांत आहे. एकदां घेतलेली कल्पना कायम ठेवण्याच्या अट्टाहासामुळें पंडित लोकांनीं सरळ व स्पष्ट अशा वचनांचा आपल्या मताप्रमाणें अर्थ करून घेण्यासाठीं त्या वचनांचे लागतील तसे चिंडवडे काढले आहेत. पण त्यांचा सविस्तर विचार करण्याचें हें स्थळ नव्हे. युरिपिडिस, आरिस्टाटल यांच्या ग्रंथांतही वायुरूप जलांच्या प्रवाहांचे उल्लेख असल्याबद्दल डॉ. वारन यानें लिहिलें आहे. प्राचीन जर्मन लोकांच्या कथांत अशीच एक विश्वव्यापी नदी आली असून फिनिश पुराणांतही एक चढती व एक उतरती अशा दोन नद्यांचें वर्णन आहे. लेटीश लोकांच्या कथांत अश्विनांच्या कृत्यांसारखीं कृत्यें वर्णिलीं असून त्यांत समुद्रांत बुडणाऱ्या सूर्यकन्येला नावेंत बसवून देवांनीं तारिल्याचें सांगितलें आहे. देवांचे पराक्रम वर्णितांनां नावा आणि रथ या दोघांचेहि उल्लेख केलेले असतात (ऋ. १,११६,३,८,५,२९;१,४६,७). त्यांपैकीं नावांचा उपयोग खालच्या समुद्रांतून येतांनां केलेला असून रथांचा आकाशांत

करीत. पण कधीं कधीं याच्या उलटही प्रकार दिसतो. उदाहरणार्थ दीर्घतमा हा दहा महिने पाण्यावरच्च जात असून दहा महिन्यांनंतर जीर्ण होऊन पाण्यांच्या स्थानाकडे म्हणजे पृथ्वीच्या खालीं असलेल्या समुद्राकडे जातो असें वर्णन आहे. असो. वायूरूप जलांच्या प्रवाहाची कल्पना आर्य पुराणांतच्च नसून इजिप्शन व यहुदि लोकांच्या पुराणांतही आहे. तात्पर्य ही कल्पना सर्व देशांतील पुराणांत आढळत असल्यामुळें वर लिहिल्याप्रमाणें वृत्राच्या कथेंतील पाणी व प्रकाश यांच्या एकदम होण्याच्या मुक्ततेचा उलगडा करण्यांत तिचा उपयोग करून घेण्याला खोट्या पूर्वग्रहाशिवाय दुसरा कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं.

आतां प्रकाश व पाणी यांची एकदम मुक्तता कशी होते हें कळण्यासाठीं दिव्य जलांच्या भ्रमणाच्या कल्पनेचा उपयोग करून घेण्याचें कबूल केल्यावर प्रश्न असा येतो कीं वृत्रकथेचा उलगडा करण्यांत ध्रुवाजवळील वसतीच्या कल्पनेचा उपयोग कसा होणार? वृत्रानें अडविलेलीं जलें म्हणजे तीन पृथ्वींच्या खालीं असलेलीं दिव्य जलें असें कबूल केलें; पण तेवढ्यावरून ध्रौविक वसतिस्थानाची कल्पना त्याला कशी उपयोगी पडणार? इंद्रवृत्रांचें युद्ध रोजचें आहे असें मानण्याला त्यांत कांहीं प्रत्यवाय नाहीं असेंही कोणी म्हणेल. पण थोड्या विचाराअंतीं रोजच्या युद्धाच्या कल्पनेवर त्या युद्धांतील सर्व गोष्टींचा उलगडा होत नाहीं असें दिसून येईल. वृत्राला मारण्याचा काल वर्षाच्या अखेरीचा आहे(१०,६२,२). या गोष्टीवरून हें युद्ध दैनिक नसून वार्षिक आहे असें उघड दिसतें. आणखी इंन्द्रानें अर्बुदाला वज्राच्या ऐवजीं हिमानें मारिलें आहे (८,३२,२६). तेव्हां हें युद्ध नुसतें वार्षिक नसून हिंवाळ्यांतच होणारें आहे. वृत्राचे किल्लेही 'शारदीय' आहेत. या सर्व गोष्टींचा उल्लेख दैनिक युद्धाच्या कल्पनेवर होणारा नसून ध्रुवस्थानाच्या कल्पनेवरच होणारा आहे.

इन्द्राचें वृत्राशीं होणारें युद्ध शरदृतूंत सुरू होऊन शिशिराच्य अखेरीस संपत असे, असें जें अनुमान वरील विवेचनांत काढिलें आहे तें ऋग्वेदांतील एका महत्वाच्या वचनावरून फारच दृढ होतें. या वचनांत इंद्रवृत्रांच्या युद्धाची तिथीच दिली आहे. ऋ. २,१२,११ यांत* " पर्व-

* यः शंबरं पर्वतेषु क्षियन्तं **चत्वारिंश्यां शरद्यन्वविंदत्**। ओजायमानं यो अहिं जघान दानुं शयानं स जनास इंद्रः ॥ ऋ. २,१२,११.

तावर रहाणारा शंबर शरद्‌तूंत चाळिसाव्या दिवशीं इंद्राला आढळला.” असें म्हटलें आहे. यांत मूळचे शब्द **चत्वारिंश्यां शरदि** असे आहेत. **चत्वारिंश्यां** हें स्त्रीलिंगी चत्वारिंशी या क्रमवाचक संख्या विशेषणाचें सप्तम्यंत एकवचन असून त्याचा अर्थ ‘ चाळिसावींत ’ असा आहे. **शरदि** हें ही शरद् या स्त्रीलिंगी नामाचें सप्तमीचें एकवचन आहे. संस्कृतांत नामाच्या लिंग–वचन-विभक्तीप्रमाणें विशेषणाच्याही लिंगवचनविभक्ति असाव्या लागतात. या साधारण नियमाप्रमाणें **चत्वारिंश्यां शरदि** या शब्दांचा अर्थ ‘ चाळिसाव्या शरदांत ’ ऊर्फ ‘ चाळिसाव्या वर्षीं ’ असा होतो; कारण संस्कृतामध्यें वसंतादि ऋतु-वाचक शब्द संवत्सरवाचकही आहेत. हाच अर्थ सायणासह सर्व टीकाकारांनीं घेतला आहे. पण ‘इंद्राला शंबर चाळिसाव्या वर्षी सांपडला’ या म्हणण्याचा अर्थ काय ? इंद्र त्याला चाळीस वर्षें शोधीत होता कीं काय ? तसें समजल्यास हें युद्ध वार्षिक नसून चाळीस वर्षांनीं एकदां होणारें आहे असें होईल. पण ‘ अभिन्दन्परिवत्सरे वलं ’ (१०,६२,२) या वचनाच्या हें अगदीं उलट आहे. आर्य व अनार्य यांच्यांत चाळीस वर्षें चाललेल्या युद्धावरील हें रूपक आहे असें कांहीं पंडित समजतात. पण इंद्राचे शत्रू अनेक नामांनीं प्रसिद्ध असल्या-मुळें ही कल्पना मुळींच ग्राह्य नाहीं. शंबराशीं झालेलें युद्ध गविष्टीसाठीं आहे असें निविदांत स्पष्ट म्हटलें* आहे. तात्पर्य ‘ चाळीसाव्या वर्षीं ’ शंवर इन्द्राला सांपडला, या म्हणण्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. पण ‘ चत्वारिंश्यां शरदि ’ या शब्दांचा ‘ चाळिसाव्या शरदांत ’ असाच अर्थ घेण्याचें कारण नाहीं. एकाद्या

---

* निविद् नामक लहान सूत्रमय वाक्यांत इंद्राचें पराक्रम थोडक्यांत पण सुरेख वर्णिले आहेत. या निविद् देवांना हवि देण्याच्या वेळीं म्हणावयाच्या असतात. इंद्राचे पराक्रम वर्णन करणाऱ्या निविदांपैकीं कांहीं अशाः—‘ इंद्रो मरुत्वान् सोमस्य पिबतु । ... । घ्नन्वृत्रासृजदपः । मरुतामोजसा सह । ... । अप्तूर्ये वृत्रतूर्ये । शंबरहत्ये गविष्टौ । ... । परमस्यां परावति । ... । वज्रस्य भर्ता । पुरां भेत्ता ।...। अपां स्रष्टा । अपां नेता । ’ या निविदांत ‘ शंवरहत्य म्हणजे शंबराशीं झालेलें युद्ध आणि ‘ गविष्टि ’ म्हणजे गाईंसाठीं झालेलें युद्ध यांना एकच म्हटलें आहे.

गोष्टीचा महिना, दिवस वगैरे सांगतांनां त्या शब्दांची सप्तमी घालण्याचा संस्कृतांत चांगला प्रघात आहे. ' कार्तिके शुक्ले त्रयोदश्यां ' असें संस्कृतांत म्हणतात. याचा अर्थ ' कार्तिक शुद्ध त्रयोदशीला ' असा होतो. विशेषेंकरून तिथि सांगतांना क्रमवाचक संख्याविशेषणाची सप्तमी घालून तिथिशब्द बहुधा गाळलेला असतो. तैत्तिरीय ब्राह्मणांत (१, १, ९, १०) ' यदि संवत्सरे न आदध्यात् द्वादश्यां पुरस्तात् आदध्यात् ' म्हणजे ' जर संवत्सराच्या शेवटीं अग्न्याधान केलें नाहीं तर पुढें द्वादश दिवशीं करावें ' असें म्हटलें आहे. त्यांत ' द्वादश्यां ' याच्या पुढें ' तिथौ ' शब्द न घालतां अध्याहृत ठेवला आहे. या रीतीला अनुसरून ' चत्वारिंश्यां शरदि ' या शब्दांचा अर्थ केल्यास ' शरदृतूंत चाळिसाव्या दिवशीं ' असा सरळ अर्थ होतो. म्हणजे या अर्थाप्रमाणें इन्द्राला शंबर शरदृतूच्या चाळिसाव्या दिवशीं सांपडला असें झालें.

आतां शरदृतु हा चवथा ऋतु असल्यामुळें त्याचा चाळिसावा दिवस म्हणजे वसंतापासून सुरू होणाऱ्या वैदिक संवत्सराचा २२० वा दिवस होय. म्हणजे प्राचीन रोमन वर्षाप्रमाणें इंद्राला शंबर आढळला तो ऑक्टोबरच्या दहाव्या तारखेला आढळला असला पाहिजे. प्राचीन रोमन लोकांच्या वर्षाला मार्चपासून सुरुवात होत असे हें पूर्वी सांगितलेंच आहे. तेव्हां पासून २२० वा दिवस म्हणजे ७ महिने संपून आठव्याचा दहावा दिवस होय. ऋ. १, १५५, ६ यांत विष्णूनें चोहोंवरोवर नव्वदांनां वाटोळें फिरावयास लाविल्याचें सांगितलें आहे. याचा संबंध ९० दिवसांच्या चार ऋतूंशीं असला पाहिजे. हा वर्षविभाग खरा धरल्यास शरद् हा तिसरा ऋतु होतो, व त्याचा ४० वा दिवस म्हणजे पुनः वर्षाच्या ८ व्या महिन्याचा दहावा दिवसच होतो. अदितीच्या सात पुत्रांची गोष्ट सांगतांनां तिनें टाकून दिलेला आठवा पुत्र म्हणजे काळोखाचा आठवा महिना होय हें सांगितलेंच आहे. हा आठवा पुत्र अपरिणत स्थितींत असल्यामुळें तिनें टाकून दिला म्हणजे सात महिने संपून आठवा महिना पुरा होण्यापूर्वीच सूर्य क्षितिजाखालीं गेला असा अर्थ उघडच आहे. हा काळ व शरदृतूचा चाळिसावा दिवस हे दोन्ही अगदीं मिळते आहेत; व या दोन्ही स्थळांचा

योग्य अर्थ कोणत्याही चालू कल्पनेवरून होत नसल्यामुळें वर सांगितलेलाच अर्थ घेतल्याशिवाय आपल्याला गत्यन्तर नाहीं.

या अर्थाप्रमाणें शरद् हा वर्षांतील शेवटचा प्रकाशयुक्त ऋतु होतो. शरद् शब्द शृ—जीर्ण होणें या धातूपासून निघाला आहे. ह्मणजे त्याचा धात्वर्थ 'जीर्ण होण्याचा ऋतु' असा आहे. यांत जीर्ण होणारा 'सूर्य' असून सायणाचार्यांनीं ह्मटल्याप्रमाणें 'तृण' वगैरे नव्हे. तै. *संहितेंत 'आदित्याचीं तीन तेजें आहेत, त्यांत वसंतरूपी प्रातःकालांतील पहिलें, ग्रीष्मरूपी मध्यान्हांतिल दुसरें आणि अपराण्हरूपी शरदांतील तिसरें' असें सांगितलें आहे. यांत प्रातः, मध्यंदिन आणि अपराण्ह यांचा नेहमींचा अर्थ असेलसें वाटत नाहीं. या तीन स्थिति सूर्याच्या वार्षिक गतीच्या असून त्यांत शरदाला सायंकाल ह्मणजे जीर्ण होण्याचा काळ ह्मटलें आहे. ह्मणजे शरदानंतर प्रकाशाचा काल नाहीं असें यावरून उघड दिसतें. शबरानें जैमिनीसूत्रांवरील आपल्या भाष्यांत एक वेदवचन ह्मणून ¶ दिलें आहे. त्यांत 'आदित्य हाच सर्व ऋतु होय. तो उगवतो तेव्हां वसंत, गोदोहनकालीं ग्रीष्म, मध्यंदिनीं वर्षा, अपराण्हीं शरद् व मावळल्यावर हेमंतशिशिर' असें ह्मटलें आहे. याचा जर कांहीं अर्थ होत असेल, तर तो एवढाच कीं, सूर्याचें तेज शरदृतूंत अगदीं कमी होऊन त्याच्या पुढचे दोन ऋतु अंधारमय होत, ह्मणजे त्या ऋतूंत सूर्य क्षितिजाखालीं जाई. रात्रिवाचक **हिम्या** शब्द ऋग्वेदांत (१,३४,१) आला असून त्यावरूनही रात्रीचा हिमाशीं व शिशिर ऋतूशीं असलेला संबंध स्पष्ट दिसत आहे.

पण प्राचीन काळीं केवळ ऋतु व दिवस एवढ्यावरच कालगणना करीत असत असें मानावयास प्रमाण काय? असा प्रश्न या विवेचनावर उत्पन्न होईल. या प्रमाणाच्या अभावीं चत्वारिंश्यां शरदि याचा

---

* त्रीणि वा आदित्यस्य तेजांसि वसंता प्रातर्ग्रीष्मे मध्यंदिने शरद्यपराण्हे। यावंत्येव तेजांसि तान्येवावरुंधे। तै. सं. २,१,२,५.

¶ आदित्यो वा सर्व ऋतवः स. यदैवादित्यथ वसंतो यदा संगवोऽथ वर्षा यदाऽपराण्होऽथ शरद् यदास्तमेत्यथ हेमंतशिशिरौ। यांत सूर्याच्या वार्षिक क्रमापैकीं हेमंतशिशिर हे ऋतु रात्रीसारखे आहेत असें स्पष्ट सांगितलें आहे.

अर्थ ' शरद्दतूच्या चाळिसाव्या दिवशीं ' असा करतां येणार नाहीं. पण हा आक्षेप निराधार आहे. मुंबई सरकारनें १८८१ सालीं छापिलेल्या पश्चिम हिंदुस्थानांतील शिलालेखांसंबंधाच्या पुस्तकांत चवदाव्या ‡ लेखाचा काल दिला आहे तो असाः—" रञो वासिठिपुतस सामिसिरि पुळुमायिस सवछरे सतमे ७ गिम्हपंखे पचमे ५ दिवसे पथमे १; याचें संस्कृत असें— " राज्ञो वासिष्ठीपुत्रस्य स्वामिश्री पुलुमायिनः संवत्सरे सप्तमे ७ ग्रीष्म-पक्षे पंचमे ५ दिवसे प्रथमे." ' वासिष्ठीपुत्र स्वामिश्री पुलुमायि राजाच्या सातव्या वर्षीं ७ ग्रीष्माच्या पांचव्या पक्षांत ५ पहिल्या दिवशीं ' असा याचा अर्थ आहे. ग्रीष्माचा पांचवा पक्ष झटला आहे त्यावरून त्यांत वर्षाचे सहा ऋतु न मानितां ग्रीष्म, वर्षा व हेमंत हे तीनच मानिले असावे असें दिसतें. पण तें कसेंही असलें तरी त्यांत महिन्याचा उल्लेख न करितां ऋतु, पक्ष व दिवस यांवरच काल सांगितला आहे ही गोष्ट महत्वाची आहे. याच्या पुढच्या विसाव्या* लेखांत " वासिष्ठीपुत्र पुलुमायी राजाच्या २४ व्या वर्षीं हेमंताच्या पांचव्या पक्षांत, दुसऱ्या दिवशीं " असा लेखकाल दिला आहे. तिसऱ्या§ एका लेखाचा काल " माढरीपुत्र स्वामिश्रीसेन राजाच्या आठव्या वर्षीं ग्रीष्माच्या पांचव्या पक्षांत दहाव्या दिवशीं " असा दिला आहे. डॉ. रा. गो. भांडारकर यांनीं आपल्या ' दक्षिणच्या इतिहासां'त **माढरीपुत्राचा** काल इ. स. १९०–१९७ हा व पुलीमयीचा त्याच्यापूर्वी ६० वर्षें झणजे सन १३०–१५४ असा ठरविला आहे. झणजे हे तिन्ही लेख दुसऱ्या शतकांतील म्हणजे आर्यभट्ट व वराहमिहिर यांच्या पूर्वीचे आहेत. ऋतु, मास, पक्ष व तिथि यांनीं कालगणना करण्याची पद्धति आर्यभट्ट व वराहमिहिर

---

‡ हा लेख कार्ल्याच्या लेण्यांतील आहे.

* सिधं रञो वासिठिपुतस सिरिपुळिमाविस सवछरे चतुविसे २४ हेमतान पंखे ततिये ३ दिवसे बितिये २; याचें संस्कृतः—सिद्धम् । राज्ञो वासिष्ठीपुत्रस्य श्रीपुळिमावेः संवत्सरे चतुर्विंशे २४, हैमंतानां पक्षे तृतीये, दिवसे द्वितीये २।

§ हा लेख कान्हेरी येथील लेण्यांतील आहे–सिधं रञो माढरिपुतस स्वामि सिरिसनेस सवछरे ८ गिप ५ दिव १०। याचें संस्कृतः—सिद्धम् । राज्ञो माढरि-पुत्रस्य स्वामिश्रीसेनस्य संवत्सरे ८, ग्री; प. ५ दिव. १०।

यांच्या ग्रंथांपासून रूढ झालेली आहे. म्हणजे त्यांच्यापूर्वी महिना न सांगतां ऋतु, पक्ष व दिवस एवढ्यावरच कालगणना करण्याची पद्धति असल्यामुळें प्राचीन काळीं याहूनही साधी म्हणजे केवळ ऋतु व दिवस यांवरच काळ सांगण्याची रीत होती असें मानावयास मुळींच हरकत नाहीं. अवेस्त्यामध्येंही ही रीत आढळून येते. परंतु ध्रुवस्थानाची कल्पनाच कोणाला न शिवल्यामुळें ' चत्वारिंश्यां शरदि ' या शब्दांचा खरा अर्थ कोणाला आजपर्यंत कळला नाहीं; व 'चत्वारिंश्यां' या स्त्रीलिंगी शब्दाचा 'शरदि' शब्दाशीं व्याकरणरीत्या सहज मेळ बसल्यामुळें ही चूक वज्रलेप झाली. आह्मी सुचविलेला अर्थ अगदीं साधा व सरळ आहे. ' चत्वारिंश्यां ' हें ' शरदि ' याचें विशेषण न घेतां ते दोन्ही शब्द स्वतंत्र सप्तम्यंत मानिले म्हणजे झालें. पण त्यामुळें अर्थामध्यें होणारा फरक मात्र दांडगा आहे. औविक वसतिस्थानाची कल्पना माहीत नव्हती तेव्हां या अर्थाकडे लक्ष न जाणें स्वाभाविक होतें. पण आतां ती माहीत झाल्यावर इंद्राला शंवर शरदाच्या चाळिसाव्या दिवशीं सांपडला, वलाचीं पुरें शारदीय आहेत, किंवा अर्बुदाला इंद्रानें हिमानें मारिलें इत्यादि गोष्टींचा खरा अर्थ कळण्यास अडचण पडणार नाहीं. ध्रुवप्रदेशांत आठव्या महिन्यांत सूर्य क्षितिजाखालीं गेल्यावर, दीर्घ संध्या व तिच्या मागून येणारी सुमारें शंभर दिवसांच्या अवधीची अखंड रात्र व तीस दिवसांची उषा या गोष्टींतच वृत्रकथेचें मूळ असून त्या कल्पनेवरच त्या युद्धांतील प्रत्येक बाबीचा उलगडा करतां येतो.

वृत्रकथेंत आणखी एक बाब लक्षांत ठेवण्यासारखी आहे. तिचा हें परीक्षण पुरें करण्यापूर्वी थोडा विचार केला पाहिजे. वृत्रवधानंतर जलें व प्रकाश हीं दोन्हीं मोकळीं होतात हें वर सांगितलेंच आहे. या जलांना कधीं कधीं ' सिन्धवः ' असें ह्मणून त्या **वर** वहातात (उदंच), व त्या सात आहेत असें ह्मटलें आहे. दिव्य जलांच्या आकाशभ्रमणाच्या कल्पनेवर त्या नद्या (सिन्धवः) वर कशा वहातात हें समजतें. पण त्या सातच कां असाव्या हें सांगतां येत नाहीं. पर्जन्याच्या कल्पनेच्या पुरस्कर्त्यांच्या मतें ह्या सात नद्या पंजाबांतील असून इन्द्रानें मेघ फोडून पाण्यांना मोकळें करून दिल्यावर त्या जोरानें वाहूं लागतात. ऋ.

१०, ७५ या सूक्तांत* ज्या नद्या वर्णिल्या आहेत त्यांशीं या 'सप्त-सिन्धवः'चा संबंध लावून ते अवेस्त्यांतील 'हप्तहिंदु' या शब्दाकडे बोट दाखवून त्याचा अर्थ 'पंजाब' असा घेतात. सकृद्दर्शनीं ही कल्पना सुंदर दिसते; पण तीवरून सप्तसिंधूचा खरा अर्थ लागत नाहीं. दिव्य-जलांच्या भ्रमणाच्या कल्पनेशिवाय प्रकाश व पाणी यांची मुक्तता एकदम कशी होते हें समजत नाहीं; ही गोष्ट कबूल केली ह्मणजे इन्द्रानें वर वहावयास लाविलेल्या नद्या जमिनीवरच्या नव्हेत हें उघड होतें. शिवाय पंजाब शब्दाचा अर्थ सात नद्यांचा देश असा नसून पांच नद्यांचा देश असा आहे; आणि वाजसनेयी§ संहितेंत (३४, ११) त्याचें तसेंच वर्णन केलेलें आहे. ऋग्वेदांतील (१०, ७५) नद्यांच्या सूक्तांत एकंदर पंधरा नद्यांचीं नांवें आहेत, पण त्यांपैकीं सप्तसिंधूंत कोणत्या घ्यावयाच्या हें काठेंही सांगितलेलें नाहीं. त्यामुळें निरनिराळे पंडित सप्तसिंधूंत निर-निराळ्या नद्यांचा समावेश करतात. ह्मणून 'पांच नद्यांचा' ह्मणून प्रसिद्ध असलेला देश पूर्वी सात नद्यांचा होता, असें मानण्यांत पुष्कळ अडचणी येतात. **सप्त सिंधवः** हा शब्द ऋग्वेदांत दहा बारा वेळां आला असून त्यांपैकीं पांच ठिकाणीं सात नद्या ह्मणजे प्रकाशावरोवर वाहूं लागणाऱ्या नद्या होत असें स्पष्ट ह्मटलें आहे (१, ३२, १२, २, १२, ३; इ.). अर्थात् त्या पृथ्वीवरील नव्हत हें उघड आहे. 'सप्त सिन्धवः' शब्द पृथ्वीवरील नद्यांचा बोधक असा कोठेंही नाहीं असें आमचें ह्मणणें नाहीं. ऋग्वेदांत सप्तसिन्धूंचे तीन कलाप दिलेले आहेत; पहिल्यांत दिव्य नद्यांचा, दुसऱ्यांत पृथ्वीवरील व तिसऱ्यांत पाताळांतील नद्यांचा समावेश होतो. ह्मणजे पुराणांत वर्णन केलेल्या गंगेप्रमाणें ह्या नद्या आकाश पृथ्वी व पाताळ या तिन्ही ठिकाणीं होत्या असें वैदिक ऋषी मानीत असत असें दिसतें. ह्मणून खास पृथ्वीवरच्या अशा सात नद्या वैदिक ऋषींना माहित नव्हत्या असें ह्मणतां येणार नाहीं. पण

---

* इमं मे गंगे यमुने सरस्वति शुतुद्रि स्तोमं सचता परुष्ण्या । असिक्न्या मरुद्वृधे वितस्तयार्जीकीये शृणुह्या सुषोमया ऋ. १०,७५,५.

§ पंच नद्यः सरस्वतीमपि यंति सस्रोतसः । सरस्वती तु पंचधा सो (सा+उ) देशेऽभवत् सरित् ॥ वा. सं. ३४, ११.

हा सप्तांकमूलक विभाग पंजाबांतील सात नद्यांवरून सुचलेला असावा असें मानण्यास मात्र कांहीं आधार नाहीं. दुसरें असें कीं, सप्तांकमूलक असा विभाग ऋग्वेदांत नद्यांचाच केवळ नसून दुसऱ्याही अनेक वस्तूंनां तो लागू केलेला आहे. पृथ्वीवरील सात धामें (घरें) (१,२२,१६), सप्त सानु (८,९६,२), सूर्याचे सात किरण किंवा अश्व (१,१६४,३,),सात दिशा, सात आदित्य इत्यादिकांतही हाच विभाग आहे. पुराणांतही, सप्त स्वर्ग, सप्त पर्वत, सप्त समुद्र, सप्त पाताळें वगैरे प्रसिद्ध आहेत. अवेस्ता व ग्रीक कथा यांतही हा सप्तमूलक विभाग आलेला आहे. ह्मणजे सात नद्या हें या सप्तमूलक विभागाचें एक उदाहरण असल्यामुळें पंजाबांतिल सात नद्यांवरून तो सुचला असावा असें ह्मणतां येणार नाहीं. कारण तसें समजल्यास आर्य लोकांची फुटाफूट होण्यापूर्वी त्यांचें वसतिस्थान पंजाबांत होतें असें ह्मणावें लागेल. तर मग आतां या सात नद्यांचा उलगडा कसा करावयाचा ? या प्रश्नाचें उत्तर जलें व प्रकाश यांची मुक्तता एकदम कशी होते हें पाहिलें ह्मणजे मिळेल. ऋ. २,१२,१२ यांत ' सप्तसिंधूं ' ना मोकळें करणाऱ्या इंद्राला 'सप्तरश्मि' ह्मटलें आहे; त्यावरून सात किरण व सात नद्या यांमधील संबंध लक्षांत येईल. जलें व सूर्य हे बरोबर गमन करीत असल्याचें अवेस्त्यांत सांगितलें आहेच. या दोन्ही गोष्टींचा विचार केल्यास सात सूर्यांना सात घोडे किंवा सात नद्या वाहून नेण्यास लागतात असें स्वाभाविकच अनुमान होतें. अदितीचे सात पुत्र सात दिशांत स्थापिलेले असून ते सात महिने उत्पन्न करतात हें अदितीच्या कथेवरून पूर्वी दाखविलेंच आहे. आतां हे सात निराळे सूर्य सात नद्यांशिवाय निरनिराळ्या दिशांतून फिरणार कसे ? तात्पर्य प्रकाश च नद्या यांतील निकट संबंध कळल्यावर हीं दोन्ही सात प्रकारचीं कशीं हें समजणें अवघड नाहीं. ९,५४,२ यांत आकाशांतील सात नद्या सांगितल्या आहेत. पर्जन्याची कल्पना व पंजाबाची वस्तुस्थिति यांवरून सात नद्या मोकळ्या झाल्यावरोबर उषा क्षितिजावर कशी येते हें सांगतां येणें शक्य नसल्यामुळें, व दिव्य जलांचें भ्रमण आणि ध्रुवावरील वसतिस्थानाची कल्पना यांच्यावरच त्या गोष्टींचा उलगडा करतां येत असल्यामुळें पाश्चात्य पंडितांची कल्पना कितीही वाक्पांडित्यानें खुलविलेली असली तरी ती त्याज्य होय. आतां सप्तसिंधुवाचक असा

'हप्तहिंदु' हा शब्द अवेस्त्यांत कसा आला हें सांगावयास दूर जावयाला नको. हप्तहिंदुप्रमाणें **वारेण** (वरुण), **हैतुमंत** (सेतुमत्) **रंघ** (रसा) **हरहवैति** (सरस्वति) इत्यादि शब्दही अवेस्त्यांत आलेले आहेत. हे शब्द जर फाटाफूट होण्याच्या पूर्वीचे आहेत तर 'हप्तहिंदु' हाही तसाच असला पाहिजे. हीं सर्व नांवें आर्यांनीं आपल्या मूलस्थानांतून नवीन वसाहतींत नेलीं व तेथें नवीन स्थळांना तीं दिलीं, असें मानणें सयुक्तिक व स्वाभाविक दिसतें. हिंदुस्थानाप्रमाणें ब्रह्मदेशांतही अयोध्या, मिथिला वगैरे शहरांचीं नावें आहेत. हिंदुस्थानांतून तिकडे वसाहत करण्यासाठीं जाणाऱ्या लोकांनीं तीं दिलेलीं आहेत असें म्हणतात. हीच गोष्ट सप्तसिंधुवाचक हप्तहिंदूची असली पाहिजे. म्हणजे हप्तहिंदु हें नांव पारशी लोकांच्या पूर्वजांनीं पंजाबाला वस्तुस्थितीवरून दिलेलें नसून तें त्यांनीं आपल्या मूल स्थानांतूनच आणलेलें असलें पाहिजे.

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून एवढें दिसून येईल कीं, वृत्राच्या बंदींतून इंद्राच्या साहाय्यानें मुक्त होणाऱ्या जलांचें खरें स्वरूप व गति हीं अगदीं ब्राह्मणकालापासूनच बरोबर माहीत नाहींशीं झालेलीं आहेत. गृपन् ही देवता अंतरिक्षाचें आक्रमण नावेंतून करीत असल्याबद्दलचीं वचन ऋग्वेदांत कित्येक आहेत. पण अश्विन किंवा सूर्य हे बहुधा रथांतूनच गमन करीत असल्याचें वर्णन आहे. यावरून अंतरिक्ष हें दिव्य जलांचें निवासस्थान नसून इंद्राच्या हातून मुक्त होणारीं जलें म्हणजे ढगांतून सांठविलेलीं जलेंच होत असें निरुक्तकारांदिकांस वाटलें. वृत्रवधानंतर वाहूं लागणाऱ्या सात नद्या म्हणजेही गंगायमुनादि नद्यांप्रमाणेंच भारतीय नद्या होत अशी त्यांनीं आपली समजूत करून घेतली. पण असें करतांना त्यांना पर्वत, गिरि इत्यादि शब्दांची ओढाताण करून त्यांच्यापासून 'मेघ' असा जबरीचा अर्थ काढावा लागला. पुढें पाश्चात्य पंडितांच्या हातांत हा प्रश्न गेल्यापासून 'हप्तहिंदु' या नांवावर भुलून त्यांनीं त्या नद्या म्हणजे पंजाबांतील नद्या असा अर्थ केला. पण पंजाब पांच नद्यांचा देश असून सात नद्यांचा नव्हे. नद्या सुरू झाल्याबरोबर उपा दिसूं लागते एवढ्या एकाच गोष्टीवरून त्या नद्या पंजाबांतील नव्हत असें सिद्ध होतें. यावरून पजाबांत ऋग्वेदकाळीं आर्यांची वसाहत नव्हती असें म्हणण्याचा इरादा नाहीं. कारण ऋग्वेदांत पंजाबांतील नद्यांचीं नांवेंच स्पष्ट आलेलीं

आहेत. असो, तर आतां वेदांत सांगितलेल्या सप्तसिंधु म्हणजे जर पंजाबांतील नद्या नव्हत, तर वृत्राच्या कथेचा उलगडा करण्याची दुसरी कांहीं कल्पना काढणें जरूर आहे. वायुरूप जलें किंवा दिव्य नद्या ह्या खालच्या लोकांतून वर आकाशांत व तेथून पुनः खालच्या लोकांत, सूर्य-चंद्रतारकांसह वहात असतात या कल्पनेवर वृत्रकथेंतील सर्व बाबींचा चांगला उलगडा होतो. वृत्र आपलें शरीर फुगवून क्षितिजाजवळील पर्वतांची द्वारें कशीं बंद करी व त्यामुळें दिव्य जलें वर न येऊन सूर्य व उषा हींही आर्यांच्या ध्रुवाजवळच्या मूलस्थानांत बराच काळपर्यन्त उगविण्याचीं कशीं थांबत या गोष्टींचा आतां चांगला उमज पडतो. दिव्य जलें आकाशांतून वहातात ही कल्पना सर्व राष्ट्रांच्या पुराणकथांत आढळून येते; व तीवरून इंद्रवृत्रांच्या युद्धाचें चौहेरी स्वरूप चांगलें समजून येतें. **अपांनेता, किंवा अपांस्रष्टा** असा इंद्र म्हणजे ढगांतील पाण्यांना मुक्त करणारा नसून ज्या जलबाष्पांनीं सर्व विश्व व्यापून टाकिलें आहे; व ज्यांपासूनच इंद्रानें हें जगत् निर्माण केलें त्या जलबाष्पांचाच नेता किंवा स्रष्टा होय. म्हणजे इन्द्रवृत्रांचें युद्ध ही पावसाळ्यांत दिसून येणारी साधी गोष्ट नसून विशेष आश्चर्याची व सर्व विश्वाशीं संबंध असणारी गोष्ट होय. म्हणूनच वृत्रवध हा इंद्राच्या सर्व पराक्रमांत मोठा पराक्रम आहे. शंभर सोमांचे हविर्भाग मिळाल्यामुळें पुष्ट होऊन इंद्र आपल्या तमांतीलें शत्रूला मारून सात नद्यांना मोकळें करी, व मग त्या सूर्य चंद्र उषा यांना घेऊन वर वाहूं लागत. हें युद्ध शरद्तूच्या चाळिसाव्या दिवशीं सुरू होऊन वसंतारंभापर्यंत चालू असे. इंद्र हा पर्जन्यदेवता नव्हेच असें म्हणतां येत नाहीं. कारण ऋग्वेदांत कित्येक ठिकाणीं तो पाऊस पाडतो असें म्हटलेलें आहे. पण वृत्राला मारून नद्या व उषा यांना मुक्त करणारा इंद्र कांहीं पर्जन्यदेवता नव्हे. वृत्रानें अडवून धरिलेल्या पाण्यांची गोष्ट अगदीं प्राचीन आहे. **वृत्र** हा **आर्थ्यास** या रूपानें ग्रीक पुराणांत व **वृत्रहन्** हा **वेरेथ्रघ्न** या रूपानें पारशी ग्रंथांत आला आहे. कदाचित् इद्र व वृत्रहन् हे मूळचे एक नसतील. कारण इंद्र* शब्द यूरोपांतील आर्य-

---

* संस्कृत 'इंद्र' शब्दाचें कै० म० मो० कुंटे यांनीं जर्मन 'आदिन्' शब्दाशीं साम्य दाखविलें आहे. भरतखंडांतील आर्यसुधारणेचीं स्थित्यंतरें, वैदिककथा प्रकरण.

भाषांत सांपडत नाहीं. इन्द्राला वैदिक देवतांत प्रधानस्थान मिळाल्यावर मूळचे वृत्रहन्त्वे पराक्रम इंद्राच्या पदरीं कदाचित् बांधले असतील. कसेंही असलें तरी वृत्रकथेसंबंधानें वर काढिलेल्या अनुमानांना त्यापासून मुळींच बाध येत नाहीं. या कथेचें मूळ ढग व पाऊस यांत नसून अखंड काळोखाच्या दीर्घरात्रीनंतर येणाऱ्या प्रकाशांत आहे, हें अगदीं उघड आहे. इंद्राला पर्जन्यदेवतात्व मागाहून आलें असो किंवा कोणा अन्य देवतेचे वृत्रवधादि पराक्रम मागाहून पर्जन्यदेवतेला लाविलेले असोत, वृत्रानें कोंडून ठेविलेलीं जलें हीं पृथ्वीखालच्या समुद्रांत वास्तव्य करणारीं वायुरूप जलें असून त्यांचा बंदिवास व मुक्ति हीं ध्रुवाजवळील आर्यांच्या मूलस्थानांत प्रतिवर्षीं होणाऱ्या प्रकाश व दीर्घ काळोख यांवरील रूपकें होत यांत कांहीं संशय नाहीं. हा खरा प्रकार जो आजपर्यंत अज्ञात राहिला, त्याचें कारण प्राचीन मनुष्यासंबंधाचें आपलें ज्ञानच आजपर्यंत फार कोतें होतें हें होय.

प्रकरण १० वें.

वैदिक कथा–प्रातःकालिक देवता.

वसंतोपपत्ति आणि अश्विनांच्या कथा–जलें व प्रकाश यांच्यासाठीं होणाऱ्या युद्धांत अश्विनांनीं केलेलें काम–त्याचा ध्रुवोपपत्तीवरच कायतो उलगडा होण्यासारखा आहे–अश्विनांच्या पराक्रमाविषयींच्या कथा–च्यवान, रेभ, भुज्यु, अत्रि, वंदन इत्यादिकांना त्यांनीं वृद्धाचें तरुण केलें, किंवा समुद्रांतून वर काढिलें, दृष्टि दिली वगैरे–प्रात्याहिक उषेच्या उदयावर किंवा हिंवाळ्यांत निस्तेज होणाऱ्या सूर्याच्या वसंतऋतूंत पुनः तेजस्वी होण्यावर या सर्व कथांचा अर्थ आजवर लावण्यांत आलेला आहे–पण या कल्पनेवर त्या कथेंत आलेल्या अंधत्वाचा किंवा काळोखाचा अर्थ लागत नाहीं, तसाच त्यावरून अश्विनांनीं तारिलेल्या भक्तांच्या संकटाच्या अवधीचाही खुलासा होत नाहीं–तसाच त्या संकटाच्या स्थानाचाही उलगडा होत नाहीं–अगाध व काळोखाचा समुद्र म्हणजे पाताळ लोक होय–वर तळ असलेला उपडा कटाह म्हणजे· पाताळांतील उलटें गोलार्ध होय–ऋज्राश्वाची कथा–शंभर मेषांचा वध म्हणजे शंभर दिवसांचा अवधि काळोखाचा करणें–सप्तवध्रीची कथा–दहा महिन्यांच्या गर्भावस्थेनंतर सुखरूप प्रसूतीसाठीं प्रार्थना करणें–या कथेचा उलगडा अद्यापि झालेला नाहीं–वेदांत द्यावापृथ्वींच्या मधल्या प्रदेशाला गर्भाचें स्थान कल्पिलें आहे–क्षितिजावर असणारा सूर्य यांत फिरत असतो–दहा महिन्यांची गर्भावस्था म्हणजे सूर्याचें दहा महिने क्षितिजावर असणें–सुखरूप प्रसूतीसाठीं केलेल्या प्रार्थनेवरून दीर्घ रात्री विषयींची चिंता दिसून येते–पुत्र जन्मल्यावर लगेच अदृश्य होणें म्हणजे काय ?–गुप्त अग्नीची कथा या संबंधींच असावी–कुमाराच्या कथेचें वेदांतील मूळ–अश्विनांच्या पराक्रमांचा योग्य उलगडा करण्यांत वसंतोपपत्तीपेक्षां ध्रुवोपपत्तीच अधिक चांगली दिसते–सूर्याचें चक्र चोरणाऱ्या इंद्राची कथा–**दशाग्रपित्व**च्या अर्थाविषयीं विवेचन–त्यावरून दहा महिन्यांनंतर येणाऱ्या दीर्घ काळोखाचा बोध होतो–विष्णूचीं तीन पावलें–त्यांविषयीं निरनिराळीं मतें–विष्णूचीं पावलें सूर्याच्या वार्षिक गतीचीं दर्शक होत–तिसरें अदृश्य पाऊल म्हणजे पाताळ लोक–विष्णूचें शिपिविष्ट हें नांव–तें ध्रुवप्रदेशांतील दीर्घ रात्रींत

अदृश्य झालेल्या सूर्याचें दर्शक आहे–सवितृ, अग्नि आणि अश्विन यांचीं तीन स्थानें–त्रित आप्त्याची कथा-त्रित ऊर्फ तिसरा म्हणजे संवत्सराचा तिसरा भाग होय–ही कथा हिंदी–जर्मनीय काळची आहे–आपः–त्यांच्या स्वरूपाचें दिग्दर्शन–वैदिक ग्रंथांतील सप्तांकमूलक आणि दशांकमूलक विभागांचीं निरनिराळीं उदाहरणें–हा दुहेरी विभाग ध्रुवप्रदेशांतील सात व दहा महिन्यांच्या सूर्य-प्रकाशाचा बोधक असावा–दाशराज्ञ युद्ध-तें दशविभागात्मक तमाशीं होणाऱ्या झगड्याचें दर्शक असावें–बृहस्पति आणि त्याची नष्ट झालेली स्त्री यांची ऋग्वे-दांतील कथा–दहा अयज्यु राजे–रावण-रामायणांतील पौराणिक भाग मूळचा वैदिक असावा-हनुमान् आणि वृषाकपि-रामायण होमरच्या काव्याची नक्कल कीं काय ?—दोघांचेंही मूळ एकच असेल-उपसंहार.

वैदिक कथा–प्रातःकालिक देवता.

मागील प्रकरणांत इंद्रवृत्रांच्या युद्धाच्या कथेचें खरें स्वरूप दाखविण्याच्या कामीं पर्जन्याची कल्पना किती अपुरी आहे तें सविस्तर दाखविलें. द्यौविकवसतिसिद्धांत आणि खालच्या व वरच्या लोकांतून वाहणाऱ्या वायुरूपी जलांची कल्पना यांच्या संयोगानें त्या कथेंतील आजपर्यंत गूढ म्हणून राहिलेल्या बाबींचा कसा सुरेख उलगडा करतां येतो हेंही त्यांत दाखविलें. आतां वसंतोपपत्तीवर जुळविलेल्या अशा कथा घेऊन त्यांचाहि खरा उल-गडा त्या उपपत्तीवरून होत नाहीं असें दाखवावयाचें आहे. या कथा देवांचे वैद्य जे अश्विन त्यांच्या पराक्रमासंबंधाच्या आहेत. ऋग्वेदांत पहिल्या मंडळांतील ११२,११६,११७ व ११८ या सूक्तांत त्यांच्या बहुतेक पराक्रमाचें वर्णन आलें आहे. वृत्राच्या स्वरूपाप्रमाणेंच अश्वि-नांचें स्वरूपही निरनिराळ्या पंडितांनीं निरनिराळें मानिलें आहे. यास्कानें सांगितल्याप्रमाणें अश्विन म्हणजे द्यावापृथिवी असें कित्येक मानतात, दिवस रात्र असें कित्येक समजतात, व कित्येकांच्या मतें ते चंद्रसूर्य होत. ऐतिहासिक म्हणतात कीं, अश्विन हे पुण्य कर्में करणारे प्राचीन राजे होते. पण आपल्याला त्यांच्या विपर्यीविचार करणें तो निरुक्तकारांच्या धोरणानेंच

करावयाचा आहे. अश्विनांसंबंधी नैरुक्त मतेंहि अनेक त्याहेत. कित्येकांच्या मतें उषा, सूर्य आणि अग्नि यांच्या उदयापूर्वी आपलें तेज पसरविणारा शुक्र म्हणजे अश्विन होय. दुसरे कित्येक जण अश्विन म्हणजे पुनर्वसूच्या दोन तारा असें मानितात. तथापि अश्विनांच्या पराक्रमाचा संबंध हिंवाळ्यांत कमी झालेलें सूर्याचें तेज परत आणून देण्याशीं लावण्यांत सर्वांचें एकमत आहे. हे पराक्रम अनेक असल्यामुळें त्या सर्वांचा येथें विचार न करतां त्यांपैकीं जितक्या बाबींचा वसंताच्या किंवा उषेच्या कल्पनेवर उलगडा न होतां फक्त भौविक वसतीच्या कल्पनेवरच होतो तेवढयांचेंच विवेचन करावयाचें आहे.

पहिली गोष्ट अशी कीं, मागील प्रकरणांत सांगितलेल्या प्रकाश व पाणी यांच्यासाठीं होणाऱ्या झगड्यांत अश्विनांचेंही थोडेसें अंग आहे. अश्विन हे उषेबरोबर येणाऱ्या देवतांपैकीं आहेत असें यज्ञग्रंथांत सांगितलेलें आहे (ऐ.ब्रा.* २,१५). सूर्योदयापूर्वी होत्यानें ह्मणावयाचें आश्विनशस्त्र ह्मणून एक स्वतंत्र शस्त्रच आहे. सूर्याची कन्या त्यांच्या रथावर चढल्याचें ऋ. १,११६,१७; ११९,५ यांत सांगितलें आहे. ऐतरेय ब्राह्मणांत (४;७–८) आश्विन शस्त्र मिळविण्यासाठीं देवांमध्यें झालेल्या शर्यतीचें वर्णन देऊन अश्विनांनीं ती जिंकली व त्यांना अग्नि, उषा व इंद्र यांनीं त्यांच्यापासून आश्विन शस्त्राचा भाग मिळविण्याचें वचन घेऊन त्यांना वाट करून दिली असें सांगितलें आहे. यज्ञाग्नीचें प्रज्वलन, उषा किंवा सूर्य यांचे उदय वगैरे गोष्टी अश्विनांबरोबरच होत असतात असें १,१५७,१ व ७,७२,४ यांत ह्मटलें आहे. अश्विनांच्या उदयाचा काल 'रक्तवर्ण गाईमध्यें कृष्ण तम आहे तों.' असा १०, ६१, ४ यांत दिला आहे (कृष्णा यद् गोषु अरुणीषु सीदत्). या गोष्टींवरून अश्विनांचा उषा व सूर्य यांशीं असलेला संबंध स्पष्ट दिसत असल्यामुळें ते प्रातःकालिक देवतांपैकीं आहेत ही गोष्ट त्यांच्या कथांचें परीक्षण करतांना लक्षांत ठेविली पाहिजे. वृत्रहन् व शतक्रतु हीं इंद्राचीं विशेषणें ऋग्वेदांत अश्विनांना लाविलेलीं आहेत (८,८,२२ वृत्रहंतमा; १, ११२,२३ शतक्रतू). १,१८२,२ यांत त्यांना इंद्रतमा व मरुत्तमा ह्मणजे इंद्राचे व मरुतांचे गुण विशेषेंकरून असलेले असें ह्मटलें आहे.

---

* एते वाव देवा प्रातर्यावाणो यदश्विनौषा अश्विनौ । ऐ. ब्रा. २,१५

त्यांनीं नमुचीशीं होणाऱ्या युद्धांत इंद्राचें रक्षण केल्याचेंही १०,१३१,४ यांत सांगितलें आहे. १,४६,२ यांत त्यांना **सिंधुमातरा** ह्मणजे समुद्रापासून उत्पन्न झालेले असें ह्मटलें आहे. ४, ४३, ५ यांत त्यांचा रथ समुद्रांतून येतो असें सांगून, १, ११२, १२ यांत 'आपल्या विनघोड्यांच्या रथांतून त्यांनीं रसा नामक आकाशांतील नदीला पूर आणिल्याचें' सांगितलें आहे. यावरून त्यांचा पाण्याशीं असलेला संबंधही दिसून येतो. हीं जलें जमिनीवरचीं नसून दिव्य आहेत; कारण ८, २६, १७ यांत ते आकाशांतील समुद्रांत रहातात असें ह्मटलें आहे. (दिवो अर्णवे). त्यांनीं अतिथिग्व आणि दिवोदास यांना शंवरापासून सोडविलें असून इंद्राचा प्रियभक्त जो कुत्स त्यालाही मदत केलेली आहे. या सर्व गोष्टींचा विचार केल्यास प्रकाश व जलें यानां मुक्त करण्यासाठीं इन्द्रानें केलेल्या युद्धांत हे त्याचे सहाय होते हें स्पष्ट होतें. ते देवांचे वैद्य असून त्यांनीं पुप्कळांना दुःखमुक्त केलें आहे. अश्विनांच्या कर्थेतील या बाबींचा उलगडा वसंतोपपत्तीनें होत नसून प्रकाश व काळोख यांतील दैनिक झगड्यावरूनही होत नाहीं. या सर्व गोष्टींचा उलगडा केवळ ग्रौविक वसतीच्या उपपत्तीनेंच होणारा आहे, व तो तसा केला ह्मणजे अश्विनांनीं कित्येक, लंगड्या, अंधळ्या इत्यादिकांना कसें दुःखमुक्त केलें हें कळून येईल.

अश्विनांनीं केलेल्या पराक्रमांचा सारांश असाः—म्हाताऱ्या व निराश्रित अशा च्यवानाला त्यांनीं सुदृढ देह दिला, आणि त्याचें आयुष्य वाढवून त्याला पुनरपि तरुण केलें. सांडलेल्या पशूप्रमाणें असलेल्या विष्णापूला त्यानीं पूजा करणाऱ्या (ऋजूयते) विश्वकाच्या परत स्वाधीन केलें. समुद्रांत सांपडलेल्या भुज्यूला त्यांनीं शंभर वल्हीं असलेल्या (शतारित्राम्) नावेच्या साहाय्यानें वर काढिलें. दहा दिवस व नऊ रात्री पाण्यांत अडकलेल्या, मेला असें समजून सोडून दिलेल्या, व जखमी झालेल्या रेभाला त्यांनीं बरें करून वर काढिलें. जळत्या खाचेंत पडलेल्या अत्रीला त्यांनीं मदत केली व त्याला तमांतून वर काढिलें. त्यांनीं एका वर्तिकेला वृकाच्या जबड्यांतून सोडविलें. शंभर मेष वृकीला दिल्याबद्दल ऋज्राश्वाला बापानें अंधळें करून टाकिलें, तेव्हां त्यांनीं त्या वृकीच्या प्रार्थनेवरून त्याला पुनः दृष्टि दिली. युद्धांत

विश्पलेची तंगडी तुटली होती, तेव्हां त्यांनीं तिला एक लोखंडाची तंगडी लावून दिली. एका वध्रिमतीला (नपुंसक पतीच्या स्त्रीला) त्यांनीं हिरण्यहस्त नांवाचा पुत्र दिला. गर्भधारणास असमर्थ झालेली शय्यूची गाय त्यानीं पुनः दुभती केली, आणि यदूला अति वेगवान् व राक्षसांना मारणारा असा एक घोडा त्यांनीं दिला (ऋ. १,११६).

दुसरेही अश्विनांचे पुष्कळ पराक्रम आहेत. पण त्या सर्वांचें तात्पर्य एवढेंच कीं, लंगड्या, अंधळ्या इत्यादिकांना त्यानीं दुःखमुक्त केलें. त्यांत कित्येक ठिकाणीं हिवाळ्यांत कमकुवत झालेल्या सूर्याचा संबंध स्पष्ट दिसत असल्यामुळें मॅक्स मुल्लरादि पंडितांनीं त्या सर्व कथा हिंवाळ्यांत कमजोर होणाऱ्या व वसंतांत पुनः तेजस्वी होणाऱ्या सूर्यावियर्यांच्या आहेत असें ठरविलें. अंधारमय खाचेंत पडलेला च्यवान हा त्यांच्या मतें निस्तेज झालेला सूर्य होय, व त्याला अश्विनांनीं वर काढिलें म्हणजे वसंतारंभीं सूर्य पुनः सतेज झाला. त्यांनीं नीट करून दिलेला विश्पलेचा पाय म्हणजे कृष्णपक्षांतील चंद्राचा चतुर्थ (पाद) होय. ऋज्राश्वाचा अंधळेपणा म्हणजे रात्रीचा काळोख, व अंध आणि लंगडा परावृज् म्हणजे दक्षिणायनान्तबिन्दूजवळचा सूर्य, असें हें वसंतकल्पनावादी समजतात. त्यांच्यामतें नावेंतून समुद्रांत पडलेल्या भुज्यूची किंवा रेभाची गोष्ट म्हणजे मावळणाऱ्या सूर्यावरील रूपक होय. वध्रीची (नपुंसकाची) स्त्री वध्रिमति हिला अश्विनांनीं हिरण्यहस्त नांवाचा पुत्र दिला म्हणजे उषेच्या मागून सूर्याला त्यांनीं उदयाला आणिलें. तात्पर्य या प्रत्येक गोष्टींत संकटांत सांपडलेल्या चंद्राचें किंवा सूर्याचें वर्णन आहे असें ते मानितात. अश्विन हे प्रातःकालच्या प्रकाशाला सोडवून आणणारे, किंवा दक्षिणायनान्तबिंदूजवळ गेल्यामुळें निस्तेज झालेल्या सूर्याचा उद्धार करणारे होत. म्हणून रोज प्रातःकाळीं सूर्याचें वर येऊन तेजःपुंज होणें किंवा वसंतारंभीं त्याची निस्तेजता जाऊन त्यानें जोमांत येणें या गोष्टी देवांचे वैद्य जे अश्विन त्यांनीं केल्या असें म्हणणें साहजिक आहे; असें उषेच्या किंवा वसंताच्या कल्पनेच्या पुरस्कर्त्यांचें मत आहे.

या वसंतकल्पनावाद्यांनीं यास्काचार्यांच्या पद्धतीवर थोडी चढ केली आहे हें खरें; कारण यास्काचार्यांनीं एक वर्तिकेची गोष्ट मात्र उषःकल्पनेवर बसविली आहे. तरी प्रस्तुत रूढ असलेल्या वसंतकल्पनेच्या

साहाय्यानें केलेल्या अश्विनकथांच्या अर्थावरून वऱ्याच गोष्टींचा उलगडा होत नाहीं. सूर्याचें हरएक प्रकारचें संकट म्हणजे त्याचें दक्षिणायनांतील निस्तेज होणें असें समजल्यास अश्विनांनीं त्याला **काळोखांतून** वर कसें काढिलें हें सांगतां येत नाहीं. वंदनाच्या कथेंत काळोखाचा उल्लेख स्पष्ट असून भुज्यु हा समुद्रांत पडलेला व अगाध तमांत (अनारंभणे तमसि) बुडालेला असतां त्याला अश्विनांनीं वर काढून मुक्त केलें आहे. अत्रीलाही त्यांनीं तमांतूनच वांचविलें आहे. दक्षिणायनांत सूर्याचें तेज कमी होत असल्यामुळें त्यावेळीं त्याला, लंगडा, पांगळा वगैरे विशेषणें शोभतील; परंतु वर सांगितल्याप्रमाणें त्याचा काळोखाशीं संबंध असल्यामुळें व कित्येक ठिकाणीं त्याला अंधळा म्हटलेलें असल्यामुळें, अंधाला दृष्टी देणें वगैरे अश्विनांच्या पराक्रमांचा संबंध हिंवाळ्यांतील सूर्याच्या कमजोरपणाशीं लावणें सयुक्तिक नाहीं; कारण अंधपणाचा संबंध काळोखाशीं आहे. 'हा काळोख खराखुरा रात्रीचा काळोख होय हें उघड आहे. ह्मणून काळोख व प्रकाश यांतील रोजच्या झगड्याशीं या गोष्टींचा संबंध लाविल्यास अश्विनांचे पराक्रम दैनिक होते असें ह्मणावें लागेल. पण वस्तुतः ते दैनिक नसून सांवत्सरिक असल्यामुळें वैदिक पंडितांनीं त्यांचा संबंध सूर्याच्या हिंवाळ्यांतिल कमजोरपणाकडे लाविला आहे. पण या कल्पनेवर काळोखाचा उलगडा होत नाहीं. हा काळोखही कित्येक दिवसांच्या अवधीचा आहे. ह्मणून या अश्विनकथांचा संबंध ध्रुवप्रदेशांतील वर्षांतून एकवार येणाऱ्या अखंड अशा दीर्घ रात्रीशींच असला पाहिजे असें मानणें भाग पडतें.

वसंताच्या कल्पनेवर आणखी एका गोष्टीचाही उलगडा होत नाहीं. अश्विनांनीं ज्यांना दुःखमुक्त केलें त्यांच्या दुःखाचा काळ चोवीस तासांहून अधिक सांगितला आहे. रेभ हा (१,११६,२४) दहा दिवस व नऊ रात्री पाण्यानें वेष्टिलेला होता. तसाच भुज्यु हाही अगाध अशा तमांत तीन दिवस व तीन रात्री होता. अश्विन हे **परावत्** ह्मणजे दूरच्या प्रदेशांत तीन दिवस व तीन रात्रि होते (८,५,८). दक्षिणायनान्तबिन्दूशीं सूर्य स्थिर झाल्यासारखा कांहीं काळ दिसतो; त्या काळाशीं या दहा किंवा तीन दिवसांचा संबंध असावा असा मॅक्स मुल्लरनें तर्क केला आहे. पण तेथें सूर्य दहा दिवसपर्यंत स्थिर झालेला खरोखर

असत नाहीं; व असतो असें जरी कबूल केलें तरी शेवटीं **दीर्घतम्याच्या** गोष्टींत हा तर्क कुंठित होतोच. कारण दीर्घतमा दहाव्या युगांत म्हातारा झाल्यावर शत्रूंच्या पीडेपासून अश्विनांनीं त्याला मुक्त केलेलें आहे. दीर्घतम्याच्या कथेंत युग शब्दाचा अर्थ महिना घेतला पाहिजे हें पूर्वी एका प्रकरणांत दाखविलेंच आहे. हा अर्थ जर बरोबर असेल तर दीर्घतमारूपी सूर्य दक्षिणायनान्तबिंदूच्या जवळ दोन महिने स्थिर होता असें मॅक्स मुल्लरच्या मतानें मानावें लागेल. पण द्यौविक वसतीच्या उपपत्तीचा आश्रय केल्यास ही सर्व अडचण नाहींशी होते. कारण ध्रुव-प्रदेशांत सूर्याचा क्षितिजाखालीं असण्याचा काळ एका रात्रीपासून तों शंभर रात्रीपर्यन्त किंबहुना सहा महिने पर्यन्तही असतो.

वसंतोपपत्तीवर उलगडा न होणारी तिसरी गोष्ट म्हणजे अश्विनांनीं ज्यांना दुःख मुक्त केलें त्यांच्या दुःखाचें स्थान ही होय. भुज्यूचें संरक्षण जमीनीवर झालेलें नसून ज्या ठिकाणीं अगाध तम आहे (**अनारंभणे तमसि**) अशा समुद्रांत (अप्सु) झालेलें आहे. वृत्रानें वेढून टाकि-लेला किंवा बृहस्पतीनें खालीं फेंकून दिलेला समुद्र (२,२३,१८) हे सर्व एकच होत हें त्यांच्या वर्णनाची तुलना केल्यास सहज दिसून येईल. हे दोन्ही समुद्र म्हणजे पूर्व प्रकरणांत वर्णन केलेल्या जलबाष्पांचें स्थान होत. सूर्य हिंवाळ्यांत जातो तें स्थान कांहीं हा समुद्र नव्हे. म्हणून अश्वि-नांनीं आपल्या आश्रितांना काळोखाच्या समुद्रांतून कसें बचाविलें हें द्यौविक वसतीच्या उपपत्तीशिवाय सांगतां यावयाचें नाहीं. ऋ. ८,४०,५ यांत बाजूला छिद्र असलेल्या (**जिह्मबारम्**) सात तळांच्या समुद्राला इन्द्रानें उघडें केल्याचें सांगितलें आहे. खालीं तोंड असलेल्या विहिरीला अश्विनांनीं वर उचलल्याचें सांगतांनां १,११६,९ यांत **जिह्मबार** हाच शब्द घातलेला आहे. १,८५,११ यांतही गोतमाची तहान भागविण्यासाठीं आडव्या तोंडाच्या विहिरीला अश्विनांनीं वर ढकललें असें म्हटलें आहे. हा समुद्र किंवा विहीर म्हणजे मेघ होत असें टीकाकारांनीं सांगितलें आहे. पण आमच्या मतें हें सर्व वर्णन पाताळ लोकालाच यथार्थ लागू पडणारें आहे; कारण तेथील वस्तु आपल्या उलट दिशेनें लटकलेल्या असतात असा समज आहे. ग्रीक व ईजिप्शन् लोकांचा **हेडिस** ऊर्फ पाताळ लोक

साहाय्यानें केलेल्या अश्विनकथांच्या अर्थावरून बऱ्याच गोष्टींचा उलगडा होत नाहीं. सूर्याचें हरएक प्रकारचें संकट म्हणजे त्याचें दक्षिणायनांतील निस्तेज होणें असें समजल्यास अश्विनांनीं त्याला **काळोखांतून** वर कसें काढिलें हें सांगतां येत नाहीं. वंदनाच्या कथेंत काळोखाचा उल्लेख स्पष्ट असून भुज्यु हा समुद्रांत पडलेला व अगाध तमांत (अनारंभणे तमसि) बुडालेला असतां त्याला अश्विनांनीं वर काढून मुक्त केलें आहे. अत्रीलाही त्यांनीं तमांतूनच वांचविलें आहे. दक्षिणायनांत सूर्याचें तेज कमी होत असल्यामुळें त्यावेळीं त्याला, लंगडा, पांगळा वगैरे विशेषणें शोभतील; परंतु वर सांगितल्याप्रमाणें त्याचा काळोखाशीं संबंध असल्यामुळें व कित्येक ठिकाणीं त्याला अंधळा म्हटलेलें असल्यामुळें, अंधाला दृष्टी देणें वगैरे अश्विनांच्या पराक्रमांचा संबंध हिंवाळ्यांतील सूर्याच्या कमजोरपणाशीं लावणें सयुक्तिक नाहीं; कारण अंधपणाचा संबंध काळोखाशीं आहे. 'हा काळोख खराखुरा रात्रीचा काळोख होय हें उघड आहे. ह्मणून काळोख व प्रकाश यांतील रोजच्या झगड्याशीं या गोष्टींचा संबंध लाविल्यास अश्विनांचे पराक्रम दैनिक होते असें ह्मणावें लागेल. पण वस्तुतः ते दैनिक नसून सांवत्सरिक असल्यामुळें वैदिक पंडितांनीं त्यांचा संबंध सूर्याच्या हिंवाळ्यांतिल कमजोरपणाकडे लाविला आहे. पण या कल्पनेवर काळोखाचा उलगडा होत नाहीं. हा काळोखही कित्येक दिवसांच्या अवधीचा आहे. ह्मणून या अश्विनकथांचा संबंध ध्रुवप्रदेशांतील वर्षांतून एकवार येणाऱ्या अखंड अशा दीर्घ रात्रीशींच असला पाहिजे असें मानणें भाग पडतें.

वसंताच्या कल्पनेवर आणखी एका गोष्टीचाही उलगडा होत नाहीं. अश्विनांनीं ज्यांना दुःखमुक्त केलें त्यांच्या दुःखाचा काळ चोवीस तासांहून अधिक सांगितला आहे. रेभ हा (१,११६,२४) दहा दिवस व नऊ रात्री पाण्यानें वेष्टिलेला होता. तसाच भुज्यु हाही अगाध अशा तमांत तीन दिवस व तीन रात्री होता. अश्विन हे **परावत्** ह्मणजे दूरच्या प्रदेशांत तीन दिवस व तीन रात्रि होते (८,५,८). दक्षिणायनान्तबिन्दूशीं सूर्य स्थिर झाल्यासारखा कांहीं काळ दिसतो; त्या काळाशीं या दहा किंवा तीन दिवसांचा संबंध असावा असा मॅक्स मुल्लरनें तर्क केला आहे. पण तेथें सूर्य दहा दिवसपर्यंत स्थिर झालेला खरोखर

असत नाहीं; व असतो असें जरी कबूल केलें तरी शेवटीं **दीर्घतम्याच्या** गोष्टींत हा तर्क कुंठित होतोच. कारण दीर्घतमा दहाव्या युगांत म्हातारा झाल्यावर शत्रूंच्या पीडेपासून अश्विनांनीं त्याला मुक्त केलेलें आहे. दीर्घतम्याच्या कथेंत युग शब्दाचा अर्थ महिना घेतला पाहिजे हें पूर्वी एका प्रकरणांत दाखविलेंच आहे. हा अर्थ जर बरोबर असेल तर दीर्घतमारूपी सूर्य दक्षिणायनान्तबिंदूच्या जवळ दोन महिने स्थिर होता असें मॅक्स मुल्लरच्या मतानें मानावें लागेल. पण ध्रौविक वसतीच्या उपपत्तीचा आश्रय केल्यास ही सर्व अडचण नाहींशी होते. कारण ध्रुव-प्रदेशांत सूर्याचा क्षितिजाखालीं असण्याचा काळ एका रात्रीपासून तों झंभर रात्रीपर्यन्त किंबहुना सहा महिने पर्यन्तही असतो.

वसंतोपपत्तीवर उलगडा न होणारी तिसरी गोष्ट म्हणजे अश्विनांनीं ज्यांना दुःख मुक्त केलें त्यांच्या दुःखाचें स्थान ही होय. भुज्यूचें संरक्षण जमीनीवर झालेलें नसून ज्या ठिकाणीं अगाध तम आहे (**अनारंभणे तमसि**) अशा समुद्रांत (अप्सु) झालेलें आहे. वृत्रानें वेढून टाकि-लेला किंवा बृहस्पतीनें खालीं फेंकून दिलेला समुद्र (२,२३,१८) हे सर्व एकच होत हें त्यांच्या वर्णनाची तुलना केल्यास सहज दिसून येईल. हे दोन्ही समुद्र म्हणजे पूर्व प्रकरणांत वर्णन केलेल्या जलबाष्पांचें स्थान होत. सूर्य हिंवाळ्यांत जातो तें स्थान कांहीं हा समुद्र नव्हे. म्हणून अश्वि-नांनीं आपल्या आश्रितांना काळोखाच्या समुद्रांतून कसें बचाविलें हें ध्रौविक वसतीच्या उपपत्तीशिवाय सांगतां यावयाचें नाहीं. ऋ. ८,४०,५ यांत बाजूला छिद्र असलेल्या (**जिह्मबारम्**) सात तळांच्या समुद्राला इन्द्रानें उघडें केल्याचें सांगितलें आहे. खालीं तोंड असलेल्या विहिरीला अश्विनांनीं वर उचलल्याचें सांगतांनां १,११६,९ यांत **जिह्मबार** हाच शब्द घातलेला आहे. १,८५,११ यांतही गोतमाची तहान भागविण्यासाठीं आडव्या तोंडाच्या विहिरीला अश्विनांनीं वर ढकललें असें म्हटलें आहे. हा समुद्र किंवा विहीर म्हणजे मेघ होत असें टीकाकारांनीं सांगितलें आहे. पण आमच्या मतें हें सर्व वर्णन पाताळ लोकालाच यथार्थ लागू पडणारें आहे; कारण तेथील वस्तु आपल्या उलट दिशेनें लटकलेल्या असतात असा समज आहे. ग्रीक व ईजिप्शन् लोकांचा **हेडिस** ऊर्फ पाताळ लोक

अशाच प्रकारचा आहे. इतर राष्ट्रांच्या प्राचीन कथांतहो पाताळाचें वर्णन अशाच प्रकारचें आहे. पाताळ ह्मणजे काळोखाच्या व पाण्यानें भरलेल्या अशा उपड्या कटाहासारखा असल्यामुळें गोतमाची तहान भागविण्यासाठीं अश्विनांना त्याच्या बाजूला छिद्र पाडून पाणी वर आणावें लागणें साहाजिक आहे. मरुतांनींही असाच पराक्रम केल्याचें १, ८५, १० यांत सांगितलें आहे. बुंधा वर असलेल्या (उच्चाबुध्न) व खालीं मुख असलेला (जिम्हवार) अशीं जीं विशेषणें कूपाला (अवत) दिलीं आहेत (ऋ. १, ११६, ९) त्यांवरून नित्या-हून कांहींतरी निराळ्या प्रकाराचें वर्णन त्यांत आहे हें उघड आहे. अर्थात् हीं विशेषणें मेघांना लावतां येण्यासारखीं नाहींत. हा कूप वर ढकलल्याचें सांगितलें आहे (ऊर्ध्वे नुनुद्रे). निस्तल (अबुध्न) अशा प्रदेशांत वरुण आपला वृक्ष उभा करितो, व त्याचे आह्मांला न दिस-णारे असे किरण वरून निघून खालीं जातात (नीचीनाः) असें जें १, २४, ७ यांत वर्णन आहे तें, सर्व वस्तु बिनआधारी व उलट्या असलेल्या पाताळाच्या वर्णनाशीं उत्तम जुळतें. त्यांतील काळोखाच्या व निस्तल अशा समुद्रांतच भुज्यु बुडालेला असून अश्विनांनीं दिलेल्या नावेंतून तरून गेला. अथर्ववेदांत " तिरकें मुख असलेल्या व वर बुंधा असलेल्या अशा चमसांत (पेल्यांत) सर्व तज टेविलेलें असून त्या महापुरुषाचें गोपन करणारे सप्तर्षि त्यांतच राहिलेले आहेत " असें सांगितलें आहे. (१०,८,९)[1]. बृहदारण्यकोपनिषदामध्येंही हा मंत्र आला असून त्यांत **तिर्यग्बिल** याच्या ऐवजीं **अर्वाग्बिल** असा शब्द घातला आहे. यास्कानें (निरुक्त १२,३८) हा चमस ह्मणजे आपल्या डोक्यावरील खगो-लार्ध व सप्तऋषि ह्मणजे सूर्याचे सात किरण, किंवा चमस ह्मणजे मनुष्याचें अंतर्गोल असें कपाल असे दोन प्रकारचे अर्थ दिले आहेत. पण हें वर्णन वरचें खगोलार्ध किंवा मनुष्यकपाल यांच्यापेक्षां पाताळालाच अधिक लागू पडतें. पारशी ग्रंथांतही अशाच प्रकारचें वर्णन असून त्यांत सात **अमेश स्पेंतांचें** तेज **यिमा**पासून तीन वेळ निघून गेलें व तें **अझि दहाकाशीं** युद्ध करून परत आणावें लागलें असें सांगितलें आहे. हें युद्ध

---

१ तिर्यग्बिलश्चमस ऊर्ध्वबुध्नस्तस्मिन्यशो निहितं विश्वरूपम् । तदासत ऋषयः सप्त साकं ये अस्य गोपा महतो बभुवुः ॥

चौरुकश समुद्रांत झालेलें आहे. ह्मणून या दोन्ही वर्णनांची तुलना करितां हा उपड्या तोंडाचा चमस ऊर्फ पेला ह्मणजे पाताळांतील काळो-खाचें व जलवाप्पांचें स्थान असें जें तेथील उलटें खगोलार्ध तेंच होय असें ह्मणण्याला सबळ आधार मिळतो. भुज्यु ज्यांत बुडाला असतां अश्विनांनीं त्याचें रक्षण केलें तो हाच प्रदेश होय.

भुज्यु या निराधार व काळोखाच्या समुद्रांत तीन रात्री व तीन दिवस होता व रेभ दहा रात्रीं व नऊ दिवस होता असें सांगितलेलें आहे. अर्थात् ह्या अवधि अखंड काळोखाचा असला पाहिजे. ऋज्राश्वाच्या (रक्तवर्ण अश्व) गोष्टींतही या ध्रुवाजवळच्या अखंड काळोखाचाच संबंध असावा असें दिसतें. ऋज्राश्वानें १०० किंवा १०१ मेंढ्या मारून वृकीला दिल्या-मुळें त्याच्या बापानें रागावून त्याला अंध केलें, व पुढें वृकीच्या विनंती-वरून अश्विनांनीं त्याला त्याची दृष्टि परत दिली. या मेंढ्या ह्मणजे तारा असून सूर्य उगवल्याबरोबर त्या अदृश्य होतात ह्मणून त्यांना ऋजाश्वानें मारिलें असें ह्मटलें असावें, असा मॅक्स मुल्लरनें तर्क केला आहे. पण तसें धरल्यास त्या १०० किंवा १०१ कां असाव्या याचा उलगडा होत नाहीं. शिवाय ग्रीक कथेंतील हेलिऑस ह्मणजे सूर्य याच्या ३५० मेंढ्या ह्मणजे ३५० रात्री व ३५० बैल ह्मणजे ३५० दिवस होत असें त्यानेंच सांगि-तलें आहे. ३५० दिवसांचें हें वर्ष रेभाच्या गोष्टीशीं चांगलें जुळतें. त्याच हेलिऑसच्या गोष्टीवरून ऋज्राश्वाच्या गोष्टीचा उलगडा होईल का नाहीं हें पाहिलें पाहिजे. तसा विचार केल्यास ग्रीक ऑडिसीस्च्या मित्रानें हेलिऑसचे बैल खाणें व ऋज्राश्वानें मेंढ्या मारून वृकीला देणें या गोष्टी-तील साम्य ताबडतोब लक्षांत येईल. वैदिक ग्रंथांत वृक ह्मणजे तमाचीं मूर्ति असें मानिलें असल्याचें दिसतें. ह्मणून शंभर मेंढ्यांच्या वधाचा संबंध सूर्याच्या तेजाशीं न लावतां काळोखाशींच लावला पाहिजे; ह्मणजे ऋज्राश्वानें शंभर दिवस काळोखाच्या स्वाधीन केले असें मानिलें पाहिजे. हे शंभर दिवस अखंड काळोखाचे असल्यासुळें ऋज्राश्व तितका काळ-पर्यंत अंध होता व मग प्रकाशाचे अग्रदूत जे अश्विन त्यांनीं त्याला पुनः दृष्टि दिली असें ह्मणणें स्वाभाविक आहे. याप्रमाणें शंभर मेंढ्यांच्या वधाची गोष्ट शंभर दिवसांच्या अवधीच्या अखंड रात्रीच्या कल्पनेवर चांगली जुळविता येते. ह्मणजे एकंदरींत अश्विनांच्या कथेवरून तीन-

पासून शंभरपर्यंत दिवसांच्या अखंड रात्रीविषयीं अनुमान करावयास चांगला आधार मिळतो.

अश्विनांच्या कथांपैकीं आपल्या उपपत्तीला अत्यंत महत्वाचा भाग म्हटला म्हणजे **अत्रि सप्तवध्रीची** गोष्ट होय. त्याला जळत्या खांचेंत टाकून दिलें असतां त्या भयंकर स्थितींतून व काळोखांतून (तमसः) अश्विनांनीं त्याला मुक्त केलें (६,५०,१०). वध्रीच्या (नपुंसक) स्त्रीला हिरण्यहस्त नांवाचा पुत्र अश्विनांनी दिल्याचें (१,११७,२४) मागें सांगितलेंच आहे. पांचव्या मंडळांतील ७८ वें सूक्त सप्तवध्रीचें (ऋषी) असून त्यांत सप्तवध्रि लांकडी पेटींत सांपडला असतां त्याला अश्विनांनीं मुक्त केल्याचें सांगितलें आहे. ही लांकडी पेटी किंवा वृक्ष म्हणजे रात्र असें धरल्यास सप्तवध्रि आपल्या स्त्रीपासून रात्रौ विलग्न झाल्यामुळें तिला तो वध्रीप्रमाणेंच झाला व प्रातःकालीं अश्विनांनीं त्याला मुक्त केल्यावर पुनः तो आपल्या स्त्रीचा यथार्थ पति झाला, अशा तऱ्हेचा या गोष्टीचा खुलासा मॅक्स मुल्लरनें केला आहे. पण तसें समजल्यास त्याला नुसतें वध्रि म्हणण्याऐवजीं सप्तवध्रि कां म्हटलें या प्रश्नाचा उलगडा होत नाहीं. **वध्रि** या शब्दाचा अर्थ चामड्याची वादी असाही आहे. म्हणून सप्तवध्रि म्हणजे चामड्याच्या सात वाद्यांनीं जखडलेला असाही त्याचा अर्थ होऊं शकेल. पण या गोष्टींतील अन्य बाबींचा विचार करितां सप्तवध्रि म्हणजे सात—नपुंसक अशाच अर्थानें तें विशेषण अत्रीला लाविलेलें असलें पाहिजे असें दिसतें.

वर सांगितलेलें पांचव्या मंडळांतील ७८ वें सूक्त अश्विनांचें असून त्याचा ऋषि **अत्रि सप्तवध्रि** हा आहे. त्यांत अत्रीनें अश्विनांची आपल्याला संकटांतून मुक्त करण्याविषयीं प्रार्थना केली आहे. त्यांत पहिल्या तीन मंत्रांत अश्विनांना यज्ञार्थ आवाहन केलें असून चवथ्यांत खांचेंत पडलेल्या अत्रीनें वेदना होणाऱ्या स्त्रीप्रमाणें अश्विनांला साहाय्यार्थ बोलाविलें आहे. पांचव्या व सहाव्या मंत्रांत वृक्षांत बद्ध झालेल्या अत्रीला सोडविण्यासाठीं प्रसूत होणाऱ्या स्त्रीच्या अंगाप्रमाणें वृक्षाची बाजू विदारण करण्याविषयीं

---

१ वि जिह्रीष्व वनस्पते योनिः सूषंत्या इव । श्रुतं मे अश्विना हवं सप्तवध्रिं च मुंचतम् ॥ ५ ॥ भीताय नाधमानाय ऋषये सप्तवध्रये । मायाभिरश्विना युवं वृक्षं सं च वि चाचथः ॥ ६ ॥ ऋ. ५,७८.

प्रार्थना केलेली आहे. या नंतरच्या शेवटच्या तीन मंत्रांत दहा महिने-पर्यंत गर्भांत असलेल्या कुमाराच्या प्रसवाचें वर्णन आहे. यां मंत्रांचा पहिल्या सहा मंत्रांशीं संबंध काय असावा हें कोणत्याही वैदिक पंडि-ताला अद्यापपर्यंत सांगतां आलेलें नाहीं. सायणाचार्यांनीं या तीन मंत्रांना गर्भस्त्राविणी उपनिषद् ह्मटलें आहे; व लड्विग् या पाश्चात्य पंडिताच्या मतें चवथ्या मंत्रांतील उपमानभूत अशा प्रसूतिवेदना होणाऱ्या स्त्रीवरून सुचलेल्या कुमारप्रसवाचें साग्र वर्णन या तीन मंत्रांत दिलें आहे. परंतु केवळ उपमेवरून सुचलेल्या अशा अप्रस्तुत विषयाचें इतकें साग्र वर्णन सूक्ताच्या अखेरीस करणें फारच विक्षिप्त दिसतें. म्हणून या मंत्रासंबंधाचा हा विलक्षणपणा मान्य तरी केला पाहिजे किंवा त्यांचा दुसऱ्या कोणत्या तरी रीतीनें खुलासा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ते मंत्र असेः—

यथा वातः पुष्करिणीं समिंगयति सर्वतः ।
एवा ते गर्भ एजतु निरैतु दशमास्यः ॥ ७ ॥
यथा वातो यथा वनं यथा समुद्र एजति ।
एवा त्वं दशमास्य सहावेहि जरायुणा ॥ ८ ॥
दशमासाञ्छशयानः कुमारो अधि मातरि ।
निरैतु जीवो अक्षतो जीवो जीवन्त्या अधि ॥ ९ ॥

हे मंत्र अगदीं सरळ असून त्यांचा अर्थ असाः—

" ज्याप्रमाणें वात पुष्करिणीला (कमळांचें तळें) चोहोंकडून हाल-वितो, त्याप्रमाणें तुझा गर्भ हालो आणि दहा महिन्यांनंतर बाहेर येवो ॥ ७ ॥

" ज्याप्रमाणें वात, वन किंवा समुद्र हालतो, त्याप्रमाणें, हे दहा महिन्यांच्या गर्भा ! तूं जरायूसह (गर्भावरील आच्छादन) बाहेर ये ॥ ८ ॥

" मातेच्या गर्भांत दहा महिने राहिलेला कुमार सजीव व सुखरूप बाहेर येऊन आपल्या जीवंत मातेला जीवंत दिसो ॥ ९ ॥ "

सहाव्या मंत्रांत वृक्षाच्या बाजूचें सप्तवध्रीसाठीं विदारण करण्यासाठीं अश्विनांची प्रार्थना केल्यावर लगेच हे तीन मंत्र आलेले असल्यामुळें

त्याचा मागच्या गोष्टीशीं संबंध असणें अगदीं स्वाभाविक आहे. पण वसंताच्या किंवा उषेच्या कल्पनेवर हा संबंध जुळवितां येत नाहीं. या मंत्रांतील शब्दांत काठिण्य मुळींच नाहीं. दहा महिन्यांच्या पूर्ण गर्भाची सुखरूप सुटका होण्याविषयीं त्यांत प्रार्थना केली आहे हें स्पष्ट आहे. पण हा गर्भांतील कुमार कोण असावा ? वध्रिमतीला हिरण्यहस्त नांवाचा पुत्र अश्विनांनीं दिल्याचें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां तिनें सुखरूप प्रसूतीसाठीं प्रार्थना केली असावी हें संभवत नाहीं. सत्यधृतीनेंही आपल्या स्त्रीच्या सुखरूप प्रसूतीसाठीं प्रार्थना केली असें म्हणतां येत नाहीं; कारण तिच्यापासून त्याला पुत्रप्राप्ति कधींच झालेली नाहीं. तात्पर्य, या तीन मंत्रांचा सूक्ताच्या पूर्वभागाशीं असलेला संबंध आजपर्यन्त मुळींच समजलेला नाहीं.

पण ध्रुवोपपत्तीच्या साहाय्यानें या गोष्टीचा चांगला उलगडा होतो. ऋग्वेदांत कित्येक ठिकाणीं उषा सूर्याला उत्पन्न करिते असें म्हटलेलें आहे. (१,११३,१;७,७८,३) परंतु उषेच्या गर्भांत सूर्य दहा महिने असतो असें म्हणतां येत नाहीं. तसेंच **दशमास्यः** किंवा **दशमासान्** हे जे शब्द सूक्तांत आलेले आहेत ते निरर्थक आहेत असेंही म्हणतां येत नाहीं. अर्थात् या गोष्टीचा दुसरा कांहींतरी खुलासा असला पाहिजे. ऋग्वेदांत सूर्याला द्यावापृथ्वीचा किंवा एकट्या द्यूचा पुत्र म्हटलेलें आहे. या गोष्टीवरून हा खुलासा मिळण्यासारखा आहे. ऋ. १०,९७,१ यांत सूर्याला **दिवस्पुत्र** म्हटलेलें आहे. तसेंच १,१६४,३३ यांत* "द्यूनें आम्हाला उत्पन्न केलें, तो आमचा पिता, तेथेंच आमचें मूळ आहे. ही अफाट पृथ्वी आमची माता होय. या दोन उत्तान चमूंच्या उदरांत पित्यानें आपल्या कन्येच्या गर्भाचें आधान केलें;" असें सांगितलें आहे. या पूर्वीच्या $ऋचेंत, " आपल्या मातेच्या गर्भांत अपूर्णावस्थेंत असलेला तो अनेकविध संपत्तिमान् होत्साता निर्ऋतींत निघून गेला. ज्यानें

---

* द्यौर्मे पिता जनिता नाभिरत्र बंधुर्मे माता पृथिवी महीयं । उत्तानयोश्चम्वोर्योनिरंतरत्रा पिता दुहितुर्गर्भमाधात् ॥ ऋ. १,१६४,३३.

$ य ईं चकार न सो अस्य वेद य ईं ददर्श हिरुगिन्नु तस्मात् । स मातुर्योना परिवीतो अंतर्बहुप्रजा निर्ऋतिमा विवेश ॥ ऋ. १,१६४,३२.

त्याला उत्पन्न केलें तो त्याला जाणत नाहीं. ज्यांनीं त्याला पाहिलें त्यांच्यापासून तो आतां गुप्त झाला आहे." असें सांगून १,१६०,१ ‡यांत " हे द्यावापृथिवी सर्व कल्याण करणारे, रजांना धारण करणारे, व्यापक स्वरूपाचे, शोभनजन्मवान् आणि ज्ञाते आहेत. हा तेजस्वी सूर्य नियमानुसार या दोन देवींच्या मधून गमन करीत असतो, " असें म्हटलें आहे. या मंत्रांवरून तीन गोष्टी स्पष्ट दिसून येतात; १ ली सूर्य हा द्यावापृथिवीरूपी दोन चमसांचा पुत्र मानिलेला आहे; २ री, या दोहोंच्यामध्यें सूर्य पोटांतील गर्भाप्रमाणें फिरतो; ३ री, तो आपल्या मातेच्या गर्भांत कांहीं काळ फिरल्यावर तमोमय प्रदेशांत (निर्ऋति) जाऊन पूर्वी ज्यांना दिसत होता त्यांना दिसत नाहींसा होतो. सूर्याच्या संवत्सरगतीवर याप्रमाणें रूपक केल्यावर, तो निर्ऋतींत जातो म्हणजे आपल्या मातेच्या गर्भांतून बाहेर पडतो असें म्हणावयास कल्पनेची फार ओढाताण करावयास नको. पण त्या गर्भांत तो दहा महिने होता या म्हणण्याचा अर्थ काय ? या प्रश्नाचें उत्तर औविकउपपत्तीवरून चांगलें मिळेल. दीर्घतमा दहाव्या महिन्यांत म्हातारा होतो व दशग्वांचें वार्षिक सत्रही तितक्याच काळांत पुरें होत असे हें पूर्वी सांगितलेंच आहे. तेव्हां क्षितिजावर दहा महिनेपर्यन्त दिसणारा सूर्य द्यावापृथ्वीच्या गर्भांत दहा महिने फिरतो असे म्हणणें स्वाभाविक आहे. या काळानंतर तो निर्ऋतींत जाऊन दोन महिने तेथील वृक्षांत अडकून पडतो; तेव्हां त्याच्या मुक्ततेसाठीं अत्रीनें अश्विनांची प्रार्थना केली हें ठीकच आहे. अथर्ववेदांत (११,५,१) सूर्याला ब्रह्मचारी म्हणून तो पृथिवी व द्यौ यांच्यामध्यें फिरतो व मोठ्यानें आक्रंदन करीत रक्तवर्ण असा तो पृथ्वीवरून बृहच्छेप (मोठें शिश्न) ओढीत नेतो, असें म्हटलें आहे. आतां द्यावापृथ्वीच्या मध्यें फिरतांना जर त्याला बृहच्छेप असेल तर निर्ऋतींत जाऊन पडल्यावर त्याला वध्रि (नपुंसक) म्हणणें साहाजिक आहे. आतां त्याला सप्तवध्रि कां म्हटलें हा प्रश्न राहिला. पण त्याचें उत्तर सोपें आहे. ऋग्वेदांत द्यौ, पृथ्वी, पाताळ, समुद्र, जलें हीं सर्व सात सात मानिलेलीं आढळतात; तसेंच दानु (राक्षस) हेही सात

---

‡ तेहि द्यावापृथिवी विश्वशंभुव ऋतावरी रजसो धारयत्कवी । सुजन्मनी धिषणे अंतरीयते देवो देवी धर्मणा सूर्यः शुचिः ॥ ऋ. १,१६०,१.

असून (१९,१२०,६) त्यांना मारणाऱ्या इन्द्राला सप्तहन् म्हटलेलें आहे (१०,४९,८). वृत्राचे किल्लेही सात असून अश्विनांनीं फोडलेला गाईंचा व्रज सप्तास्य (१०,४८,८) म्हणजे सात मुखांचा आहे. या गोष्टींचा विचार करतां क्षितिजावर फिरणारा सूर्य जर बृहच्छेप आणि सप्ताश्व किंवा सप्तकर आहे तर तमोमय अशा निर्ऋतींत उतरल्यावर त्याला सप्तवध्रि म्हणणें कांहीं वावगें नाहीं. असा अर्थ घेतल्यास वर सांगितलेल्या तीन मंत्रांचा सर्व सूक्तांशीं चांगला संबंध दाखवितां येईल. मातेच्या उदरांत रहाण्याचा दहा महिन्यांचा काळ म्हणजे सूर्य क्षितिजावर असे पर्यन्तचा काळ होय. यानंतर दोन महिने पाताळांतील समुद्राच्या वृक्षांत अडकल्यावर अश्विन त्यास बाहेर काढीत. या गोष्टीचा उलगडा आजपर्यंत झालेला नसून तो आतां ध्रुवोपपत्तीवरच होणारा आहे.

या कथेंत दिसून येणाऱ्या एका कोड्याचा या ठिकाणीं थोडा विचार करणें अवश्य आहे. येथें अशी कल्पना केली आहे कीं, सूर्य आपल्या मातेच्या गर्भांत दहा महिने वावरल्यावर खालीं पाताळांत पडतो; म्हणजे तो गर्भातून बाहेर आल्यावरं अदृश्य होतो. हा प्रकार सामान्य प्रकाराच्या उलट आहे. सामान्यतः बालक मातेच्या उदरांतून बाहेर आला म्हणजेच दृश्य होतो. हा प्रकार लक्षांत घेऊन वैदिक ऋषींनीं त्याचें एक अजब कोडें बनविलें. या कोड्याचें ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं वर्णन आलें आहे. १,१६४,३२ यांत 'ज्यानें त्याला (सूर्याला) उत्पन्न केलें त्यालाच तो दिसत नाहींसा होतो' असें म्हटल्याचें वर सांगितलेंच आहे. ५,२,१ यांत* "युवति माता कुमाराला गुप्तपणें नेते, व पित्यापाशीं देत नाहीं, अरातींत असलेल्या त्याचें म्लान होणारें मुख लोकांना दिसत नाहीं" असें म्हटलें आहे. आणखी,+ १,७२,२ यांत "वत्स आमच्या भोंवतीं फिरत असतांही तो चतुर अशा अमर्त्य देवांनाही दिसत नाहीं; त्याच्या मागोमाग चालणारे देव थकून अग्नीच्या चारु अशा उच्च पदीं

---

* कुमारं माता युवतिः समुब्धं गुहा बिभर्ति न ददाति पित्रे । अनीकमस्य न मिनज्जनासः पुरःपश्यन्ति निहितमरतौ ॥ ऋ. ५,२,१.

+ अस्मे वत्सं परि षंतं न विंदन्निच्छंतो विश्वे अमृता अमूराः । श्रमयुवः पदव्यो धियंधास्तस्थुः पदे परमे चार्वग्नेः ॥ ऋ १,७२,२.

उभे राहिले," व १,९५,४ यांत * तर " तुमच्यापैकीं कोणाला हें रहस्य समजलें आहे ? वत्सानें आपल्या मातेलाच जन्म दिला; सर्वांचें बीज असा तो महान् द्रष्टा स्वसामर्थ्यानें करून आपांच्या मांडीवरून पुढें येतो " असें म्हटलें आहे. दीर्घ तमांमध्यें फार काळ (ज्योक्) राहिलेल्या (१०,१२४,१) व नंतर जलांचा पुत्र (अपां नपात्) होत्साता पुनः बाहेर येणाऱ्या (१,१४३,१) अग्नीचें हें वर्णन आहे. जलांचा पुत्र म्हणजे मेघांत उत्पन्न होणारा विद्युद्रूप अग्नि होय असें साधारणतः मानितात. पण तसें मानिल्यास त्याच्या काळोखांत राहाण्याचा उलगडा होत नाहीं. पण दिव्य जलभ्रमण व ध्रुवोपपत्ति यांच्या साहाय्यानें हें कोडें समाधानकारक रीतीनें सुटतें. द्यावापृथ्वीच्या मध्यें दहा महिने वावरणाऱ्या सूर्याच्या स्थितीला दहा महिन्यांची गर्भावस्था म्हणणें स्वाभाविक आहे. पण त्यांत आश्चर्य एवढेंच कीं, गर्भांत असे तोंपर्यंत तो दृश्य असून बाहेर पडल्याबरोबर मात्र तो अदृश्य होतो. यावर तो जातो कोठें? खालीं पडल्यावर वृक्षांत अडकून पडतो कीं काय? त्याची प्रसूति झाल्यावर माता त्याला पित्याकडे कां घेऊन जात नाहीं ? त्याची सुटका तरी सुखरूप होते कीं नाहीं ? असे प्रश्न साहाजिक उत्पन्न होतात, व वैदिक ऋषींनीं पुनः पुनः त्यांचा विचार करून ते सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही सूर्याची गोष्ट अग्नीलाही लागू आहे; कारण ऋग्वेदांत सूर्य व अग्नि यांचें एकत्व अनेक वेळां प्रतिपादिलेलें आहे. ३,२,१४ यांत अग्नीला उषःकालीं जागें होणारें (उषर्बुधं) प्रकाशयुक्त आकाशांतील दिव्य तेज असें म्हटलेलेंहै आहे. ऐतरेय ब्राह्मणांत† (८,२८) " सूर्य अस्तंगत होतांना अग्नींत प्रवेश करतो व प्रातःकालीं पुनः त्याच्यापासूनच उत्पन्न होतो " असें सांगितलें आहे. दहा महिन्यांच्या गर्भावस्थेनंतर गुप्त होण्याची गोष्ट सूर्याची असो वा अग्नीची असो, दहा महिनेपर्यंत प्रकाशल्यावर क्षितिजाखालीं जाणाऱ्या

---

* क इमं वो निण्यमा चिकेत वत्सो मातॄर्जनयत स्वधाभिः । बह्वीनां गर्भो अपसामुपस्थान्महान्कविर्निश्चरति स्वधावान् ॥ ऋ. १,९५,४

† आदित्यो वा अस्तं यन्नग्निमनुप्रविशति ।...। अग्नेर्वा आदित्यो जायते ॥ ऐ. ब्रा. ८,२८.

सूर्याशीं तिचा संबंध आहे, एवढें खास. आतां हा नाहींसा होणारा कुमार जातो कोठें, त्याचें होतें काय ? तो आपल्या मातापितरांना परत मिळतो कीं नाहीं, मिळत असल्यास केव्हां व कसा मिळतो ? त्याला परत मिळवून देण्याचें काम ऋग्वेदांत ऋभु किंवा अश्विन यांनीं केलेलें आहे. १,११०,८ यांत ऋभूंनीं मातेला वत्साशीं युक्त केल्याचें सांगितलें आहे. अश्विनांच्या पराक्रमाचा उल्लेख मागें झालाच आहे. आतां या दहा महिन्यांनंतर च्युत होणाऱ्या अग्नीच्या किंवा सूर्याच्या गोष्टीवर पुराणांतील स्कंदाची किंवा कुमाराची गोष्ट कशी रचिली असावी हें सहज सांगतां येईल. खालीं पडल्यावर (स्कंद) गुप्त होणारा (गुह), प्रातःकालीं सात नद्या ऊर्फ मातांबरोबर उगवणारा व विजयी होत्साता प्रकाशकिरणांसह ऊर्फ देवांच्या सैन्यासह देवयान मार्गाचें आक्रमण करणारा असा सूर्य हाच कुमार कार्तिकेय होय. वृत्राबरोबर होणाऱ्या युद्धांत मरुत् हे इन्द्राचे साहाय्यकर्ते असल्यामुळें या मरुतांचा पौराणिक प्रतिनिधि जो रुद्र त्याचा हा कुमार पुत्र होणें कांहीं अशक्य नाहीं. सूर्याला वर येते वेळीं वृत्रानें बुजविलेलीं उदयगिरीचीं (अवेस्तिक आलबुर्झ) द्वारें फोडावीं लागत असल्यामुळें या कुमाराला क्रौंचदारण (क्रौंच पर्वत फोडणारा) हें अभिधानही योग्यच आहे. .या विषयाचें साग्र परीक्षण करण्याचें हें स्थळ नसल्यामुळें तो येथेंच सोडला पाहिजे. घौविक उपपत्तीला पोषक अशा कांहीं बाबी आश्विनांच्या कथांत आहेत कीं नाहीं हें पहाण्याचा आपला उद्देश होता, व तो उद्देश सफलही झाला आहे. सप्तवध्रीच्या कथेंतील **दशमास्य** हा शब्द व दीर्घतम्याच्या गोष्टींतील **दशमे युगे** हे शब्द दहा महिन्यांच्या सूर्यप्रकाशाचे स्पष्ट सूचक असून तीन, दहा किंवा शंभर दिवसांच्या अखंड रात्रींचेही स्पष्ट किंवा अप्रत्यक्ष उल्लेख या कथांत आलेले आहेत. ' निर्ऋतीच्या उपस्थांत ' किंवा ' तमांत ' शयन करणारा सूर्य असे जे शब्द आलेले आहेत, त्यांवरून हा तम खरा असून लाक्षणिक अर्थाचा नव्हे हें उघड आहे. तात्पर्य या सर्व कथांचा भर दहा महिन्यांनंतर क्षितिजाखालीं जाणाऱ्या सूर्यावर असून हिंवाळ्यांत थोडा बहुत निस्तेज होणाऱ्या सूर्यावर नाहीं यांत शंका नाहीं. अश्विनांच्या सर्व पराक्रमांचें धोरण या अगाध तमाच्या निरालंब समुद्रांतून सूर्याला वर काढण्याकडे आहे. वसंतोपपत्ति व घौविकउपपत्ति या

दोन्हीही सूर्यसंबंधी आहेत, तरी ध्रौविक उपपत्ति जास्त व्यापक असल्यामुळें वसंतोपपत्तीनें उलगडा न होणाऱ्या अनेक गोष्टींचा तीवरून चांगला खुलासा होतो, व ही गोष्ट उलटपक्षीं ध्रुवोपपत्तीला पोषक होऊन तिला स्थापित करते.

सूर्याचें चक्र.

सप्त आदित्य व आठवा मार्तांड यांच्या गोष्टींवरून सात महिन्यांचा सूर्यप्रकाश व त्यानंतर येणारी मोठी थोरली अखंड काळोखाची रात्र अशी ध्रुवप्रदेशांतील एक स्थिति दिसून येते हें मागें सांगितलेंच आहे. अक्षांशाच्या मानानें ६ पासून ११ पर्यंत सूर्यप्रकाशाचे महिने ध्रुववृत्ताच्या आंतील प्रदेशांत असतात. नवग्व आणि दशग्व यांचीं वार्षिक सत्रें व अश्विनांच्या कथांपैकीं सप्तवध्रीची कथा यांवरून नऊ आणि दहा महिन्यांच्या सूर्यप्रकाशाच्या काळाचें अनुमान करतां येतें; हेंही येथपर्यंतच्या विवेचनावरून दिसून आलें आहे. आतां ऋग्वेदांतील प्रत्यक्ष सूर्याच्याच गोष्टीवरून असला कांहीं प्रकार अनुमित होतो कीं नाहीं हें पहावयाचें आहे. सूर्याच्या रथाला दहा किंवा सात घोडे आहेत अशा अर्थाच्या वचनांवरून दहा किंवा सात महिन्यांच्या प्रकाशाचें पूर्वी अनुमान केलेंच आहे. पण इंद्रानें सूर्याचें चक्र चोरून नेल्याची गोष्ट याहूनही स्पष्ट आहे. ही गोष्ट नीट कळण्यासाठीं इंद्राचा सूर्याशीं संबंध काय आहे हें पाहिलें पाहिजे. इन्द्र उषेसह सूर्याला उदयास आणितो व आकाशांत त्याची स्थापना करितो (८,३,६ इ०). तमांत पडलेल्या सूर्याला दशग्वांच्या साहाय्यानें इन्द्रानें माणसांसाठीं वर काढिलें (३,३९,५). त्यानें सूर्याला मार्ग करून दिला (१०,१११,३); व असुरांशीं युद्ध करून प्रकाश परत मिळविला. तात्पर्य इन्द्र हा सर्व ठिकाणीं सूर्याचा मित्र व सहायक आहे. असें असूनही ऋग्वेदांत[1] (१,१७५,४;४,३०,४;५,३१,१,१०,४३,५) सूर्याचें चक्र चोरून इंद्रानें त्याचा पराभव केल्याचें सांगितलें आहे. मेघाच्या योगानें सूर्य आच्छादून जाणें किंवा त्याचें रोजचें मावळणें या गोष्टींशीं वरील कथेचा संबंध असावा असें कित्येकांनीं अनुमान केलें आहे. परंतु इंद्रानें ढग उत्पन्न करणें व त्यानें सूर्याचें आच्छादन करणें ही गोष्ट अगदीं अनिश्चित असल्यामुळें एखाद्या कथेला ती आधारभूत

---

१ मुषाय सूर्यं कवे चक्रं; मघवा सूर्यं जयत्, इ०

धरली असेलसें संभवत नाहीं. रोजच्या सूर्याच्या मावळण्याशीं या कथेचा संबंध जोडण्याला आपल्यापाशीं कांहीं आधार नाहीं. ह्मणून दुसरा कांहीं तरी या गोष्टीचा खुलासा शोधून काढला पाहिजे. सूर्याच्या रथाला एक चाक आहे ही गोष्ट ऋग्वेदांत (१,१६६,२) तशीच* पुराणांतही प्रसिद्ध आहे. हें चक्र इन्द्रानें हरण केल्यावर सर्व व्यवहार अर्थातच बंद पडणार. या कथेंत हें चक्र म्हणजें प्रत्यक्ष सूर्याचें बिंबच सोय. सूर्य चक्रम् (सूर्य हें चक्र) असे जे शब्द ऋग्वेदांत (१,१७५,४;४,३०,४) आले आहेत, त्यांवरून असें मानावयास हरकत नाहीं. इन्द्रानें चक्र नेलें ह्मणजे प्रत्यक्ष सूर्यच नाहींसा झाला; केवळ रथाचें एक चाक गेलें असें नव्हे. पण इंद्रानें या चाकाचें केलें काय ? असुरांना जाळून टाकण्यासाठीं इंद्रानें सूर्यकिरणांचा उपयोग केलेला आहे (८,१२,९).[1] सूर्याचें चक्र उर्फ सूर्यबिंब चोरून नेण्यांतही इंद्राचा हाच हेतु असावा. पण इन्द्राचें असुरांशीं झालेलें युद्ध प्रकाशासाठीं मुख्यतः झालेलें असल्यामुळें सूर्याचें बिंब नेऊन त्यानें पुनः सूर्यालाच वर काढिलें असें कसें ह्मणावें ? असा प्रश्न उत्पन्न होईल. पण ही अडचण फारशी जड नाहीं. सूर्य व प्रकाश यासंबंधीं प्राचीन व अर्वाचीन कल्पना भिन्न आहेत. हे दोन्ही समवेत असतात असें आपण मानितों. पण **तमसि क्षियन्तम्** (तमांत राहिलेल्या) हें विशेषण ऋग्वेदांत सूर्यासंबंधानें निदान दोन वेळ तरी आलेलें आहे (३,३९,५;१,११७,५). त्यावरून क्षितिजाखालीं गेल्यावर सूर्याचें तेज नाहींसें होतें अशी वैदिक ऋषींची कल्पना स्पष्ट दिसून येते. ही गोष्ट मान्य केल्यास असुरांचा पराभव करून प्रकाश आणण्यासाठीं इन्द्राला सूर्यबिंबाचा काय उपयोग होता हें समजावयाला कठीण पडणार नाहीं. सूर्याचें तेज नाहींसें करणाऱ्या असुरांचा नाश करून त्याला पुनः तेजस्वी करण्यांत इंद्र त्याला साहाय्य करतो; ह्मणूनच "इंद्रानें सूर्याच्या चक्राला थांबविलें आणि गरगर फिरवून रजाच्या तळीं आच्छादक अंध-

---

* रथस्यैकं चक्रं भुजगयमिताः सप्त तुरगाः । निरालंबो मार्गश्चरणरहितः सारथिरपि ॥ या सुभाषितांत सूर्याच्या पौराणिक स्वरूपाचें सार आलें आहे.

१ इंद्रः सूर्यस्य रश्मिभिर्न्यर्शसानमोषति । ऋ. ८,१२,९.

कारांत त्याला फेंकून दिलें " असें झटलें आहे[1] (४,१७,१४). पण आपल्याला या बाबतींत विशेष महत्वाचा मंत्र झटला झणजे ६,३१,३ हा होय. तो असाः—

त्वं कुत्सेनाभि शुष्णमिंद्राशुषं
युध्य कुयवं गविष्टौ ।
दश प्रपित्वे अध सूर्यस्य
मुषायश्चक्रमविवेरपांसि ॥

याच्या पहिल्या दोन ओळींत कठीणपणा मुळींच नाहीं. त्यांचा अर्थ असाः—" हे इन्द्र, गाई मिळविण्यासाठीं तूं कुत्सासह अशुष आणि कुयव अशा शुष्णाशीं युद्ध कर." या मंत्राचें दुसरें अर्ध मात्र सरळ नाहीं. पदपाठांत 'अविवेरपांसि' हे शब्द 'अविवेः रपांसि' असे तोडले आहेत, व त्यांचा अर्थ 'संकटें नाहींशीं केलीं' असा आहे. आतां या दुसऱ्या दोन ओळींतील **दश** आणि **प्रपित्वे** हे दोन शब्द वगळतां बाकी शब्दांचा अर्थ असाः—" तूं सूर्याचें चक्र चोरून संकटें नाहींशीं केलींस." आतां **दश** आणि **प्रपित्वे** यांचा अर्थ काय तें पाहूं. सायणाचार्यांनीं **दश** झणजे **अदशः** असें समजून व **प्रपित्वे** झणजे 'युद्धांत' असा अर्थ घेऊन एकंदर पदाचा अर्थ " तूं युद्धांत (त्याला) दंश करतोस " असा केला आहे. पण ही केवळ ओढाताण असून, त्या अर्थाची याच गोष्टीचें वर्णन करणाऱ्या इतर स्थलांशीं संगति लागत नाहीं. उदाहरणार्थ, ऋ. ४,१६,१२ यांत 'शुष्णाला **अह्नः प्रपित्वे** मारिलें' असें म्हणून ५,३१,७ यांत 'प्रपित्वाला' पोंचल्यावर शुष्णाचा पराभव झाला असें सांगितलें आहे. या दोन्ही स्थळीं युद्धाचा काळच सांगितला आहे यांत कांहीं शंका नाहीं. या तिन्ही स्थळीं **प्रपित्व** शब्द आला असून तिन्ही ठिकाणीं शुष्णाशीं झालेल्या युद्धाचें वर्णन असल्यामुळें **दश प्रपित्वे, अह्नः प्रपित्वे** आणि **प्रपित्वं यन्** हीं सर्व पदें समानार्थकच समजलीं पाहिजेत. अर्थात्च प्रपित्वाचा अर्थ जो असेल तो तिन्ही ठिकाणीं एकच असला पाहिजे. प्रपित्व शब्द ऋग्वेदांत इतर ठिकाणींही

---

१ अयं चक्रमिषणत्सूर्यस्यं न्येतशं रीरमत्ससृमाणम् । आ कृष्ण ईंजुहुराणो निघर्तिं त्वचो बुध्ने रजसो अस्य योनौ ॥ ऋ. ४,१७,१४.

आला आहे. पण त्याच्या अर्थाविषयीं पंडितांचें ऐकमत्य नाहीं. कित्येक त्याचा **अग्रभाग** असा अर्थ समजून, **अन्हः प्रपित्वे** म्हणजे दिवसाच्या आरंभीं किंवा प्रातःकाळीं असा अर्थ करितात. सायणाचार्यांनीं ८,४,३ वरील भाष्यांत **प्रपित्वे**चा अर्थ 'प्राप्त झालें असतां,' (प्राप्तेसति) असा केला आहे. अशा स्थितींत **प्रपित्व** व त्याचा विरोधी असे शब्द जेथें आले असतील अशा स्थलांवरून अर्थाचा निश्चय केला पाहिजे. ऋ* ७,४१,४, व ८,१,२९, यांत **प्रापित्व** शब्दाचा **मध्ये** व **उदिता** या शब्दांशीं स्पष्ट विरोध दाखविला आहे. अर्थात् त्याचा अर्थ 'शेवटीं', 'अंतीं' असाच घेतला पाहिजे. वाजसनेयी संहिते वरील (२४,३७) व्याख्यानांत महीधरानें **प्रपित्वे** ह्मणजे **प्रपतने** असें समजून त्याचा अर्थ दिवसाच्या शेवटीं असा केला आहे. हा अर्थ घेतल्यास ४,१६,१२ यांतील **अन्हः प्रपित्वे नि वर्हीः** या वाक्याचा अर्थ इन्द्रानें शुष्णाला दिवसाच्या शेवटीं मारिलें असा होतो. दश प्रपित्वे या पदाचा अर्थ सदर अर्थाला अनुसरूनच केला पाहिजे. पण पदपाठांत केल्याप्रमाणें **दश प्रपित्वे** हे शब्द निराळे घेतले असतां तसा अर्थ घेतां येत नाहीं. म्हणून **दशप्रपित्वे** हें एक पद ध्यावें म्हणजे त्याचा अर्थ 'दहा (महिन्यां) च्या शेवटीं' असा होईल. या रीतीनें एकंदर ऋचेचा अर्थ असा होतो:—"हे इन्द्र गाई परत मिळविण्यासाठीं तूं सर्वभक्षक (अशुष) व धान्यांचा शत्रु (कुयव) अशा शुष्णावरोबर युद्ध कर. दहा (महिन्यां) च्या समातीनंतर तूं सूर्याचें चक्र चोरून संकटें नाहींशीं केलींस." हा अर्थ अगदीं सरळ असून त्यांत **दश** शब्दाचा नवीनच कांहीं तरी अर्थ करून इन्द्राला आपल्या शत्रूस दंश करविण्याची जरूर पडत नाहीं. **अन्हः प्रपित्वे** (४,१६,१२) व **दशप्रपित्वे** हीं दोन्ही पदयुग्में इंद्रशुष्णांच्या युद्धवर्णनांत आलेलीं असल्यामुळें **अन्हः प्रपित्वे** प्रमाणेंच **दशप्रपित्वे** हीं पद कालवाचक असावें असें सहजच दिसतें. अर्थात् त्याचा अर्थ **दशानां प्रपित्वे** (दहांच्या शेवटीं) असा घेण्यासाठीं **दश** व **प्रपित्वे** हीं पदें एकत्रच घेतलीं पाहिजेत. याप्रमाणें व्याकरणविषयक संबंध जुळविल्यावर

---

* उतेदानीं भगवंतः स्यामोत प्रपित्व उत मध्ये अह्नाम् । उतोदिता मघवन्त्सूर्यस्य वयं देवानां सुमतौ स्याम ॥ ७,४१,४. मम त्वा सूर उदिते ममध्यंदिने दिवः । मम प्रपित्वे अपि शर्वरे वसवा स्तोमासो अवृत्सत ॥ ८,१,२९.

दश ह्मणजे दहा 'दिवस' कीं दहा 'महिने' एवढेंच ठरवावयाचें राहिलें अन्हः प्रपित्वे या शब्दांवरून ते दहा दिवस असावे असें वाटण्याचा संभव आहे. पण इन्द्रशुष्णांचें युद्ध दाशाहिक खात्रीनें नसून वार्षिक किंवा दैनिक असल्यामुळें दश ह्मणजे दहा महिने असाच अर्थ घेतला पाहिजे. ७,१०३,९ यांत द्वादशास्य या संख्याविशेषणाचा द्वादशास्य मासस्य असाच अर्थ घेतलेला आहे. तर याप्रमाणें या मंत्रांत तमोरूप असुराला मारण्यासाठीं इन्द्रानें सूर्याचें चक्र केव्हां चोरिलें तें नक्की सांगितलें आहे. दशग्वांचें दशमासिक सत्र आटोपल्यावर ह्मणजे प्राचीन रोमन वर्षाच्या अखेरीस ही गोष्ट घडून आलेली आहे. वर सुचविलेली या मंत्रांतील पदांची रचना सरळ असून, त्याप्रमाणें होणारा अर्थ इतर गोष्टींशीं अगदीं जुळता आहे, इतकेंच नव्हे, तर चालू अर्थापेक्षां तो अधिक सयुक्तिकही आहे. चालू अर्थाची सर्व जबाबदारी पदपाठावर आहे; कारण त्यांत जर दश प्रपित्वे हीं पदें तोडलेलीं नसतीं तर त्याचा अर्थ इतका गूढ राहिला नसता. शिवाय पदपाठ ह्मणजे अगदीं अस्खलनशीलच आहे असेंही नाहीं. यास्क व सायणाचार्य यांनींही कित्येक वेळां त्यांत फेरफार सुचविलेले आहेत. (उदा. १,१०५,१८,१०,२९,१ आणि निरुक्त, ५,२१;६,२८). ह्मणून सदर मंत्राचा समाधानकारक अर्थ होण्यासाठीं पदपाठ सोडून दशप्रपित्वे हें एक पद घेण्यांत आम्हीही कांहीं भलत्याच मार्गाचें अवलंबन करीत आहों असें नाहीं. असा अर्थ घेतला असतां या मंत्रावरून सूर्याच्या वार्षिक गतीचें सविस्तर वर्णन आपल्याला मिळतें. सूर्याला उदयास आणून तो दहा महिने प्रकाशल्यावर पुनः त्याचें चक्र चोरून नेऊन त्याच्यासह तमोरूपी असुरांशीं झगडण्यासाठीं इंद्र क्षिति-जाखालीं जातो, असा या सर्व कथेचा तात्पर्यार्थ होय. हा अर्थ ध्रौविक उपपत्तीवरून नीट समजत असल्यामुळें तिच्या सत्यतेसंबंधाचें ही कथा ह्मणजे एक अप्रत्यक्ष प्रमाण होय.

विष्णूचीं तीन पदें.

ध्रुवप्रदेशांतील परिस्थिति दर्शविणाऱ्या दुसऱ्या कांहीं ज्या गोष्टी आहेत त्यांचाही याच प्रकरणांत विचार करूं. विष्णूचीं तीन पदें ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं स्पष्टपणें सांगितली आहेत, (१,२२,१७–१८; १, १५४,२). त्यासंबंधाचें दोन पूर्वाचार्यांचें मत यास्कानें (१२, १९)

दिलें आहे. त्यांपैकीं शाकपूणीच्या मतें हीं पावलें पृथ्वीवर, अंतरिक्षांत व आकाशांत ठेविलेलीं असावींत. दुसरा जो और्णवाभ त्याच्यामतें त्यांपैकीं एक पाऊल उदयगिरीवर (समारोहण), दुसरें स्व–स्वस्तिकीं (विष्णुपद), आणि तिसरें अस्तगिरीवर (गयशिरस्) अशी ठेवलेलीं असावींत. रामायणांत (४,४०,६४) एका ठिकाणीं उदयपर्वताच्या सौमनस नामक शिखरावर विष्णूचें पहिलें पाऊल पडलेलें आहे असें सांगितलें आहे. पुढें दुसरें पाऊल मेरूवर आहे असें सांगून "सूर्य जेव्हां उत्तरेकडे जंबुद्वीपाला प्रदक्षिणा करतो तेव्हां तो बहुधा मेरूच्या शिखरावरून दिसत असतो" असें म्हटलें आहे. यावरून विष्णूचें तिसरें पाऊल जंबुद्वीपांत सूर्यास्तानंतर ठेविलेलें असतें असा रामायणांचा मावार्थ दिसतो. हीं विष्णूचां पदें पुराणांत विष्णूचा पांचवा अवतार जो वामन त्याच्या तीन पदांच्या रूपानें आलेलीं आहेत. बलीची गोष्ट सर्व प्रसिद्धच आहे. बलीनें तीन पदें भूमी देतों ह्मटल्यावर वामनानें पहिल्या पदानें सर्व पृथ्वी भरून दुसऱ्या पदानें आकाश भरिलें. तेव्हां तिसरें पाऊल ठेवण्यासाठीं संपूर्ण विश्वांत कोठेंहि जागा न राहिल्यामुळें बळीनें आपलें वचन सत्य करण्यासाठीं म्हणून आपलें डोकें पुढें केलें व त्यावर वामनाला तिसरें पाऊल ठेवावयास सांगितलें. तेव्हां वामनानें बलीच्या डोक्यावर पाय देऊन त्यास पाताळांत ढकलिलें व इन्द्राला पुनः सर्व विश्वाचें राज्य मिळवून दिलें. या सर्व गोष्टींत विष्णु ह्मणजे सूर्य होय ही गोष्ट सर्वमान्य आहे.पण विष्णूचीं हीं तीन पदें दैनिक आहेत कीं सांवत्सरिक आहेत याविषयीं वैदिक पंडितांत एकमत नाहीं. यासाठीं प्रत्यक्ष वेदांतील विष्णूच्या वर्णनावरून याचा निर्णय करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ऋ. १,१५५,६ यांत विष्णूनें आपल्या चार नांवाच्या ९० अश्वांना चक्राप्रमाणें फिरावयास लाविल्याचें सांगितलें आहे, त्याचा संबंध ९० दिवसांच्या चार ऋतूंशीं उघड दिसतो; व त्यावरून विष्णूचें पराक्रम ह्मणजे सूर्याच्या वार्षिक गतीवरील रूपक होय असें मानावयास बळकट आधार मिळतो. तसेंच विष्णु हा इंद्राचा मोठा सखा (इंद्रस्य युज्यः सखा १,२२,१९) असून वृत्रांशीं लढण्यांत त्याची इन्द्राला पुष्कळ मदत झालेली आहे. वृत्राला मारतेवेळीं इन्द्रानें लवकर ये, असें विष्णूला सांगितलें असून (४,१८,११) विष्णूनें त्याच्या मदतीनें गाईंचा गोत्रही

फोडिला आहे (१,१५६,४), व दोघांनीं मिळून शंबराचा पराभव करून सूर्य, उषा व अग्नि यांना उत्पन्न केल्याचें ७,९९,४–५ यांत सांगितलें आहे. या गोष्टींत सांगितल्याप्रमाणें विष्णु जर इन्द्राचा मित्र व वृत्रयुद्धांत त्याचा सहायक असेल तर त्याचें तिसरें पाऊल या युद्धभूमीवर म्हणजे पाताळांत पडलेलें असलें पाहिजे. विष्णूचीं दोन पदें मात्र मनुष्यांना दृश्य असून तिसरें अदृश्य आहे असें जें १,१५५,५ यांत म्हटलें आहे त्याचा अर्थ आतां नीट कळून येईल. पाताळांतील तिसरें पाऊल अदृश्य आहे असें म्हणणें योग्यच आहे. वृत्राचें वसतिस्थान गुप्त (निण्य) असून तमोमय आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. विष्णूचीं तीन पदें म्हणजे सूर्याचें वार्षिक भ्रमण होय. पहिलीं दोन पदें तो क्षितिजावर असतांचीं असून तिसरें अखंड काळोखाच्या दीर्घ रात्रींतील म्हणजे या वृत्राच्या स्थानांतील होय. याच ठिकाणीं विष्णु इन्द्राला वृत्राचा पराभव करण्यांत आणि उषा, सूर्य व यज्ञ हीं परत मिळविण्यांत मदत करितो. मागच्या प्रकरणांत इंद्राचें वृत्राशीं उर्फ शंबराशीं होणारें युद्ध वसंत आरंभ धरून आठव्या महिन्यांत होतें असें दाखविलें आहे. हे सूर्यप्रकाशाचे आठ महिने व पुढचे काळोखाचे चार महिने मिळून विष्णूचीं तीन पावलें होत. विष्णु चार महिनेपर्यंत सुप्त असतो असें पुराणांत सांगितलें आहे, त्यावरूनही हेंच अनुमान निघतें. विष्णु क्षीर समुद्रांत अहि–(शेष) शयनावर निद्रा घेतो असें जे पुराणांत वर्णन आहे त्यांतील अहि व समुद्र म्हणजे पृथ्वीच्या खालचा पाताळांतील समुद्र ब वृत्ररूपी अही होत. विष्णूच्या चार महिन्यांच्या निद्रेचा संबंध कित्येकांनीं चार महिन्यांच्या पर्जन्यकाळाशीं लाविलेला आहे. पण ही मागाहूनची कल्पना आहे. विष्णूचें तिसरें पद व त्याची निद्रा हीं मूळचीं एकरूपच होत. शिवाय हें तिसरें पद अदृश्य असल्यामुळें त्याचा संबंध वर्षाकाळाशीं लावतां येत नाही; कारण वर्षाकाळांत सूर्य कांहीं सर्वस्वीं अदृश्य नसतो. ध्रुववृत्तान्तर्गत दीर्घ काळोखाच्या रात्रीशिवाय विष्णूच्या अदृश्य अशा तिसऱ्या पदाचा व निद्रेचा उलगडा होत नाहीं.

पण या पौराणिक गोष्टीशिवाय खुद्द वेदांतही अशाच धोरणाची विष्णुसंबंधी एक कथा आहे. विष्णूला ७,१००,६ मध्यें **शिपिविष्ट** हें कुत्सितार्थक नांव दिलेलें आहे. त्यांत ऋषि म्हणतो ' हे विष्णो तूं

आपल्याला **शिपिविष्ट** म्हणवून घेतलेंस, तर तसा तुझा दोष काय होता ?' शिपिविष्ट या पदासंबंधी एक जुनी दंतकथा देऊन हें पद ' कुत्सितार्थीय ' आहे असें सांगून (५,७–९), यास्कानें त्याचे दोन अर्थ दिले आहेत. " शेपः इव निर्वेष्टितः " म्हणजे ' गुह्येंद्रियाप्रमाणें वेष्टिलेला ' किंवा " अप्रतिपन्नरश्मि " म्हणजे ' ज्याचे किरण प्रच्छन्न झालेले आहेत ' असा पहिला अर्थ असून दुसरा ' ज्याचे किरण (शिपयः) आविष्कृत झालेले आहेत' (आविष्टाः) असा आहे. यावरून यास्काच्या वेळीं शिपिविष्ट शब्दाचा अर्थ अनिश्चित झालेला होता असें कांहीं पंडितांनीं अनुमान केलें आहे. पण असें मानण्याचें कारण नाहीं. अर्वाचीन संस्कृत वाङ्मयांतही शिपिविष्ट शब्दाचा " सडलेल्या केसांचा " किंवा " गलत्कुष्ट असलेला " असा वाईट अर्थ स्पष्ट आहे. शिपिविष्ट शब्दाचें मूळ स्मरणांतून गेल्यामुळें व तो शब्द विष्णुसारख्या देवतेला लावलेला असल्यामुळें त्याचा वाईट अर्थ घालविण्यासाठीं ब्रह्मवादि व पंडित यांनीं निरनिराळे अर्थ सुचविले. त्यांत **शिपि** शब्दाचा ' किरण ' असा अर्थ करून यास्कानें प्रथम त्यांतून चांगला अर्थ काढण्याचा यत्न केला. म्हणूनच बहुधा महाभारतांत (शां. प. अ. ४३२, श्लो.६९,७१) " शिपिविष्ट हें विशेषण यास्कानेंच प्रथम विष्णूला लाविलें " असें म्हटलेलें आढळतें. पण त्यावरून महाभारताचा कर्ता वेदानभिज्ञ होता असें मानणें मात्र सयुक्तिक नाहीं. तैत्तिरीय संहितेंत विष्णूची **शिपिविष्ट** म्हणून पूजा केलेली सांगितली आहे (२,२,१२,४–५) व शिपि शब्दाचा ' पशवः ' असा अर्थ दिला आहे. पण याप्रमाणें शिपि शब्द यज्ञ, पशु, किंवा किरण यांचा वाचक धरून व्युत्पत्तीच्या जोरावर शिपि-विष्ट शब्दाला चांगला अर्थ देण्याचे प्रयत्न बहुतांशीं फसले आहेत. यावरून शिपिविष्ट शब्दाचा मूळचा अर्थ वाईट असून कोणत्यातरी शारीरिक व्याधीचा तो दर्शक होता हेंच सिद्ध होतें. ब्रह्मवाद्यांनीं त्यांत कांहीं गुह्य अर्थ आहे असें सांगितलें आहे. पण याचें कारण त्या शब्दाचा खरा अर्थ त्यांस माहित नव्हता हें नसून आपल्या देवतेला असलें वाईट नांव नसावें ही इच्छाच होय. ७,१००,५–६ यांत आलेल्या शिपिविष्ट शब्दाचा

वर सांगितलेला वाईट अर्थच आहे यांत संशय नाहीं. त्या* ऋचांचा भावार्थ असाः—'हे विष्णो, ज्ञातव्य गोष्टी जाणणारा मी तुझा भक्त तुझ्या शिपिविष्ट या नांवाची स्तुति करितों; शक्तिहीन असा मीं सामर्थ्यवान् आणि या लोकाच्या पलीकडे रहाणाऱ्या तुझें स्तवन करितों. मी शिपिविष्ट आहें असें तूं ह्मणतोस तर तें तुझें नाम वर्जनीय कां असावें? अन्यरूप धरून संग्रामांत तूं गेलेला असल्यामुळें हें तुझें रूप तूं आह्मांपासून लपवूं नको.' रजसः पराके (या लोकाच्या पलीकडे) असे जे शब्द यांत आलेले आहेत, त्यांवरून या ऋचांच्या खऱ्या अर्थाचें धोरण समजण्यासारखें आहे. या पलीकडच्या लोकांतच विष्णूला हें वाईट उपपद मिळालें आहे. हें वाईट उपपद आहे तरी काय? **शिपिविष्ट** याचा अर्थ वर सांगितल्याप्रमाणें 'शेपाप्रमाणें वेष्टिलेला' असा आहे; म्हणजे विष्णूचें तेज या खालच्या लोकांत असेपर्यंत तमामुळें लुप्त झालेलें होतें. म्हणूनच या उपपदांबद्दल विषाद मानूं नको असें ऋषीनें विष्णूला सांगितलें आहे. या नामानें सूचित होणारें रूप विष्णूनें तात्पुरतें स्वीकारलेलें असल्यामुळें असुरवधानंतर त्याची गरज संपते; आणि म्हणूनच खरें स्वरूप प्रकट करण्यासाठीं विष्णूची ऋषीनें प्रार्थना केली आहे. हाच या वर सांगितलेल्या ऋचांचा खरा अर्थ होय. क्षितिजावर असतांना सूर्याला **बृहच्छेप** असें म्हटल्यास तमोमय अशा पाताळांत त्याला **शिपिविष्ट** ऊर्फ "शेपाप्रमाणें (शिश्नाप्रमाणें) वेष्टिलेला" असें म्हणणें योग्यच होईल. यांत विष्णूच्या भक्ताला विषाद मानण्यासारखें कांहींच नाहीं. तात्पर्य ह्या गोष्टीचा संबंध रोगयुक्त होत्साता विष्णूनें पाताळांत जाऊन असुरांच्या मस्तकावर आपलें पद ठेविलें, किंवा जलें, प्रकाश, सूर्य, उषा इत्यादिकांना वर आणण्यासाठीं इन्द्र युद्ध करीत असतां कृष्णकवच घालून त्याला मदत केली व अखंड काळोखाच्या दीर्घ रात्रीनंतर सूर्याला तेजोयुक्त करून वर आणिलें या गोष्टीशींच आहे.

---

* प्रतत्ते अद्य शिपिविष्ट नामार्यः शंसामि वयुनानि विद्वान् । तं त्वा गृणामि तवसमतव्यान्क्षयन्तमस्य रजसःपराके ॥ ५ ॥ किमित्ते विष्णो पारिचक्षं भूत्प्रयद्वक्षे शिपिविष्टो अस्मि । मा वर्पो अस्मदपगूह एतद्यदन्यरूपः समिथे बभूथ ॥ ६ ॥ ऋ. ७,१००.

विष्णूप्रमाणेंच संपूर्ण विश्वाचें आक्रमण करणाऱ्या ज्या अन्य वैदिक देवता आहेत, त्यांच्या वसतिस्थानाचा विचार करतांही हेंच अनुमान दृढ होतें. सविता, अग्नि व अश्विन या देवता अशा प्रकारच्या आहेत. निरनिराळ्या लोकांचें आक्रमण करणाऱ्या सवित्यार्चीं (५,८१,३) तीन आकाशें (द्यावः) असून त्यांतील दोन जवळ जवळ आहेत व तिसरें यमाच्या प्रदेशांत आहे (१,३५,६), याचा अर्थ सवित्यार्चीं दोन ठिकाणें वरच्या आकाशांत असून तिसरें पाताळांत आहे असा होय. अग्नीचींही तीन ठिकाणें असून एक समुद्रांत, दुसरें आकाशांत (दिवि) व तिसरें जलांत आहे (अप्सु. १,९५,३). विष्णूलाच केवळ माहीत असलेलें असें अग्नीचें तिसरें स्थान (१९,१,३) व विष्णूचें तिसरें पद हीं एकच असलीं पाहिजेत. अग्नि हें सूर्याचेंच एक रूप असल्यामुळें त्याचें पाण्यांत गुप्त होणें व **अपां नपात्** (पाण्याचा पुत्र) होऊन त्यांतून वर येणें म्हणजे सूर्याचें क्षितिजाखालीं गेल्यावर बऱ्याच दिवसांच्या अखंड काळोखानंतर उदयास येणेंच होय. अश्विनांचींही तीन स्थानें असून (८,८,२३) त्यांच्या रथाच्या तीन चाकांपैकीं एक विष्णूच्या तिसऱ्या पदाप्रमाणें एका गुप्त ठिकाणीं आहे. या तीन देवतांच्या स्थानांतील साम्य काकतालीय मानतां येत नाहीं; आणि म्हणून वर दिलेल्या सर्व वचनांवरून असा ग्राह्यांश निघतो कीं, या देवतांचीं तृतीय ऊर्फ गुप्त स्थानें जलमय व तमोमय असा जो पाताळांतील पितृलोक, ऊर्फ यमलोक त्यांतच कोठें तरी असलीं पाहिजेत.

त्रित आप्त्य.

विष्णूचीं तीन पदें म्हणजे चतुर्मासात्मक असे वर्षाचे तीन विभाग असून त्यांपैकीं पहिलीं दोन दृश्य असून तिसऱ्यांत सूर्य क्षितिजाखालीं गेल्यामुळें तें अदृश्य असतें हें वरील विवेचनांत दाखविलें आहे. आतां रूपकानें या तीन विभागांना बंधु कल्पिल्यास त्यांपैकीं पहिले दोन तिसऱ्याला काळोखाच्या खांचेंत लोटून देतात अशी कथा तयार होईल; आणि खरोखरच ऋग्वेदांतील **त्रित आप्त्य** व अवेस्त्यांतील **थाएतौन** यांची गोष्ट अगदीं अशी आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत (३,२,८,१०–११) **एकत, द्वित,** आणि **त्रित** ऊर्फ पहिला, दुसरा व तिसरा अशा तीन बंधूची गोष्ट आली असून तींत **त्रिताला** पहिल्या दोन बंधूंनी कूपांत ढकलिलें व तेथून त्याला बृहस्पतीनें वर

काढिलें असें सांगितलें आहे. **एकत** हा ऋग्वेदांतें कोठें आलेला नसून **द्वित** दोन ठिकाणीं आलेला आहे (५,१८,२;८,४७,१६). **त्रित** शब्द संख्याविशेषण म्हणून ६,४४,२३, यांत आलेला असून **त्रितेषु रोचनेषु** (तिसऱ्या लोकांत) असा प्रयोग तेथें केलेला आहे. **त्रित** या वैदिक देवाला **आप्त्य** म्हणजे पाण्यापासून उत्पन्न झालेला किंवा 'जलनिवासी' असें उपपद लाविलेलें आहे. वृत्राचा वध करण्यांत मरुत् व इन्द्र यांचा सहायक म्हणूनही तो पुष्कळ वेळां आला आहे. १०,८,८ यांत 'इंद्राच्या प्रोत्साहनानें **त्रितानें** त्वष्ट्याचा पुत्र जो **त्रिशिरस्** त्याला मारून गाई मोकळ्या केल्याचें सांगितलें आहे. १०,९९,६ यांत त्यानें आपल्या लोखंडी वज्रानें वराहाला मारिलें असें म्हटलें आहे. पण त्याच्या कथेंतील आपल्याला महत्वाची अशी गोष्ट १,१०५ यांत सांगितली आहे. या सूक्तांत **त्रित** हा वस्त्रांत किंवा कूपांत पडलेला असतां त्यानें आपल्या मुक्ततेसाठीं देवांची प्रार्थना केली; तेव्हां बृहस्पतीनें त्याला दुःखमुक्त केलें (१७) असें सांगितलें आहे. या सूक्तांपैकीं कित्येक मंत्र बरेच सूचक आहेत. उदाहरणार्थ, ९ व्यांत त्यानें आकाशांतील रश्मींशीं आपला संबंध सांगून तो आपल्याला माहित असल्याचेंही त्यानें सांगितलें आहे. १८ व्यांत रक्त वृकाला तो जात असतां दिसल्याचें वर्णन आहे. या गोष्टींवरून त्रिताचा प्रकाशदेवतांशीं संबंध असून कालपरत्वें तो तमोमय कूपांत पडलेला होता असें दिसतें. ९,१०२,२ यांत त्रिताचें स्थान, विष्णूच्या तिसऱ्या पदाप्रमाणें, गुप्त असल्याचें सांगितलें आहे. अवेस्त्यांतही अशीच गोष्ट आली आहे. आथ्व्य (सं—आप्त्य) हें पैतृक नाम असलेला **थाएतौन** यानें **अझि दहाक** नांवाच्या तीन शिराच्या व सहा डोळ्यांच्या असुराला मारिलें. या असुरावर चाल करून जात असतां थाएतौनचे दोघे बंधु त्याच्याबरोबर असून त्यांनीं वाटेंत त्याचा वध करावयाचा विचार चालविला होता. अशा रीतीनें या वैदिक व अवेस्तिक गोष्टींत उत्कट साम्य असल्यामुळें वर दिलेली ब्राह्मणांतील कथा ऋग्वेदांतील इकडच्या तिकडच्या कांहीं फुटकळ वचनांवरून जुळविलेली होती असें म्हणतां येत नाहीं. पण ध्रुवोपपत्तीच्या अभावीं चार महिन्यांच्या अखंड काळोखाची कल्पना पुढें आलेली नसल्यामुळें **त्रिताचें** नांव **त्रित** ऊर्फ **तिसरा** असें कसें पडलें हें पाश्चात्य पंडितांस कळलें नाहीं, म्हणून त्यांनीं त्याच्या गोष्टीचा खुलासा करण्यासाठीं

मोठ्या गमतीच्या कल्पना लढविल्या आहेत. मॅक्स मुल्लरच्या मतें त्रित याचें मूळचें रूप तृत असें असून त्याचा अर्थ अर्वाचीन तराणि प्रमाणें 'तरून जाणारा' असा असावा व त्याचा संबंध सूर्य रोज मावळल्यावर खालच्या समुद्रांतून तरून पुनः वर येतो या कल्पनेशीं असावा. पण जुन्या आयरिश भाषेंतील समुद्रवाचक **त्रिअथ** शब्द स्वरशास्त्राच्या दृष्टीनें ग्रीक **त्रितोन,** संस्कृत **त्रित** आणि झेन्द **थ्रित** या शब्दांशीं संबद्ध असल्यामुळें, तसेंच जुन्या नॉर्स भाषेंत **आदिन्** (इंद्र) वाचक **थ्रिदि** असाच शब्द असल्यामुळें तृत शब्दाचें **त्रित** असें गैरसमजामुळें रूपान्तर झालें असल्यास तें या निरनिराळ्या आर्य शाखांची फाटाफूट होण्यापूर्वीच झालेलें असलें पाहिजे असें समजावें लागतें व मॅक्स मुल्लरनें तसें मानिलेंही आहे. त्रित झणजे तिसरा कसा हें सांगतां न आल्यामुळें मॅक्समुल्लरला एवढा खटाटोप करून कांहींएक आधाराशिवाय निवळ स्वतःच्या कल्पनेवर प्राचीन आर्यांच्या पदरीं विनाकारण गैरसमज बांधावा लागला आहे. पण ध्रुवोपपत्तीच्या साहाय्यानें त्रित झणजे तिसरा कसा हें सहज समजतें. त्रिताचा काळोख समुद्र व प्रकाश यांशीं असलेला संबंध, वृत्राच्या वधांत त्यानें केलेली कामगिरी, जुन्या आयरिश भाषेंतील समुद्रवाचक **त्रिअथ** शब्द, या सर्व गोष्टींचाही आतां उलगडा होण्यास अडचण पडणार नाहीं. पाताळ लोक हा जलवाष्पांचें वास्तव्यस्थान असल्यामुळें त्यांतून बृहस्पतीनें त्याला वर काढिलें हें ठीकच आहे. त्रिताच्या स्थानासंबंधानें मॅक्समुल्लरनें लिहिलें आहे कीं " त्रिताचें गुप्त स्थान ऊर्फ वज्र हें ज्या अनारंभण तमांतून सूर्य व त्याचींच अन्य रूपें असलेले असे अत्रि, वंदन आदिकरून दररोज वर येतात तो अनंत असा काळोखाचा प्रदेशच होय." यापैकीं **दररोज** हे शब्द वगळले असतां त्रिताच्या कथेचें खरें स्वरूप या वाक्यांत बरोबर सांगितलें आहे असें दिसून येईल. त्रिताचें स्थान काळोखांतील आहे एवढें समजल्यावर ध्रुवोपपत्तीशीं पोंचावयास कांहीं फार प्रयास नको होते. त्याच्या गोष्टींतील इतर बाबींचा मॅक्समुल्लरनें योग्य संबंध लाविला असूनही **दररोज** या शब्दानें सगळ्यांची माती झाली आहे. झणून तेवढा शब्द गाळला कीं त्या विद्वान् पंडितांच्या शब्दांतच त्रिताचें खरें स्वरूप व्यक्त झालेलें दिसून येईल.

आपः.

दिव्य जलांचें सविस्तर वर्णन मागील प्रकरणांत आलेंच आहे. पाताळ लोक उपड्या कटाहाप्रमाणें मानिलेला असल्यामुळें तेथें जाणारी प्रत्येक देवता ' अनारंभणे तमसि ' किंवा 'अबुध्न समुद्रांत' जाते असें म्हटलेलें आहे. या समुद्राच्या कडेवर खालच्या व वरच्या लोकांमध्यें मर्यादा घालणाऱ्या पर्वताचीही कल्पना केलेली आहे. पाताळांतून "आपः"ना वर यावयाचें म्हणजे वृत्रानें बुजविलेलीं या पर्वतावरील विवरें किंवा द्वारें खुलीं करावीं लागत. बृहस्पतीनें खुल्या केलेल्या अवताचें (विहिरीचें) मुख धोंड्यांनीं बंद झालेलें [अश्मास्यम्] होतें [२,२४,४], व पणीनें ऊर्फ वृत्रानें ज्या किल्यांत गाईना अडकवून ठेविलें होतें, त्या किल्याचे दरवाजेही दगडांचेच होते [१०,६७,३]. वृत्राच्या उदरांत एक पर्वत असून† (१,५४,१०) शंवराचें वास्तव्यही पर्वतावरच होतें. निरुक्तकारांनीं वेदार्थनिर्णयाची मोठी कामगिरी केली हें खरें. तरी कित्येक ठिकाणीं व्युत्पत्तीला त्यांनीं फारच वाहविली आहे; व त्याअन्वयें वरील "पर्वता" च्या अर्थाचीही फार ओढाताण करून गैरसमजामुळें त्याचा अर्थ त्यांनीं मेघ असा केला आहे. तरी पण येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून जलमय अशा पाताळाचा, पर्वत व काळोख यांशीं स्पष्ट संबंध दिसून येतो. वृत्र, भुज्यु, सप्तवध्रि, त्रित इत्यादिकांच्या गोष्टींवरून हीं पाताळांतील जलें केवळ दुष्ट असुरांचेंच वास्तव्यस्थान नसून, सूर्य, अग्नि, विष्णु, अश्विन आणि त्रित यांनांही वर्षांतून कांहीं काळ त्यांत जाऊन रहावें लागे असें दिसतें. विष्णूचें निद्रा घेण्याचें किंवा रोगयुक्त झाल्यास प्रच्छन्न रहाण्याचें ठिकाण हेंच. त्यांतच यज्ञिय अश्वाला त्रितानें सज्ज केल्यावर त्यावर इंद्रानें प्रथम आरोहण‡ केलें, (१,१६३,२). आर्यांच्या मूलस्थानांत सात महिने प्रकाशणाऱ्या सात सूर्यांना घेऊन वहाणाऱ्या सात अंतरिक्षांतील नद्यांचें उगमस्थानही या पाताळांतील आपःच होत. अंतरिक्षांत वाहून पर्जन्यरूपानें पृथ्वीवर जलाची समृद्धि करणाऱ्या आपः याच. तीन पृथ्वींच्या खालून पश्चिमेकडून पूर्वेकडे अशा त्या पसरलेल्या असून त्यांतच प्रलयस्थान व सूर्यादि प्रातःकालिक देवतांचें जन्मस्थान

---

† अंतर्वृत्रस्य जठरेषु पर्वतः । ऋ. १, ५४, १०.

‡ यमेन दत्तं त्रित एनमायुनगिंद्र एणं प्रथमो अध्यतिष्ठत् । ऋ. १,१६३,२.

होतें. वरुण व यम यांचें साम्राज्य यांतच असून पितृही यांतच सुखा-समाधानानें रहात. पृथ्वी किंवा द्यौ यांप्रमाणेंच या आपोमय पाताळा-चाही तीन, सात किंवा दहा प्रकारचा विभाग वैदिक ऋषींनीं केला होता. तात्पर्य वर्‍याचशा वैदिक व पौराणिक कथांचा नीट उलगडा व्हावयाला पाहिजे असेल, तर या दिव्य आपःचें स्वरूप नीट ध्यानांत आणिलें पाहिजे. तसें न केल्यास त्या कथांत केवळ गोंधळच आहे असें वाटण्याचा बराच संभव आहे. या ठिकाणीं संकलित केलेलीं हीं आपःचीं वरींच लक्षणें पृथ्वीवरील क्षारसमुद्रालाच अर्वाचीन वाङ्मयांत लाविलेलीं आहेत. उदाहरणार्थ भर्तृहरीनें " इतः स्वपिति केशवः " इत्यादि श्लोकांत समुद्राविषयींच्या पौराणिक आख्यायिकांचें संकलन केलें आहे. या सर्व आख्यायिका वैदिक आपोदेवतांच्या कल्पनेवरच रचिलेल्या आहेत. सर्व जगतीचें उद्गमस्थानच अशा ह्या आपोदेवतांचें वेदांमध्यें एवढें महत्व कां आहे हें आतां निराळें सांगावयास नको.

सप्तमूल आणि दशमूल विभाग.

वेदांमध्यें सप्तमूल व दशमूल विभाग अनेक प्रकारें आला आहे. पाताळ, पृथ्वी आणि द्यौ यांचे तीन, सात, किंवा दहा विभाग, तसेंच सात, नऊ किंवा दहा महिन्यांनीं संपणारीं वार्षिक सत्रें, नवग्व, दशग्व इत्यादिकां-विषयीं मागें उल्लेख आलाच आहे. इतर राष्ट्रांच्या पुराणांतही असा दोन प्रकारचा भेद आढळून येत असल्याबद्दल मागें उल्लेख केलेला आहे. या विभागांपैकीं सप्तमूल विभागासंबंधानें यास्क व सायणाचार्य एवढेंच म्हणतात कीं, सूर्याचे किरण सात प्रकारचे असल्यामुळें त्याचे घोडे किंवा

---

१ इतः स्वपिति केशवः कुलमितस्तदीयद्विषाम् । इतोऽपि शरणार्थिनः शिखरिणां गणाः शेरते ॥ इतोऽपि वडवानलः सह समस्त-संवर्तकैः । अहो वितनमूर्जितं भरसहं च सिंधोर्वपुः ॥ भर्तृहरि-नीतिशतक.

भावार्थ-अहो या सागराचें शरीर किती विस्तृत, भव्य आणि सहन-शील आहे ह्मणून सांगावें ! त्याच्या एका कोनांत केशव (विष्णु) निद्रा घेतो आहे, तर दुसऱ्यांत त्याच्या शत्रूंच्या (राक्षसांच्या) टोळ्या राहिलेल्या आहेत; एका बाजूला पर्वतांचे गण आश्रयासाठीं वसले आहेत, तर दुसऱ्या बाजूला प्रलयकालीन मेघांसह वडवानल पडला आहे.

अग्नीच्या जिव्हा सात कल्पिलेल्या आहेत. शं. पां. पंडित यांनीं तर वेदार्थयत्नांत या सप्तमूल विभागाचा संबंध लोलकांतून दिसणाऱ्या सात प्रकारच्या रंगांशींच लावला आहे. सकृद्दर्शनीं हें सर्व ठीक दिसतें. पण या सप्तमूल विभागांबरोबरच जिकडे तिकडे दशमूल विभागही सांगितला असल्यामुळें थोडा विचार केल्यास या खुलाशासंबंधानें शंका येऊं लागते. सायणाचार्य व यास्क यांनीं या दुसऱ्या दशमूल विभागांकडे दुर्लक्ष करूनच वेळ मारून नेली आहे. पण हा विभाग इतक्या ठिकाणीं आला आहे कीं, त्याकडे दुर्लक्ष करतां येणें शक्य नाहीं. म्हणूनच या दोन प्रकारच्या विभागांचें कारण शोधून काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. करितां प्रथम हे दोन्ही विभाग किती किती प्रकारानें आले आहेत तें पाहूं.

प्रथम सूर्य घेऊं. त्याला ५,४५,९ यांत सात अश्वांचा म्हणून १,१६४,३ यांत त्याच्या रथाचीं सात चाकें असून त्याला सात घोडे किंवा सात नांवाचा एक घोडा जोडलेला असतो असें म्हटलें आहे. पण ९,६३,९ यांत सूर्यानें आपल्या रथाला दहा घोडे जोडल्याचें सांगून १,१६४,१४ यांत संवत्सर देवतेचें चक्र दहा घोडे ओढीत असल्याचें सांगितलें आहे. अथर्ववेदांत सूर्याच्या रथाला अष्टाचक्र म्हटलें आहे. (९,४,२२).

सप्तरश्मि हें विशेषण इंद्राला (२,१२,१२) तसेंच त्याच्या रथाला लाविलेलें आहे (६,४४,२४). पण ५,३३,८ यांत दहा अश्व त्याला वाहून नेतात असें म्हटलें आहे. ८,२४,२३ यांत त्याच्याविषयीं दशमं नवम् असे शब्द आले आहेत. तैत्तिरीय आरण्यकांत (३,११,१) इंद्राचा आत्मा दहाप्रकारें गमन करतो असें सांगितलें आहे (इंद्रस्यात्मानं दशधा चरंतम्). त्याचप्रमाणें अवेस्त्यांत वेरेथ्घा (वै. वृत्रहन्) चे दहा अवतार सांगितले आहेत. दशद्यु (दहा प्रकारें प्रकाशणारा) नामक एक इंद्राचा आश्रित असून (१,३३,१४; ६,२६,४) दशोणी व दशमाय अशा दोन असुरांना त्यानें द्योतनाकडून पादाक्रान्त करविलें आहे (६,२०,८).

सोम व पूषन् यांचा रथ पंचरश्मि व सप्तचक्र असून (२,४०,३) सोमाचे रश्मि ९,९७,२३ यांत दहा सांगितले आहेत.

अग्नीचे रश्मि सात असून (१,१४६,१; २,५,२) त्याचे अश्व सप्तजिव्ह आहेत (३,६,२). पण १,१४१,२ यांत त्याला दशप्रमति म्हणून, १०,५१,३ यांत त्यांची दहा गुप्त स्थानें सांगितलीं आहेत.

९,८,४ यांत धिति (प्रार्थना) सात सांगितल्या असून १,१४४,५ यांत त्या दहा सांगितल्या आहेत.

अन्नें सात असून (३,४,७), १,१२२,१३ यांत तीं दहा प्रकारचीं सांगितलीं आहेत. शतपथ ब्राह्मणांत (१,८,१,३४) दहा प्रकारें तयार केलेलें हवि सांगितलें आहे.

सात विप्र (३,७,७) किंवा सात होते (३,१०,४; ४,२,१५; १०,६३,७) कित्येक ठिकाणीं सांगितले आहेत. पण तैत्तिरीय ब्राह्मणांत (२,२,११; २,२,४,१) दहा होते स्पष्ट सांगितले असून दहा दशाग्व तर प्रसिद्धच आहेत (३,३९,५).

प्रथमज होता जो बृहस्पति तो सप्तास्य असून (४,५०,४) अथर्व वेदांत एके ठिकाणीं (४,६,१) त्याला दशास्य व दशशीर्ष्ण म्हटलें आहे.

पृथ्वीचे विभागही सात (१,२२,१६) किंवा दहा (दशावनी) आहेत (१०,९४,७)

अश्विनांनीं फोडलेला गायवाडा सप्तास्य असून (१०,४०,८) ८,८,२०;४९,१०;५०,९ यांत दशव्रजही सांगितला आहे.

१०,९३,४ यांत अर्यमा, मित्र, वरुण, रुद्र, मरुत्, पूषन् आणि भग असे सात राजे आले आहेत. पण ८,५,३८ यांत दहा हिरण्यसदृश राजे सांगून, ७,८३,७ यांत दहा अयज्यु (यज्ञ न करणारे) राजे सांगितले आहेत.

येणेंप्रमाणें देवता किंवा तद्विषयक वस्तु यांचे विभाग आहेत. हे सर्वच ठिकाणीं सारखे स्पष्ट असतील असें नाहीं. तरी एकंदरींत त्यांच्या सप्तमूल व दशमूल विभागांसंबंधानें शंका येण्याचें कारण नाहीं. याशिवाय पृथ्वी, आकाश व पाताळ ह्यांचे प्रत्येकीं तीन विभाग, आणि देवांचे प्रत्येक लोकांतील ११ प्रकार आहेत ते निराळेच. अथर्ववेदांत (११,७,१४) आणखी नऊ पृथ्व्या, नऊ समुद्र व नऊ आकाशें सांगितलीं आहेत. इतक्या सर्व प्रकारच्या विभागांचा उलगडा यास्काच्या

रीतीनें होत नाहीं. कारण सप्तमूल विभाग सूर्याच्या सात किरणांवरून झाला किंवा त्रिमूल विभाग पृथ्वी, आकाश व पाताळ यांवरून सुचला असें मानिलें, तरी इतर प्रकारच्या विभागांचें कारण त्यावरून समजत नाहीं. पण सात विप्र, नवग्व व दशग्व यांच्या साम्यावरून ह्या विभागांचें स्पष्टीकरण होण्यासारखें आहे. सूर्याच्या सात किंवा दहा घोड्यांचा संबंध सूर्यप्रकाशाच्या सात किंवा दहा महिन्यांशीं असावा हें साहाजिक दिसतें. ध्रुववृत्तान्तर्गत आर्यांच्या मूलस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं अक्षांशाच्या मानानें प्रकाशयुक्त महिन्यांची संख्या सात पासून अकरापर्यन्त होती. पण त्यांत सात, नऊ व दहा महिने प्रमुख होते असें सप्त विप्र, नवग्व व दशग्व यांवरून दिसतें. अंगिरस् हे **विरूप** (नानाविध) असल्याचें मागें सांगितलेंच आहे. त्याचप्रमाणें **अर्यमा** हाही आपल्या अनेकविध रूपांपैकीं (विषुरूपेषु) **सप्तहोतृ** या रूपानें विशेष प्रसिद्ध होतासें दिसतें (१०,६४,५). अंगिरसांना ' असुरांचे वीर ' म्हटलेलें आहे (३,५३,७). १०,२७, १५ यांत, सात, आठ, नऊ आणि दहा असे वीर सर्वत्र उद्भूत होत असल्याचें सांगितलें आहे. अर्थात् या संख्यांचा संबंध होत्यांच्या संख्येशींच असला पाहिजे. हे वीर खालीं, वर, मागें पुढें असे सर्वत्र उद्भूत होत असल्याचें सांगितलें आहे; त्याप्रमाणेंच ८,४,१ यांतही* इंद्राचें पूजन पुढें, मागें, खालीं, वर असें सर्वत्र होतें असें म्हटलें आहे. याचा अर्थ एवढाच कीं, ध्रुवाजवळील भूमींत निरनिराळ्या स्थळीं प्रकाशयुक्त महिन्यांच्या मानानें निरनिराळ्या प्रकारचे होते (होतारः) होते. ध्रुवोपपत्तीशिवाय दुसऱ्या कोणत्याही उपपत्तीनें या सर्व गोष्टींचा उलगडा होत नसल्यामुळें सध्यां तरी तिचें ग्रहण करणें उचित होय.

दहा राजे आणि रावण.

दहा हिरण्यसदृश राजे (८,५,३८) आणि दहा यज्ञ न करणारे राजे (अयज्यवः दश राजानः ७,८३,७) ऋग्वेदांत आलेले असून त्यांच्यासंबंधानें एक विशेष महत्वाची गोष्ट आहे. दिवोदास अतिथिग्वाचा पुत्र सुदास हा या दहा राजांशीं लढत असतां त्याचा पुरोहित जो वसिष्ठ

---

* यदिंद्र प्रागपागुदङ् न्यग्वा हूयसे नृभिः । ऋ. ८, ४, १.

त्यानें इंद्रावरुणाची मदत त्याला मिळवून दिली होती (७,३३,३–५; ८३,६–८). या युद्धाला **दाशराज्ञ** युद्ध म्हटलेलें आहे. हें युद्ध आर्य व अनार्य यांच्यांत झालेलें होतें असें कित्येक पंडितानीं ठरविलें आहे. पण आमच्या मतें इन्द्र व सप्तदानू यांच्या युद्धाचेंच तें एक निराळें स्वरूप असावें. सप्तमूल भेदान्वयें इंद्राला सप्तहन् (१०,४९,८) म्हटल्यास दशमूल भेदान्वयें तो दशहन् होईल. दशहन् शब्द ऋग्वेदांत प्रत्यक्ष आलेला नाहीं, तरी या दहा राजांशीं झालेल्या त्याच्या युद्धावरून तें मान सहज येतें. दशमाय व दशोणी हे इन्द्राचे शत्रू असून, दशद्यु हा त्याचा एक आश्रित आहे; या गोष्टींचा विचार केल्यास सप्तदानूंप्रमाणें इंद्राचे तमोरूप शत्रू दशविधही मानिलेले असून, सुदास व ' अयज्यवः दश राजानः ' यांतील युद्ध म्हणजे दशग्वाच्या भूमींतील प्रकाश व काळोख यांतील युद्ध होय असें दिसून येईल. पण या युद्धाचें महत्व याहूनही अधिक आहे. राजन् शब्द ऋग्वेदांत केवळ क्षत्रियवाची नसून एकदां तर तो अंगिरसांनाही लाविलेला आहे (१,१३९,७). म्हणजे ' दहा हिरण्यसंदृश राजे, ' ' दहा होते, ' ' दहा अंगिरस ' किंवा ' दहा महिन्यांचें सत्र करणारे दशग्व ' या सर्वांचा अर्थ एकच आहे. अंगिरसांचा मुख्य जो बृहस्पति तो सप्तास्य किंवा दशास्य असा दोन्ही प्रकारचा ऋग्वेदांत सांगितला आहे. सरमा व पणी यांच्या कथेशीं या बृहस्पतीचा संबंध असून त्यानें इंद्राला साहाय्य करून, किंवा कित्येक वेळां स्वतःही, गाई परत आणण्याचें काम केलेलें आहे. (१,८३,४;१०,१०८, ६–११). बृहस्पतीची नाहींशी झालेली स्त्री देवांनां परत मिळवून दिल्याची गोष्ट १०,१०९ यांत सांगितली आहे. तैत्तिरीय आरण्यकांत इंद्राला अहल्येचा जार (अहल्यायै जारः) म्हटलें असून, या दोन्ही गोष्टींचा संबंध पंडितांनीं उशेशीं लाविला आहे.

या सर्व गोष्टी मोठ्या सूचक असून त्यांवरून रामायणांतील कित्येक गोष्टी सहज लक्षांत येतात. रामायणाला ऐतिहासिक आधार आहे कीं नाहीं हें पहाण्याचें हें स्थळ नव्हे. तरी त्यांतील मूलभूत कथा व वैदिक कथा यांतील साम्य मोठें चटकदार असल्यामुळें त्याचा येथें थोडासा उल्लेख करणें गैर होणार नाहीं. रामायणांतील मुख्य गोष्ट इतकी सविस्तर सांगितलेली आहे कीं, दर्शनींच ती ऐतिहासिक आहे असें खास वाटतें.

तरी त्यांत रामाचा शत्रु दहा तोंडाचा एक विक्षिप्त प्राणी होता हें कसें ? दहा तोंडांच्या राक्षसाला कांहीं साधारणतः ऐतिहासिक ह्मणतां येणार नाहीं. ह्मणून रामायणाच्या मूळ ऐतिहासिक कथेंत वैदिक कथा मोठ्या खुबीनें जोडून दिल्या असाव्या असें वाटतें. सुदासाचे शत्रू जे दहा राजे त्यांनांच दहा तोंडाचा एक राजा करणें कविकल्पनेला कठीण नाहीं. दहा अंगिरसांचा मुख्य जो बृहस्पति त्याला असाच दहा शीर्षांचा म्हटलेलें आहे. या दशाननाचा भाऊ सहा महिने झोंप घेणारा असल्यामुळें तो ध्रुवावरचा असावा असें सहज दिसतें. हिंवाळ्यात सर्व देव कारागृहांत कोंडलेले असून ते उन्हाळ्यांत पुनः मोकळे होतात अशी पक्रगोनियन लोकांत कल्पना असल्याचें प्लूटार्कनें लिहिलें असून या गोष्टीचा ध्रुवप्रदेशांतील अखंड दीर्घ काळोख व प्रकाश यांच्यामधील झगड्याशीं प्रो. न्हिस या पाश्चात्य पंडितानें संबंध लाविला आहे. रावणानें सर्व देवांना तुरुंगांत टाकलेलें असून रामानें त्यांची मुक्तता केल्याची गोष्ट अशाच तऱ्हेनें जुळविली पाहिजे. रामायणांतील हनुमानाचाही संबंध वैदिक वृषाकपीशीं लाविता येण्यासारखा आहे. वृषाकपि ह्मणजे दक्षिणायनाबिन्दूजवळचा सूर्य किंवा ध्रुवोपपत्तीप्रमाणें दीर्घ काळोखाच्या आरंभीं क्षितिजाखालीं उतरणारा सूर्य होय. सूर्य तमोग्रस्त झाला असतां हनुमानाचा जन्म झाला आहे, ह्या गोष्टीवरून या ह्मणण्यास थोडासा आधार मिळतो. तात्पर्य रामायणांतील दंतकथात्मक भाग उषेच्या प्रत्यावर्तनाच्या वैदिक कथेंतून घेतला असावा असें ह्मणणें कांहीं गैर होणार नाहीं. इलियड या ग्रीक काव्यांतील वरींच नावें मॅक्स मुल्लरनें वैदिक नांवांशीं जुळविलीं आहेत. हेलन ह्मणजे सरमा, पॅरिस ह्मणजे पणि, ब्राएसिस ह्मणजे भृष्य असें त्यानें ठरविलें आहे. याप्रमाणें सर्व नांवांचा जरी उलगडा करतां आला नाहीं, तरी एवढें खरें कीं, उषारूपी चोरून नेलेल्या स्त्रीला परत आणण्याची गोष्ट भारतीय व ग्रीक आर्यांना एकाच ठिकाणाहून मिळालेली आहे. ह्मणून रामायण व इलियड या दोन काव्यांत जर सदृश गोष्टी आढळल्या तर त्या एकमेकांनीं एकमेकांपासून चोरलेल्याच असल्या पाहिजेत असें ह्मणण्याचें कांहीं कारण नाहीं. या समान गोष्टींवरून या दोन्ही लोकांचें

---

१ वेदकालनिर्णय पान ८२—८३.

मूळचें एकत्वच उलट सिद्ध होतें. हा विषय जरी फार मनोरम आहे तरी तो फार मोठा व अप्रस्तुत असल्यामुळें त्यांत खोल शिरण्याचा मोह येथेंच सोडून देणें भाग आहे. विष्णूच्या दहा अवतारांचा धागाही हिरण्यसदृश दहा राजांशीं पोंचवितां येईल. अवेस्त्यांत तर वायु, वृषभ, अश्व, उष्ट्र, वराह, युवा, काक, मेष, बक आणि नर असे वेरेथ्रघ्नाचे दशावतार स्पष्टच सांगितले आहेत. त्यांत अश्व, वराह, युवा आणि नर हे तर आमच्या कल्कि, वराह, वामन आणि राम, यांशीं सदृश आहेत. तात्पर्य दशावतारांची कल्पना आम्ही व पारशी एक असतांच्या काळची आहे. मत्स्य, कूर्म, वराह, नारसिंह, वामन आणि राम ह्या अवतारांचा धागा थोड्याबहुत प्रमाणानें ऋग्वेदाशीं नेऊन भिडवितां येईल. परंतु त्यासंबंधें कोणतेंही निश्चित विधान करण्यापूर्वी चांगला शोध व विचार केला पाहिजे. ध्रुवोपपत्ति जर स्थापित झाली, तर वैदिक व पौराणिक अशा दोन्ही प्रकारच्या कथांचा अर्थ बऱ्याच प्रमाणांत बदलून कित्येक ठिकाणीं तर तो अगदींच नवीन बसवावा लागेल. परंतु या उपपत्तीला आधारभूत असा पुरावा देण्याचाच या पुस्तकाचा उद्देश असल्यामुळें येथें हें काम करतां येणें शक्य नाहीं.

येणेंप्रमाणें आपल्या उपपत्तीला थोडाबहुत तरी आधार देणाऱ्या अशा बहुतेक वैदिक कथांचें येथवर विवेचन झालें. ध्रुवोपपत्तीवर उलगडा होणाऱ्या आणखीही कांहीं गोष्टी आहेत. उदाहरणार्थ, मित्र व वरुण या मूळच्या जोड देवता आहेत, त्या कशा हें आपल्याला आतां सांगतां येईल. ध्रुवोपपत्तीप्रमाणें पाहिल्यास त्या षण्मासावधि दीर्घ दिवस व दीर्घ रात्र यांच्या देवता होत, ह्मणूनच वरुणाला क्षपांनां (रात्रींना) परिस्वजन (आलिंगन) देणारा असें ह्मटलें आहे (८,४१,३). अशा सर्व गोष्टी येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून वैदिक कथांतील बऱ्याच वाक्यांचा, प्रकाश व काळोख यांतील रोजचा झगडा (उषेची कल्पना), किंवा हिंवाळ्यावरील वसंताचा वार्षिक विजय (वसंत कल्पना), किंवा मेघांवरील पर्जन्यदेवतेचा विजय (पर्जन्याची कल्पना) या कल्पनांवर उलगडा होण्यासारखा नाहीं अशी कोणाचीही खात्री होईल. वृत्राचा दरवर्षीं वध होणें, त्या वधावरोबर जलें व प्रकाश वर येणें, शरद्ऋतूच्या ४० व्या दिवशीं इंद्राला

शंबर सापडणें, त्यांचें परावत् प्रदेशांत युद्ध होणें, दीर्घतम्याचें १० व्या महिन्यांत वृद्ध होणें, अदितीनें आपल्या आठव्या पुत्राला (मार्तांड) टाकून देणें, त्रिताचें काळोखाच्या खांचेंत पडणें, किंवा विष्णूचें तिसरें पद अदृश्य असणें, इत्यादि गोष्टींचा प्रचलित कल्पनांवर उलगडा होत नाहीं. पण त्या ध्रुवोपपत्तीवरून चांगल्या समजत असल्यामुळें ही उपपत्ति त्यांच्यावरून अप्रत्यक्षरीत्या स्थापित होते. इंद्रवृत्रांचें युद्ध, सप्तवाध्रि, अदितीचे सात तेजस्वी पुत्र व आठवा मार्तांड, सूर्याचें चक्र व दीर्घतमा इत्यादिकांच्या कथांतून त्यांच्या जन्मभूमींत असलेला सात किंवा दहा महिन्यांचा सूर्यप्रकाशकाल दर्शविणारीं वचनें स्पष्ट आहेत. ह्मणून इतकीं सर्व वचनें केवळ काकतालीय होत असें मानण्याची तयारी असल्याशिवाय आपल्याला ध्रुवोपपत्ति अमान्य करतां येत नाहीं; कारण तीवरून आजपर्यंत न समजलेल्या किंवा दुर्लक्ष करून सोडून दिलेल्या अशा पुष्कळ गोष्टींचा सरळ व समाधानकारक अर्थ लागत आहे. ही ध्रुवोपपत्ति ह्मणजे आजपर्यंत प्रचलित असलेल्या वसंतादि कल्पनांना हुसकून लावून त्यांची जागा पटकावील असें नाहीं. एवढेंच कीं आजपर्यंत बरोबर अर्थ न लागल्यामुळें सोडून दिलेल्या बऱ्याच वैदिक कथांचा चांगला उलगडा करीत असल्यामुळें वसंतादि उपपत्त्यांपेक्षां अर्थातच ही अधिक व्यापक आहे. ह्मणून वैदिक कथांचा अर्थ लावतांना हिचा इतरांपेक्षां बराच जास्त उपयोग होईल. या दृष्टीनें पाहिल्यास इतरांबरोबर हीही आपल्या ग्रहणास सर्वथा पात्र असली पाहिजे, इतकेंच नव्हे तर कित्येक प्रसंगीं इतरांची जागाही हिलाच द्यावी लागेल. पुराणकथांशिवाय ध्रुवप्रदेशांतील सृष्टचमत्कारांचें वर्णन करणाऱ्या ऋग्वेदांतील स्पष्ट वचनांवरूनही ती स्थापित होते हें पूर्वप्रकरणांत दाखविलें असून, अवैस्तिक व रोमन कथांचाही या अनुमानाला पूर्ण पाठिंबा आहे. ही उपपत्ति आधुनिक भूगर्भविषयक, व पुराणवस्तुविषयक शोधांच्या मुळींच विरुद्ध नाहीं हेंही पूर्वी सिद्ध केलें आहे. अशी ही इतक्या गोष्टींचा सरळ उलगडा करणारी एकच उपपत्ति असतां, ती केवळ नवीन म्हणून अमान्य करावयाची कीं काय ? असें करणें तर्कशास्त्राच्या व शास्त्रीय पद्धतीच्या अगदीं विरुद्ध होईल. आम्हीं तर आमच्या उपपत्तीच्या यशापयशाचा भार तर्कशास्त्राचे नियम व शास्त्रीय पद्धतीचें विवेचन यांवरच सर्वस्वीं टाकिला आहे.

प्रकरण ११ वें.

अवैस्तिक प्रमाणें.

अवैस्तिक प्रमाणांचें स्वरूपकथन—त्या स्वरूपाविषयीं विद्वानांचीं भिन्न भिन्न मतें—या प्रमाणांचें पुनर्निरीक्षण करण्याची आवश्यकता–वंदिदादाच्या पहिल्या अध्यायाचा सारांश—अहुर मझ्दानें उत्पन्न केलेले सोळा प्रदेश—प्रथम उत्पन्न केलेला प्रदेश जो ऐर्यन वइजो तो पारसी आर्यांची मूलभूमि होय—ऐर्यन वइजोच्या स्थानाविषयीं निरनिराळीं मतें—अवेस्त्यांतील वर्णनांत सांगितलेल्या लक्षणांवरूनच ऐर्यन वइजोचें स्थान ठरविलें पाहिजे—त्या मूळच्या सुखमय स्थानांत अंग्र मैन्यूनें प्रथम दहा महिन्यांचा हिंवाळा उत्पन्न केला—म्हणजे पूर्वी तेथें दहा महिने उन्हाळा व दोन महिने हिंवाळा अशी स्थिति असावी असें अनुमान होतें—ध्रुवप्रदेशांतील हवामानांत झालेल्या या आकस्मिक फरकाला भूस्तरशास्त्रांत चांगला आधार आहे—दोन महिन्यांचा हिंवाळा तेथें अखंड दीर्घ रात्रीशीं समकालीन असणार—ऐर्यन वइजोमध्यें सात महिन्यांचा उन्हाळा आणि पांच महिन्यांचा हिंवाळा असल्याचें वुंदहिश ग्रंथांतील वर्णन—दहा महिन्यांच्या उन्हाळ्याशीं याचा विरोध येत नाहीं—ध्रुवप्रदेशांत दोन्हीही शक्य आहेत—ऋग्वेदांतील समानार्थक वचनें—सात महिन्यांचा उन्हाळा, अदितीची कथा आणि शंवरयुद्धाचा दिवस यांची एकवाक्यता—वंदिदादाच्या दुसऱ्या अध्यायांतील तात्पर्यार्थ—ऐर्यन वइजो मधील यिमाचा वर—त्यांत सूर्य वर्षांतून एकदांच उगवत असे—यावरून एर्यन वइजो उत्तर ध्रुवावर होता असें ठरतें—तो इराणच्या पूर्वेस नव्हता—त्याचें वर्णन काल्पनिक दिसत नाहीं—तेथें झालेल्या हिमपाताचेंच तें वर्णन होय—ध्रुवप्रदेशांतील वसतिस्थानाचा हिमपातामुळें नाश झाल्याचें हें अत्यंत प्राचीन ऐतिहासिक प्रमाण होय—अवैस्तिक प्रमाणांचें विशिष्ट महत्व—त्यांना नवीन शास्त्रीय शोधांचें पूर्ण पाठबळ आहे—ऐर्यन वइजो सोडून जाणें हिमपातामुळें अवश्य झालें—पहिल्या फर्गर्दांतील सोळा भूमी ह्मणजे दक्षिणेकडे येतांना वाटेंत लागलेले प्रदेश होत—हे प्रदेश पहिल्या अध्यायांतील मजकुरांचें ऐतिहासिक स्वरूप स्थापित करतात—शतपथ ब्राह्मणांतील प्रलयाची कथा—हिंदी आर्यांच्या उत्तरेकडील मूळच्या वसतिस्थानाचीं दर्शक अशीं आणखी वचनें—वैदिक आणि अवैस्तिक प्रमाणांवरून निघणारीं अनुमानें.

अवैस्तिक प्रमाणें.



व प्रदेशांतील आर्यांच्या वसतिस्थानाच्या सिद्धयर्थ वेदान्तर्गत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रमाणें देतांनां मागील प्रकरणांतून ठिकठिकाणीं अवेस्त्यांतील कथांचाही तुलनेसाठीं प्रसंगवशात् उल्लेख केला आहे. पण त्याहून विशेष महत्वाचीं अशीं कांहीं स्थलें अवेस्त्यांत असून त्यांत आर्यांचें उत्तरेकडील मूलस्थान व तेथून, उक्षस् (ऑक्सस्) यक्षावर्त (जग्झार्टिस्) सिंधु इत्यादि नद्यांच्या कांठच्या प्रदेशापर्यंत झालेलीं त्यांची स्थानान्तरें यांचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे. हीं अवेस्त्यांतील प्रमाणें वैदिक प्रमाणांना जोड देतात इतकेंच नव्हे, तर ध्रुवोपपत्तीच्या सिद्धयर्थ स्वतंत्र पुरावाच तीं दाखल करीत असल्यामुळें त्यांचा या प्रकरणांत सविस्तर विचार करणें अवश्य आहे. वेदांप्रमाणेंच अवेस्त्याचेंही प्राचीनत्व आतां सर्वमान्य असल्यामुळें त्याविषयीं येथें प्रमाणें देण्याची गरज नाहीं. दोन्ही ग्रंथ एकाच मूळवृक्षाच्या शाखा असल्यामुळें, वेदांप्रमाणें अवेस्ता हा जरी अविच्छिन्न राहिलेला नाहीं, तरी एकमेकांतील उणीवा एकमेकांकडून भरून निघत असल्यास त्या शक्य तितक्या ठिकाणीं भरून काढणें गैर होणार नाहीं. दीर्घ उषा, अखंड काळोख, दशमासावधि संवत्सरसत्रें इत्यादिकांविषयींचे उल्लेख वेदांत आहेत, तरी आर्यांचें अगदीं उत्तरेकडील मूलस्थान व तें सोडून खालीं दक्षिणेकडे त्यांनीं प्रयाण करण्याचीं कारणें याविषयींचे उल्लेख त्यांत सांपडत नाहींत. पण सुदैवानें वेदांतील ही उणीव अवेस्त्यानें फार सुरेख भरून काढिली आहे. मागील प्रकरणांत सांगितलेल्या अवेस्त्यांतील कथांवरून सहा महिन्यांचा दिवस व सहा महिन्यांची रात्र किंवा एक दिवसापासून शंभर दिवसांच्या अवधीची अखंड रात्र इत्यादिकांची माहिती मझ्दभक्तांच्या पूर्वजांना होती, हें सिद्ध होतें. या सर्व कथांचीं प्रतिरूपें वेदांमध्येंही आहेत. पण उत्तरेकडील आर्यांचें मूलस्थान, व त्याचा बर्फाच्या योगानें झालेला नाश यांविषयींचें अवेस्त्यांतील वर्णन स्वतंत्र एकटें असून, वैदिक प्रमाणांसंबंधानें पूर्व प्रकरणांत केलेल्या विवेचनावरून, तें प्राचीनकाळीं खरोखर घडून आलेल्या ऐतिहासिक गोष्टीची साक्ष देत आहे असें निःसंशय दिसतें. हें वर्णन अवेस्त्यांतील वंदिदाद नामक पुस्तकाच्या पहिल्या दोन

अध्यायांत आलेलें आहे. त्यासंबंधानें पाश्चात्य पंडितांमध्यें दोन मतें असून कांहीं त्याला ऐतिहासिक मानतात, व दुसरे केवळ दंतकथात्मक समजतात. यांपैकीं दुसऱ्या मतालाच आज विशेष मान आहे. पण हें मत ठरलें त्यावेळीं ध्रुवप्रदेशांतील वसतीविषयीं वेदांत प्रमाणें आहेत ही गोष्ट माहीत नव्हती, इतकेंच नव्हे, तर भूस्तरशास्त्रावरून तें अशक्यच वाटत होतें. ही गोष्ट लक्षांत घेतां, आतां भूस्तरशास्त्रानें त्याची शक्यता सिद्ध केल्यामुळें व वेदांत तत्संबंधाचीं प्रमाणेंही सांपडत असल्यामुळें अवेस्त्यांतील या वर्णनाचें नवीन दृष्टीनें पुनर्निरीक्षण करणें अवश्य झालें आहे.

वंदिदादाच्या पहिल्या अध्यायांत अहुरमझ्दानें उत्पन्न केलेल्या सोळा भूमींची यादी दिली आहे. प्रत्येक भूमि तयार झाल्यावर अहुर मझ्दाचा प्रतिस्पर्धी जो अंग्र मैन्यु त्यानें ती रहाण्याला अयोग्य करण्यासाठीं तींत कांहीं तरी अरिष्ट उत्पन्न केलें आहे. या अध्यायाचा सारांश असा.—

" पवित्र अशा झरथुष्ट्राला अहुर मझ्द म्हणतो, ' जी भूमि पूर्वी वसतीला सर्वस्वीं अयोग्य होती ती मीं सुखकर केली आहे, मीं हें केलें नसतें, तर सर्व प्राणी ऐर्यन वइजोकडे धांवले असते. १–२.

" म्या अहुरमझ्दानें ऐर्यन वइजो ही पहिली उत्तम भूमि निर्माण केली. तेव्हां अंग्र मैन्यूनें प्रतिकारार्थ म्हणून, मोठा अहि व हिम अशी आसुरी सृष्टि तींत उत्पन्न केली. तेव्हां तेथें हिंवाळ्याचे दहा महिने असून उन्हाळ्याचे दोन आहेत. ३–४.

" म्या अहुरमझ्दानें सुगंधयुक्त अशी गऊ नांवाची दुसरी उत्तम भूमि उत्पन्न केली. तेव्हां तिच्या प्रतिकारार्थ अंग्रमन्यूनें पशु आणि क्षेत्रें यांचा नाश करणारी अशी दुष्ट मक्षिका तेथें उत्पन्न केली. ५"

याप्रमाणें एकामागून एक असे सोळा प्रदेश अहुरमझ्दानें उत्पन्न केलें. त्यांत चवदावा वरेन (सं. वरुण), पंधरावा हप्त हेंदु (सं. सप्तसिंधु) व सोळावा रंघ (सं० रसा) नदीच्या कांठचा प्रदेश असे होते.

या सोळा प्रदेशांपैकीं दहांची ओळख आज प्रसिद्ध असलेल्या प्रदेशांशीं झेन्द पंडितांनीं खात्रीलायकपणें लाविलेली आहे. अर्थात् वंदिदादांतील हा मजकूर केवळ दंतकथात्मक नसून ऐतिहासिक आहे असें मानावें लागतें. पण यांपैकीं पहिली भूमि जी ऐर्यन वइजो तीसंबंधानें

पंडितांमध्यें मतभेद आहे. ऐर्यन वइजो ही अहुरमझ्दानें उत्पन्न केलेली पहिली आनंदभूमि असून तिचा अर्थ आर्यांची जन्मभूमि (वइजो–सं. बीज) असा आहे. आतां त्यासंबंधानें असा प्रश्न आहे कीं ही भूमि केवळ काल्पनिक आहे कीं खरी आहे? व खरी असेल तर ती कोटें होती? दुसरा प्रश्न असा आहे कीं, या सोळा निरनिराळ्या भूमि म्हणजे आर्यांना दक्षिणेकडे येत असतां मार्गांत लागलेल्या होत्या कीं काय? या प्रश्नांसंबंधानें वंदिदादांत कांहींच सांगितलेलें नसल्यामुळें ह्या सोळा भूमींविषयीं मजकूर ह्मणजे तत्कालीन इराणी लोकांना माहीत असलेल्या प्रदेशांचें वर्णन असून त्यांचा प्राचीन आर्यांच्या प्रयाणमार्गांशीं कांहीं संबंध नाहीं असें अनुमान पंडितांनीं केलें आहे. त्यांच्या मतें ऐर्यन वइजो हा प्रदेश उक्षस् व यक्षावर्त नद्यांच्या उगमाजवळचा प्रांत होय. पण डॉक्टर हौ आदिकरून दुसरे पंडित असें ह्मणतात कीं ऐर्यन वइजो हा प्रांत अगदीं उत्तरेकडील असून बाकीचे प्रांत मार्गांत लागलेले होत.

यांपैकीं पहिल्या मताच्या अभिमान्यांनीं आपलें मत कांहीं गोष्टी गृहीत धरून त्यांच्या आधारावर बनविलें आहे. पण ऐर्यन वइजोचें वंदिदादांत जें वर्णन आलें आहे, त्यावरून तो अगदीं उत्तरेकडील प्रदेश असावा हें उघड दिसतें. ऐर्यन वइजो हा अहुरमझ्दानें उत्पन्न केलेला पहिला सुखमय प्रदेश असून अंग्रमैन्यूनें दुष्टपणानें त्यांत दहा महिन्यांचा हिंवाळा व दोन महिन्यांचा उन्हाळा असे उत्पन्न केले. हें वर्णन यक्षावर्त नदीच्या बऱ्याच उत्तरेकडील प्रदेशालाच फक्त लागू पडणारें आहे. अंग्रमैन्यूनें अहि व हिम उत्पन्न करण्यापूर्वी ऐर्यन वइजोमध्यें सुखकारक हवापाणी होतें, ह्मणजे अंग्रमैन्यूनें दुष्टपणामुळें मूळच्या उलट स्थिति निर्माण केली. अर्थात् ही दुःसह स्थिति ह्मणजे जर दहा महिन्यांचा हिंवाळा व दोन महिन्यांचा उन्हाळा अशा प्रकारची झाली, तर पूर्वीची स्थिति उघडच याच्या उलट ह्मणजे दहा महिन्यांचा उन्हाळा व दोन महिन्यांचा हिंवाळा अशी सुखकर असावी असें सहज अनुमान होतें. तात्पर्य ऐर्यन वइजोमधील हवापाणी प्रथम चांगलें असून कांहीं आकस्मिक कारणानें त्यांत एकाएकीं फरक झाला असें या वंदिदादाच्या पहिल्या अध्यायावरून उघड होतें. उत्तरध्रुवाजवळील प्रदेशांत सूर्याचे किरण

तिरके पडत असल्यामुळें तेथील उन्हाळा सुखकरच असणार, व हिंवाळा त्याच्या मानानें अगदीं थोडा ह्मणजे दोन महिन्यांचा असल्यामुळें तोही फार दुःसह नव्हता. ह्मणजे एकंदरींत अंग्रमैन्यूचा कोप होण्यापूर्वीची ऐर्यन वइजोची हवापाण्यासंबंधीं स्थितिं फारच मजेदार होती. परंतु त्यांत एकाएकीं भयंकर हिमपात झाल्यामुळें ही स्थिति पालटून हिंवाळा फार मोठा ह्मणजे दहा महिन्यांचा होऊन उन्हाळा फार अल्पावधि ह्मणजे दोन महिन्यांचा झाला. ही स्थिति फार दुःसह असून तींत मनुष्यांना रहातां येणें शक्य नाहीं. अर्थातच तेथील रहिवाश्यांना हिमपात झाल्यावर कोठें तरी दूर जावें लागलें असलें पाहिजे.

तीस चाळीस वर्षांपूर्वी अशा प्रकारचें अनुमान करणें केवळ अशक्य होतें. ध्रुवाजवळची हवा सदैव अशीच भयंकर असावयाची व त्यामुळें तेथें वसति असणें कधींही शक्य नव्हतें असें त्यावेळीं ठाम मत होतें. पण अगदीं अलीकडच्या भूस्तर विषयक शोधांनीं ही अडचण आतां दूर केली आहे. हिमकालापूर्वी ध्रुवाजवळची हवा सुखकर सौम्य व म्हणून मनुष्यांना रहावयाला योग्य अशी होती याविषयीं आतां वादच उरलेला नाहीं. अंग्रमैन्यूनें दुष्टपणानें केलेली कृति व भूस्तरशास्त्रांतील हिमपातः हीं एकच होत हें त्यांच्या वर्णनाची तुलना केल्यास सहज समजून येईल. याप्रमाणें नवीन शास्त्रीय शोध अवेस्त्यांतील वर्णनाशीं इतके मिळते असतां, कित्येक झेन्द पंडितांनीं केवळ कल्पनेवर काढिलेलें अनुमान त्याज्य समजून, आजमितीला दहा महिन्यांचा हिंवाळा असलेला ऐर्यन वइजो उत्तरध्रुवाजवळच कोठें तरी असला पाहिजे, असें मानणें आपल्यास भाग आहे. असें मानावयाचें नसेल तर अवेस्त्यांतील वरील वर्णनाचा इराणी लोकांच्या प्राचीन भूमीच्या हकीगतीशीं कांहीं संबंध नाहीं असें ह्मटलें पाहिजे; पण पूर्वीच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें इतका सबळ वेदांतील पुरावा उपलब्ध झाला असतां, अवेस्त्यांतील वर्णन कांहीं तरी काल्पनिक असावें असें ह्मणणें सयुक्तिक नाहीं. हिंदी–युरोपीय लोकांचें प्राचीन वर्ष दहा महिन्यांचा सूर्यप्रकाश व त्याच्या मागून येणारी दोन महिन्यांची अखंड रात्र यांमिळून होत असें हें पूर्वी सप्रमाण सिद्ध केलेंच आहे. ऐर्यन वइजो मधील वर्षही अशाच तऱ्हेचें होतें. हम (सं. समा) हा उष्णकालवाचक झेन्द् शब्द

वेदांत वर्षाचा वाचक आहे. ह्मणजे अवेस्त्यांत सांगितलेले उन्हाळ्याचे दहा महिने ह्मणजे दहा महिन्यांचा सूर्य प्रकाशाचा काळ ऊर्फ " मानुषा युगा " व त्यामागाहून येणारी द्विमासावधि अखंड रात्र यांमिळून झालेलें वर्षच होय. वंदिदादांतील वर्णनांत हिंवाळ्याच्या दोन महिन्यांत सतत काळोख होता असें कांहीं स्पष्ट सांगितलेलें नाहीं हें खरें. पण दहा महिन्यांच्या उन्हाळ्यावरून ऐर्यन वइजो हा प्रदेश ध्रुवाजवळचा होता असें एकदां मानिलें ह्मणजे दोन महिन्यांचा हिंवाळा हा अखंड काळोखाचा होता हें उघडच झालें. आज मितीस ही अखंड रात्र दहा महिन्यांच्या हिंवाळ्याच्या मध्यें असते. पण हिमकालापूर्वी जेव्हां त्या प्रदेशांत दहा महिन्यांचा उन्हाळा होता, तेव्हां हिवाळ्याचे दोन महिने व अखंड दीर्घ रात्र हीं एककालावच्छिन्नच असलीं पाहिजेत. आर्यांच्या जन्मभूमींतील हिमकालापूर्वीच्या व नंतरच्या हवापाण्याच्या स्थितींत एवढा फरक आहे. दोन्ही वेळा अखंड दीर्घ रात्र ही सारखीच असणार; पण ज्यावेळीं तेथील हिंवाळा अल्पावधि होता, तेव्हां तो या अखंड रात्रीपुरताच असे. ही स्थिति पालटून जेव्हां आतां तेथें दहा महिन्यांचा हिंवाळा होऊं लागला, तेव्हां ही अखंड दीर्घ रात्र त्याच्या मध्यभागीं येऊन पडली. तात्पर्य वंदिदादांतील ऐर्यन वइजोच्या वर्णनावरून तेथें पूर्वी असलेल्या दहा महिन्यांच्या उन्हाळ्याचें व त्यामागून येणाऱ्या दोन महिन्यांच्या अखंड रात्रीचें अनुमान करून अंग्र मैन्यूच्या स्वारीनंतर हिमपाताच्या योगानें ही स्थिति उलट झाली असें मानावें लागतें. तिष्ट्र्याच्या अपौशाशीं झालेल्या युद्धाचा महत्तम काल शंभर रात्रींचा असल्याचें, व हिंवाळ्यांत दोन रात्री तीन रात्री किंबहुना महिनाभरही घरांत प्रेत ठेवण्याच्या चालीवरून हा काल अखंड काळोखाचा असल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. या गोष्टीशीं वरील ऐर्यन वइजोचें वर्णन जोडल्यास हा प्रदेश, ह्मणजे प्राचीन इराणी लोकांचें नंदनवन, उत्तर ध्रुवाजवळच कोठें तरी असून अंग्रमैन्यूची त्यावर स्वारी होण्यापूर्वी तेथें सौम्य व दीर्घ उन्हाळे व अल्पावधि व गरम परंतु अखंड काळोखाचे हिंवाळे होते, आणि या स्वारीनंतर ह्मणजे हिमपातानंतर ही स्थिती पालटून कित्येक शें हात जाडीचा बर्फाचा थर त्यावर पडून तो मनुष्यास रहावयास नालायख झाला ही गोष्ट स्पष्ट सिद्ध होते.

या वर्णनांत आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ऐर्यन वइजोचें वर्णन करतांना प्राचीन झेन्द् टीकाकारांनीं 'त्यांत सात महिन्यांचा उन्हाळा व पांच महिन्यांचा हिंवाळा' असल्याचें सांगितलें आहे. हा मजकूर प्रक्षिप्त असावा असें कित्येक पंडितांचें मत आहे. पण तें सयुक्तिक दिसत नाहीं. सकृद्दर्शनीं एकाच प्रकरणांत दहा महिन्यांचा व सात महिन्यांचा उन्हाळा आणि दोन महिन्यांचा व पांच महिन्यांचा हिंवाळा अशा दोन जोड्या विसंगत दिसतात. पण दशमासावधि उन्हाळ्याइतकीच सप्तमासावधि उन्हाळ्याची गोष्टही प्राचीन आहे, असें बुंदहिश नामक पारशी ग्रंथावरून दिसतें; कारण त्यांत 'आवान् महिन्याच्या औहरमझ्द (पहिल्या) दिवशीं हिंवाळा सुरू होतो, दीन (दहाव्या) महिन्याच्या अतारो (नवव्या) दिवशीं तो ऐरान वीजमध्यें फार कडक होऊन स्पेंदरमद् महिन्यांत तो समाप्त होतो; ह्मणून दीन महिन्याच्या अतारो दिवशीं जिकडे तिकडे हिंवाळा आला असें सुचविण्यासाठीं अग्नि प्रज्वलित करतात' असें सांगून आवान्, आतारो, दीन, वोहूमन् आणि स्पेंदरमद् असे हिंवाळ्याचे पांच महिने त्यांत स्पष्ट सांगितले आहेत. शिवाय या काळांत रपित्विन् गाह् नांवाचा विधीही करीत नाहींत, कारण 'रपित्विन् हा हिंवाळ्यांत जमिनीखालीं जाऊन उन्हाळ्यांत वर येतो' असेंही त्यांत सांगितलें आहे. हे जसे पांच हिंवाळ्याचे महिने तसे फरवर्दिन् पासून मित्रोपर्यंत सात महिने उन्हाळ्याचे त्यांत सांगितले आहेत. यावरून सात महिन्यांचा उन्हाळा व पांच महिन्यांचा हिंवाळा अशी ऐर्यन वीजो मधील प्राचीन स्थितीच बुंदहिशमध्यें दिलेली असली पाहिजे; कारण त्यांतच पुढें बारा महिन्यांचीं व चार ऋतूंचीं नांवें सांगून हिंवाळ्याचे दीन, वोहूमन् आणि स्पेंदरमद् असें तीनच महिने दिले आहेत. अर्थात् पांच महिन्याच्या हिंवाळ्याची गोष्ट प्राचीन असून, तीन महिन्यांची स्थिति बुंदहिश लिहिला त्यावेळची असावी. म्हणूनच वंदिदादाच्या प्राचीन टीकाकारांनीं प्राचीन कथा राखून ठेवण्याच्या बुद्धीनें दहा महिन्याचा उन्हाळा व दोन महिन्यांचा हिंवाळा यांच्याबरोबरच, सात महिन्यांचा उन्हाळा व पांच महिन्यांचा हिंवाळा हे सांगितले असले पाहिजेत. आतां या गोष्टी परस्परविरुद्ध दिसतात; व त्यांचे खरें कारण कळलें नाहीं तोंवर

त्या परस्परविरुद्ध असणारच्च. ऐर्यन वइजो हा प्राचीन इराणचा अगदीं पूर्वेकडचा भाग असें समजलें ह्मणजे वर दिलेले हे वर्षाचे विभाग विसंगत आहेत खरे. पण हें प्राचीन इराणी लोकांचें मूलजन्मस्थान ध्रुववृत्ताचे आंत कोठें तरी होतें असें मानिल्यास, हा सर्व विसंगतपणा नाहींसा होतो; कारण त्यांत दहा आणि सात महिन्यांचा उन्हाळा एकाच काळीं पण जरा निरनिराळ्या ठिकाणीं असतो हें आपणांस माहीत आहे. ध्रुवबिन्दु व ध्रुववृत्त यांमधील भागांत अक्षांशाच्या मानानें वर्षांतून सात ते अकरा महिनेपर्यंत सूर्य क्षितिजावर असतो. तेव्हां अवेस्त्यांतील उन्हाळ्याच्या अवधीसंबंधाचीं दोन निरनिराळीं विधानें विलक्षण किंवा विसंगत आहेत असें ह्मणण्याचें कारण नाहीं. मूळ वाक्यांचा नीट अर्थ केल्यास दोन्हीं प्रकारच्चीं वर्णनें एकाच ठिकाणाच्या दोन निराळ्या भागांना लागू पडणारीं आहेत असें दिसून येईल. वैदिक प्रमाणांचा विचार करतांना सात व दहा महिन्यांचा अशा दोन्ही प्रकारच्या सूर्यप्रकाशयुक्त कालाच्या खुणा ऋग्वेदांत सांपडतात हें सांगितलेंच आहे. असा प्रकार ध्रुववृत्तांतर्गत प्रदेशाशिवाय दुसऱ्या कोठेंही शक्य नसल्यामुळें वरील विवेचनांत ठरविल्याप्रमाणें ऐर्यन वइजो हा ध्रुवाजवळचाच प्रदेश असला पाहिजे असें सिद्ध होतें. बुदहिश मध्यें ' दीन महिन्याच्या नवव्या दिवशीं हिंवाळा आलेला आहे, असें सुचविण्यासाठीं अग्नि प्रज्वलित करण्याची ' जी चाल सांगितली आहे, ती हिंवाळा आलेला आहे हें सुचविण्यासाठीं नसून त्याला सुरवात होत आहे असें सुचविण्याकरतां असावी. कारण, हिंवाळ्याच्या आगमनार्थ अग्नि प्रदीप्त करणें तो दोन तीन महिने थंडी पडून गेल्यावर करण्यापेक्षां आरंभीं करण्यांतच औचित्य आहे. असा या चालीचा अर्थ घेतल्यास नऊ महिने दहा दिवसांचें वर्षही त्यावेळीं आर्यस्थानाच्या कोणत्या तरी भागांत सुरू होतें असें दिसेल. हें अनुमानही दहा महिन्यांच्या प्राचीन रोमन वर्षाशीं अगदीं जुळतें आहे. पण ही बारीक बाब सोडून दिली तरी या गोष्टीसंबंधानें वैदिक व अवैस्तिक कथांत फारच साम्य आहे. बुंदहिशमध्यें तीन महिन्यांचा एक ऋतु असे वर्षाचे चार ऋतु सांगितले आहेत. फर्वर्दीन, अर्द्धहित्, आणि होर्वदाद् मिळून वसंत; तीर, अमरोदाद्, आणि शत्वैरो मिळून ग्रीष्म; मित्रो, आवान्, आतारो मिळून शरद्; आणि दीन्, वोहूमन्, व स्पेंदरमद् मिळून शिशिर. या

हिशोबाप्रमाणें शरदाचा ४० वा दिवस आवान् महिन्याचा १० वा दिवस होतो; व मग 'इंद्राचें शंबराशीं झालेलें युद्ध शरदाच्या ४० व्या दिवशीं सुरू झालें' या वैदिक वचनाचा, 'ऐर्यन वइजोमध्यें आवान् महिन्यापासून शिशिर सुरू होतो,' या बुंदहिशमधील वचनाशीं बराच (दहा दिवसांच्या फरकानें) मेळ बसतो. याप्रमाणें वैदिक, अवैस्तिक, रोमन इत्यादि कथांमध्यें उन्हाळा संपण्याच्या काळासंबंधानें एकवाक्यता आहे. ह्मणून सात किंवा दहा महिन्यांच्या सूर्यप्रकाशाचें वर्ष हिंदी-युरोपीय काळांतील ह्मणजे हिंदी व युरोपीय आर्य एकत्र होते त्या वेळचे असून या त्याच्या दुहेरी स्वरूपाचा उलगडा या लोकांचें मूलस्थान ध्रुवप्रदेशांत होतें, असें मानिल्याशिवाय होत नसल्यामुळें ऐर्यन वइजो देखील ध्रुवाजवळच होता असें मानणें अपरिहार्य होतें. वास्तविक अवेस्त्यांतील वरील वर्णन सरळ आहे; आणि जर झेन्द् पांडितांनीं ऐर्यन वइजोची स्थापना विनाकारण प्राचीन इराणाच्या पूर्व सरहद्दीवर केली नसती, तर त्यांत सकृद्दर्शनीं दिसणारा विरोधही केव्हांच नाहींसा करतां आला असता. अशी स्थिति असल्यामुळें ऐर्यनवइजोसंबंधाच्या दोन मतांपैकीं खरें कोणतें हें सांगावयास नकोच. अधिकाधिक घोंटाळा उत्पन्न करणाऱ्या कल्पनेपेक्षां सर्व बाबींचा समाधानकारक उलगडा करणारी कल्पनाच ग्राह्य होय हें कोणीही सांगेल.

ऐर्यन् वइजोमधील हवापाण्याचें वर्णन करणाऱ्या वंदिदादांतील बचनाचा येथवर विचार केला. ध्रुवोपपत्तीवर या वचनांचा चांगला खुलासा करतां येतो. ऐर्यन वइजो मधील मूळची हवापाण्याची स्थिति ठरवितांना बी अंग्रमन्यूनें उत्पन्न केलेल्या स्थितीच्या उलट असली पाहिजे अशी कल्पना केली आहे. पण वंदिदादाच्या दुसऱ्या अध्यायांत जो मजकूर आला आहे, त्यावरून अशी केवळ कल्पना करण्याचें कारण उरत नाहीं. हा अध्याय पहिल्या अध्यायाच्या पुरवणीदाखल असून त्यांत ऐर्यन वइजोची सविस्तर हकीगत व अंग्र मैन्यूनें त्यांत थंडी व बर्फ उत्पन्न करण्यापूर्वीच्या तेथील हवापाण्यासंबंधाच्या अत्यंत सुखावह अशा स्थितीचें वर्णन आलें आहे. त्याचे दोन भाग असून पहिल्या भागांत ऐर्यन वइजोचा राजा जो **यिम** त्याला अहुरमझ्दानें मझ्दापासून धर्मनियम घेण्यास सांगितलें आहे. तसें करण्याचें यिमानें नाकारल्यावर

अहुरमझ्दानें त्याला आपल्या लोकांना सुखी ठेऊन त्यांची वृद्धि करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें यिमानें रोग व मृत्यु यांना आपल्या लोकांपासून दूर सारून त्यांना सुखी ठेविलें व आपल्या राज्याची सीमा वाढविण्याचा तीन वेळां प्रयत्न केला. या गोष्टीचा संबंध कदाचित् उत्तरध्रुवाजवळील आर्यवसाहती वाढविण्याच्या प्रयत्नाशीं असेल पण त्याचा येथें विचार करण्याचें आपल्याला कारण नाहीं. दुसऱ्या भागांत अहुरमझ्दानें भरविलेल्या सर्व देवांच्या सभेचें वर्णन आहे. या सभेला यिम राजा आपल्या सर्व बड्या सरदारांसह हजर होता. या सभेंत अहुरमझ्दानें यिमाला अशी सूचना दिली कीं, ऐर्यन वइजोवर भयंकर थंडी व बर्फ यांची स्वारी होणार असून तीमुळें त्यांतील सर्व वस्तू नाश पावतील; तर या संकटाला तोंड देण्यासाठीं ह्मणून तूं एक **वर** (घर) तयार कर, आणि त्यांत सर्व प्राणी व वनस्पती यांचीं बीजें जतन करून ठेव. त्याप्रमाणें यिमानें **वर** तयार केला. या वरांतील लोकांना सूर्य, चंद्र व तारका हीं **वर्षांतून फक्त एकदांच उगवलेलीं दिसत,** असें सांगून पुढें या अध्यायांत या वरांत लोक कसे आनंदानें राहिले त्याचें वर्णन केलें आहे.

हा यिमाचा **वर** वायवलमधील नोहाच्या नावेप्रमाणेंच आहे; एवढाच फरक कीं, वायवलमधला पूर पाण्याचा असून अवेस्त्यांतील पूर बर्फाचा आहे. अवेस्त्यांतील बर्फाचा पूर भूस्तरशास्त्राशीं विरुद्ध नसून उलट भूस्तरशास्त्रांतील अगदीं अलिकडच्या शोधांवरून तो खरा ऐतिहासिक आहे असें अगदीं स्पष्ट सिद्ध होत आहे. दुसरें यिमाच्या वरांतील लोकांना ' सर्व वर्ष एका दिवसासारखें भासलें, ' व ' सूर्य आणि तारका वर्षांतून एकदांच काय त्या उगवलेल्या दिसत ' असें जें वर्णन आहे, त्यावरून हा **वर** उत्तर ध्रुवाजवळ होता याबद्दल तिलप्राय संदेह रहात नाहीं. याप्रमाणें यिमाच्या वराची जागा नक्की ठरल्यावर ऐर्यन वइजोची आपोआप ठरलीच; कारण हा वर ऐर्यन वइजोमध्येंच होता. ऐर्यन वइजो ध्रुवाजवळ होता असें ह्मणण्याला हें आणखी एक उत्तम प्रमाण आहे. या वराची कथा कदाचित् खरी नसून काल्पनिक आहे असें जरी म्हटलें, तरी एका वर्षाएवढा दिवस, व वर्षांतून एकदांच सूर्य उगवणें या गोष्टीही केवळ कल्पनेनेंच समजलेल्या असतील, व उत्तर ध्रुवाजवळच्या स्थितीशीं त्या जुळतात त्या केवळ काकतालीय न्यायानें जुळतात असें

म्हणतां येत नाहीं. वंदिदादकालीन लोकांनीं या गोष्टी प्रत्यक्ष पाहिलेल्या नसतील, तर त्या त्यांना परंपरागतच समजल्या असल्या पाहिजेत; म्हणजे त्यांच्या पूर्वजांनीं उत्तर ध्रुवाजवळ रहात असतां त्या प्रत्यक्ष पाहिलेल्या असल्या पाहिजेत. ऐर्यन वइजो प्राचीन इराणाच्या पूर्वेस होता असें म्हणणारे पंडित, उक्षस् व यक्षावर्त नद्यांच्या उगमाजवळचा हा डोंगर-सपाटीचा प्रदेश आतांच्यापेक्षां फार ऊंच होता व त्यामुळें तेथें फार थंडी होती, असें ह्मणून ऐर्यन वइजो मधील दहा महिन्यांच्या हिंवाऱ्याचा उलगडा करूं पहातात. पण असें मानण्यांत कोणत्या अडचणी आहेत याचा त्यांनीं विचार केलेला दिसत नाहीं. ऐर्यन वइजो-मधील दहा महिन्यांचा हिंवाळा अंग्र मैन्यूच्या स्वारी नंतरचा असून त्यापूर्वी तेथें सुखकरच हवा होती. पण तसें असावयास, पूर्वी तो प्रदेश उंच नसून अंग्र मैन्यूनें तो ऊंच केल्यामुळें तेथें थंड हवा झाली असें मानावें लागतें. आज तर उक्षस् नदीच्या उगमाशीं दहा महिने हिंवाळा असण्यासारखी स्थिति नाहीं, म्हणजे अंग्र मैन्यूच्या स्वारीनंतर कालान्तरानें तो पुनः सखल झाला असें ह्मटलें पाहिजे. पण दुर्दैवानें या प्रदेशाचें वर होणें व खालीं होणें या संबंधानें भूस्तरशास्त्र—विषयक पुरावा मुळींच नाहीं आणि तसा पुरावा कदाचित् असता, तरीही यिमाच्या वरांतील लोकांना सबंद वर्ष एका दिवसासारखें वाटलें या एकाच गोष्टीवरून हें वर्णन ध्रुवासंबंधींच आहे याविषयीं संशय रहाताना. तात्पर्य एवढेंच कीं, ध्रुवेतर ठिकाणीं ऐर्यन वइजो होता असें ह्मणणें केवळ फोल होय. पुराणांतील नद्यांचीं किंवा प्रदेशांचीं नावें मागाहून खऱ्या नद्यांनां किंवा प्रांतांना दिलीं असतील. पण तेवढ्यावर केवळ नामसादृश्यावरून त्या मूळ नद्यांचा किंवा देशांचीं स्थानें जर आपण ठरवूं लागलों, तर ऐर्यन वइजो हा हिमालय व विंध्यपर्वतांच्या मधला प्रदेश होय असें म्हणावें लागेल; कारण या प्रांतालाही ऐर्यन वइजो याच अर्थाचें आर्यावर्त असें नांव आहे. असाच प्रकार झेन्द् पंडितांनीं केला आहे. दहा महिन्यांच्या हिंवाळ्याच्या उल्लेखाच्या साहाय्यानें ऐर्यन वइजोचें स्थान ठरविण्याचें सोडून इराणांतील नद्यांच्या नांवावरून तें ठरविण्याचा प्रयत्न झेन्द् पंडितांनीं केला. वास्तविक हीं नावें प्राचीन असून जेव्हां प्राचीन इराणी लोक तेथें रहावयास आले तेव्हां तेथील ठिकाणांना त्यांनीं

तीं दिलीं असलीं पाहिजेत. झेंद् पंडितांच्या या कल्पनेमुळें ऐर्यन वइजोंच्या स्थानाचा खुलासा होण्याऐवजीं त्यासंबंधानें अधिकच घोटाळा झाला. पण आधुनिक शास्त्रीय शोधांनीं अवेस्त्यांतील वर्णन अगदीं खरें आहे, असें सिद्ध झाल्यामुळें ऐर्यन वइजो हा प्राचीन इराणाच्या पूर्व सरहद्दीवर होता हें झेन्द् पंडितांचें मत टाकून देण्याशिवाय मार्गच नाहीं.

दुसऱ्या अध्यायांतील महत्वाचा भाग म्हटला ह्मणजे ज्यांत अहुर-मझ्दानें यिमाच्या राज्यावर येणाऱ्या भयंकर थंडीची व हिमाची त्याला सूचना दिली आहे तो होय. ही सूचना भविष्यरूपानें दिली असून ती वाचणारास प्राचीन इराणी लोकांच्या पूर्वजांनीं प्रत्यक्ष पाहिलेल्या हिम-कालाचेंच तें वर्णन असावें असें सहज दिसून येईल. ती सूचना अशी:—

अहुरमझ्द यिमाला म्हणतो, "हे विवंगत्पुत्रा यिमा, या पृथ्वीवर भयंकर थंडीचा काळ येऊन अतिशय धुकें पडेल, व अत्युच्च पर्वताच्या शिखरावरही **अरेद्वि** इतका जाड बर्फाचा थर पडेल. आणि त्यामुळें, रानांत रहाणारे, डोंगरावर रहाणारे, व खालीं दऱ्यांत रहाणारे असे तिन्ही प्रकारचे पशु नाश पावतील. हा हिमकाल येण्यापूर्वीं पशूंकरितां क्षेत्रांत विपुल तृण उगवेल; वाहणारे पाण्याचे प्रवाह आणि वितळणारें बर्फ यांच्यामुळें ही भूमी पृथ्वींत सुखकर अशी आहे, व तींत अद्यापिहि पशूंचीं पावलें उमटलेलीं दिसत आहेत. ह्मणून तूं एक दीर्घ चौकोनी वर तयार कर आणि त्यांत, गाई, मेंढ्या, मनुष्यें, श्वान, पक्षी व रक्तवर्ण अग्नि यांचीं बीजें आणून ठेव."

सवंद वर्ष एका दिवसाप्रमाणें जेथें भासत होतें त्या यिमाच्या राज्या-वर घाड घालणाऱ्या हिमकालाचें याहून स्पष्ट वर्णन तें काय असणार? त्यांत अग्र मैन्यूचा उल्लेख नसून एखादा आधुनिक भूस्तरशास्त्रज्ञ हिम-कालांतील हिमावरणाचें जसें वर्णन करील त्याप्रमाणेंच तेंही सरळपणें केलेलें आहे. डोंगराच्या माथ्यावर सुद्धां पडणाऱ्या बर्फामुळें डोंगरावर व दऱ्यांत रहाणारे असे सर्व प्रकारचे पशु नाश पावतील असें अहुरमझ्दानें यिमाला सांगितलें; त्यांत तें बर्फ **अरेद्वि** इतकें उंच असेल असें म्हटलें असून त्याचा अर्थ 'अतिशय' किंवा 'चवदा अंगुळें' (एक वीत दोन अंगुळें) असा भाषांतरकारांनीं केलेला आहे. हातभर जाडीचा बर्फाचा थर डोंगर व दऱ्या यांवर सारखा पडला असतां सर्व जीवजात

मरून जाईल हें कांहीं सांगावयास नको. तात्पर्य, हिमपाताच्या आगमनाचें वर्णन याहून हुबेहुब करणें कठीणच आहे. आर्यांची मूळची सुखकर भूमी बर्फ व थंडी यांमुळें कशी नष्ट झाली यासंबंधानें इतका स्पष्ट मजकूर आपल्याजवळ असतां, पहिल्या फर्गर्दात (अध्यायांत) वर्णिलेली अंग्र मैन्यूची धाड कोणत्या प्रकारची होती हें सांगणें मुळींच कठीण नाहीं. ऐर्यन वइजोमधील हवा पूर्वी सुखकर असून बर्फ व थंडी यांच्या-योगानें ती पार बिघडून गेली हा केवळ तर्क नसून वंदिदादांतील वर्णणांत तसें स्पष्ट सांगितलें आहे. हें वर्णन इतकें हुबेहुब आहे कीं, तें केवळ दंतकथात्मक किंवा काल्पनिक असेल असें कधींही म्हणतां येणार नाहीं. भूस्तरशास्त्रविषयक आधुनिक शोधांवरून निदान दोन तरी हिमकाल आजवर होऊन गेले, असें सिद्ध झालें असून अमेरिकन शास्त्रज्ञांच्या मतें शेवटचा हिमकाल इ. स. पूर्वी ८००० वर्षांपूर्वीच संपून हिमोत्तरकालाला आरंभ झालेला आहे. अवेस्त्यांतील हिमपाताचें वर्णन भूस्तरशास्त्रांतील शोधांशीं इतकें मिळतें असतांना, तें खरें ऐतिहासिक आहे असें मानावयास पूर्वकल्पित दुराग्रहाशिवाय दुसरी कांहीं अडचण दिसत नाहीं. तीस चाळीस वर्षांत उपलब्ध झालेल्या भूस्तरशास्त्रीय प्रमाणांवरून कळून आलेल्या ह्या चमत्काराचें वर्णन वंदिदादाच्या कर्त्यानें केवळ कल्पनेनें केलें असेल असें संभवत नाहीं. तीस चाळीस वर्षांपूर्वी त्याला केवळ कल्पनासृष्टि ह्मणणें शोभत असेल पण आतां हिमपाताची कल्पना स्पष्टपणें कळून आल्यामुळें सदर अवेस्त्यांतील वर्णनासंबंधीं असल्या निराधार तर्कास मुळींच मान देतां येत नाहीं. खऱ्या गुरुकिल्लीच्या अभावीं आपल्या भूमीसंबंधानें लिहून ठेवलेल्या प्राचीन लेखांचा कसा भलताच अर्थ करण्यांत येतो यांचें मात्र हे तर्क ह्मणजे एक उदाहरण होत. झेंद् पंडितांनीं विनाकारण गैरसमज करून घेतला नसता तर ऐर्यन वइजो ऊर्फ आर्यांचें जन्मस्थान उत्तर ध्रुवाजवळच असून तेथून ते केवळ लोकसंख्येच्या वाढीमुळें किंवा कोणत्या तरी अप्रतिकार्य मनोवृत्तींमुळें तेथून निघाले नसून हिमपातानें ती भूमी रहाण्याला अयोग्य झाल्यामुळेंच त्यांना ती सोडून द्यावी लागली असें सहज समजलें असतें. तात्पर्य, अलीकडे तीस चाळीस वर्षांत उपलब्ध झालेल्या शास्त्रीय प्रमाणांवरून समजून आलेल्या हवामानांतील या अत्यंत प्राचीन क्रान्ती-

विषयींचा लेखी पुरावाच वंदिदादांत नमूद करून ठेविलेला आहे यांत कांहीं शंका नाहीं.

येथवर केलेल्या विवेचनावरून वंदिदादांतील पहिल्या दोन फर्गदांतील कथा आपल्याला किती महत्वाच्या आहेत हें कळून आलें. ऋग्वेदांतील उषेच्या सूक्तांवरून तीस दिवसांच्या अवधीच्या दीर्घ उषेचें आमच्या मूलस्थानांतील अस्तित्व सिद्ध होतें; तसेंच इतर वचनांवरून तेथील षण्मासावधि किंवा कांहीं कमी अशा रात्री व सात किंवा दहा महिन्यांचें वर्ष इत्यादि गोष्टीही कळून येतात. वैदिक कथांवरून कित्येक वैदिक देवताही मूळच्या ध्रुवावरीलच दिसतात, हेंही मागील दोन प्रकरणांत दाखविलें आहे. पण इतकें असूनही, ध्रुवावर वसति केव्हां होती, व ती तेथून केव्हां उठली याचा निर्णय करतां येण्यासारखें एकही वचन ऋग्वेदांत नाहीं. ह्यासाठीं भूस्तरशास्त्राची मदत घ्यावी लागली. या शास्त्रांतील अगदीं अलीकडच्या शोधांवरून ध्रुवप्रदेशांत जी हवा आज अति कडक व थंड आहे तीच गेल्या हिमकालापूर्वी सौम्य व सुखकर होती असें सिद्ध झालें आहे. आतां वैदिक वचनांवरून जर ध्रुवप्रदेशांतील आर्य वसतीचें अनुमान होत असेल, तर अर्थातच तेथें असणारी आर्यांची वसति हिमकालापूर्वीची असून नंतरची नव्हे हें उघडच झालें. पण अवेस्त्यांतील पूर्वोक्त कथांमुळें आतां भूस्तर शास्त्रीय शोधांवरून असें नुसतें अनुमानच करण्याची कांहीं गरज राहिली नाहीं. या कथांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, (१) ऐर्यन वइजो मधील हवा मूळ चांगली असून अंग्र मैन्यूनें तिचा बिघाड केला, (२) ऐर्यन वइजोचें स्थान असें होतें कीं त्यांत बांधिलेल्या वरांतून सबंद वर्षांत सूर्य एकदांच उगवलेला दिसे, (३) आणि ही सुखकारक भूमि हिमपातामुळें तेथील सर्व प्राण्यांचा नाश झाल्यामुळें रहाण्याला अयोग्य झाली. भूस्तरशास्त्रांतील अलीकडच्या शोधांच्या अभावीं हीं वचनें स्पष्ट असूनही त्यांचें रहस्य कळलें नसतें, व कदाचित् त्यांत आलेल्या गोष्टी असंभवनीयही वाटल्या असत्या. कित्येक झेन्द् पंडितांची अशी स्थिति झाल्यामुळेंच आपल्याला हवा तो अर्थ त्यांतून काढण्यासाठीं त्यांनीं या वचनांची लागेल तशी ओढाताण केली. म्हणून हा गैरसमज दूर करून अवेस्त्यांतील कथांचा खरा अर्थ दाखवून देण्यांत

भूस्तर शास्त्रीय शोधांची जी मदत झाली आहे ती नाकबूल करितां येणार नाहीं. तरी पण त्यावरून या कथांचें महत्व कांहीं कमी होत नाहीं. प्राचीन काळीं युरेशियाच्या अगदीं उत्तर मागांत घडून आलेल्या ज्या भयंकर हिमपातामुळें तेथील आर्यांना दक्षिणेकडे यावें लागलें, त्याचा इतिहास हजारों वर्षें केवळ कथांच्या रूपानें स्मरणांत राहिलेला आहे; व जरी या कथा आजवर गूढ राहिल्या होत्या, तरी अलीकडील शास्त्रीय शोधांवरून त्यांचा खरा अर्थ समजल्यामुळें, त्यांच्या सत्यतेविषयीं आतां चांगली खात्री पटण्यासारखी आहे. धार्मिक वाङ्मयांतील गोष्टींची ऐतिहासिक सत्यता आधुनिक शास्त्रांनीं पटवून दिल्याचीं अशीं थोडींच उदाहरणें सांपडतील. याप्रमाणें प्राचीन कथा व आधुनिक शास्त्रें यांवरून ऐर्यन वइजोचें ध्रुवाजवळचें स्थान व त्याचा हिमामुळें झालेला नाश या गोष्टी सिद्ध झाल्यावर, पहिल्या फर्गदींतील वर्णनांत आलेल्या सोळा भूमींचा संबंध आर्यांच्या हळूहळू झालेल्या प्रयाणार्शींच असला पाहिजे, असें सहजच झालें. त्या फर्गदींत जरी स्थानत्यागाचा कांहीं उल्लेख केलेला नाहीं, तरी ऐर्यन वइजो हा अगदीं उत्तरेकडील प्रदेश असून त्याचा हिमामुळें नाश झाला एवढें समजल्यावर स्थानत्यागाच्या स्पष्ट उल्लेखाचें कांहीं कारण नाहीं. सोळा निरनिराळे प्रदेश एका विशिष्ट क्रमानें सांगितले आहेत ही एवढीच गोष्ट ते प्रदेश आर्यांच्या प्रयाणमार्गांत क्रमशः लागलेले होत असें मानावयाला पुरेशी आहे. वंदिदादांतील मजकुराचें प्रत्येक अक्षर ऐतिहासिक दृष्ट्या खरें आहे असें म्हणण्याचा आमचा उद्देश नाहीं; कारण आपल्या इकडील मेरूप्रमाणेंच ऐर्यन वइजोदेखील पुराणांच्या जाळ्यांत गुरफटून गेलेला आहे. तरी पण इराणी आर्यांच्या ध्रुवाजवळील मूलस्थानाची ऐतिहासिक माहितीच वंदिदादांत दिली असून, त्याच्या पहिल्या फर्गदींत, ते आपल्या मूलस्थानांतून निघून हिमोत्तरकालाच्या आरंभीं रसा (रंघ) नदीच्या काठीं किंवा सप्तसिंधूच्या प्रान्तांत येऊन तेथें वसाहत करीपर्यन्त त्यांना वाटेंत लागलेल्या देशांचेंच वर्णन आहे, या गोष्टी नाकबूल करतां येत नाहींत.

या इराणी आर्यांच्या नंदनवनावर आलेल्या बर्फाच्या पुराच्या गोष्टींचें आपल्या प्राचीन वाङ्मयांतील प्रलयाच्या कथेशीं बरेंच साम्य आहे. या प्रलयाच अगदीं प्राचीन वर्णन म्हटलें म्हणजे शतपथ ब्राह्मणांतील (१,

८,१,१–१०) असून महाभारत, मत्स्यपुराण, भागवत इत्यादि ग्रंथातहीं ही कथा आलेली आहे. या सर्व कथांचा विचार येथें न करतां फक्त शतपथ ब्राह्मणांतील कथेचेंच थोडेंसें परीक्षण केल्यास पुरें आहे. ती कथा अशीः—एके दिवशीं प्रातःकाळीं मनूला स्नानाकरितां पाणी दिलें असतां त्यांत असलेला एक मत्स्य मनूच्या हातांत सांपडला. तेव्हां या मत्स्यानें आपला प्राण वांचविण्याविषयीं मनूची प्रार्थना केली आणि या उपकारांची फेड करण्यासाठीं ह्मणून सर्व प्राण्यांना वाहून नेणाऱ्या एका जलाच्या औघापासून त्याचें रक्षण करण्याचें मत्स्यानें कबूल केलें. या कथेंत हें संभाषण केव्हां व कोणत्या स्थळीं झालें हें सांगितलेलें नसून त्या औघाचेंही स्वरूप अधिक सविस्तर सांगितलेलें नाहीं. असो. मत्स्यानें सांगितल्याप्रमाणें मनूनें त्याला प्रथम एका भांड्यांत नंतर एका लहान तळ्यांत ठेऊन व शेवटीं समुद्रांत नेऊन त्याचें रक्षण केलें. तेव्हां त्यानें मनूला सांगितलें कीं, अमुक एक वर्षीं भयंकर जलप्रलय होणार आहे, तर तो होण्यापूर्वी एक नाव बांधून त्यांत तूं वसून रहा. मनूनें त्याप्रमाणें नांव बांधिली व जेव्हां पूर चढूं लागला, तेव्हा तींत बसून त्यानें तिचा दोर त्या मत्स्याचा शिंगाला बांधिला आणि अशा रीतीनें तो उत्तरगिरीशीं (हिमालय) येऊन पोंचला. तेथें आल्यावर मत्स्यानें मनूला सांगितलें कीं, तूं आपली नांव एखाद्या वृक्षाला बांध ह्मणजे पाणी जसें जसें उतरेल तशी तशी ती खालीं येईल. मनूनें तसें केलें आणि ह्मणूनच या उत्तरगिरीला ' मनूचें अवसर्पण ' असें नांव मिळालें, असेंही त्या ब्राह्मणांत सांगितलें आहे. या प्रलयांतून एकटा मनूच काय तो बचावला. पुढें त्याला संततीची इच्छा उत्पन्न होऊन त्यानें पाकयज्ञ केला. तेव्हां एका वर्षानें इडा नांवाची स्त्री उत्पन्न होऊन तिच्यापासून त्याला संतति प्राप्त झाली.

ह्या गोष्टीचा अथर्ववेदांत उल्लेख केलेला आहे असें दिसतें, कारण त्यांत (१९,३९,७–८) कुष्ठ नांवाची वनस्पति **नावप्रभ्रंशनम्** नांवाच्या हिमवानाच्या शिखरावर उत्पन्न झाली असें ह्मटलें आहे. महाभारतांत या हिमालयाच्या शिखराला **नौबंधनम्** ह्मटलें आहे. पण ही कथा केव्हां व कोठें घडली याबद्दल त्यांत कांहीं सांगितलेलें नाहीं. मत्स्यपुराणांत मनूच्या तपश्चर्येचें स्थान **मलय** ऊर्फ मलबार हें दिलें असून, भागवतांत

द्रवीड देशाचा राजा **सत्यव्रत** यालाच या प्रलयाच्या कथेचा नायक झटलेलें आहें. पण या सर्वांत प्राचीन अशी जी ब्राह्मणांतील हकीगत तींत मनु कोणत्या स्थळीं नावेंत बसला हें कांहींच सांगितलेलें नाहीं. शिवाय हा पूर पाण्याचा असून अवेस्त्यांतील पुराप्रमाणें बर्फाचा नाहीं. तथापि मनूची कथा ही एखाद्या लहानशा पुराची कथा नसून अवेस्त्यांत वर्णिलेल्या सार्वत्रिक प्रलयाचीच आहे यांत कांहीं शंका नाहीं. शतपथ ब्राह्मणांत या पुराला **औघः** असें झटलें आहे; तरी संस्कृतांत बर्फाचा वाचक जो **प्रालेय** शब्द तो पाणिनीच्या मतें (७,३,२) प्रलय शब्दापासूनच झालेला आहे. यावरून प्रळय आणि बर्फ यांचा मूळ संबंध भारतीयांना प्रथम माहीत असून मागाहून त्याकडे दुर्लक्ष झालेलें असावें असें दिसतें. भूस्तरशास्त्रावरून असें समजतें कीं, प्रत्येक हिमकालाच्या प्रसंगीं बर्फ पडणाऱ्या प्रान्तांतून वहाणाऱ्या नद्या आपल्याबरोबर विपुल गाळ व माती घेऊन दूरच्या जमिनीलाही त्या पुरानें भरून टाकितात. शतपथ ब्राह्मणांतील औघ शब्दाचाही असल्याच एखाद्या जंगी पुराशीं संबंध असून मनु त्याबरोबर आपल्या नावेसह वहात वहात हिमालयाशीं येऊन पोंचला असेल. झणजे ही ब्राह्मणांतील गोष्ट केवळ पाण्याच्या पुराचीच होती असें मानण्याचें विशेष कारण नाहीं. ही कथा अवेस्त्यांतील बर्फाच्या प्रलयाच्या गोष्टीचेंच रूपान्तर होय. ही जलप्रलयाची गोष्ट भारतीयांनीं बायबलांतील गोष्टीवरून आपल्या ग्रंथांत घातली असेल अशी एक कल्पना कांहीं वर्षांपूर्वी कित्येक पंडितांनीं काढिली होती. पण शतपथ ब्राह्मणांत "कृत्तिका मात्र पूर्व दिशेपासून चळत नाहींत' असें जें म्हटलें आहे, त्यावरून हें ब्राह्मण इ. स. पूर्वी २५०० वर्षांच्या अलीकडचें नाहीं हें सिद्ध झाल्यामुळें ही कल्पना त्यांना सोडून द्यावी लागली. तात्पर्य ही प्रलयाची कथा मूळ आर्यच असून अवैस्तिक व वैदिक हकीगतीचें मूळ एकच असलें पाहिजे. अवैस्त्यांतील यिम हा विवंघत्चा पुत्र आहे, तर वैदिक मनूहि वैवस्वत ऊर्फ विवस्वताचा पुत्र झणून प्रसिद्ध आहे (श. ब्रा. १३,४,३,३; ऋ. ८,५२,१). यमालाही ऋग्वेदांत वैवस्वत म्हटलेलें आहे (१०,१४,१). म्हणून अवेस्त्यांतील गोष्टीचा नायक यिम (सं. यम) व वेदांतील गोष्टींचा नायक मनु आणि एक पूर बर्फाचा तर दुसरा जलाचा असें जरी आहे,

तरी दोन्ही गोष्टींचा संबंध एकाच भूस्तरविषयक उत्पातांशीं आहे यांत शंका नाहीं. शतपथ ब्राह्मणांतील हकीगतीपेक्षां वंदिदादांतील हकीगत स्पष्ट असून तिच्या बहुतेक बाबींचा हिमपातविषयक शास्त्रीय शोधांशीं चांगला मेळ पडत असल्यामुळें शतपथ ब्राह्मणापेक्षां ती प्राचीन आहे असें अनुमान होतें.

उत्तरेकडील वसतिस्थानाचें ज्यांवरून थोडेंबहुत अनुमान करितां येईल अशीं दुसरींही कांहीं वचनें आमच्या प्राचीन वाङ्मयांत आहेत. ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं आलेले **शतम् हिमाः** (१,६४,१४,२,३३;२;५,५४, १५ इ.) हे शब्द, ऐतरेय ब्राह्मणांतील* (८,१४) उत्तर कुरु उत्तर मद्र यांचे उल्लेख हे उत्तरेकडील वसतिस्थानाचेच अवशेष असावे. उत्तर कुरु हे देवांची भूमि असून त्यांना कोणीही मर्त्य जिंकूं शकणार नाहीं असें ऐतरेय ब्राह्मणांत सांगितलें आहे (८,२३). रामायणांत (४, ४३,३८) त्यांना पुण्यकर्मे करणारांची वास्तव्यभूमि असें म्हटलें आहे. महाभारतांत सभापर्वामध्यें (अ. २८) ' या उत्तर कुरूंना जिंकावयास कोणीही धजत नाहीं ' असें अर्जुनाला सांगितलेलें आहे. टालेमी या प्राचीन ग्रीक शास्त्रज्ञानेंही ऑत्तारो कोरा या नांवाच्या पर्वताचा, लोकांचा व नगराचा उल्लेख केलेला आहे. उत्तरकुरूचा प्रदेश हिमालयाच्या पलीकडचा असून तेथील लोक वैराज्य भोगितात असें ऐतरेय* ब्राह्मणांत सांगितलें आहे (८,१४). ' वाग्देवता

---

१ जलप्रलयाची कथा ग्रीक पुराणांतही आलेली असून मनूच्या वैदिक गोष्टीशीं तिचें कांहीं बाबतींत बरेंच साम्य आहे. ती गोष्ट अशी–पृथ्वीवर अतिशय अन्याय झाल्यामुळें **झुस**नें (द्यौः पितर्) अतिशय पाऊस पाडून, अति उंच पर्वतशिखरांशिवाय बाकीच्या सर्व ग्रीस देशाला पाण्यांत बुडवून टाकिलें. त्यांत द्युकेलियन हा आपल्या बापाच्या सांगण्यावरून एक नाव बांधून तींत राहिल्यामुळें बचावला. पुढें त्याच्या प्रार्थनेवरून झुसनें त्याच्या बरोबर राहण्यासाठीं स्त्रीपुरुष उत्पन्न केले. नावेंतून सुखरूप उतरल्यावर द्युकेनियननें झुसला यज्ञ करून संतुष्ट केलें. आरिस्तातल या ग्रीक तत्ववेत्यानेंही आपल्या ग्रंथांत ही गोष्ट खरी ऐतिहासिक समजूनच तिची चर्चा केली आहे.

* तस्मादेतस्यामुदीच्यां दिशि ये केच परेण हिमवंतं जनपदा उत्तरकुरव उत्तरमद्रा इति वैराज्यायैव तेऽभिषिच्यन्ते । ऐ. बा. ८, १४.

(पथ्यास्वस्ति) उत्तर दिशेला (उदीचीं दिशम्) जाणते ' असें कौषीतकी ब्राह्मणांत सांगितलें आहे. या सर्व गोष्टींवरून प्राचीन काळीं उत्तरेशीं आर्यांचा असलेला संबंध दिसून येण्यासारखा आहे असें मूर या पाश्चात्य पंडिताचें मत आहे. पण यांपैकीं एकही गोष्ट निर्णायक नसून ध्रुवस्थानाच्या सिध्यर्थ त्यांचा प्रत्यक्ष असा कांहींच उपयोग नाहीं. वैदिक व अवैस्तिक वचनांवरून निघणाऱ्या अनुमानांना अप्रत्यक्ष पुष्टि यांच्यावरून मिळेल; आणि त्याच दृष्टीनें त्यांचा या ठिकाणीं उल्लेख केला आहे. आमची खरी मदार म्हटली ह्मणजे पूर्वीच्या प्रकरणांत दिलेलीं वैदिक वचनें व या प्रकरणांत सांगितलेल्या अवेस्यांतील गोष्टी ह्यांवरच्च आहे. या दोहोंवरून आर्यांच्या ध्रुवप्रदेशांतील मूलस्थानाविषयीं प्रत्यक्ष पुरावा मिळत असून, तें मूलस्थान हिमकालांत नष्ट झाल्यामुळें प्राचीन आर्यांना आपली जन्मभूमि सोडून दक्षिणेकडे प्रवास करीत व मध्य आशियांतील कित्येक देश ओलांडित उक्षस्, कुभा, रसा इत्यादि नद्यांच्या कांठीं वसाहती कराव्या लागल्या व तेथून पुढें कांहीं दिवसांनीं त्यांची एक शाखा पूर्वेस वळली व दुसरी पश्चिमेकडे इराणांत जाऊन राहिली इत्यादि गोष्टींचेंही त्यांवरून चांगलें अनुमान होतें.

प्रकरण १२ वें.

तुलनात्मक गाथाशास्त्रांतील प्रमाणें.

तुलनात्मक गाथाशास्त्रांतील प्रमाणांचें महत्व-वैदिक प्रमाणांना त्यांवरून दुजोरा मिळतो-ध्रुवोपपत्तीवरून यूरोपीय आर्यांच्या पुराणकथांचा उलगडा होतो-लेट् लोकांच्या पुराणांतील अनेक उषा-ग्रीक पुराणांतील हेराक्लिसच्या अनेक स्त्रिया-सेल्टिक पुराणांतील सूर्याच्या स्त्रीचीं अनेक नांवें-ग्रीक पुराणांतील ३५० दिवसांचें वर्ष-रोमन वर्ष पूर्वी दहा महिन्यांचें होतें याविषयीं प्लूटार्कचें मत-प्राचीन सेल्टिक वर्ष आक्टोबरच्या शेवटीं संपे-या वर्षाचे दोन भाग-डिमेटरची कन्या सहा महिने तमोमय घरांत जाई-प्लूटो (पाताळाचा राजा) पर्झिफोनला सहाच महिने आपले जवळ ठेवितो-मोइतूर्याच्या युद्धाचा दिवस-प्राचीन नॉर्स लोकांचें वर्षही असेंच होतें-या सर्वांवरून सहा महिन्याच्या दिवस रात्रीचा बोध होतो-या अनुमानाला व्युत्पत्तिशास्त्राचा आधार--वैदिक नवग्वांचे जोडीदार-रोमन पुराणांतील नोव्हम् सार्इल्स--सेल्टिक् पुराणांतील नऊ रूपांची कन्या-नॉर्स पुराणांतील थॉरचीं नऊ पावलें--अवेस्त्यांतील विफ्र नवाझ्-नॉर्स् देव बाल्डर आकाशांत बराच वेळ थांबतो-ही गोष्ट ध्रुवप्रदेशांतील दीर्घ दिवसाची द्योतक आहे-स्लॅव्होनिक पुराणांतील इवान्ची कथा-वैदिक त्रिताशीं त्याचें साम्य-वैदिक विष्णूप्रमाणें आयरिश आणि नॉर्स पुराणांतील देव वर्षांतून कांहीं काल रोगग्रस्त होत-हा काल हिंवाळ्याचा व दीर्घ अंधकाराचा होय-मानुष्यकशास्त्रांतील नवीन शोधांवरून आर्यांचें मूळचें स्थान उत्तर जर्मनी किंवा स्वीडनमध्यें होतें असें म्हणूं लागले आहेत-याच्याही पलीकडे उत्तरेकडे जाणें अवश्य आहे-सर्व मानव जातीचेंही मूलस्थान ध्रुवाजवळ असूं शकेल-प्रो० ट्रिसची शोध करण्याची पद्धति-त्याचीं अनुमानें-पौरस्त्य व पाश्चात्य कथांवरून ध्रुवस्थानाचीच सिद्धि होते.

तुलनात्मक गाथाशास्त्रांतील प्रमाणें.

वेद आणि अवेस्ता यांतील कथांवरून निघणाऱ्या अनुमानांना इतर आर्य राष्ट्रांच्या पुराणकथांवरून कितपत पाठबळ मिळतें हें या प्रकरणांत पहावयाचें आहे. मागील प्रकरणांत जीं वैदिक व अवैस्तिक प्रमाणें दिलीं आहेत त्यांचें स्वरूप सर्वसामान्य आहे. तीं केवळ आशियाखंडालाच लागू पडणारीं आहेत असें नाहीं. त्यामुळें जरी इतर राष्ट्रांच्या कथांचा त्यांशीं विरोध आला तरीही त्यांवरून निघणारीं अनुमानें त्याज्य होणार नाहींत. असें जरी आहे तरी इतर राष्ट्रांनीं आपल्या उत्तरेडील मूलस्थानाचें पुराणकथांच्या रूपानें किंवा कालगणनेच्या पद्धतींत स्मरण ठेविलें आहे कीं नाहीं हें पहाण्यासाठीं त्यांच्या कथांचें निरीक्षण करणें उपयुक्तच होणार आहे. या गोष्टींचें प्रामाण्य कदाचित् वैदिक कथांइतकें मानतां येणार नाहीं; तरी वैदिक कथांना त्यांचेपासून दुजोरा मिळतो ह्मणून तरी त्यांचें महत्व आहेच. तुलनात्मक गाथाशास्त्र आणि तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्र यांच्या इतिहासावरून असें दिसतें कीं, युरोपीय पंडितांना संस्कृतभाषा व तिच्या द्वारा वैदिक वाङ्मय यांची ओळख झाल्यापासून ग्रीक व रोमन पुराणांसंबंधानें नवीन दृष्टि उपलब्ध झाली. त्याचप्रमाणें आतां ध्रुवावरील वसतिस्थान सिद्ध करणारीं वेद व अवेस्ता यांतील प्रमाणें उपलब्ध झाल्यामुळें यूरोपीय आर्यांच्या पुराणकथांतील बऱ्याच बाबींचा उलगडा होणार आहे.

वैदिक प्रमाणांचा ऊहापोह करतांना जो क्रम स्वीकारला होता, तोच येथेंही घेऊन, प्रथम कालगणनेचा विचार करून त्यावरून, दीर्घ उषा, दीर्घ दिवस व रात्र, किंवा बारा महिन्यांहून कमी अवधीच्या सूर्यप्रकाशाचें वर्ष इत्यादि ध्रुवविशिष्ट गोष्टींचा पाश्चात्य आर्यांच्या कथांमध्यें कांहीं मागमूस आढळतो कीं नाहीं हें पाहूं. वेदांमध्यें उषा अनेक आहेत, अशा तात्पर्याचीं जीं वचनें आलीं आहेत त्यांप्रमाणें लेट् लोकांच्या पुराणांत **दिएवो दुक्तेचा** अनेकवचनीं उल्लेख करून अशा अनेक सुंदर **दिएवो दुक्रुझेलिस्** ह्मणजे देवकन्यका आहेत असें ह्मटलें आहे. उषावाचक **दिवो दुक्ते** या शब्दाचा अर्थ द्यौची कन्या असा असून ऋग्वे-

दांतील **दिवो दुहिता** शब्दाचेंच तो रूपान्तर आहे. ग्रीक कथांतही हेराक्लिसच्या अनेक स्त्रिया असून त्यांचीं नांवें पीत, सौम्य, तेजस्वी अशा अर्थांचीं असून **इऑस** ऊर्फ उषस्शीं त्यांचा संबंध स्पष्ट दिसून येतो. हीच गोष्ट सेल्टिक् पुराणांत आली असून कुचुलैनच्या ह्मणजे सूर्य-देवाच्या स्त्रीचीं अनेक नावें त्यांत दिलीं आहेत. वेदांतील उषेच्या वर्णनाप्रमाणें या वर्णनावरून ध्रुवप्रदेशाचा प्रत्यक्ष बोध होण्यासारखा नाहीं. पण यांपैकीं उषेला लेटिश पुराणांत द्यौची कन्या ह्मणून ऋग्वेदाप्रमाणेंच तिचा अनेकवचनीं उल्लेख केला आहे; म्हणून ऋग्वेदांतील सविस्तर वर्णनावरून जें अनुमान काढलें तेंच लेटिश कथांनाही लावावयास हरकत नाहीं. ग्रीक व सेल्टिक् पुराणांनाही हीच गोष्ट लागू आहे.

गवां अयनम् आणि त्याबरोबर नवग्व आणि दशग्व यांची कथा सांगतांना ग्रीक पुराणांतील हेलिऑस् (सूर्य) याचे ३५० बैल व तितक्याच मेंढ्या असल्याचें सांगून त्यावरून ३५० दिवसांच्या वर्षाचें अनुमान केलें आहे. तसेंच रोमन वर्षाचा शेवटचा महिना जो डिसेंबर (सं. दशमवार) त्याच्या नांवावरून तो मूळ दहावा महिना असावा असें मानून प्राचीन रोमन वर्ष दहाच महिन्याचें होतें असें सांगितलें आहे. प्लूटार्कनें प्रसिद्ध रोमन लोकांचीं चरित्रें लिहिलीं आहेत, त्यांत न्यूमा नामक राजाच्या चरित्रांत असें म्हटलें आहे कीं, 'न्यूमानें महिन्यांचा क्रम बदलून मार्च पहिला होता तो तिसरा केला आणि जानेवारी व फेब्रुवारी हे अकरावे व बारावे होते ते पहिले व दुसरे केले.' यावरून कित्येकांनीं रोमन लोकांचें प्राचीन वर्ष दहा महिन्याचें नसून बारांचेंच होतें असें ठरविलें आहे. पण प्लूटार्कनेंच पुढें सांगितलें आहे कीं, 'न्यूमानें जानेवारी व फेब्रुवारी हे महिने नवीनच घातले; त्यापूर्वी रोमन लोक वर्षाचे दहाच महिने धरीत असत, असें पुष्कळांचें ठाम मत आहे.' शिवाय प्लूटार्कनें आपलें स्वतःचें मत देतांना म्हटलें आहे कीं, 'रोमन वर्षाचे प्रथम दहाच महिने होते व बारा नव्हते, असें मानावयास त्यांतल्या शेवटच्या महिन्याच्या नांवाचा मोठा आधार आहे; कारण अजूनही त्याला दहावा महिना अशा अर्थाचें डिसेंबर हेंच नांव आहे. शिवाय मार्च पासून पांचवा, सहावा इत्यादि महिन्यांचींही त्याच अर्थांचीं क्विन्टिलिस् (पांचवा) सेक्स्टिलिस् (सहावा) इत्यादि नांवें असल्यामुळें मार्च हा पहिला महिना

होता हें उघड होतें.'' हें फ्लूटार्कचें ह्मणणें सोडून देतां येण्यासारखें नाहीं. कारण महिन्यांना पांचवा, सहावा इत्यादि क्रमवाचक नांवें देण्याची पद्धत डिसेंबरपासून एकाएकीं सोडून दिली असेल असें ह्मणणें सयुक्तिक नाहीं. जानेवारी व फेब्रुआरी हे महिने खरोखर न्यूमानें मागाहून घातलेले असून, ते कां घातले हें जेव्हां समजत नाहींसें झालें, तेव्हां ते पुढून मागें आणले असें मत प्रचलित झालें असावें. कारण फ्लूटार्क शिवाय आणखी मॅक्रोबियस् या ग्रंथकारानेंही आदि रोमन राजा जो रोम्युलस् त्याचें वर्ष दहाच महिन्यांचें होतें असें ह्मटलें आहे. अर्थात् त्याबद्दल मुळींच शंका नसून वेदांतील दशग्वांच्या दशमासिक सत्रांच्या गोष्टीशींही तें चांगलें जुळत आहे.

सेल्ट्, टचूटन् आणि ग्रीक या लोकांच्या प्राचीन वर्षाविषयींचीं प्रमाणें इतकीं निश्चित नाहींत; तरी त्या प्रत्येकामध्यें वर्षाचा थोडा तरी भाग थंडी व काळोख यांनीं व्याप्त असल्याचें स्पष्ट दिसत असल्यामुळें तें वर्ष मूळचें ध्रुवावरचें असावें असें म्हणावयास हरकत नाहीं. सेल्टिक् पुराणकथांवरून असें दिसतें कीं, त्यांचें प्राचीन वर्ष आक्टोबरच्या शेवटीं संपून, तेथून थंडी व काळोख यांना आरंभ होत असे; कारण हिंवाळ्याच्या आगमनाप्रीत्यर्थ करावयाचा समारंभ ते आक्टोबरच्या शेवटच्या दिवशीं करीत असत. उन्हाळ्याच्या म्हणजे सेल्टिक्पुराणाप्रमाणें पहातां वर्षाच्या मध्यभागीं करावयाचा **लम्नसद**चा उत्सव आगष्ट महिन्याच्या पहिल्याच दिवशीं होत असे, व उन्हाळ्याला सुरुवात मेच्या पहिल्या दिवसापासून होई. प्राचीन सेल्टिक् वर्षाचे दोनच भाग असल्याचेंही कांहीं गोष्टींवरून दिसून येतें. **डि-मेटर** म्हणजे भूमाता (सं०ज्या-माता) ही आपली कन्या **प्राझर्पाइन्** इच्या संगतींत सहा महिने सुखानें घालवून, पुढच्या सहा महिन्यांत ती पृथ्वीच्या खालीं तमोमय घरांत गेल्यामुळें तिच्या वियोगामुळें दुःख करीत असते. तशीच ग्रीकपुराणांत दुसरी एक गोष्ट आहे. झुसची (सं-द्यौस्) कन्या पर्झिफोन हिला पाताळाचा राजा फ्लूटो हा पळवून नेतो; पण त्याला वर्षांतून फक्त सहाच महिने आपल्याजवळ तीस बाळगतां येतें. ऋग्वेदांत इन्द्र-शंबरांच्या युद्धाच्या आरंभाचा जसा नक्की दिवस दिला आहे, तसा सेल्टिक पुराणांतहीं मोइतूर्याच्या युद्धाचा दिवस नवंबरची पहिली तारीख म्हणून सांगितला आहे.

नार्वेतील लोकांचें व ग्रीक लोकांचें प्राचीन वर्षही अशाच तऱ्हेचें होतें असें प्रो० ऱ्हिस या विद्वान् पंडितानें दाखविलें आहे.

यावरून युरोपांतील आर्यांनाही सहा महिन्यांचा दिवस व सहा महिन्यांची रात्र यांची माहिती असून, या भेदतत्वावरच त्यांची कालगणनापद्धति बसविली होती असें दिसतें. तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्रावरूनही या अनुमानाला बळकटी येते. आर्यांच्या बहुतेक शाखांच्या वर्षाचे उन्हाळा व हिंवाळा असे दोनच भाग होते, असे मानावयाला व्युत्पत्तिशास्त्रावरून आधार मिळतो असें डॉ० श्रेडर नांवाच्या पंडितानें आपल्या ग्रंथांत दाखविलें आहे. निरनिराळ्या आर्य भाषांना सबंद वर्षाचा वाचक असा एकही शब्द समाईक नाहीं. ध्रुववृत्तांत वर्षांतून सहा ते बारा महिन्यांपर्यंत सूर्यप्रकाशाचा काल असल्यामुळें वर्षाचा बोध करून घेण्याकरितां बारा महिन्यांच्या वर्षाच्या कल्पनेपेक्षां, अमुक महिन्यांचा उन्हाळा व हिंवाळा अशीच कल्पना तेथील लोकांना अधिक सोपी वाटली असावी. सबंद वर्षाचा बोध करण्याकरितां **मानुषा युगा** आणि **क्षपः** असे जे शब्द आले आहेत त्यांचा यावरून उलगडा होण्यासारखा आहे.

नवग्व आणि दशग्व यांच्या नांवांत जे संख्यात्मक भाग आहेत त्यांवरून त्यांच्या मत्राच्या अवधीच्या कालाची कल्पना करतां येते असें मागें दाखविलेंच आहे. या नवग्व–दशग्वांसारखी मंडळी इतर आर्यपुराणांतही आहेत कीं काय हें आतां पाहूं. रोमनपुराणांतील **नोव्हम्सार्इल्स** व नवग्व, यांचें शाब्दिक साम्य आहे; पण त्यांच्या स्वरूपांत तसें साम्य दिसत नाहीं. परंतु सेट्लिकपुराणांतील नवरूपा कन्येशीं मात्र त्यांचें खरें साम्य दिसतें; कारण तिचा कुचुलैन ऊर्फ सूर्य–देवाशीं संबंध आहे. **कांचोबर** याची **फेडेल्म** नांवाची एक सुंदर कन्या होती. पश्चिमेकडून आपले शत्रू वर आले असें ऐकतांच कुचुलैन हा आपल्या पित्यासह तिकडे गेला, व सायंकाळीं एकाएकीं तेथून निघून तो आपल्या संकेतस्थानीं आला; त्या ठिकाणीं फेडेल्म हिनें त्याला दुसऱ्या दिवशींच्या युद्धासाठीं तयार करण्याकरितां त्याच्या स्नानाची तयारी करून ठेविली होती. ही गोष्ट नवग्व–दशग्वांनीं सोमांच्या आहुती देऊन वृत्रयुद्धासाठीं इन्द्राला पुष्ट करण्याच्या गोष्टीसारखीच आहे. तात्पर्य ही नवरूपा कन्या म्हणजे वैदिक नवग्वांचें सेल्टिक रूपांतरच होय. नॉर्स पुराणांत पृथ्वीचा पुत्र जो **थॉर्**

तो राक्षसाचा वध केल्यावर, नऊ पावलें चालून सर्पविषामुळें मृत्यु पावतो असें सांगितलें आहे. थॉरची ऊर्फ सूर्यदेवाचीं हीं नऊ पावलें म्हणजे तो क्षितिजावर आल्यापासून पुनः दीर्घ काळोखाच्या आरंभीं क्षितिजास्तालीं जाईपर्यंतचा नऊ महिन्यांचा काळ असला पाहिजे. अवेस्त्यांतील **विफ्र नवाझ** याची गोष्टही अशाच प्रकारची दिसते. थाएतौनानें त्याला हवेंत झोंकून दिल्यामुळें तो सारखा तीन दिवस व तीन रात्री उडत होता; पण त्याला खालीं येतां येईना. तिसऱ्या रात्रीच्या शेवटीं जेव्हां उषेचा उदय झाला, तेव्हां त्यानें अर्द्विसूर अनाहित हिची प्रार्थना करून तिला **हओमाच्या** आहुति देण्याचें कबूल केलें. प्रार्थना ऐकून अर्द्विसूर अनाहितेनें त्याला सुखरूप खालीं आणिलें. हा विफ्र नवाझ वैदिक विप्र नवग्वच होय. सात विप्र व नवग्व हे ऋग्वेदांत (६,३२,२) एकत्र सांगितलेले असून, ५,७४,७ यांत अश्विनांना **विप्रवाहसा** म्हणून ते दूरच्या प्रदेशांत तीन दिवस व तीन रात्री राहिल्याचें सांगितलें आहे. नऊ महिन्यानंतर आपलें सत्र आटोपून पाताळांत इंद्राला मदत करण्यासाठीं जाणाऱ्या नवग्वांची गोष्ट आश्विनांच्या कथेशीं जोडून विफ्र नवाझाच्या गोष्टीच्या रूपानें ती अवेस्त्यांत सांगितली असावी.

येणें प्रमाणें सेल्टिक, ग्रीक, आणि नॉर्स वाङ्मयांतील कथांवरून हिंवाळ्यांतिल दीर्घ काळोख किंवा सहा अथवा दहा महिन्यांच्या प्रकाशाचें वर्ष इत्यादि गोष्टी यूरोपीय आर्यांच्या पूर्वजांना माहीत होत्या असें दिसतें. नॉर्स पुराणांतील सूर्यदेव **बाल्डर** हा आकाशांत बराच वेळ राहतो असें म्हटलें आहे. सूर्य आपला रथ सोडून मध्येंच आकाशांत थांबतो. असें जें ऋग्वेदांत म्हटलें आहे, त्यासारखेंच हें आहे. उत्तर ध्रुवाजवळील दीर्घ दिवसाचा संबंध या गोष्टींत असावा. स्लॅव्होनिक पुराणांत वैदिक **त्रिताच्या** गोष्टीचें प्रतिरूप आहे. तें असें–एका वृद्ध दंपतीला तीन पुत्र होते; त्यापैकीं दोघे शहाणे असून, तिसरा **इवान्** हा भोळसर होता. इवान् ज्या ठिकाणीं रहात असे तेथें नेहमींच रात्र असे. हें कृत्य अहीचें असल्यामुळें इवान् त्या अहीला मारावयास सिद्ध झाला. तेव्हां बारा शीर्षांचा एक साप तेथें आला. इवाननें त्याचा वध केल्यावर लगेच जिकडे तिकडे प्रकाश झाला. त्रितांचें स्थान दूरच्या प्रदेशांत ऊर्फ पाताळांतील अंधकारमय प्रदेशांत होतें असें जें वेदांत सांगितलें आहे त्याशीं ही इवान्ची गोष्ट उत्तम जुळते.

या सर्व कथांवरून,सेल्ट्, टयूटन्,लेट्, स्लॅव्ह्, ग्रीक आणि रोमन या यूरोपीय आर्यलोकांच्या पुराणांत ध्रुवाजवळील कालपरिमाणाच्या खुणा अद्यापिही राहिल्या आहेत असें दिसून येतें. दीर्घ उषा, दीर्घ दिवस व रात्र, आणि काळोखाचे हिंवाळे या गोष्टींचे कमी जास्त स्पष्ट उल्लेख त्यांत आहेत, पण त्यांपैकीं एकावरूनही ध्रुवावरील आर्यांची वसति किंवा त्यांचा नाश होण्याचें कारण यांचा प्रत्यक्ष बोध होत नाहीं. पण ही उणीव वेद व अवेस्ता यांनीं पूर्णपणें भरून काढिली असल्यामुळें, त्यांच्या साहाय्यानें यूरोपीय आर्यांच्या पुराणांचा विचार केल्यास त्यांतील कथांवरून ध्रुवाजवळील मूलस्थानाचें अनुमान करतां येण्यासारखें आहे. वर सांगितलेल्या गोष्टींशिवाय आणखीही कित्येक गोष्टींत सूर्यदेवानें अंधकारावर मिळविलेल्या विजयाचें वर्णन या पुराणांत केलेलें आहे. पण त्या सर्व येथें नमूद करण्याचें कारण नाहीं. वेदांतील विष्णूच्या अल्पकालिक आजाराप्रमाणें आयरिश व नॉर्स पुराणांतील देवही वर्षांतून कांहीं कालपर्यंत रोगग्रस्त होऊन पडत असत. हा रोगग्रस्तपणा ह्मणजे हिंवाळ्यांतील काळोख होय. या सर्व गोष्टींचा संबंध आतां ध्रुवस्थानाशीं लावतां येतो, पण कांहीं वर्षांपूर्वी असें मत प्रतिपादन करणारावर वेडेपणाचा आरोप आला असता. अलीकडे भाषाशास्त्र आणि मानववंशशास्त्र यांतील शोधांमुळें पूर्वी ठरविलेल्या सिद्धांतांमध्यें बराच फरक झालेला आहे. आर्यांचें मूलस्थान मध्यआशियांत होतें हें मत, भूस्तरशास्त्र, पुराणवस्तुशास्त्र, मस्तकविज्ञानशास्त्र इत्यादि शास्त्रांतील शोधांनीं बदलून टाकिल्यामुळें, आतां तें मूलस्थान उत्तर जर्मनी किंवा स्वीडनचा दक्षिण भाग यांत होतें असें व्युत्पत्तिशास्त्रज्ञहि ह्मणूं लागले आहेत. तुर्कस्तान खेरीज करून यूरोपांतील बहुतेक मोठीं राष्ट्रें आपली पूर्वपरंपरा नॉर्स लोकांच्या दिग्विजयापर्यंत नेऊन भिडवितात. पण ऊत्क्रान्तितत्वाला अनुसरून ही परंपरा आणखीही उत्तरेकडे पोंचवितां येईल. वर सांगितलेल्या पुराणांतील गोष्टींत दिसून आल्याप्रमाणें त्या कथांचा रोंख ध्रुववृत्ताच्या आंतील कोणत्या तरी स्थळाकडे आहे यांत कांहीं शंका नाहीं. ही गोष्ट फक्त आर्यांच्या मूलस्थानाची झाली. इतर मानववंशांच्या मूलस्थानाचा यांत कांहीं संबंध नाहीं. तरी त्यांचे मूलस्थान ध्रुवाजवळ असूं शकणार नाहीं असें मात्र यावरून समजावयाचें नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी एम्. डी. सपोर्टा

नांवाच्या एका फ्रेंच पंडितानें संपूर्ण मानव जातीचें उत्पत्तिस्थान उत्तर ध्रुवप्रदेशच होय असें मत मोठ्या जोरदार रीतीनें प्रतिपादन केलें होतें.

प्रो. व्हिस या प्रसिद्ध पंडितानें यूरोपीय आर्यांच्या पुराणकथांचें तुलनात्मक परीक्षण करून जो सिद्धांत काढिला आहे त्याचें सार येथवर दिलें आहे. प्रो. मॅक्समुल्लर आणि प्रो. व्हिस या दोघांचीही शोध करण्याची दिशा एकच. परंतु ज्या कथांचा विचार करावयाचा त्यांतील हरएक बाबीचा कोणत्या तरी कल्पनेवर समाधानकारक उलगडा झाल्याशिवाय पुढें जावयाचें नाहीं, असा निर्धार केल्यामुळें प्रो. व्हिस याचीं अनुमानें जास्त व्यापक झालीं व शेवटीं सर्व बाबींचा उलगडा करणाऱ्या ध्रुवोपपत्तीचा आश्रय करणें त्याला भाग पडलें. या बाबतींत प्रो. व्हिस याची कामगिरी आपल्या उपपत्तीला फारच महत्वाची झालेली आहे. प्रस्तुत पुस्तकांत दाखल केलेल्या ध्रुवाजवळील वसतीसंबंधीं वैदिक पुराव्याची जर त्यास माहिती असती, तर त्यानें आपले सिद्धांत याहूनही अधिक जोरानें प्रतिपादिले असते. सेल्टिक आणि टयूटॉनिक कथांचें सूक्ष्म निरीक्षण करून व त्यांची ग्रीक कथांशीं तुलना करून त्यानें हीं अनुमानें काढिलीं आहेत; आणि वैदिक व अवैस्तिक कथांचा स्वतंत्र रीतीनें विचार करून आह्मीं काढिलेल्या अनुमानांशीं तीं पूर्णपणें जुळत असल्यामुळें आमच्या अनुमानांना दुप्पट जोर मिळाला आहे. प्रस्तुत अनुमानें तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्राच्या विरुद्ध नाहींत हें मागें सांगितलेंच आहे. भाषाशास्त्र व व्युत्पत्तिशास्त्र यांतील शोधांच्या धोरणावरून आशियांतील आर्यांच्या मूलस्थानाची कल्पना आतां पण्डितांनीं सोडून दिल्यासारखी आहे, आणि यूरोपांत रहाणारे नवपाषाणयुगांतील आर्यलोक हे मूळचे तेथलेच होते असेंही अद्यापि सिद्ध झालेलें नाहीं. ह्मणजे आर्यांच्या मूलस्थानाचा अद्यापि निर्णय झालेला नाहीं. ह्मणून त्यांच्यासंबंधानें परंपरागत कथांच्या पुराव्याचा योग्य विचार करून त्यांवरून जीं अनुमानें निघतील तीं काढण्याची आह्मांला पूर्ण मोकळीक आहे. उत्क्रान्ति नियमांस अनुसरल्यास आपलें मूलस्थान शोधण्यासाठीं उत्तरेकडे ध्रुवप्रदेशांतच गेलें पाहिजे असें जें प्रो. व्हिस यानें म्हटलें आहे तें अगदीं बरोबर आहे. त्याप्रमाणें पहातां खरोखर वर्षांतून सात महिन्यांचा सूर्यप्रकाश, शंभर

दिवसांच्या अवधीचा अखंड अंधकार, किंवा तीस दिवसांच्या अवधीची अखंड उषा, हीं ज्या अक्षांशावर आहेत, तेथेंच आपलें मूलस्थान असलें पाहिजे. आर्य लोकांखेरीज इतर मानववंशांचेंही मूलस्थान ध्रुवाजवळ असेल कीं नाहीं, या प्रश्नाचा सांगोपांग विचार डॉ. वारन् या पंडितानें आपल्या नंदनवनोपलब्धि ऊर्फ 'मानव जातीचें उत्तर ध्रुवाजवळील उत्पात्तिस्थान' नांवाच्या ग्रंथांत केला आहे. एकंदर मनुष्यशास्त्राच्या दृष्टीनें हा प्रश्न महत्वाचा आहे. पण तो फार व्यापक असल्यामुळें त्याचा येथें विचार करतां येत नाहीं. तरी पण आपली उपपत्ति डॉ. वारन्च्या उपपत्तीच्या विरुद्ध नसून तिला उलट सहायकच आहे. एवढाच फरक आहे कीं आपला उद्देश त्याच्यापेक्षां संकुचित आहे. सर्व मनुष्य जातीचा विचार न करितां तीपैकीं फक्त आर्य शाखेंतील लोक गेल्या हिमकालापूर्वी उत्तरध्रुवाजवळ रहात असत, व हिमकालानंतर त्या ठिकाणाचा नाश झाल्यामुळें तेथून त्यांना निघून जावें लागलें, एवढेंच आपल्याला दाखवावयाचें होतें. पूर्व प्रकरणांत सांगितलेल्या वैदिक व अवैस्तिक वचनांवरून या वसतीचा प्रत्यक्ष बोध होत असून, प्रो. ह्विससारख्या पंडितांनीं सेल्टिक, टयूटॉनिक इत्यादि युरोपीय आर्यांच्या पुराणांचा स्वतंत्र विचार करून तेंच अनुमान काढिलें आहे. आधुनिक शास्त्रांतील शोधांचाही या अनुमानाला पाठिंबा आहे हें मागें दाखविलेंच आहे. म्हणून आर्य लोकांचें मूलस्थान उत्तर ध्रुवाजवळ कोठें तरी होतें ही गोष्ट सिद्ध झाली असें मानावयास आतां हरकत नाहीं.

प्रकरण १३ वें.

प्राचीन आर्यांची सुधारणा आणि धर्म यांशीं प्रस्तुत अनुमानांचा संबंध.

ध्रुवप्रदेशांतील वसतिस्थानाच्या सिध्यर्थ दिलेल्या प्रमाणांचा सारांश–त्यांवरून ध्रुवाजवळील वसतिस्थानाचा स्पष्ट बोध होतो, पण ध्रवप्रदेशांतील नक्की स्थान त्यांवरून निश्चित होत नाहीं–भूस्तरशास्त्रावरून पहातां ध्रुवाजवळील वसतिस्थान हिमान्तरकालांतच शक्य होतें–प्राचीन वैदिक कालगणनापद्धतीचें परीक्षण–हिमोत्तरकालाचा आरंभ आणि मृगशीर्षकाल यांतील अवधि ८०००० वर्षांइतका असावा असें त्यावरून दिसत नाहीं–वैदिक कालगणनेशीं अमेरिकन शास्त्रज्ञांचे नेमस्त अंदाज जुळतात–पुराणांतील युगात्मक कालगणना, मन्वंतरें आणि कल्प--गेल्या प्रलयानंतरच्या दहा हजार वर्षांच्या चतुर्युगात्मक मूळ चक्रावरून पुराणांतील पद्धति निघाली असावी--देवांच्या वर्षाची कल्पना मनुस्मृतींत व भारतांत नाहीं—त्या नंतरच्या ग्रंथकारांनीं तिचा अवलंब केला--त्यांना आपण कृत युगांत आहों असें वाटत नव्हतें--गेल्या प्रलयानंतर दहा हजार वर्षें होऊन गेलीं या मूळ कल्पनेचा वैदिक कालगणनेशीं चांगला मेळ पडतो--तसाच तो अमेरिकन भूस्तरशास्त्रज्ञांच्या अंदाजांशींही पडतों--या सर्वांवरून ध्रुवाजवळील वसतिस्थानाचा काल शकापूर्वी ८००० वर्षांच्या पलीकडचा ठरतो--प्राचीन दंतकथांचें विश्वासार्ह स्वरूप आणि त्या राखून ठेवण्याची पद्धति--सर्व मानवजातीचें मूलस्थान ध्रुवावर होतें ही कल्पना आर्यांच्या तेथील वसतिस्थानाच्या विरुद्ध नाहीं–आर्यांची अत्यंत प्राचीन सुधारणा आणि धर्म यांविषयींच्या प्रचलित मतांचें परीक्षण–आर्यांचे मूळ पूर्वज आणि त्यांची सुधारणा हीं हिमोत्तरकालीन नव्हत–हिमकालांत झालेला प्राचीन आर्यसुधारणेचा नाश–नवपाषाणयुगांतील यूरोपीय आर्यांच्या सुधारणेंतील कमीपणाचें कारण ते प्रलयोत्तरकालांत पुनः रानटी बनले हें होय–हिमान्तरकालांतील ध्रुवाजवळच्या वसतिस्थानांतील लोकांची रहाणी आणि कालमानपद्धति–देवयान, पितृयान आणि तत्कालीन देवता–आर्यांचे मूळ यज्ञयाग–अविभक्त आर्यांच्या ध्रुवजवळच्या मूलस्थानांतील सधारणेचें प्रमाण–

तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्राचीं अनुमानें–त्यांवरून दिसून येणारी आर्यांची सुधारणा लघुतम समजली पाहिजे-ह्मणजे ती खरोखर बरीच उच्च प्रकारची असली पाहिजे–अविभक्त आर्यांची सुधारणा पाषाणयुगांतिल सुधारणेहून उच्च होती–धातूंचीं नांवें त्यांच्यांत बहुधा प्रचलित असावीं–आर्यांच्या भाषेचा आरंभ, वर्णानुसार मनुष्यजातीचें वर्गीकरण इत्यादिकांच्या कालाचा पत्ता अद्यापि लागण्यासारखा नाहीं–आर्य जातीचें व त्यांच्या धर्माचें मूळ प्राचीन भूस्तर युगांत गुरफटलेलें आहे–वेदांच्या उत्पत्ति व स्वरूपाविषयीं ब्रह्मवाद्यांचीं मतें–षड्दर्शनकारांचीं मते-पतंजली आणि व्यास यांच्या मतें गेल्या प्रलयांत वेद नष्ट होऊन नवीन कल्पाच्या आरंभीं शब्दशः नव्हे तरी अर्थतः पुनः उत्पन्न झाले-हिमोत्तरकालाचे ज्योतिःशास्त्रदृष्ट्या करतां येण्यासारखे चार विभाग–ऐतरेय ब्राह्मणांतील चार युगांच्या लक्षणांशीं त्यांची तुलना–वेदांची उत्पत्ति आणि स्वरूप यांविषयींच्या ब्रह्मवाद्यांच्या आणि ऐतिहासिक मतांची तुलना–सूक्तांचे शब्द नवे असले तरी त्यांचा मथितार्थ प्राचीन आहे असें सांगणारीं वैदिक वचनें–वैदिक देवता आणि त्यांचे पराक्रम हीं सर्व प्राचीन होत-वेद अथवा वैदिक धर्म स्वरूपतः हिमोत्तरकालीन असले तरी तत्वतः हिमान्तरकालीन होत–उपसंहार.

प्राचीन आर्यांची सुधारणा आणि धर्म यांशीं प्रस्तुत अनुमानांचा संबंध.

वैदिक आर्यांच्या मूलस्थानाच्या प्रश्नाचा अनेक दृष्टींनीं केलेला विचार येथें पुरा झाला. त्यावरून असें दिसून येईल कीं, आमचा कोटिक्रम केवळ प्राचीन सुमारणेच्या इतिहासावर किंवा भाषाशास्त्रावरून निघालेल्या अनुमानावर उभारलेला नसून, वेद व अवेस्ता यांतील स्पष्ट वचनांवरच तो उभारलेला आहे. या वचनांवरून असें सिद्ध होतें कीं, केवळ ध्रुवप्रदेशांतच आढळून येणारे असे जे सृष्टचमत्कार आहेत त्यांची माहिती वैदिक ऋषींना होती; तसेंच चक्राकार भ्रमण करणारी उषा, वृत्रानें कोंडिलेलीं जलें, सूर्यादि देवांना दुःखमुक्त करणारे अश्विन, विश्वाचें तीन पदांनीं आक्रमण करणारा विष्णु, रात्रि व समुद्र यांचा

राजा वरुण, सात महिन्याचे सात आदित्य, त्रित, इत्यादि मुख्य मुख्य वैदिक देवतांचीं लक्षणें मूळ ध्रुवसंबंधी आहेत. तात्पर्य तिसऱ्या प्रकरणांत सांगितलेलीं ध्रुवविशिष्ट लक्षणें व ध्रुवमंडल-विशिष्ट लक्षणें हीं सर्व वेदांत इतक्या स्पष्ट रीतीनें आढळून येतात कीं, त्यांवरून निघणाऱ्या अनुमानांविषयीं मुळींच शंका रहात नाहीं. सहा महिन्यांचा दिवस व तेवढीच रात्र, कित्येक दिवसांच्या अवधीची वर्तुलाकार फिरणारी तेजस्वी उषा, किंवा बारा महिन्यांपेक्षां कमी सूर्यप्रकाशाचें वर्ष इत्यादि गोष्टी वैदिक ऋषींना माहीत होत्या; व त्या त्यांनीं सरळ शब्दांनीं सांगितलेल्या असूनही आज पावेतों त्यांचा नीट अर्थ लागला नव्हता. पण आतां नवीन शास्त्रीय शोधांच्या साहाय्यानें त्यांचा चांगला उलगडा करतां येणार आहे. या लक्षणांचा उल्लेख करणाऱ्या वचनांचा अर्थ करण्याची खरी गुरुकिल्ली माहीत नसल्यामुळें एतद्देशीय व परदेशीय, तसेच प्राचीन व अर्वाचीन अशा सर्व वैदिक पंडितांनीं त्यांची लागेल तशी ओढाताण कशी केली आहे, किंवा त्यांकडे मुळींच दुर्लक्ष केलें आहे. असें झटलें तरी निरुक्तकार यास्क किंवा भाष्यकार सायणाचार्य यांच्या श्रमाचें महत्व कमी करण्याचा आमचा मुळींच इरादा नाहीं. त्यांच्या मदती शिवाय वैदिक ग्रंथांच्या अर्थनिर्णयासंबंधानें आधुनिक पंडितांस कांहीं एक करतां आलें नसतें ही गोष्ट कोणालाही कबूल करावी लागेल. आमच्या धर्मग्रंथांच्या स्पष्टीकरणार्थ यांनीं अत्यन्त श्रम केलेले आहेत याबद्दल कोणाचा मतभेद होईलसें वाटत नाहीं; आणि त्यांच्या या अत्यन्त महत्वाचा कामगिरीबद्दल भावी पिढ्यांतील वैदिक पंडित त्यांचे सदैव ऋणी रहातील. पण वेद हे जर आमचे अत्यन्त प्राचीन ग्रंथ आहेत, तर जुन्या पंडितांच्या दृष्टीआड राहिलेल्या त्यांतील कित्येक गोष्टी प्राचीन मनुष्यांविषयींच्या वाढत्या ज्ञानावरोवर आज आमच्या नजेरस येणार नाहींत असें कसें होईल? अशा कांहीं गोष्टी त्यांच्या दृष्टीआड राहिल्या हा त्यांचा दोष नव्हे. तर आपल्या अत्यंत प्राचीन पूर्वजांची स्थिति ज्या शास्त्रांवरून जाणतां येण्यासारखी आहे तीं शास्त्रेंच कांहीं काळापूर्वी अस्तित्वांत आलेली नव्हतीं, किंवा अस्तित्वांत असल्यास अगदींच बाल्यावस्थेंत होतीं. म्हणून भाष्यकारांना न सुचलेल्या अशा कांहीं कल्पना वैदिक किंवा अवैस्तिक वचनांवरून आम्हांला सुचल्यास त्यांत आश्चर्य मानण्याजोगें कांहीं नाहीं.

ही गोष्ट लक्षांत ठेऊनच आमच्या वाचकांनी पूर्व प्रकरणांत आम्ही दिलेल्या वैदिक वचनांच्या अर्थांची आजपर्यंत केलेल्या अर्थांशीं तुलना करावी.

या वचनांचा योग्य तो अर्थ केल्यास त्यांवरून केवळ ध्रुवविशिष्ट अशीं लक्षणें दिसून येतात, व एवढी एकच गोष्ट जरी आमची उपपत्ति सिद्ध करावयास पुरेशी आहे, तरी आमची मुख्य भिस्त काहीं आह्मीं केलेल्या या वचनांच्या अर्थांवर नाहीं. वैदिक आर्यांच्या यज्ञ-ग्रंथांत व पुराणकथांत आमची उपपत्ति सिद्ध करणाऱ्या अनेक गोष्टी आहेत; आणि त्यांना पारशी व यूरोपीय आर्य यांच्या पुराणांतील कथांचाही पूर्ण पाठिंबा आहे. दशग्वांचें दशमासावधि सत्र किंवा तितक्याच मुदतीचें संवत्सर सत्र हीं या गोष्टींचीं मुख्य उदाहरणें असून त्यांना डिसेंबरांत संपणाऱ्या दहा महिन्यांच्या प्राचीन रोमन वर्षाची जोड आहे. सहा सहा महिन्यांच्या दिवसरात्रीची गोष्ट ही केवळ पौरस्त्य आर्यकथांतच केवळ नसून पाश्चात्य आर्यांच्या पुराणांतही आहे. सवंद वर्ष ज्यांत एका दिवसाप्रमाणें दिसत होतें तें इराणी नंदनवन व बर्फाचा जाड थर पडून झालेला त्याचा नाश यांच्या वंदिदादांतील कथेवरून आमच्या उपपत्तीला फारच उत्तम आधार मिळत आहे. ह्मणून प्रो. न्हिस याच्या मताप्रमाणें पाश्चात्य आर्यांच्या कथांचा रोख जर त्यांचें आदिस्थान फिन्लंडांत होतें असें दाखविण्याचा असेल, तर वैदिक व अवैस्तिक कथांचा तो आणखी उत्तरेकडे ध्रुवाजवळ तें होतें असें दाखविण्याचा आहे. कारण ध्रुवाशिवाय इतर ठिकाणीं तीस दिवसांची अखंड उषा शक्य नाहीं. याप्रमाणें आमच्या आदिस्थानाचें अक्षांशमान जरी साधारण मानानें निश्चित करतां आलें तरी त्याचें रेखांशमान ठरविण्यासारखा ह्मणजे तें यूरोपच्या उत्तरेस होतें कीं आशियाच्या उत्तरेस होतें हें ठरविण्यासारखा पुरावा वेदांत आज तरी निदान दिसत नाहीं. परंतु ध्रुवस्थानासंबंधाच्या गोष्टी ब्राम्हण व पारशी यांच्यांच ग्रंथांत विशेष स्पष्ट रीतीनें राहिलेल्या आहेत, या गोष्टीचा विचार करितां तें स्थान रशियाच्या किंवा स्वीडन नार्वेच्या उत्तरेस नसून सैबेरियाच्याच उत्तरेस असावें असें अधिक संभवनीय दिसतें. पण याहून स्पष्ट पुराव्याच्या अभावीं उगाच कांहीं तरी तर्क करण्यांत मतलब नाहीं.

या पुस्तकाच्या आरंभीं भूस्तरशास्त्र व पुराणवस्तुशास्त्र यांत अगदीं अलीकडे झालेल्या शोधांचा सारांश देऊन त्यावरून आदि मनुष्य प्राणी व चतुर्थ युगांत युरेशियाच्या उत्तर भागावर पुनः पुनः आलेल्या हिमकालाच्या धाडी यांविषयीं कोणती माहिती मिळते त्याचें दिग्दर्शन केलें. असें करण्यांत भूस्तरशास्त्रावरील जुन्या ग्रंथांत पृथ्वीच्या कवचाचा इतिहास देतांना मनुष्य प्राणी हा हिमोत्तरकालांत उत्पन्न झाला असा जो सिद्धांत काढलेला होता, त्यावरून होणारा गैरसमज दूर व्हावा, हा उद्देश होता. मनुष्यप्राणी तृतीय युगांत अस्तित्वांत होता, व गेल्या हिमकालांपूर्वी ध्रुवप्रदेशांतील हवा सौम्य असून हिमकालांत पडलेल्या बर्फामुळें ती अतिशय कडक झाली, या गोष्टी जर भूस्तरशास्त्रानें अलीकडे सिद्ध केल्या नसत्या, तर आजही उत्तरध्रुवाजवळचें मूलस्थान म्हणजे अशक्य गोष्ट वाटली असती. अतिशय कडक हिंवाळ्याचा उल्लेख करणारीं वचनें ऋग्वेदांत शोधून काढून त्यावरून ध्रुवस्थानाची सिद्धि करण्याचे प्रयत्न मागें फुकट कां गेले हें आतां आपल्याला चांगलें समजून येईल. कारण त्या ठिकाणीं जेव्हां आमच्या पूर्वजांची वसति होती तेव्हां तेथील हिंवाळे मुळींच कडक नसून हिमकालानंतर ते कडक होऊन तें ठिकाण मनुष्यांस रहावयास निरुपयोगी झालें. अवेस्त्यांत हा प्रकार उत्तम रीतीनें सांगितला आहे. अवेस्त्यांतील वर्णन व भूस्तर-शास्त्रांतील नवीन शोध यांचा इतका मेळ पडल्यावर ध्रुववसतिकाल निश्चित करणें कठीण नाहीं. कारण ध्रुवाजवळ मनुष्यांनीं रहाण्यासारखी सौम्य हवा हिमोत्तर कालांत नसून हिमान्तरकालांतच होती असा भूस्तर-शास्त्राचा सिद्धांत आहे.

आतां कांहीं भूस्तरशास्त्रज्ञांच्या मतें, गेला हिमकाल संपल्याला २०००० किंवहुना ८०००० वर्षें झालीं असावीं; आणि वेदांचा प्राचीनतम काल तर इ. स. पूर्वी ४५०० वर्षांच्या पलीकडे जात नाहीं. यावरून कोणी असें म्हणतील कीं हिमकालाचा शेवट, व वैदिक सूक्तांचा रचनाकाल यांमध्यें जो हजारों वर्षांचा खंड पडला, त्यांतून हिमान्तरकालांतील ध्रुव-स्थानाची खरी हकीगत वंशपरंपरा जशीच्या तशीच निघून वैदिक ऋषींना मिळाली असेल असें संभवत नाहीं. हा समज दूर करण्यासाठीं येथें थोडेंसे विवेचन करणें अवश्य आहे. **वेदकालनिर्णय** या पुस्तकांत असें दाखविलें

आहे कीं तैत्तिरीयसंहिता आणि ब्राह्मणें यांत नक्षत्रांना कृत्तिकांपासून आरंभ केलेला असून त्याचा अर्थ त्या वेळीं वसंतसंपात त्या नक्षत्रांत होता असा होतो, व त्या अन्वयें या ग्रंथाचा काल शकापूर्वी २५०० वर्षांच्या सुमारास ठरतो; तसेंच यांच्यापेक्षां प्राचीन असा जो ऋग्वेद त्यांतील कित्येक वचनांवरून ऋक्सूक्तें मृगनक्षत्रांत वसंतसंपात असतांना म्हणजे इ. स. पूर्वी ४५०० वर्षांच्या सुमारास रचिलीं असावीं. आणखी त्यांत असेंही दाखविलें आहे कीं, वसंतसंपात पुनर्वसूंत (शकापूर्वी ६००० वर्षें) असल्याच्याही कांहीं अंधुक खुणा त्यांत आहेत. (टिळक म्हणतात) ही शेवटची मर्यादा याहूनही आणखी मागें ढकलतां येईल कीं नाहीं हें पहाण्यासाठीं संपाताच्या क्रांतिवृत्तांतील याहून प्राचीन स्थानाचा शोध करण्याचा आम्हीं प्रयत्न केला. पण तसें स्थान आम्हांला सांपडलें नाहीं. तथापि ध्रुवस्थानाचा उल्लेख करणाऱ्या वाक्यांकडे यापुढें आमचें अधिकाधिक लक्ष जाऊन त्यांवरून असें वाटूं लागलें कीं, शकापूर्वी ५००० ते ६००० वर्षांच्या सुमारास वैदिक आर्य मध्य आशियाच्या उंच मैदानावर स्थिरस्थावर झाले असावे, आणि त्या वेळीं त्यानां आपल्या ध्रुवाजवळील मूलस्थानाची चांगली आठवणही असावी. तात्पर्य, वैदिक कालगणनेविषयीं केलेल्या शोधावरून, गेला हिमकाल मृगशीर्षकालाच्या पूर्वी किती तरी हजार वर्षें होऊन गेला असें म्हणावयास कांहीं आधार मिळत नाहीं. अमेरिकन भूस्तरशास्त्रज्ञांनीं हा हिमकाल इ. स. पूर्वी ८००० वर्षांच्याच सुमारास झाला असावा असें जें अनेक प्रमाणांवरून अनुमान केलें आहे, त्याशीं हा आमचा अंदाज चांगला जुळतो. म्हणजे अमेरिकनशास्त्रज्ञांच्या अनुमानाला आमच्या स्वतंत्र रीतीनें काढिलेल्या अनुमानांवरून चांगली पुष्टि मिळत असल्यामुळें, डॉ. क्रोल सारख्या शास्त्रज्ञांचे मनमुराद तर्क सोडून अमेरिकन शास्त्रज्ञांचें नेमस्त मत ग्रहण करणें हेंच आजच्या ज्ञानाच्या स्थितींत योग्य दिसतें. गेला हिमकाल संपून हिमोत्तर कालाला सुरुवात शकापूर्वी ८००० वर्षांच्या सुमारास झाली असें अमेरिकन शास्त्रज्ञांचें मत आहे. हा काल आणि मृगशीर्षकाल यांत ३००० वर्षांचें अंतर आहे; इतक्या कालांत आपल्या मूलस्थानाची स्मृति राखून ठेऊन ती सूक्तांत ग्रथित करणें कांहीं असंभवनीय नाहीं. तात्पर्य वैदिक कथा शास्त्रीय शोधांच्या मुळींच विरुद्ध नसून,

उलट त्यांवरून हिमयुगाच्या कालासंबंधीं बेसुमार तर्कांनां आळाच पडणार आहे. अमेरिकन भूस्तरशास्त्रज्ञांचें नेमस्त मत स्वीकारल्यास, वैदिककथा व भूस्तरशास्त्र या दोहोंवरून हिमोत्तरकालाचा आरंभ आणि ध्रुवस्थानांतून झालेली आर्यांची फाटाफूट हीं शकापूर्वी ८००० वर्षांपेक्षां फारशीं प्राचीन नाहींत असें दिसून येईल.

हें अनुमान केवळ वैदिक कालगणनेवरूनच निघत नसून पौराणिक कालगणना पद्धतीचाही नीट अर्थ केल्यास तीवरूनही तेंच अनुमान निघत आहे. कांहीं ठराविक कालानें पृथ्वीवर प्रलय होऊन तिचा नाश होतो, तसाच त्याहून फार मोठ्या कालान्तरानें संपूर्ण विश्वाचाही होतो असें आपल्या पुराणांत सांगितलें आहे. सृष्टिकर्ता ब्रह्मा आपल्या दिवसभर जागा असून त्यावेळीं पृथ्वीही नीट चाललेली असते, परंतु रात्रीं तो निद्रावश झाल्यावर तिचा प्रळयांत नाश होऊन दुसरे दिवशीं ब्रह्मदेव पुनः उठल्यावर सृष्टिही पुनः पूर्ववत् होते, असा आपला समज आहे. ब्रह्मयाचा दिवस व रात्र हीं प्रत्येकीं एक एक कल्पाएवढीं आहेत; अर्थात् असे ७२० कल्प ह्मणजे ब्रह्म्याचें एक वर्ष होतें. अशीं शंभर वर्षें ह्मणजे ब्रह्मदेवाचें आयुष्यमान असून या कालाच्या अखेरीस महाप्रलय होऊन ब्रह्म्यासह संपूर्ण विश्वाचा त्यांत लय होतो. मनुस्मृति व महाभारत यांत सांगितल्याप्रमाणें कृत, त्रेता, द्वापर आणि कलि अशीं चार युगें मिळून देवाचें युग होतें आणि अशीं १००० युगें किंवा १२,०००,००० वर्षें ह्मणजे ब्रह्मदेवाचा दिवस ऊर्फ कल्प होतो. पण पुराणांतील पद्धति याहून निराळी आहे. त्यांत सांगितल्याप्रमाणें कृत, त्रेता द्वापर आणि कलि अशीं चार युगें मिळून एक महायुग होतें, असलीं ७१ महायुगें ह्मणजे एक मन्वंतर आणि १४ मन्वंतरांचा एक कल्प होतो. या पद्धतीप्रमाणें कल्पांत ४३२०,०००,००० वर्षें असतात. हा जो कल्पाच्या दोन प्रकारच्या अवधींत फरक त्याचें कारण असें कीं मनुस्मृति व महाभारत यांतील वर्षें आमच्यासारखीं साधीं असून पुराणांत तीं देवांचीं ह्मणून मानिलेलीं आहेत. याविषयीं विशेष विचार कै. शं. बा. दीक्षित यांच्या 'भारतीय ज्योतिःशास्त्रांत' केलेला आहे तो पहावा.§ भारतीय ज्योतिष ग्रंथकारांनीं ही पुराणांतील पद्धतीच घेतली

§ भा. ज्यो. पानें १०, १०२, १०३, १४१–१४३.

आहे. या कालगणनेप्रमाणें सांप्रत आपण चालू कल्पाच्या ७ व्या (वैवस्वत) मन्वंतरांतील २७ महायुगें टाकून २८ व्याच्या कलियुगाच्या ५०११ व्या वर्षांत आहों, ह्मणजे सध्या चालू असलेल्या श्वेतवाराह कल्पाच्या आरंभीं होऊन गेलेल्या प्रलयापासून आतांपर्यंत १९७,२९,४९,०११ वर्षें होऊन गेलीं आहेत. पण हा अंदाज भूस्तरशास्त्राच्या मर्यादेबाहेरचा आहे. आमच्या ज्योतिष्यांच्या मतें कल्पाच्या आरंभीं सूर्य चंद्र आणि इतर सर्व ग्रह हे युतींत होते; या समजाप्रमाणें उलट गणित करून त्यांनीं या सर्व ग्रहांनीं पृथ्वीभोंवतीं पूर्ण प्रदक्षिणा करून एके ठिकाणीं येण्याचा ह्मणजे त्यांच्या युतीचा काल ठरविला असण्याचाही संभव आहे. कसेंहीं असलें तरी कृत, त्रेता, द्वापर आणि कलि या चार युगांचा पर्याय या सर्व कालगणनेच्या मुळाशीं असल्यामुळें, त्यांमिळून होणाऱ्या महायुगाचा खरा अर्थ काय आणि आज त्यांचा जो काल ठरविलेला आहे तोंच मूळचा होता कीं काय या प्रश्नांचा नीट विचार केला पाहिजे.

सातव्या प्रकरणांत **युग** शब्दाचा ' कालपर्याय ' असा अर्थ ऋग्वेदांत असून ' मानुषा युगा ' या प्रयोगांत त्याचा ' महिना ' असाच अर्थ केला पाहिजे असें दाखविलें आहे. पण ' देवानां प्रथमे युगे ' इत्यादि वचनांत ' युग ' शब्द बऱ्याच मोठ्या कालाचा वाचक आहे हें उघड आहे. अथर्व वेदांतं (८,२,२१) " आह्मी तुला शंभर किंवा दहा हजार वर्षें किंवा दोन तीन अथवा चार युगें देतों " असें ह्मटलें असून त्यांत **युग** शब्द दहा हजार वर्षांहून कमी कालाचा बोधक नाहीं यांत कांहीं शंका नाहीं. कारण दहा हजार (अयुत) वर्षें झाल्यावर ' एक युग ' देतों असें न ह्मणतां एकदम दोनपासून युगें देतों असें ह्मटलें आहे. या गोष्टीचा विचार केल्यास ' युग ' शब्दाचा अर्थ अथर्ववेदकालीं १०००[1] वर्षें असा होता असें ह्मणावयास हरकत दिसत नाहीं. आतां मनुस्मृति आणि महाभारत या दोहोंतही कलि, द्वापर, त्रेता आणि कृत या युगांना अनुक्रमें १०००, २०००, ३०००, आणि ४००० वर्षें दिलेली आहेत; ह्मणजे द्वापर, त्रेता आणि कृत हीं युगें कलियुगाच्या अनुक्रमें दुप्पट, तिप्पट व चौपट होत. कृत शब्दाचा अर्थ संस्कृतांत चार असा आहे, ही गोष्ट लक्षांत घेतल्यास हीं युगांचीं नावें आवृत्तिवाचक संख्याविशेष-

---

१ शतं तेऽयुतं हायनान्द्वे त्रीणि चत्वारि कृष्मः अ. वे. ८,२,२१.

णात्मक असावीं असें दिसतें. असो. या चार युगांची संकलित संख्या (ह्मणजे महायुग) १०००० वर्षें होते. मनु व महाभारतकार व्यास यांनीं प्रत्येक युगाच्या आद्यन्तीं धरावयाचा संध्येचा किंवा संध्यांशाचा काल एकत्र करून वरील १०००० या संख्येंत आणखी २००० वर्षें मिळविलीं आहेत. तीस घटिकांच्या दिवसांच्या आद्यन्तीं ज्याप्रमाणें सुमारें ३ घटिकांची ह्मणजे दशांश संध्या असते त्याप्रमाणें या युगांच्याही आद्यन्तीं दशांश संध्या कल्पिली आहे. या हिशोबाप्रमाणें संध्या व संध्यांश धरून कृताचीं ४८०० त्रेताचीं ३६००, द्वापराचीं २४०० व कलीचीं १२०० अशीं वर्षें होतात. आतां, महाभारत व मनुस्मृति यांच्या काळीं कलियुगाला आरंभ झालेला होता; आणि जर त्याचीं १००० वर्षें किंवा संध्या धरून १२०० वर्षें झाल्यावर तें संपावयाचें असतें, तर शकारंभापूर्वीच्च तें संपलें असें ह्मणावयास पाहिजे. पण त्याच सुमारास लिहिलेल्या पुराणांच्या कर्त्यांना कलियुग संपून पुनः कृतयुग लागल्याचीं कांहीं लक्षणें दिसेनात. कारण कृत ह्मणजे अत्यंत पुण्यमय असें युग असून त्यावेळीं तर जिकडून तिकडून अधोगतीचीं चिन्हें दिसत होतीं. ह्मणून पुराणकारांनीं कलियुगाची मर्यादा वाढविण्याचा प्रयत्न केला; ह्मणजे त्याचीं १२०० वर्षें हीं मानवी नसून देवांचीं होत असें त्यांनीं मानिलें. ३६० मानवी वर्षें ह्मणजे देवांचें एक वर्ष. असें करण्याला त्यांना श्रुतीचाही आधार सांपडला. तैत्तिरीय संहितेंतील ' एकं वा एतद्देवानामहः यत्संवत्सरः ' हें वचन त्यांच्या उपयोगीं पडलें. व्यास व मनु या दोघांनींही कलीचा काल १००० वर्षें सांगितला. पण मनुस्मृतींत युगें व त्यांच्या संध्या यांचे अवधि सांगितल्यावर, " या १२००० वर्षांच्या चतुर्युगात्मक कालाला देवांचें युग ह्मणतात " अशी टीप दिली आहे, तेव्हां पुराणकारांना या युगांच्या अवधीचीं वर्षें देवांचीं होत असें मानावयाला मुळींच हरकत वाटली नाहीं. शिवाय त्या वेळच्या लोकांना कलियुग संपल्याचीं लक्षणें न दिसल्यामुळें पुराणकारांची ही युक्ति सर्वांना पसंत पडली आणि कलियुगाच्या १२०० साध्या वर्षांना देवांचीं वर्षें कल्पून त्यांना १२००×३६०=४३२००० साध्या वर्षांचें स्वरूप देण्यांत आलें. याच युक्तीनें महायुगाच्या १२००० वर्षांचीं ४३२०००० वर्षें होऊन, मन्वंतर, कल्प इत्यादिकांचे अवधीही या प्रमाणानें वाढले.

या विवेचनावरून असें दिसून येईल कीं, मनुस्मृति व महाभारत यांत, कृत, त्रेता, द्वापर आणि कलि यांमिळून होणाऱ्या १०००० वर्षांचा युगपर्यायच दिलेला असून, त्यांपैकीं १००० वर्षांचें असें जें कलियुग त्याला त्यावेळीं आरंभ झालेला होता. अन्य शब्दांनीं हेंच सांगावयाचें म्हणजे मनु व व्यास यांच्या मतें कृतयुगाच्या आरंभापासून कलीच्या अंतापर्यंतचा काल १०००० किंवा संध्या धरल्यास १२००० वर्षें इतकाच होता. कृतयुगाला प्रलयानंतर आरंभ झाला असें जें झटलें आहे, त्याचा विचार केल्यास मनु व व्यास यांना आपल्यापूर्वी १०००० वर्षांच्या सुमारास (१२०० वर्षांच्या कलियुगाच्या आरंभीं हे होऊन गेले असें धरून) कृतयुग सुरू होऊन नवीन सृष्टीची रचना झाली असें वाटत असावेंसें दिसतें; झणजे त्यांच्यामतें जुन्या सृष्टीचा नाश करणारा प्रलय त्यांच्यापूर्वी १०००० वर्षांच्या सुमारास झाला. ही मूळ कथा निरनिराळ्या काळच्या परिस्थितीला जुळवून घेण्याच्या प्रयत्नांत तिची पुष्कळ ओढाताण झालेली आहे. तरी तिचें खरें स्वरूप ओळखून काढणें फारसें कठीण नाहीं. तें ओळखल्यास असें दिसून येईल कीं, नवीन सृष्टीचा आरंभ किंवा आधुनिक शास्त्रीय परिभाषेंत सांगावयाचें झटल्यास चालू हिमोत्तरकालाचा आरंभ शकापूर्वी १०००० वर्षांच्या पलीकडे जात नाहीं. अमेरिकन भूस्तर शास्त्रज्ञांनीं स्वतंत्र शास्त्रीय प्रमाणांवरून हाच काल ठरविलेला आहे; आणि वैदिक व पौराणिक

---

१ ही युगपद्धति महाभारतांत शांतिपर्व व वनपर्व अशा दोन ठिकाणीं दिली आहे. वनपर्वांत (अ. १८८,२१–२८) खालील मजकूर आहेः—"आदितो मनुजव्याघ्र कृतस्यास्य जगतः क्षये । चत्वार्याहुः सहस्राणि वर्षाणां तत्कृतं युगम् ॥ तस्य तावच्छती संध्या संध्यांशश्च तथाविधः । त्रीणि वर्षसहस्राणि त्रेतायुगमिहोच्यते । तस्य तावच्छती सन्ध्या संध्यांशश्च ततः परम् ॥ तथा वर्षसहस्रे द्वे द्वापरं परिमाणतः । तस्यापि द्विशती संध्या संध्यांशश्च तथाविधः ॥ सहस्रमेकं वर्षाणां तथा कलियुगं स्मृतं । तस्य वर्षशतं संधिः संध्यांशश्च ततःपरं ॥ संधिसंध्यांशयोस्तुल्यं प्रमाणमुपधारय । क्षीणे कलियुगे चैव प्रवर्तति कृतं युगं ॥ एषा द्वादश साहस्री युगाख्या परिकीर्तिता । एतत्सहस्रपर्यंतमहर्ब्राह्ममुदाहृतम् ॥" यांत पहिल्या ओळींत प्रलयानंतर कृतयुग सुरू झाल्याचें स्पष्ट सांगितलें आहे.

कालगणनापद्धतीवरूनही तोच काल ठरत असल्यानें, गेल्या हिमकाला-संबंधानें २०००० किंवा ८०००० वर्षांसारखे बेसुमार अंदाज सोडून देऊन तो संपल्याला व हिमोत्तरकाल सुरू झाल्याला आज १०००० किंवा फार तर १२००० वर्षें झालीं असावीं असें मानण्याला बिलकुल हरकत नाहीं.

याप्रमाणें ध्रुवाजवळील मूलस्थानाचा काल निश्चित केल्यावर, तें मूलस्थान, त्याचा हिमकालांतील बर्फानें झालेला नाश व त्या संबंधाच्या दुसऱ्या कांहीं गोष्टी मझ्दयस्नी लोकांच्या धर्मग्रंथांत आणि वैदिक ऋषींच्या सूक्तांत ग्रथित होईतोंपर्यंत जशाच्या तशाच आठवणींत कशा राहिल्या याचा विचार करावयाचा. आमच्या धर्मग्रंथांचें संरक्षण आमच्या ब्राह्मणवर्गानें कसें केलें हें ज्याला माहीत आहे त्याला वरील गोष्टी वेदकालापर्यंत किंवा अवेस्ताकालापर्यंत अबाधित राहिल्या याचें मुळींच आश्चर्य वाटणार नाहीं. लेखनकला व मुद्रणकला यांचा प्रसार आज झालेला असल्यामुळें आह्मांला केवळ स्मरणशक्तीवर फार भिस्त टेवावी लागत नाहीं; म्हणून स्मरणशक्तीची नीट जोपासना केल्यास तिचें सामर्थ्य किती प्रचंड आहे याची कल्पनाही आतां आह्मांलां करतां येत नाहीं. अंगासहित संपूर्ण वेद अक्षरशः व स्वरशः असे निदान ३००० किंवा ४००० वर्षें तरी आमच्या ब्राह्मणांनीं राखून टेविलेले आहेत; आणि हें ज्यांनीं केलें त्यांच्याच पूर्वजांनीं आमच्या ध्रुवप्रदेशांतील वसतीचा वृत्तान्त सूक्तांत ग्रथित होईपर्यंत होता तसा राखून टेविला. सुनियंत्रित स्मरणशक्तीची ही कामगिरी आज आपल्याला आश्चर्यकारक वाटण्यासारखी असेल पण जेव्हां पुस्तकांपेक्षां तिच्यावरच सर्व भिस्त होती तेव्हां असला प्रकार ह्मणजे अगदीं साधारण गोष्ट होती. त्यावेळीं भावी पिढ्यांसाठीं राखून ठेवण्यासारख्या सर्व गोष्टी त्यांना बिनचूक पोंचविण्याचें साधन ह्मणजे ही कमावलेली स्मरणशक्तीच होती. स्मरणशक्तीला नीट कमावून व तिला नेहमीं सतेज ठेऊन तिच्या द्वारा आमचे धर्मग्रंथ पुढील पिढीला पोंचविण्याचेंच ज्यांचें व्रत त्या आमच्या वैदिक ब्राह्मणवर्गाला निष्कारण शिव्या देण्याचा प्रघात बऱ्याच प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. याल्कासारख्या पंडितांनींही त्यांना भारवाहक ह्मटलें आहे; व दुसऱ्या कांहींनीं अर्थ समजल्याशिवाय शब्द पाठ करणाऱ्या पोपटांचीं

त्यांना उपमा दिलेली आहे. पण आमच्या अगदीं प्राचीन कथांच्या द्वारा आमचा प्राचीन इतिहास व धर्म राखून ठेवण्याच्या कामीं त्यांनीं जी कामगिरी केली आहे ती केवळ अमूल्य असून, असल्या कामीं मुद्दाम कमावलेल्या स्मरणशक्तीचीच जरूरी असल्यामुळें आमच्या प्राचीन कथा आज हजारों वर्षेंपर्यंत जशाच्या तशा राखून ठेविण्याचें पवित्र व धार्मिक काम ज्यांनीं पिढ्यान् पिढ्या केलें त्या आमच्या वैदिकांबद्दल आह्मांला अत्यंत कृतज्ञता वाटल्यावांचून रहात नाहीं. वैदिक सूक्तांचा अर्थ करण्यांत पंडित आपली सर्व चतुराई खर्च करतील; पण वैदिक ब्राह्मणांनीं स्मरणशक्ति कमावणें हा आपल्या जन्माचा व्यवसाय जर केला नसता तर या पंडितांनीं उभारावयाच्या इमारतीचा पायाच मुळीं पुष्कळ काळापूर्वी नाहींसा झाला असता हें विसरतां कामा नये. असल्या व्यवसायाची आवश्यकता[1] आज नाहींशी झाली तरीही तो तसाच आहे. यावरून कोणत्याही देशांत धार्मिक संस्था अजिबात नष्ट होणें बहुधा अशक्य आहे ही गोष्ट आपण लक्षांत ठेविली पाहिजे.

तर याप्रमाणें कमावलेल्या स्मरणशक्तीच्या साहाय्यानें अबाधितपणें राखून ठेवलेल्या वैदिक व अवैस्तिक कथांवरून हिमांतरकालांत आर्य लोक उत्तरध्रुवाजवळ रहात होते ही गोष्ट निःसंशय सिद्ध होते. गेल्या हिमकालांत त्या स्थानाचा नाश झाल्यामुळें त्यांना दाक्षिणेकडे यावें लागलें, आणि हिमोत्तरकालाच्या आरंभीं ह्मणजे सुमारें १०,००० वर्षांपूर्वी यूरोप खंडाचा उत्तर भाग अथवा मध्य आशियांतील उंच मैदानें येथें त्यांनीं प्रथम कायमची वसति केली. याप्रमाणें आर्यांचें प्राचीनत्व हिमान्तरकालापर्यंत पोंचवितां येतें व त्या वेळीं ते तीस दिवसांची अखंड उषा असलेल्या उत्तर ध्रुवाजवळच्या प्रदेशांत रहात होते असें सिद्ध होतें. आर्यांशिवाय इतर मानववंश मूळ ध्रुवावरच रहाणारे होते कीं काय हा प्रश्न प्रस्तुत पुस्तकाच्या मर्यादेबाहेरचा आहे. डॉ. वारन या पंडितानें आपल्या 'नंदनवनोपलब्धि' नांवाच्या ग्रंथांत ईजिप्शन, अक्केडियन्, आसिरियन्, बाबिलोनियन्, चिनी आणि जपानी इत्यादि पुराण कथांचा

---

१ ही आवश्यकता नाहींशी झाली आहे कीं काय हा प्रश्नच आहे; कारण किती झालें तरी लेखनकला किंवा मुद्रणकला यांवर कमावलेल्या स्मरणशक्ती इतकी भिस्त ठेवतां येणार नाहीं.

विचार करून या सर्व लोकांचें ह्मणजे पर्यायानें सर्व मानवजातीचें जन्मस्थान उत्तरध्रुवाजवळ होतें असें अनुमान काढिलें आहे. हें अनुमान आमच्या उपपत्तीशीं मुळींच विरुद्ध नाहीं. कारण आर्यांशिवाय दुसरे कोणीही उत्तरध्रुवाजवळ रहात नव्हते असें ह्मणण्याचा आमचा मुळींच हेतू नाहीं. उलट ऋग्वेदांत अनेक वेळां आलेले पांच मानववंश (पंच जनाः) हे आर्यांच्याबरोबर त्यांच्या मूलस्थानांत राहणारे लोकच असावे असेंही मानण्यास आधार आहे. कारण मूलस्थानांतून निघाल्यावर आर्यांना पांचच प्रकारचे लोक आढळले असावेत किंवा त्यांच्या स्वतःच्याच पांच टोळ्या असाव्या असें मानावयास कांहीं आधार नाहीं. पण या प्रश्नाची अधिक वाटाघाट करण्याची येथें जरुरी नाहीं. उत्तरध्रुव हा अखिल मानवजातीचें उत्पत्तिस्थान होता असें यापुढें जर निःसंशय ठरेल तर त्यावरून आमच्या अनुमानांना मुळींच बाध येणार नाहीं, पण उलट आमचें स्वतंत्र प्रमाणावरून काढिलेलें अनुमान जर सत्य ठरलें, तर डॉ. वारनच्या अनुमानांनाच त्यावरून अधिक पुष्टि मिळेल. इतर कोणत्याही लोकांच्या प्राचीन कथांपेक्षां आर्यांच्या वेद व अवेस्त्यांतील कथाच बहुतांशीं अबाधित राहिलेल्या असल्यामुळें, डॉ. वारन सारख्या पंडितांनीं घेतलेला व्यापक प्रश्न सोडून स्वंतत्र रीतीनें एकट्या आर्यांच्याच मूलस्थानाचा संकुचित प्रश्न प्रस्तुत पुस्तकांत चर्चेसाठीं घेतला आहे. वेद व अवेस्ता हे आर्यांचे अत्यंत प्राचीन ग्रंथ आहेत याविषयीं आतां कोणाचा मतभेद नाहीं; ह्मणून नवीन शोधांच्या साहाय्यानें त्यांतील कथांवरून आर्यांच्या ' नंदनवनाचें ' स्थान निश्चित करणें कठिण नाहीं.

पण आर्यांचें मूलस्थान उत्तरध्रुवाजवळ होतें ही गोष्ट खास सिद्ध झाली ह्मणजे त्यांचा प्राचीन इतिहास व धर्म याविषयीं प्रस्तुत प्रचलित असलेल्या मतांत क्रान्ति झाल्याशिवाय रहाणार नाहीं. अगदीं रानटी स्थितीपासून ऋग्वेदावरून दिसून येणाऱ्या सुधारलेल्या स्थितीपर्यंत झालेली आर्यांची धार्मिक, मानसिक, नैतिक, अथवा सामाजिक उन्नति मध्य आशियांतील मैदानांवरच झाली असें मध्यआशियावादी पंडितांचें ह्मणणें आहे. त्यांच्यामतें, सूर्यादि सृष्टवस्तूंच्या अवलोकनानें आश्चर्य व भय यांनीं प्रेरित होऊन आर्य लोक सृष्टीच्या शक्तींचे उपासक झाले ते मध्य आशियांतच. वस्त्रें विणण्याची कला, रथादि तयार करण्याची विद्या,

अश्वादि पशूंना शिकविण्याचें कसब, किंवा सुवर्णादि धातूंचा उपयोग ते याच मैदानावर शिकले. तात्पर्य निरनिराळ्या आर्य शाखांत सामान्यत्वेंकरून दिसणारी जी प्राचीन आर्यांची सुधारणा तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्रावरून दिसून येते ती सर्व हिमोत्तरकालांत मध्य आशियांतील मैदानावरच घडून आली असें हे पंडित मानितात. पण तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्राचीं अनुमानें भाषेच्या किंवा इतिहासाच्या दृष्टीनें कितीही महत्वाचीं असलीं तरी त्यांवरून हें मूलस्थान कोठें होतें, त्यांत वसति केव्हां होती किंवा तें कां आणि केव्हां सोडून द्यावें लागलें इत्यादि गोष्टी कळणें बरेंच कठीण आहे. **गो** शब्द किंवा **वे** (विणणें) हा धातु सर्व आर्य भाषांत आढळतो, यावरून गाईची व वस्त्रें विणण्याच्या कलेची माहिती अविभक्त आर्यांना होती एवढेंच म्हणतां येईल. पण या शब्दसाम्यावरून आर्य लोक एकत्र असतांनां कोठें रहात होते किंवा ते विभक्त केव्हां झाले हें कांहीं सांगतां यावयाचें नाहीं. अलीकडे पुराणवस्तुशास्त्र व मानुष्यकशास्त्र यांवरून आर्य लोक मूळ मध्य आशियांत रहात होते व तेथूनच ते यूरोपांत गेले ही गोष्ट संभवनीय नाहीं असें दिसून आलें आहे. म्हणून मध्यआशियावाद्यांचें मत आतां बहुतेक लुप्तप्राय झालें आहे; आणि पंडित लोक आतां असें म्हणतात, कीं हल्लीं यूरोपांत जे लोक रहात आहेत त्यांचे पूर्वजही नवपाषाणयुगांत तेथेंच रहात होते. पण हे यूरोपीय लोकांचे पूर्वज मूळ तेथलेच होते कीं दुसऱ्या कोठून ते यूरोपांत गेले या प्रश्नाचा कांहीं अद्यापि या पंडितांनीं निर्णय केलेला नाहीं. तात्पर्य, मध्यआशियावादी झाले काय आणि हे उत्तरयूरोपवादी झाले काय, दोघेही आर्य सुधारणा हिमोत्तरकालीन होय असेंच मानीत असून आर्यांचा धर्म व कथा यांची परंपरा या कालाच्यामागें ढकलण्यास ते मुळींच तयार नाहींत.

पण आर्य लोकांचें मूळ आणि त्यांची सुधारणा या संबंधाचे तर्क हिमांतरकालांतील ध्रुववसतीच्या शोधामुळें आतां बरेच बदलावे लागतील. मूळचे आर्य केवळ हिमोत्तरकालीनच होते व अगदीं रानटी स्थितींतून त्यांची जी सुधारणा झाली ती मध्य आशियांत किंवा उत्तर यूरोपांत झाली असें आतां म्हणतां यावयाचें नाहीं. निरनिराळ्या आर्य शाखांच्या पुराणांत सारख्याच देवता आढळून येत नसल्यामुळें हीं पुराणें आर्यांची

फाटाफूट झाल्यावरच तयार झालीं असलीं पाहिजेत; उदाहरणार्थ उषस् हा शब्द जरी बहुतेक आर्य भाषांत आढळून येतो तरी उषेला देवतापद असें ऋग्वेदांतच दिलेलें असल्यामुळें वैदिक कथांचा जन्म व वाढ भरत-खंडांतच झालीं असलीं पाहिजेत; इत्यादि प्रकारचा कोटिक्रमही ध्रुवोप-पत्तीमुळें अशक्य होणार आहे. वैदिक देवतांचीं लक्षणें जर खास ध्रुवविशिष्ट आहेत तर त्यांच्या संबंधाच्या कथा इतर ठिकाणीं उत्पन्न झाल्या असें कसें म्हणावयाचें ? भरतखंडांत दिसणारी उषा अगदीं अल्पकालिक असून ध्रुवावरील उषेशीं तिचें मुळींच साम्य नाहीं; व म्हणून तिचें ऋग्वेदांतील भपकेदार वर्णन जें आहे तें हिंदुस्थानांत रहाणाऱ्या ऋषींनीं केलेलें असेल असें मुळींच संभवत नाहीं. इन्द्र, विष्णु, अश्विन इत्यादि देवतांनांहि हीच गोष्ट लागू आहे. या देवतांचीं नांवें सेल्टिक किंवा टयूटॉनिक भाषांत आढळत नसलीं, तरी वैदिक देवतांचीं जीं ध्रुवविशिष्ट लक्षणें आढळतात तीं या भाषांतील पुराणांतही आढळत असल्यामुळें, हें मूळचें साम्य जोंपर्यंत त्यांत दिसत आहे, तोंपर्यंत केवळ शब्दांत साम्य नाहीं एवढ्यावरून या कथांचें मूळ एक नव्हे असें म्हणणे संयुक्तिक नाहीं. आर्यांच्या मूलस्थानाचा हिमपातामुळें नाश झाला हें समजल्यामुळें त्यांच्या सुधारणेच्या इतिहासाला एक नवीन दिशा लागणार आहे; आणि म्हणून आशियांतील आर्य शाखांत जी सुधारणा आढळून येते तशी नवपाषाणयुगांत यूरोपच्या उत्तर भागांत रहाणाऱ्या आर्यांत दिसून येत नाहीं याचें कारण ते लोक त्या प्रलयानंतर आपली प्राचीन सुधारणा गमावून पुनरपि रानटी स्थितींत गेले हें होय. साधारणतः सुधारणेंत ज्यांची बरीच प्रगति झाली आहे असे लोक एकाएकीं पुनः रानटी स्थितींत उलट येत नाहींत हें खरें; पण प्रलय-पूर्वकालीन सुधारणा प्रलयोत्तरकालांत येण्याच्या वेळीं हा नियम लागू पडेल असें नाहीं. असल्या भयंकर प्रलयांतून जगणारे लोक आधीं थोडे, व जे जगले असतील त्यांना आपली मूळची सर्व सुधारणा, नवीन ठिकाणीं, नवीन परिस्थितींत, रहाण्याच्या जागेसाठींसुद्धां आर्येतर लोकांशीं भांडतांना कायम ठेवितां आली असेल असें दिसत नाहीं. शिवाल प्रलयानंतर कांहीं काळपर्यंत आशिया व यूरोप यांच्या उत्तर भागांतील हवा हल्लींपेक्षां बरीच कडक असली पाहिजे ही गोष्ट विचारांत

येतां ध्रुवप्रदेशांतून या प्रदेशांकडे येणाऱ्या आर्यांना व त्यांच्या मुलांबाळांना या भयंकर व अस्थिर स्थितींत, ध्रुवावरील नंदनवनांत रहाणाऱ्या आपल्या पूर्वजांची प्रलयपूर्वकालीन सुधारणा राखतां आली असेल तर ती अगदीं मोडक्या तोडक्या स्वरूपाचीच असली पाहिजे. ह्मणून नवपाषाण युगांत यूरोपीय आर्यांची सुधारणा अगदींच कनिष्ठ प्रकारची होती असें आढळल्यास त्यांत नवल नाहीं. उलट या प्रलयपूर्वकालीन धर्म व सुधारणा यांपैकीं एवढा भाग तरी भारतीय व इराणी आर्यांना राखून ठेवितां आला हेंच आश्चर्य आहे. आपल्या पूर्वजांपासून जो कांहीं सुधारणेचा अवशेष आपल्याला प्राप्त झाला तो नीट जतन करून पुढील पिढीच्या स्वाधीन करणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें त्यांच्या मनानें घेतल्यामुळेंच त्यांना एवढें कठीण काम करतां आलें.

ध्रुवप्रदेशांतील हवामान हिमान्तरकालांत फार सौम्य असून तेथें बहुतेक अक्षय वसंत होता व त्या वेळीं ध्रुवासभोंवतीं एक विस्तीर्ण भूमिप्रदेश असून त्याचा पुढें हिमकालांत नाश झाला हें मागें सांगितलेंच आहे. असल्या प्रदेशांत रहाणाऱ्या आमच्या पूर्वजांना तेथें खरोखर मोठें सुखसमाधान वाटत असलें पाहिजे. तेथें गैरसोईची ह्मणजे एकच गोष्ट होती; ती ह्मणजे तेथील दीर्घ काळोखाची रात्र होय. हा काळोख व त्याचे इंद्रादि शत्रू याच्यांतील युद्धाचें वर्णन नाना तऱ्हेनें कथांच्या रूपानें वैदिक ऋषींनीं कसें केलें आहे हें मागें सांगितलेंच आहे. ध्रुवावरील कंटाळवाणी दीर्घ रात्र, व कित्येक महिने वाट पाहावयाला लाऊन मग क्षितिजावर दिसूं लागणारी उषा या गोष्टी आमच्या आद्य पूर्वजांचें विशेष लक्ष वेधणाऱ्या असून धार्मिक सामाजिक इत्यादि उत्सवांचें वार्षिक चक्र सुरू करणारी अशी उषा पाताळांतील समुद्रांतून वर आणणें ह्मणजे देवांचा मोठाच पराक्रम होय असें ते मानीत. तमोरूप वृत्राचा वध करून प्रकाशदेवतांचा विजयी होण्याचा काल म्हणजे उषेचा उदयकाल हा देवयानाचा आरंभ असून उषेचा पुत्र व देवांचा सेनापति असा जो कुमार तो मोठ्या विजयोत्सवानें या देवयान मार्गाचें आक्रमण करीत ऋग्वेदांत सांगितल्याप्रमाणें 'मानुषा युगांचें' चक्र चालू करी. याच्या उलट पितृयान ह्मणजे दोन पासून सहा महिन्यांच्या काळोखाची रात्र होती. हा काळ विश्रांतीचा असून सूर्यप्रकाशाच्या अभावीं त्यांत

मृत शरीराची व्यवस्था लावण्याचेंही काम लोक करीत नसत. या कालांत सर्व धार्मिक व सामाजिक विधीही बंद असत. तात्पर्य आर्यांच्या प्राचीन कालगणनापद्धतींत सात किंवा दहा महिन्यांचा उन्हाळा व त्या मानानें पांच किंवा दोन महिन्यांचा हिंवाळा असे वर्षाचे दोनच भाग होते. पण हे दोन्ही भाग एकत्र करून त्यावरून वर्ष मोजण्याच्या पद्धतीपेक्षां एकट्या उन्हाळ्याच्या किंवा हिंवाळ्याच्या अवधीवरूनच तें मोजण्याची पद्धत त्या काळीं होती असें दिसतें. सात किंवा दहा महिन्याचें वर्ष व तितक्याच मुदतीचीं सत्रें वेदांत आढळतात याचें तरी कारण हेंच होय. पण ही पद्धत ध्रुववृत्ताच्या दक्षिणेकडील प्रदेशांत चालणें शक्य नसल्यामुळें तिकडे गेल्यावर आमच्या आर्यपूर्वजांना न्यूमा राजानें रोमचे वर्षांत फेरफार केल्याप्रमाणें या पद्धतींत फेरफार करावे लागले. तरी देवयानांतच यज्ञादि धर्मविधि करण्याची चाल त्यांनीं तशीच ठेविली, व अद्यापिही ती तशीच आहे. आमच्या गृह्यसूत्रांत धार्मिक दृष्ट्या उत्तरायणाचें विशेष महत्व असून दक्षिणायनांत मरण येणें हें अशुभ आहे असें मानिलें आहे त्याचें कारण आतां समजून येईल.

हिमान्तरकालांतील सात किंवा दहा महिन्याचें वर्ष हिमोत्तरकालांत बारा महिन्याचें कसें झालें, वर्षाचा देवयानपितृयानरूप सांपातिक विभाग जाऊन त्याच्या ऐवजीं आयनिक विभाग कसा प्रचारांत आला व त्याअन्वयें उत्तरायणाचा मूळचा अर्थ कसा बदलला इत्यादि प्रश्न वैदिक कालगणनेच्या विचारांत महत्वाचे आहेत. पण त्यांचा प्रस्तुत विषयाशीं संबंध नसल्यामुळें त्यांचा येथें विचार करतां येत नाहीं. कित्येक पंडितांचें असें मत आहे कीं सृष्टींतील शक्तींची उपासना जरी बऱ्याच प्राचीन आर्यधर्मांत आढळली, तरी ती हे सर्व आर्य एकत्र असतांना उत्पन्न झालेली नव्हे. पण हें मत डॉ. श्रेडर या पंडितानें साफ खोडून काढिलें आहे. उषा, आदित्य, अश्विन, वृत्रहन्, इत्यादि देवतांचीं लक्षणें ध्रुवविशिष्ट असल्यामुळें, आकाश (द्यौः), उषा, अग्नि इत्यादि सृष्टीच्या शक्तींच्या. निरनिराळ्या आर्यभाषांतील नामसाद्दश्यावरून निघणाऱ्या अनुमानांना चांगला आधार मिळतो. तात्पर्य, कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी द्यौःपिता, सूर्य, अग्नि, उषस्, तन्यतु

(मेघगर्जना) यांना अगदीं आदिकालींच देवतापदवी मिळालेली असून पूजार्थक जो संस्कृत यज् धातु तो झेन्द् यझ् आणि ग्रीक अंझोमै या रूपानीं इतर आर्यभाषांत दिसत असल्यामुळें, या देवतांची यज्ञरूपानें त्याकाळीं पूजाही होत असे असें निर्विवाद ठरतें. ही उपासना हिमान्तर-कालांतच सुरू झाली कीं त्याच्याही पूर्वीपासून ती चालत आलेली होती हें ठरविण्याला सांप्रत कांहीं साधन नाहीं. पण एवढें मात्र खास आहे कीं, दैवी शक्तीचीं व्यक्त रूपें या नात्यानें होणारी सृष्टींतील महाभूतांची उपासना, सर्व आर्य ध्रुवाजवळ एकत्र असतांना सुरू होती व तिच्या-पासूनच पुढें प्रलयोत्तर कालांतील निरनिराळे आर्यधर्म उत्पन्न झाले. सात नऊ किंवा दहा महिन्यांत आपलीं सत्रें संपविणारे, मनु, अंगिरस्, भृगु इत्यादि ऋग्वेदांत सांगितलेले प्राचीन यज्ञप्रवर्तक अविभक्त आर्यांचेच ऋत्विज् असून, ते सूर्यप्रकाश असे तों सात किंवा दहा महिने-पर्यंत यज्ञयाग चालवीत आणि सूर्य क्षितिजाखालीं जाऊन तेथील दीर्घरात्र सुरू झाली ह्मणजे इतर यज्ञ बंद करून, तमाचा पाडाव करून प्रकाशाला पुनः प्राप्त करून देणाऱ्या वृत्रहनालाच सोमाच्या आहुती देत. हिमा-न्तरकालांत यज्ञपद्धतीला अगदीं सुव्यवस्थित स्वरूप जरी कदाचित् आलेलें नसलें तरी त्यावेळीं उपासनाविधीचें मुख्य अंग यज्ञ हेंच होतें, यांत कांहींच शंका नाहीं.

ईशशक्तीचीं व्यक्तरूपें जीं महाभूतें त्यांची उपासना करणारे, आपली भाषा स्वतंत्ररीतीनें सुसंस्कृत करणारे आणि ध्रुवाजवळील आपल्या सुखकर अशा मूलभूमींतील सृष्ट चमत्कारांवर रूपकें करून त्यावर नानाप्रकार-च्या कथा रचणारे असे जे आमचे आर्य पूर्वज त्यांची सुधारणेंत बरीच प्रगति झालेली असली पाहिजे यांत कांहीं शंका नाहीं. ती नक्की किती होती हें जरी सांगतां आलें नाहीं, तरी तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्रावरून एवढें दिसतें कीं, आर्य लोक अविभक्त असतांना त्यानां सूत काढणें, कापड विणणें, धातूचें काम, नांवा बांधणें, रथ गाड्या करणें, इत्यादि कला, शहरें बांधून त्यांत रहाण्याची रीत, क्रयविक्रयाचे व्यवहार, शेतकीचें काम इत्यादि गोष्टींची चांगली माहिती होती. विवाहादि धार्मिक आणि सामाजिक संस्था त्यांच्यांत असून मालमत्तेसंबंधाचे नियमही त्यांनीं ठरवून टाकिले होते. प्राचीन भाषाशास्त्रावरून या आदि आर्यांना माहीत असलेल्या

च्याच प्राण्यांची व वनस्पतींची माहिती मिळते. भाषाशास्त्रावरून अशाप्रकारच्या गोष्टी समजत असल्यामुळें प्राचीन आर्यांची सुधारणा नवपाषाणयुगांतील रानटी लोकांपेक्षां बरीच जास्त होती एवढें तरी खास ठरतें. पण आतां ध्रुवोपपत्ति माहीत झाल्यामुळें, तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्रावरून दिसून येणारी तेवढीच काय ती सुधारणा प्राचीन आर्यांची होती किंवा कसें याविषयीं जास्त विचार करणें जरूर आहे. बर्फाच्या प्रलयामुळें मूलस्थान सोडून वाटेल तिकडे जाणें भाग पडल्यावर, त्या संकटांतून निभावलेल्या आर्यांनीं व त्यांच्या मुलाबाळांनीं आपल्या उरलेल्या मोडक्या तोडक्या सुधारणेच्या जोरावरही अगदीं प्रतिकूल अशा परिस्थितींत नवीन देशांत जाऊन तेथील लोकांनां जिंकून त्यांना आपलेसे करून त्यांच्यावर आपलें वर्चस्व स्थापन केलें व त्यांना भाषा, आचार, विचार इत्यादि गोष्टींत आपल्यासारखे आर्य करून सोडिलें एवढ्या एकाच गोष्टीवरून आर्यांची मूळ सुधारणा कोणत्या प्रकारची होती याचें अनुमान करतां येईल. नवपाषाणयुगांत यूरोपच्या उत्तर भागांत रहाणारे आर्य मूळचे तेथीलच होते असें जोंपर्यंत मत होतें, तोंपर्यंत तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्राच्या अनुमानांबाहेर जाण्याची गरज नव्हती. पण या नवपाषाणयुगीन आर्यांची सुधारणा आर्यांच्या मूळ ध्रुवावरील सुधारणेचा एक यःकश्चित् अवशेष होय असें आतां आपल्याला कळून आल्यामुळें, अमुक एक सुधारणा दर्शविणारे शब्द सर्व आर्य भाषांत सांपडत नाहींत एवढ्यावरूनच केवळ ती सुधारणा मूळ आर्यांमध्यें नव्हती असा कोटिक्रम करणें अगदीं अयुक्त होईल. तात्पर्य एवढेंच कीं तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्राच्या अनुमानांचा उपयोग फक्त विध्यर्थी असून तो निषेधार्थी करणें बरोबर नाहीं. प्रलयामध्यें किती सुधारणा नाहींशी झाली हें सांगतां येणें अगदीं अशक्य आहे. म्हणून तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्रावरून दिसून येणारी मूळ आर्यांची सुधारणा एवढी तरी कमींत कमी होती एवढेंच फार तर आपल्याला खास सांगतां येईल. तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्राच्या अनुमानांना किती महत्व द्यावयाचें हें यावरून कळून येईल. आर्यांच्या मूलस्थानाचा प्रश्न अनिर्णित होता तोंपर्यंत सर्व भार या अनुमानांवर होता, हें ठीक होतें. पण आतां आर्य लोक व त्यांचा धर्म हीं हिमान्तरकालीन असून

त्यांचें खरें मूळ तर त्याच्याही पलीकडील भूस्तरशास्त्रांतील कालांत गुरफटून गेलें आहे असें समजल्यामुळें हिमान्तरकालांतील आर्य रानटी होते असें म्हणणें युक्तीस धरून नाहीं. पुराणवस्तुशास्त्रज्ञांनीं ठरविलेलीं जीं पाषाण, कांस्य, लोह इत्यादि युगें त्यांपैकीं पहिल्या पाषाण युगांतून आर्यलोक हे एकदां केव्हां तरी आलेले असले पाहिजेत हें खरें. पण आर्यांचें पाषाणयुग हिमोत्तरकालांत होतें असें म्हणावयाला पुराणवस्तु-शास्त्रांत कांहीं प्रमाण नाहीं. शिवाय तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्रावरून अविभक्त आर्यांना धातूंची माहिती होती असें दिसत असल्यामुळें त्यांची सुधारणा पाषाणयुगाहून वरच्या दर्जाची होती हें तर सहजच ठरतें. धातूंचें काम करण्याची कला आर्य लोकांनींच इतर देशांतून यूरोपांत नेली असें कित्येक पुराणवस्तुशास्त्रज्ञांचें मत असल्याविषयीं पहिल्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. तांब्याचें किंवा पितळेचें नाणें पाडून त्याचा क्रयविक्रयासाठीं उपयोग करण्याचेंही प्राचीन आर्यांना माहीत होतेंसें दिसतें. क्रयविक्रय साधनाचा वाचक असा 'खल्कॉस' शब्द होमरनें सांगितला आहे; व विकत घेणें किंवा अदलाबदल करणें या अर्थांही ग्रीक व संस्कृतांत समान शब्द आहेत. ग्रीक 'मे इ' संस्कृत 'मे'=अदलाबदल करणें; "प्रिअमै"—संस्कृत, 'क्रि' विकत घेणें. ऋग्वेदांत (८, १, ५) 'शुल्क' नावाचें मूल्यपरिमाण सांगितलें असून त्याचा अर्वाचीन संस्कृत वाङ्मयांत 'दस्तुरीच्या नाक्यावर देण्याचा पैसा' असा अर्थ आहे. म्हणजे हें शुल्क मूळचें होमरनें सांगितलेल्या 'खल्कॉस' सारखेंच तांब्याचें किंवा पितळेचें नाणें असणें असंभवनीय नाहीं. साधारणतः ग्रीक 'ख' बद्दल संस्कृतांत 'ह' येतो; व हा नियम 'खल्कॉस' शब्दाला कडकपणें लाविल्यास 'खल्कॉस' आणि 'शुल्क' हे स्वरशास्त्रदृष्ट्या एक होणार नाहींत. म्हणून व्युत्पत्तिशास्त्रज्ञांनीं 'खल्कॉस' ला संस्कृत 'हृक' शब्दाचें रूप मानिलें आहे. पण या दोन शब्दांचा मुळींच संबंध दिसत नाहीं. 'हृक' शब्द वैदिक नाहीं व त्याचा अर्थही तांबें किंवा पितळ असा नाहीं. आतां संस्कृत 'श' बद्दल ग्रीक भाषेंत 'क' होतो व कधीं कधीं हा 'क' हकारयुक्त होऊन त्याचा 'ख' होतो. म्हणून ग्रीक 'खल्कॉस' हें संस्कृत 'शुल्का' चेंच रूप असावें असें दिसतें. हें साम्य वास्तव असेल तर अविभक्त आर्य तांबें किंवा

पितळ यासारख्या धातूचीं नाणीं क्रयविक्रयासाठीं वापरीत होते असें अनुमान करावें लागतें. अशा आणखी किती तरी गोष्टी आहेत; पण त्यांचा येथें विचार करतां येत नाहीं. तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्राच्या अनुमानांवर प्राचीन आर्यांच्या सुधारणेची मर्यादा ठरविण्यांत किती भिस्त ठेवावयाची एवढेंच आह्मांस दाखवावयाचें होतें. असो. मूळ आर्य सुधारणा हिमान्तरकालीन होती असें असतां, नवपाषाणयुगांतील यूरोपीय आर्य लोकांची सुधारणा जर कनिष्ठ प्रकारची असेल, तर मागें सांगितल्याप्रमाणें त्याच्या मूलस्थानांवर आलेल्या संकटांत त्यांनीं ती गमाविली असल्यामुळें असें झालें असेल. आशियांतील आर्यांनीं मूळ सुधारणेचा व धर्माचा बराच भाग कायम ठेवला याचें कारण त्यांनीं तो आपल्या सूक्तांत ग्रथित करून ठेवला, व त्यांच्यापैकीं कांहीं जणांनीं हीं सूक्तें जशींच्या तशीं पुढील पिढ्यांना पोंचविण्याचें काम मुद्दाम कमावलेल्या स्मरणशक्तीच्या द्वारा करण्याचा आपल्या जन्माचा व्यवसायच करून टाकला हें होय. तरीही हें काम बरेंच कंठीण होतें. अवेस्त्यांतील मूळचा बराच भाग आज नाहींसा झालेला आह; आणि आपले वेद हे जरी त्यांहून चांगल्या स्थितींत असले तरी ते मूळ वेदांचा एक भागच होत असा आपला समज प्रसिद्धच आहे. या ग्रंथांत हजारों वर्षांपूर्वीं आस्तित्वांत असलेल्या ध्रुवावरील वसतीची हकीगत दिसून यावी हें आश्चर्य तर खरेंच, पण प्रस्तुत पुस्तकांत दिलेल्या पुराव्यावरून पहातां तें तितकेंच खरेंही आहे.

असो; याप्रमाणें हिमान्तरकालांत आर्यांची सुधारणा बऱ्याच उच्च प्रतीची होती एवढें जरी निश्चित असलें, तरी अद्यापि त्यांच्या संबंधानें बऱ्याच गोष्टी अनिश्चित आहेत. उदाहरणार्थ, 'एकंदर मानवजातीपासून आमचा हा आर्यवंश वेगळा कधीं झाला, आर्यांची भाषा मूळ केव्हां व कशी उत्पन्न झाली इत्यादि प्रश्न मनुष्यशास्त्रदृष्ट्या बरेच महत्वाचे आहेत. पण त्यांचा उलगडा करण्याचें साधन प्रस्तुत उपलब्ध नाहीं. मनुष्यप्राणी तृतीय युगांतही आस्तित्वांत होता, आणि पृथ्वीच्या कबचांत हिमकालांत झालेल्या प्रचंड घडामोडी त्यानें पाहिल्या होत्या हें भूस्तरशास्त्रावरून दिसून येतें. पण वर्ण किंवा भाषा यांच्या तत्वावर एकंदर मनुष्यजातीचे भेद केव्हां झाले हें ठरविण्यास मनुष्यशास्त्रांत कांहीं

आधार नाहीं. उलट अत्यन्त प्राचीन असे जे मनुष्यांचे अवशेष सांपडले आहेत त्यांवरूनही भिन्न भिन्न मानववंशाचेंच अस्तित्व सिद्ध झालें आहे; यावरून मनुष्यजातीच्या मूळ उत्पत्तीचा प्रश्न मुळींच सुटलेला नसून, एकमूलवादि व अनेकमूलवादि अशा दोघांनाही मनमुराद तर्क करण्यास वाव असून त्या तर्कांचें वस्तुस्थितीवरून खंडण होण्याचीही धास्ती नाहीं असें दिसून येतें. प्रस्तुत पुस्तकांत दिलेल्या प्रमाणांवरून एकंदर मनुष्यजातीच्या, किंवा एकट्या आर्यांच्याही मूळ उत्पत्तीचा प्रश्न मुळींच सुटण्यासारखा नाहीं. आर्यांचें मूळ हिमपूर्वकालापर्यंत पोंचवितां येईल कीं नाहीं, किंवा मनुष्यजाति एकाच दंपतीपासून झाली कीं अनेकांपासून झाली हें या प्रमाणांवरून मुळींच सांगतां येणार नाहीं. आर्यलोक व त्यांची समशीतोष्ण कटिबंधांतील हिमोत्तरकालीन सुधारणा यांची परंपरा हिमान्तरकालीन ध्रुवप्रदेशांपर्यंत नेण्याचें काम काय तें या प्रमाणांवरून होणारें आहे. आर्यलोक व त्यांची भाषा एकदम सुधारलेल्या स्थितींतच हिमान्तरकालाच्या अखेरीस भूतलावर अवतरली असें जर ह्मणतां येत नाहीं तर अर्थात् त्यांचें मूळ अति प्राचीन भूस्तरीय काळांतच असलें पाहिजे. तात्पर्य, सांप्रत या प्रश्नांत फार खोल न जातां, आर्यलोक व त्यांची सुधारणा यांची परंपरा हिमान्तरकालापर्यंत पोंचवितां येते व त्यांचें खास मूळ अति प्राचीन भूस्तरीय काळांत गडप झालेलें आहे एवढें म्हणूनच स्वस्थ बसलें पाहिजे.

आतां हें प्रकरण पुरें करण्यापूर्वी वेदांची उत्पत्ति, स्वरूप आणि प्रामाण्य याविषयींच्या ब्रह्मवाद्यांच्या मताशीं या आमच्या अनुमानांचा कितपत संबंध पोंचतो हें थोडें पाहूं. ब्राह्मणकालापासून कमीजास्ती जोरानें या प्रश्नाची चर्चा झालेली असून ब्रह्मवादिपक्षाच्या दृष्टीनें त्यासंबंधानें आतां कांहीं सांगण्याचें राहिलेलें नाहीं. पण शास्त्रीय विवेचनासाठीं ब्रह्मवादिपक्ष व प्राचीनविद्यापंडितांचा पक्ष हे दोन्ही अलग ठेविले पाहिजेत. शास्त्रीय दृष्टीनें केलेला विचार पूर्ण झाल्यावर त्यावरून निघणारीं अनुमानें ब्रह्मवादि पक्षाशीं कितपत जुळतात हें पाहिजे तर मग पहावें. ब्रह्मवाद्यांच्या मतें वेद हे नित्य, अनादि, आणि अपौरुषेय आहेत; आणि हीं विशेषणें या ग्रंथांना अगदीं प्राचीन तत्वज्ञान्यांनींहीं दिलेलीं आहेत. वेदप्रामाण्यासंबंधानें ऋग्वेदभाष्याच्या प्रस्तावनेंत सायणाचार्यांनीं विचार

केलेला असून कै. महामहोपाध्याय राजारामशास्त्री बोडस यानींही 'वेद-प्रामाण्यचंद्रिका' नांवाच्या लहानशा संस्कृत पुस्तकांत या प्रश्नाची चर्चा केली आहे. त्यांतील वादात्मक गोष्टींचा विचार न करितां ब्रह्मवादि पक्षाच्या निरनिराळ्या मतांचा सारांश तेवढा येथें देऊं. प्रस्तुत प्रश्न असा आहे कीं, अनुक्रमणिकेंत (वेदांच्या) सूक्तांचे जे ऋषि दिलेले आहेत त्यानीं तीं सूक्तें अक्षरशः, कालिदासानें शाकुंतलादि ग्रंथ रचिले त्याप्रमाणें रचिलीं, कीं तीं अनादि कालापासून तशींच आलेलीं आहेत ? या प्रश्नाचा निर्णय करण्याचें उत्तम साधन म्हणजे प्रत्यक्ष हीं सूक्तेंच होत. पण त्यांत या विषयासंबंधानें सर्व ऋषींची एकवाक्यता नाहीं. त्यांत कित्येक ऋषींनीं आपले विचार आशा, भीति इत्यादि निर्दिष्ट केलीं आहेत. कित्येकांनीं ऐहिक सुखप्राप्तीसाठीं, किंवा शत्रूचा पराभव व्हावा म्हणून किंवा द्यूतादि व्यसनें लागूं नयेत म्हणून (१०, ३४) देवांची प्रार्थना केली आहे. कित्येकांनीं पुढें दिसणाऱ्या वस्तुस्थितीचें चित्र रेखाटलें आहे; कित्येकांनीं सुतार रथ करतो त्याप्रमाणें आपण स्वतः केलेल्या, किंवा रचिलेल्या (कृ, जन् तक्ष्) नवीन सूक्तांचा (नव्यसी, अपूर्व्य) निर्देश केला आहे* (१, ४७, २; ६२, १३; २, १९, ८; ४, १६, २०; ८, ९५, ५; १०, २३, ६; ५४, ६ इ०) तर कित्येक सूक्तांत तीं अमुकाचा पुत्र अमुक यानें रचिलीं असें म्हटलें आहे (१, ६०, ५; १०, ६३, १७; ६७, १ इ०). आतां या सूक्तांवरोवरच्या दुसऱ्या अनेक सूक्तांमध्यें ऋषींनीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं इंद्र, वरुण, सोम, अदिति इत्यादि देवतांच्या स्फूर्तीमुळेंच हीं सूक्तें उत्पन्न झालीं, किंवा या ऋचा प्रत्यक्ष विराट् पुरुषापासून उद्भवल्या, किंवा त्या देवांनीं उत्पन्न केलेल्या असून पुढें त्या ऋषींनी पाहिल्या (पश्यात्) (१, ३७, ४; २, ३३, २; ७, ६६, ११; ८, ५९६, १०, ७२, १; ८८, ८; ९०, ९. इ.) वाक् ही नित्य असून (८, ७५, ६.) ती दिव्य वाक् व सूक्तें देवांनीं उत्पन्न केलीं (८, १००, १०; १०१, १६; १०, ८८,८)

---

* ब्रह्माकर्म भृगवो न रथं। ऋ. ४, १६, २०. स्तोमं त इन्द्र विमदा अजीजनन्नपूर्व्यं। ऋ. १०, २३, ६. सनायते गोतम इन्द्र नव्यमतक्षद्ब्रह्म। ऋ. १, ६२, १३.

असेंही कित्येक ठिकाणीं झटलें आहे. त्यामुळें प्रत्यक्ष सूक्तांवरून आपल्या प्रश्नाचा कोणताही निर्णय होणार नाहीं. हीं सूक्तें कित्येकांना मानवी कृति वाटली, तर कित्येकांना तीं थेट देवतांपासून मिळालीं असें वाटलें; यावरून एवढें खरें कीं कांहीं ऋषींना तरी आपण गात असलेली सूक्तें प्रत्यक्ष ईश्वरी प्रेरणेनेंच उत्पन्न झालीं असें वाटत होतें. स्वतः सूक्तें केल्याचे जे निर्देश आहेत त्यांचाही स्फूर्तिवादानें उलगडा करतां येईल. पण ऋक्, यजुस् आणि साम हे तिन्ही विराट् पुरुषापासून उत्पन्न झाले असें जें स्पष्ट म्हटलें आहे त्याचा या युक्तीनें उलगडा होत नाहीं. म्हणजे वेदांच्या अनादित्वाची किंवा अपौरुषेयत्वाची कल्पना वेदांइतकीच प्राचीन आहे असें म्हणावें लागतें. ब्राह्मणें व उपनिषदें यांत हेंच मत दृष्टीस पडतें. ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हे अनुक्रमें अग्नि वायु व सूर्य यांपासून झाले असें त्यांत सांगितलें आहे (श. ब्रा. ११,५,८; १ ऐ. ब्रा. ५,३२–३४; छांदोग्य उप० ४,१७,१); वेद हे परमात्म्याचें निश्वसित (निश्वास) होत (बृहदारण्यक उप० २,४,१०); प्रजापतीनें दैवी वाचेपासून वेद निर्माण केले. हेंच मत स्मृति, व पुराणें यांत प्रतिपादन केलें आहे. कल्पान्तीं होणाऱ्या प्रलयांत इतर सर्व वस्तूंप्रमाणें वेदही नष्ट होतात, पण पुढच्या कल्पाच्या आरंभीं ब्रह्मदेव स्वतः त्यांचें पुनरुज्जीवन करतो व लहान प्रलयांतून ऋषीच त्यांचें रक्षण करितात असें मत आहे. या मताला आधार महाभारतांतील एक श्लोक आहे; तो असाः–" युगान्तेऽन्तर्हितान्वेदान्सेतिहासान्महर्षयः । लेभिरे तपसा पूवमनुज्ञाता स्वयंभुवा " ॥ (शांतिपर्व, अ. २१०, श्लो. १९)–मागील युगाच्या अन्तीं नष्ट झालेले वेद व इतिहास महर्षींनीं स्वयंभू ब्रह्मयाच्या अनुज्ञेनें तप करून पूर्वी परत मिळविले. या कारणास्तव ऋषी हे मंत्राचे कर्ते नसून द्रष्टे होत. तैत्तिरीय, काठक इत्यादि वेदांच्या शाखा ज्या ऋषींच्या नांवानें प्रसिद्ध आहेत, त्या ऋषींनीं अर्थातच त्या केलेल्या नसून ते त्यांचे द्रष्टे मात्र होत. पण या वेदांच्या नित्यत्वासंबंधानें षड्दर्शनांमध्यें फारच सूक्ष्म विवेचन केलेलें आहे. या विवेचनांतील कोटिक्रम भारदस्त

---

१ भवभूतीनेंही उत्तर रामचरितांत एके ठिकाणीं असेंच झटलें आहे, ब्रह्मर्षयो ब्रह्महिताय तप्त्वा । परःसहस्राः शरदस्तपांसि ॥ एतान्यपश्यन् गुरवः पुराणाः । स्वान्येव तेजांसि तपोमयानि ॥

असून, त्यांतील उदाहरणें समजूत पटण्यासारखीं असल्यामुळें तें फार मौजेचें आहे. त्या सर्वांवरून एवढें तरी दिसून येतें कीं वेदांच्या अनादित्वाची गोष्ट वेदांइतकीच प्राचीन असून ते मनुष्यांनीं रचिले असें कोणत्याही काळीं कोणी प्रदिपादन केलेलें नाहीं. हे षड्दर्शनकार सामान्य व्यक्ति नसून त्यांचें अचाट बुद्धिवैभव व त्यांची उत्कट धर्मशीलता लक्षांत घेतल्यास त्यांनीं दिलेल्या प्रमाणांसंबंधानें कोणत्याच प्रकारची शंका घेणें योग्य होणार नाहीं; म्हणून वेद नित्य आहेत ही समजूत अगदीं प्राचीन कालापासून चालत आलेली आहे, असें मानणें भाग आहे. पण ही समजूत म्हणजे वेदांच्या अपौरुषेयत्वासंबंधाचा प्रत्यक्ष पुरावा नसून, वेदांचा मानवी कर्ता कोणत्याही काळीं ज्ञात नव्हता एवढेंच फार तर तीवरून सिद्ध होईल. शब्द आणि अर्थ यांचा संबंध नित्य आहे, मनुष्यकृत नव्हे, म्हणून वेदही नित्य होत असा कोटिक्रम पूर्वमीमांसाकार जैमिनि यानें केला आहे. एका विवक्षित क्रमानें आलेल्या अक्षरांचा समूह म्हणजे शब्द. अक्षरांच्या या ठराविक क्रमामुळें शब्दांत अर्थोत्पत्ति होते. जैमिनीचें हें मत वैयाकरणांना पसंत नाहीं. त्यांचें मत असें आहे कीं, अक्षरें अनित्य असल्यामुळें त्यांच्या समूहावरून अर्थनिष्पत्ति होत नसून या अक्षरसमूहाचा उच्चार झाल्यावर 'स्फोटा' मुळें त्यांत अर्थ उत्पन्न होतो. वेदांमध्यें मुळीं अनित्यवस्तुवाचक शब्दच नाहींत, व त्यांतील शब्द आणि त्यांचे अर्थ हे नित्य असल्यामुळें वेद हे स्वतः सिद्ध असून सूर्याप्रमाणें स्वयंप्रकाश व अस्खलनशील आहेत; वेदांतील कित्येक भाग ऋषींच्या नांवानें प्रसिद्ध आहेत, ते त्या ऋषींनीं केले म्हणून नसून त्यांनीं त्याचें प्रथम अध्ययन करून इतरांना ते शिकविले म्हणून होत, असें जैमिनीचें मत आहे. वेदांतसूत्रकार बादरायण व्यास आणि त्याचे भाष्यकार शंकराचार्य यांना शब्दाचें नित्यत्व कबूल आहे; पण त्यांचें म्हणणें असें कीं खुद्द शब्द नित्य नसून तो ज्या वस्तुजातीचा वाचक आहे ती जाति नित्य आहे; म्हणून इंद्रादि देवतांचीं नावें दिलेलीं अर्थात् अनित्य आहेत; तरी त्यांवरून वेदांच्या नित्यत्वाला बाध येत नाहीं; कारण ज्यांचे ते शब्द वाचक आहेत त्या इंद्रादिदेवतांची जाति नित्यच आहे. नैयायिकांनां शब्दाची नित्यता मान्य नाहीं, तरी ते वेद प्रमाण मानितात, कारण ज्यांना धर्माचें साक्षात्

ज्ञान झालेलें आहे (साक्षात्कृतधर्माणः) अशा विश्वासार्ह (आप्त) पुरुषांपासून त्यांची उत्पत्ति झालेली असून त्यांनीं ऐहिक आचाराविषयीं ज्या आज्ञा केलेल्या आहेत, त्यांची अनुभवानें खात्री पटण्यासारखी असल्यामुळें त्या पुरुषांची विश्वासार्हताही सिद्ध होते, असें त्यांचें म्हणणें आहे. वैशेषिक सूत्रांमध्यें ईश्वर वेदांचा कर्ता असें स्पष्ट म्हटलें आहे. सांख्यांना, नैयायिकांप्रमाणेंच, शब्दार्थांमधील संबंध नित्य वाटत नसून ते आदिपुरुषापासून वेदांची उत्पत्ति झाली असें मानितात; मात्र ते त्यानें मुद्दाम केलेले नसून श्वासक्रियेप्रमाणें सहज लीलेनें ते उत्पन्न झाले असें त्यांचें मत आहे. या मताप्रमाणें पहातां मीमांसक म्हणतात त्या अर्थानें वेद नित्य नसून, ज्या वेदवाक्यांत वेदांच्या नित्यत्वाचा उल्लेख केला आहे, त्यांत 'एकाच जातीच्या अर्थक्रमाचा प्रवाह कधीं बंद पडत नाहीं" असें सांगण्याचाच उद्देश आहे (वेदनित्यता-वाक्यानिच सजातीयानुपूर्वीप्रवाहानुच्छेदपराणि*). या प्रश्नाचा पतंजलीनें महाभाष्यांत निकाल करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानें शब्दानुक्रम (वर्णानुपूर्वी) व अर्थ हीं भिन्न समजून असें ठरविलें आहे कीं, वेदांच्या नित्यतेचा संबंध अर्थाच्या नित्यतेशीं असून, शब्दक्रमाशीं नाहीं; कारण हा क्रम नेहमीं सारखा नसतो, आणि म्हणूनच अर्थ कायम असूनही, काठक, कालापक, मौदक, इत्यादि वेदांच्या शाखा आढळून येतात.† वेदांच्या अनेक शाखांचा, शब्दक्रमाच्या नित्यतेवर उलगडा होत नसल्यामुळें हें मीमांसक मत पतंजलीनें अमान्य केलें आहे. त्याच्या मतें पृथ्वीवर होणाऱ्या प्रलयांत वेद नष्ट होऊन, पुनः दुसऱ्या युगाच्या आरंभीं त्या प्रलयांतून बचावलेले ऋषी त्यांचें स्मृतीच्या जोरावर पुनरुज्जीवन करितात. याप्रमाणें प्रत्येक मन्वंतरांतील वेद शब्दांनीं

---

* वेदांतपरिभाषा या ग्रंथातही परमेश्वरानें सृष्टिकालीं पूर्व युगांतील वेदांसारखेच सजातीय वेद निर्माण केल्याचें सांगितलें आहे—" सर्गाद्यकाले परमेश्वरः पूर्वसर्गसिद्धवेदानुपूर्वीसमानानुपूर्विकं वेदं विरचितवान् न तु तद्विजातीयं वेदम् । "

† ननु चोक्तं नहि च्छदांसि क्रियन्ते नित्यानि छंदासीति । यद्यप्यर्थो नित्यो या त्वसौ वर्णानुपूर्वी साऽनित्या । तद्भेदाच्चैतद्भवति काठकं, कालापकं, मौदकं, पैप्पलादिकमिति ॥

निराळा * असून त्यांत अर्थ मात्र एकच असतो, आणि निरनिराळ्या ऋषींनीं पुराकल्पांतील वेदांचें पुनरुज्जीवन केल्यामुळें त्याच्या अनेक शाखा होऊन त्या ऋषींच्या नांवानें प्रसिद्ध होतात. हें मत व्यासाच्या वर दिलेल्या मतांशीं बहुतांशीं जुळतें आहे. षड्दर्शनांवर ग्रंथ लिहिणाऱ्या यापुढील ग्रंथकारांनीं नाना तऱ्हेनें शब्दप्रामाण्याची बाजू उचलिली आहे. पण त्या सर्वांचा विचार करण्याचीं कांहीं गरज नाहीं; कारण त्यांच्या मुळाशीं पतंजली व व्यास यांचेंच मत आहे.

याप्रमाणें वेदांची उत्पत्ति, स्वरूप, व प्रामाण्य यांविषयींच्या आमचे ब्रह्मवादि, दर्शनकार व इतर पंडित यांच्या मतांचा सारांश आहे. त्यांत पतंजलि, व व्यास यांच्या मताला प्रस्तुत पुस्तकांत प्रतिपादन केलेल्या उपपत्तीवरून चांगलाच आधार मिळतो असें दिसून येईल. वैदिक धर्म व यज्ञपद्धति हिमान्तरकालीन आहेत, आणि जरी त्यांचें आदिमूल शोधून काढतां आलें नाहीं, तरी वैदिक देवतांच्या ध्रुवविशिष्ट लक्षणांवरून, निसर्गशक्तींना आदिआर्यांनीं जी देवतापदवी दिली ती ध्रुवाजवळील प्रदेशांत म्हणजे पुराणांतील मेरूवर रहात असतांना आधींच दिलेली होती हें मागें दाखविलेंच आहे. हिमपातामुळें या ध्रुवस्थानाचा नाश झाल्यावर त्यांतून बचावलेल्या आर्यांनीं शक्य तेवढी सुधारणा व धर्म बरोबर घेऊन तेथून गाशा गुंडाळला, आणि या प्रलयांतून तगून निघालेल्या धर्माच्या अवशेषावर हिमोत्तरकालांतील धर्माची रचना त्यांनीं केली. या उपपत्तीप्रमाणें हिमोत्तरकालापासून तों गौतमबुद्धापर्यंतच्या काळाचे जे भाग होतात ते असेः—

१००००—८००० (शकापूर्वी)—मूळ ध्रुवस्थानाचा हिमकालानें झालेला नाश आणि हिमोत्तरकालाचा आरंभ.

८०००—५००० (शकापूर्वी)—मूलस्थानांतून आर्यांचें प्रमाण. प्रलयांतून निभावलेले आर्य लोक या काळांत युरेशियाच्या उत्तर भागांत नवीन वसतिस्थानाच्या शोधार्थ भटकत होते. या काळांत वसंतसंपात पुनर्वसूत होता; पुनर्वसू नक्षत्राची देवता अदिति असल्यामुळें, वेदकाळ

---

*प्रतिमन्वंतरं चैषा श्रुतिरन्याऽभिधीयते ॥ नागोजी भट्टाची महाभाष्यावरील टीका.

निर्णयांत दिलेल्या संज्ञेअन्वयें या कालाला आदितिकाल ऊर्फ मृगशीर्ष पूर्वकाल हें नांव देऊं.

५०००—३००० (शकापूर्वी)—मृगशीर्षकाल—या काळांत वसंतसंपात मृग नक्षत्रांत होता. वरींच वैदिक सूक्तें या काळाच्या आरंभींचीं असून तेव्हां ध्रुवस्थानासंबंधी आख्यायिकांच्या खऱ्या अर्थाची स्मृति नष्ट झाली नव्हती. पंचांगाची सुधारणा करण्याचे व्यवस्थित प्रयत्न या कालांत होऊन यज्ञयागांतही विशेष शिस्त उत्पन्न झाली.

३०००—१४०० (शकापूर्वी)—कृत्तिकाकाळ—यांत वसंतसंपात कृत्तिका नक्षत्रांत होता. कृत्तिकांपासून नक्षत्रचक्राला आरंभ करणारे, तैत्तिरीय संहिता व ब्राह्मणें इत्यादि ग्रंथ या काळांत झाले. वैदिक सूक्तांची संहितात्मक रचना या काळाच्या आरंभीं झाली. मूळ ध्रुवस्थानाविषयींच्या आख्यायिका या सुमाराम अस्पष्ट होऊन वैदिक सूक्तांचा अर्थ या पुढें अधिकाधिक गूढ होत गेला. यज्ञपद्धतीला शास्त्रीय स्वरूप येऊन तिची याच काळांत वाढ झाली. या काळाच्या शेवटीं वेदांग ज्योतिष मूळ रचण्यांत आलें, निदान त्यांत सांगितलेली संपाताची स्थिति पाहून निश्चित करण्यांत आली.

१४००—५०० (शकापूर्वी)—बुद्धपूर्वकाल. या काळांत सूत्रग्रंथ व षड्दर्शनें यांचा अवतार झाला.

वेदकालनिर्णयांत सांगितलेल्या काळांहून सदर काळ जरा भिन्न आहेत, आणि आदितिकालाची पूर्व मर्यादा ध्रुवोपपत्तीमुळें चालू हिमोत्तरकालाच्या आरंभापर्यंत हटल्यामुळें हा भेद झालेला आहे. पुराणांच्या परिभाषेप्रमाणें प्रलयानंतरच्या युगाला (शकापूर्वी ८०००—५०००) कृतयुग ऊर्फ ऐतरेय ब्राह्मणांत म्हटल्याप्रमाणें भटकण्याचें युग हें नांव आहे. मूलभूमींतून हद्दपार झाल्यावर या काळांत आर्य लोक युरोशियाच्या उत्तर भागांत वसाहतीसाठीं नवीन जमिनी शोधीत हिंडत होते. कृतयुगाला हिंडण्याचें युग म्हणण्यांत ऐतरेय ब्राह्मणांचा हाच उद्देश असेल असें नाहीं. पण या ब्राह्मणांत सांगितलेल्या चारी युगांच्या लक्षणांचा[1] हा नवीन

---

१ कलिःशयानो भवति संजिहानस्तु द्वापरः । उत्तिष्ठँस्त्रेता भवति कृतं संपद्यते चरन् ॥ ऐ. ब्रा. ७, १५.

अर्थही मजेचा आहे. त्यांत, शयन करणारा तो कलि, थोडीबहुत हालचाल करणारा तो द्वापर, उभा राहिलेला त्रेता, आणि फिरूं लागलेला तो कृत, असें सांगितलें आहे. ध्रुवोपपत्तीवरून पाहिल्यास या वर्णनांत हिमोत्तरकालांत आर्यांना ज्या स्थितींतून जावें लागलें त्या स्थितीपासून ह्मणजे नवीन भूमि शोधण्याच्या स्थितीपासून तों कायम वसाहती करून ते स्थाईक होईपर्यंतच्या स्थिति सांगितल्या असाव्यात अशीही कल्पना करितां येईल. हा श्लोक सोडून दिला तरीही वर दिलेल्यांपैकीं पहिल्या काळांत आर्यांना हिंडावें लागत असून सुखकर भूमींत कायम वसाहत होईपर्यंत किती तरी ठिकाणें त्यानीं पाहून पुनः सोडलीं असतील असें सहज दिसून येईल. आर्यांचा धर्म, आणि यज्ञपद्धति हीं हिमान्तरकालीन असून वैदिक धर्म व विधि हे हिमकालांतून राहिलेल्या प्राचीन आर्यधर्माच्या अवशेषावर उभारलेल्या इमारती होत हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्यावरून आतां हीं अनुमानें व वेदांची उत्पत्ति, स्वरूप व प्रामाण्य यां विषयींचीं ब्रह्मवाद्यांचीं मतें यांची तुलना करणें सोईचें होईल. ऋग्वेदांतील प्रत्येक सूक्त केव्हां झालें हें आपल्याला सांगतां येणार नाहीं; तरी प्रलयकाल संपल्यावर राहिलेल्या मंडळींनीं अथवा त्यांच्या मुलांनीं आपल्या वाडवडिलांपासून मिळालेल्या पवित्र धर्मज्ञानाला, थोडेसे स्थिरस्थावर झाल्याबरोबर लगेच सूक्तांत गोवून टाकिलें असलें पाहिजे एवढें मात्र खास म्हणतां येईल. हिमोत्तरकालांत नवीन उत्पन्न झालेला धर्म या सूक्तांत सांगितला असेल अशी कल्पना करतां येत नाहीं; व वैदिक देवतांच्या ध्रुववशिष्ट लक्षणांवरून तर असल्या शंकेला जागाच रहात नाहीं. प्रलयपूर्वकालीन भाषा व या सूक्तांची भाषा यांत किती साम्य होतें हा प्रश्न निराळा असून, त्याशीं आपला प्रस्तुत कांहीं संबंध नाहीं; कारण पतंजली, व व्यास यांच्या मताप्रमाणें सूक्तांची भाषा कायम रहात नसून तात्पर्य मात्र कायम असतें. आपल्याला फक्त तात्पर्यच पहावयाचें आहे, आणि आपल्या प्रलयपूर्वकालांतील वाडवडिलांपासून प्राप्त झालेल्या धर्मज्ञानाचा तात्पर्यार्थ पुढच्या पिढ्यांसाठीं राखून ठेवून त्यांना पोंचविण्याचें पवित्र काम करण्याचें ज्यानीं अंगावर घेतलें त्या वैदिक ऋषींच्या विश्वासार्हतेबद्दल किंवा योग्यतेबद्दल शंका बाळगण्याचें कारण नाहीं. वैदिक ऋषींप्रमाणेंच आजही निदान तीन चार हजार वर्षेपर्यंत तरी आमच्या वैदिक ब्राह्मणांनीं

वेदांचें रक्षण केलेलें आहे. तेव्हां आज जी गोष्ट खरोखर आपण पहातों, तीच प्राचीन ऋषींनीं केलेली असल्यास त्यांत नवल तें काय? त्यांच्या-वेळीं तर ध्रुवस्थान व तेथील धर्म यांचें स्मरण जागृत होतें. हीं सूक्तें सार्वजनिक रीतीनें गाण्याचा परिपाठ असल्यामुळें, व सर्वांनाच आपले धर्मविधि कायम रहावे ही इच्छा असल्यामुळें ऋषींच्या सूक्तगायनाकडे सर्वांचें सूक्ष्म लक्ष असे. अशा रीतीनें कमावलेल्या स्मरणशक्तीच्या साहाय्यानें वैदिक ऋषीनीं आपल्या मूलस्थानांतील धर्माचें स्वरूप आख्यायिकांच्या रूपानें होतें तसें ठेविलें, आणि पुढें त्यांनां सूक्तांत स्थान मिळून कालान्तरानें त्यांची मंडळें व संहिता या रूपानें रचना झाली. ह्या सूक्तांचा तात्पर्यार्थ हिमान्तरकालीन असून त्यांचें आदि मूल तर प्राचीन भूस्तरीय काळांत गडप झालेलें आहे असें ठाम सांगावयास आतां कांहीं हरकत नाहीं. आतां ही दोन्हीं प्रकारचीं, म्हणजे ब्रह्मवाद्यांचें व ऐतिहासिक अशीं मतें समोरासमोर मांडूं:—

ब्रह्मवादिमत.	ऐतिहासिकमत.
१. वेद नित्य, अनादि आणि अपौरुषेय असे आहेत.	१. वेदान्तर्गत आर्यधर्म हिमान्तरकालीन आहे असें दाखवितां येतें; पण त्याचें आदिमूल मात्र प्राचीन भूस्तरीयकालांत गडप झालेलें आहे.
२. गत कल्पाच्या अखेरीस झालेल्या प्रलयांत वेद नष्ट झाले.	२. आर्यांचा धर्म आणि सुधारणा हीं त्यांच्या ध्रुवावरील स्थानांत बर्फाचा प्रलय झाला त्यांत नष्ट झालीं.
३. प्रस्तुत कल्पाच्या आरंभीं ऋषींनीं तपश्चर्या करून, ईश्वराच्या कृपेनें स्मरणांत राहिलेल्या वेदांचें, शब्दशः नसलें तरी तात्पर्यतः पुनरुज्जीवन केलें.	३. चालू हिमोत्तरकालांत ऋषींनीं, आपल्या प्रलयपूर्वकालीन वाडवडिलांपासून परंपरागत आलेल्या धर्मतात्पर्यावरून वैदिक सूक्तांची रचना केली.

या दोन्ही प्रकारच्या मतांची तुलना केल्यास असें दिसून येईल कीं, वर सांगितलेल्या महाभारतांतील श्लोकांत व्यासानें वेदांचा नाश त्यांचें व पुनरुज्जीवन यांविषयींची जी आख्यायिका दिली आहे ती ऐतिहासिक गोष्टीच्या

आधारावरच दिलेली आहे. पुराणांप्रमाणें पहातां, चालू कल्पाचा आरंभ किती तरी हजार वर्षांपूर्वी झालेला आहे हें खरें; पण आजही जरा कित्येक भूस्तरशास्त्रज्ञांच्या मतें गेल्या हिमकालाला ८०००० वर्षें होऊन गेलेलीं आहेत, तर पुराणांतील अंदाजाबद्दल आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. शिवाय नवीन कल्पापासून किंवा भूस्तरशास्त्राच्या भाषेंत बोलावयाचें झटल्यास चालू हिमोत्तरकालापासून सुरू झालेल्या महायुगाचा अवधि योग्य तऱ्हेनें पाहिल्यास १०००० वर्षांचा आहे असें दिसून येत आहे. या दोन्ही मतांत आणखी एक भेद आहे तो वेदांच्या अनादित्वासंबंधीं होय. वैदिक-धर्मकाल अनादि आहे असें ऐतिहासिक किंवा शास्त्रीय दृष्ट्या सिद्ध करतां यावयाचें नाहीं. एवढेंच म्हणतां येईल कीं त्यांचा आदि प्राचीन भूस्तरीय काळांत गडप झालेला आहे, किंवा हा धर्म, आर्यभाषा व आर्य-ज़ाति यांच्या इतकाच प्राचीन आहे. वेदांच्या अनादित्वाला शास्त्रीय दृष्ट्या मिळणाऱ्या एवढ्या आधारावर जर ब्रह्मवाद्यांचें समाधान होत नसेल तर ब्रह्मवादिमत व शास्त्रीयमत हीं नेहमींच भिन्न रहाणार, कारण त्यांच्या तत्वनिर्णयांचे मार्गच मुळीं भिन्न आहेत; म्हणूनच वर हीं मतें एकत्र न मिसळतां समोरासमोर मांडिलीं आहेत. शब्दा पासून सृष्ट्युत्पत्ति झाली कीं काय हा प्रश्न ऐतिहासिक विवेचनाच्या बाहेरचा आहे. तरी व्यावहारिकदृष्ट्या वेदांतर्गत धर्म अनादिच आहे असें म्हणावयास शास्त्रीय आधारांवरूनही हरकत दिसत नाहीं.

वैदिक सूक्तांचें सूक्ष्म निरीक्षण करणारास, वैदिक ऋषींनांही आपण गात असलेल्या सूक्तांचा मथितार्थ प्रलयपूर्वकालीन असून शब्द मात्र स्वतःचे आहेत असें वाटत असल्याचें दिसून येईल. सुतार रथ करतो त्याप्रमाणें सूक्तेंही ऋषींनीं केलीं आहेत असें सांगणारीं, व याच्या उलट तीं सूक्तें देवांनीं दिलेलीं, उत्पन्न केलेलीं किंवा त्यांच्या स्फूर्तीनें झालेलीं होत असें स्पष्ट सांगणारीं, अशा दोन्ही प्रकारचीं वैदिक वचनें पूर्वी दिलींच आहेत. त्यासंबंधानें निरनिराळ्या ऋषींचीं भिन्न मतें होतीं, किंवा ऋषींनां स्फूर्तीची स्पष्ट कल्पनाच नव्हती असें मानून या भिन्न मतांची एकवाक्यता करण्याचा कित्येकांनीं प्रयत्न केला आहे. पण ही एकवाक्यता अगदींच दुर्बल आहे. त्यांची एकवाक्यता करण्याचा अधिक चांगला मार्ग झटला म्हणजे वेदांची भाषा किंवा शब्द व तात्पर्य किंवा अर्थ

यांत भेद करून भाषेला किंवा शब्दांना मनुष्यकृत समजणें व तात्पर्यार्थाला प्राचीन किंवा अपौरुषेय समजणें हा होय. ऋग्वेदांत ' प्राचीन ऋषि ' (पूर्वे ऋषयः) किंवा प्राचीन सूक्तें याविषयीं अनेक उल्लेख आले आहेत (१,१,२;६,४४,१३;७,२९,४;८,४०,१२;१०,१४,१५ इ०). हे पूर्व ऋषि ह्मणजे वैदिक ऋषींचे हिमोत्तरकालांतीलच पूर्वज होत असें पाश्चात्य पंडितांचें मत आहे. पण हें मत खोडून काढण्यासारखा स्पष्ट पुरावा या सूक्तांतच आहे. कित्येक ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं ' हें सूक्त जरी नवें आहे (नव्यसी), तरी त्याची देवता प्राचीनच (प्रत्न) आहे (६,२२,७;६२,४;१०,९१,१३ इ०). सूक्तांत वर्णन करीत असलेल्या देवतांचे पराक्रमही प्राचीन आहेत असेंही कित्येक ठिकाणीं ह्मटलें आहे. पहिल्या मंडळांतील ३२ व्या सूक्ताला ' इंद्रानें पूर्वी केलेले पराक्रम (प्रथमानि) सांगतों असें ह्मणून सुरुवात केली आहे; तसेंच १,११,३ व, १,६१,१३ यांत इंद्राच्या पराक्रमानां ' पूर्वी व पूर्व्याणि ' अशीं विशेषणें दिलीं आहेत. अश्विनांच्या ही पराक्रमांनां ' पूर्व्याणि ' हें विशेषण १,११७,२५ यांत लाविलें आहे; या सूक्तांत दिलेली अश्विनांच्या पराक्रमांची लांबच लांब याद पाहिली म्हणजे हे पराक्रम ऋषींनें स्वतः पाहिलेले नसून, परंपरेनें ठाऊक असलेल्यांचाच सारांश तो देत आहे असें स्पष्ट दिसतें. अंगिरस् किंवा वसिष्ठ यां सारख्या ऋषींना अतींद्रिय शक्ति होती (७,३३,७–१३) किंवा ते देवांजवळ संभाषण करीत (१,१७९,२) अथवा देवांच्या भोगांचे वाटेकरी होत (देवानां सधमादः, ७,७६,४) असें जें ह्मटलें आहे त्यावरूनही हीच गोष्ट सिद्ध होते. या ऋषींनां पुढील पिढ्यांचे आद्यमार्गदर्शक (पूर्वेभ्यः पथिकृद्भ्यः) असेंही ह्मटलें आहे (१०, १४, १५). असें अमानुष सामर्थ्य आपल्या अगदीं जवळच्या पूर्वजांना होतें असें वैदिक ऋषींनीं ह्मटलें असेल अशी कल्पना करवत नाहीं. ह्मणून हे पूर्वज प्रलयपूर्वकालीनच होत (नः पूर्वे पितरः) असें आम्हांला वाटतें. हीच गोष्ट प्राचीन देवतांनांही लागू आहे. अदिति व तिचे सात पुत्र यांची गोष्ट गत युगांतील (पूर्व्ये युगम्) आहे असें स्पष्टच सांगितलेलें आहे. तात्पर्य ऋग्वेदांत सांगितलेलीं प्राचीन सूक्तें, ऋषी, किंवा देवता हीं हिमोत्तरकालीन नसून पूर्व युगांतीलच होत, असें मानिल्यानेंच या देवतांच्या

ध्रुवविशिष्ट लक्षणांचा उलगडा होणार आहे. वैदिक ऋषींनी नवीन सूक्तें रचिलीं असतील, पण एवढें झटल्यानें ह्या सूक्तांचा विषयही नवीन होता कीं काय हें ठरत नाहीं. पण सूक्तें नवीन असून त्यांत वर्णिलेल्या देवता प्राचीन आहेत असें जें म्हटलें आहे (६,६२,४) त्यावरून या प्रश्नाचा उलगडा करतां येतो; म्हणजे या सूक्तांतील शब्द नवे असून आंतील मतलब मात्र प्राचीन काळापासून परंपरेनें आलेला होता. १०,७२,१–२ यांत " स्तुतीच्या आवडीमुळें गाइलेल्या सूक्तांच्या रूपानें देवांच्या जन्माचें वर्णन करूंया.—उत्तर युगामध्यें ज्याला तीं दिसतील त्या कोणीही (तसें करावें)" असें म्हटलें आहे त्यांत देवांचे जन्म व त्यांना उत्तर युगांत पहाणारा यांच्यांत जो भेद केला आहे, त्यावरून सूक्ताचा विषय पूर्व युगांतील असून, ऋषी त्याचें उत्तर युगांत वर्णन करीत आहे हें उघड दिसतें. ८,५९,६[२] यांत " हे इंद्रावरुणौ, तुह्मीं पूर्व कालीं ऋषींना जें ज्ञान, जी अर्थशक्ति, जी विद्या, आणि ऋषींनीं यज्ञ करून निर्माण केलेलीं जीं स्थानें दिलीं तीं सर्व मीं तपाच्या योगेंकरून पाहिलीं आहेत." असें म्हटलें आहे. हा मजकूर वर दिलेल्या व्यासाच्या श्लोकांतील मजकुरासारखाच आहे. असलीं स्पष्ट वचनें पुढें असतांना सूक्तांच्या मानवी आणि दैवी उत्पत्ती-विषयींच्या परस्परविरोधी वचनांची एकवाक्यता करण्याचा एकच मार्ग झटला म्हणजे त्यांची **शब्दरचना** मानवी असून विषय अनादि आहे असें पतंजलीनें सुचविल्याप्रमाणें मानणें हा होय. ८,९५,४–५ यांत ऋषीनें इंद्रासाठीं अगदीं **नवीन** असें उत्तेजन देणारें सूक्त रचिलें; हें सूक्त सत्यपूर्ण अशा कुशाग्र मनांतून, **प्राचीन** बुद्धीचें फळ म्हणून उत्पन्न झालें " असें म्हटलें* आहे. यांत एकाच सूक्ताला नवीन व प्राचीन

---

१ देवानां नु वयं जाना प्रवोचाम विपन्यया । उक्थेषु शस्यमानेषु यः पश्यादुत्तरे युगे ॥ ऋ. १०,७२,१.

२ इंद्रावरुणा यदृषिभ्यो मनीषां वाचो मतिं श्रुतमदत्तमग्रे । यानि स्थानान्य-सृजंत धीरा यज्ञं तन्वानास्तपसाभ्यपश्यम् ॥ ऋ. ८,५९,६.

* इंद्र यस्ते नवीयसीं गिरं मंद्रामजीजनत् । चिकित्विन्मनसं धियं प्रत्नामृतस्य पिप्युषीं ॥ ऋ. ८,९५,५.

म्हटलें आहे; व शब्द (गिरम्) आणि बुद्धि (धियम्) यांचा विरोध दाखवून प्राचीन बुद्धीला (धियं प्रत्नाम्) नवीन शब्दांनीं सज्जविल्याचें स्पष्ट सांगितलें आहे. ब्राह्मण ग्रंथांत विषयांचीं जीं सदरें केलेलीं आहेत त्यांत **पुराकल्प** म्हणजे 'गत युगांतील प्रघात' असें एक सदर आहे; अर्थात् या ब्राह्मणांतही प्रलयपूर्वकालीन आख्यायिका आलेल्या आहेत असें आमच्या ब्रह्मवाद्यांचें मत असलेलें दिसतें. "उषा संपून सूर्योदय होतो कीं नाहीं अशी ब्राह्मणांना पूर्वीं भीति वाटत असे" हें तैत्तिरीय ब्राह्मणांतील वचन सायणाचार्यांनीं पुराकल्पाचें उदाहरण म्हणून दिलें आहे; आणि त्याचा संबंध ध्रुवावर दिसणाऱ्या दीर्घ उषेशींच असल्याचें आम्हीं पूर्वी दाखविलें आहे. ब्राह्मणांत जर पूर्व युगांतील आख्यायिका सांगितल्या आहेत तर वेदांत त्या असल्या पाहिजेत हें उघडच झालें. याप्रमाणें कोणत्याही दृष्टीनें या प्रश्नाचा विचार केला तरी अंतर्बाह्य प्रमाणांवरून एकच अनुमान निघतें, तें असें कीं वैदिक सूक्तांचा मथितार्थ प्राचीन म्हणजे हिमान्तरकालीन असून हिमोत्तरकालांत ऋषींनीं तो सूक्तांत ग्रथित केला.

वैदिक अर्थमीमांसेंतील व वैदिक आणि पौराणिक कथांतील आंणखीही कित्येक बाबींचा हिमान्तरकालांतील ध्रुवस्थानाच्या कल्पनेवर सयुक्तिक उलगडा होणारा आहे. उदाहरणार्थ, पाश्चात्य पंडितांना जेव्हां प्रथम वेदांची माहिती झाली, तेव्हां त्यांना वाटलें कीं आपल्याला आर्य सुधारणेचें मूळच, किंवा सृष्टचमत्कारांच्या व निसर्ग व्यापारांच्या प्रथम दर्शनानें चकित झालेल्या आदि-आर्याच्या मनांतील पहिल्या तरंगांचा सांठाच जणूं काय सांपडला; पण थोड्याच काळांत त्यांची निराशा झाली. ती कां हें आतां आपल्याला सांगतां येईल. आमच्या उपपत्तीवरून असें दिसून येईल कीं वेद हे जरी आर्यांचे अत्यंत प्राचीन ग्रंथ आहेत, तरी न्यांत दिसणारी सुधारणा व देवतोपासना ह्या वैदिक ऋषींच्या कृती नसून त्या त्यांना त्यांच्या हिमान्तरकालीन पूर्वजांपासून मिळालेल्या होत्या; म्हणून जर कोणाला आर्यसुधारणेचें मूळ शोधून काढावयाचें असेल, तर त्याला गेल्या हिमकालाच्या पलीकडे जाऊन आर्यलोक आपल्या ध्रुवाजवळील मूलस्थानांत कोणत्या स्थितींत रहात होतें हें पाहिलें पाहिजे. आर्यांची ही आद्य सुधारणा किती उच्च होती हें ठरविण्याचें साधन सांप्रत

आपल्याजवळ नाहीं; तरी पण हिमान्तरकालीन आर्यसुधारणा साधारणतः मानितात त्यापेक्षां बऱ्याच वरच्या दर्ज्याची असावी असें मानावयास आधार आहे हें आम्हीं दाखविलेंच आहे. म्हणून आदिआर्यांना सुधारणेच्या दृष्टीनें इतिहासपूर्वकालीन ईजिप्टच्या लोकांच्या पदवीस नेऊन ठेवावयास कोणतीच हरकत नाहीं. नवीन जमिनीच्या शोधार्थ ध्रुवावरून दक्षिणेकडे येतांना वाटेंत ज्या अनार्य लोकांशीं त्यांची गांठ पडली त्यांचा नायनाट करून किंवा त्यांचा आपला एकजीव करून त्यांनीं त्यांच्यावर जें वर्चस्व स्थापन केलें तें त्यांची मूल सुधारणा उच्च प्रतीची असल्याशिवाय केलें असें म्हणतां येत नाहीं. ध्रुवोपपत्ति सर्वमान्य होऊन तिच्या साहाय्यानें वेदांचें जेव्हां आणखी आलोडन होईल, तेव्हां सध्या अज्ञात असलेल्या आणखीही कित्येक गोष्टी कळून येऊन आमच्या मताला पुष्टि मिळेल. सांप्रत ध्रुवप्रदेशांत जे शोध चालले आहेत त्यांवरूही पुढें मागें आर्य सुधारणेचें मूळ शोधण्याच्या कामास मदत होईल. पण आर्यांचें मूलस्थान ध्रुवाजवळ होतें ही कल्पना जेव्हां शास्त्रीय गोष्ट या नात्यानें सर्वमान्यता पावेल त्यावेळीं पुढच्या शोधकांनीं करावयाचें हें काम आहे. हिमान्तरकालांत आर्य लोक ध्रुवाजवळ रहात होते असें वेद व अवेस्ता यांतील प्रमाणांवरून दाखविणें एवढाच आमचा उद्देश होता; आणि प्रस्तुत पुस्तकांत दिलेलीं प्रमाणें व कोटिक्रम हीं जर वाचकांनीं नीट समजून घेतलीं असतील, तर आमची उपपत्ति वेद व अवेस्ता यांतील स्पष्ट वचनांवरच उभारली असून तिला, भूस्तरशास्त्र, पुराणवस्तुशास्त्र, प्राचीनभाषाशास्त्र, तुलनात्मक गाथाशास्त्र आणि ज्योतिःशास्त्र या शास्त्रांतील अगदीं नवीन शोधांवरूनही स्वतंत्र रीतीनें पुष्टि मिळते, असें त्यांस दिसून येईल. खरें सांगावयाचें तर (लो. टिळक म्हणतात) ध्रुवस्थानाविषयींचीं प्रमाणें वेदांतून शोधून काढण्याची कल्पना मूळ शास्त्रीय शोधांवरून जरी सुचली नसली, तरी तिला त्यांवरूनच उत्तेजन मिळालें, आणि तिला व्यक्त स्वरूप देण्यांत ज्या शास्त्रीय पद्धतीचा स्वीकार केला आहे ती जितकी कडक पाहिजे होती तितकी ठेवलेली आहे. आमच्या निरुक्तकारांनीं वैदिक वाक्यार्थमीमांसेचा पाया घातल्याला आज शेंकडों वर्षें होऊन गेलीं, तरा इतक्याही काळांत ध्रुवस्थानाचा मागमूस वेदांत त्यांस दिसला नाहीं,

हें आश्चर्य तर खरेंच; पण अशाप्रकारच्या संशोधनाच्या कामांत केवळ आश्चर्य मानून स्वस्थ न बसतां, वाढत्या ज्ञानाच्या स्थितींत तर्कशास्त्राचे कडक नियम व शास्त्रीय विवेचनपद्धति यांच्या साहाय्यानें जीं अनुमानें निघतील तीं मान्य करावयास प्रत्येकानें तयार असलें पाहिजे. आमच्या उपपत्तीच्या सिध्यर्थ आह्मीं याच कडक नियमांवर भिस्त ठेविली आहे; आणि आमच्या अनुमानांच्या सत्यतेची परीक्षा जर या नियमांवरून केली, तर, आजपर्यंत निरर्थक म्हणून टाकून दिलेल्या, किंवा मुळींच न समजलेल्या अशा अनेक वैदिक वचनांचा व कथांचा अर्थ लावण्याची खरी किल्ली शोधून काढण्यांत आह्मांला यश आलें आहे असें समजून येईल. वाढत्या ज्ञानाच्या आजच्या काळांत आदि मनुष्याच्या सुधारणेच्या प्रश्नाचा अनेक दृष्टीनीं विचार चालला असतां एकट्या वेदार्थमीमांसेला अलग रहातां येणें किंवा केवळ भाषाशास्त्र व व्याकरण यांवरच सर्वस्वीं भिस्त ठेवणें शक्य नाहीं, आणि चालू युगाच्या आरंभापासून मोठ्या कळकळीनें ज्या वेदांचें आमच्या पूर्वजांनीं रक्षण केलें व ज्यांना आम्हीं मनःपूर्वक अत्यंत पूज्य मानतों त्या आमच्या आर्यांच्या आद्य ग्रंथांतील कथा व अगदीं नवीन शास्त्रीय शोध यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यांत आम्हीही या काळाच्या धोरणाचेंच अनुकरण केलें आहे.

समाप्त.

या पुस्तकांत आलेल्या कित्येक शास्त्रीय शब्दांचें स्पष्टीकरण.

अक्षांश—भूमध्य किंवा विषुव वृत्तापासून दक्षिणेकडील किंवा उत्तरेकडील अंशात्मक अंतर.

अचैतन्ययुग—भूस्तरशास्त्रांत ज्या अतिप्राचीनकाळीं पृथ्वीच्या कवचावर कोणत्याही प्रकारचे वनस्पति किंवा प्राणी उत्पन्न झाले नव्हते तो काळ.

अनेकमूलवादी—एकाच आदि जोडप्यापासून सर्व मनुष्य जाति उत्पन्न झाल्या असें न मानतां निरनिराळ्या मनुष्य जातींचीं निरनिराळीं मूळें होतीं असें म्हणणारे लोक.

अयन—सूर्याच्या उत्तर व दक्षिण गतीमुळें झालेले वर्षाचे दोन भाग.

अयनचलन—(संपातचलन पहा.)

अयनबिंदु—सूर्याचीं दक्षिणेकडे किंवा उत्तरेकडे जाण्याचीं परमावधीचीं स्थानें.

अयनवृत्तें—विषुववृत्ताशीं समांतर अशीं अयनबिंदूंतून जाणारीं कल्पित वृत्तें.

अरीभवन—चाकाच्या अरांप्रमाणें पदार्थाच्या पृष्ठभागापासून उष्णता किंवा प्रकाश यांचे किरण बाहेर जाण्याची क्रिया.

अरुणप्रकाश—सूर्य उगवण्यापूर्वी दिशा फांकल्यापासून जो प्रकाश दिसतो तो—उषःप्रकाश यालाच म्हणतात.

अस्थिरमानें—ज्योतिषांत ग्रहादिकांचीं सूर्यापासून अंतरें, त्यांचे प्रदक्षिणाकाल, त्यांचे आपल्या आंसाभोंवतीं फिरण्याचे काल इत्यादिकांना मानें म्हणतात. त्यांत परम किंवा लघुतम अंतरां सारखीं जीं कमी जास्त होतात त्यांस अस्थिरमानें म्हणतात.

अस्थिशेष—प्राचीन काळच्या प्राण्यांचे भूपृष्ठांतील निरनिराळ्या थरांत सांपडणारे दगडासारखे झालेले अवशेष. त्यांना चैतन्या-

वशिष्टें असें व्यापक नांव रा. सा. नाना पावगी यांनीं दिलें आहे.

उच्च—ग्रहाच्या कक्षेंतील सूर्यापासून अतिदूरचा बिंदु.

उत्तरक्रान्ति—(क्रान्ति शब्द पहा.)

उत्तरयूरोपवादी—आर्यांचें मूलस्थान यूरोपच्या उत्तरभागांत नार्वे किंवा स्वीडनमध्यें होतें असें ह्मणणारे लोक.

उत्तरवृत्त—उत्तर ध्रुवापासून २३ अंश २८ कलांच्या अंतरावरून जाणारें विषुववृत्ताशीं समांतर असलेलें वृत्त.

उत्तरायण—(दक्षिणायनें पहा).

उत्तरारुण—ध्रुवापासून कांहीं अंशांपर्यंतच्या प्रदेशांत दिसणारा एक-प्रकारचा विद्युत्प्रकाश. यास इंग्रजींत 'अरोरा बोरिआलिस' असें नांव आहे.

एकमूलवादी—सर्व मनुष्यजातींचें मूळ एक जोडपें होतें असें ह्मणणारे लोक.

कक्षा—ग्रहाचा सूर्याभोंवती फिरण्याचा मार्ग.

कदंब—क्रांतिवृत्ताच्या आंसाचीं टोकें किंवा ध्रुव.

कटिबंध—हवामानाप्रमाणें भूमध्यवृत्तापासून ध्रुवापर्यंत जे पृथ्वीचे भाग पडतात ते. दोन्ही अयनवृत्तांच्या मधल्या सुमारें ४७ अंशांच्या पट्याला उष्ण कटिबंध, अयनवृत्तें व दक्षिण आणि उत्तर वृत्तें यांच्यामधील सुमारें ४३ अंशाच्या प्रत्येक गोलार्धांतील पट्याला समशीतोष्ण कटिबंध, आणि ध्रुवा-पासून सुमारें २३॥ अंशापर्यंयच्या प्रत्येक पट्याला शीत कटिबंध अशीं नांवें आहेत.

कांस्ययुग—पाषाणयुग पहा.

केन्द्र—दीर्घ वर्तुळाच्या मोठ्या व्यासावरील दोन विशिष्ट बिंदु.

केन्द्रच्युति—दीर्घ वर्तुळाच्या दोन व्यासांचें प्रमाण, किंवा त्याच्या दोन केन्द्रांमधील अंतर. (विशेष विवेचन व व्याख्या प्रकरण १ लें पान ३५ पहा).

क्रांति—खविषुवापासून ग्रहाचें किंवा तारेचें दक्षिणेकडील किंवा उत्तरेकडील अंतर.

क्रांतिवृत—पृथ्वीचा सूर्याभोंवतीं फिरण्याचा मार्ग. अर्थात् दिसण्यांत सूर्याचा पृथ्वीभोंवतीं फिरण्याचा मार्ग.

खस्वस्तिक—पहाणाराच्या बरोबर डोक्यावरील आकाशांतील बिन्दु.

खविषुव—आकाशाचें विषुववृत्त.

जीवशून्यकाल—अचैतन्ययुग पहा.

त्रिविष्टपकाल—तिबेटांत आढळून येणारे रक्तवालुकेचे थर जेव्हां बनले तो काळ. याचप्रमाणें भूस्तरशास्त्रांतील इतर कालांसंबंधानें समजावें.

ध्रुवोपपत्ति—आर्यांचें मूलस्थान ध्रुवाजवळ होतें अशी कल्पना.

दक्षिणायन—सूर्याचा दक्षिण मार्ग. याचे प्राचीन व अर्वाचीन असे दोन अर्थ आहेत. प्राचीन अर्थ, सूर्य शरत्संपातीं येऊन दक्षिणगोलार्धांत उतरल्यावर पुनः तो वसंतसंपातीं येईपर्यंतचा काळ. अर्वाचीन अर्थ, कर्क संक्रांतिपासून मकर संक्रातीपर्यंतचा काळ. याचप्रमाणें उत्तरायणाविषयीं समजावें.

दीर्घशीर्ष—डोक्याच्याच्या कपालाची रुंदी लांबीच्या तीन चतुर्थांश किंवा कमी असलेले लोक.

नवपाषाणयुग—पाषाणयुगाचें उत्तरार्ध.

नीच—ग्रहाच्या कक्षेंतील सूर्याच्या अति जवळचा बिन्दु.

परावर्तन—प्रकाशाच्या किरणांचा एखाद्या पदार्थाच्या पृष्ठभागावर पडून मागें वळण्याचा धर्म.

मंदकर्ण—ग्रहमालेचा मध्य जो सूर्य त्यापासून ग्रहाचें अंतर.

मध्यआशियावादी—आर्यांचें मूलस्थान मध्य आशियांत होतें असें म्हणणारे लोक.

मझ्दयस्नी—पारशी, मझ्दाचे भक्त.

मानववंशशास्त्र—हा शब्द मानुष्यकशास्त्राबद्दल कांहीं ठिकाणीं आला आहे. उपोद्घात पहा.

पाषाणयुग—पुराणवस्तुशास्त्रांतील ज्या काळांत माणसें दगडाचीं किंवा हाडांचीं हत्यारें वापरीत होतीं तो काळ. याचप्रमाणें ताम्रयुग, कांस्ययुग, लोहयुग, इत्यादिकांविषयीं समजावें.

पूर्वपाषाणयुग—पाषाणयुगाचें पूर्वार्ध.

युरेशिया—यूरोप आणि आशिया हीं दोन्ही खंडें मिळून झालेला भूप्रदेश.

लोहयुग—पाषाणयुग पहा.

वक्रीभवन—प्रकाश किरणांचा एक धर्म. एका द्रव्यांतून दुसऱ्या कमी किंवा अधिक विरल अथवा घन द्रव्यांत जातांना किरणांची दिशा बदलून ते त्या द्रव्याच्या घनत्वाच्या किंवा विरलतेच्या मानानें कमजास्त तिरपे जाऊं लागतात. या तिरपे होण्याला वक्रीभवन ही संज्ञा आहे.

संपात—आकाशाचें विषुववृत्त आणि पृथ्वीची कक्षा हीं दोन तिरपीं असल्यामुळें तीं एकमेकांस दोन ठिकाणीं छेदितात. या छेदनबिंदूस संपात किंवा क्रांतिपात म्हणतात. या बिंदूपैकीं ज्या जवळ सूर्य आला असतां वसंत ऋतु सुरू होतो तो वसंत संपात आणि दुसरा शरत्संपात हे बिंदु चल असून दर वर्षास थोडे थोडे मागें येतात. या गतीला संपातचलन म्हणतात. संपातावरोबर अर्थात् अयनबिन्दूही मागें येत असल्यामुळें त्याला अयनचलनही म्हणतात.

हिंदी-इराणी—हिंदी व इराणी लोक एकत्र होते तो काळ.

हिंदी-जर्मन—हिंदी व जर्मन लोक ,, ,,

हिंदी-यूरोपीय—हिंदी व युरोपीय लोक ,, ,,

हिमकाल
हिमांतरकाल
हिमोत्तरकाल
हिमपूर्वकाल
} उपोद्घात, भूस्तरशास्त्र पान ४ पहा.

ह्रस्वशीर्ष—कपालाची रुंदी लांबीच्या शेंकडा ८३ हून जास्त. असलेले लोक.

सूचि.

अ.

अग्गिलॉस–अंगिरसांचे ग्रीक प्रतिनिधी १३४.

अग्नि–वैदिक प्रातःकालिक देवता, ७४; दीर्घ तमांत रहाणारा, ११०; त्याचें जलांत व तमांत गुप्त असलेलें स्थान, २४२; अपां नपात् ऊर्फ जलांचा पुत्र, २३१, २४२; त्यांचें तिसरें गुप्त स्थान, २४२; त्याचे सात रश्मि किंवा जिव्हा, २४८; त्याचीं दहा गुप्त स्थानें, २४८.

अग्निष्टोम–एक सोमयाग, १६३.

अंगिरस्–आर्य जातीचे आदिऋत्विज् १३४; त्यांचे अनेक प्रकार, नवग्व आणि दशग्व १३५; दशग्वांचें दहा महिन्याचें सत्र, १३६; वर्षाच्या शेवटीं गाई सोडविण्यांत इंद्राला मदत करितात, १३७; त्यांना सूर्य तमांत असलेला दिसला, १३६; त्याचें विरूपत्व म्हणजे अनेक प्रकार, १३९.

अंगिरसां अयनम्–एक संवत्सर सत्र १३५, १५७.

अंग्र मैन्यु–अवेस्त्यांतील दुष्ट दैत्य, ऐर्यन वइजोंत भयंकर हिमकाल उत्पन्न करून त्याचा नाश करितो, २५६ इ०; ध्रुवप्रदेशांत झालेल्या हिमपाताचा दर्शक, २६६ इ०.

अतिरात्र–एक सोमयाग १६३; सत्राच्या आरंभीं व शेवटीं येतो, १६४; १७५; रात्रिसत्रांत मोडतो, १६७; त्यांत सोमरस रात्रीं काढितात, १६७, १६८; अवेस्त्यांतील साम्य, १६८; त्यांतील **अति** शब्दाचा अर्थ, १७५; त्यापासून अहोरात्रांचे पर्याय सुरू होतात, १७५; प्राचीन वार्षिक यज्ञपर्यायांतील त्याचें स्थान १७६.

अत्रि–प्राचीन ऋषि २२०.

अत्रि सप्तवध्रि–अश्विनौ आणि सप्तवध्रि पहा, २२६.

अत्यग्निष्टोम–एक सोमयाग, १६३.

अथर्वण–प्राचीन ऋत्विज् १३४.

अदिति–सात पुत्रांची कथा, १२९; पूर्वीच्या युगांत झाला, १३२.

अद्रि–पर्वत, १९१, ऋग्वेदांतील अर्थ, १९३.

अध्यात्मिक–यांची वेदांचा अर्थ करण्याची पद्धति, १८६.

अनाग्झिमिनिस–एक ग्रीक ग्रंथकार, आकाशाचें डोक्यावर टोपीसारखें फिरणें, ७६.

अपॉलॉन–च्या गाई हर्मिस्‌नें चोरिल्या, १६२; संस्कृत 'अपवर्यन्' शब्दावरून निघाला.

अपौश–ऋग्वेदांतील शुष्णासारखा अवेस्त्यांतील एक दैत्य, १७२; तिष्ट्र्यानें वधिला, १७३;–शीं शंभर रात्रीं युद्ध, १७३.

अप्तूर्य–इंद्राचें पाण्यासाठीं युद्ध, १९०.

अप्तोर्याम–एक सोमयाग, १६३.

अप्सुजित्–इन्द्राचें विशेषण, १९०.

अभिप्लव-एक प्रकारचा षळह १६३.

अरोरा बोरियालिस–उत्तरेकडील विद्युत्प्रकाश, ५०, ७१.

अर्द्विसूर अनाहित–अवेस्त्यांतील दिव्य नदी, वैदिक सरस्वति, २००; थाएतौनाला तिनें वर दिला, २०१.

अर्धौ–ऋग्वेदांतील खगोलार्धं १९८.

अल्बुर्झ–अवेस्त्यांतील पर्वत, खालच्या वरच्या लोकांची सीमा २०२; त्यांतील छिद्रें २०२.

अवेस्ता–पारशी धर्मग्रंथ, अनेक ठिकाणीं याचा उल्लेख आला आहे; ७३, १६८, १७२, २००, २११, २४२; प्रकरण ११ पहा.

अश्व–सूर्याचे, सात किंवा दहा, १२५, २४७.

अश्विनौ-प्रातःकालिक देवता, त्यांचा मार्ग ७३; त्यांचें शस्त्र ह्मणण्याचा काल, ७९; दीर्घतम्याचा उद्धार करतात, १४१; देवांचे वैद्य, १९०१, २१८, २२०; वृत्राशीं लढण्यांत इंद्राला मदत करितात, २२०; त्यांचे पराक्रम व स्वरूप, २००, २०१; अगाध तमांतून आश्रितांचें रक्षण करितात, २२३; याचा वसंतोपपत्तीनें उलगडा होत नाहीं, २२३; मातेच्या गर्भांत दहा महिने राहिलेल्या सप्तवध्रीला सुखरूप बाहेर आणितात; २२६ २२७; त्यांचीं तीन स्थानें, २४२; त्यांचे पराक्रम, पूर्वीच्या युगांतील ह्मणजे हिमान्तरकालांतील होत. ३१२.

अहनी–दिवस रात्र, उषासानक्ताहून भिन्न, ११४, ११७; संवत्सर देवतेच्या डाव्या उजव्या बाजू, ११८.

अहल्या–ची कथा, १८७, २५०.

अहीन–तेरा दिवसांहून कमी अवधीचा सोमयाग, १६२.

अहुरमज्द-अवेस्त्यांतील मुख्य देव, यमाशीं त्याचा संवाद ७२; पुढें येणाऱ्या प्रलयाची सूचना यिमास देतो, ७२, २६५.

अहोरात्र, वैदिक जोड देवता, ११४; दोन प्रकार, ११६; पृथ्वीवरील निरनिराळ्या ठिकाणचीं स्वरूपें, ११७.

आ.

आजानदेवता–१८६.

आदित्य—सात, १२९; आठवा मार्तांड मिळून ध्रुवप्रदेशांतील वर्षाच्या सूर्यप्रकाशयुक्त व तमोयुक्त भागांचे दर्शक १३२.

आदित्यानां अयनम्–संवत्सरसत्र १६४.

आपः–जलें–ऋग्वेदांतिल भेद, पृथ्वीवरील व आकाशांतील १९५; दिव्यजलांवर सूर्य दहा महिने स्वार होतो, १४१; वरुणानें अधिष्ठित आहेत, १४६; वृत्रानें निरुद्ध केलीं आणि इंद्रानें सोडविल्यावर वर वाहूं लागलीं, दिव्यच होत, प्रकरण ९; सप्तसिन्धवः दिव्यच, २१२; दिव्यजलाचें आकाशांतील परिभ्रमण, त्याचें अवेस्त्यांतील वर्णन, २०३; त्यांचा प्रवाह हिंवाळ्यांत बंद होतो, २०३; इतर पुराणांतील त्यांच्या भ्रमणाचें वर्णन, २०५; देवता या रूपानें त्यांच्या लक्षणांचा सारांश, २४५; पौराणिक कथांशीं तुलना, २४६.

आप्त्य–वैदिक देवता, त्रित पहा, २४२.

आयुः–एक सोमयाग, १६३.

आर्य–लोक (सर्व) पूर्वीं एकच होते, ९; त्यांच्या मूलपुरुषांविषयीं निरनिराळीं मतें, २१, २२; वैदिक आर्य मृगशीर्षकाळांत मध्यएशियांत येऊन राहिले २८७ आदिआर्य हिमान्तरकालीन होत, हिमोत्तरकालीन नव्हत, २९६; यूरोपांतील नवपाषाणयुगांतील आर्य प्रागतिक नव्हते, परागतिक रानटी होते, ३०२; चें मूळ आणि त्यांचा इतर आर्यजातींपासून झालेला भेद हीं प्राचीन भूस्तर युगांत गुरफटलेलीं आहेत, ३०३.

आर्यां–चें आदिस्थान मध्य आशियांत होतें असें ह्मणतां येत नाहीं; २२, २३; जर्मनीच्या उत्तर भागांत किंवा स्वीडन नार्वेतही ते नव्हतें, २७९.

आर्यां–च्या स्थानाचा हिमकालांत नाश झाला, २८५; हिमोत्तरकालच्या आरंभीं तेथून ते निघाले, २९३.

आर्यां–ची प्राचीन सुधारणा, व धर्म, प्रकरण १३–ध्रुवाजवळील मूलस्थानांतिल, २९७–३०२; नव-

पाषाणयुगीन युरोपीय सुधारणेहून उच्च दर्जाची होती, ३००; च्या भाषांचें एकत्व, ९; त्या फिनिक भाषेपासून निघालेल्या नव्हत, २३; त्यांचें मूळ प्राचीन भूस्तर युगांत गुरफटलेलें आहे, ३०३.

आर्य—इंद्र, दासाचा प्रतिकार करणारा, १२०, १२१.

आर्यभट्ट—प्राचीन हिंदु ज्योतिषग्रंथकार, २१०.

आल्प्स—प्राचीन भूस्तर युगांत सखल होता २७.

आश्विनशस्त्र—प्रातःकालिक देवतांच्या शर्यतींतील बक्षिस ७९, २१९.

इ.

इतिहासकाल, ८; ग्रीक आणि ईजिप्त या देशांतील. ८.

इंद्र—महत्वाची वैदिक देवता, आकाशाला फिरवितो ६८; उषेचा रथ भग्न करितो ९४; शत्रूशीं तमांत युद्ध करितो १०९; दिवस दीर्घ करून दासाचा प्रतिकार करितो, ११९; नवग्वांचें आणि दशग्वांचें साहाय्य १३६; संवत्सराच्या शेवटीं वलांशीं युद्ध करितो १३७; अतिरात्राचा स्वामी, १६७; शंभर यज्ञांचा स्वामी, १७०; वृत्राला मारून जलें, सूर्य आणि उषा यांना वर आणितो, १९२; वृत्रहन् २१५, २१६; त्याला शंबर शरद्दतूच्या चाळिसाव्या दिवशीं सांपडतो, २०६; सूर्याचें चक्र चोरतो, २३३; वृत्रवधांत विष्णूचें त्याला साहाय्य २३८; त्याचे दहा अवतार, २५२; सप्तहन्, दशहन् २५०; अहल्येचा जार, २५०; त्याचे पराक्रम प्राचीन ह्मणजे हिमान्तरकालीन होत, ३१२.

इराणी आर्य-त्यांचें मूलस्थान, २५६; ध्रुवावरीलच असलें पाहिजे २६१; त्याचा हिमकालांत नाश झाला, २६६.

इलियड—ग्रीक काव्य, त्यांतील दिवस ७६; आदि आर्यांच्या काळच्या गोष्टी, २५१;

इवान्—ची गोष्ट, २७८.

ई.

ईजिप्त—त्यांतील इतिहास काल ८, हिमकालाची खूण नाहीं, १९.

उ.

उंची—समुद्राच्या सपाटीपासून, तिचा हवेवर होणारा परिणाम २६.

उक्षस्—मध्य एशियांतील नदी, २५५, तिच्या कांठच्या आर्य वसाहती, २५५, २५७, २६४ २७२.

उक्थ्य–एक सोमयाग, १६३.
उचथ्य–ऋग्वेदांतील दीर्घतम्याचा बाप, १४०.
उच्चाबुध्न–पाताळ लोकांचें विशेषण, २२४.
उतथ्य–भारतांतील दीर्घतम्याचा बाप, १४०.
उत्तर–हें नांव कां मिळालें, १२४.
उत्तरायण–पूर्वी संपातापासून संपातापर्यंत असे, भास्कराचार्यांची याविषयीं चूक, ७९.
उत्तरकुरु–२७१.
उत्तरगिरि-हिमालयाचें नांव, २६९.
उत्सर्गिनां अयनम्–चांद्रवर्षानुसार होणारें वार्षिक सत्र, १६५.
उर्वशी–१८८.
उषस–वैदिक प्रातःकालिक देवता, वैदिक देवतांत सर्वांत सुंदर, ७८; तिचें स्वरूप स्पष्ट आहे, ७८; सर्व ऋग्वेदाचें पारायण होईपर्यंत ती रहात असे, ७९; ८०,८७ पूर्वी एकसारखी प्रकाशत असे असा उल्लेख, २५; उषा आणि व्युष्टि यांतील फरक, ८०; ती कित्येक दिवस सारखी प्रकाशत असे हें सिद्ध करणारीं तीन वैदिक वचनें,८१, ८४; एक वचनीं आणि अनेक वचनीं असे उल्लेख, ८५; तो बहुमानार्थक नव्हे, ८५; अनेक देवतांमुळेंही नव्हे, ८५; रोजच्या उषांसंबंधानेंही नव्हे, ८६; त्याचा अखंड दीर्घ उषेशीं संबंध आहे, ८६; तैत्तिरीय संहितेंतील तीस उषा, ८७, ९६; ऋग्वेदांतील तीस उषा, ९०; तैत्तिरीय संहितेंतील तीस उषांचा अखंड कलाप, एकाच ठिकाणीं त्या सर्व वाटोळ्या फिरतात, त्यांची ऋग्वेदांतील चक्राकार गति, ९१; वैदिक उषांच्या लक्षणांचा सारांश, ९३; तिच्या अवधींत होणारा फरक, ९३; इंद्रानें तिचा रथ मोडल्याची कथा, ९४; सर्वांवरून ध्रुवावरील वसतीची सिद्धि, ९४.

ऋ.

ऋक्षस्–सप्तऋषि, ६८.
ऋजिश्वन्–इंद्राचा साहाय, ११९;
ऋज्राश्व-अश्विनांचा आश्रित,२२०; शंभर मेषांना मारून वृकीला देतो, १६२,२२०,२२१.
ऋषि–वैदिक, वैदिक सूक्तांच्या उत्तीविषयीं त्यांचें मत, ३०४; पूर्व आणि नवे असा त्यांचा भेद, पूर्व म्हणजे हिमांतरकालीन, नवे म्हणजे हिमोत्तरकालीन, ३१३.

ए.

एकत–पहिला, त्रिताचा बंधु २४२.

एकाष्टका–इंद्राची जननी, १०२.
एकाह–एका दिवसाचा सोमयाग, १०२.
एशिया–उत्तर भागावरील हिमपात १९; चा मध्यभाग, आर्यांचें मूलस्थान तेथें होतें असें मत, २२०; हिंदी व पारसा आर्य एकत्र असतांचें स्थान, २७३, २८७.

ऐ.

ऐतिहासिक–त्यांचो वेदांचा अर्थ करण्याची पद्धति, १८६.
ऐयंगार–नारायण, वैदिक कथांचा अर्थ लावण्याची नाक्षत्र पद्धति, ६६, १९०.
ऐर्यन वइजो–इराणी आर्यांचें मूल वसतिस्थान, ७२; त्यांतील यिमाचा वर, ७२; वंदिदादांतील त्याचें वर्णन, २६३, २६५; तो इराणच्या पूर्वकडील कोणताही देश नव्हे, २६१; अंग्र मैन्यूनें तेथील हवेंत फरक केला, २५६; त्यावरून गेल्या हिमकालांत तेथें झालेल्या हिमप्रलयाचें अनुमान, २६५; त्यांतील दहा महिन्यांचा हिंवाळा, २६०; सात महिन्यांचा उन्हाळा, २६०; सूर्य, चंद्र, तारा यांचें वर्षांतून एकदांच उगवणें आणि वर्षावधि दिवस, २६३; या गोष्टी उत्तरध्रुवाजवळच शक्य आहेत, इराणच्या पूर्वेस नाहींत, २६१; हिमपाताचें वर्णन २६५.

ओ.

ओक-काल, १८.
ऑडिन्–इंद्राशीं साम्य २१५.
ऑडिसी–ग्रीक काव्य, त्यांतील दिवसाचें स्वरूप, ७६.
आडिसस्–हेलिऑसचे बैल खातो १६२.

औ.

और्णवाभ–विष्णूच्या पावलाविषयीं मत, २३८.

क.

कट–खांच, हिवाळ्यांत मृतशरीरें ठेवण्यासाठीं, ७५; कुत्स त्यांत पडला, २०४.
कण्व–प्राचीन यज्ञप्रवर्तक, १३४.
कर्मदेवता, १८६.
कलियुग–आरंभ अवधि व स्वरूप, २९०; एका ठिकाणीं स्थिर होण्याचें युग, ३१०.
कल्प–पौराणिक कालगणनेंतील परिमाण, २७८, २८०; प्रत्येकाच्या आरंभीं वेदाचें पुनरुज्जीवन होतें, ३०७.
कश्यप–मेरूला प्रकाश देणारा आठवा आदित्य, ७१, १३०.

—युग-युग पहा.
काकस–वैदिक वलासारखा ग्रीक दैत्य, १५९.
कान्हेरी–लेण्यांतील लेख, २१०.
कालमापन पद्धति–वैदिक, तैत्तिरीय संहितेंतिल ६६; प्राचीन यज्ञविषयक १७६; प्राचीन रोमन १५९, १७७; प्राचीन सेल्टिक आणि नॉर्स, २७७; प्राचीन ग्रीक २७७; आदि आर्यांची, ध्रुवप्रदेशांतील, २९७, २९८.
कालगणना-पौराणिक, कल्प मन्वंतर महायुग, २८८; कल्पाचा अवधि, २८८; युगाचा अवधि, २८९, २९०; मनुस्मृति आणि महाभारत यांतील २९०, २९१.
कार्तिकेय–कुमार पहा.
कालिदास–१२४; ३०४.
कार्ले–लेण्यांच्या लेखांतील काल सांगण्याची पद्धति, २१०.
कांस्य–करण्याची युक्ति यूरोपांत बाहेरून गेली, १४; आर्यांची फाटाफूट होण्यापूर्वी माहीत होतें, १४.
कुत्स–कटांत सांपडलेला, २०४.
कुभा–काबूल नदी, २७२.
कुमार–पित्याकडे मातेनें नेलेला, २३०; कार्तिकेयाच्या गोष्टीचें मूळ, २३२.
कृत–युगाचा आरंभ आणि अवधि, २९१, भटकण्याचें युग ३१०,
कृत्तिका–काळ, वसंतसंपात त्यांत असतांचा ४८, ६५, २७०, २८७, ३०९,
क्रतु—नियतस्थान, १०१; यज्ञ, १७१.
काळोख–ध्रुवप्रदेशांतील रात्रीचा, ५०; त्यांतील वृत्राचें आश्रयस्थान, १०९; अग्नी त्यांत दीर्घ काळ रहातो, ११०; ध्रुवावरील हिंवाळा व काळोखाचा काळ एकच, २०३–२०४; काळोख आणि प्रकाश यांतील दैनिक आणि वार्षिक झगडा, १९४, २२०; अश्विनांचे आश्रित त्यांत असत, २२२; त्यांत असलेला सूर्य १४१, २३४.

ख.

खगोलार्ध–दक्षिण, ध्रुवावर! नेहमीं अदृश्य; उत्तर, नेहमीं दृश्य, ६०; त्याचें छत्राकार फिरणें, ४८.
खल्कॉस–कांशाचें प्राचीन नाणें, ३०१; त्याचा स्वरशास्त्रदृष्ट्या शुल्कशब्दाशीं संबंध, ३०१.
खाल्डिया–आशियाच्या वायव्येकडील एक पुरातन देश, १७.

ग.

गल्फस्ट्रीम–एक सामुद्र प्रवाह, २६.

गवां अयनम्—दहा महिन्यांचें वार्षिक सत्र, १५७, इत्यादि.
गविष्टि—चा अर्थ, १९०.
गाई—वेदांतील तीन प्रकारच्या, १६०; त्याचें दहा महिन्याचें सत्र, १५८;
गिरि—पर्वत पहा, २१४.
गो—एक सोमयाग, १६३.

घ.

घर्म—एक यज्ञपात्र, १५५.
घोडे—सूर्याचे, अश्व पहा.

च.

चतुर्विंश,—यज्ञ दिवस, १६३.
चत्वारिंश्यां शरदि,—(ऋ. २, १२, ११) अर्थ, २०७.
च्यवान,—खालीं पडणारा सूर्य, अश्विनांचा आश्रित, १४१, १९०, २२०.

ज.

जमीन,—आणि पाणी यांची वांटणी, २६; उंच सखल होणें, हिमकालाचें कारण, २९, ३१.
जिम्हवार,— पाताळाचें विशेषण, २२३.
जैमिनी,—वेदांच्या अनित्यत्वाविषयीं मत, ३०६.
ज्योतिषी—भारतीय, उत्तरध्रुव, ह्मणजे मेरु समजात, ६९; त्यांची कालगणना पद्धति २८८—२८९.
ज्योतिष्टोम,—सोमयाग, १६३.

झ.

झुस्—ग्रीक देवता (सं. द्यौः)२७१.

ड.

डिसेंबर,—प्राचीन रोमन वर्षाचा दहावा महिना, १५८; ध्रुवप्रदेशांतील दहा महिन्यांच्या वर्षाचा दर्शक, १५९.
डिमेटर, भूमाता, २७६.

त.

तडागवासी,—लोक स्वित्झर्लेंडांतील, १७, २२.
तालेमी, प्राचीन ग्रीक शास्त्रज्ञ, २७१

थ.

थाएतौन—अवैस्तिक देवता (वैदिक त्रित आप्त्य) २०१, २४३.

द.

दाक्षिणा,—सूर्याची माता, १२२, १२३.
दक्षिणायन—पितृयान उर्फ देवांची रात्र, ७४; त्यांत येणारें मरण अशुभ, ७५; बादरायणाचें मत ७५.
दंश—प्रपित्वे, (ऋ. ६, २१, ३) चा अर्थ. २३५—२३७.
दशग्व,—अंगिरसांचा एक प्रकार, १३५.
दशमाय,—इंद्राचा शत्रु, २५०.

दशद्यु,–इंद्राचा आश्रित, २५०.
दशमे–युगे, (ऋ. ११५८, ६) चा अर्थ, १४१–१४६.
दशोणी–इंद्राचा शत्रु, २५०.
दाशराज्ञ–युद्ध, २५०.
दिविष्टि १९०.
दीक्षित–शंकर बाळकृष्ण, ४८, २८८.
दीर्घतमा,–महाभारतांतील कथा, १४०. ऋग्वेदांतील कथा, १४१; दहाव्या युगांत ह्मातारा होतो, १४१.
देव–त्यांची षण्मासावधि रात्र, ६९; त्यांचे अकरा प्रकार, २४८ त्यांचा रोगयुक्त असण्याचा काल, २७९.
देवयान–देवांचा मार्ग, ७३, ह्मणजे सहा महिन्यांचा दिवस, ७४, त्यांचा पितृयानाशीं ऊर्फ सहा महिन्यांच्या रात्रीशीं विरोध, ७४.
द्वादशाह,–बारा दिवसांचा याग, १६३.
द्वापर,–पुराणांतील तिसरें युग, त्याचा अवधि व स्वरूप, २८८, २८९, ३०९.
द्वित,–त्रिताचा भाऊ, ४२१.

ध.

ध्रुवप्रदेश–हिमान्तरकालांत वस-तियोग्य होते, २९ ४१; तेथील हिमकालापूर्वीचें विस्तीर्ण भूखंड, ४५; तेथील आकाशाचा देखावा, ४८–५०; तेथील रात्रिदिवसाचें मान, ५१; तेथील उषा, ५२–५३; तेथील विशिष्ट लक्षणाचा सारांश. ६०, ६१.
ध्रुवमंडलस्थ–प्रदेश, ध्रुवापासून भिन्न, ४७; त्यांतील विशिष्ट गोष्टी, ६१.
धिति–प्रार्थना, तिचे सात किंवा दहा प्रकार, २४८.

न.

नवग्व–अंगिरसांचा प्रकार, १३५, अर्थ, १३८; रोमन नोव्हेम् साइत्सशीं साम्य, २७७.
नवपाषाण युग–१५, १७, इ.
नवरात्र–नऊ दिवसांचा यज्ञ, १६३.
नाक्षत्र उपपत्ति–वैदिक कथांची, १९०.
नावप्रभंशन–हिमालयाचें शिखर, २६९.
निर्ऋति–पाताळ लोक १९७.
निविद्–इंद्राविषयीं, २०७
नोवा झेम्ला–ध्रुवाजवळील प्राचीन भूखंडाची खूण, ४४.
न्यूमा–रोमन राजा, दहाचे बारा महिने करतो, १५९, २७५.

प.

पंच जनाः–२९४.

पंजाब–पांच नद्यांचा देश, २१२, सप्तसिंधु त्यांतील नव्हत, २१३.
पंडित–शं. पां., वेदार्थ यत्न, २४७.
पतंजली–वेदांच्या नित्यत्वाविषयीं मत, ३०७.
पथ्यास्वस्ति–वाग्देवता, २७२.
पदपाठ–२३५, सुधारणा, २३७.
पनामा–संयोगिभूमी, जलावृत नव्हती, ३०.
परावत्–प्रदेश, पाताळ, १९९.
पर्वत–मेघ असा अर्थ करण्याचें कारण नाहीं, १९१; २१४.
पितृयान–देवयान पहा, ७३, ७५.
पिप्रु–इंद्राचा शत्रु, १२०, १९०.
पिम्–कॅप्टन, ध्रुवावरील वर्षाचें वर्णन, ५१.
पुरः–अर्थ, १७२.
पुरा–पूर्वीच्या युगांत, म्हणजे हिमान्तरकालांत, ९५.
पुराकल्प–प्राचीन चाल, ११२, ३०
पुराणवस्तुशास्त्र––व्याख्या ३; इतिहासपूर्वकालीन युगें, लोह, कांस्य आणि पाषाण, १४. यांतील धातूंचीं व लोखंडाचीं हत्यारें–पृथ्वीच्या वरच्या थरांत सांपडतात १३, हीं युगें समकालीन नव्हतीं, नवपाषाण आणि पूर्वपाषाण युगांतील भेद १५; बीच, ओक आणि देवदारू यांचे काल १८; पूर्वपाषाण युगाचा आरंभ काल १८; –यांतील नवीन शोधांचा प्राचीन इतिहासावर होणारा परिणाम १०, वेदार्थ मीमांसेवर होणारा परिणाम १२; यांतील शोधांचा सारांश ४०.
पुराणें–त्यांतील युगपद्धति, २८८, २९०.
पुरूरवस्–१८८.
पूषन्–सूर्य, त्याचा रथ, २४७,
पृथ्वी–थरांचें वर्गीं करण, १६ प्राचीन हवामान, २६; आंसाच्या तिरकेपणामुळें ऋतु होतात, २६, आंस पालटणें शक्य नाहीं, ३०; उष्णता कमी होत गेली, ३१; कक्षाकेंद्रच्युति हिमकाल उत्पन्न करते, ३२, ३४; सूर्यापासून मिळणाऱ्या उष्णतेचें मान, ३६; केंद्रच्युतीचें महत्तम मान, ३७; वेदांतील व अवेस्त्यांतील तीन प्रकारची, १९६; सात भेद, २४८; नऊ भेद, २४८; दहा भेद, २४८.
पृष्ठ्य–एक पळह, १६३.
प्रजापति–वेदांचा निर्माता, ३०५.
प्रपित्वे–वेदांतील अर्थ, २३५, २३६
प्रलय–पूर, वेद त्यांत नष्ट होतात, ३०७.
प्रवर्ग्य–यज्ञविधि, १५५.

प्लूटार्क–प्राचीन रोमन वर्षाची, हकीकत. १५९,२७५.

फ.

फ़िनिशियन्-नावाड्यांची गोष्ट, १२३.
फ़ेवशी–वैदिक पितूंचे अवेस्त्यांतील जोडीदार, ७४, २०३,

व.

वलि-दीर्घ तम्याचें रक्षण करणारा, १४०; वामनाचा शत्रु, २३८.
बादरायण–दक्षिणायनांत मृत्यु येणें अशुभ आहे असें नाहीं, ७५;चें वेदांच्या नित्यत्वाविषयीं मत, ३०६.
बाल्डर–नॉर्सपुराणांतील देव,२७८.
बॉल–सर रॉबर्ट्, इंग्लिश ज्योतिषी, ३२; क्रोलची उपपत्ती मानतो, ३६, ३७.
बुंदाहिश–पारशी धर्म ग्रंथ, २६०; ११ व्या प्रकरणांत अनेक ठिकाणीं.
बृहस्पति–अंगिरसांचा पुत्र, सात मुखांचा, १४०; गाईना जिंकून आणितो, १६०; वलाशीं युद्ध करतांना इंद्राला मदत करितो, १९१; मित्राचें रक्षण करितो, २४३; सात मुखांचा आणि दहा शीर्षांचा, २४८; सरमा आणि पणींशीं त्याचा संबंध, २५०; त्याची नष्ट झालेली स्त्री, २५०.
ब्रह्मचारी–सूर्याचें अथर्ववेदांतील विशेषण, २२९.
ब्रह्मदेश––त्यांतील शहरांचीं नावें, २१४.
ब्राह्मण–वैदिक ग्रंथ, यांच्या रचनाकालीं वेद अंशतः समजत नाहींसे झाले होते, ११; त्यांतील मजकुराचें वर्गीकरण, ११२; त्यांचा उद्देश व स्वरूप, १७७, वेदांच्या नित्यत्वाविषयीं त्यांतील मत, ३०५.
बीच–काल, १८.

भ.

भर्तृहरि–२४६.
भास्कराचार्य–दिवसरात्रीच्या अवधींविषयीं विवेचन, उत्तरायणाविषयीं त्यांचें चुकीचें मत, ६९.
भास्कर भट्ट–टीकाकार, १७२.
भांडारकर-डॉ. रा. गो., माढरीपुत्र आणि पुलुमायी यांचा काल, २१०.
भीष्म–प्रसिद्ध भारत वीर, उत्तरायण होईपर्यंत मरावयाचा थांबला, ७५.
मुज्यु–आश्विनांचा आश्रित, २२०, २२५.
भृगु–प्राचीन ऋत्विज् १३४.

भूस्तरशास्त्र–त्यांतील काल व युगें, १६; पुराण वस्तु शास्त्राशीं संबंध, १६; त्यांतील नवीन शोधांचा सारांश, ४१. अवेस्त्यांतील हिमपाताच्या वर्णनाला जोड, २६६.

म.

मॅक्समुल्लर–ऋग्वेदाच्या भाषांन्तराविषयीं मत, ११; समया (ऋ. १, २१३, १०) चा अर्थ, ९१; योजनाचा अर्थ, ९१; क्षपःचा अर्थ, ११०; मानुषा युगाचा अर्थ, १४३; गाईंच्या तीन प्रकारांविषयीं मत, १६०; त्रित शब्दाची व्युत्पत्ति, २४४; वेद आणि इलियड यांतील नांवांचें साद्दश्य, २५१;

मॅक्रोवियस्–रोमन ग्रंथकार, दहा महिन्याचें वर्ष, २७६.

मझ्द–पारशी देवता, त्याचा मार्ग, ७४, २०३.

मत्स्य पुराण–प्रलयाचें वर्णन, २६९.

मनु–स्मृतिकार, ७०, मानवजातीचा मूलपुरुष; प्रलयांतून बचावलेला, २६९; प्राचीन यज्ञप्रवर्तक, १३४.

मनुष्य–चतुर्थ आणि तृतीय युगांतील त्याचें अस्तित्व, १०, १७, ४१.

ममता–दीर्घतम्याची माता, १४०, १४१.

मलय–मनूचें तपश्चर्येचें स्थान २६९.

महाभारत–७०, ७५, ११०, १४०, २१०, २६९, २८८, २८९, २९१, ३०५.

महायुग–चार युगांमिळून होणारा काळ, २६, त्याच्या अवधी विषयीं विवेचन, २९०–२९१.

महावीर–एक यज्ञपात्र, १५५.

महाव्रत–सोमयाग, १६४, त्यांचें लाक्षणिक स्वरूप, १६५.

महीधर–वाजसनेयी संहितेवरील टीकाकार, १४४.

मानुषा युगा–अर्थ, १४२–१४४; क्षपः व हीं मिळून वर्ष होई, १४८.

माधव–टीकाकार, ११५.

मार्तांड–आठवा आदित्य, १३१; व्युत्पत्ति आणि अर्थ, १३३.

मास–महिने, सूर्य प्रकाशाचे, ध्रुवप्रदेशांत वारांहून कमी, १२८, दशमासिक सत्र, १३६; अवेस्त्यांतील, हिंवाळ्याचे आणि उन्हाळ्याचे, २६०.

मीमांसक–वेदांच्या नित्यत्वाविषयीं मत, ३०६.

मेरु–उत्तरध्रुव, देवांचें स्थान ६९, ७१, १३०.

य.

यज्ञ–उर्फ संवत्सर, त्याचें रक्षण आणि प्रजनन, १५५; वार्षिक

पर्यायाचें साधारण स्वरूप, १६३ १६४.
यज्ञिय–प्राचीन १३४.
यम–प्राचीन ऋत्विजांचा त्यांशीं संबंध, १३५.
यिम–अवेस्त्यांतील यम, त्याचा वर ७२, २६३, २६५.
यास्क–निरुक्तकार, कठीण-वैदिक वचनांचा अर्थ करण्याचो पद्धति, १४४; उषेचा बहुवचनीं प्रयोग ८५; सूर्याचे सात किरण, १२८, १८५, १८७, २२१, २३७, २४०, २४६, २८४.
युग–प्राचीन वस्तुशास्त्रांतील,–पाषाण कांस्य आणि लोह १४; पूर्वपाषाण आणि नवपाषाण यांतील भेद १५; भूस्तरयुगाशीं त्यांचा संबंध. १६; त्यांतील जमीन व पाणी यांची वाटणी आणि हवामान, २७.
—चा ऋग्वेदांतील अर्थ, १४६; चे दोन प्रकार, मनुष्यांचीं आणि देवांचीं १२९०; दोहोंचाही अर्थ ' कालावधि ' असा आहे, ' पिढी ' असा नाहीं; १४५; वर्षाच्या एका भागाचा दर्शक महिना १४५; प्रो. रंगाचार्यांचें मत, १४७;
—पूर्व्यम् युगम् १२९, २३२, पूर्वीचें युग ह्मणजे चालू कल्पाच्या पूर्वीचें, ३१३.
—पुराणांतील चार युगाचें चक्र; मिळून १००० वर्षें, २९१; त्यांचे अवधि आणि स्वरूपें; २८९; दशमे युगे; १४१, १४८.

र.

रजस्–अर्थ, १९६; द्विवचनीं प्रयोग, दोन खगोलार्धें, ६८, १९९.
रंगाचार्य–युगाचा अर्थ, १४७.
रंघ–अवेस्त्यांतील नदी, (सं. रसा) २५६, २६८, ७२.
राम–२५१, विष्णूचा अवतार, २३२ वेदांतील मूळ २५२.
रामायण–विष्णूचीं तीन पावलें, २३५; दंतकथात्मक भाग वैदिक, २५०, २५१ त्याचें व इलियडचें मूळ एक, २५२.
रावण–२५१.
राजे–सात आणि दहा, २४८.
रात्र––ध्रुवावरील ५२; देवांचीं, प्रकरण ४ थें.
रात्रिसत्र–रात्रीं करावयाचे सोमयाग, १६९, १७०; रात्रीचा अर्थ, १६६ १६९; त्यांची १ पासून १०० पर्यंतची संख्या, १६६; तिचें कारण १७२.
रात्रिसूक्त–११०.

रेभ-अश्विनांचा आश्रित, २२२, २२५.

ल.

लेटिश्-पुराणें, २०५; उषेचा अनेकवचनीं उल्लेख, २७५.
लिबिया-आफ्रिका, तिला प्रदक्षिणा करणारे फिनिशियन नावाडी, १२३.
लियल--हिमकालोत्तीचें कारण, ३१.

व.

वंदन-अश्विनांचा आश्रित, १४१.
वध्रिमती-आश्विनांची आश्रित, २२१, २२८.
वर-यिमाचा ७२, २६३, २६५.
वराहमिहिर-हिंदु ज्योतिषी, २१०.
वरुण-आपांचा (जलांचा) राजा, १४६, १९५, त्याचा वृक्ष, २२४; क्षपांना आलिगन देणारा, २५२.
वर्तिका-अश्विनांनी मुक्त केलेली, २२०.
वर्ष-ध्रुवावरील, ५१; ध्रुवप्रदेशांतील, ५७, प्राचीन रोमन, १५९, २७५; देवांच्या वर्षांची उपपत्ति, २९०.
वल-इंद्राचा शत्रु, १९०, १९१ इ०
वाक्-३०४, तिचें नित्यत्व.
वाजपेय-सोमयाग, १६३.
वामन-विष्णूचा पांचवा अवतार, २३८, २५२.
वॉरन्-डॉ. ध्रुवावरील मनुष्य जातीचें मूलस्थान, १२, ५१, ५२, २८१, २९३, २९४.
विरूपा-अंगिरसांचें विशेषण, १३९
विरूपे-कमीजास्त अवधीचीं, ११५, ११७.
विप्र-सात आणि दहा, २४८.
विष्णापु-अश्विनांचा आश्रित २२०
विष्णु-वैदिक देवता, तीन पावलें, २३७; तिसरें पाऊल ह्मणजे पाताळ, २३९ शिपिविष्ट नांव, २४०.
विश्पला-अश्विनांची आश्रित, २२१.
विषुवान्-सोमयागांतील मधला दिवस, १६४, १६५.
विवस्वत्-त्याचे दहा, १५६ मनूचा पिता, २७०.
वृषाकपि-हनुमानाचा वैदिक प्रतिनिधि, २५१.
वृत्र-इंद्राचा शत्रु, १०९, १७२, १९०, १९२ इ०; यास्काचें मत, १८७; त्याशीं झालेल्या युद्धाचें चार प्रकारचें स्वरूप, १९० त्याचें गुप्त ठिकाण, १९२; त्याशीं झालेल्या युद्धाची तिथि २०६.

वृत्रहन्–इंद्राचें नांव, १९३ इ.
वृत्रतूर्य-वृत्राशीं झालेलें युद्ध,१९०
वेद–त्यांच्या अर्थाचें नवें साधन, १२, सूक्तें कालक्रमवार लावि-लेलीं नाहींत, ६७; त्याचें नित्यत्व ३०५, ३०७; प्रळयांत नष्ट होऊन कल्पारंभीं पुनः उद्भूत होतात, ३०५.
व्यास–वेदांच्या नित्यत्वाविषयींचयीं मत,३०६; युगांचे अवधि,२९०.

श.

शंकराचार्य-७५वेदांच्या नित्यत्वा-संबंधीं मत, ३०६.
शतक्रतु–इंद्राचें विशेषण, १६९; त्याचा अर्थ शंभर यज्ञांचा स्वामी १७४; शंभर शक्तींचा असा नव्हे १७०; पुराणांतील त्याच्या कथेचें मूळ १७०.
शतपथ ब्राह्मण–त्यांतील प्रलयाचें वर्णन, २६९.
शतरात्र–शंभर रात्रींतील यज्ञ,–ध्रुवावरील दीर्घ रात्रीचा दर्शक, १६९.
शंबर–त्याला इंद्रानें शरदृतूच्या चाळिसाव्या दिवशीं मारिलें १०३, २०७.
शयु–अश्विनांचा आश्रित, २२१.
शरद्–प्राचीन आर्यस्थानांतील शेव-टचा प्रकाशयुक्त ऋतु, २०८;व्युत्पतिदृष्टया अर्थ,२०८, ५०९.
शारदीय–वृत्राचीं शंभर पुरें, त्यांचा अर्थ १९१, १९३, २०६.
शिक्षा-पाणिनीय, एक उतारा ८९.
शिपिविष्ट–विष्णूचें कुसितार्थ नांव, २४; त्याचा ध्रुवोपपत्तीवरून होणारा उलगडा २४१.
शुल्क–प्राचीन आर्यांचें एक नाणें, २०१.
शुष्ण-इंद्राचा शत्रु, त्याचा दहा-नंतर इंद्र वध करितो, २३६.

ष.

षळह–सहा दिवस, याज्ञिक काल-परिणाम १६३.
षोडशी–एकसोमयाग, १६३.

स.

सत्र,–संवत्सर १२७, १५७, सूर्याच्या वार्षिक गतीची प्रतिमा, १५७; गवां अयनम्, प्रकरण ८ वें.
संध्या–युगांमधील, २९.
सतोकरहे–अवेस्त्यांतील वेरेथ्रघ्नाचें विशेषण, १७४.
सप्तवध्रि–अश्विनांचा आश्रित, २२६; सुखरूप प्रसूतीसाठीं प्रार्थना, १२६.
समुद्रौ-१९८, १९९.
सरमा–१३५, २५०.

सरण्यु–१३८.
सरस्वति–३००.
सवितृ–सूर्य, त्याचें तिसरें द्यौ, २४२, १९५;
सप्त–मूलविभाग, २४६, सिंधु, पंजाबांतील नव्हत, २१२–२१४ दिव्य होत, २१५.
सायणाचार्य–वेदांचा अर्थ करण्याची पद्धति, ११, ८१, ८२, ८३, ८५, ८६, ८८, ९०, १००, १०२, १०२, १२०, १४८, १७०, १८५, २०७, २२७, २३५, २३७, २४६, ३८४.
सायवेरिया–४४, २८५.
सिद्धांत शिरोमणी–५८, ६९.
सुदास–२४९.
सोम–रस, १६२.
सोमयाग–१६२.
सूर्य–१४१, २३३, २४७.
सूर्या–२१९.
सूर्य सिद्धांत–६९.
स्वरसाम–दिन, १६४.

ह.

हनुमान–पौराणिक देवता, वैदिक वृषाकपि, २५१.
हप्तहिंदु–सं. सप्तसिंधु, त्याचें मूळ आणि अर्थविवेचन, २१२, २२४–सप्तसिंधु पहा.
हर्क्युलिस–त्याच्या गाई काकसनें पळवून नेल्या, १५९.
हर्मिस–अपॉलानच्या गाई चोरतो, १६२.
हिमालय–अलीकडील भूस्तरयुगांत वर आला. २७.
हिमोत्तरकाल–३७,३९.
हिरण्यहस्त–अश्विनांनीं वध्रिमतीला दिलेला पुत्र, २२१, २२८.
हुकैर्य–अवेस्त्यांतील पर्वत, २००.
हेमंत––शिशिर मिळून जोडऋतु, वार्षिक सूर्यास्ताचा काळ २०९.
हेराक्लिस–सं. सूर्य, ग्रीक देवता, त्याच्या अनेक स्त्रिया, २७५.
हेरोडोटस–ग्रीक इतिहासकार, सहा महिने झोंप घेणारे लोक, ७२; फिनिशियन नाविकांची गोष्ट, १२३;
होमर–ग्रीक कवी, इलियड आणि ऑडिसी, ७६ पृथ्वीच्या आकाराविषयीं मत, २०५; त्याच्या काव्याचें व रामायणाचें मूळ एकच, २५१; खल्कॉसचा उल्लेख ३११.
हेलीऑस–च्या ३५० गाई व मेंढ्या, १६०; ३५० दिवसांचें वर्ष, १६१.

परिशिष्ट.

श्वेतभूमि.

इंदूरच्या होळकर कालेजांतील गणित विषयाचे गुरु कै. प्रो. रा. स. आठवले एम्. ए. यांनीं श्वेतभूमि नांवाच्या लहानशा पुस्तकांत टिळकांच्या ग्रंथांतील सिद्धांताचा अनुवाद करून आर्यांचें वसतिस्थान ध्रुववृत्ताच्या आंत कोणत्या अक्षांशावर असावें हें ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांतील विवेचनाचा सारांश प्रस्तुत ग्रंथाची पुरवणी म्हणून देणें योग्य वाटल्यावरून येथें दिला आहे.

ध्रुवविशिष्ट किंवा ध्रुवमंडलविशिष्ट अशा ज्या गोष्टींचे उल्लेख वेदांत आहेत असें या पुस्तकांत प्रतिपादन केलें आहे, त्या गोष्टींपैकीं प्रो. आठवले यांनीं सर्वांचा विचार न करतां ध्रुवप्रदेशांतील वर्षाच्या निरनिराळ्या भागांचें कमीजास्त होण्याचें प्रमाण आधारभूत धरून त्यावरून त्या स्थानाचा अक्षांशनिर्णय केला आहे. प्रथमतः त्यांनीं ध्रुवबिंदूपासून २० अंशापर्यंत निरनिराळ्या ठिकाणीं वर्षाचें अवयव-प्रमाण कसें असतें हें दाखविण्यासाठीं कित्येक कोष्टकें दिलीं आहेत. ध्रुवप्रदेशांतील वर्षाचे मुख्य अवयव असे:—

	खुद्द ध्रुवावर	६० घटिकांचे कालावधि.
	अवयव.	
१	अखंड दीर्घ दिवस, ...	१८६—१८८
२	अखंड संध्या	४४—४३
३	अखंड दीर्घ रात्र	९१
४	अखंड दीर्घ उषा	४४—४३
	ध्रुवापासून कांहीं अंतरावर.	
१	सूर्यप्रकाश आणि संध्या यांचे पर्याय.	
२	अखंड दीर्घ दिवस.	
३	सूर्यप्रकाश आणि संध्या यांचे पर्याय.	
४	अखंड संध्या.	
५	संध्याप्रकाश आणि काळोख यांचे पर्याय.	

६ अखंड दीर्घ काळोख.
७ काळोख आणि उषा यांचे पर्याय.
८ अखंड दीर्घ उषा.

खुद्द ध्रुवावर हे वर्षाचे भाग कसे होतात हें तिसऱ्या प्रकरणांतील विवेचनावरून दिसून येईलच. पण ध्रुवापासून कांहीं अंतरावरील वर्षाच्या भागांचें थोडें स्पष्टीकरण केलें पाहिजे. खुद्द ध्रुवावर सूर्य प्रथम दिसूं लागला म्हणजे एकसारखा सहा महिने क्षितिजावर असतो, आणि एकदां खालीं गेला कीं, सारखा सहा महिने खालींच असतो. पण थोडें खालीं आलें असतां जरा निराळा प्रकार दृष्टीस पडतो. तेथें सूर्य एकदां दिसूं लागल्याबरोबर कांहीं कालपर्यंत सूर्यप्रकाश आणि संध्याप्रकाश* यांचे पर्याय होतात. त्यानंतर सूर्याची उत्तरक्रांति ध्रुवांशाएवढी (ध्रुवापापासून त्या स्थलाच्या अंशात्मक अंतराएवढी) झाली, म्हणजे दीर्घ दिवस सुरू होतो. पुढें २२ जूनला सूर्याची उत्तरक्रान्ति २३$\frac{१}{२}$° होऊन दीर्घ दिवसाचा मध्य होतो. पुनः कांहीं दिवसांनीं दीर्घ दिवस बंद होऊन सूर्यप्रकाश आणि संध्या प्रकाश यांचे पर्याय होतात. नंतर सूर्य क्षितिजाखालीं गेला कीं, कांहीं काळ सारखा संध्याप्रकाश होतो. पुढें कांहीं दिवस संध्याप्रकाश आणि काळोख यांचे पर्याय होतात. त्यानंतर कांहीं दिवस अखंड काळोख पडतो. हा काळोख संपला कीं, पुनः उषः-प्रकाश आणि काळोख यांचे कांहीं पर्याय होतात. ते झाल्यावर कांहीं दिवस सारखा उषःप्रकाश पडतो आणि मग थोडे दिवसांनीं सूर्य पुनः क्षितिजावर दिसूं लागून प्रकाश आणि संध्या यांचे पर्याय पूर्वीप्रमाणें सुरू होतात.

ध्रुवापासून ७$\frac{१}{२}$ अंशाच्या पुढील स्थळीं कोठेंही पूर्ण काळोखाचा अवधि एका वेळीं २४ तासांहून अधिक असत नाहीं; म्हणून तेथें अखंड संध्याप्रकाश संपला कीं, संध्या आणि पूर्ण काळोख यांचें पर्यायच होतात. म्हणजे वर दिलेल्या वर्षाच्या आठ अवयवांपैकीं अखंड दीर्घ काळोखाचा भाग या स्थळीं कमी होऊन सातच भाग रहातात. असो.

---

* या काळांत सूर्य केव्हां क्षितिजाखालीं गेला तरी तो १६ अंशांपेक्षां अधिक जात नसल्यामुळें तेथें पूर्ण काळोख न पडतां संध्याप्रकाश पडतो.

आतां या निरनिराळ्या अवयवांचे कित्येक अक्षांशावरील अवधि देऊं:—

उ. अ. $८८\frac{०१}{२}$ (ध्रुवापासून $१\frac{०१}{२}$)

अवयव	साठ घटिकांचा एक याप्रमाणें कालावधि.
१ सूर्य आणि संध्या यांचे पर्याय	८
२ दीर्घ दिवस	१७८—१८०
३ सूर्यसंध्यापर्याय	८
४ अखंड संध्या	३५—३४
५ संध्या आणि काळोख यांचे पर्याय	१०
६ दीर्घ रात्र	८१
७ काळोख आणिं उषा यांचे पर्याय	१०
८ अखंड उषा	३५—३४

उ. अ. $८६\frac{०१}{२}$ } यावर हे अवधि अनुक्रमें, १७—१८, १६९—१७१, १८—१७, २४—२३, २४, ६५, २४, २४—२३ असे असतात.

उ. अ. $८५\frac{०१}{२}$ (ध्रुवापासून $४\frac{०१}{२}$)

अवयव	कालावधि.	अवयव	कालावधि
१	२३	५	३१
२	१६३—१६५	६	५६
३	२३—२२	७	३१
४	१९	८	१९—१८

अक्षांश ७५° (ध्रुवापासून १५°).

अवयव	कालावधि.
साधीं अहोरात्रें	३८
संध्यासूर्यपर्याय	४४
अखंड दीर्घ दिवस	१०३
सूर्यसंध्यापर्याय	४४
साधीं अहोरात्रें	३८
पूर्ण काळोख आणि संध्या यांचे पर्याय	९८

या कालमानांचा विचार करतां असें दिसून येईल कीं, रात्रि या शब्दाचा अनेक तऱ्हेनें अर्थ होऊं शकेल.

१ सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा काळ.
२ सूर्यास्तापासून उषेच्या उदयापर्यंतचा काळ.
३ संध्याप्रकाशानंतरच्या काळोखापासून सूर्योदयापर्यंतचा काळ.
४ संध्या आणि उषा वगळून उरलेला खऱ्या काळोखाचा काळ.
५ चोवीस तासांचें एक अहोरात्र.
६ अज्ञान (रूपकानें).

या सहा अर्थांपैकीं शेवटचा आध्यात्मिक असल्यामुळें आपल्या उपयोगाचा नाहीं. कारण आपण नैरुक्त पद्धतीचा अवलंब केला आहे. सोमयागांपैकीं शतरात्र हा मूळ शंभर रात्रींच्या अवधीचा होता हें मूळ पुस्तकांत दाखविलेंच आहे. तर त्यांत रात्रि शब्दाचा अर्थ काय असावा हें पाहिलें पाहिजे.

बऱ्याच उन्नत अक्षांशांत सूर्यप्रकाशरहित काळाचे पांच भाग असतात, ते असेः—

१ अखंड संध्या
२ संध्या आणि काळोख यांचे पर्याय
३ अखंड काळोख
४ काळोख आणि उषा यांचे पर्याय
५ अखंड उषा

या पांच भागांची निरनिराळ्या प्रकारांनीं जुळणी केल्यास ' रात्रि ' शब्द नऊ प्रकारांनीं दर्शविला जाईल. ते असेः—

प्रकार.	एकत्र ध्यावयाचे भाग.	प्रकार	एकत्र ध्यावयाचे भाग.
१	१ ते ५	६	२—३
२	१—४	७	३—५
३	१—३	८	३—४
४	२—५	९	३
५	२—४		

आतां या नऊ प्रकारच्या रात्रींचे कित्येक अक्षांशांवरील अवधि देऊं.

रात्रि प्रकार / ध्रुवांश	१	२	३	४	५	६	७	८	९
०°	१७९	१३५	१३५	१३५	९१	९१	१३५	९१	९१
१°	१७४	१३६	१२९	१३६	९८	९१	१२९	९१	८४
१°½	१७१	१३६	१२६	१३६	१०१	९१	१२६	९१	८१
३°½	१६१	१३७	११३	१३७	११३	८९	११३	८९	६५
१५°	९८	९८	४९	९८	९८	४९	४९	४९	०

ध्रुवबिंदूपासून २० अंशापर्यंतचीं अशीं निरनिळीं कोष्टकें देऊन प्रो. आठवले यांनीं असें दाखविलें आहे कीं, वरील पैकीं नवव्या अर्थाची ह्मणजे पूर्ण काळोखाची रात्र १०० दिनावधीची अशी कोठेंही—खुद्द ध्रुवावरही नाहीं. पूर्ण काळोखाच्या रात्रीचें खुद्द ध्रुवावरील मान ९१ दिवसांचें आहे. उषःकालीं करावयाचे यज्ञ स्वतंत्र असल्यामुळें उषेचा रात्रींत अंतर्भाव करतां येत नाहीं. त्याचप्रमाणें संध्याप्रकाशाचा काळही तींतून काढून टाकिला पाहिजे. असें असल्यामुळें वृत्राचीं किंवा शंबराचीं १०० पुरें, शंभर रात्रिक्रतु इत्यादिकांवरून दिसून येणाऱ्या शंभर रात्री वरील रात्रीच्या अर्थांपैकीं पांचव्या अर्थानेंच घेतल्या पाहिजेत, व त्या $१\frac{१}{२}^{\circ}$ किंवा १५° या ध्रुवांशावरीलच असल्या पाहिजेत. म्हणजे $८८\frac{१}{२}^{\circ}$ किंवा ७५° अक्षांशावरील प्रदेशांत हे १०० रात्रिक्रतू पूर्वी करीत असले पाहिजेत असें झालें. केवळ गणितानें पाहिल्यास तिसऱ्या व सातव्या अर्थानें १०० रात्री $५\frac{१}{२}^{\circ}$ या ध्रुवांशावरही येतात. या साठीं या तीन स्थळांपैकीं खरें कोणतें याचा निर्णय केवळ गणितानें होणार नाहीं. परंतु चतुर्विंश या शब्दाचा खरा अर्थ किंवा अखंड उषेचा अवधि यांवरून तसा निर्णय करतां येईल. १०० दिनावधि अखंड रात्र आणि अखंड दीर्घ उषा या दोन्ही गोष्टी एका ठिकाणासंबंधींच आहेत, असें मानिल्यास वरील पैकीं ७५° अक्षांशावरील प्रदेश वगळावे लागतील. कारण, तेथें अखंड दीर्घ उषा होतच नाहीं. तेव्हां प्रश्न उरला $१\frac{१}{२}^{\circ}$ किंवा $५\frac{१}{२}^{\circ}$ या ध्रुवांशासंबंधानें. परंतु वर सांगितल्याप्रमाणें संध्या व उषा रात्रींतून गाळल्या पाहिजेत, व त्या तशा गाळल्या ह्मणजे $१\frac{१}{२}^{\circ}$ ध्रुवांशावरील प्रदेशच प्राधान्येंकरून शतरात्र यागाच्या उत्पत्तीचें स्थान दिसतात. तरी रात्रिक्रतूंची संख्या शंभरांहून

कमीही असल्यामुळें १°½ च्या खालच्या ध्रुवांशांतही आर्यांच्या वसतीचें अनुमान करावें लागेल. पुढें दिलेल्या कारणांवरून ८६°½ अक्षांशही संभवनीय दिसतो. यानंतर **चतुर्विंश, दशरात्र, द्वादशाह, अभिप्लव, पृष्ठ्य,** इत्यादि संवत्सरसत्रांतील यागांच्या नांवाच्या अर्थावरून या अक्षांशाचें अनुमान होतें असें प्रो. आठवले यांनीं दाखविलें आहे.

चतुर्विंशः—याचा अर्थ चोविसावा. याला आरंभणीय असेंही नांव आहे. तें कां असावें ? हा सत्राचा पहिला दिवस असून त्याला **प्रथम** न ह्मणतां **चतुर्विंश** कां ह्मटलें ? या दिवशीं ह्मणावयाचा **स्तोम** (स्तवन) चोवीस प्रकारचा असल्यामुळें त्याला हें नांव मिळालें असें ब्राह्मणांत सांगितलें आहे. पण हा **स्तोम** तरी चतुर्विंश कां ? वास्तविक सत्रारंभापूर्वीच्या दीर्घ अखंड उषेच्या प्रत्येक दिवशीं एक याप्रमाणें चोवीस दिवसांचे चोवीस स्तोम मूळचे असून आर्य लोक जेव्हां खालीं आले तेव्हां तेथें चोवीस दिवसांच्या अवधीची उषाच नाहींशी झाल्यामुळें ते चोवीस स्तोम सर्व एका दिवशींच ह्मणण्याचा प्रघात पडला; आणि त्या दिवसाला चतुर्विंश असें नांव मिळालें. ह्मणजे चतुर्विंशाचें मूळ चोवीस दिवसांची अखंड उषा जेथें होती, त्या ३°½ या ध्रुवांशावरचें होतें असें झालें.

३°½ या ध्रुवांशावर सत्र संपल्यावर ११३ दिवसांच्या अवधीची रात्र (पांचव्या अर्थानें) येई. या रात्रीच्या मागें पुढें **अतिरात्र** करीत. दशरात्राचा हल्लीं द्वादशाहांत अंतर्भाव करितात. पण तो मूळचा १०० रात्रींतील यज्ञांचाच पूरक असावा. तसें धरिल्यास शतरात्र, दशरात्र, आणि अतिरात्र मिळून जवळ जवळ ११३ रात्रींची संख्या येते. अनेक कारणांमुळें या रात्रींची नक्की मुदत ठरविणेंही प्रेक्षकाला कठीण असल्यामुळें या हिशोबांत एक दोन दिनावधींची तफावत पडल्यास फारशी हरकत नाहीं.

कित्येक ठिकाणीं तीस उषांचा उल्लेख आहे. तो ८८° अक्षांशावरील स्थळांचा दर्शक आहे.

सप्तगु शब्दावरून ८२°½ अक्षांशाचा बोध होतो.

नवग्वांचें ठिकाण ७४°½ अक्षांशावरील असावें. तसेंच **दशग्वांचें** जवळ जवळ ७०° अक्षांशावरील असावें.

—सध्या प्रचलित असलेल्या संवत्सराच्या रचनेंत ३६० याग असून त्यांत रात्रिक्रतूंचा अंतर्भाव होत नाहीं. ही रचना अर्थातच ७७$^{\circ}\frac{1}{2}$ अक्षांशाच्या अलीकडील आहे. संवत्सरसत्रापैकीं फक्त २२ याग कायते न बदलणाऱ्या अवधीचे असून बाकीचे ३३८ पळहांनी भरून काढलेले असल्यामुळें विकारक्षम होत हें १६४ पानांत पूर्वी सांगितलेंच आहे. वर्षाचे दिवस चंद्रावरून व सूर्यावरून मोजल्यास दोहोंत १२ दिवसांचें अंतर पडतें. हें अंतर भरून काढण्यासाठीं चांद्रवर्षांत बारा दिवस अधिक धरून त्याला द्वादशाह ह्मणत असत. या द्वादशाहांत दशरात्राचा अंतर्भाव सध्या करतात. परंतु पूर्वी तसा करीत नसून द्वादशाह हा सत्रांतील बदल न होणारा विशिष्ट भाग असावा. दशरात्राच्या मागाहून तो येत असल्यामुळें त्यांच्या सांनिध्यावरून पुढें द्वादशाहांत दशरात्राचा अंतर्भाव होऊं लागला. असा अंतर्भाव होऊं लागल्यामुळें दशरात्राला रात्रिक्रतूंतून काढून स्वतंत्र अस्तित्व देण्यांत आलें. ८३$^{\circ}\frac{1}{2}$ अक्षांशावर रात्रीचें मान ११२ दिवसांचें असून त्याचे १०० आणि १२ असे दोन भाग करून त्यावरून रात्रिक्रतूंचे सत्र आणि अहीन असे वर्ग करण्यांत आले असावे. अहीनाचा अवधि तेरांहून अधिक दिवसांचा कां नसावा यांचेंही कारण आतां समजण्यासारखें आहे.

६७$\frac{1}{2}$ अक्षांशाचा अलीकडील प्रदेशांत ३६० (३६५) दिवसांचें वर्ष असल्यामुळें तेथें संवत्सरसत्रांत ३६० याग असणें योग्यच आहे. रात्रीचे याग यांत धरावयाचे तर आणखी २६० होतील. परंतु हे रात्रीचे याग १०० च आहेत. हे याग पूर्वी अखंड रात्रींत करीत असत हें पूर्वी दाखविलेंच आहे. यावरून तेव्हां दिनयागांची संख्या २६० असावी असें दिसतें. आतां पुढें दिनयागांची संख्या १०० नी वाढली ती **अभिप्लव** भागांत १०० मिळवून वाढविली असें मानिल्यास अभिप्लवांची पूर्वीची संख्या १७० होती असें दिसेल; कारण सध्या ती २७० आहे. ८६$\frac{1}{2}$ अक्षांशावरील दीर्घ दिवसाचा अवधि १७० आहे ही गोष्ट लक्षांत घेतल्यास अभिप्लव आणि दीर्घ दिवस हे परस्परसंबद्ध असावेत असें सहज दिसून येईल. **अभिप्लवाच्या** व्युत्पत्तीवरूनही हेंच अनुमान दृढ होतें. या शब्दाचा अर्थ वाटोळा (अभि) फिरणारा किंवा वहाणारा (प्लव) असा आहे. सूर्यबिंब क्षितिजावर वाटोळ्या प्रदक्षिणा

करीत असण्याचा काळ म्हणजे जो दीर्घ दिवस तोच **अभिप्लवाचा** काळ होय. अभिप्लवाचा हा अर्थ मान्य झाल्यास **पृष्ठ्य** शब्दाचाही मूळ अर्थ कळून येईल. पृष्ठ्य षळहांची संख्या ११ असून त्यांचे ६६ दिवस होतात. $८६^{\circ}\frac{१}{२}$ अक्षांशावरील सूर्य आणि संध्या यांचे पर्याय आणि अखंड दीर्घ संध्या यांचा काळ ६० दिवसांचा आहे. या दोहोंत दिसणारा सहा दिवसांचा फरक पहाण्याच्या दोषामुळें पडूं शकेल. म्हणून पृष्ठ्य षळहांचा अवधि वर सांगितलेल्या सूर्यसंध्यापर्यायांच्या आणि अखंड संध्येच्या अवधीचा दर्शक असावा असें वाटतें. पृष्ठ्य शब्दाच्या व्युत्पत्तीवरूनही ह्या म्हणण्याला जोर मिळतो. पृष्ठ्य शब्दाचा 'पृष्ठभागावरील' किंवा 'पाठीवरील' असा अर्थ आहे. $८६^{\circ}\frac{१}{२}$ अक्षांशावर सूर्यसंध्यापर्यायकाळांत सूर्याची क्षितिजापासून महत्तम उंची ७ अंशाहून अधिक नसल्यामुळें तो पृथ्वीच्या पाठीवर फिरतो आहेसा वाटेल; केव्हां जरा क्षितिजाखालीं जाईल; केव्हां थोडा वर डोकावेल. तात्पर्य क्षितिजाच्या पाठीवर फिरण्याचा सूर्याचा काळ म्हणजे **पृष्ठ्य** होय.

या प्रमाणें चतुर्विंश, द्वादशाह, दशरात्र, अभिप्लव, पृष्ठ्य, या शब्दांचे अर्थ एकमेकांशीं इतके जुळत असल्यामुळें ($८६^{\circ}\frac{१}{२}$ अक्षांशा संबंधानें) त्यांचें मूळ $८६^{\circ}\frac{१}{२}$ अक्षांशावर होतें असें म्हणावयास मुळींच हरकत नाहीं. हे शब्द भाषेंत एकदां रूढ झालेले असल्यामुळें बदललेल्या परिस्थितींतही ते तसेच राहिले. परिस्थितींत बदल झाल्याबरोबर जुनें सर्व टाकून सगळें नवें घेण्याचा कोणाचा प्रघात नाहीं. या निसर्गसिद्ध पुराणप्रियतेमुळें अगदीं नवीन परिस्थितींतही जुना इतिहास उपलब्ध होण्याचें साधन मिळणें शक्य झालें आहे. आमचे पूर्व ऋषि पुराणाप्रिय नसते तर आज आम्हाला या गोष्टी कळण्याला मार्गच राहिला नसता.

REFBK-0001515

